
सौआपए
आणि
डिव्हिजन
या दोन
अमेरिकी गुप्तचर संघटनांतील
स्पर्धेचे रूपांतर
इराण-इस्रायल युद्धात झाले.
यामध्ये
विमानहल्ले घोषविण्यासाठी
जिवाची बाजी लावणारे
अधिकारी यांची
चित्तथरारक संघर्षकथा
मेहता पब्लिशिंग हाऊस
रुल्स ऑफ डिसेप्शन्स
मूळ लेखक
ख्रिस्तोफर रिच
अनुवाद
दीपक कुळकर्णी

ख्रिस्तोफर रिच

सीआयए
आणि
डिव्हिजन
या दोन
अमेरिकी गुप्तचर संघटनांतील
स्पर्धेचे रूपांतर
इराण-इसापल युद्धात झाले,
यामध्ये
विमानहल्ले घोषविण्यासाठी
जिवाची बाजी लावणारे
अधिकारी यांची
चित्तथरारक संघर्षकथा

मेहता पब्लिशिंग हाऊस

रुल्स ऑफ डिसेप्शन्स

मूळ लेखक
ख्रिस्तोफर रिच
अनुवाद
दीपक कुळकर्णी

ख्रिस्तोफर रिच

ख्रिस्तोफर रिच याचा जन्म १२ नोव्हेंबर, १९६१ला टोकिओमध्ये झाला. वयाच्या चौथ्या वर्षी तो कुटुंबासमवेत लॉस एंजलिसला आला. १९७९साली त्याने हार्वर्ड स्कूलमधून पदवी संपादन केली. त्यानंतर वॉशिंग्टन डी.सी.ला जाऊन तिथल्या जॉर्जटाउन विद्यापीठातून त्याने आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या विषयातही पदवी मिळवली. दोन वर्षं त्याने स्टॉकब्रोकरचा व्यवसाय केला, पण त्यात त्याचे मन रमले नाही. स्वित्झर्लंडला जाऊन तो युनियन बँक ऑफ स्वित्झर्लंडमध्ये नोकरी करू लागला. सात वर्षं बँकेत नोकरी केल्यावर त्याने अचानक लेखक व्हायचं ठरवलं. तोपर्यंत त्याने एखादी लघुकथादेखील लिहिली नव्हती किंवा इंग्रजी वाङ्मयाचा नीट अभ्यासही केला नव्हता. पण त्याला वाचनाचं जबरदस्त वेड होतं.

आपण नक्की लेखक होऊ याचा ठाम विश्वास त्याला होता व त्याच्या पत्नीने त्याच्या या निर्णयाला मनापासून पाठिंबा दिला. त्यानंतर तो ऑस्टिनला स्थलांतरित झाला व तिथेच त्याने 'नंबर्ड अकाउंट' ही त्याची पहिली कादंबरी लिहिली.

'नंबर्ड अकाउंट' आणि 'द पॅट्रियट्स क्लब' या त्याच्या दोन गाजलेल्या कादंबऱ्यांमुळे न्यू यॉर्कच्या सर्वाधिक खप असलेल्या लेखकांमध्ये त्याचं नाव झळकलं व २००६साली सर्वोत्कृष्ट खळबळजनक कादंबरीकाराचं पारितोषिक देऊन त्याला सन्मानित करण्यात आलं. पत्नी व मुलांसह तो सध्या दक्षिण कॅलिफोर्निया येथे राहत आहे.

Christopher Reich

आवर्जून वाचावे असे काही

अत्याचार करून, ब्लँकेटमध्ये गुंडाळून, तरुण मुलींची प्रेतं
कडेला वेगवेगळ्या ठिकाणी टाकली जातात...
एका सूडसत्राचा घेतलेला शोध



मूळ लेखिका
करेन रोझ

अनुवाद
दीपक कुळकर्णी

सच्च्या हिचकॉकियन परंपरेनुसार ख्रिस्तोफर रिच, डॉ. जोनाथन रॅन्सम या आपल्या बेसावध असलेल्या नायकाला एका आंतरराष्ट्रीय कटकारस्थान व भयानक जीवघेण्या काळोखी विश्वात बिनदिक्कतपणे ढकलून देतो. रॅन्समच्या पत्नीचा आल्प्स पर्वतामध्ये स्किइंग करताना अपघाती मृत्यू झाल्यानंतर त्याला समजतं की, ती आपल्या नकळत गुप्तहेराचं दुहेरी जीवन जगत होती. आपल्या पत्नीच्या पूर्वायुष्याचा छडा लावण्यासाठी त्याने सुरू केलेल्या शोधाला पाहता-पाहता गंभीर वळण लागतं आणि त्यातून सुरू होतं, एक भयानक नाट्य. जीवन व मृत्यूच्या या थरकाप उडवणाऱ्या पाठलागात जीव मुठीत धरून जोनाथनला उत्तर युरोपभर लपतछपत जगावं लागतं. आकर्षक शैली, अचूक प्रसंग व ओघवत्या संवादातून ख्रिस्तोफर रिच वाचकाला अक्षरशः खिळवून ठेवतो.

– पब्लिशर्स विकली

रिचची कादंबरी सुरू होते तीच अक्षरशः एका कडेलोटाच्या क्षणापासून व तिथून ज्या धक्कादायक वळणावर तिचा शेवट होतो, तिथपर्यंत ती वाचकाला जराही निःश्वास सोडू देत नाही. डॉ. जोनाथन रॅन्सम व त्याची पत्नी एम्मा आल्प्समध्ये गिर्यारोहणासाठी गेले असताना एम्माचा दरीत कोसळून मृत्यू होतो. हादरलेल्या जोनाथनच्या हाती एक पाकीट पडते; ज्यात एम्मासाठी भेट पाठवलेल्या सामानाच्या रेल्वे पावत्या असतात. सामान ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या जोनाथनवर प्राणघातक हल्ला होतो; पण सुदैवाने जोनाथन त्यातून बचावतो. आपल्या पत्नीला इतक्या मौल्यवान भेटवस्तू कोणी व का दिल्या याचा छडा लावण्याचा डॉ. रॅन्सम चंग बांधतो व त्यातून वाढत जाणाऱ्या संशयाचं वर्तुळ भेदून तो सत्यापाशी कसा पोहोचतो हे मूळातूनच वाचायला हवे.

– बुकलिस्ट

उत्तम, उत्कंठावर्धक, उत्कट लेखन...!

– वॉशिंग्टन पोस्ट

माझा विमानप्रवास यापूर्वी इतक्या पटकन कधीच संपला नव्हता! 'रुल्स ऑफ डिसेप्शन' ही रहस्यमय खळबळजनक व मनाची पकड घेणारी कादंबरी आहे की तिचा शेवट काय होणार या अधीर उत्सुकतेने प्रवासभर मी श्वास रोखून फक्त पानांमागून पानं उलटत गेलो. क्षणाक्षणाला कथानकाला कलाटणी देणाऱ्या घटना, गडद होत जाणारं रहस्य... उत्कृष्ट कादंबरी!

– टेस गेरिस्टन

रुल्स ऑफ डिसेप्शन्स

सी.आय.ए. आणि डिव्हिजन या दोन अमेरिकी गुप्तचर संघटनांतील स्पर्धेचे रूपांतर इराण-इस्त्रायल युद्धात झाले. यामध्ये विमान हल्ले थोपविण्यासाठी जीवाची बाजी लावणारे अधिकारी यांची चित्तथरारक संघर्ष कथा.

लेखक

ख्रिस्तोफर रिच

अनुवाद

दीपक कुळकर्णी

मेहता पब्लिशिंग हाऊस

RULES OF DECEPTION by CHRISTOPHER REICH

Original English Language Edition Copyright Christopher Reich (c) 2008
All rights reserved including the right of reproduction in whole or in part in any form. This Edition Published by Arrangement with InkWell Management.
Marathi Language Translation
Copyright © 2014 By Mehta Publishing House, Pune

Translated into Marathi Language by Deepak Kulkarni

रुल्स ऑफ डिसेप्शन / अनुवादित कादंबरी

अनुवाद : दीपक कुळकर्णी
१ निशिगंधा पार्क हौ. सो., प्लॉट नं ३२, आयडियल कॉलनी,
कोथरूड, पुणे – ४११०२९.

✆ ९८२२२५६२४८ Email : deepak.kulkarni1409@gmail.com

मराठी अनुवादाचे व प्रकाशनाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी पुणे – ४११०३०.

ज्यांनी मला भरभरून आनंद दिला

त्या माझ्या मुली

नॉइल व कॅटजा यांना –

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the Publisher and the licence holder. Please contact us at **Mehta Publishing House,** 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 411030.

✆ +91 020-24476924 / 24460313
Email : info@mehtapublishinghouse.com

production@mehtapublishinghouse.com

sales@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com
♦ या पुस्तकातील लेखकाची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

उपोद्घात

थंड वाऱ्याची एक मंद लाट हळुवारपणे त्या विस्तीर्ण पठारावर पसरत गेली आणि त्या लाटेवर आरूढ होत एक रंगीत फुलपाखरू अवकाशात अलगद तरंगू लागले. त्या इवल्याशा कीटकामध्ये विलक्षण चैतन्य होते. वाऱ्याशी छचोरपणा करत कधी ते खोलवर सुरकांडी मारायचं तर दुसऱ्याच क्षणी वर झेपावत हवेत एक सुंदर वर्तुळ रेखाटायचे. त्याची ती लयबद्ध होणारी हालचाल खरोखरच विलोभनीय होती. नाजूक सौंदर्याचा तो एक अप्रतिम नमुना होता. फुलपाखराचे पंख गडद पिवळ्या रंगाचे होते व त्यावर काळ्या रंगाची नक्षीदार जाळी होती. त्या दुर्गम प्रदेशात इतकं सुंदर फुलपाखरू सापडणं दुरापास्त होते. म्हणूनच की काय त्या पाखराला नावही आगळंवेगळंच दिलेलं होते. पॅपिलिओ पॅनोप्टस. नेत्रसुखद फुलपाखरू.

ते मुक्तपणे विहरत होते. संरक्षित रस्त्यांवरून, विद्युतभारित कुंपणावरून तर कधी काटेरी तारांमधून ते स्वच्छंदपणे उडत होते. कुंपणापलीकडे रानफुलांचं शेत पसरलं होते. त्या फुलांमधलं वैविध्य आणि त्या फुलांचे लुभावणारे रंग डोळे दिपवून टाकत होते. दूरवर कुठेही एकदेखील वास्तू दिसत नव्हती. एखादं घर, धान्याचं कोठार, इमारत काही काही नव्हते. गच्च दाबून बसवलेली ओल्या मातीची टेकाडंच फक्त नुकत्याच संपवलेल्या ताज्या कामाची साक्ष देत होती. पण फुलांच्या गर्द ताटव्याखाली झाकली गेलेली ती टेकाडंदेखील दृष्टीस पडणं धड कठीण झाले होतं.

इतका दूरचा प्रवास करूनही, त्या फुलपाखराने फुलांकडे मात्र साफ दुर्लक्ष केलं होतं. फुलांमधले सुगंधित परागकण शोषण्याच्या किंवा फुलांमधला रसाळ मकरंद चाखण्याचा त्याने जराही प्रयत्न केला नव्हता. उलट हवेमध्ये उंच उंच उडण्याकडेच त्याचा कल दिसत होता. जणूकाही त्याला हवी असलेली ऊर्जा त्या हवेमधूनच त्याला मिळत होती.

आणि अखेर शिशिरातल्या त्या फिकट आभाळाखाली चमचमणाऱ्या एका पिवळ्या झेंड्यावर ते विसावलं. मात्र थांबतानाही त्याने एखाद्या सुवासिक जांभळ्या फुलाची निवड केली नव्हती. पठाराला एका भव्य, उत्तुंग पर्वताने वेढलं होतं व त्या डोंगरातून उगम पावलेले अनेक निर्झर वाहात वाहात माळरानापर्यंत पोहोचले होते. पण फुलपाखराने त्यातलं मधुर जल एकदाही प्यायलं नाही. एक चौरस किलोमीटर परिमितीच्या त्या खास बांधलेल्या कुंपणाबाहेर ते किंचितही भरकटलं नाही. रंगीत शेतावरून भिरभिरण्यातच ते संतुष्ट राहिलं. दिवसांमागून दिवस आणि रात्रींमागून रात्री, तो एवढासा जीव काहीही न खाता-पिता अविश्रांतपणे, अखंड उडत राहिला.

सात दिवसांनी 'नशी' नावाचं झंझावती वादळ अचानक अवतरलं. प्रचंड वेग आणि ताकद

असलेल्या त्या घोंघावणाऱ्या वाऱ्याच्या आवाजाने अवघ्या कडेकपारी दणाणून गेल्या. त्या तुफानाचा तडाखा इतका जबरदस्त होता की, वाटेत येणाऱ्या प्रत्येकाची धूळदाण उडवत ते तितक्याच बेफामपणे पठारावर आदळलं. त्या इवल्याशा जीवामध्ये इतक्या मोठ्या निर्दयी वादळाशी मुकाबला करण्याची ताकद कुठून असणार? कुंपणाभोवती गोलाकार फेऱ्या मारून ते आधीच दुर्बल झालं होतं. वाऱ्याच्या एका भोवऱ्याने त्याला अल्लद उचललं, गरागरा फिरवलं आणि जमिनीवर भिरकावून दिलं. फुलपाखराच्या नाजूक देहाच्या ठिकऱ्या उडाल्या.

गस्त घालणाऱ्या एका सैनिकाला धुळीमध्ये पिवळं काहीतरी चमकताना दिसलं व त्याने जीप थांबवली. पायाच्या घोट्यापर्यंत वाढलेल्या गवतावर गुडघे टेकवत तो सावधपणे ती आकृती निरखू लागला. असं फुलपाखरू त्याने यापूर्वी कधीही पाहिलं नव्हतं. पहिली गोष्ट म्हणजे ते आकाराने चांगलंच मोठं होतं. त्याचे पंख कडक होते व त्याच्या रेशमासारख्या मुलायम त्वचेतून कागदाइतक्या पातळ धातूचे तुकडे बाहेर डोकावत होते. त्याची दुभागलेली लुसलुशीत छाती, एका हिरव्या तारेने जोडलेली होती. मनाच्या गोंधळलेल्या अवस्थेत त्याने ते फुलपाखरू उचललं व त्याची तो काळजीपूर्वक तपासणी करू लागला. स्वतःला तो आधी एक अभियंता मानत होता व मग एक सैनिक. तेही काहीशा नाखुशीनेच. त्याने जे काही पाहिलं होतं, त्यामुळे तो पार हादरून गेला होता.

फुलपाखराच्या छातीत एक अॅल्युमिनियमची इटुकली पेटी होती. त्या पेटीत एक बॅटरी लपवलेली होती. बॅटरीची लांबी व एकूण आकार जेमतेम तांदुळाच्या दाण्याएवढा असेल. ती बॅटरी एका मायक्रोवेव्ह ट्रान्समीटरला जोडलेली होती. त्याने फुलपाखराच्या नाकाजवळचा भाग आपल्या अंगठ्याच्या नखाने खरवडला. त्याच्या हातात एकदम केसाएवढ्या तंतूसदृश वायर्सचा एक पुंजकाच आला.

नाही... शक्य नाही, तो स्वतःशीच पुटपुटला. छे. असं नाही होऊ शकत. निदान इतक्या लवकर तर नाहीच नाही.

तो आपल्या जीपच्या दिशेने धावत सुटला. त्याच्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं. तो मनाला समजावत होता. उलटसुलट तर्क लढवत होता. पण मनाला काहीच पटत नव्हतं. दगडाला ठेचकाळल्याने, त्याचा तोल गेला व तो मातीत कोलमडला. मात्र दुसऱ्याच क्षणी त्याने स्वतःला सावरलं. तो उठून उभा राहिला आणि वेगाने जीपकडे जाऊ लागला. आता प्रत्येक मिनिट महत्त्वाचं होतं.

जीपमध्ये बसून आपल्या बॉसला फोन करताना, त्याचा हात अक्षरशः थरथरत होता.

“त्यांनी आपल्याला शोधून काढलंय.”

१

जोनाथन रॅन्समने आपल्या गॉगल्सवर जमा झालेला बर्फ चक्क हाताने ठोकून साफसूफ केला आणि मग आकाशाकडे एक नजर टाकली. परिस्थिती याहून थोडी जरी बिकट झाली तर मात्र आपल्यावरचे संकट अटळ असणार. त्याने स्वत:शीच विचार केला. हिमवर्षाव कमालीच्या वेगाने होऊ लागला होता. झोंबणाऱ्या वेगवान वाऱ्यामुळे त्याच्या गालावर बर्फाचे व दगडांचे बारीक तुकडे अक्षरश: आदळत होते. आल्प्सच्या त्या खोल दऱ्यांभोवती वर्तुळाकार वेढलेली, त्याच्या नित्यपरिचयाची हिमशिखरे आता काळजात धडकी भरवणाऱ्या काळ्याकुट्ट ढगांच्या आरमारामागे गुडुप झाली होती.

पुढे झुकत त्याने सावकाशपणे चढायला सुरुवात केली. एक स्की-बूट उचलला आणि त्यानंतर दुसरा. अतिशय संथ गतीने व सावधपणे तो कडा चढून वर आला. बुटांना आतून सील प्राण्याच्या केसाळ कातड्याचे अस्तर लावले होते. त्यामुळे बर्फामध्ये पाय घट्ट रोवायला सोपे जात होते व लांब ढांगाही टाकता येत होत्या. तो सदतीस वर्षांचा उंचापुरा व तगडा इसम होता. त्याची कंबर सडपातळ होती आणि खांदे चांगलेच रुंद होते. उबदार लोकरी टोपीखाली त्याचे अकाली पिकलेले केस लपून गेले होते. काळ्याभोर डोळ्यांना गॉगल्सचे संरक्षण होते. दोन दिवसांच्या दाढीचे खुंट वाढलेले गाल आणि जाड ओठ – त्याच्या शरीराचा एवढाच भाग समोरच्याला दिसू शकत होता. गस्तीवरचे सैनिक वापरतात तसले जॅकेट त्याने घातले होते. ते त्याचे जुने व लाडके जॅकेट होते. त्याच्याविना त्याने एकदाही पर्वतारोहण केले नव्हते.

काळी पँट व लाल जॅकेट परिधान केलेली त्याची बायको – एम्माही – त्याच्याच थोड्या खालच्या बाजूला होती. एकेक कडा चढताना तिची पुरती दमछाक होत होती. तिचा चालण्याचा वेग फारच विचित्र होता. ती तीन पावले टाकायची व मटकन खाली बसायची. तर कधी दोन पावलांनंतरच दम खात विश्रांती घ्यायची. अजून निम्मे अंतरही पार झाले नव्हते आणि आत्ताच ती पूर्ण गळपटून गेली होती.

जोनाथनने आपले बूट काटकोनात वळवले आणि हातातल्या पोलच्या काठ्या बर्फात रुतवल्या. “आहे त्या जागीच उभी राहा.” तो ओरडला. त्याने प्रतिसादाची वाट पाहिली. पण भोवतालच्या घोंघावणाऱ्या वाऱ्यामुळे त्याच्या बायकोला त्याचा आवाज ऐकूच आला नाही. ती धडपडत चढतच राहिली.

जोनाथन पुन्हा खाली उतरू लागला. एका बाजूला दणकट खडक तर दुसऱ्या बाजूला खोल दरी असलेला तो कडा निमुळता व अरुंद होता. पार पायथ्याशी, टेकड्यांच्या उतारावर अरोसा नावाचे वसलेले खेडे अगदी अंधूकपणे दिसत होते. स्वित्झर्लंडच्या पूर्वेकडील ग्राऊबंडन जिल्ह्याचा तो प्रदेश होता. दरीतून आता ढगांचे कळप झपाट्याने वर येत होते.

“इथला प्रवास नेहमीच इतका खडतर असतो?” तो तिच्याजवळ पोहोचल्यावर

एम्माने विचारले.

“गेल्या खेपेस तर तू माझ्या आधी वर जाऊन पोहोचली होतीस.”

“गेल्या खेपेस म्हणजे आठ वर्षांपूर्वी. मी आता म्हातारी होत चाललीये.”

“होय तर! बत्तिसाव्या वर्षीच तू ही भाषा बोलायला लागलीस. जरा माझ्या वयाची होण्याइतकी तग धर. आयुष्याचा खरा उतार तिथे सुरू होतो.” त्याने बॅगमध्ये खोलवर हात घालून पाण्याची बाटली बाहेर काढली व तिच्या हातात दिली. “कसं वाटतंय तुला?”

“अर्धमेली झालेय.” हातातल्या काठ्यांवर ती पोक काढून उभी राहिली. “मदतीसाठी शेरपांना बोलवायची वेळ आलीय.”

“या देशात शेरपा नसतात. इथे ‘बुटके’ असतात. म्हातारे बुटके. दिसायला तरतरीत वाटतात, पण त्यांच्या अंगात, शेरपांच्या मानाने निम्मीही ताकद नसते. त्यांच्यावर भरवसा ठेवण्यात काही अर्थ नाही. आपण आपल्याच ताकदीवर निभवू या.”

“तुला नक्की खात्री वाटते?”

जोनाथनने मान डोलावली. “तुला काहीही झालेलं नाही. तुझ्या अंगातली उष्णता थोडी जास्त वाढलीय. ती डोक्यावरची कॅप जरा मिनिटभर काढ आणि जितकं पिता येईल तितकं पाणी पी.”

“जशी आपली आज्ञा डॉक्टर.” एम्माने लगेच आपली लोकरीची कॅप काढली व ती घटाघट पाणी पिऊ लागली.

जोनाथनच्या डोळ्यासमोर आठ वर्षांपूर्वीची एम्मा आली. दोघांचे एकत्र असे ते पहिलेच गिर्यारोहण होते. नुकतीच शल्यचिकित्सक ही पदवी प्राप्त करून तो आपल्या पहिल्यावहिल्या नेमणुकीसाठी आफ्रिकेत रुजू झाला होता. तर त्या वेळेस ती एक बाणेदार स्वभावाची इंग्लिश परिचारिका होती. एम्माला, आपल्या नववधूला घेऊन जोनाथन प्रथमच आल्प्सला आला होता. यापूर्वी तू कधी ट्रेकिंग केले होतेस? ह्या त्याच्या प्रश्नावर, ‘फारच क्वचित’ असे उत्तर तिने दिले होते. पण तिच्या बोलण्याचा रोख मात्र असा होता की अनुभव नसला म्हणून काय फरक पडतो? आपले म्हणणे तिने लगेच खरेही करून दाखवले होते. त्याला झपाट्याने मागे टाकत, एखाद्या कसलेल्या गिर्यारोहकाप्रमाणे ती त्याच्या खूप आधी शिखरावर जाऊन पोहोचली होती. जोनाथनच्या डोळ्यांसमोरून तो सारा प्रसंग तरळून गेला.

“हं. आता जरा बरं वाटलं.” आपल्या पिंगट केसातून हात फिरवत एम्मा म्हणाली.

“नक्की ना?”

एम्मा हसली, पण तिच्या तपकिरी डोळ्यांत थकून गेल्याची झाक स्पष्ट दिसत होती. “सॉरी.”

“कशाबद्दल?”

“हवी तेवढी तंदुरुस्त न राहिल्याबद्दल. आपल्या दोघांचाही वेग कमी केल्याबद्दल... आणि गेल्या काही वर्षांत तुझ्याबरोबर इथे न आल्याबद्दल.”

“वेडी कुठली. तू आलीस ह्यातच मी खूप खूश आहे.”

एम्माने मान वर केली आणि त्याच्या ओठांवर ओठ टेकवले. “मीसुद्धा.”

तो आता गंभीर झाला होता. “आता जरा नीट ऐक. मला वाटतंय, वातावरण फारच बिघडत चाललंय. आपण परतावं असा मी विचार करतोय.”

एम्माने त्याच्या दिशेने पाण्याची बाटली उडवली. “काय बोलतोयस तू मर्दा? अरे, ह्याच पर्वतावर एकदा मी तुला हरवले होतं. आज आणखी एकदा हरताना तू स्वत:ला फक्त पाहात राहा.”

“कितीची बेट लावतेस?”

“त्याहून जरा मोठं आव्हान दे.”

“अस्सं?” जोनाथन घोटभर पाणी प्यायला. बऱ्याच दिवसांनी तिला असे खटयाळपणे बोलताना पाहून त्याला मनातून खूप बरे वाटले होते... किती बरे दिवस झाले असतील त्या गोष्टीला? सहा महिने? छे. निदान एक वर्ष तरी नक्कीच. एम्माचे डोके वारंवार दुखू लागले होते आणि तासन्तास ती स्वत:ला अंधाऱ्या खोलीत कोंडून घ्यायची. ह्या डोकेदुखीला नेमकी कधी सुरुवात झाली याची तारीख त्याला आठवत नव्हती. पण पॅरिसला यायच्या आधीची ती गोष्ट होती. गेल्या जुलैला ते पॅरिसमध्ये आले होते.

जॅकेटची बाही मागे सरकवत त्याने हातावरच्या घडयाळातली वेगवेगळी बटणे दाबली.

समुद्रसपाटीपासूनची उंची ९,२०० फूट. तापमान : उणे १० सोल्सियस.

वायुभार : ९०० मिलीबार्स व सेकंदासेकंदाला खालावत जाणारा.

त्याने सर्व आकडे पुन्हा पुन्हा तपासले. त्याचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. हवेचा दाब कमालीचा घटला होता.

“काय झालं?” एम्माने विचारले.

त्याने पाण्याची बाटली सॅकमध्ये सरकवली. “हे वादळ निवळेल असं वाटत नाही. उलट त्याचा जोर वाढण्याचीच चिन्हं अधिक दिसताहेत. हे बघ, पुढे जायचा मार्ग आपल्याला आधीच नीट आखून घ्यायला हवा. तुझा, न परतण्याचा निर्णय अजूनही कायम आहे ना?”

एम्माने मानेनेच होकार दिला. पण ह्या वेळेस त्यात घमेंड नव्हती. निर्धार मात्र कायम होता.

“ठीक आहे तर,” तो म्हणाला. “तू पुढे हो. मी तुझ्या पाठीमागेच राहतो. फक्त एक मिनिट थांब. सर्व वस्तू मी तपासून घेतो व घट्ट बांधून टाकतो.”

त्याने गुडघे टेकून सामान बांधण्यास सुरुवात केली, तोच एक बर्फाचा भला मोठा तुकडा घरंगळत खाली येऊन त्याच्या बुटावर आदळला. त्याचे स्की-बूट बर्फात रुतून गेले. त्याचे पाय गारठयामुळे थरथरू लागले व सामान बांधायचे भानही त्याला उरले नाही.

तो सावधपणे उठून उभा राहिला. खांद्याच्या वरच्या बाजूला, फर्गा नॉर्डबंडची भिंत होती. बर्फाच्छादित खडकांची व साधारण हजार फूट उंचीची. तिच्या अगदी वरच्या बाजूला चुनखडीच्या सुळक्याचे एक देखणे शिखर होते . त्याने वर निरखून पाहिले. सतत वाहणाऱ्या वाऱ्यांनी, त्या भिंतीच्या पायथ्याशी बर्फाचा थर रचत एक भलीमोठी तटबंदीच उभारली गेली होती. पण ती पोकळ व भुसभुशीत दिसत होती. कोणत्या क्षणी

ती खाली कोसळेल याचा भरवसा नव्हता.

जोनाथन मनातून घाबरला होता. तसा तो एक अनुभवी गिर्यारोहक होता. त्याने आल्प्स, रॉकीज यासारखे पर्वत अनेक वेळा सर केले होते. एका मोसमात तर तो हिमालयही चढलेला होता. ट्रेकिंग करताना अनेकदा त्याच्यावर जिवावरचे प्रसंग गुदरले होते. बरोबरचे साथीदार माघारी फिरले, पण त्याने मात्र न डगमगता त्या प्रसंगांवर मात केली होती. म्हणून तर कुठल्याही संकटाचा अंदाज त्याला सर्वांच्या आधी येत असे.

"तुला जाणवतंय?" त्याने विचारले. "वर बघ, तो बर्फाचा बांध कोसळायच्या बेतात आहे."

"मला काहीतरी ऐकू येतंय. तुला?"

"नाही."

त्याच क्षणी ढगांचा प्रचंड गडगडाट शिखरा-शिखरांमधून दणाणत गेला. अख्खा पर्वत हादरला. फर्गावरच्या शिखरांची त्याला आठवण झाली. तिथे हजारो टन वजनाचे महाकाय हिमसुळके तयार होत असत. त्याच्या लक्षात आले, तो ढगांचा गडगडाट नव्हता. ते सुळके आता तडकू लागले होते व त्यामुळे त्या सुळक्यांच्या पायथ्याशी साठलेला बर्फ सैल व मोकळा होऊ लागला होता.

जोनाथनने पुन्हा पर्वतावर नजर रोखली. यापूर्वीही एकदा तो एका बर्फलोटात सापडला होता. तब्बल अकरा मिनिटे बर्फाखाली गाडला गेला होता. काळोखामध्ये त्याला हाताचे बोटदेखील हलवता येत नव्हते. थंडी तर इतकी जीवघेणी होती की, आपला पाय जांघेमधून निखळलाय व पाठीमागून दुमडला गेल्याने, गुडघा कानाजवळ आलाय हेही त्याला जाणवले नव्हते. सुदैवाने तो अगदी बर्फाखाली जात असताना, त्याच्या जॅकेटवरचा क्रॉस त्याच्या मित्राने पाहिला व त्याला बाहेर काढण्यात आले.

दहा सेकंदाने तो आवाज हळूहळू विरत गेला. वाऱ्याचा जोरही कमी झाला. वातावरण मात्र कमालीचे गूढ व भीतिदायक झाले होते. काहीही न बोलता त्याने दोरखंडाची गुंडाळी सोडली व आपल्या कमरेभोवती बांधली. त्याचे दुसरे टोक एम्माच्या कमरेभोवती गच्च बांधले. आता जरी मनात आले तरी ते परतू शकत नव्हते. बर्फलोटाच्या क्षेत्राबाहेर राहाणे गरजेचे होते. वर कसे जायचे हे त्याने तिला खाणाखुणा करून सांगितले. "ठीक आहे?" हेसुद्धा खूण करूनच विचारले.

"ठीक आहे." तिच्याकडून उत्तर आलं.

त्याने चढण्यास सुरुवात केली. चढण उभी होती. त्याने हळूहळू वेग वाढवला. थोडेसे अंतर चढल्यावर तो मान तिरपी करून मागे पाहायचा. एम्मा पाच पावलांपेक्षा जास्त मागे राहणार नाही याची तो दक्षता घ्यायचा. अचानक वाऱ्याचा जोर वाढला व तो पूर्वेला वळला. बर्फाचा आडवा मारा होऊ लागला. दोघांच्याही कपड्यांवर बर्फाचे बोचकारे बसू लागले. हातपाय बधिर झाले होते व बोटे लाकडाची होऊन गेली होती. काही वेळापूर्वी तो वीस फुटांपर्यंत पाहू शकत होता. आता दहा फुटांपलीकडचेही दिसू शकत नव्हते. शेवटी शेवटी तर फक्त त्याला आपल्या नाकाचा शेंडा तेवढा दिसत होता. पोटऱ्यांमध्ये उठणारी कळच त्याला सांगत होती की तो वरच्या दिशेने चढतो आहे.

संपूर्ण कडा चढून वर यायला त्याला एक तास लागला. तो थकला होता. त्याने आपले

बूट बर्फात घट्ट रोवले व एम्माला खेचून वर घेतले. हवेमध्ये बूट लोंबकळवत, ती येऊन त्याच्या बाहुपाशात कोसळली. तिला चांगलाच दम लागला होता. धापा टाकताना तिच्या शरीराला हिसडा बसत होता. श्वास नियमित होईपर्यंत त्याने तिला छातीशी घट्ट कवटाळून धरले होते. काही वेळाने ती कशीबशी आपल्या पावलांवर उभी राहू शकली.

दोन शिखरांच्या मधल्या खोबणीत ते उभे होते. वाऱ्याचा वेग जबरदस्त होता. एखाद्या जेट इंजीनाच्या वेगाने तो झोडपत सुटला होता. आकाश मात्र थोडे निरभ्र झाले होते व त्यामुळे दरीच्या टोकाला वसलेल्या फ्रॉइनकिर्च व डॅव्होस ह्या दोन खेड्यांचे ओझरते दर्शन होत होते.

तो घसरत अगदी कडेच्या टोकावर आला व त्या निमुळत्या जागेवरून खाली पाहू लागला. लिफ्टच्या खाली जो लोखंडाचा उभा दांडा असतो, त्या आकाराचा एक बर्फाचा लांबलचक सुळका त्याला दिसला. तो सुळका एका मोठ्या खडकाच्या मध्यभागातून बाहेर पडत, खाली घसरत गेलेला होता. त्यामुळे आयताच एक छान घसरणीचा मार्ग तयार झाला होता. जोनाथनपासून तो सुळका साधारण वीस फुटांवर होता. त्याच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. "अरे, हा तर आपला रोमनचा मार्ग. आपण जर त्यावर उतरू शकलो तर आपण संकट पार केल्यासारखंच आहे." तो मनातल्या मनात म्हणाला.

रोमनचा पॉईंट हे इथल्या स्थानिक लोकांचे एक श्रद्धास्थान होते. असे म्हटले जायचे की फार फार वर्षांपूर्वी एका प्रलयंकारी हिमवर्षावात, रोमन नावाच्या वाटाड्याचा बर्फावरून घसरून मृत्यू ओढवला होता व त्यानंतर तिथे हा मार्ग आपोआप तयार झाला होता. एम्माचे डोळे मात्र ते दृश्य पाहून विस्फारले गेले होते. तिने जोनाथनकडे पाहिले व मानेनेच खाली उतरण्यास नकार दिला. "छे, फारच अवघड आहे."

"आपण यापेक्षाही अवघड मार्ग आत्तापर्यंत पार केलाय."

"नाही जोनाथन... तो बघ कसला निमुळता उतार आहे. दुसरा एखादा मार्ग नाही?"

"निदान आज तरी नाही."

"अरे पण..."

"एम, आपल्यासमोर दोनच पर्याय आहेत. एक तर रोमनवर खाली उतरायचं किंवा इथेच गोठून मरायचं."

ती पुढे सरकली. मान पुढे करून पाहू लागली. तिची हनुवटी छातीला टेकली होती. "कुठल्या नरकात येऊन पडलोय. पण आता पर्यायही नाही." ती स्वत:वरच चिडली होती.

"उतार थोडा खोल आहे. मग एक छोटंसं वळण. पण त्यानंतर मात्र चक्क राजमार्ग. मी मगाशी म्हटलं ना, आपण ह्याहून कठीण मार्ग पार केलाय."

एम्माने मान डोलावली. तिच्यात थोडा आत्मविश्वास आला होता. क्षणभर तिने त्याला भासवले की, वाटले होते तेवढी काही परिस्थिती हाताबाहेर गेलेली नाही. तिला आता हे पटलेय की अंगाला बोचणारा हा बर्फ सहज सहन करता येऊ शकेल. निर्णय थोडासा धाडसी आहे, पण आता कसोटीला उतरायची तिची मानसिक तयारी झालीय.

"तर मग, सुरुवात करायची?" जोनाथनने स्की-बूट काढले व पायाची सोलवटलेली कातडी साफ केली. मग त्याने एक स्की-बूट कुऱ्हाडीसारखा हातात धरला व बाजूला

पडलेल्या बर्फातून एक तीन चौरस फुटाचा तुकडा कापला. त्याने तो तुकडा कड्यावरून खाली फेकला. बर्फाचा तुकडा बरोबर त्या उतारावर पडला व घरंगळत खाली गेला. त्याने थोडे इकडे-तिकडे हेलकावे खाल्ले, पण मुख्य म्हणजे त्या मोठ्या सुळक्याने, बर्फाचे वजन अगदी सहज पेलले होते. जोनाथनला हायसे वाटले.

"माझ्या मागोमाग यायचं," तो तिला म्हणाला. "मी माझ्या पावलांच्या खुणा उमटवत जाईन."

एम्मा त्याच्या बाजूला येऊन उभी राहिली. आपल्या बुटाचे टोक कड्याच्या टोकावरून पुढे लोंबतेय, याचे तिला भान राहिले नव्हते.

"मागे हो." पायात स्की-बूट चढवताना तो ओरडला. तिने घाबरून आपल्या पायांकडे पाहिले. त्याने मात्र तिच्याकडे न बघताच इशारा दिला होता. त्याचा अंदाज अचूक होता.

"मी आधी पुढे जातो."

"तू मला उचलून का नाही घेऊन जात?"

"शक्य तरी आहे का?"

"पण मगाशी तर... आठवतंय ना?"

"एऽ... जमणार नाही."

एम्मा पुढे झुकली. तिने स्वत:ला ढकलून दिले. ती क्षणभर हवेत लोंबकळली, पण मग उतारावर जाऊन कशीबशी तोल सावरत उभी राहिली. तिच्या बुटांखाली बर्फ चरचरत होते. तिला उडीसुद्धा नीट मारता आली नव्हती. खाली येताना तिने अवघडून पाय टेकवले होते. त्यामुळे ती स्वत:ला चटकन थांबवू शकली नाही व वेगाने खाली घसरत गेली होती. हात खूप उंच धरल्यामुळे, तिचे शरीर बराच वेळ अधांतरी राहिले होते. तिचा स्वत:वरचा ताबा सुटला होता. जोनाथनच्या लक्षात आले की ती शेजारच्या खडकावर आपटणार. "वळ, ताबडतोब." तो उत्स्फूर्तपणे ओरडला.

त्या क्षणी तिच्यात व त्या खडकात दहा फुटांचे अंतर होते. ते हळूहळू पाच फुटांचे होत गेले. पण तितक्यात तिने अगदी अचूक उडी घेतली व वळून ती उलट्या दिशेला आली.

जोनाथनच्या जिवात जीव आला.

एम्मा घसरणीवरून धावत गेली व आणखी एकदा वळत तिने पुन्हा उडी मारली. या वेळेस मात्र खाली येताना, तिने हात शरीराच्या बाजूला ठेवले. त्यामुळे तिला खाली आल्यावर फारसे धक्के बसले नाहीत. आता आपल्याला नीट जमू लागलेय हे लक्षात आल्यावर तिचा सगळा थकवा कुठल्या कुठे पळाला.

विजयोन्मादाने तिने हाताची मूठ हवेत उंचावली. तिने ते करून दाखवले होते. आता अर्ध्या तासात ते फ्रॉईन किर्चच्या स्टॅफेल्प रेस्टराँमध्ये बसून गरमागरम कॉफीचे घुटके घेणार होते. दिवसभर घडलेल्या घटना आठवून खो-खो हसत सुटणार होते. आलेले संकट इतके काही मोठे नव्हते, असे एकमेकांना भासवणार होते. त्यानंतर ते हॉटेलमधल्या आपल्या खोलीत परतणार होते. बेडवर अंग लोटून देणार होते आणि....

एम्माची तिसरी उडी मात्र सपशेल चुकली.

तिने एकतर चुकून कड्याचे टोक तरी पकडले असावे किंवा अर्धा सेकंद उशिरा

वळल्यामुळे तिचे स्की-बूट तरी खडकाच्या खाचेत अडकलेले असावेत. जोनाथनच्या पोटात गोळा आला. ती इतक्या वेगात खाली घसरत गेली की तिच्या पाठोपाठ एक वक्राकार पट्टा उमटत गेला. जोनाथन श्वास रोखून तिच्याकडे पाहात होता. तिने बर्फामध्ये हात रुतवण्याचा प्रयत्न केला, पण उतार इतका निमुळता होता की ती खाली घसरतच राहिली. घसरण्याचा वेग वाढत गेला व एका क्षणी तिच्या शरीराला एवढ्या जोरात गचका बसला की ती एखाद्या कापडी बाहुलीसारखी हवेत उंच फेकली गेली. खाली येताना तिचा पाय अंगाखाली विचित्र दुमडला गेला व स्फोट झाल्यासारखा बर्फ उसळला. एखाद्या तोफेतून गोळा उडावा तसे तिच्या पायातून बूट हवेत उडाले. तिचे हातपाय पोटाखाली चेपले गेले होते व गाडीच्या चाकासारखे बराच वेळ डोके गरगरत राहिले होते.

"एम्माऽऽ" तो जिवाच्या आकांताने किंचाळला व तिच्या दिशेने धावत सुटला. तो बेभान झाला होता. तोल सावरण्यासाठी त्याने हात हवेमध्ये लांब फाकवले. त्याने आपले शरीर जणू घट्ट ताणलेले होते व तो त्या पर्वतावर तुटून पडत होता. अचानक धुक्याचा एक दाट पट्टा त्याच्यासमोर पसरत गेला. आपण वर जातोय की खाली जातोय हेही त्याला कळेना. त्याने आपल्या हातातल्या स्की-स्टिक्स त्या धुक्यात खुपसल्या व त्या ढगाला भेदून तो आरपार गेला.

एम्मा उताराच्या टोकाला जाऊन पडली होती. तिला धड बसताही येत नसावे. तिचे डोके बर्फात खुपसलेले होते. तो तिच्याजवळ पोहोचला. दोघांमध्ये दहा फुटांचे अंतर होते त्याने बूट काढले व लांब-लांब ढांगा टाकत तो तिच्याजवळ आला. "एम्मा... माझा आवाज ऐकू येतोय?"

त्याने पाठीवरची सॅक बाजूला भिरकावली. तो गुडघ्यावर बसून तिच्या नाकातोंडावर साचलेले बर्फ साफ करू लागला. त्याने तिला जवळ घेतले. तिच्या नाडीचे ठोके स्थिर होते. त्याने बॅगेतून आपला शर्ट काढला व तिच्या गळ्याखाली चेपून धरला.

एम्माने थोडी हालचाल केली. पण त्या थोड्याशा हालचालीनेही ती कळवळली. "नाही रे. नाही सहन होत." ती पुटपुटली.

"अजिबात हलू नकोस," त्याचा हुकमी डॉक्टरी स्वर आला. तिच्या पँटवर हात ठेवून तो हळूहळू तपासू लागला. अचानक तिचा चेहरा वेदनेने वेडावाकडा झाला. "नको... थांब." ती कळवळली.

जोनाथनने आपला हात झटकन बाजूला घेतला. गुडघ्याच्या काही इंच वर, पँट फुगलेली होती. त्याला काय झाले असणार याचा पूर्ण अंदाज आला.

"हाड मोडलंय. हो ना?"

"मी पाय हलवू शकत नाहीये. खूप दुखतंय रे जोनाथन. खरंच सांगतेय."

"जरा शांत राहशील मला नीट बघू दे."

आपल्याजवळील स्विस सैनिकी चाकूचा वापर करत, त्याने तिची पँट खालच्या बाजूने मधोमध फाडली. कपचा उडालेले एक हाड बाहेर डोकावले. हाडाभोवती रक्त साकळलेले होते. त्याच्या मते, पोटरीचे हाड दोन-तीन ठिकाणी फ्रॅक्चर झालेले होते.

"फारच वाईट अवस्था आहे का रे?" एम्माने विचारले.

"नाही. तसं वाटत नाही." त्याने जणू किरकोळ जखम झाली असल्याचे भासवले.

तिला घोटभर पाणी पाजत, त्याने फर्स्ट एड बॉक्स बाहेर काढला व टेपच्या साहाय्याने फाटलेली पँट चिकटवली. “तू फक्त पाठीमागे झूक. मागच्या बाजूला पाहात राहा.”

“देवा... मी पुन्हा चालू शकेन ना?”

“हे बघ, मी तुझा पाय लाकडी पट्ट्यांनी घट्ट बांधणार आहे. ते हाड जरादेखील बाजूला सरकणं धोक्याचं आहे.”

त्याने दोरखंडाचा एक मोठा तुकडा कापला. पाठीमागे जाऊन त्याने आपले स्की-बूट व स्की-स्टिक्स आणल्या. त्याने तिच्या पायाच्या बाजूला एकेक स्टिक ठेवली व पोटरीच्या भोवती तो दोरखंडाचा तुकडा गोलगोल गुंडाळला.

खिशातून आपले चामड्याचे पाकीट काढले व तिच्यापाशी दिले. “मी सांगतो तसे कर.”

एम्माने ते पाकीट दातांमध्ये गच्च आवळून धरलं.

जोनाथनने हळूहळू तो दोरखंडाचा तुकडा असा करकचून आवळला की, त्या दोन्ही स्की-स्टिक्स तिच्या पायाला घट्ट चिकटल्या. एम्माने एक मोठा आवंढा गिळला. मग त्याने दोरखंडाची दोन्ही टोके अगदी पक्की बांधून टाकली. थोड्या वेळाने, त्याने तिच्या पाठीला आधार देत तिला सावकाश बसवलं.

“बरं वाटतंय?” जोनाथनने विचारले.

एम्माला वेदना सहन करणेही कठीण जात होते. तिच्या डोळ्यात पाणी आले होते. एक अश्रू गालावर ओघळला. त्याने तिच्या खांद्यावर हात ठेवला व तिला हलकेच थोपटले. “आपण मदत केंद्राशी संपर्क साधू या,” तो म्हणाला. त्याने जॅकेटमधून दुहेरी संपर्क साधणारा रेडिओ बाहेर काढला. “डॅव्होस मदत केंद्र?” तो बाजूला चालत गेला. “इथे ताबडतोब मदत हवी आहे. फर्गाच्या दक्षिणेला, रोमन पॉईंटवर एक गिर्यारोहक जबर जखमी झालाय. ओव्हर.”

पलीकडून कुठलाच प्रतिसाद आला नाही.

“डॅव्होस मदत केंद्र,” तो पुन्हा म्हणाला. “इथे एका व्यक्तीला तातडीच्या मदतीची गरज आहे. ताबडतोब या.”

त्याला फक्त हिमवर्षावाची खरखर ऐकू आली. त्याने पुन्हा पुन्हा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण पलीकडून उत्तर येत नव्हते.

“या हवामानामुळे असं होतंय.” एम्मा म्हणाली. “तू दुसऱ्या केंद्राशी संपर्क साध.” जोनाथनने दुसऱ्या चॅनेलचे बटण दाबले. काही वर्षांपूर्वी त्याने आल्प्समध्ये प्रशिक्षक व मदत केंद्रावरचा साहाय्यक म्हणून काम केले होते. त्या वेळेस त्याने स्वत: विशेष लक्ष घालून, त्या प्रदेशातील प्रत्येक ठिकाणाशी संपर्क साधू शकेल असा विविध विद्युतलहरींची क्षमता असलेला रेडिओ बनवला होता– डॅव्होस, अरोसा, लेंझरहाईड तसेच कँटॉन्स्पॉलिझी, स्विस अल्पाईन क्लब व रेगा, तातडीची हेलिकॉप्टर सेवा अशा अनेक केंद्रांशी त्यामुळे संपर्क साधणं सुलभ झाले होते.

“अरोसा मदत केंद्र. फर्गाच्या दक्षिणेला एक गिर्यारोहक जखमी होऊन पडलाय. तत्काळ मदतीची गरज आहे.”

तिथेही त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्याने रेडिओ जवळ आणला. पॉवर लाईट

क्षीणपणे लुकलुकत होता. त्याने पायावर रेडिओ ठोकला. दिवा एकवार चमकून विझून गेला.

“रेडिओ बंद पडलाय.”

“बंद? रेडिओ? कसा काय? काल रात्री तर व्यवस्थित चालू होता.”

“हो, त्या वेळेस नीट काम करत होता.” जोनाथनने अनेक वेळा रेडिओ बंद करून पुन्हा चालू करण्याचा प्रयत्न केला; पण तो थंडगार पडला होता.

“बॅटऱ्यांमुळे असं झालं का?”

“काही समजत नाही. काल मी नव्याकोऱ्या बॅटऱ्या टाकल्या होत्या.” हातमोजे काढून त्याने तो रेडिओ उघडला व आतमध्ये तपासू लागला. “बॅटऱ्यांमुळे नाही, वायरिंगमुळे. पॉवर युनिट ट्रान्समीटरला जोडलेलंच नाहीये.”

“मग जोड.”

“मी नाही जोडू शकत. ह्या इथे तर नाहीच. माझ्यापाशी हत्यारं असती तरी मला शक्य झालं नसतं.” त्याने रेडिओ सॅकमध्ये फेकून दिला.

“फोन कुठे गेला?”

“फोनचा काय उपयोग? या इथे कुठलं नेटवर्क पोहोचू शकणार?”

“प्रयत्न कर.” तरीही ती हट्टाने म्हणाली.

जोनाथनच्या सेलफोनवर नेटवर्क नसल्याचे स्पष्ट दिसत होते. तरीही त्याने रेगाचा नंबर फिरवला. अर्थात कॉल लागलाच नाही. “काहीही ऐकू येत नाही.” एम्माने त्याच्याकडे रोखून पाहिले. त्याच्या लक्षात आले की ती कशीबशी आपल्या मनावर संयम ठेवण्याचा प्रयत्न करते आहे. “अरे, पण कुणाशी तरी बोलायलाच हवंय ना?”

“कुणाशी बोलणार? कुणाला ऐकूच जात नाही.”

“पुन्हा एकदा रेडिओ चालू होतोय का बघ.”

“कशासाठी? सांगितलं ना, तो बंद पडलाय.”

“मी सांगते म्हणून बघ.”

जोनाथन गुडघे वाकवत तिच्या शेजारी बसला. “हे बघ, सर्व काही ठीक होणार आहे. तू उगाच काळजी करू नकोस.” आवाज शक्य तितका शांत ठेवत तो म्हणाला, “मी स्वत: खाली जातो आणि बरोबर मदत घेऊन परत येतो. जोपर्यंत तुझ्यापाशी तुझा ट्रान्समीटर आहे, तोपर्यंत तुझ्याशी संपर्क साधणं मला कठीण जाणार नाही.”

“नाही, मला एकटीला सोडून तू जाऊ शकत नाहीस. तुझ्याकडे मोठा दिवा असला तरी तुला परतीचा मार्ग सापडूच शकणार नाही. कुठल्याही दिशेला बघ, वीस फुटांपलीकडचं काहीतरी दिसतंय? मी गोठून जाईन. आपल्याला नाही शक्य... मला नाही शक्य...” तिचा आवाज जड झाला. गळ्यातून शब्द उमटेनात. तिने मान बर्फात खुपसली आणि ती बाजूला वळली. आपण रडतोय हे त्याला समजू नये, म्हणून. “तुला माहितीये... मला जवळजवळ जमलं होतं... पण त्या शेवटच्या वळणावर... मी थोडी उशिरा...”

“ऐक माझं, तू सुखरूप राहणार आहेस.”

एम्माने मान वर करत त्याच्याकडे पाहिले. “खरंच? राहीन मी सुखरूप?”

जोनाथनने तिच्या गालावरचे अश्रू पुसले. “मला खात्री आहे.” तो म्हणाला.

सॅकजवळ जाऊन त्याने थर्मास बाहेर काढला व आपल्या बायकोसाठी त्याने कपात गरम चहा ओतला. ती चहा पीत असताना, त्याने तिच्या लांब फेकल्या गेलेल्या स्की-स्टिक्स गोळा करून आणल्या आणि X ची आकृती तयार करत तिच्यापाठीमागे ठेवून दिल्या, यासाठी की दूरवरून त्या काठ्या त्याच्या नजरेत भरतील. त्याने डोक्यावरची कॅप काढून एम्माच्या डोक्यावर ठेवली व तिच्या मानेला ऊब मिळावी म्हणून किंचित खाली खेचली. शेवटी त्याने सॅकमधून, खास अवकाशात वापरायचे ब्लँकेट काढले व काळजीपूर्वक तिच्या छातीवरून व पाठीभोवती गुंडाळले त्या ब्लँकेटवर HELP हा शब्द चकाकणाऱ्या शाईने असा लिहिला गेला होता की, मदतीसाठी घिरट्या घालणाऱ्या एखाद्या हेलिकॉप्टर चालकाला तो चटकन दिसला असता. पण आज त्या ठिकाणी हेलिकॉप्टर येणे शक्यच नव्हते.

“हे बघ, दर पंधरा मिनिटांनी तू थर्मासमधून चहा ओतून पीत राहा.” त्याने तिचा हात हातात घेतला.

“सतत काहीतरी खात राहा आणि मुख्य म्हणजे अजिबात झोपू नकोस.”

त्याचा हात घट्ट पकडून, एम्माने मान डोलावली.

“आणि चहाचं विसरू नकोस.” तो पुन्हा पुन्हा सांगत राहिला. “दर पंधरा–”

“आता तोंड बंद कर आणि इथून लवकर निघून जा.” ती म्हणाली. त्याचा हात शेवटचा एकदा घट्ट दाबून तिने तो सोडून दिला. “तू मला आणखी घाबरवून टाकायच्या आधी जा इथून.”

“शक्य तितक्या लवकर येतो.”

एम्माने त्याच्या डोळ्यात खोलवर पाहिले. “आणि जोनाथन... इतका डगमगून नको रे जाऊस, तुला माहितीये ना, आजपर्यंत मला दिलेले प्रत्येक वचन तू पूर्ण केलंयस.”

२

डॅव्होसच्या पश्चिमेला तीनशे किलोमीटरवर, देशाच्या राजधानीला लागूनच असलेल्या बर्न-बेल्प विमानतळावर आज सकाळपासून धुंवाधार हिमवर्षाव होत होता. 'आर्क्टिक कॅट'ची अवाढव्य बर्फनिस्सारण यंत्रे धावपट्ट्यांवर साठलेला बर्फ वेगाने साफ करत होती. तो सर्व बर्फ टॅक्सीमार्गाच्या जवळ एकत्र आणून टाकल्याने तिथे बर्फाची एक छोटी टेकडीच उगवल्यासारखी वाटत होती. दुरून बघणाऱ्याला वाटले असते की, कुणीतरी जणू आल्प्स पर्वताचेच व्यंगचित्र रेखाटलेय.

धावपट्टी क्रमांक १-४ च्या पश्चिमेला पाच-सहा जणांचा घोळका आकाशाकडे नजर लावून उभा होता. ते सर्व पोलीस अधिकारी होते व अल्पावधीतच तिथे उतरणाऱ्या एका विमानाची ते आतुरतेने वाट पाहत होते. एका कुविख्यात गुन्हेगाराला अटक करण्यासाठी ते विमानतळावर आले होते.

त्यातला एक जण इतरांपासून थोडा दूर उभा होता. मार्क्स व्हॉन डॅनिकन हा पन्नाशीचा, ठेंगणा, अत्यंत आक्रमक स्वभावाचा, ग्रिनेडियर माशाप्रमाणे आपले काळे केस भादरलेला, गंभीर व लांबट चेहऱ्याचा अधिकारी होता. गेली सहा वर्षे त्याने सर्व्हिस फॉर अॅनॅलिसिस अँड प्रिव्हेन्शन म्हणजेच 'सॅप'ची धुरा समर्थपणे सांभाळली होती. अतिरेकी, दहशतवादी आणि गुप्तहेर यांच्यापासून देशाची अंतर्गत सुरक्षाव्यवस्था अबाधित ठेवणे हे सॅपचे मुख्य कार्य होते. अमेरिकेमध्ये हेच काम एफबीआय करत होती, तर इंग्लंडमध्ये एम-१५. त्या क्षणी व्हॉन डॅनिकन थंडीने अक्षरशः कुडकुडत होता व विमान लवकरात लवकर यावे अशी मनोमन प्रार्थना करत होता.

"हवामानाबद्दल तुझा काय अंदाज?" त्याने बाजूच्या माणसाला विचारले. तो सुरक्षा दलाचा मेजर होता.

"बस, आणखी फक्त दहा मिनिटं अन् ते त्यानंतर एकही विमान उतरू देणार नाहीत. तुला मी तरी नीट दिसतोय का?"

"विमानाची अवस्था कशी आहे?"

"एक इंजीन बंद पडलंय. दुसरं कमालीचं तापलंय. शेवटचं वळण घेऊन ते विमानतळाच्या जवळ पोहोचलंय."

व्हॉन डॅनिकन आकाशात हुडकू लागला. धावपट्टीच्या शेवटच्या टोकावर पिवळे दिवे, दाट धुक्यामधून लुकलुकताना दिसू लागले. क्षणार्धात ढगांमधून खाली उतरलेले विमानाचे प्रचंड धूड डोळ्यांसमोर दिसू लागले. गल्फस्ट्रीम नंबर चारचे ते विमान स्वीडनच्या स्टॉकहोमवरून निघाले होते. त्याच्या शेपटावर असलेला एन ४१५ जीबी हा नंबर, पाश्चिमात्य देशांमधील प्रत्येक गुप्तहेरखात्याला तोंडपाठ होता.

फेब्रुवारी २००३ मध्ये अबू ओमर या जहाल मुस्लीम मूलतत्त्ववादी गुरूला मिलानच्या रस्त्यावर जेरबंद केले होते व नंतर अतिशय गुप्तपणे ह्याच विमानातून

इटली-जर्मनीमार्गे इजिप्तला नेऊन पुढच्या कारवाईसाठी त्याच्याच देशवासीयांच्या ताब्यात देण्यात आले होते, त्यानंतर खलिद-ए-मसरी ह्या लेबेनीझ वंशाच्या परंतु जर्मन नागरिकत्व स्वीकारलेल्या इसमाला मॅसेडोनिया इथे पकडून, ह्या विमानाने त्याची काबूललगत असलेल्या हवाईदलाच्या तळावरील 'सॉल्ट पिट' या तुरुंगात रवानगी करण्यात आली होती. परंतु अखेर कळून चुकले की, ज्याला पकडण्यात आलेय तो इसम हा दहशतवादी कृत्यात सामील असलेला खराखुरा अतिरेकी खलिद नव्हताच.

एकदा यश तर दुसऱ्या खेपेस अपशय. व्हॉन डॅनिकनच्या मनात विचार सुरू होता. अलीकडच्या काळात या यशापयशाचे प्रमाण नेहमीच एकास एक असायचे. म्हटले तर हा एक प्रकारचा जुगारच होता; पण त्यातली खुबी ही होती की तुम्ही टेबल जराही न सोडता, सतत खेळत राहायला हवे.

विमान डांबरी धावपट्टीवर जोरदार आदळले. त्याच्या चाकांमधून बर्फ आणि पाण्याचे फवारे उडाले व इंजीन रोंरावत हळूहळू बंद झाले.

"निमकहराम, विघ्नसंतोषी भडवे साले." अगदी बारीक, म्हणजे जवळजवळ हडकुळा दिसणाऱ्या, लांबलचक लाल केस असलेल्या व डोळ्यांवर प्रोफेसरी गोल भिंगाचा चश्मा असलेल्या माणसाने सणसणीत शिवी हासडली. "कधी एकदा त्यांची थोबाडं बघतोय, असं मला झालंय. जन्माची अद्दल घडेल असा धडा त्यांना शिकवायला हवा." त्याचे नाव होते, अल्फोन्स मार्टी आणि तो स्वित्झर्लंडचा कायदामंत्री होता.

सेऊल येथे १९८८ साली झालेल्या ऑलिंपिक्समध्ये मार्टीने मॅरॅथॉन स्पर्धेत स्वित्झर्लंडचे प्रतिनिधित्व केले होते. त्या वेळेस तो स्टेडियममध्ये अगदी शेवटी पोहोचला होता. तोही अर्धमेल्या अवस्थेत. गरम हवेमुळे त्याच्या पायांचे रबर झाले होते व तीन दिवस मद्यामध्ये बुडालेल्या एखाद्या दारुड्यासारखा तो धडपडत, वेडेवाकडे हेलकावे घेत होता. तातडीच्या वैद्यकीय पथकाने त्याला रोखण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना कसेबसे ढकलून देत तो अंतिम रेषेच्या पाऊलभर पुढे गेला व तिथेच खाली कोसळला. त्याला तत्काळ हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. पण ज्यांनी त्याला त्या अवस्थेत पाहिले, त्यांच्या लेखी मात्र तो आजही हिरो ठरला आहे. इतरांची मते वेगळी होती. होता नवशिक्या आणि आव मात्र आणला पट्टीच्या खेळाडूचा, असे ते खाजगीत कुजबुजत असत.

"आता मात्र एकही चूक होता कामा नये." व्हॉन डॅनिकनचा खांदा पकडत मार्टी बोलत होता. "सवाल आपल्या इभ्रतीचा आहे. स्वित्झर्लंडमध्ये अशी गोष्ट कधीही खपवून घेतली जात नाही. आपण एक तटस्थ राष्ट्र म्हणून ओळखले जातो. आता मात्र वेळ आलीय, एक ठाम भूमिका घेण्याची व ती यशस्वी करून दाखवण्याची. माझं म्हणणं तुला पटतंय ना?"

व्हॉन डॅनिकनने अनेक पावसाळे पाहिले होते व त्यामुळे प्रश्नाला उत्तर न देण्याचे शहाणपण त्याच्यापाशी होते. त्याने रेडिओ ओठांसमोर धरला. "मी सूचना देईपर्यंत कुणीही त्यांच्यावर हल्ला करणार नाही." तो गरजला.

शंभर फूट अंतरावर एका चढावाच्या मागे, पोलीस गाड्यांचा एक लहानसा ताफा, आज्ञा मिळताच हल्ला करण्यासाठी दबा धरून बसला होता. व्हॉन डॅनिकनने डावीकडे नजर फिरवली. दहा सशस्त्र सुरक्षादलातील सैनिकांनी भरलेली एक जीप आडोशाला

लपलेली होती. इतका फौजफाटा आणण्याला त्याचा विरोध होता, पण मार्टी ऐकायला तयार नव्हता. त्या कायदामंत्र्याने कितीतरी दिवस या क्षणाची वाट पाहिली होती.

"वैमानिकाने खाली उतरू द्यायची विनंती केली आहे." सुरक्षादलाच्या मेजरने माहिती दिली. "विमानतळ अधिकाऱ्यांनी त्याला कस्टम्सच्या कक्षात येण्याची सूचना केली आहे."

व्हॉन डॅनिकन आणि मार्टी एका खास गाडीत बसून निर्देशित पार्किंग लॉटजवळ गेले. उरलेले अधिकारी दुसऱ्या गाडीतून तिथे पोहोचले. गल्फस्ट्रीमही आपली दिशा बदलत कस्टम्स कक्षासमोर येऊ लागले. विमान पूर्ण थांबेपर्यंत व्हॉन डॅनिकनने शांतपणे वाट पाहिली. "चला, सर्वांनी निघा."

निळ्या-पांढऱ्या प्रकाशझोतांनी काळंकुट्ट आकाश उजळून निघाले. आतापर्यंत लपून राहिलेल्या लष्करी गाड्या वेगात बाहेर आल्या आणि पाहतापाहता त्यांनी विमानाला वेढा घातला. त्यातली एक गाडी विमानाजवळ जाऊन पोहोचली. हातात .५० कॅलिबरची बंदूक धरलेला जवान त्या उघड्या गाडीत सरसावून उभा राहिला. बाकीच्या सर्व गाड्यांमधून कमांडोज भराभर खाली उतरले व विमानाभोवती अर्धवर्तुळ करून उभे राहिले. त्यांच्या हातातल्या मशिनगन्स विमानाच्या दरवाजावर रोखलेल्या होत्या.

एक साधा टेलिफॅक्स आल्यामुळे ही एवढी मोठी सर्कस उभारावी लागली, असा विचार करत व्हॉन डॅनिकन गाडीतून खाली उतरला. त्याने आपले पिस्तूल तपासले. चेंबरमध्ये एकही गोळी नसल्याची व सेफ्टी ऑन असल्याची खात्री करून घेतली.

बरोबर तीन तासांपूर्वी ओनिक्स या उपग्रह संदेशांवर चोरटी नजर ठेवणाऱ्या स्वित्झर्लंडच्या खाजगी यंत्रणेने तो टेलिफॅक्स हस्तगत केला होता. स्टॉकहोममधल्या सिरियन दूतावासाने हा फॅक्स आपल्या दमास्कसच्या कचेरीसाठी धाडला होता व त्यात मध्यपूर्वेकडे निघालेल्या एका विशिष्ट विमानातील प्रवाशांची नावे व माहिती दिलेली होती. विमानात चार जण होते. वैमानिक, सहवैमानिक व दोन प्रवासी. त्यातला एक जण हा अमेरिकन सरकारी खात्यातील एजंट होता व दुसरा हा, ज्याच्या अटकेसाठी बारा पाश्चिमात्य राष्ट्रांतील कायदापालन अधिकारी नजर ठेवून होते, असा एक कुविख्यात अतिरेकी. खबर मिळताच ती वरिष्ठ सूत्रांपर्यंत पोहोचवण्यात आली व त्या फॅक्सची एक प्रत व्हॉन डॅनिकनकडे तर दुसरी मार्टीकडे पाठवली गेली.

आणि खरे तर ती खबर तिथेच थांबली गेली होती. अशा अनेक गुप्त वार्ता सतत येतच असतात व 'काही कारवाई नाही' अशा आदेशाने त्या फाईलमध्ये सरकवल्या जातात. ह्या फॅक्सवरही तसेच शिक्कामोर्तब होणार होते, पण तोच आणखी एक खबर येऊन थडकली की, सदर विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने ते विमान 'बर्न-बेल्प'वर उतरू देण्याची विनंती स्विस विमान नियंत्रण कक्षाला करण्यात आली होती.

जेटचा दर्शनी दरवाजा उघडला गेला व विमानाची शिडी घसरत जमिनीला येऊन टेकली. मार्टी भराभर शिडी चढू लागला. व्हॉन डॅनिकन त्याच्या पाठोपाठ जाऊ लागला. वैमानिक दरवाजात येऊन उभा राहिला. कायदामंत्र्याने आपल्या हातातील वॉरंट वैमानिकाला दाखवले व विमानाची झडती घेणार असल्याचे सांगितले. "आम्हाला अशी माहिती मिळालेली आहे की तुम्ही एका कैद्याला घेऊन चालला आहात व ही गोष्ट जिनिव्हा मानवी हक्क कायद्याचा भंग करणारी आहे."

वैमानिकाने त्या वॉरंटवर ओझरतीदेखील नजर फिरवली नाही. “तुमची काहीतरी चूक होतेय.” तो म्हणाला. “माझा सहवैमानिक व मिस्टर पालुंबो सोडून ह्या विमानात आणखी कुणीही नाही.”

“चूक होऊच शकत नाही.” मार्टीने त्याला बाजूला सारत विमानात प्रवेश केला. “स्वीस भूमीवर अशा गैरकृत्यांना कधीही थारा मिळणार नाही. चीफ इन्स्पेक्टर व्हॉन डॅनिकन, विमानाची संपूर्ण झडती घे.”

व्हॉन डॅनिकन पॅसेजमधून चालत गेला. एका प्रशस्त चामड्याच्या सीटवर एकुलता एक प्रवासी बसलेला होता. चाळीस वर्षांचा, भरदार खांदे असलेला व डोक्याचा तुळतुळीत गोटा केलेला तो एक गोरापान गृहस्थ होता. तो एक अनुभवी, परिपक्व इसम असणार हे त्याच्या व्यक्तिमत्त्वातून प्रथमदर्शनीच जाणवत होते. स्वत:ची पूर्ण काळजी घ्यायची धमक त्याच्यामध्ये निश्चितच होती. वादळी वाऱ्यांची फौज चहूबाजूंनी चालून येतेय हे त्याच्या बाजूच्या खिडकीतून स्पष्ट दिसत होते. पण त्याच्या चेहऱ्यावरची एक रेषाही बदलली नव्हती.

“गुड आफ्टरनून.” व्हॉन डॅनिकनने त्याला अस्खलित पण खास इंग्रजी उच्चारशैलीत अभिवादन केले. “आपण मिस्टर पालुंबो?”

“आणि आपण कोण?”

व्हॉन डॅनिकनने स्वत:ची ओळख करून दिली व त्याच्याकडील ओळखपत्र मागितले.

“आम्हाला पक्का संशय आहे की तुम्ही या विमानातून वालिद गॅसन ह्या कैद्याला अवैधपणे घेऊन जात आहात. माझं म्हणणं बरोबर आहे ना?”

“नाही सर, आपलं म्हणणं बरोबर नाही.” एका मांडीवर दुसरी मांडी ठेवत पालुंबो म्हणाला व त्याच्या पायातील दणकट बांधणीच्या बुटांनी व्हॉन डॅनिकनचे लक्ष वेधले.

“तर मग विमानाची झडती घ्यायला तुमचा काहीच विरोध नसावा.”

“हा तुमचा देश आहे. तुम्ही तुमच्या मर्जीप्रमाणे काहीही करू शकता.”

विमानाची झडती पूर्ण होईपर्यंत जागा न सोडण्याची सूचना त्या प्रवाशाला करून व्हॉन डॅनिकन विमानाच्या मागील बाजूकडे चालू लागला. बेसिनमध्ये थाळ्या व पेले पसरलेले होते. त्याने त्या वस्तू मोजल्या. चार-चार वस्तूंचा संच होता. वैमानिक, सहवैमानिक आणि पालुंबो. कुणीतरी गायब होता. त्याने प्रसाधनगृह तपासले व नंतर टोकाला असलेल्या सामानाच्या खोलीचा दरवाजा उघडून सर्व खोली उसकटली.

“इथे कुणीही नाही.” त्याने रेडिओवरून मार्टीला कळवले. “सामानाच्या खोलीसकट संपूर्ण विमानाची झडती घेऊन झाली.”

“काय? ‘कुणीही नाही’ असं तू कसं म्हणू शकतोस? असं होऊच शकत नाही.” मार्टीने त्याला सुनावले.

“त्यांनी एखाद्या सूटकेसमध्ये त्याला कोंबलेले असले तरच. त्याशिवाय दुसरी कुठलीही शक्यता मला दिसत नाही.”

“शोधत राहा.”

व्हॉन डॅनिकनने पुन्हा एकदा मालाच्या खोलीत जाऊन फेरी मारली. सर्व छोटे-मोठे पोकळ कप्पे तपासले. हाती काहीच न सापडल्याने त्याने खोलीचा दरवाजा बंद केला व

तो विमानाच्या मुख्य भागात परतला.

“तू संपूर्ण विमानाची नीट तपासणी केलीस?” कॅप्टनच्या शेजारी हाताची घडी घालून उभ्या असलेल्या मार्टीने विचारले.

“वरपासून खालपर्यंत. मिस्टर पालुंबो सोडल्यास, ह्या विमानात आणखी एकही प्रवासी नाही.”

“अशक्य!” मार्टीने व्हॉन डॅनिकनकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला. “ह्या विमानात तो कैदी असल्याचा आपल्याकडे सबळ पुरावा आहे.”

“कसला पुरावा आहे हे मला जरा कळू दे तरी.” पालुंबोने विचारलं.

“माझ्याबरोबर खेळ खेळण्याचा प्रयत्न करू नकोस.” मार्टी म्हणाला. “तुम्ही कोण आहात आणि कुणासाठी काम करता हे मला पक्कं ठाऊक आहे.”

“खरंच? खरंच तुला ठाऊक आहे? तर मग आता तुला सगळंच खरं सांगून टाकायला काहीच हरकत नाही.”

“तुला काय म्हणायचंय?” मार्टीच्या आवाजात जरब होती.

“ज्या इसमाला तुम्ही शोधताय... त्याला आम्ही अर्ध्या तासापूर्वी, तुमच्या त्या महाकाय पर्वतावर मुक्त केलं. आपल्याला आल्प्स बघायची फार इच्छा आहे असं तोच म्हणाला.”

मार्टीचे डोळे विस्फारले. “तुम्ही नक्कीच असं केलेलं नाही?”

“म्हणूनच तर आमच्या इंजिनात बिघाड झाला असावा. एक तर तो तरी इंजिनात अडकला असेल किंवा एखादा कादंब पक्षी.” आपल्याच विनोदावर खळखळून हसत पालुंबो बेफिकीरपणे खिडकीबाहेर पाहत होता.

व्हॉन डॅनिकनने मार्टीला बाजूला खेचले. “आपल्याला मिळालेली खबर चुकीची असावी. ऐक माझं, विमानात आणखी कुणीही नाही.”

मार्टीने त्याच्याकडे रोखून पाहिले. संतापाने तो लालबुंद झाला होता. एक उष्ण प्रवाह त्याच्या शरीरात पसरत गेला व त्याचे खांदे खडखडले. पालुंबोकडे पाहत त्याने मानेला झटका दिला व तो तडक विमानाबाहेर पडला.

विमानापाशी आता एकच कमांडो उभा होता. व्हॉन डॅनिकनने त्याला मानेनेच इशारा करत निघून जायला सांगितले. कमांडो शिडी उतरून दिसेनासा होईपर्यंत तो शांतपणे थांबला व मग पालुंबोकडे वळला, “माझी खात्री आहे की आमचे तंत्रज्ञ विमानाचं इंजीन लवकरात लवकर दुरुस्त करतील. पण हवामान आणखीनच बिघडलं आणि विमानतळ बंद करावं लागलं तर तुम्ही इथून अगदी जवळ असलेल्या हॉटेल रॉसलीमध्ये विश्रांती घेऊ शकता.”

“आपली माफी आम्ही स्वीकारली आहे.” पालुंबो उत्तरला.

“अरे हो... आणखी एक गोष्ट...” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “विमानात मला हे सापडलं होतं.” त्याच्याजवळ वाकत व्हॉन डॅनिकनने एक लहानशी पण टणक वस्तू त्या सीआयए ऑफिसरच्या हातात ठेवली. “मला खात्री आहे की आमच्या दृष्टीने महत्त्वाची अशी काही माहिती मिळाली तर ती तुम्ही आमच्यापर्यंत नक्कीच पोहोचवाल.”

डॅनिकन विमानाबाहेर पडेपर्यंत पालुंबो थांबला व मग त्याने सावकाशपणे आपली बंद

मूठ उघडली.

त्याच्या तळहातावर एका पुरुषाच्या हाताच्या अंगठ्याचे उपटून काढलेले रक्तबंबाळ नख होते.

३

“ती नाहीशी झालीय.”

रोमनच्या पायथ्यापासून दोनशे मीटरवर असलेल्या एका टेकडीच्या माथ्यावर जोनाथन उभा होता. समुद्राच्या लाटांप्रमाणे थडथडत उसळी मारणारे वारे इतक्या प्रचंड वेगाने वाहत होते की, एक मिनिटभर जोनाथनचे शरीर बर्फाने आच्छादलेले असायचे तर दुसऱ्या मिनिटाला अंगावर बर्फाचा एक कणदेखील नसायचा. हातातल्या दुर्बीणीतून तो सैरभैर नजरेने पाहत होता. त्याला ते खूण करून ठेवलेले स्की-बूट दिसत होते, HELP ही अक्षरे ठळकपणे उठून दिसणारे ब्लँकेट दिसत होते आणि त्याच्या डावीकडे केशरी रंगाचे बर्फ उकरायचे खोरेही दिसत होते. दिसत नव्हती फक्त एम्मा.

डॅव्होस मदत पथकाच्या तिघा जणांना खालीच सोडून, जोनाथन ती शेवटची टेकडी चढून वर आला होता. मदत मिळवण्यासाठी तो खाली उतरला होता, त्याला आता चार तास होऊन गेले होते; खुणेसाठी एकमेकांवर तिरके रचलेले स्की-बूट बर्फाखाली पूर्ण गाडले गेले होते; पण एम्माच्या सॅकवर मात्र बोटभर जाडीचे बर्फ पसरले होते. त्याने ती सॅक उघडली. सँडविचेस व चॉकलेट बार आता शिल्लक उरले नव्हते. तिचा थर्मासही रिकामा झाला होता. त्याने ती सॅक पायाजवळ टाकून दिली. ज्या ठिकाणी एम्मा पडून राहिली होती, तिथे तिच्या शरीराचा ठसा अस्पष्ट उमटला होता. ती फारशी दूर गेली नसावी.

हिमलोटामध्ये हरवलेल्या किंवा अडकलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी एक जास्त क्षमतेची बॅटरी वापरली जाते. जोनाथनने तो दिवा पेटवून आपल्या पोटाशी बांधला व त्याची नजर चारही दिशांचा वेध घेऊ लागली. शंभर मीटर, म्हणजे साधारण तीनशेतीस फुटांपर्यंत प्रकाश पसरवण्याइतकी त्या बॅटरीची क्षमता असते. बॅटरी पेटवली की गाडीच्या हॉर्नसारखा आवाज येतो व काही वेळाने तो आपोआप थांबतो. कोसळलेले बर्फांचे खडक आता स्थिरस्थावर होत असताना इतका प्रचंड आवाज करत होते की, जणू भारतीय युद्धात वाजणारे पडघमच. त्या आवाजाने सर्व दऱ्याखोऱ्या दुमदुमून जात होत्या.

“तुझ्यापाशी खुणेचा बावटा आहे?” जोनाथन आपल्या जवळ येताच सेप्प स्टेनरने त्याला विचारले. सेप्प हा मदतपथकाचा प्रमुख होता. डोळ्यांखाली सुरकुत्या पडलेला, खोलगट गालफडांचा तो एक ठेंगणा इसम होता.

“नाही.”

त्याच वेळी जोनाथनचे लक्ष बर्फावर पडलेल्या एका लाल ठिपक्यावर गेले. त्या रक्ताच्या थेंबाला स्पर्श करण्यासाठी तो खाली वाकला. काही इंचांवर तसाच दुसरा ठिपका होता आणि त्यापुढे काही अंतरावर आणखी एक. “ह्या बाजूने जाऊ या.” इतरांना त्याने हाताने इशारा केला.

“अजिबात पुढे जाऊ नका.” स्टेनरने त्याला सावध केले. “अगदी काही मीटरवर बर्फाला मोठा तडा गेलाय.”

“तडा?”

“हो. आणि तो खूप खोल आहे. पार हिमनदीला जाऊन भिडलाय.”

जोनाथन डोळे बारीक करून ती भेग निरखू लागला, पण एका अभेद्य पांढऱ्या भिंतीपलीकडे त्याची नजर पोहोचू शकली नाही. “माझ्या कमरेभोवती दोरखंड बांधा.” त्याने आपले स्की-बूट काढले व बसायचे खोगीर मागच्या बाजूला अडकवले आणि मग कमरेभोवती दोरखंड करकचून बांधला.

“नीट काळजी घे.” स्टेनरने आपल्या पायातले बूट काढून जोनाथनला त्याच्या खोगिरात नीट व्यवस्थित बसवले. “आम्हाला तुलाही गमवायचं नाहीये.”

जोनाथनने बुटक्या माणसाकडे झटकन मान वळवली. “ती अजून नाहीशी झालेली नाहीये.” सुरुवातीला रक्ताचे थेंब शोधणे त्याला कठीण जात होते. सुईच्या अग्राएवढे सूक्ष्म ठिपके दिसायचे. पण हळूहळू त्यांचा आकार वाढत गेला व दोन थेंबांमधले अंतरही कमी होत गेले. अखेर रक्ताची एक लांबलचक धार सुरू झाली. जणूकाही कुणी सायरपची मोठी बाटलीच बर्फावर उपडी केलीय. फरक एवढाच होता की, ह्या सायरपचा रंग रक्तवाहिन्यांतील प्राणवायुमिश्रित लालधम्मक रक्ताचा होता.

एम्मा इथून कधी घसरत गेली असेल? जोनाथन विचारात पडला. पाच मिनिटांपूर्वी? दहा? एम्माने आपला चांगला पाय कुठे टेकवला असेल व त्यामागून तिचा मोडका पाय कसा फरफटत गेला असेल हे त्याने खाली वाकत नीट निरखून पाहिले. काही अंतरावर बर्फाला खळगा पडला होता व त्याच्या मध्यभागी ‘आ’ वासलेला एक खोल खड्डा निर्माण झाला होता.

पोट दुमडून तो खुरडत खुरडत पुढे जाऊ लागला व बॅटरीच्या झोतात डोळे ताणून पाहू लागला. तळ नसलेल्या त्या खोल विवराच्या भोवती हिमअश्माचे वर्तुळाकार वलय तयार झाले होते. एका बाजूला झुकत जोनाथनने आपली बॅटरी तपासली. त्या अत्याधुनिक यंत्रावर उमटलेला ९८ हा आकडा पाहून त्याच्या पोटात धस्स झाले. अठ्ठयाण्णव मीटर्स म्हणजे तीनशे फुटांहून जास्त खोल तो खड्डा होता.

“तुला काही खूण दिसतेय?” स्टेनरने विचारले. “ती दिसली का तुला?”

“हो.” जोनाथनने मोघम उत्तर दिले व अधिक स्पष्टीकरण देण्याचे टाळले. “मी खाली चाललोय. तू हातातला दोरखंड ढिला सोड.”

“ठीक आहे. सोडतो.”

आपल्या कुदळीने खोदत त्याने तो खड्डा रुंद करण्याचा प्रयत्न केला. बर्फाचा एक जाड तुकडा कोसळला व पायाखालचे विवर अधिक गहिरे झाले. खड्ड्यामध्ये पाय लोंबकळवत त्याने बर्फावर पाठ टेकवून जोरात घुसळली. आणखी थोडा बर्फ सैल होत खाली पडला. बर्फाच्या त्या घट्ट तटबंदीवर डोक्याने मुसंडी मारत त्याने खोल उडी घेतली व कमरेभोवतीचा दोरखंड पूर्ण ताणला जाईपर्यंत तो खोल जात राहिला. “मी आत पोहोचलोय.” भोवतालचा बर्फ लाथांनी तुडवत त्याने दोरखंडाला येणारा अडथळा दूर केला व अजून काही फूट स्वत:ला खोल नेले. त्याच्याभोवती वेढलेला तो हिमराणीचा आद्य-चिरस्थायी महाल, दिव्याच्या भगभगीत प्रकाशात क्रूरपणे चमचमत होता.

दहा मीटर खाली, बर्फाच्या कड्याबाहेर आलेल्या एका सपाट भागावर त्याला काळ्यापांढऱ्या रंगाची वस्तू दिसली. ती एम्माची कॅप होती. घड्याळाच्या लंबकाप्रमाणे

एक-दोनदा पुढेमागे हेलकावत त्याने ती टोपी उचलण्याचा प्रयत्न केला. तिसऱ्या खेपेस, आपले शरीर किंचित तिरके झुकवत, आपला हात जास्तीतजास्त ताणला व त्या कॅपवर ताबा मिळवला.

हातात टोपी पकडून त्याने स्वत:ला स्थिर केले व बर्फाच्या त्या सपाट भागावर प्रकाशझोत सोडला. त्या जागेवरचा बर्फ विस्कळीत झाला होता व रक्ताने माखला होता. त्या रक्ताला धार लागून, ते पुढे वाहत गेलेले नव्हतं; परंतु त्या जागेवर मात्र टपोऱ्या द्राक्षाएवढ्या आकाराचा रक्ताचा थेंब स्पष्ट दिसत होता. आता मात्र तो स्वत:च्या मनाची खोटी समजूत घालू शकला नाही. काय घडले असावे याचा त्याला पुरता अंदाज आला. एम्माने पर्वत उतरून खाली जाण्याचा प्रयत्न केला होता. तिच्या पायांच्या हालचालीमुळे मांडीच्या रक्तवाहिनीला तुटलेल्या हाडाचा जोरदार धक्का बसला होता. मांडीतील रक्तवाहिनी, हृदयाकडून आलेल्या रक्ताचा पुरवठा खालच्या भागांना करते– पाय, पाऊल व तळवा. तीच नस जर फुटली तर त्याचे काय परिणाम होतात हे एक शल्यचिकित्सक असल्याने त्याला पक्के ठाऊक होते. पायाला पक्के बँडेज नसल्यामुळे काही मिनिटांतच शरीराचा रक्तपुरवठा खंडित झालेला असणार. सामान्य माणसाच्या भाषेत सांगायचे तर अतिरिक्त स्त्रावाने तिचा मृत्यू ओढवला होता.

त्याने आपली बॅटरी तपासली. त्यावर एकोणनव्वद हा आकडा चमकत होता. ते विवर अजून तीनशे फूट खोल होते. त्याने खोलवर प्रकाशझोत सोडला. खाली मिट्ट काळोख होता.

जोनाथनने वर पाहिले. रात्रीच्या काळोखी आकाशाला एक छोटे प्रकाशछिद्र पडावे तशी प्रकाशाची एक बारीक रेघ त्याला दिसत होती.

“दोर अजून खाली सोडा.”

“मी तुला अजून जास्तीतजास्त पंचवीस मीटर खाली पाठवू शकतो. त्याहून जास्त लांबीचा दोरखंड माझ्यापाशी नाही.”

पहिल्या दोरखंडाला दुसरा दोरखंड बांधला जाईस्तोवर जोनाथन थांबून राहिला. स्टेनरने वरून धक्का दिला व जोनाथन खाली जाऊ लागला. त्याने आपला वेग आता कमी केला होता. दर दहा फुटांवर थांबून तो सर्व दिशेला बॅटरीचा प्रकाश फिरवत होता. एखाद्या अडथळ्यावर एम्मा अडकून पडलीये का, हे शोधत होता. बॅटरीवर उमटणारे आकडे क्रमाक्रमाने कमी होत होते... ७० ... ६८ ... ६४... अचानक दोर घट्ट ताणला गेला.

“बस. यापुढे तुला जाता येणार नाही.” स्टेनर वरून ओरडला.

जोनाथन बॅटरीच्या झोतात आजूबाजूला पाहू लागला. अचानक त्याला लाल रंगाचा पट्टा चमकताना दिसला. त्याचंच तर ते जॅकेट होते! त्याने डावीकडे प्रकाश वळवला. तांबूस रंग चमकला. एम्माचे केस? त्याच्या काळजाचा ठोका चुकला. “मला अजून दोर हवाय. अजून काही लांबीचा.”

“आमच्याकडे एक इंचसुद्धा शिल्लक नाही.”

“घेऊन या.” तो कडाडला.

“वेळ शिल्लक नाही. आमच्या मागच्या बाजूला काही सेकंदांपूर्वीच एक मोठा हिमकडा कोसळलाय. कोणत्याही क्षणी अख्खा पर्वत खाली येऊ शकतो.”

जोनाथनने बॅटरीच्या प्रकाशात आपली नजर स्थिर केली. तो लाल पट्टा आता स्पष्ट दिसू लागला. जॅकेटवरचा क्रॉस त्याच्या नजरेत भरला. तो तांबूस रंगाचा पुंजका म्हणजे त्याच्या बायकोचे गळून पडलेले केस होते.

"एम्मा" तिचे नाव त्याच्या घशात घुसमटले.

तो आता तिला पाहू शकत होता. निदान तिची बाह्य आकृती त्याच्या नजरेसमोर होती. ती पोटावर पालथी पडलेली होती. एक हात डोक्यावरून पुढे ताणला गेला होता. जणू मदतीसाठी तिने टाहो फोडला असावा. पण काहीतरी चुकत होते... तिच्याभोवती पसरलेला बर्फ पांढराशुभ्र दिसत नव्हता. त्यावर काळपट रंग चढला होता. आपल्याच रक्ताच्या थारोळ्यात ती निपचित पडली होती.

"आहे ती इथे." तो हट्टीपणे म्हणाला. "आपण तिच्यापर्यंत पोहोचू शकतो."

"ती शंभर मीटर खाली कोसळलीये." स्टेनरने वाद घातला. "ती वाचणे शक्यच नाही. तुला परत फिरावंच लागेल. चार माणसांचं आयुष्य मी धोक्यात घालू शकत नाही."

"एम्मा" जोनाथन जिवाच्या आकांताने ओरडला. "मी आहे, मी. जोनाथन. जर तू शुद्धीत असशील तर फक्त तुझा हात हलव."

ती आकृती तशीच निश्चल पडून होती. जणू त्याचा आवाज तिच्या पोकळीत नुसताच घुमत राहिला असावा.

"गप्प बस." स्टेनरला राग अनावर झाला होता. "तू आपल्या सगळ्यांना इथेच गाडून टाकणार आहेस."

दोरखंडाला एक झटका बसला. पाठच्या बाजूस असलेल्या बर्फावर आदळत जोनाथन वर उचलला गेला. स्टेनर त्याला वर खेचत होता. जोनाथन संतापून गेला. त्याने आपले बूट बर्फात घट्ट रोखून धरले आणि खिशातून चाकू काढत त्याने तो डोक्यावर असलेल्या दोरखंडाला चिकटवला. त्याच्यापाशी बर्फातून चढून जाण्यासाठी वापरली जाणारी लोखंडी पट्टी होती. बर्फ फोडण्याची कुदळ होती. तो दोरीशिवाय उतरून आपल्या बायकोपाशी पोहोचू शकत होता.

त्याने तिच्या आकृतीकडे टक लावून पाहिले. तिचा आकार खूप छोटा आणि अनोळखी दिसत होता. कसलीही हालचाल त्याला दिसली नव्हती. तिच्या शरीरातून कमालीचे रक्त वाहून गेले होते.

त्याने हातातला चाकू दोरखंडापासून दूर नेला व बर्फात रुतवलेले बूट मोकळे केले. दोरखंडाला पुन्हा झटका बसला व तो वर वर ओढला जाऊ लागला. त्याने त्या लाल पट्ट्यावर पुन्हा बॅटरीचा प्रकाशझोत मारण्याचा प्रयत्न केला; पण आता तो पट्टा अदृश्य झाला होता. आपल्या बायकोची आकृती आता त्याच्या दृष्टिक्षेपात राहिली नव्हती.

"एम्माऽ" त्याने टाहो फोडला. त्याच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. त्याच्या आवाजाचा प्रतिध्वनी त्या अवकाशात पुन्हा पुन्हा उमटत राहिला.

४

सीसस्ट्रॅसेच्या रस्त्यावरून लँड-रोव्हर सुसाट वेगाने चालली होती. लवकरात लवकर झुरिचच्या बाहेर पडणे आवश्यक होते. गाडीमध्ये फक्त एकच इसम होता. त्याच्या गालांवर दाढीचे खुंट वाढले होते व डोळ्यांखाली काळी वर्तुळे तयार झाली होती. गेले चोवीस तास तो प्रवास करत होता. त्याला खरेतर तीन गोष्टींची प्रचंड गरज होती. जेवण, अंघोळ व झोप. अर्थात, या तीन गोष्टी त्याला मिळणारच होत्या. त्याआधी एक महत्त्वाचे काम त्याला हातावेगळे करायचे होते.

बाजूचा कप्पा उघडत त्याने पिस्तूल बाहेर काढले. गोळी सुटताना आवाज न करणारे. त्याने शेजारच्या सीटवर पिस्तूल ठेवून दिले. काचेतून त्याचे लक्ष बाहेरच्या विस्तीर्ण तलावाकडे गेले. काळोखात अनेक पांढरी शिडे फडकत होती. दूरवर एका मोठ्या बोटीचे दिवे लुकलुकत होते व वाऱ्याच्या वेगामुळे त्यांचा प्रकाश हेलकावत होता. जलप्रवासासाठी ती रात्र नक्कीच योग्य नव्हती.

पुढच्या सिग्नलला वळून गाडी एका नागमोडी रस्त्यावर आली. गाडीच्या दिव्यांवर बर्फ साठला होता, पण त्याने गाडीचा वेग जराही कमी केला नाही. त्याला रस्ता पूर्ण परिचित होता. काही तासांपूर्वी, संध्याकाळीच तो या रस्त्यावरून गाडी घेऊन आला होता. त्या प्रदेशाच्या नकाशाचा त्याने नीट अभ्यास केला होता. आत शिरण्याची व तिथून निसटण्याची ठिकाणे, त्याने आपल्या स्मरणात पक्की करून ठेवली होती.

उंच चढावावर अॅक्सिलेटर दाबत तो एका पठारावर येऊन पोहोचला. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अंतरा-अंतरावर बांधलेले आलिशान बंगले दिसत होते. झुरिच तलावाच्या पूर्वेला असलेला तो भाग 'सुवर्णकिनारा' या नावाने ओळखला जाई. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत लखलखीत प्रकाश व तेथील श्रीमंत लोकांची वस्ती यासाठी सुवर्णकिनारा प्रसिद्ध होता. आपले 'लक्षय' असलेले घर दिसू लागताच त्याने गाडीचा वेग कमी केला. मुख्य रस्त्यापासून आतील बाजूस परंतु उंचावर बांधलेले ते घर, फ्रेंच वसाहतींमध्ये जशी घरे बांधली जातात, त्या धाटणीचे होते. घराच्या दोन्ही बाजूला फळबागा होत्या.

वीस मीटर पुढे जाऊन त्याने एका उंच पाईन वृक्षाच्या छायेत गाडी थांबवली. त्याने गाडीचे दिवे बंद केले व इंजिनाची घरघर बंद होण्याची शांतपणे वाट पाहिली. जोरात वाहणारा वारा गाडीच्या खिडकीवर आपटत होता. जॅकेटमधल्या एका देखण्या चांदीच्या पेटीतून त्याने चार गोळ्या बाहेर काढल्या. नाकाचा आकार असलेल्या त्या तपकिरी रंगांच्या गोळ्यांवर X ही खूण कोरलेली होती. बोटे निमुळती करत त्याने त्या चारही गोळ्या रांगेने समोरच्या आडव्या पट्टीवर ठेवून दिल्या. नंतर त्याने आपल्या गळ्यात लटकवलेली चिनी मातीची छोटी बाटली काढून त्याचे बूच उघडले. मग तो हळूहळू मंत्रासारखे काहीतरी पुटपुटू लागला. विस्मृतीत गेलेल्या एक प्राचीन भाषेतले शब्द त्याच्या ओठांवर होते. त्याच्या स्वतःच्या गणतीनुसार, आजपावेतोवर त्याने तीनशे

पुरुष, स्त्रिया व मुलांना यमसदनाला पाठवले होते. परलोकातील त्या अतृप्त जिवांपासून आपल्या आत्म्याला संरक्षण मिळण्यासाठी तो ती प्रार्थना म्हणत होता. गेली वीस वर्षे, एक व्यावसायिक खुनी म्हणून काम करताना तो नकळत अंधश्रद्ध बनला होता.

एकामागोमाग एक अशा त्याने आपल्या हातातील गोळ्या त्या बाटलीतील चिकट व कडवट वास असलेल्या द्रवात बुडवल्या. हे त्याचे नित्याचे कर्मकांड होते. प्रथम प्रार्थना व मग त्या द्रवाचा वापर करणे. पक्का व्यावसायिक असल्याने त्याला एक गोष्ट आपल्या अनुभवातून कळून चुकली होती की, अतिसावध राहण्यात मुळीच अर्थ नसतो. या जगातही नाही आणि पुढच्याही जगात नाही. प्रत्येक गोळीवर एकेक फुंकर मारत, त्याने गोळ्या पिस्तुलात सारल्या व हातात पिस्तूल धरत मधला भाग गोलाकार फिरवला. पिस्तुलाची सुरक्षा-झडप व्यवस्थित असल्याची खात्री करत त्याने दुसऱ्या खिशातून एक कापडी पिशवी काढली व पिस्तुलाचे फक्त पुढचे टोक उघडे ठेवून ती पिस्तुलाभोवती गुंडाळली.

तो खाली उतरला. त्याची भेदक नजर, रस्त्याचा वर-खाली वेध घेऊ लागली. एक चिटपाखरूही दिसत नव्हते. हवामानाने आज त्याला उत्तम साथ दिली होती. रात्रीचे फक्त साडेनऊ वाजले होते; पण सारा परिसर चिडीचूप झाला होता.

आपल्या ओव्हरकोटची बटणे लावत, तो रस्त्यावरून काही अंतर आत चालत गेला. तसा तो सडपातळ इसम होता. मध्यम उंची, अरुंद खांदे आणि शर्टच्या कॉलरवर लोंबणारे लांब काळे केस. त्याचे गाल ओढलेले होते व नाक लांबट व खानदानी वाटायचे. त्याला चालताना जर दुरून कुणी पाहिले असते तर त्याला वाटले असते की कुणीतरी हवेत तरंगत जातोय. त्याच्या त्या कृश व तरल हालचालींमुळे त्याला एक टोपणनाव मिळाले होते– पिशाच.

घराच्या मुख्य दरवाजाला लागून असलेल्या काचेच्या खिडकीमुळे त्याला आतले दृश्य सहज पाहता आले. एका कोचावर एक स्त्री व तीन मुले टी.व्ही.वरील कार्यक्रम पाहाण्यात दंग झाले होते. खिडकीपाशी रेंगाळत तो आत पाहू लागला. त्यातला सर्वांत छोटा मुलगा हा त्याच्याचसारखा काळा व हडकुळा होता. आईला गच्च मिठी मारून तो टी.व्ही. बघत होता. त्या मुलाला पाहून त्याची छाती धडधडली. सापळ्यात अडकलेल्या पक्षयाने गजाला जोरजोरात धडका द्याव्यात तशा सर्व आठवणी त्याच्या नजरेसमोरून तरळून गेल्या.

त्याने नजर हटवली.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला दृष्टिक्षेप टाकत एखादे वाहन येत नाही ना याची त्याने खात्री केली व छोट्याशा कुरणासमोर असलेल्या कुंपणावरून उडी मारत तो पलीकडे पोहोचला. घराच्या त्या कडेला लाकडाचे ओंडके व्यवस्थित रचून ठेवले होते. त्या ओंडक्यांच्या पाठची जागा त्याने निवडली व तिथे पडलेल्या बर्फावर दबा धरून तो वाट पाहात राहिला.

इतर वेळी तो एका छोट्या गटाबरोबर आलेला असायचा. तो गटप्रमुख मात्र कधीही नसायचा. आखलेली मोहीम त्याला नीट ठाऊक असायची. ज्या व्यक्तीचा 'गेम' करायचा असेल, त्याच्याभोवती दोन साथीदार घुटमळत असायचे. काम फत्ते झाल्यावर

त्याला घरी घेऊन जाण्यासाठी एक गाडी बाहेर उभी असे. मुख्य शूटरला ताबडतोब विमानतळावर किंवा रेल्वेस्टेशनवर घेऊन जाण्यासाठी आणखी काही साथीदारांचे पथक सज्ज असे. त्याला सुखरूपपणे देशाबाहेर पाठवले जाई. ही त्यांची ठरलेली कार्यपद्धती असायची.

पण हा आत्ताचा क्षण त्याला अधिक आवडत होता. मिट्ट काळोखात एकटयानेच उभे राहणे, दबा धरून, एका यमसेवकाच्या भूमिकेत.

त्याने खिशातून एक छोटी लोखंडी पेटी काढली. त्या यंत्रपेटीत एक स्वयंचलित खटका होता. त्याने तो खटका दाबताच समोरच्या गॅरेजचे दार घट्ट चिकटून बसले. आता त्या इसमाला गाडीतून उतरून तो दरवाजा प्रयत्नपूर्वक उघडावा लागणार होता किंवा बाजूच्या दरवाजाने आत जाऊन मुख्य दरवाजा उघडावा लागणार होता.

दूर अंतरावर त्याला एका शक्तिशाली इंजिनाची संथ, तालबद्ध घुर्रघुर्र ऐकू येऊ लागली. त्याने खिशातून पिस्तूल काढले आणि तो रस्त्याकडे टक लावून पाहू लागला. ऑडी-८ चे ते अगदी अलीकडचे मॉडेल होते. चढावरून गाडी वर आली. गाडीचे दिवे, डोळे दिपवू लागले. त्याने पिस्तुलाची सुरक्षा झडप मोकळी केली.

गाडी एकदम दृष्टिक्षेपात आली. रस्त्यावरील दिव्याच्या उजेडात त्याने गाडीचे मॉडेल व गाडीवरचा नंबर नीट पाहून घेतला. वेग कमी करत गाडी गॅरेजसमोर येऊन थांबली. ड्रायव्हरच्या बाजूचा दरवाजा उघडला गेला. इसम गाडीतून खाली उतरला. तो उंच व धिप्पाड माणूस होता. तपकिरी केसांचा आणि गुबगुबीत गालांचा. तो एक निष्णात इंजिनिअर होता. कुटुंबवत्सल असला तरी शिस्तीच्या बाबतीत अत्यंत करडा होता.

आता त्या इसमाच्या दिशेने जाण्यास 'पिशाचा'ने सुरुवात केली. तीन ढांगांत तो त्या इसमाच्या समोर जाऊन ठाकला. अपरिचित माणसाला पाहून तो गृहस्थ गोंधळून गेला. गॅरेजचा दरवाजा आपोआप का उघडला नाही? हा मनुष्य कोण? आणि तो हवेतून अचानक असा कसा अवतरला? त्या इसमाच्या मनात उडालेला गोंधळ पिशाच्याने बरोबर हेरला व संधी साधली. खांदा वर उचलत त्याने चाप ओढला. चेहऱ्याचा वेध घेत, तीन गोळ्या सटासट सुटल्या. गोळ्यांची टरफले कापडी पिशवीत उडून पडली. इसम उभ्याउभ्याच खाली कोसळला.

पिशाच्याने खाली झुकत आपले पिस्तूल त्याच्या छातीवर टेकवले आणि आणखी एक गोळी छाती चिरत आत घुसली. शेवटचा आचका देताना शरीर डुचमळले. नेमके त्याच क्षणी 'पिशाचा'चे लक्ष त्या इसमाच्या कोटाकडे गेले. कोटाच्या कॉलरवर एक सोनेरी पिन चमचम करत होती. नीट निरखण्यासाठी तो खाली वाकला.

ते एक फुलपाखरू होते.

५

मार्क्स व्हॉन डॅनिकन घरी पोहोचला तेव्हा अकरा वाजून गेले होते. त्याच्या हातात चंदेरी जिलेटिन कागदात गुंडाळलेले, लांब देठांचे दोन लाल गुलाब होते. अंधाऱ्या दिवाणखान्यातून तो स्वयंपाकघरात पोहोचला तेव्हा टेबलावरचा मंद दिवा जळत होता. पिस्तूल व पैशाचे पाकीट तिथल्या फळीवर भिरकावत त्याने एक भली मोठी जांभई दिली आणि फ्रिज उघडून बिअरची बाटली बाहेर काढली. फ्रिजमध्ये एक हॅम सँडविच होते. शिवाय बटाट्याचे सॅलड आणि लिंबाचे लोणचेही होते. एका पातळ पारदर्शक तावामध्ये ते तीनही पदार्थ व्यवस्थित गुंडाळून ठेवले होते. त्याच्या घरगड्याने लिहून ठेवलेल्या चिठ्ठीमुळेच त्याला ते उरलेले पदार्थ फ्रिजमध्ये ठेवून द्यायची आठवण झाली होती. अंगातले जॅकेट खुर्चीवर टाकत त्याने शर्टाच्या बाह्या वर खेचल्या आणि बेसिनमध्ये हात धुतले. त्याने सँडविच खाल्ले व राहिलेले दोन पदार्थ अगदी तत्परतेने पुन्हा फ्रिजमध्ये ठेवून दिले.

व्हॉन डॅनिकन, बर्नलगत असलेल्या छोट्याशा टेकडीपायथ्यावर एका प्रशस्त घरात एकटाच राहत होता. ब्रह्मचाऱ्यासाठी ते घर अवाढव्यच म्हणायला हवे. घर वडिलोपार्जित होते. त्याचे वडील, आजोबा अशा दोन-तीन पिढ्या त्याच घरात राहिल्या होत्या. याचा अर्थ एकोणिसाव्या शतकात ते घर बांधले गेले असावे. खरे म्हणजे असे एकट्यानेच राहाणे, त्याला विशेष पसंत नव्हते. परंतु घराबाहेर पडायलाही त्याला फारसे आवडत नसे. त्यामुळे गेली अनेक वर्षे, त्याने त्याच्याच आवाजाला प्रतिसाद देणारे घरातले लांबलचक व्हरांडे, खिन्न कुढणारी शांतता व कायम काळोखात असलेल्या खोल्या, यांनाच आपले मित्र बनवले होते.

तो टेबलाकडे वळला व पुष्पविक्रेत्याकडून आणलेला तो चंदेरी कागद उलगडून त्यातली दोन फुले बाहेर काढली. गुलाबांचे देठ काळजीपूर्वक तासून त्यानी ती फुले विजेच्या फुलदाणीत ठेवली. मुरानोला तो जेव्हा हनिमून साजरा करत होता, त्या वेळेस तिथल्या एका प्रसिद्ध कारखान्यातून त्याने फुलदाण्यांची एक जोडी विकत घेतली होती. ती फुलदाणी त्यापैकीच एक होती. आयुष्यात त्याने फक्त एकदाच लग्न केले होते. त्याला एक मुलगी होती आणि दुसरीही होणार होती. त्या वेळी घर एवढे प्रशस्त नव्हते. तरीही त्याने ते घर विकून टाकावे असा हट्ट त्याच्या बायकोने धरला होता. व्यवसायाने ती वकील होती व जिनिव्हाच्या कोर्टात काम करत असे. आपल्या कामात ती निष्णात होती, पण तिचा स्वभाव किंचित अतिउत्साही व उतावळा होता. तिला ते घर जुनाट, पारंपरिक व पुराणकालीन वाटत असे. तो तिच्याशी सहमत नव्हता. पण आपसातले मतभेद मिटवण्याची त्यांना संधीच मिळाली नाही.

व्हॉन डॅनिकनने दिवाणखान्यातला दिवा लावला. शेकोटीच्या जागेच्या वर त्याच्या बायको व मुलीचा फोटो होता. मेरी-फ्रान्स व स्टेफनी. दोघीही सोनेरी केसांच्या. पंधरा

वर्षांपूर्वी एका विमान अपघातात ठार झालेल्या दोघींचे मृतदेह ताब्यात घेताना त्याचे काळीज आक्रंदून उठले होते. कालच्या कोमेजलेल्या गुलाबांच्या जागी त्याने ताजे टपोरे गुलाब ठेवले व मग आरामखुर्चीत सैलावत त्याने उरलेली बिअर संपवली. बाजूला पडलेला रिमोट उचलून त्याने टेलिव्हिजन सुरू केला. सुदैवाने त्या दिवशी दुपारी ते अटक न करू शकलेल्या गुन्हेगाराचा उल्लेख बातम्यांमध्ये आला नाही. तो चॅनल्स बदलत राहिला व एका फ्रेंच साहित्यविषयक कार्यक्रम चालू असलेल्या चॅनलवर थांबला. साहित्याविषयी त्याला जराही प्रेम नव्हते. पण सूत्रसंचालन करणारी ती स्त्री त्याच्या मनात भरली. मध्यमवयीन, आकर्षक, तपकिरी केसांची ललना. त्याने टी.व्ही.चा आवाज बंद केला व टक लावून तिच्याकडे पाहू लागला. रेखीव. पूर्ण स्त्री. आता त्याला सोबत मिळाली होती.

खऱ्याखुऱ्या आयुष्यापेक्षा टी.व्ही. त्याला अधिक सुरक्षित वाटला. इतक्या वर्षांमध्ये त्याने अनेक स्त्रियांबरोबर एकांत अनुभवला व भोगला होता. बहुतेकींबरोबर फक्त एकदाच, काहींच्या बाबतीत दोनदा आणि फक्त दोन स्त्रियांबरोबर त्याचे संबंध सहा महिन्यांहून अधिक टिकले होते. त्या दोनही स्त्रिया मोहक, बुद्धिमान व शय्यासोबतीत प्रवीण होत्या. अर्थात, त्याच्या बायकोशी मात्र त्यांची तुलना होऊच शकली नव्हती. याच कारणामुळे तर ते दोन्ही संबंध हळूहळू विरत गेले होते. फोनकॉल्स अनुत्तरित राहात गेले. भेटी विरळ होत गेल्या. अनेकदा, हाती आलेल्या महत्त्वाच्या केसमुळे तो अखेरच्या क्षणी, ठरलेली भेट रद्द करून टाकायचा. त्याचा उदासीनपणा लक्षात यायला, त्या सुज्ञ स्त्रियांनाही फारसा वेळ लागला नाही. मात्र एक गोष्ट त्याच्या अपेक्षेपेक्षा विचित्र घडली. संबंध तोडताना, त्या दोनही स्त्रियांनी त्याला खूप मानसिक यातना दिल्या व ती कडवट चव बराच काळ त्याच्या जिभेवर रेंगाळत राहिली.

त्याचा सेलफोन वाजू लागला. “कोण?”

“विडमर. झुरिच पोलीसस्टेशन. आमच्या हद्दीत एक घटना घडलीय. अर्लेनबॅचमध्ये एक खून झालाय. सुवर्णकिनारा. खुनी, सराईत व्यावसायिक असावा.”

व्हॉन डॅनिकन आरामखुर्चीतून ताडकन उठला व त्याने टी.व्ही. बंद केला. “मग मला फोन कशासाठी केलात? हा तर फौजदारी गुन्हा आहे.”

पण त्याने हालचाली करायला सुरुवातही केली होती. स्वयंपाकघरात जाऊन त्याने उरलेली थंड बिअर बेसिनमध्ये ओतली. कमरेला पिस्तूल लटकवले. जॅकेट चढवले व पैशाचे पाकीट खिशात सरकवले.

“मृत व्यक्तीचं नाव ISIS च्या यादीत नोंदलं गेलंय.” विडमरने स्पष्टीकरण दिले. “त्याच्या फाईलवर ‘गोपनीय’ असा शेरा मारला गेलाय आणि वीस वर्षांपूर्वी त्याची कसून चौकशी केली गेली होती.”

ISIS म्हणजे इन्फर्मेशन सिस्टिम फॉर इंटर्नल सिक्युरिटी. अंतर्गत सुरक्षेसाठी निर्माण केली गेलेली माहिती यंत्रणा. पन्नास हजारांहून अधिक दहशतवादी, अतिरेकी व परदेशी गुप्तहेरांची-मित्रराष्ट्र व शत्रूराष्ट्र, दोघांचीही – संपूर्ण माहिती संगणकावर संकलित करण्यात आली होती.

“कोण आहे तो भाग्यवान इसम?” खिशातून गाडीची चावी उपसत, त्याने विचारले.

“त्याचं नाव लॅमर्स आहे. डच. ‘C ’ परवानाधारक. इथे तो पंधरा वर्षं राहत होता.” विडमर क्षणभर बोलायचा थांबला आणि त्याचा आवाज किंचित घोगरा झाला. “त्या व्यतिरिक्त आणखीही पाणी मुरतंय. मला वाटतं की तुला ते प्रत्यक्षच पाहायला आवडेल.”

“ठीक आहे. मला फक्त नव्वद मिनिटांचा अवधी दे.”

व्हॉन डॅनिकनला एकशेदहा किलोमीटर्सचे अंतर पार करायला फक्त पंचाऐंशी मिनिटे लागली. गाडीतून खाली उतरत तो बर्फाच्छादित निसरड्या रस्त्यावरून सावधपणे चालत गेला व पोलिसांनी लावलेल्या ‘टेप’खाली वाकून आत शिरला. झुरिच पोलीस अधिकाऱ्याने त्याला पाहिले व तो पुढे आला. “गुड इव्हिनिंग सर.”

व्हॉन डॅनिकनने त्याचा खांदा थोपटला. “मी कॅप्टन विडमरला शोधतोय.”

“त्या तिथे वर.” गॅरेजकडे बोट दाखवत तो पोलीस अधिकारी म्हणाला.

गॅरेजचा परिसर प्रकाशझोताने चमकत होता. व्हॉन डॅनिकन चढून वर गेला. एक हजार वॅट्स क्षमता असलेल्या दिव्यांच्या झगझगीत प्रकाशाने डोळे दिपून जात होते. क्षणभर त्याला वाटले की सेंट ट्रोपेझच्या त्या ताहिती-प्लॅग पठारावर एका मृत इसमाला सूर्यस्नान घातले जात आहे. त्याने त्या प्रेताकडे एकवार पाहिले आणि झटकन मान वळवली. “काम तर चोख बजावलंय.” तो स्वत:शीच पुटपुटला.

रुंद खांद्यांचा व टक्कल पडलेला एक गृहस्थ आपले गुडघे टेकवून त्या प्रेताचे निरीक्षण करत होता. त्याने मान वर करून व्हॉन डॅनिकनकडे पाहिले. “डोक्यामध्ये तीन आणि छातीत एक.” झुरिच पोलीस खात्यातील गुन्हा अन्वेषण विभागाचा प्रमुख, वॉल्टर विडमरने मार्क्सला माहिती दिली. “गोळ्यांचा आकार फारच लहान आहे. एक गोष्ट मात्र नक्की, की ज्या कुणी हे कृत्य केलं, तो कुठलाही धोका पत्करायला तयार नव्हता.”

“तो इसम व्यावसायिक खुनी असावा असं तुझं अजूनही मत आहे?”

“नक्कीच. एकाही गोळीचं आवरण उडालेलं दिसत नाही. गोळ्यांचा आवाज ऐकलेला एकही साक्षीदार मिळालेला नाही.” विडमरच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरलेले होते. “आमच्या अंदाजाप्रमाणे त्या नेमबाजाने आणखी एक चाल खेळलीय. त्याने विद्युत उपकरणाच्या साहाय्याने गॅरेजचं दार निकामी करून टाकलं व लॅमर्सला गाडीतून खाली उतरायला भाग पाडले. आता बोल.”

व्हॉन डॅनिकन त्यावर काहीच बोलला नाही. तो तिथून चटकन सटकला व पुन्हा रस्त्यापर्यंत आला. त्या मृत इसमाचा तो छिन्नविच्छिन्न झालेला विद्रूप चेहरा आता बरेच दिवस त्याचा पिच्छा पुरवणार होता.

मार्क्स व्हॉन डॅनिकनला फौजदारी गुन्ह्यांचा फारसा अनुभव नव्हता. मनुष्यवधाच्या केसेस त्याने क्वचितच हाताळलेल्या होत्या. त्याची पोलिसी कारकीर्द अगदी उलटच्या दिशेने सुरू झाली होती. पायदळातील अधिकारी म्हणून चार वर्षे काम केल्यावर त्याची बदली फेडरल पोलीस खात्याच्या आर्थिक गुन्हेगारी विभागात झाली होती. त्याची पदोन्नती अतिशय धीम्या गतीने होत राहिली. स्विस बँकिंग क्षेत्रातील गैरव्यवहार, बनावट नोटा-प्रकरणे आणि आर्थिक अपहारांच्या केसेस निस्तरण्यातच त्याची बरीच वर्षे गेली होती. त्यानंतर मात्र दहा वर्षांपूर्वी अचानक एक सुवर्णसंधी त्याच्याकडे चालत

आली. नाझी अत्याचारांत बळी पडलेल्या हजारो माणसांच्या मालमत्तेचा मोठा प्रश्न स्विस सरकारच्या अखत्यारित बरेच वर्षं भिजत पडला होता. त्यासाठी स्विस टास्क फोर्सचा प्रमुख प्रतिनिधी म्हणून त्याची निवड करण्यात आली. मार्क्सने त्या संधीचे सोने केले व तो एकदम प्रसिद्धीच्या झोतात आला. देशातील अग्रेसर बँकांच्या संचालकांबरोबर, तसेच डझनभर इतर देशातील निष्णात मुत्सद्यांबरोबर आणि जागतिक मान्यतेच्या सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर काम करण्याची संधी त्याला मिळाली. स्विस सरकार, स्विस बँका, जागतिक ज्यू काँग्रेस व प्रत्यक्ष बळी गेलेल्यांचे वारसदार अशा सर्वांना एकमताने मान्य होईल असा तोडगा शोधून काढण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्या श्रमांचे चीज झाले. फेडरल पोलीस खात्यातील 'सॅप' या प्रतिष्ठित विभागाची धुरा त्याच्याकडे सोपवण्यात आली.

"त्याच्या पत्नीला तू भेटलास?" गॅरेजच्या वरच्या बाजूस दिसणाऱ्या त्या मोठ्या खिडकीकडे निर्देश करत त्याने विचारले. "तिने कदाचित पाहिलं असेल."

विडमरने विषादाने मान हलवली. "ती भलतीच कणखर स्त्री आहे. जन्माने, मोल्युक्कन आहे. तिच्या म्हणण्यानुसार जेव्हा ही घटना घडली तेव्हा ती मुलांबरोबर टी.व्ही. पाहात होती. गाडी कंपाउंडमध्ये शिरताना तिने पाहिली होती. गॅरेजचा दरवाजा उघडला गेलेला नाही हे तिच्या लक्षात आलं, म्हणून ती बाहेर आली. हा सर्व प्रकार फक्त दोन मिनिटांत घडलाय असं ती शपथेवर सांगतेय. मी तिला आपले नेहमीचे प्रश्न विचारले. नवऱ्याला कुणी शत्रू होते का? अलीकडे त्याला कुणी धमक्या दिल्या होत्या का? गेल्या काही दिवसांत एखादी विचित्र घटना घडली होती का? तिच्या मते सर्व काही सुरळीत चाललं होतं."

"तू तिच्यावर विश्वास ठेवशील?"

"मी कधीच कुणावर विश्वास ठेवत नाही." विडमर उत्तरला.

"कदाचित लॅमर्स त्या खुन्याला ओळखत असावा. म्हणून त्याने गॅरेजचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्नही केला नसावा. कदाचित त्या दोघांची भेट आधीच ठरलेलीही असेल."

"मला शंका वाटते. लाकडाच्या ढिगामागे आम्हाला पावलांचे ठसे आढळले. माझ्या अंदाजाप्रमाणे खुनी इसम तिथे लपून त्याची वाट पाहत होता. इथे पोहोचेपर्यंत तू आणखी काही माहिती मिळवलीस?"

"थोडीफार मिळाली. १९८७ मध्ये तो ब्रुसेल्सला असताना, बेल्जियम पोलिसांनी त्याला दर आठवड्याला पोलीस स्टेशनवर हजर राहण्याची ताकीद दिली होती. लॅमर्स जेव्हा स्वित्झर्लंडला स्थायिक झाला तेव्हा त्यांनी त्याची फाईल आमच्याकडे पाठवून दिली. अर्थात आम्ही त्याचे नाव ISIS च्या यादीत टाकले. आणखीही माहिती आहे; पण ती जुन्या दप्तरकार्यालयात आहे. उद्या सकाळपर्यंत मी ती पाहू शकत नाही. मी एवढंच सांगू शकतो की, झुरिचला आल्यापासून त्याने सर्व कायद्यांचं अचूक पालन केलंय. आपला कर नियमितपणे भरलाय. कुठल्याही भानगडीत तो कधीही पडलेला नाही... आणि तुला तर माहितीच आहे की ISIS ची यादी अशा प्रकारच्या माणसांनी खचाखच भरलेली आहे... अजून तरी त्याच्यावर कुठलाही गुन्हा शाबित झालेला नाही."

"त्याच्यावर गुन्हा शाबित झालेला आहे. आत चल."

विडमर त्याला गॅरेजच्या रस्त्याने लॅमर्सच्या घरात घेऊन गेला. मुख्य दरवाजापाशी पोहोचताच तो झटकन एका बाजूला वळला व लगतच्या जिन्याने खाली उतरत तळघरात गेला. "माझ्या एका ऑफिसरला टॉयलेटला जायचं होते. घरात धूळ येऊ नये म्हणून लॅमर्सच्या बायकोने त्याला खाली असलेल्या बाथरूममध्ये जायला सांगितले. तो वाट चुकला आणि अपघाताने लॅमर्सच्या या कार्यशाळेत शिरला."

व्हॉन डॅनिकन त्या बाथरूमच्या बाजूने चालत गेला. बाथरूमचा दरवाजा उघडा होता व आतले दिवे पेटत होते. तसाच तो पुढे चालत राहिला. "तो कसा वाट चुकला असेल हे आता माझ्या ध्यानात आलं."

हॉलच्या टोकाला असलेल्या एका खोलीवर विडमरने बॅटरीचा प्रकाश टाकला. ती कार्यशाळा जणूकाही स्टेनलेस स्टीलच्या धातूनेच बनवलेली होती. स्टेनलेस स्टीलची बाके, उपकरणे ठेवायलाही स्टेनलेस स्टीलची मांडणी. जणू काही आत्ताच फॅक्टरीतून आणल्यासारखी प्रत्येक वस्तू लखलखीत होती. पण ती काही रविवारचे घरगुती उद्योग करण्यासाठी बनवलेली खोली नव्हती. अत्याधुनिक साधनसामुग्रीचा वापर करणाऱ्या एका व्यावसायिक अभियंत्याची ती सुसज्ज खोली होती.

बाजूच्या टेबलावर असलेल्या एका बॅगेमध्ये अनेक पासपोर्ट्स कोंबून ठेवलेले होते.

"हे काय आहे?" व्हॉन डॅनिकनने विचारले.

"माझ्या माणसाला ती सर्वांत वरच्या खणात सापडली."

"तो टॉयलेट पेपर शोधत होता. हो ना?"

विडमरने हुंगल्यासारखे केले व आपली एक भुवई उंचावली. व्हॉन डॅनिकनला त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले होते. त्या अधिकाऱ्याने आपल्या नेहमीच्या सवयीने, त्या खोलीची ताबडतोब कसून झडती घ्यायला सुरुवात केली होती. मिळालेला पुरावा आता कोर्टात सादर करता येणे शक्य नव्हते. पण म्हणून काय झाले? नाहीतरी लॅमर्सला आता कोर्टासमोर उभे करणे अशक्य होते.

"हॉलंड. बेल्जियम. न्यूझिलंड." एकेक पासपोर्ट उघडून बघत तो त्यातील देशांची नावे वाचत होता. "नियमितपणे जगप्रवास करणारा असावा. तुझ्या त्या माणसाला आणखी काही सापडलं?"

"जे सापडलंय, ते त्या कपाटाखाली आहे." विडमर म्हणाला. "आपल्यावर शत्रूची पाळत आहे हे लॅमर्सला समजलेलं असणार. हं, जरा सावधगिरीनं. ती ठासून भरलेली आहे."

व्हॉन डॅनिकनने खाली वाकत आपले डोके कपाटाखाली घुसवले. भिंतीला टेकवून ठेवलेली ती एक उझी बनावटीची सबमशीन होती. त्याच्या नाडीचे ठोके जलद गतीने पडू लागले. "ही बंदूक त्याला कुणी विकली हे शोधून काढा." पुन्हा सरळ उभा राहत तो म्हणाला व पासपोर्ट्स चाळू लागला. "मला वाटतं हे पासपोर्ट माझ्याकडे ठेवायला, तुझी काही हरकत नसावी."

"मला फक्त एका कागदावर लिहून दे."

व्हॉन डॅनिकनने आपल्या डायरीत तशी पावती लिहिली व कागद फाडून विडमरच्या हातात ठेवला.

"झालं तुझ्या मनासारखं? आता एक शेवटची कामगिरी मी तुझ्यावर सोपवतोय.

लॅमर्सच्या बायकोला सांगायचं की तिच्या नवऱ्याला इतकी वेगवेगळी नावं धारण करण्याची गरज का वाटली हे तिने काहीही न लपवता सांगायला हवं, नाहीतर तिला व तिच्या तीनही मुलांना चोवस तासाच्या आत या देशातून हाकलून देण्यात येईल.”

“हे बोलणं जरा जास्तच कठोर वाटेल, नाही का?” विडमर म्हणाला. “म्हणजे... काही तासांपूर्वीच तिच्या नवऱ्याचा कुणीतरी बळी घेतलाय.”

व्हॉन डॅनिकनने आपल्या कोटाची बटणे लावली व तो दरवाजाच्या दिशेने चालू लागला. “बळी?” त्याचा चेहरा ताणला गेला. “ज्याच्यापाशी तीन पासपोर्ट्स आणि गोळ्यांनी भरलेली एक उझी आहे, तो एकतर अट्टल गुन्हेगार असू शकतो किंवा गुप्तहेर.”

६

चारही बाजूंनी काळोख दाटून आला. जोनाथनने पापण्यांची उघडझाप केली. त्याचे डोळे तर टक्क उघडे होते पण भोवतालच्या किट्ट काळोखाने त्याला ठार आंधळे केले होते. त्याने हात उचलायचा प्रयत्न केला पण तो जागीच खिळून गेला होता. खांदे व पायही बर्फात रुतलेले होते. चेहरा सोडला तर अंगभर बर्फाचा वेढा पडला होता. जणूकाही एका स्नानगृहात त्याला काळजीपूर्वक निजवले होते. हाताचे बोट हलवणेही त्याला मुश्किल झाले होते. तरीही अज्ञातातून अखंडपणे एक स्थिर व गंभीर आवाज त्याला ऐकू येत होता. शांत रहा. शांत रहा. अपेक्षेपेक्षा हवा मात्र कमी थंड होती. पण काळोख? इतका गर्द काळोख त्याने कधीच अनुभवला नव्हता. इथल्या काळोखाबद्दल कुणी कधी बोललेलेही नव्हते. त्याला श्वास घेताना आता फार त्रास होऊ लागला. हवा वेगाने विरळ होत चालली होती. आपण खूप खोल गाडले गेलोय आणि कुणीतरी येऊन आपली सुटका करण्याची शक्यताही आता उरलेली नाही हे त्याला कळून चुकले. शरीराच्या आतून भीतीची एक लहर हळूहळू उमटत गेली. मग पोटातून वर सरकत ती छातीपर्यंत पोहोचली. सर्व शक्ती पणाला लावून त्याने ती जीवघेणी शांतता चिरून टाकण्याचा प्रयत्न केला. पण घशातून फक्त हलकासा एक आवाज आला. किर्र काळोख. असह्य ताण. अपुरी हवा. काळजात धडकी भरली. जिवाच्या आकांताने, त्याने किंकाळी मारण्यासाठी तोंड उघडले. उघड्या तोंडात बर्फाचा खच पडला.

तो बिछान्यावर ताडकन उठून बसला.

“एम्माऽ” धापा टाकत त्याने हाक मारली. बिछान्यावरची चादर तो चाचपडू लागला.

तेच स्वप्न त्याला पुन्हा पुन्हा पडत होते. तिचा आवाज ऐकायची त्याला आस लागली होती. तिचा तो खांद्यावरचा स्पर्श त्याला हवा होता. त्याने लाईट लावला. एम्मा झोपायची ती जागा जराही विस्कटलेली नव्हती. तिची लाडकी सफेद दुलई नीट घडी करून गुपचूप बसली होती. तिच्या उशीखालून तिच्या नाईटशर्टाचे एक टोक बाहेर डोकावत होते.

ती निघून गेलीय.

वादळ दुरून येताना जाणवावे तसे त्याला हळूहळू भान येत गेले. त्याच्या श्वासाचा वेग वाढला. बोटांच्या टोकाला मुंग्या आल्या. कुणीतरी पोटात एक थंड व तीक्ष्ण हत्यार खुपसावे, तशा मरणप्राय यातनांनी तो विव्हळला आणि अंगाचे मुटकुळे करून त्याने गुडघ्यात मान खुपसली. तो हमसाहमशी रडू लागला.

ती निघून गेलीय.

ते शब्द डोक्यात घुमू लागले. गोठलेल्या काळोखात बेवारशासारखी एकटीच पडलेली तिची आकृती त्याला असह्यपणे छळू लागली.

अखेर त्या वादळाचा जोर ओसरत गेला. त्याचा श्वास मंद झाला. भीतीची छाया

अस्पष्ट होऊ लागली, पण ती पूर्ण नाहीशी झालेली नाही हेही तो उमजून होता. अगदी जवळपासच ती दबा धरून बसलीय हे त्याला पक्के ठाऊक होते.

तो उठला व खिडकीपाशी गेला. बाहेर हिमवृष्टीचा जोर वाढला होता आणि पहाटेच्या त्या धूसर प्रकाशाचा निषेध करत, आकाशात दाटी केलेल्या ढगांनी मृत्यूचा एकच कल्लोळ आरंभला होता. टुमदार झोपड्यांमुळे एरवी ठिपक्या ठिपक्याचा दिसणारा डोंगर आज अदृश्य झाला होता. त्यापुढे अर्ध्या मैलावर उंच टेकड्या चढत गेलेले विस्तीर्ण जंगल पसरले होते. अख्ख्या शहराला त्या जंगलाने जणू आपल्या पाळण्यात बसवले होते.

गॅलरीचा दरवाजा उघडत त्याने बाहेर पाऊल ठेवले. बोचऱ्या थंडीमुळे हवेला काही गंधच नव्हता. त्याने मोकळा श्वास घेण्याचा प्रयत्न केला, परंतु आत आलेली हवा त्याचा घसा व छाती जाळत गेली. कठड्यावर रेलत तो, कालचा आपला मार्ग शोधू लागला. त्याची नजर पर्वतात खोल घुसत गेली. ढगांमधून, धुक्यामधून वाट काढत फुर्गाच्या शिखरावर विसावली आणि आणखी पलीकडे जात रोमनच्या पॉईंटवर.

मला हा पर्वत परिचित होता आणि तरीही मी तुझे रक्षण करू शकलो नाही.

मला हा पर्वत परिचित होता आणि तरीही मी तुला एकाकी पाडले.

मला हा पर्वत परिचित होता आणि तरीही मी त्याला तुझा सर्वनाश करू दिला.

थंडीने सर्वांगाला कापरे भरू लागले तसा तो आत परतला. दिवाणखान्याचा नीटनेटकेपणा त्याच्या नजरेला खुपू लागला. ती निघून गेलीय म्हणून घरातल्या खोल्यांनीही विस्कटून जायला हवे, ही कल्पना बालिश वाटण्यासारखी होती. पण कुठलीच गोष्ट ताळ्यावर राहिलेली नसताना, त्या खोलीने निर्विकारपणे असे नटून राहाणे, त्याला विश्वासघातकी वाटले.

टेबलाजवळ बसत त्याने टेबलाचा खण उघडला. छोटा चाकू, नकाशे, ओठांना लावायचा बाम, डोक्याला गुंडाळायचा रुमाल, धोक्याचा इशारा देणारा दिवा आणि रेडिओ. अनेक वस्तू खणात पसरलेल्या होत्या. त्याने रेडिओ उचलला व बटणांची उघडझाप करू लागला. रेडिओ पूर्णपणे निकामी झाला होता.

वायर... तुटलेली वायर.

पर्वत उतरल्यावर जोनाथनला पोलीस स्टेशनवर नेण्यात आले होते. एका डॉक्टरने त्याची पूर्ण तपासणी केली होती व त्यानंतर पोलिसांच्या निरर्थक प्रश्नांची त्याला उत्तरे द्यावी लागली होती. पूर्ण नाव : जोनाथन हॉबर्ट रॅन्सम. जन्मठिकाण : अॅन्नापोलिस, मेरीलँड. व्यवसाय : बोर्डाचा प्रमाणित शल्यचिकित्सक. नागरिकत्व : अमेरिकन. निवासस्थान : जिनिव्हा.

त्यानंतर एम्मासंबंधीचे प्रश्न. जन्मठिकाण : पेन्झान्स, इंग्लंड. पालक : मृत. भावंडे : एक बहीण, बिट्राइस. व्यवसाय : परिचारिका व व्यवस्थापिका. अतिसंवेदनशील व्यक्तिमत्त्वाची स्त्री. सर्व बाबतीत 'कर्तव्यभावनेने लुडबुड' करायची वृत्ती. पत्नी. जिवाभावाची मैत्रीण. सूत्रधार.

आणखीही प्रश्न विचारले गेले. त्याच्या गिर्यारोहणाच्या अनुभवासंबंधी. एम्मा नेमकी कुठे व कधी खाली कोसळली? तो तिला सोडून निघाला तेव्हा तिला रक्तस्त्राव होत होता का? गिर्यारोहण सुरू करण्याआधी रेडिओमधला दोष त्याच्या कसा लक्षात

आला नाही? आणि शेवटचा प्रश्न म्हणजे, वादळाची तीव्रता वाढत चाललीय हे लक्षात येऊनसुद्धा वर चढत राहण्याचा निर्णय त्याने का घेतला?

तो निर्णय त्याने घेतला नव्हता असे त्याला सांगावेसे वाटले. निर्णय सर्वस्वी तिचा होता. एम्मा परत वळायला तयार नव्हती.

त्याने तो रेडिओ टेबलावर ठेवला आणि फिरून त्याचे डोळे त्या पर्वतात भिरभिरू लागले. आपण या गिर्यारोहणाच्या प्रेमात कधी पडलो याचा तो विचार करू लागला आणि त्याला आठवले, तो नऊ वर्षांचा असतानाची त्याची पहिली कॅलिफोर्नियाची सहल. अख्खे रॅन्सम कुटुंब त्या सहलीत सहभागी झाले होते. माऊंट व्हिटनी चढून जायचे हा त्यांचा मुख्य हेतू होता. अठ्ठेचाळीस राज्यांमध्ये पसरलेल्या पर्वतातले, माऊंट व्हिटनी हे सर्वांत उंच शिखर होते. सहलीचा आराखडा साधारण असा होता की, ८५०० फूट उंचीवर असणाऱ्या व्हिटनी प्रवेशद्वारापासून पहाटे पाच वाजता त्याच्या मोठ्या भावांनी चढायला सुरुवात करायची आणि बावीस मैलांची प्रदक्षिणा पूर्ण करत, १४,५०० फुटांवर असणारे व्हिटनीचे शिखर सर करून एका दिवसात परतायचे. जोनाथन व त्याचे वडील, त्यांना काही मैल साथ करतील व मग एखाद्या ठिकाणी थांबून राहतील. मोठे भाऊ परत येईपर्यंत मासे वगैरे पकडत मौज करतील.

परंतु त्या वयातच, जोनाथनने आपल्या स्वतंत्र स्वभावाची चुणूक दाखवायला सुरुवात केली होती. लहानपणी प्रत्येकाच्याच मनात आपले मोठे भाऊ हे दैवतासमान असतात व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालायची मनात इर्षा असते. आपल्याला मागे ठेवून आपले भाऊ पुढे निघून जाणार ही कल्पनाच त्याला सहन न होणारी होती. त्याचे वडील त्या वेळेस चाळीस वर्षांचे होते. जिवाची दमछाक करून घेण्यापेक्षा, एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी थांबून, कॉकटेलसमवेत मस्त भोजनाचा स्वाद घ्यावा ही त्यांची मौज करण्याची कल्पना असायची. जोनाथनचा स्वभाव मात्र त्यांच्या विरुद्ध होता. चार मैल अंतर चालून झाल्यावर जेव्हा वडलांनी थांबायचा प्रस्ताव मांडला; तेव्हा जोनाथन मात्र पुढे चालतच राहिला. वडलांनी त्याला हाका मारल्या पण त्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पूर्ण अंतर पार करेपर्यंत तो एकदाही थांबला नाही व अखेर आपल्या भावांनाही शंभर यार्डाने मागे टाकत तो शिखर चढून गेला.

जोनाथन आता सोळा वर्षांचा झाला होता. ट्रेकिंग हा त्याचा एकच ध्यास होता. ट्रेकिंगमधल्या उत्तम यशामुळे त्याला शाळेच्या परीक्षेतूनही सूट मिळाली होती. कॉलेजला जायचा विचार तर त्याच्या मनात कधीच आला नाही. उन्हाळ्यात माऊंट मॅक्किनलेवर सफर तर हिवाळ्यात अवघड बर्फांच्या कड्यांवरून वाटाड्या व गस्तीचा पहारेकरी म्हणून काम करणे यातच त्याचे वर्ष निघून जात असे. वाचवलेल्या प्रत्येक पैशाचा विनियोग नव्या मोहिमेसाठी केला जाई. या काळात त्याने उत्तम नावही कमावले. ऑक्सिजन सिलिंडरशिवाय त्याने आयगर नॉर्डवंडचे अॅकॉनकाग्वा हे शिखर काबीज केले होते.

त्याच काळात त्याला स्वत:च्या व्यक्तिमत्त्वातला एक दोष लक्षात आला होता. आपल्याला अमानवी ताकदीची निसर्गदत्त देणगी आहे व जोडीला बंडखोर स्वभाव आहे आणि म्हटले तर हा एक दोष आहे. पण या दोन गोष्टींमुळे त्याला मुष्टियुद्धामध्ये प्रचंड रस निर्माण होऊ लागला. पर्वतातल्या आरामगृहांमध्ये त्याच्या मुठी वारंवार वळू

लागल्या. तिथल्या मद्यगृहात माज करणारे व फुशारक्या मारणारे अनेक जण समोर येत. प्रतिस्पर्ध्यांची तो काळजीपूर्वक निवड करत असे व सर्वांत घमेंडखोर माणसाला आव्हान देई. त्याच्या मते शिक्षेस सर्वाधिक पात्र असणाऱ्याला व त्याच्याशी टक्कर द्यायला लायक असणाऱ्याला तो मुद्दामहून चिथावत असे. त्या आधी तो बार्बीन व्हिस्कीचा एक पेग रिचवत असे.

प्रत्यक्ष लढतीचा कालावधी तसा कमी वेळाचा असला तरी त्या छोट्याशा काळात प्रतिस्पर्धी एकमेकांवर अतिशय निर्दयपणे हल्ला करत असत. तो अतिशय धूर्त व चलाख लढवय्या होता. प्रतिस्पर्ध्याचे कच्चे धागे तो चटकन हुडकून काढी. एक-दोन मिनिटे तो समोरच्याचे ठसे हुकवत व त्याला दमवत नुसताच त्याच्याभोवती गोल गोल फिरे. नंतर मात्र तो आत घुसत प्रतिस्पर्ध्याच्या हनुवटीवर जबरदस्त तडाखा हाणत असे, पोटामध्ये एक सणसणीत गुद्दा लगावत असे आणि गर्रकन फिरत डोक्याच्या खाली जोरदार प्रहार करत असे. सारा खेळ पाच मिनिटांत संपत असे. आपल्या या खास वेळ-बचत तंत्राचा त्याला सार्थ अभिमानही वाटत असे.

आपल्यामध्ये येणारी ही उत्स्फूर्त उर्मी अयोग्य व धोकादायक आहे आणि एक ना एक दिवस ती आपला घात केल्यावाचून राहाणार नाही ह्याची त्याला जाणीव होती. आपल्याला धोका पत्करायचे जणू व्यसनच लागलेय ही गोष्टसुद्धा त्याच्या लक्षात आली होती. अनोळखी ठिकाणी, खुलेआम, आपल्याहून वरचढ दिसणाऱ्या माणसांना आव्हान द्यायची त्याला सवय लागत चालली होती. हळूहळू तो हरायला लागला होता, पण तरीही त्याची सवय सुटत नव्हती. गिर्यारोहणाच्या बाबतीतही त्याचा हाच स्वभाव उफाळून येई. अपरिचित मार्ग चोखाळणे, कठीणातले कठीण आव्हान स्वीकारणे. कितीही उंच, दूर आणि वेगाने अंतर कापले तरीही त्याचे समाधान होत नव्हते.

आणि अचानक एक दिवस मात्र ते सर्व संपून गेले. मुष्टियुद्धाची खुमखुमी, दुर्गम व अवघड शिखरे काबीज करायची इर्षा, जीव धोक्यात घालण्यातच खरा जिवंतपणा आहे असे वाटण्याची निकड सगळ्याचाच त्याला वीट आला. आयुष्यातले एक पर्व संपलेय अशी स्वत:च्याच मनाशी पक्की खूणगाठ बांधून त्याने आपल्या अतिसाहसी वृत्तीला रामराम ठोकला.

लोकं म्हणू लागले की हिमलोटाचा त्याने धसका घेतला. तो आत्मविश्वास गमावून बसलाय. पण लोकांचा समज चुकीचा होता. तो निवृत्त झाला नव्हता. त्याला अधिक वेगवान असे काही सापडले होते. त्याची दौड थांबलेली नव्हती. आता तो आकाशात उंच उंच जाणार नव्हता. जमिनीवर पावले ठेवून राजमार्गावरून धावणार होता.

त्या वेळेस त्याचे वय एकवीस वर्षांचे होते. ती रविवारची रात्र होती. झिऑन नॅशनल पार्कच्या दोन हजार फूट उंचीवर असलेल्या एंजेल्सवर चढाई करून तो नुकताच आस्पनला खाली येत होता. आठवड्याची अखेर असल्यामुळे ट्रेकिंगसाठी गर्दी उसळली होती व तो अरुंद रस्ता वाहनांनी खचाखच भरला होता. त्याच्या गाडीच्या पुढे अठरा चाकांची एक भली मोठी फोर्ड ब्रँको चालली होती. गाडी फारच जुनी व खूप वापरली गेलेली असल्यामुळे संथ वेगाने पुढे जात होती. पण अचानक तिने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला व समोरून येणाऱ्या जग्गरनॉटवर ती दाणकन आदळली. त्या गाडीचा ड्रायव्हर तर जागच्या जागीच गतप्राण झाला. जोनाथन तिथे पोहोचला तेव्हा

गाडीतील प्रवासी जबर जखमी झाला असला तरी अजून जिवंत होता. ती एक जेमतेम चौदा वर्षांची मुलगी होती. जोनाथनने तिला गाडीबाहेर काढून जमिनीवर निजवले. गाडीचा गिअर तिच्या छातीत घुसला होता व एखादा पाईप फुटून पाणी भसाभस बाहेर यावे तसे रक्त वाहात होते. गस्तीचा सैनिक म्हणून प्रशिक्षण घेत असताना त्याला प्रथमोपचारांची जी काही जुजबी माहिती मिळाली होती, त्यावरच विसंबून राहण्याखेरीज त्याच्यापुढे पर्याय नव्हता. त्याने तिची जखम, आपल्या मुठीने गच्च दाबून धरली. फुटलेल्या रक्तवाहिनीवर दाब दिल्यामुळे बाहेर येणारा रक्तप्रवाह थांबला. या सर्व काळात ती मुलगी पूर्ण शुद्धीवर होती पण तिने एक शब्दही उच्चारला नाही. अँब्युलन्स येईपर्यंत ती आपले हात छातीच्या बरगड्यांमध्ये खुपसून त्याच्याकडे एकटक पाहत होती.

तिच्या छातीचे ठोके त्याला अखंड जाणवत होते. खरे तर दाबून धरलेल्या त्याच्या हाताला तिच्या लिबलिबीत हृदयाचाच स्पर्श होत होता.

जिवंत राहण्यासाठी जिवाची ती अखेरची जीवघेणी तडफड.

दुसऱ्याच आठवड्यात त्याने आपल्या गस्तीच्या कामाचा राजीनामा दिला आणि वैद्यकीय कॉलेजात आपले नाव नोंदवले.

जोनाथनचे विचार पुन्हा भिरभिरत वर्तमानकाळात आले. तो वळला आणि एम्माच्या टेबलाकडे त्याची नजर गेली. बाहेर पडताना तिने नीट आवरून ठेवलेले टेबल अगदी त्याच अवस्थेत होते. पाण्याने भरलेली बाटली बंद करायची राहून गेली होती. शृंगारिक कादंबऱ्यांच्या ढिगावर तोल सावरत चश्मा पडलेला होता. 'तुला नाही रे समजायचं.' आपल्याला शृंगारिक कादंबऱ्या वाचायचे वेड का लागले याचे स्पष्टीकरण देताना एकदा ती त्याला म्हणाली होती. लूटमार करत अखंड प्रवास करणारे स्कॉटिश तरुण, प्रसंगी जिवाचा धोका पत्करून, अडकलेल्या सुंदर मुलींची सुटका करत व मग त्यांच्यासह एका निर्जन बेटावर राहायला जात. तिला अशा गोष्टींची फार आवड होती. गोष्टीचा सुखान्त होणार याची पक्की खात्री असायची. दिवसरात्र ज्या कामात तिने वाहून घेतलेले असायचे, त्या हॉस्पिटलमध्ये क्वचितच काही चांगले घडत असे. शिवाय, चांगले घडेलच याची खात्री तर कधीच देता यायची नाही.

अखेर त्याची नजर, उशीखालून डोकावणाऱ्या तिच्या नाईटशर्टाकडे गेली. तो बिछान्यावर बसला आणि उशीखालून तो शर्ट काढून, त्याने तो आपल्या चेहऱ्याभोवती लपेटला. शर्टाचे कापड अगदी मुलायम होते. खूप वापरल्यामुळे काही काही ठिकाणी विरले होते. व्हॅनिला व चंदनाचा सुगंध येत होता. असंख्य संवेदनांची एक मोठी लाट आली व त्याला चिंब भिजवून गेली. तिच्या सुंदर मेरुदंडाच्या एकेका स्नायूंचा स्पर्श तो अनुभवू लागला. ती जेव्हा जेव्हा प्रणयोत्सुक होत असे, तेव्हा तिच्या मानेचा खालचा भाग प्रथम उबदार होत असे. त्या उबदार जाणिवेने ती स्वत:च लाजून चूर होत असे आणि केसांना झटका दिलाय असे भासवत, त्याच्याकडे एक चोरटा कटाक्ष टाकत असे.

"काय रे?... हो?" खूप धाडस करून मग ती त्या शब्दाचा उच्चार करत असे. जोनाथनने हताशपणे तो शर्ट आपल्या मांडीवर ठेवला. सगळे आता संपून गेलेय. तिच्या स्पर्शाची अनावर ओढ त्याच्या मनात दाटून आली. ती ओढ इतकी जबरदस्त होती की स्वत:वर ताबा ठेवणे त्याला अशक्य झाले. यापुढे तिची उणीव आता कायमच भासत

राहाणार. त्याचे सांत्वन आता कुणीही, कधीही करू शकणार नव्हते.

त्याची नजर पुन्हा एकदा एम्माच्या शर्टावर गेली आणि त्याचा अडकलेला श्वास हळूहळू मोकळा होत गेला. तिला अलविदा करायला तो तयार नव्हता. त्याने शर्टाची काळजीपूर्वक घडी केली व उशीखाली हळुवारपणे ठेवून दिली. अजून तरी काही काळ, ती त्याला सोबत करणार होती.

७

बर्न येथील न्यूसबॉमस्ट्रॅसमध्ये, पूर्णपणे स्टील व काचेने उभारलेल्या एका अत्याधुनिक इमारतीत 'सॅप'चे कार्यालय होते. स्विस सरकारच्या त्या प्रतिहेरगिरी करणाऱ्या कार्यालयात उणीपुरी दोनशे लोकं कामाला होती. त्यांचे मुख्य काम म्हणजे माहिती गोळा करणे व त्याची काळजीपूर्वक छाननी करणे आणि परदेशी अधिकृत प्रतिनिधींवर बारीक नजर ठेवणे. बहुतेक देशांचे प्रतिनिधी बर्नमध्येच वास्तव्य करणे पसंत करत. आपापल्या देशाबरोबर त्यांचे जे संदेशवहन चालत असे, त्याचे काळजीपूर्वक निरीक्षण करण्याची जबाबदारी या कर्मचाऱ्यांवर सोपवलेली असे. त्याहून अधिक महत्त्वाच्या कामासाठी तीस अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली होती. देशांतर्गत असणाऱ्या अतिरेकी संघटना आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादी दलांच्या रोजच्या हालचालींचा शोध घेणे हे त्यांचे काम असे. एकूण अखंड कार्यरत असलेले ते एक छोटेखानी कार्यालय होते.

मार्क्स व्हॉन डॅनिकन बरोबर सातच्या ठोक्याला हजर झाला व लगेचच आपल्या कामाला लागला. फोन उचलत त्याने कार्यालयातलाच एक नंबर फिरवला. एका स्त्रीचा आवाज त्याला ऐकू आला. "श्मिड. आयसीस."

व्हॉन डॅनिकनने स्वत:ची ओळख सांगितली. "थिओ लॅमर्स या व्यक्तीबद्दल आपल्याकडे असणारी सर्व माहिती मला हवीये. लवकरात लवकर."

"होय सर. मी लगेच पाठवून देते."

मिनिटभराने त्याच्या कॉम्प्युटरवर एक विशिष्ट सुरावट वाजली. त्याच्यासाठी ई-मेल आली होती. आयसीसकडून आलेली फाईल पाहून तो खूश झाला. बेल्जियम पोलिसांनी पाठवलेल्या माहितीचा पूर्ण तपशील त्या फाईलमध्ये होता.

थिओडॉर अल्ब्रेखा लॅमर्सचा जन्म रॉटरडॅम येथे १९६१ साली झाला होता. उत्रेख्त विद्यापीठातून मेकॅनिकल इंजिनिअरींगची डॉक्टरेट ही पदवी संपादन केल्यावर त्याने हेग व अॅम्स्टरडॅममधल्या अनेक फुटकळ कंपन्यांमध्ये काही काळ काम केले होते. १९८७ साली त्याच्या गुप्त व संशयास्पद कामाकडे सरकारचे लक्ष वेधले गेले. ब्रुसेल्समधील अमेरिकन शस्त्रास्त्रांचा डिझाईनर म्हणून ओळखला जाणाऱ्या गेराल्ड बुलचा तो मुख्य मदतनीस बनला होता. बुल त्या वेळेस सद्दाम हुसेनसाठी एक 'सुपरगन' बनवत होता. 'बेबीलॉन' हे त्या बंदुकीला दिलेले सांकेतिक नाव होते. खरे तर ती बंदूक नसून अजस्त्र तोफ होती. तिच्यात शेकडो मैल अंतरावर असलेल्या 'लक्षयाचा' अचूक वेध घेण्याची क्षमता होती. मध्यपूर्वेकडील देशांच्या सुलतानासाठी त्याने केलेल्या कामाची तर सार्वजनिक नोंद झालेली होती. थोडक्यात, बुल व त्याचे सहकारी (त्यात लॅमर्सचा समावेश होता.) हे बेल्जियम पोलिसांच्या खास टेहेळणी पथकाच्या हिट लिस्टवर होते.

उरलेली गोष्ट व्हॉन डॅनिकनला आधीच माहिती होती. गेराल्ड बुलचा १९९० साली खून करण्यात आला होता. मानेच्या वर पाच गोळ्या झाडून, ब्रुसेल्समधल्या त्याच्या

राहत्या घराच्या प्रवेशद्वारावरच त्याला ठार मारण्यात आले होते. इस्त्रायल गुप्तहेर संघटनेच्या मोस्सादने त्याचा खून केला, अशी वदंता सुरुवातीला पसरली होती. पण तो अंदाज चुकीचा ठरला होता. त्या काळात इस्त्रायलने या शास्त्रज्ञाबरोबर विशिष्ट अंतर राखून पण जवळचे संबंध ठेवलेले होते. भविष्यकाळात तो आपल्या उपयोगी पडू शकतो ही गोष्ट हेरून त्याच्या नेमक्या क्षमतेचा ते अंदाज घेत होते. नेमक्या ह्याच कारणामुळे त्याला इराक्यांनी ठार मारले होते. बेबीलॉन तोफेची निर्मिती पूर्ण झाल्यावर, तिच्या निर्मितीचे गुपित कुणालाही, विशेषत: इस्त्रायलला माहीत होणे, ही गोष्ट सद्दाम हुसेनला कधीच मान्य झाली नसती.

व्हॉन डॅनिकनने काँप्युटर बंद केला व तो खिडकीपाशी चालत गेला. आजची सकाळ काळवंडलेली व उदास दिसत होती. खाली उतरलेल्या ढगांमधून ओलसर हिमाचा वर्षाव होत होता. त्याचे लक्ष दूरवरच्या एका इमारतीकडे गेले. इमारतीचे बांधकाम सुरू होते व खराब हवामानाला न जुमानता, तमाम मजूरवर्गाने स्वत:ला कामात जुंपून घेतले होते.

आणि लॅमर्सचे काय? त्याने स्वत:लाच प्रश्न विचारला. आपल्या बाथरूममध्ये उझी सबमशिन व बनावट पासपोर्ट लपवून ठेवणाऱ्या इसमाचा नेमका कोणता उद्योग सुरू होता किंवा एका व्यावसायिक मारेकऱ्याची मदत घेऊन त्याला घराच्या गॅरेजसमोर ठार मारण्याची निकड का भासली असावी?

व्हॉन डॅनिकन आपल्या जागेवर परतला व त्याने पुन्हा काँप्युटर सुरू केला. टेबलावर कागदपत्रांचा ढीग येऊन पडला होता. मजकुराप्रमाणे प्रत्येक कागदावर त्या त्या विषयाचे नाव लिहिले होते. 'विमानतळ व स्थलांतरण.' 'प्रतिदहशतवाद-अंतर्गत.' 'प्रतिदहशतवाद-परकीय.' 'अमली पदार्थविक्री' त्यामधील 'परकीय-प्रतिदहशतवादा' विषयीची कागदपत्रे सर्वांत शेवटी ठेवून त्याने इतर कागदांवरून झरझर नजर फिरवली.

त्याला उत्सुकता असलेल्या त्या शेवटच्या कागदपत्रांतला मजकूर त्याने वाचण्यास सुरुवात केली. आंतरराष्ट्रीय सुरक्षा संस्थेने वेळोवेळी धाडलेल्या माहितीचा सारांश त्यात उद्धृत केला होता. १९७१ साली राजकीय हेतूंनी हिंसाचार घडवून आणणाऱ्या प्रवृत्तींना कायमचा आळा घालण्यासाठी एका महत्त्वाच्या संघटनेची स्थापना केली. पश्चिम युरोपमधील कायद्यांची सक्तीने अंमलबजावणी करण्यासाठी त्या क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यावसायिक तज्ज्ञांची त्या संघटनेवर नेमणूक करण्यात आली. देशातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अबाधित राखणे ही त्यांच्यावर सोपवलेली मुख्य जबाबदारी होती. 'बर्नचा क्लब' या नावाने ती संघटना ओळखली जाऊ लागली. ९/११च्या घटनेनंतर त्या संघटनेच्या कामाचे स्वरूप बदलून 'काऊंटर टेररर ग्रुप–सीटीजी' हे नवीन नाव त्या संघटनेने धारण केले.

स्वीडनमधल्या त्याच्याच समदर्जाच्या अधिकाऱ्याने पाठवलेला तो महत्त्वाचा अहवाल होता. त्यात म्हटले होते की, वालिद गॅसन हा संशयित अतिरेकी (स्वीडनने 'दहशतवादी' या शब्दाला मान्यता दिलेली नव्हती.) स्टॉकहोममध्ये असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अहवालात पुढे म्हटले होते की, अम्मान-जॉर्डन येथील शेरेटॉन हॉटेलवरील बॉम्बहल्ल्यात तसेच इतरही अनेक फसलेल्या हल्ल्यांमध्ये गॅसनचा प्रमुख सहभाग असल्याचा दाट संशय आहे. गॅसन व त्याच्या साथीदारांविषयी आपल्याकडे काही अधिक माहिती असल्यास ती स्वीडन गुप्तहेर संस्थेला त्वरित

कळवावी.

अहवाल अपूर्ण असला तरी अचूक होता.

ज्यामधून वालिद गॅसन प्रवास करत होता ते विमान स्वित्झर्लंडमधल्या विमानतळावर काही वेळासाठी थांबणार असल्याची खबर, जिनिव्हातील 'बिग मॉस्क'च्या एका खबऱ्याकडून जानेवारी महिन्यात मिळाली होती. व्हॉन डॅनिकनने गॅसनच्या अटकेसाठी एक विशेष पथक विमानतळावर पाठवले होते. स्वित्झर्लंड सरकार जरी गॅसनच्या मागावर नसले तरीही इंटरपोलने त्याला पकडण्यासाठी रेड फ्लॅग वॉरंट काढलेले होते. त्यामुळे गॅसनला अटक करण्याचा अधिकार व्हॉन डॅनिकनपाशी निश्चितच होता. परंतु दैव गॅसनच्या बाजूने होते. व्हॉन डॅनिकनने पाठवलेले पथक पोहोचण्याआधीच गॅसन स्विसची सीमा पार करून निघून गेला होता. गॅसनच्या ठावठिकाण्यासंदर्भात धोक्याचा इशारा देण्याव्यतिरिक्त व्हॉन डॅनिकन काहीच करू शकला नव्हता. विमानात सापडलेल्या त्या नखाची त्याला आठवण झाली. पण गॅसनच्या हालचालीसंबंधीच्या या अहवालामुळे नक्कीच मदत होणार होती. स्टॉकहोमच्या रस्त्यावर त्याला पकडले गेले की अन्य कुठल्या युरोपियन शहरात त्याला पकडले हे त्याला खात्रीपूर्वक समजले नव्हते. पण आता गॅसनबद्दल तो फारसा विचार करणार नव्हता. गॅसनचे वास्तव्य कुठे आहे हे सांगण्याची जबाबदारी त्याने
CIA
चा प्रमुख, फिलीप पालुंबोवर सोपवून टाकली होती. योग्य वेळ येईल तेव्हा पालुंबोला स्वीडिश सरकारला सांगावेच लागेल.

व्हॉन डॅनिकन जिना उतरून दुसऱ्या मजल्यावर गेला. राखाडी रंगाचे कार्पेट आच्छादलेल्या त्या लांबलचक थंडगार पॅसेजमधून चालत तो शेवटच्या दरवाजासमोर जाऊन उभा राहिला. 'KILA 2-8 ' अशी दरवाजावर पाटी होती.

'किला' म्हणजे कोऑर्डिनेशन युनिट फॉर आयडेंटिटी डॉक्युमेंट्स. प्रत्येक देशांमध्ये वापरात असलेल्या विविध प्रकारच्या ओळखपत्रांचा संचय करणे हे 'किला'चे काम होते. दोनशेहून अधिक देशांतले सरकारमान्य पासपोर्ट, वाहन परवाना, जन्मदाखला व इतर ओळखपत्रांचा प्रत्येकी एक तरी नमुना तिथल्या कपाटात आढळला असता.

व्हॉन डॅनिकन दरवाजातूनच आत डोकावला. "मॅक्स, कामात आहेस?"

'किला'ची जबाबदारी मॅक्स सीलरवर सोपवली होती. तो एक बुटका, भरदार छातीचा, निळ्या डोळ्यांचा व पिंगट पण पातळ केसांचा माणूस होता. "तू येणार हे मला नक्की ठाऊक होतं." हातातल्या कामावरून नजर काढत तो म्हणाला. "तुझी कालची रात्र फारच सनसनाटी होती असं ऐकलं."

व्हॉन डॅनिकनने आपल्या हातातले तीन पासपोर्ट टेबलावर टाकले. "हे त्याच्या घरात सापडले."

सीलरने ते पासपोर्ट तपासले. "कुणी एजंट होता?"

"हेर, तस्कर, ठक यापैकी कुणीतरी एक."

अंजिरी रंगाच्या पासपोर्टकडे सीलर नीट न्याहाळून पाहू लागला. 'युरोपीज् उनी कोनिन्क्रीज डर नेदरलंडन' अशी अक्षरे त्यावर कोरलेली होती. "हा त्याचा खरा पासपोर्ट आहे का?"

“मला एवढंच ठाऊक आहे की लॅमर्स हे त्याचं खरंखुरं नाव आहे. तो डच नागरिक होता व त्याच्याजवळ ‘सी’ दर्जाचा परवाना होता. ISIS ने त्याचा माग काढण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या मते लॅमर्स हा नेदरलंड विद्यापीठात शिकायला होता. पण तो अठरा वर्षांचा होण्याआधीच हेरखात्यात रुजू झाला असावा असा माझा संशय आहे. ते राहू देत. मला ह्या पासपोर्टची पूर्ण तपासणी करून हवीय व खास कागदपत्रांच्या फाईलमध्ये त्यांची नोंद व्हायला हवी.”

सामाजिक सुरक्षा कार्ड व जन्मदाखल्यांचा समावेश, खास कागदपत्रांमध्ये केला जाई. ही कागदपत्रे सरकारने जारी केलेली असल्याने, त्यांची ग्राह्यता वादातीत असायची.

एका बाजूला वळत सीलरने खुर्चीवर जमा झालेला कागदांचा गठ्ठा बाजूला सारला. सहज नजर टाकली असती तरी त्या गठ्ठ्यातले इटालियन चालकाचे परवाने, जर्मन आरोग्यविमा कार्ड्स व इंग्लिश जन्मदाखले कुणालाही दिसले असते. सर्वच्या सर्व बनावट होते.

“ज्यूल्स गाय, जन्म १९६२, ब्रुसेल्स.” बेल्जियम पासपोर्ट उघडून त्याने मोठ्याने वाचला. पासपोर्टचे एकेक पान त्याने काळजीपूर्वक उलटले. त्यावरील स्थलांतरणाचा शिक्का तपासला व मग पासपोर्टचे वरचे पान त्याने जांभळ्या रंगाच्या प्रकाशाखाली धरले. बोल्जियम राजवाड्याचे फिकट चित्र दिसू लागले.

“चांगल्या दर्जाची शाई वापरलेली दिसतेय.” व्हॉन डॅनिकन म्हणाला.

“बोल्जियम सरकारने आपले नवीन पासपोर्ट तयार करताना खूपच सावधगिरी बाळगलीये. या पासपोर्टमध्ये पाच तऱ्हेची सुरक्षा आवरणं वापरलीत. त्यामुळे बनावट पासपोर्ट लक्षात येणं खूपच सोपं झालंय. पासपोर्टधारकाच्या फोटोला लेझर किरणांनी पाडलेलं एक छोटंसं भोक, अल्बर्ट-घ्घ्चं हिरव्या रंगात बदलत जाणारं आणि दोन अतिसूक्ष्म बोधचिन्हं. अगदी न तपासताही मी तुला सांगू शकतो की पासपोर्ट अस्सल आहे.”

“तुला म्हणायचंय की त्याने कोरा पासपोर्ट चोरला होता?”

“तसं नाही म्हणत मी. अस्सल म्हणजे पासपोर्ट ऑफिसमधून, योग्य अधिकाऱ्याच्या सही-शिक्क्याने जारी झालेला.”

“तुझी पक्की खात्री आहे?” व्हॉन डॅनिकनने घेतलेल्या असंख्य अनुभवांमुळे, त्याचा स्वभाव शंकेखोर बनला होता. बनावट पार्सपोर्ट्मध्ये बेल्जियम पासपोर्टची संख्या नेहमी सर्वाधिक असायची. १९९० सालापासून बेल्जियमच्या परराष्ट्र कचेरीतून, दूतावासांमधून, टाऊन हॉलमधून एकोणीस हजारांहून अधिक अस्सल पासपोर्ट चोरीला गेले होते. माणसे जशी आपल्या घराच्या चाव्या हरवतात तसे त्या देशात पासपोर्ट गहाळ झाले होते.

“आपण तपासू शकतो.” सीलरने आपला काँप्युटर चालू केला व जगभरातून हरवलेल्या वीस लाख पासपोर्टची माहिती असलेली फाईल उघडून त्यात त्याच्या हातात असलेल्या पासपोर्ट क्रमांकाची नोंद केली. “बेल्जियमचं एक वैशिष्ट्य आहे. पासपोर्ट गहाळ करण्यामध्ये ते अगदी निष्काळजी असतात; पण हरवलेल्या पासपोर्टची नोंद ताबडतोब करण्याबाबत अत्यंत काटेकोर असतात. जर हा पासपोर्ट हरवलेला असेल तर

तो यादीत लगेच सापडेल.” काही क्षणांतच त्याच्या कपाळावर आठ्या पसरल्या. “पासपोर्टचा नंबर यादीत नाही. म्हणजे बेल्जियनांच्या मते तो कायदेशीर आहे.”

“पासपोर्टमध्ये काहीही बदल, खाडाखोड केलेली नाही?”

“नक्की. मी म्हटलं तसं फोटोमध्ये लेसर किरणाने भोक पाडलेलं आहे. दुसऱ्या कुणाच्या फोटोऐवजी स्वत:चा फोटो लावणं लॅमर्सला शक्यच झालं नसतं.”

“मी जरा तुझा फोन वापरू?”

“खुशाल.”

व्हॉन डॅनिकनने बेल्जियन फेडरल पोलीसच्या ओळखपत्र विभागाचा नंबर फिरवला.

“फ्रँक, माझ्या टेबलावर तुमच्याकडचा एक पासपोर्ट पडलाय. पासपोर्टधारकाचा काल रात्री खून झालाय. माझ्या माहितीनुसार तो अस्सल आहे.” त्याने फोनवरून नाव व नंबर सांगितला.

“तुझं म्हणणं बरोबर आहे.” एक-दोन सेकंदातच फ्रँककडून उत्तर आले. “आमच्या यादीत या नंबरची नोंद आहे.”

“कमाल आहे. आमच्या यादीत या गृहस्थाची, थिओ लॅमर्स–डच नागरिक अशी नोंद झालीये. मला तुझी मदत हवीय. ज्यूल्स गाय या इसमाची अगदी संपूर्ण माहिती काढ. या नावाचा माणूस खराच आहे की तोतया आहे, हे मला हवंय.”

“मला जरा अवधी दे. संध्याकाळपर्यंत मी सांगू शकेन.”

“दुपारपर्यंत पाठवता येतंय का बघ. आणखी एक गोष्ट. हा पासपोर्ट तुम्ही कुठल्या पत्त्यावर पाठवला होता हेही मला हवंय.”

व्हॉन डॅनिकनने फोन ठेवला. मॅक्स सीलर आता न्यूझीलंडचा पासपोर्ट तपासत होता. तोही पासपोर्ट वैध ठरला. पासपोर्टमध्ये काहीही बदल किंवा खाडाखोड केलेली नव्हती व तोही पासपोर्ट, हरवलेल्यांच्या यादीत नोंदला गेला नव्हता. व्हॉन डॅनिकनने घड्याळाकडे पाहिले. ऑकलंडमध्ये आता दुपारचे साडेपाच वाजलेले असतील. म्हणजे ऑफिसची वेळ आता संपली असणार. त्याऐवजी त्याने न्यूझीलंडच्या पॅरिस येथील दूतावासाशी संपर्क साधायचे ठरवले. दोन देशांच्या वेळेत दहा तासांचा फरक असल्याने त्यांनी त्यांच्या पॅरिस येथील कार्यालयात तक्रार निवारणाची खास सोय केली होती.

व्हॉन डॅनिकनने फोन लावला व तो पासपोर्ट खरा असल्याचे त्याला सांगण्यात आले. पासपोर्टधारक मायकेल कॅरींग्टन हा २४, व्हिक्टोरिया लेन, ख्राईस्टचर्च येथील रहिवासी असून ती एक प्रतिष्ठित व्यक्ती असल्याचीही न्यूझीलंड अधिकाऱ्याने माहिती दिली. त्याच्याविरुद्ध आजतागायत एकही गुन्हा दाखल झालेला नाही. डॉन व्हॅनिकनने त्या पासपोर्टची कागदपत्रे पुन्हा एकदा तपासून पाहण्याची विनंती केली. न्यूझीलंड सरकारच्या प्रतिनिधीने त्याच्या सूचनेला नम्र होकार दिला.

“या सगळ्यावरून तू काय अंदाज बांधू शकतोय?” फोन ठेवून त्याने विचारले.

सीलरने आपले खांदे उडवले. “लॅमर्सचाच फोटो असलेले दोन वैध पासपोर्ट पण वेगवेगळ्या नावांचे. या प्रश्नाचं एकच उत्तर आहे. गाय आणि कॅरींग्टन या प्रतिष्ठित व्यक्ती आहेत. लॅमर्स हा केवळ हावरटपणे नफा कमावणारा गलिच्छ वृत्तीचा व्यापारी असूच शकत नाही. तुझ्या हातात एका सरकारी ‘पाहुण्याची’ केस आलीये.”

सरकारी ‘पाहुणा’ म्हणजे सरकारतर्फे प्रशिक्षण मिळालेला परंतु सरकारच्या कुठल्याही संरक्षणाशिवाय इतर देशात राहून काम करणारा. गोपनीय गुप्तहेर.

व्हॉन डॅनिकनने मानेने होकार दर्शवला. काहीशा अस्वस्थपणे तो आपल्या ऑफिसमध्ये परतला. ही केस विलक्षण गुंतागुंतीची होती. या केसच्या जवळपासही जाऊ शकेल अशी एखादी केस त्याने गेल्या सात वर्षांत तरी हाताळलेली नव्हती. त्याच्या डोक्यात फक्त दोनच प्रश्न होते : लॅमर्स नक्की कुणासाठी काम करत होता? आणि स्वित्झर्लंडमध्ये त्याने नेमके असे काय केले की, ज्यामुळे त्याला जीवे मारण्यात आले?

८

गल्फस्ट्रीम-४ या विमानाच्या डावीकडचे चक्की-इंजीन पूर्ण दुरुस्त झाले, त्या वेळी सकाळचे बरोबर सात वाजले होते व बर्न-बेल्पच्या विमानतळावरून उड्डाण करण्यासाठी ते सज्ज झाले. मार्क्स व्हॉन डॅनिकनने हॉटेलमध्ये विश्रांती घ्यायचा दिलेला सल्ला न मानता, फिलीप पालुंबो विमानातच थांबला होता. प्रवाशांच्या जागेच्या मागच्या बाजूस असलेल्या एका कोचावर अंग पसरून त्याने लहानशी डुलकी घेतली होती.

जेटने हवेत उड्डाण करताच, पालुंबो आपल्या जागेवरून उठला व विमानाच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या सामानाच्या खोलीचा छोटा दरवाजा त्याने खाली वाकून उघडला. निमुळता आकार असलेल्या त्या लहानशा खोलीला एकही खिडकी नव्हती. एका कोपऱ्यात तीन सूटकेसेस पडलेल्या होत्या. त्याने त्या दूर लोटल्या व तिथे असलेले स्टेनलेस स्टीलचे हँडल फिरवत एक छोटेसे झाकण बाजूला सारले. झाकणालगतच्या दोन पट्ट्या ओढून काढताच, त्या खाली असलेले सात फूट बाय चार फुटांचे एक तळघर अचानक दृश्यमान झाले. तळघरात एक चटई अंथरलेली होती व तिथे बेल्ट बांधण्यासाठीचीही व्यवस्था केली गेली होती.

त्या तळघरामध्ये एका सडपातळ, फिकट पिवळसर कांतीच्या व सफेद पायघोळ अंगरखा घातलेल्या माणसाला अंगाचे मुटकुळे करून बसवलेले होते. त्याच्या हातापायात कडी अडकवलेली होती व एका साखळीला ती सर्व कडी बांधली होती. पूर्ण हजामत करून दाढी उडवण्यात आली होती व डोक्यावरचे केस सैनिकी शैलीप्रमाणे कापून अगदी बारीक केले होते. त्याच्या झग्यावर अडकवलेला डायपरही प्रमाणित आकाराचा होता. त्याचे सारे सत्त्व व व्यक्तिमत्त्व हिरावून टाकून त्याला पार दुबळे व अगतिक बनवण्यात आले होते.

तो तरणाबांड दिसत होता. त्याने घातलेल्या आकर्षक चश्म्यामुळे तो एखादा कॉलेजयुवक किंवा कॉंप्युटर प्रोग्रॅमर वाटला असता. वालिद गॅसन हे त्याचे नाव होते. तो एकतीस वर्षांचा होता व त्याने स्वत:ला दहशतवादी म्हणून घोषित केले होते. वेगवेगळ्या काळात त्याने इस्लामिक जिहाद, हेजबुल्लाह व प्रत्येक आत्मगौरवी मुस्लीम धर्मपिसाटाला अभिमान असलेल्या अल् कायदा संघटनेमध्येही काम केले होते.

पालुंबोने त्याला उचलून सरळ उभे केले व त्याला घेऊन तो प्रवासी कक्षात आला. त्याला एका खुर्चीत ढकलत त्याने त्याच्या कमरेभोवती करकचून बेल्ट बांधला. मग त्याच्या तोडलेल्या नखांच्या जागी मर्क्युरी क्रिम लावण्यात पालुंबोने काही सेकंदं खर्च केले. त्याची तीन नखे उपटण्यात आली होती.

“तू मला कुठे घेऊन चालला आहेस?” गॅसनने विचारले. त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत पालुंबोने त्याच्या पायातील कडी मोकळी केली व त्याच्या पोटऱ्यांना तो मालिश करू लागला. रक्ताच्या गाठी होऊन गॅसनचा मृत्यू ओढवू नये यासाठी पालुंबो काळजी घेत होता. त्याच्याकडून बरीच माहिती मिळवायची होती.

“मी एक अमेरिकन नागरिक आहे.” गॅसन उद्दामपणे बोलत सुटला. “मला हक्क आहे विचारायचा. तू मला कुठे घेऊन चाललायस? तू मला सांगायलाच हवं.”

एखादा विशेष चमत्कारिक प्रयोग करायचा असला तरीही त्यात एक आचारतत्त्व पाळले जायचे.

CIA

ला जर एखाद्याची शाब्दिक झडती घ्यायची असेल तर त्याला जॉर्डनला पाठवले जायचे. जर त्याचा शारीरिक व मानसिक छळ करायचा असेल तर त्याला सिरियाला नेण्यात येई व जर त्याचे पृथ्वीतलावरील नामोनिशाण मिटवायचे असेल तर त्यासाठी इजिप्तची निवड करण्यात येत असे.

“हाजी, तुझ्यासाठी तो एक धक्का ठरणार आहे.”

“माझं नाव हाजी नाही.”

“बरोबर आहे तुझं म्हणणं.” पालुंबोने धमकावणीच्या सुरात त्याला सुनावले. “एक गोष्ट माहितीये तुला? तुला आता नावच उरलेलं नाहीये. जगाच्या दृष्टीने तू आता हयात नाहीस.” त्याने आपली बोटे त्या कैद्याच्या चेहऱ्यासमोर नाचवली. “तू हवेत विरून गेलायस.”

जेट उंच हवेत झेप घेताच पालुंबोनेही खुर्चीत बसत कमरेभोवती बेल्ट आवळला. केबिनमधल्या स्क्रीनवर जगाचा नकाशा दिसत होता. त्यावर विमान कोणत्या दिशेला चाललेय, विमानाचा वेग, बाहेरील हवेचे तापमान, मुक्कामाच्या ठिकाणाचे अंतर अशी अनेक प्रकारची माहिती दाखवली जात होती. काही मिनिटांतच आपली उत्तरेची दिशा बदलत, गल्फस्ट्रीम डावीकडे वळले व दक्षिण-पूर्व दिशेने पुढे सरकू लागले. खाली भूमध्य समुद्र दिसू लागला होता.

“मी तुला आणखी एक संधी देतो.” पालुंबो म्हणाला. “तू माझ्याशी आत्ता बोलणार आहेस की नंतर? चल, दोन्हीमधला कुठलाही एक पर्याय निवडायची मी तुला मुभा देतो.”

गॅसनचे बुजरे तपकिरी डोळे त्याच्या डोळ्यांना भिडले. “माझ्याकडे सांगण्यासारखं काहीही नाही.”

निराशेने मान हलवत, पालुंबोने एक उसासा सोडला. आणखी एक चिवट प्रकरण. “मग जर्मनीतून तू पैदा केलेली स्फोटकं आणि शस्त्रास्त्रं? मला वाटतं, आपण तिथून सुरुवात करू या.”

“तू कशाबद्दल बोलतोयस हेच मला कळत नाही.”

“नाहीच, तुला नाहीच ते कळणार.”

त्याने गॅसनकडे एक नजर टाकली. त्या तरुण माणसाने केलेली अमानुष कृत्ये त्याला आठवली. किती जणांचे बळी घेतले असतील. किती कुटुंबांना देशोधडीला लावले असेल. आणखी एक विचार त्याच्या मनात आला. हा मनुष्य जेव्हा विमानातून उतरेल तेव्हा त्याच्या दैवात काय लिहिलेले असणार आहे?

वालिद गॅसनच्या पापांचा घडा भरायला आता फक्त चार तासांचा अवधी!

१

दरवाजावर हलकेच थाप पडली.

“एक सेकंद.” जोनाथनने चटकन बास्कचा स्वेटर अंगावर चढवला व पायात स्लीपर्स सरकवत तो दरवाजापाशी पोहोचला. “बोला.”

हॉटेलचा मॅनेजर दारात उभा होता. “सर, आपल्या दु:खात मी व माझ्या हॉटेलचा नोकरवर्ग सहभागी आहोत. आम्हा सर्वांनाच अतिशय वाईट वाटलं.” तो म्हणाला. “आपल्याला काही मदत हवी असली...”

“आभारी आहे.” जोनाथन त्याचे वाक्य तोडत म्हणाला. “पण या क्षणी तरी मी सावरलेलो आहे.”

मॅनेजरने मान डोलावली पण तो निघून गेला नाही. आपल्या जॅकेटमधून त्याने फिकट पिवळ्या रंगाचा लिफाफा काढून जोनाथनच्या हातात दिला. “तुमच्या पत्नीच्या नावाने ही डाक आली होती.”

जोनाथनने तो लिफाफा जरा उंच, प्रकाशात धरला. ‘एम्मा रॅन्सम, हॉटेल बेल्लेव्हू, पोस्टस्ट्रॅसे, अरोसा.’ हस्ताक्षर ठळक, मोठे व वळणदार होते. नक्कीच कुणा पुरुषाचे असणार हे त्याने लगेच ताडले. पण पाठवणाऱ्याचे नाव किंवा पत्ता मात्र लिहिलेला नव्हता.

“नेमकं एक दिवस उशिरा मिळालं.” मॅनेजरच्या सुरात थोडा अपराधीपणा होता. “सेंट पीटर-मोलिनसजवळ असलेल्या रेल्वे रुळांवर हिमलोटांमुळे बर्फाचा डोंगर झाला होता. मी मिसेस रॅन्समना ही गोष्ट नीट समजावूनही सांगितली होती. पण त्या खूपच अस्वस्थ वाटल्या. मी माफी मागतो.”

“म्हणजे याविषयी तुझं एम्माशी बोलणं झालं होतं?”

“हो. शनिवारी संध्याकाळी. जेवणापूर्वी.”

“ती या पत्राची वाट पाहत होती तर.”

“कुणाच्या तरी वाढदिवसाबद्दल त्या काहीतरी पुटपुटल्या. पण ही गोष्ट कुणालाही सांगू नकोस असं त्यांनी मला बजावलं होतं.”

वाढदिवस? जोनाथनचा अडतिसावा वाढदिवस तर १३ मार्चला होता. अजून जवळजवळ एका महिन्याने. “हूं. तेच कारण असणार. थँक्स.”

दरवाजा बंद करत तो बेडरूममध्ये आला. हातातला लिफाफा त्याने उलटा फिरवला. एम्मा रॅन्सम, हॉटेल बेल्लेव्हू, पोस्टस्ट्रॅसे, अरोसा. पोस्टाचा शिक्का तर अगदी पुसट होता. तारखेचे आकडे वाचता येत होते, पण ज्या शहरातून ते पत्र पाठवले गेले होते, त्याचे नाव मात्र स्पष्ट दिसत नव्हते. पहिले अक्षर ‘A’ वाटत होते. म्हणजे जर ते ‘R’ नसेल तर. दुसरे ‘C’ होते किंवा ‘O’ कदाचित ‘E’सुद्धा असावे. तिसरे ‘1’ नाहीतर? ‘I’.

त्याने नाद सोडला. काहीच उपयोग होणार नव्हता.

बिछान्याच्या कडेला बसत त्याने लिफाफा उघडण्यासाठी आत अंगठा घातला. अचानक निळ्या रंगाचा स्टँप दिसल्याने तो थांबला. निळा रंग म्हणजे 'तातडीची सेवा.' याचा अर्थ ते दुसऱ्या दिवसाच्या बटवड्यासाठी शुक्रवारीच पोस्टात आलेले असणार.

त्याने तो लिफाफा पुन्हा उलटा फिरवला. त्यावर पाठवणाऱ्याचा पत्ता नव्हताच.

नेमका कधीपासून त्याच्या मनात संशयाचा भोवरा निर्माण झाला होता? सहा महिन्यांपूर्वी? की वर्ष उलटले असेल? एम्मा ट्रीपसाठी पॅरिसला निघून गेली, तेव्हापासून? का त्याच्या आधीपासूनच त्याला संकेत मिळत होते? पण तो आपल्या कामात इतका व्यग्र होता की, त्या संकेतांचा पाठपुरावा करणे राहूनच गेले.

तिच्या प्रेमात तो पागल झाला होता असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती झाली नसती. 'पागल' हा तसा भीतिदायक शब्द आहे. त्या शब्दात, माणसाचा अविचारी, अतिधाडसी व बेबंद स्वभाव सूचित होतो. त्याच्या मनात एम्माबद्दल तशा भावना नव्हत्या. एम्मावरच्या त्याच्या प्रेमामध्ये संशयाला तसूभरही जागा नव्हती. ज्या क्षणी त्याने तिला पाहिले, त्याचक्षणी त्याला पुरते समजून चुकले. तिचे ते खटयाळ स्मितहास्य त्याला म्हणाले, "सोड बाण. शिकार तुझ्या समोर आहे." ती मनस्विनी होती. आपल्या झुबकेदार पिंगट केसांना तिने कायमचे हवेत मोकळे सोडले होते. आपल्या उसवलेल्या अंगाला एक तरी ठिगळ लाव, असे ती बिचारी जीर्ण झालेली जीनची पँट अगदी आक्रंदून सांगत असायची. "हे बघ जोनाथन, केस नीट बांधून ठेवणे आणि इस्त्री केलेला स्वच्छ फ्रॉक घालण्यापेक्षा आयुष्यात करण्यासारख्या खूप महत्त्वाच्या गोष्टी आहेत." ती फक्त नजरेतून त्याला असे काही आव्हान देई की, ते आव्हान पुरे करण्यासाठी तो आपले सर्वोत्तम कौशल्य पणाला लावी. विधात्याने जणू काही त्याच्यासाठी तिला घडवले होते व त्याच्याचसाठी ती इतकी वर्षं थांबून राहिली होती. भेटीच्या त्या पहिल्या क्षणानंतर दोघांनीही काहीही हातचे न राखता आपापली आयुष्ये एकमेकांवर उधळून टाकली होती.

होय. त्याने तिच्यावर वेड्यासारखे प्रेम केले. पण आंधळ्यासारखे मात्र, निश्चितच नव्हे.

गेल्या काही महिन्यांपासून तिचे आपल्या कामावरून मन उडाले होते. एकेकाळी दिवसाचे चौदा-चौदा तास काम करणाऱ्या एम्माने आपले कामाचे तास चौदावरून बारावर आणि मग आठ तासांवर आणून ठेवले होते. बंधमुक्त पेशा स्वीकारलेल्या डॉक्टरवर्गाच्या सेवा व पुरवठा कार्यालयाची ती विभागीय संचालक होती. मध्य-पूर्व देशांतील संकटग्रस्त लोकांना त्वरित मदत कार्य करणाऱ्या विभागाची ती प्रमुख समन्वयक होती. स्वयंसेवक व कर्मचाऱ्यांची नेमणूक व प्रशिक्षण व्यवस्था, वैद्यकीय मालाचा पुरवठा करणे, सरकारी संस्थांनी सतत संपर्क राखणे व या सर्वांसाठी लागणाऱ्या अर्थव्यवहारांवर बारीक नजर ठेवणे असे एम्माच्या कामाचे एकूण स्वरूप होते. काम, धावपळीचे व दमछाक करणारे होते.

त्याला सुरुवातीला वाटले की प्रचंड शारीरिक ताणामुळे तिला मानसिक थकवा जाणवत असावा. कुठल्याही कामात तनमनाने झोकून द्यायचा तिचा स्वभाव होता. तिची शिखा, क्षमतेबाहेर जळत होती व तिला हळूहळू जाळत होती. काही काळ ती उजळून

निघाली, असे म्हटले तर गैर ठरले नसते पण गात्रे थकली की त्यांना विश्रांती ही लागतेच.

याव्यतिरिक्तही आणखी काही लक्षणे दिसू लागली होती. असह्य डोकेदुखी. एकटीनेच दूरवर चालत जाणे. विमनस्क मन:स्थिती. दीर्घ मौन. दोघांमध्ये अंतर निर्माण होत चाललेय हे दिवसेंदिवस त्याला प्रकर्षाने जाणवू लागले.

हे सर्व पॅरिसनंतर सुरू झाले होते.

जोनाथनने हातातला लिफाफा पुन्हा उलटासुलटा करत तपासला. लिफाफ्याला काहीच वजन नव्हते. आतमध्ये फक्त एक लहानसा कागद आहे हे त्याच्या लक्षात आले. त्याने तो पुन्हा उलटून पाहिला व पाठवणाऱ्याच्या पत्त्याखालील रिकाम्या जागेकडे टक लावून बघू लागला. पत्रामागे आपला पत्ता न लिहिणाऱ्याला, स्विसमध्ये जवळजवळ देशद्रोहीच ठरवले जायचे. बँकेच्या गुप्ततेचे उल्लंघन करणे किंवा लिंडत च्या चॉकलेटची पाककृती चोरणे या प्रतीचा तो गुन्हा समजला जाई.

या व्यक्तीला देशद्रोही नाही तर दुसरे काय म्हणायचे?

रेडिओमधून पाठोपाठ चार वेळा, एक कर्णमधुर नाद झंकारला. त्यामागून खणखणीत ब्रिटिश उच्चार कानी पडले. "ग्रिनीच वेळेनुसार दुपारचे बारा वाजत आहेत. ही बीबीसीची जागतिक सेवा आहे. आपल्याला बातम्या सांगत आहे..."

पण जोनाथनच्या मनात मात्र एक वेगळाच आवाज उमटत होता. उघड ते पत्र. तो आवाज त्याला विनवत होता. ताबडतोब उघड आणि मोकळा हो.

ते इतके सोपे असते तर आणखी काय हवे होते. तो विचारात खोल बुडाला होता.

खरी गोष्ट अशी होती की आपण ते पत्र मुळात उघडायलाच हवे का, याचा निर्णय तो घेऊ शकत नव्हता. आता एम्मा या जगात नाही. तिच्या फक्त आठवणीच आता आपल्यापाशी शिल्लक आहेत. त्या डागाळून जाव्यात, हे त्याला कधीही मान्य झाले नसते. त्याने तो लिफाफा अगदी आपल्या नजरेजवळ आणला आणि त्याचे मन भिरभिरत एका अप्रिय ठिकाणी जाऊन पोहोचले. जिथे कधीही न जाण्याचा त्याने पक्का निर्धार केला होता.

पॅरिस... जिथे खास स्त्रियांसाठी आयोजित केलेल्या एका संस्कृती व पाककृती प्रदर्शनाला भेट देण्यासाठी एम्मा एका शनिवार-रविवारी गेली होती. जिवाला विरंगुळा मिळावा हा त्यामागचा खरा उद्देश होता.

पॅरिस... जिथे एम्मा दोन दिवस व दोन रात्रींसाठी अदृश्य झाली होती. तिच्या काळजीने तो अस्वस्थ झाला होता. तिच्या चौकशीसाठी त्याने निरोपामागून निरोप धाडले होते. पण एकही निरोप तिच्यापर्यंत पोहोचला नव्हता.

पॅरिस...

जोनाथन आपल्या तंबूमध्ये एका कॉटवर गाढ झोपला होता. रात्रीच्या तीन वाजताही हवेत कमालीचा उकाडा होता. यावेळचा उन्हाळा फारच कडक होता. मध्य पूर्वेच्या देशातला उन्हाळा नेहमीच कडक असतो, पण या खेपेस हवामानाने उच्चांक गाठला होता. तो बेका व्हॅलीत बरेच महिने काम करत होता आणि एव्हाना घामाने अंग निथळत असतानाही शांत झोपण्याची कला

त्याने अवगत केली होती.

त्याच्या शेजारची कॉट रिकामी होती. एम्मा एका आठवड्याच्या युरोप भेटीला निघून गेली होती. आपल्या ऑफिसच्या जिनिव्हा कार्यालयात ती तीन दिवस राहाणार होती आणि अखंड रात्र जागे असणाऱ्या पॅरिस शहरात ती आपल्या सिमॉन या जिवलग मैत्रिणीबरोबर तीन दिवस जिवाचे पॅरिस करणार होती. दुपारी ज्यू डे पॉममध्ये तर संध्याकाळी सॉन एट ल्युमिअरमध्ये मनसोक्त मौज करणार होती. आपल्या पूर्वीच्या जोषात तिने त्या तीन दिवसांतल्या प्रत्येक मिनिटाची अगदी काळजीपूर्वक आखणी केली होती. त्यातला एकही क्षण तिला वाया जाऊ द्यायचा नव्हता.

गाड्यांच्या अचानक आलेल्या कर्कश आवाजांमुळे त्याला जाग येते. त्याला वाटते की जणू यंत्रांच्या अभावित आक्रमणामुळे, रात्र संतापाने गुरगुरत आहे.
जोनाथन उशीवरून डोके उचलतो. बंदुकीतून सुटलेली एक गोळी, सारा अंधार चिरत आणि विस्कटत जाते.

जोनाथन बिछान्यावरून धडपडत उठतो आणि धावत बाहेर येतो. हॉस्पिटलचे प्रवेशद्वार अडवून, रशिद नावाचा एक पॅलेस्टिनियन तरुण आपल्या हातातील शस्त्र समोर रोखून उभा आहे. चिखलाने माखलेल्या दोन मोटारी फाटकाजवळ उभ्या असलेल्या त्याला दिसतात. गाड्यांच्या स्पीकर्समधून ऐकू येणारे संगीत, कानठळ्या बसवणारे आहे. नागरी सेनेचे एक सशस्त्रधारी पथक त्या युवकाभोवती कडे करून उभे आहे. आपल्या हातातली शस्त्रे त्यांनी रोखलेली आहेत व दरवाजा उघडण्यासाठी ते त्याला धमकी देताहेत. जोनाथन जबरदस्तीने घुसत त्या दोघांमध्ये जाऊन उभा राहातो. 'तुम्हाला काय हवंय?' आपल्या मोडक्यातोडक्या अरेबिक भाषेत तो त्यांना विचारतो.

"तू इथला प्रमुख आहेस?" मांजरीसारखे घारे डोळे असलेला व छोटीशी दाढी राखलेला त्यांच्यातला वीस वर्षीय तरुण नेता त्याला विचारतो. "तू डॉक्टर आहेस?"

"होय. मी डॉक्टर आहे." जोनाथन उत्तर देतो.

"आम्हाला औषधे हवी आहेत. या पोरट्याला आमच्या वाटेतून बाजूला व्हायला सांग."

"शक्य नाही." रशिद त्वेषाने ओरडतो. तो पंधरा वर्षांचा असला तरी सळसळत्या रक्ताचा व क्रोधाने पेटलेला आहे. जोनाथन आणि एम्मा त्या हॉस्पिटलमध्ये रुजू झाल्यापासून तो सावलीसारखा त्यांच्या सतत बरोबर राहिलेला आहे. जोनाथन हा त्याचा गुरू व आदर्श आहे. तो त्याचा रक्षणकर्ता महात्मा आहे आणि जोनाथनचे संरक्षण करणे ही त्याला त्याची पवित्र जबाबदारी वाटत आली आहे. आपल्या असंख्य नातेवाइकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वैद्यकशास्त्र शिकण्याचा त्याचा मनसुबा आहे. हॉस्पिटलमधल्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच त्याच्यासाठीही हे हॉस्पिटल म्हणजे सर्वस्व आहे.

“प्लीज.” चेहेऱ्यावर हास्य आणत, जोनाथन त्या तरुण नेत्याचा राग शांत करण्याचा प्रयत्न करतो. “मला मदत करण्याची संधी द्या. तू आजारी आहेस? का तुमच्यापैकी कुणी जखमी झालाय?”

“माझे वडील.” तो भडक माथ्याचा तरुण नेता सांगतो. “त्यांना हृदयरोग आहे. त्यासाठी औषधं हवी आहेत.”

“मग त्यांना इकडे घेऊन या.” जोनाथन म्हणतो. “त्यांच्यावर उपचार करायला मला नक्कीच आवडेल.” तो त्या नेत्याकडे निरखून पाहतो. त्याचे चमकणारे डोळे, त्याचे ते ‘स्वप्नाळू हास्य, तो प्यायलाय? नशेत आहे? कसली नशा केली आहे?
राकी? हॅश? मेथ?’

“त्यांच्यापाशी वेळ नाहीये.”

“तुम्ही एल. एन. हॉस्पिटलमध्ये त्यांना नेण्याचा प्रयत्न केलात? जर तुझ्या वडलांना हृदयरोग असेल तर तुम्ही ताबडतोब बैरुतला जावं, असं मी सुचवेन.”

पण बैरुत तर आठ तासांच्या अंतरावर आहे आणि पुरामुळे रस्ता बंद झालाय.

“गपचूप बाजूला हो.” रशिदला ढकलत तो नेता गुरकावतो. रशिद त्याला उलट धक्का देतो. जोनाथनने काही हालचाल करण्यापूर्वीच, त्याला शरण जाण्याची सूचना करण्याआधीच, त्या नेत्याने बंदूक सरसावत, रशिदच्या चेहऱ्यावर गोळी सोडलेली असते.

“माझ्या वडलांना नायट्रोग्लायसरीनची गरज आहे.” खाली पडलेल्या रशिदच्या शरीरावरून ढांग टाकत तो नेता बेफिकिरीने बोलतो. “आणि आम्हाला” आपल्या सहकाऱ्यांकडे निर्देश करत– “आमचं दिल थंड करण्यासाठीही बरंच काही हवंय.”

जोनाथन रशिदकडे पाहतो. सारे काही संपलेय हे त्याला एका नजरेतच कळून चुकते. तो त्या नागरी सेनेला घेऊन हॉस्पिटलमध्ये येतो. ती तर लूटमार करणारी टोळी निघते. हावऱ्या हातांनी ते गुंड, मॉर्फाईन, व्हिकोडिन आणि कोडाईनने भरलेली कपाटे स्वच्छ, मोकळी करून टाकतात. काही मिनिटांतच तो दवाखाना उघडा-बोडका दिसू लागतो. ज्या वेगाने ती धाड सुरू होते, त्याच वेगाने ती संपून जाते. प्रेषित तुझे भले करेल अशी उद्दामपणे सदिच्छा व्यक्त करत ती टोळी गाड्यांमधून पसार होते.

दुसऱ्या मिनिटाला जोनाथनने कानाला सेलफोन् अडकवलेला दिसतो. कावराबावरा होऊन तो परिसशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत असतो. पहिले विमान पकडून एम्माने जिनिव्हाला जाऊन *DWB* च्या मुख्य कार्यालयात पोहोचावे यासाठी त्याची तडफड चाललेली असते. कुठून तरी पैशाचा बंदोबस्त करून तिने लवकरात लवकर जिनिव्हाला पोहोचावे म्हणजे हॉस्पिटलला

औषधांचा पुरवठा होऊ शकेल या विचारांनी त्याने पॅरिसला फोन लावलेला असतो.

लेबॅनॉनमध्ये आता पहाटेचे साडेतीन वाजलेत. पॅरिसचे घड्याळ, एक तास आधीची वेळ दाखवत असेल. हॉटेल लेस ट्रॉईल कौरोनसमध्ये राहात असलेल्या एम्माला त्याने फोन केलेला असतो. परंतु तिचा मोबाइल बंद असतो. तो हॉटेलवर फोन करतो व आपल्याला ताबडतोब फोन करण्याचा निरोप तिथे ठेवतो. पण एम्माचा फोन येत नाही. त्या रात्री नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी नाही. जोनाथन आपल्याकडे असलेली सर्व पुंजी घेऊन बैरुतला जातो व एका काळा बाजार करणाऱ्या विक्रेत्याकडून अत्यावश्यक औषधे खरेदी करून दुपारी परत येतो. त्या दुपारीही एम्माचा फोन येत नाही.

त्याची बायको गायब आहे.

प्रत्येक माणसाच्या सहनशक्तीला एक अंत असतो. खिन्नपणे का होईना पण त्याच्या लक्षात येते की, श्रद्धा ही काही हवेत सहज विरून जाणारी गोष्ट नव्हे. दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता तो पुन्हा त्या हॉटेलला फोन करून मॅनेजरला बोलावतो. “तुम्ही माझा निरोप नेमका तिच्याच खोलीत धाडला होता ना?” तो विचारतो.

“मिस्टर रॅन्सम, त्याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. शेवटची चिठ्ठी तर मी स्वतः खोलीत टाकली होती.”

“माझी पत्नी आत्ता तिच्या खोलीत आहे का, हे तुम्ही जरा तपासता का?”

“का नाही? हा कॉल मी माझ्या सेलफोनवर घेतो. मला जर तुमची पत्नी भेटली तर तुम्ही प्रत्यक्षच तिच्याशी बोलू शकाल.”

एखाद्या ‘फँथम’प्रमाणे जोनाथन त्या मॅनेजरबरोबर हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावर पोहोचतो. मॅनेजरच्या फोनवरून त्याला लिफ्टचे दार धाडकन लावल्याचा आवाज येतो. नंतर कार्पेटवरून टाचा घासत चाललेले बूट ऐकू येतात. दरवाजावर मारलेली थापही तो ऐकतो. “मॅडम, मी हेन्री गटे. हॉटेलचा मॅनेजर. आपण ठीक आहात ना, एवढंच मला विचारायचंय.”

पलीकडून कुठलाच प्रतिसाद येत नाही. बराच वेळ जातो. खोलीचा दरवाजा उघडत हेन्री आत शिरतो.

“मिस्टर रॅन्सम,” तो नम्र फ्रेंच आवाज पुन्हा कानावर येतो. “सगळ्या चिठ्ठ्या जमिनीवरच पडल्याहेत.”

“म्हणजे? काय म्हणायचंय तुला?”

“एकही चिठ्ठी उघडलेली दिसत नाही. खरं बोलायचं तर तुझी बायको या खोलीत कधी आली होती याचीच शंका वाटते.”

“तू काय म्हणतोहेस याचा मला अर्थबोध होत नाही.”

“बेडवरच्या चादरीची घडीसुद्धा विस्कटलेली नाही. खोलीत एकही सूटकेस किंवा इतर काही वस्तूही नाहीत.” बोलता बोलता हेन्री थांबला. त्याचे खाली पडलेले पराजित खांदे तो कल्पनेने पाहू शकला. जोनाथनला वाटलं, ते खांदे हेन्रीचे नसून, आपलेच आहेत. “या खोलीत माणसाचा वावर झालेलाच नाही.”

पत्र उघड.

जोनाथनने आपला अंगठा आत सरकवला व लिफाफ्याचे कव्हर फाडले. आतमध्ये फक्त एक कागद होता. कोरा. नाव नाही. शीर्षक नाही. कसलीही खूण नाही. त्याने लिफाफा पूर्ण उलटा धरून जोरजोरात हलवला. जाडसर कागदावर लिहिलेल्या दोन चिठ्ठ्या त्याच्या तळहातावर पडल्या. दोन्हीचा आकार व माप अगदी एकसारखे होते. जणूकाही एकाच कागदाचे दोन समान भाग केल्यामुळे दोन्ही चिठ्ठ्यांची एकेक कड टरकावलेली दिसत होती. दोन्ही चिठ्ठ्यांच्या मध्यभागी, लाल शाईने एक सहा आकडी नंबर लिहिलेला होता. ती कसली तरी पावती असावी, हे सहज लक्षात येत होते. एखाद्या कोठारातून माल ताब्यात घेण्यासाठी जशी पावती बनवली जाते, अगदी तशीच ती वाटत होती. चिठ्ठीच्या उजव्या बाजूस तळाशी लहान आकारात एक संक्षिप्त मजकूर छापला होता.

एसबीबी.
श्वाईझराईच बंडेसबन्ह
दि स्विस रेल्वे.

प्रवासी समान उतरवून घेण्याची ती तिकिटे होती.

१०

गेल्या बारा तासांमध्ये, मार्क्स व्हॉन डॅनिकन आता झुरिचला दुसऱ्यांदा येऊन पोहोचत होता. एका कंपनी ऑफिसच्या बाहेर तो उभा होता. दरवाजाच्यावर मीटरभर अंतरावर एक काचेची आडवी पट्टी होती. त्यावर 'रोबोटिका एजी' ही निळ्या रंगातली अक्षरे चमचमत होती. त्याला मिळालेल्या माहितीनुसार, थिओ लॅमर्सने ही कंपनी १९९४ साली सुरू केली होती. तोच त्या कंपनीचा एकमेव मालक व सीईओ होता. यंत्रांचे सुट्टे भाग बनवणे हे त्याच्या कंपनीच्या कामाचे मुख्य स्वरूप असावे असे अस्पष्टपणे नमूद केले होते.

एक दणकट, आक्रमक वृत्तीची स्त्री प्रवेश कक्षामध्ये उभी होती. एखादा मेजर जनरल परेडसमोर ज्या थाटात उभा असतो, तशी ती आपले दोन्ही हात पाठीमागे जुळवून करारीपणे उभी होती. "मिशेला मेन्झ," दोन पावले ठामपणे टाकत ती मार्क्ससमोर येत म्हणाली. तिने पँट व जाकीट परिधान केले होते व आपल्या तपकिरी केसांचा बॉयकट केला होता. जाकिटावर अडकवलेल्या कार्डावरची तिची शैक्षणिक पदवी ठळकपणे डोळ्यात भरत होती. मेकॅनिकल इंजिनिअरींगमधील डॉक्टरेट ही पदवी तिने वरच्या श्रेणीत मिळवलेली होती.

डॅनिकनने शांतपणे तिच्याकडे पाहिले. आपल्या कोटावरच्या ओळखकार्डाकडे त्याने तिचे लक्ष वेधले व तिच्याकडे एक तुच्छतापूर्वक कटाक्ष टाकून त्याने तिचा सगळा माज उतरवून टाकला.

"आम्ही अजूनही त्या धक्क्यातून सावरलेलो नाही." डॅनिकनला आपल्या केबिनकडे घेऊन जात असताना ती म्हणाली. "मिस्टर लॅमर्सवर कुणी खुनी हल्ला करू शकेल यावर आमचा विश्वासच बसत नाही. इतका तो छान माणूस होता."

"खरंय तुझं म्हणणं. तू म्हणतेस त्यावर विश्वास न ठेवण्याचं मला काहीच कारण दिसत नाही." व्हॉन डॅनिकन म्हणाला. "खरं तर म्हणूनच मी स्वत: इथे आलोय. खुन्याला हुडकून काढण्यासाठी आम्हीही तुमच्याइतकेच उत्सुक आहोत. तू मला जितकी अधिक माहिती देऊ शकशील तितका तिचा तपासाच्या दृष्टीने जास्त फायदा होऊ शकतो."

मेन्झची केबिन छोटेखानी असली तरी छान सजवलेली होती. त्यात कुटुंबीयांपैकी किंवा मित्रांपैकी कुणाचाच फोटो लावलेला नव्हता. ती नोकरी करणारी एक विधवा स्त्री आहे ही गोष्ट त्याने लगेच ताडली. तिच्या चेहऱ्यावर पसरलेली काळजी त्याला स्पष्ट दिसत होती. अर्थात लॅमर्सबद्दल तिला फारशी काळजी वाटत नसावी, पण त्याच्या मृत्यूनंतर आता कंपनीचा कारभार कोण चालवणार याची चिंता तिला सतावत होती.

"त्याचाच एखादा सहकारी याबद्दल जबाबदार असेल असं तुला वाटतं?" तिने जरा जास्तच उत्साहात विचारले, पण तिचा स्वर मात्र दु:खी होता. "म्हणजे... कदाचित परदेशातला कुणीतरी?"

“या घडीला मी काहीच सांगू शकत नाही. चौकशी सुरू असताना काहीही मत व्यक्त करायचं नाही, हे आमचं धोरण असतं. मला वाटतं, आपण तुमच्या कंपनीपासून सुरुवात करू या. तुम्ही नक्की काय करता?”

मेन्झने आपली खुर्ची आपल्या टेबलाच्या अगदी जवळ आणली. “आम्ही वेगवेगळ्या प्रकारच्या मार्गनिर्देशक यंत्रणा तयार करतो. जमिनीवरच्या, पाण्याखालच्या. शिवाय आम्ही वातचलित यंत्रांसाठी योग्य तळ शोधून काढतो.” बोलता बोलता तिने डॅनिकनच्या नजरेत आलेली अविश्वासार्हता झटकन ओळखली व लगेच पुढे म्हणाली, “विमानं, बोटी किंवा गाड्या या नेमक्या कुठल्या मार्गावर व किती अंतरावर आहेत, हे दर्शवणारी यंत्रेही आम्ही बनवतो.”

“GPS सारखी?”

मात्र प्रश्न विचारल्या विचारल्या, त्याच्या कपाळावर एक आठी उमटली. ती आठीच सांगून गेली की नको तो प्रश्न विचारून त्याने चौकशीला चुकीचे वळण लावलेय. मेन्झ उत्साहात सांगू लागली. “आम्हाला उपग्रहांवर अवलंबून राहायला आवडत नाही. अलीकडेच आमच्या कंपनीबरोबर काही नवे करार करण्यात आले. विमान डोंगराळ भागातून जात असताना, त्याच्यावर माग ठेवणं फारच अवघड असतं. त्यासाठी आम्ही ‘सेन्सॉर फ्युजन’ नावाची एक नवीन यंत्रणा शोधून काढलीय. स्थिर मार्गनिर्देशक यंत्रणा, अंकीय नकाशे व रडार या तिघांकडून आलेली माहिती, आमच्या यंत्रात एकत्र आणली जाते. डोंगराळ भागातून विमान जात असताना, वैमानिकाला ते सतत वर-खाली आणावं लागत असतं. एकीकडे त्या उंचीमध्ये होणारा फरक मोजला जात असतो व अंकीय नकाशाने दिलेल्या माहितीबरोबर तिची तुलना करून, ते विमान नक्की कुठे आहे हे आम्ही अगदी अचूक मिलीमीटर्समध्ये सांगू शकतो. शिवाय त्यामुळे विमानाचा प्रवास करताना डोंगराळ प्रदेश चुकवताही येतो.”

“आणि ही यंत्रं विकत कोण घेतं?”

“आमच्याकडे अनेक मोठमोठे ग्राहक आहेत. बोईंग, जनरल इलेक्ट्रिक आणि एअरबस.” व्हॉन डॅनिकनने चकित झाल्याप्रमाणे भुवया उंचावल्या व तिचे कौतुक करत तो म्हणाला, “म्हणजे माझे विमान जेव्हा डोंगराळ भागातून सुरक्षित जात असेल तेव्हा मी तुझ्या कंपनीचे मनातल्या मनात आभार मानायला हवेत.”

“फक्त आमचेच नव्हेत... पण हो, एका अर्थी तुझं म्हणणं मी मान्य करेन.”

तो पुढे वाकून तिच्या अगदी जवळ आला. जणू त्याला काही गुपित सांगायचे होते. “मला वाटतं की लष्करी कार्यात अशा यंत्रणांचा अधिक वापर होत असतो. तुमच्या ग्राहकांमध्ये काही लष्करी उद्योगातल्या कंपन्या आहेत? विमाननिर्मितीशी जोडलेल्या? लेझर-तंत्राद्वारे दारूगोळा बनवणाऱ्या? म्हणजे त्या प्रकारच्या?”

“एकही नाही.”

“पण तू ज्या कंपन्यांची नावं घेतलीस, त्याही आपल्या देशाच्या संरक्षण व्यवस्थेशी जोडलेल्या आहेत. नाही का?”

“त्या असतीलही. पण तो त्यांचा मुख्य व्यवसाय नव्हे. लष्करी मार्गनिर्देशक यंत्रणा तयार करणाऱ्या कंपन्या वेगळ्या आहेत.”

डॉन व्हॅनिकनच्या कानांना, तिचे उत्तर सारवासारवीचे वाटले. लष्करी शस्त्रास्त्रांच्या

आणि विशेषत: सद्दाम हुसेनसाठी खास 'सुपरगन' निर्मितीत सहभाग असल्याबद्दल, लॅमर्सवर सक्त नजर ठेवण्यात आली होती. "कदाचित हे ऐकून तुला आश्चर्य वाटेल, पण आपल्या तरुणपणी, लॅमर्सने काही शस्त्रास्त्रं डिझाईन केली होती."

"तो प्रचंड बुद्धिमान माणूस होता." मेन्झ म्हणाली. "त्याला अनेक विषयात गती असावी असा माझाही अंदाज आहे. पण त्या गोष्टींबद्दल तो माझ्याशी कधीही बोलला नाही. मी एवढंच सांगू शकते की आमची कंपनी, शस्त्रास्त्र निर्मितीमध्ये कधीच सहभागी नव्हती." तिच्या भुवया जोडल्या गेल्या. "पण तू हे का विचारतोहेस? या गोष्टींचा, त्याच्या मृत्यूशी संबंध असावा असं तुला वाटतंय?"

"या क्षणी, सर्वच शक्यता गृहीत धरायला हव्यात."

"अच्छा." मेन्झची नजर अचानक शून्यात गेली आणि त्याच्या लक्षात आले की, आपल्या बोलण्याचा तिच्या मनावर परिणाम झाला आहे. तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत गेले व आपला चेहरा झाकून तिने एक हुंदका दिला. "माफ कर. थिओच्या मृत्यूने मी खूपच अस्वस्थ झालेय."

व्हॉन डॅनिकन आपल्या डायरीत नोंदी करू लागला. तो स्वत:ला कुणी इन्स्पेक्टर मायग्रेट समजत नव्हता, पण मेन्झच्या बोलण्यात सत्यता आहे असे सकृतदर्शनी तरी त्याला वाटले. किंवा जरी लॅमर्स काही अवैध कृत्यात गुंतलेला असला तरी तिला ते ठाऊक नसावे. मेन्झ शांत होईपर्यंत त्याने वाट बघितली व मग विचारले, "लॅमर्सला, आपल्या कामासाठी सतत प्रवास करावा लागायचा?"

मेन्झने मान वर केली. "प्रवास? अरे बापरे, कायमच." ती डोळे पुसत म्हणाली. "तो सतत प्रवासातच असायचा. आपण बसवलेल्या यंत्रणा तपासत, नवीन ऑर्डर्स घेत, असलेल्या ग्राहकांशी संवाद साधत, आपल्या कंपनीची प्रतिष्ठा अबाधित राखत."

"आणि नेमक्या कुठल्या देशांमध्ये तो जात असे?"

"आमचे नव्वद टक्के ग्राहक हे युरोपमधले आहेत. डुसेल्डोर्फ, पॅरिस, मिलान आणि लंडन. तिथल्या औद्योगिक क्षेत्राला तो भेट देत असे."

"तो कधी मध्य-पूर्वेला जायचा? सिरिया? दुबई?"

"कधीच नाही."

"इस्त्राईल किंवा इजिप्तमध्ये तुमचे ग्राहक आहेत?"

"अजिबात नाही."

"त्याच्या प्रवासाची कोण आखणी करत असे?"

"मला वाटतं, तो स्वत:च."

"तुला म्हणायचंय की त्याला त्यासाठी कुणीही मदतनीस नव्हता? तिकिटं काढणं, हॉटेल्स, प्रवासी गाड्या ठरवणं... आजकाल बिझिनेस ट्रीपसाठी किती गोष्टींची आखणी करावी लागते."

"या बाबतीत तो कुणाचं ऐकून घ्यायला तयार नसे. स्वत:ला लागणाऱ्या गोष्टींची जबाबदारी तो स्वत:वरच घेत असे. इंटरनेटवरून तो विमानाच्या तिकिटाचं बुकिंग करायचा."

व्हॉन डॅनिकनने ती माहिती लगेच आपल्या डायरीत लिहून घेतली. लॅमर्स स्वत:ची

कामे स्वत: करायचा हे ऐकून त्याला बिलकूल आश्चर्य वाटलं नाही, उलट त्यात त्याची लपवाछपवीच उघड होत होती. ज्यूल्स गाय किंवा त्याच्या अन्य एखाद्या खोट्या नावाने विमानाचे तिकीट काढत असताना, आपण कुणाच्या नजरेत येऊ नये याबद्दलची ती दक्षता होती. "डॉक्टर मेन्झ," चेहरा हसरा ठेवत तो म्हणाला. "मी त्याचं ऑफिस बघू शकतो का? मला वाटतं त्यामुळे मी लॅमर्सला अधिक समजून घेऊ शकेन."

"मला वाटतं, मी तशी परवानगी देणं योग्य होणार नाही."

खरे तर, व्हॉन डॅनिकनने बोलताना आपली मर्यादा ओलांडली होती. पण वॉरंट मिळवण्याएवढा त्याच्यापाशी वेळ नव्हता. वॉरंटविना कुठल्याही खाजगी जागेची झडती घेणे बेकायदेशीर होते. "त्या खुनी माणसाला पकडण्यासाठी मला शक्य असेल ती प्रत्येक गोष्ट करायलाच हवी." आपल्या नजरेनेच तिला आव्हान देत तो म्हणाला. "नाही का?"

मिशेला मेन्झ खुर्चीवरून उठली व तिने त्याला आपल्या मागोमाग यायची खूण केली. लॅमर्सची केबिनही मेन्झच्या केबिनसारखी छोटीशी, पण सुबकपणे सजवलेली होती. बाजूच्या टेबलावर ठेवलेल्या एका चमत्कारिक वस्तूकडे, त्याचे चटकन लक्ष गेले. अर्धा मीटर उंची असलेल्या त्या वस्तूचा V सारखा आकार होता व ती अर्धपारदर्शक प्लॅस्टिकसारख्या पदार्थाने बनवली होती. "आणि हे? हे देखील तुमचे एखादे उत्पादन आहे?"

"त्याला MAV म्हणतात." डॉ. मेन्झ म्हणाली, "मायक्रो एअरबोर्न व्हेईकल."

"मी बघू शकतो?" त्याने विचारले व तिने मान हलवत संमती दिली. त्या वस्तूचे वजन एक किलोपेक्षाही कमी भरले असते. त्याचे पंख अत्यंत कडक होते पण तितकेच ते कमालीचे लवचीक होते. "म्हणजे हे खरोखर उडतं?"

"अर्थातच." त्याचा प्रश्न तिला अपमानास्पद वाटला होता. "ते एका तासाला चारशे किलोमीटरपर्यंत उंच व पन्नास किलोमीटरपर्यंत दूर जाऊ शकतं."

"अशक्य!" चेहऱ्यावर एखाद्या खेडवळ माणसाचा भाव आणत त्याने अविश्वास प्रगट केला. "आणि हे सर्व त्याने या इथे बनवलं?"

मेन्झने कौतुकाने मान हलवली. "आमच्या प्रयोगशाळेत त्याने स्वत:च्या हाताने ते बनवलंय. त्याची ही आकाराने सर्वांत छोटी असलेली निर्मिती होती. त्याचा त्याला फार अभिमानही वाटायचा."

तिने उच्चारलेला प्रत्येक शब्द, तो स्मरणात साठवत होता. मर्यादा : ताशी पन्नास कि.मी. वेग : ताशी चारशे कि.मी. स्वत: बनवलेला... सर्वांत कमी आकाराचा. याचा अर्थ त्याने आणखीही काही बनवलेली असणार. त्याने ते चमत्कारिक विमान पुन्हा नीट तपासले.

मिलीमीटरपर्यंत मोजू शकणारे यंत्र याही विमानात बसवलेले असणार यात काहीच शंका नव्हती. "तुमच्या उत्पादनापैकी हे एक आहे? म्हणजे तुम्ही नव्या क्षेत्रात शिरणार होतात? खेळण्यांच्या व्यापारात?"

अपेक्षेप्रमाणेच त्याचे शब्द तिला चांगलेच झोंबले. पुढे होत तिने, त्याच्या हातातून ते विमान काढून घेतले. "MAV हे काही एखादं खेळणं नाही. या प्रकारची व इतक्या छोट्या आकाराची ही जगातील एकमेव वस्तू आहे. तुझ्या माहितीकरता आणखी एक

गोष्ट सांगते. फार महत्त्वाच्या ग्राहकासाठी ती बनवली गेलीय.”

“मी त्या ग्राहकाचं नाव विचारू शकतो?”

“नाही. ती अतिशय गुप्त गोष्ट आहे. पण त्याचा लष्कराशी काहीही संबंध नाही एवढं मात्र मी नक्कीच सांगेन. खरं तर ते लष्कराचं अगदी विरुद्ध टोक आहे. त्यांचं नाव तू झटकन ओळखूही शकशील. आमच्या दृष्टीने तो आमचा सर्वोच्च सन्मान आहे.”

“तू त्यांचं नाव सांगितलंस तर माझं काम खूपच सोपं होईल.”

मेन्झने नकारार्थी मान हलवली. “थिओचा खुनी शोधण्यामध्ये त्यामुळे मदत होऊ शकेल असं मला वाटत नाही.”

व्हॉन डॅनिकनने सफाईदारपणे माघार घेतली. आपला वेळ दिल्याबद्दल, त्याने तिचे आभार मानले व अधिक काही सांगायचे असल्यास केव्हाही फोन करण्याची विनंती केली. गाडीत येऊन बसताना त्याच्या मनात रोबोंचा विचार नव्हता. तो फक्त MAV चा विचार करत होता.

मिशेला मेन्झचे म्हणणे योग्य होते. ते खेळणे नव्हते.

ते एक छुपे हत्यार होते.

११

हळूहळू चालणाऱ्या लोकांना झपाझप मागे टाकत, जोनाथन डोंगर झरझर उतरून खाली आला. आपले हात मात्र त्याने खिशात ठेवले होते. हाताच्या बोटांनी तो खिशातल्या पावत्या सतत चाचपत होता. त्या सामानाच्या पावत्या होत्या? स्कीज व बूट्स? हिवाळ्याचे गरम कपडे? त्या गोष्टी मिळाल्यावर तो एम्माच्या ऑफिसमध्ये फोन करणार होता; पण ते सामान पाठवल्याचे कुणालाच आठवणार नव्हते.

जर त्यांनी ते सामान पाठवले नसेल तर मग कुणी पाठवले असेल? तो विचारात पडला. आणि पाठवणाऱ्याचा पत्ता राहू देत, पण त्या लिफाफ्यात साधी एक चिठ्ठीसुद्धा का नव्हती? प्रश्न त्याला आतून रक्तबंबाळ करत होते. एम्माने हे सर्व त्याच्यापासून का लपवले हा त्याला छळणारा सर्वांत मुख्य प्रश्न होता.

पोस्ट्रस्ट्रॅसे शहर हे डोंगरावरून सापासारखे उतरून, अतिशय मोहकपणे वसलेले होते. रस्त्याच्या दुतर्फा दुकाने, हॉटेल्स व चहापानाचे कॅफे होते. स्वित्झर्लंडच्या तमाम भागात, फेब्रुवारीचा पहिला आठवडा हा 'स्की आठवडा' म्हणून साजरा केला जाई. सेंट गॅलनपासून जिनिव्हापर्यंतचे सर्व नागरिक त्या काळात, त्या डोंगरावर गर्दी करत. आजच्या अखंड हिमवर्षावाने व वादळी वाऱ्याने मात्र सर्व वाहतूक ठप्प करून टाकली होती. अगदी ल्युफ्तसेलबन्हचीसुद्धा. बाजूच्या रस्त्यांवर तर लोकांच्या उत्साहाला उधाण आले होते. अशा हवामानात, पर्वत चढून जाणे कुणालाच शक्य झाले नसते. केवळ जोनाथनलाच नाही तर इतर कुणालाही.

श्मक बुटिक व लांझचे उन्हेरेन ओलांडल्यावर, तो अचानक थांबला. शोकेसमधल्या एका वस्तूने त्याचे लक्ष वेधून घेतले. भोवताली चमचमणाऱ्या घड्याळांच्या मध्यभागी ती वस्तू ठेवलेली होती. ते एक कालबाह्य झालेले हवामानदर्शक उपकरण होते. त्या एकाच उपकरणात थर्मामीटर, हायग्रोमीटर व बॅरोमीटर सामावलेले होते. आठ वर्षांपूर्वी जेव्हा तो एम्माला प्रथमच गिर्यारोहणासाठी इथे घेऊन आला होता, त्या वेळेसही हे उपकरण अगदी त्याच जागी होते. त्याचा आकार एखाद्या जुनाट रेडिओसारखा होता. तीन वेगवेगळ्या परिमाणांतून सद्य वातावरणाच्या स्थितीची त्यात नोंद केली जात होती. त्यामधला लाल दिवा लुकलुकत होता. याचा अर्थ हवेचा दाब झपाट्याने कमी होत चाललाय. खराब हवामानाचा अंदाज व्यक्त केलेला होता व अजून काही तास तरी हिमवर्षाव सुरू राहणार होता.

जोनाथनने काचेला डोळे चिकटवून त्यावरचे आकडे वाचायचा प्रयत्न केला. हवामान तीन डिग्री सेल्सियसवरून उणे अकरा अंशापर्यंत खाली घसरले होते. हवेतील आर्द्रता कमालीची वाढली होती व हवेचा दाब एक हजार मिलिबार्सवरून सातशेवर आलेला दिसत होता.

"तू हवामानाच्या अंदाजाकडे का दुर्लक्ष केलंस?" परवा रात्री एका पोलीस

अधिकाऱ्याने त्याला हा प्रश्न विचारला होता.

मनातल्या मनात मात्र तो त्या पर्वताच्या शिखरावर जाऊन पोहोचला होता. बर्फात, वाऱ्यात व गाठवणाऱ्या थंडीत, तो मनसोक्त हिंडत होता. आपल्या कमरेभोवती वेढलेला, एम्माच्या हाताचा स्पर्श त्याला जाणवला. सर्वांत उंच शिखरावर पाऊल ठेवताच, ती त्याच्या अंगावर कोसळली होती. तिच्या नजरेत समाधान होते, अभिमानाने उर भरून आला होता. एकमेकांची सोबत असली तर या जगात काहीच अशक्य नाही अशी त्या क्षणी तिच्या मनाची ठाम खात्री झाली होती.

"जोनाथन."

दुरून कुणीतरी त्याला हाक मारत होते. आवाज किंचित घोगरा होता व त्यात फ्रेंच बोलीची झलक होती. त्याने त्या आवाजाकडे दुर्लक्ष केले. तो वरच्या त्या लाल प्रकाशाकडे डोळे भाजेपर्यंत एकटक पाहत राहिला. एम्माला हवामानाचा अंदाज ठाऊक होता. डोंगर चढण्यासाठी ती इतकी उत्सुक होती की, तिने खराब हवामानाबद्दल त्याला काही सांगितलेच नाही.

तेवढ्यात कुणीतरी मागून त्याचा खांदा दाबला. "हे काय?" तो फ्रेंच आवाज म्हणत होता. "तुला शोधून शोधून दमले मी."

जोनाथन गर्रकन मागे वळला. समोर एक उंच आकर्षक स्त्री उभी होती. काळ्याभोर मुलायम केसांची. "सिमॉन... तू पोहोचलीस तर!"

सिमॉन नॉयरेटने आपल्या खांद्यावरची बॅग खाली फेकली आणि त्याला घट्ट मिठी मारली. "खूप वाईट झालं रे."

जोनाथननेही तिला जवळ घेतले. त्याचे डोळे गच्च मिटले गेले व जबडा आवळला गेला. एरवी तो कितीही कणखर असला तरी जिव्हाळ्याचे माणूस असे अचानक समोर आल्यावर त्याला आपल्या भावना आवरणे अशक्य झाले. क्षणभराने तिने आपली मिठी सैल केली व त्याचे दोन्ही खांदे पकडत ती त्याच्या समोर उभी राहिली. "स्वत:ला कितपत सावरलंयंस?"

"सावरलंय." तो म्हणाला. "आणि सावरलेलो नाहीसुद्धा. एक प्रकारचा बधिरपणा आलाय."

"काय अवस्था झालीय तुझी. दाढी, आंघोळ, जेवण, सगळंच बंद केलंयस का? असं वागून नाही चालणार."

आपले गाल पुसत तो कसाबसा हसला. "मला वाटतं, माझी भूकच मेलीय."

"मग त्यासाठी आपल्याला कठोर उपाय योजावे लागणार."

"मलाही तसंच वाटतंय." तो म्हणाला.

सीमॉनने त्याला मान वर करून पाहायला भाग पाडले. "नक्की तुला तसं वाटतं?"

जोनाथनने पुन्हा स्वत:ला सावरले. "होय सीमॉन, त्यासाठी आपल्याला खरंच काहीतरी करावं लागेल."

"आता जरा ताळ्यावर आलास." हाताची घडी घालत तिने मान डोलावली. जणू तिच्यासमोर इयत्ता चौथीतला एक मुलगा उभा होता.

सीमॉन नॉयरेट ही जन्माने इजिप्शियन, फ्रेंच माणसाशी लग्न केलेली व व्यवसायाने

शिक्षिका होती. नुकतेच तिला चाळिसावे वर्ष लागले असले तरी ती कमीतकमी दहा वर्षांने तरुण दिसत होती. आपल्या तारुण्याचा संबंध, ती आपल्या अरब वंशाशी जोडत असे. तिच्यातल्या सळसळत्या रक्ताचा प्रत्यय, तिच्या दाट व काळ्याभोर केसांकडे पाहून येत असे. तिचे ते केस डौलदारपणे खांद्यापर्यंत झुलत असत. केसांसारखेच तिचे डोळेही काळेभोर होते आणि गडद रंगवलेल्या पापण्यांमुळे तिची चंचल नजर अधिक धारदार वाटत असे. तिने खांद्यावर लटकवलेली बॅग, भारी किमतीची होती. बॅगेत हात घालून तिने सिगारेट बाहेर काढली– गॉलाइस दिवसाला ती साठ सिगारेट्स ओढायची. अजूनपर्यंत तरी सिगारेटचा परिणाम फक्त तिच्या आवाजावरच झाला होता. प्रवासात आपल्याबरोबर सतत बाळगणाऱ्या जुन्या ब्रेल रेकॉर्डसारखाच तिचा आवाजही खरखरीत झाला होता.

“आल्याबद्दल खरंच तुझे आभार मानावेसे वाटतात.” तो म्हणाला. “कुणीतरी आपल्याबरोबर असावं असं फार वाटत होतं. एम्माला जवळून ओळखणारं.”

सीमॉन बोलायला सुरुवात करणार होती पण तिच्या गळ्यात हुंदका दाटून आला. तिने मान फिरवली व जमिनीवर सिगारेट फेकून दिली. “काही झालं तरी आपण रडायचं नाही असं स्वत:ला प्रवासभर सारखं बजावत होते.” ती म्हणाली. “आणि स्वत:ला सांगत होते की या क्षणी तुला एका भक्कम आधाराची फार गरज आहे. कुणीतरी येऊन तुझ्या मनाला उभारी द्यायला हवी. तुझी नीट काळजी घेणारं माणूस, तुझ्या सोबत असायला हवं. पण तू स्वत:च इतका धीराचा आहेस. आमचा गुणी जोनाथन! ए, बघ ना रे माझ्याकडे. लहान मुलासारखा दिसतोस तू.”

तिच्या डोळ्यांच्या कडांतून पाण्याच्या धारा लागल्या आणि पापण्यांवरचा रंग गालांवर उतरला. खिशातून टिशू पेपर काढत त्याने तिचे गाल पुसले.

“पॉललाही खूप वाईट वाटलंय.” हुंदके देता देता ती म्हणाली, “त्याचा डॅव्होसला आठवडाभर मुक्काम आहे. मिस्टर बिगशॉटचं अफ्रिकेत भ्रष्टाचारावर खास व्याख्यान ठेवलंय आणि त्याला तिथे हजर राहणं फार महत्त्वाचं आहे. इथे येता आलं नाही म्हणून तो स्वत:वरच खूप चिडलाय.”

सीमॉनचा नवरा, पॉल हा एक अर्थशास्त्रज्ञ होता. जागतिक बँकेत तो मोठ्या हुद्यावर काम करत होता.

“त्यात काय झालं? शक्य असतं तर तो नक्कीच आला असता.”

“तसं नाही. मी त्याला स्पष्ट सांगितलं की आता काळच असा आलाय की, आपण आपल्या महत्त्वाकांक्षेचे दास बनलो आहोत.” सीमॉनने दुकानातल्या आरशात स्वत:चा चेहरा पाहिला आणि ती किंचाळली. “शी! मी किती वाईट दिसतेय. आपली जोडी अगदी शोभून दिसतेय.”

दोन वर्षांपूर्वी रॅन्सम व नॉयरेट कुटुंबांची, बैरुतमध्ये प्रथम भेट झाली होती. जोनाथन DWB च्या दौऱ्यावर आला असताना ज्या इमारतीत राहत होता, त्याच्या शेजारीच पॉल व सीमॉन राहत होती. सीमॉन त्यावेळेस बैरुतच्या एका अमेरिकन शाळेत शिकवत होती. एम्मा ही संकटग्रस्तांना मदत करणाऱ्या संस्थेत काम करतेय हे समजल्यावर सीमॉनने, तिच्या असलेल्या उच्चपदस्थांच्या ओळखीचा वापर करत, एम्माला खूप मदत केली होती. सीमॉनच्या दिलदार स्वभावाने एम्मा भारावून गेली व

दोघी एकमेकांच्या जिवलग मैत्रिणी बनून गेल्या.

त्यानंतर जोनाथनची बदली DWB च्या जिनिव्हा येथील मुख्य कार्यालयात झाली आणि त्याआधी दोन आठवडे, पॉल नॉयरेटही जिनिव्हात येऊन पोहोचला होता. दोन्ही बायकांच्या उत्साहाला पुन्हा एकदा उधाण आले. जोनाथन व एम्माला आपल्याच कॉलनीत जागा मिळवून देण्यासाठी, नॉयरेट कुटुंबाने खास मदत केली. जेव्हा जेव्हा वेळ मिळे तेव्हा दोन्ही कुटुंबे रात्रीच्या जेवणासाठी एकत्र येत. महिनाभर रॅन्समच्या घरात बर्गर्सचा आस्वाद घेत तर दुसऱ्या महिन्याला नॉयरेट्सच्या घरात तर रोज मेजवान्याच असत. एम्माच्या मते मात्र ती काही योग्य देवाणघेवाण नव्हती.

जोनाथनने सीमॉनची बॅग आपल्या हातात घेतली. “चल माझ्याबरोबर.” आणि तो भराभर डोंगर उतरू लागला.

“मला वाटलं होतं की हॉटेल उलटच्या दिशेला आहे.”

“बरोबर आहे तुझं. आता आपण स्टेशनवर चाललोय.”

त्याला गाठता गाठता सीमॉनची दमछाक झाली. “एवढ्यातच माझ्यापासून दूर पळायला लागलास?”

“तसं नाही. एका गोष्टीचा मला तपास करायचाय.” त्याने तिला त्या पावत्या दाखवल्या.

“कसल्या पावत्या आहेत?” सीमॉनने विचारलं.

“मला वाटतं सामान ताब्यात घेण्याच्या. एम्माच्या नावाने काल एक पाकीट आलं. त्यात ह्या पावत्या होत्या. आतमध्ये फक्त एक कागदाचा चिटोरा होता. त्यावर नाव, गाव, पत्ता काहीही नव्हतं. फक्त या पावत्या.”

सीमॉनने त्याच्या हातातून त्या पावत्या घेतल्या. “एसबीबी. म्हणजे श्वाईझराईच बंडेसबन्ह. तिचं काही सामान हरवलं होतं?”

“तेच तर मला पाहायचंय.”

“कोणी पाठवलंय?”

“कल्पना नाही. कुठेच काही नावाचा उल्लेख नाही.” त्याने तिच्याकडून पावत्या परत घेतल्या. “तिचा एखादा मित्र असावा.”

“ही गोष्ट मला ठाऊक नसावी?”

“तू तिच्याबरोबर पॅरिसमध्ये होतीस.”

“हो. होते. तर मग?”

जोनाथन बोलताना अडखळला. “तुम्ही दोघी तिथे असताना, माझ्यावर एक आणीबाणीचा प्रसंग गुदरला होता. दोन दिवस मी तिला गाठण्याचा प्रयत्न करत होतो. माझे प्रयत्न थकले आणि मी कमालीचा अस्वस्थ होऊन गेलो. नंतर तिने सांगितलं की, ती तुझ्याच खोलीत राहत होती व स्वत:च्या खोलीकडे फिरकलीही नाही.”

हीच त्याच्या मनातली बोच होती. तिच्याबद्दल आपल्या मनात कधी संशय निर्माण झाला हे नेमके त्याला आता उमगले होते. दिवसाउजेडी त्याला ही गोष्ट क्षुल्लक आणि फालतू वाटली होती.

“आणि तू मात्र तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवला नव्हतास.” सीमॉनने त्याच्या

खांद्यावर हात ठेवला आणि किंचित दाबला. “पण हे असंच घडलं होतं. त्या दोन दिवसात आम्ही अखंड एकत्र होतो. ती आमची ‘फक्त मुलींची’ ट्रीप होती. मध्यरात्र उलटून जाईपर्यंत तर आम्ही एकमेकींशी एक शब्दही बोललो नव्हतो आणि मग मात्र गप्पा संपतच नव्हत्या. अशी होती आपली एम्मा. दिलं तर सर्वस्व नाहीतर कुणाला जवळपासही फिरकू देणार नाही. तुला काय तिचा स्वभाव ठाऊक नाही?”

“पण मग या सामानाचं काय? याबद्दल ती कधीच तुझ्याशी बोलली नव्हती? तिने एखादी सहल ठरवली होती का? का अचानक एखादी भेट देऊन मला चकित करायचा तिचा बेत होता?”

“म्हणजे तिची ती ‘सणकी सहल’?”

“तसंच काहीसं.”

कुणालाही न सांगतासवरता एम्मा अचानक घरातून बाहेर पडायची आणि एखाद्या जवळपासच्या किंवा कधीकधी अगदी दूरच्या ठिकाणीही जाऊन, आपल्याला हवा असलेला माल घेऊन यायची. एम्माची ‘सणकी सहल’ असे तिच्या त्या गायब होण्याला नाव पडले होते. रक्ताच्या बाटल्या, पेनिसिलीन, व्हिटॅमिन ‘सी’च्या गोळ्या अशा वेगवेगळ्या गोष्टींची ती खरेदी करत असे. तिच्या खरेदीला काही बंधन नसे. मनात आले तर ती एखादी मौल्यवान गोष्ट विकत घ्यायलाही कचरत नसे.

“तिने नक्कीच काहीतरी सामान मागावलेलं असणार. तू तिच्या ऑफिसमध्ये फोन केला होतास का?” तिने विचारलं.

आपण फोन केल्याचे, जोनाथनने तिला सांगितले आणि ऑफिसतर्फे काहीही सामान न पाठवल्याचे त्याला लगेच सांगण्यातही आले होते.

“ठीक आहे. मला तरी त्यात काही काळजी करण्यासारखं वाटत नाही.” सीमॉनने आपला खांदा त्याच्या खांद्यात अडकवला व दोघेही खाली उतरू लागले.

समोर पोस्ट ऑफिस आल्यावर ते डावीकडे वळले व ओबर्सी नावाच्या एका छोटच्या तळ्याच्या बाजूने चालू लागले. तळे गोठलेले होते आणि त्याला दोरखंडाचे कुंपण घातलेले होते. त्यामुळे त्यावर नवीन पडणारे बर्फ नीट पसरले जात होते. बन्हहॉफ स्टेशनवर चिटपाखरूही दिसत नव्हते. दर तासाला एक गाडी अरोसाला जायची व त्याच वेळी दुसरी गाडी अरोसाहून यायला निघायची. दोन्ही गाड्या पाच मिनिटांच्या अंतराने आपापल्या स्टेशनातून निघायच्या.

जोनाथन सामानाच्या खिडकीपाशी पोहोचला. खिडकीवरच्या माणसाने त्याच्या हातातून पावती घेतली व दुसऱ्याच मिनिटाला ती त्याला परत केली. “इथे नाही.” तो म्हणाला.

आतल्या लोखंडी शेल्फवर डझनभर बॅगा पडलेल्या होत्या. तिकडे पाहत जोनाथनने विचारले. “तू नीट तपासून पाहिलंस का?”

“तिकीट ऑफिसात जाऊन चौकशी कर. आमच्या सिस्टिममध्ये नोंद झालीये का, हे तुला स्टेशन मास्तर सांगू शकेल.”

तिकिट ऑफिसही रिकामे होते. जोनाथनने पावत्या आत सरकवल्या. “इथे नाहीत.” स्टेशन मास्तरची नजर कॉंप्युटरवर खिळलेली होती. “त्या बॅगा लॅंडक्वॉर्टला आहेत. दोन दिवसांपूर्वीच त्या तिथे येऊन पोहोचल्या आहेत.”

लँडक्वॉर्ट हे झुरिच-चूर रस्त्यावरचे एक छोटेसे गाव होते व क्लोस्टर्स मार्गावरचे शेवटचे स्टेशन म्हणून अधिक प्रसिद्ध होते. क्लोस्टर्स हे ब्रिटिश सम्राटांचे त्या काळातले अत्यंत आवडते विश्रांतीस्थळ होते, तर त्याच मार्गावरचे डॅव्होस हे बर्फावरच्या विविध खेळांसाठी प्रसिद्ध होते.

“ते सामान कुणी पाठवलंय हे समजू शकेल?” जोनाथनने विचारले.

“दोन्ही वस्तू अस्कोनावरून आल्या आहेत. दुपारी १ वा. ५७ मिनिटांनी त्या झुरिचला येणाऱ्या गाडीत चढवण्यात आल्या आणि तिथून लँडक्वॉर्टला उतरवण्यात आल्या.”

अस्कोना हे स्वित्झर्लंड-इटली सीमेवर वसलेले एक लहानसे गाव होते. लॅगो मॅगिओर किनाऱ्यावरील नारळांच्या बागांमधली टुमदार आरामगृहे हे तिथले मुख्य आकर्षण होते. जोनाथनचे कुणीच मित्र तिथे राहत नव्हते. एम्माचे कदाचित असावेत.

सीमॉन खिडकीजवळ झुकली. “हे सामान कोणी पाठवलंय हे कळू शकेल?” स्टेशनमास्तरने मान हलवत नकार दर्शवला. “ही माहिती मिळवणं माझ्या अधिकारात नाही.”

“मग कुणाच्या आहे?”

“अस्कोनाच्या स्टेशन मास्तरच्या.”

जोनाथनने आपले पाकीट बाहेर काढले पण त्या आधीच सीमॉनने आपले क्रेडिट कार्ड पुढे सरकवले होते. “लँडक्वॉर्टरची दोन तिकिटं.” ती म्हणाली. “फर्स्ट क्लास.”

१२

ते प्रशस्त आवार, अल्-अझबर या नावाने ओळखले जायचे व ते फर पॅलेस्टीनच्या शाखेच्या मालकीचे होते. फर फॅलेस्टीन हा सिरियन लष्करी गुप्तचर संस्थेचा एक विभाग होता. फिलिप पालुंबो त्या इमारतीत शिरला व हॉलमधील अमोनियाचा तीव्र गंध त्याच्या नाकात शिरला. तो काही पहिल्यांदाच तिथे येत नव्हता. तिथे त्याच्या दहाहून जास्त खेपा झाल्या असतील; पण प्रत्येक खेपेस डोळ्यातून पाणी आणणारा तो अमोनियाचा वास व आजूबाजूचे उजाड वातावरण त्याला सहन होत नसे. काँक्रीटच्या फरशा. काँक्रीटच्या भिंती. कुठल्याही प्रकारची सजावट नाही. सजावट म्हणायचीच तर फक्त भिंतीवर टांगलेल्या दोन फोटोंची. त्यातला एक फोटो राष्ट्राध्यक्ष बशीर-अल्-अस्सद (ज्यांना तिथले लोक 'डॉक्टर' या नावाने संबोधत) यांचा होता व दुसरा त्यांचे पिताश्री, हफीज-अल-अस्सद यांचा होता. ते आता हयात नव्हते. हॉलच्या मध्यभागी एक टेबल-खुर्ची ठेवलेली होती. खुर्चीत एक ऑफिसर बसलेला होता. त्याच्या बाजूला एक जर्मन शेफर्ड कुत्रा पाय जवळ घेऊन झोपला होता. पालुंबोला पाहताच तो अधिकारी खुर्चीवरून उठला व त्याने सलाम ठोकला. "वेलकम बॅक सर."

पालुंबो काहीही न बोलता पुढे गेला. तो तिथे आल्याची कोणतीही अधिकृत नोंद व्हायला नको होती. उलट तशीच वेळ आली तर, त्याने सिरीयामध्ये पाऊलदेखील ठेवले नव्हते हे सिद्ध करणाराच पुरावा सादर करावा लागला असता.

पालुंबो हा SRU म्हणजे CIA च्या स्पेशल रिमुव्हल युनिटचा प्रमुख होता. कागदोपत्री, SRU हे दहशतवादविरोधी हुकमत केंद्र समजले जायचे. परंतु प्रत्यक्षात SRU चा कारभार स्वायत्तपणे चालत असे आणि पालुंबो हा अॅडमिरल जेम्स लॅफेव्हर, कार्यकारी उपसंचालक, याच्या हाताखाली काम करत असे. जेम्स लॅफेव्हर याला त्या एजन्सीमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे स्थान होते.

पालुंबोवर सोपवलेली जबाबदारी तशी सरळ साधी होती. संशयित दहशतवाद्यांना पकडणे व त्यांचे अपहरण करून त्यांना चौकशी अधिकाऱ्यासमोर उभे करणे, यासाठी त्याला तीन जेट (विमाने) उपलब्ध करून दिली होती. केवळ तासाभराच्या सूचनेत, त्याला चारही दिशांमध्ये मुक्त भ्रमण करण्याची मुभा होती. त्यासाठी अॅडमिरल लॅफेव्हर सदैव त्याच्या पाठीशी होता व अमेरिकन राष्ट्राध्यक्षाचीही संमती मिळालेली होती. त्याला फक्त एकच ताकीद देण्यात आली होती : तो शत्रूच्या हातात सापडता कामा नये. थोडक्यात, जबाबदारी दुधारी होती.

त्याचे विमान दुपारी १ वा. ५५ मि. दमास्कसला उतरले होते. सिरियन अधिकाऱ्यांच्या ताब्यात कैद्याला देणे ही त्याची पहिली जबाबदारी होती. त्याने सही केलेल्या

कागदपत्रांच्या तीन प्रती त्याच्याजवळ होत्या. त्यानुसार कैदी नं. ८८८९१Z ह्यावर आता सिरियन दंडाधिकारी यंत्रणेनुसार कारवाई होणार होती. भूमध्यसमुद्रापलीकडील देशांसाठी आता वालिद गॅसनचे अस्तित्व संपुष्टात आलेले होते. त्याला 'गायब' असे अधिकृतपणे जाहीर केलेले होते.

एका झगमगीत पॅसेजमधून तेलकट रंगाचा गणवेश परिधान केलेला एक सडपातळ बांध्याचा अधिकारी बाहेर आला. त्याचे नाव होते, कर्नल माजिद मालौफ. 'कर्नल माईक' या नावाने हाक मारलेले त्याला अधिक आवडत असे. गॅसनच्या चौकशीची जबाबदारी त्याच्यावर देण्यात आली होती. कर्नल माईक हा दिसायला अगदी ओबडधोबड होता. त्याच्या नाकावर व गालांवर देवीचे व्रण होते. मिठी मारून व हस्तांदोलन करत, त्याने अमेरिकन माणसाचे स्वागत केले. पालुंबोला मात्र ती अस्वलाचीच मिठी वाटली. दोघेही कर्नल माईकच्या केबिनमध्ये गेले व तिथे पालुंबोने त्याला गॅसनची संपूर्ण केस साधारण तासभर समजावून सांगितली. विशेषत: गॅसनकडून कुठली माहिती मिळवणे अत्यंत गरजेचे आहे यावर पालुंबोने अधिक भर दिला.

सिरियन अधिकाऱ्याने सिगारेट पेटवत कागदावर केलेल्या नोंदींकडे एकवार नजर टाकली. "आपल्यापाशी आता किती वेळ शिल्लक आहे?"

"आमच्या मते, धोक्याची वेळ अगदी तोंडाशी येऊन ठेपलीय." पालुंबो म्हणाला. "काही दिवस, फक्त. जास्तीतजास्त एक-दोन आठवडे."

"धावपळीचं काम आहे, तर."

"मला तरी तसं वाटतं."

आपल्या ओठांवर आलेला तंबाखूचा बारीक तुकडा त्या सिरीयनने बोटाने झटकला.

"त्याच्या नातेवाइकांना बोलावण्याएवढा वेळ आपल्यापाशी आहे?"

संशयित गुन्हेगाराच्या आईला किंवा बहिणीला बोलावून घेणे हे कुठल्याही चौकशीमधले प्रभावी तंत्र समजले जायचे. त्या दोघींपैकी एकीच्या शारीरिक छळाची नुसती धमकी दिली गेली की, गुन्हेगार आपल्या पापाचा धडा धडधड वाचून दाखवत असे.

"अजिबात नाही." पालुंबो म्हणाला. "आपण ताबडतोब कोणती कृती करू शकतो, याचा विचार करायला हवा."

सिरियनने खांदे उडवले. "आलं लक्षात मित्रा."

खरे म्हणजे, अमेरिकेच्या यादीत सिरियाचे नाव अजूनही 'दहशतवादाला खतपाणी' घालणारे राष्ट्र म्हणूनच होते. मात्र १९८६ सालापासून कुठल्याही दहशतवादी संघटनेशी, सिरियाचे नाव जोडले गेले नव्हते. उलट, कुठल्याही स्थानिक दहशतवादी संघटनेला देशांतर्गत किंवा परदेशात हल्ले करण्यापासून रोखण्यात सिरियन सरकार यशस्वी झाले होते. फक्त पॅलेस्टाईन मुक्तीसाठी कार्यरत असलेल्या कट्टर संघटनांना मात्र निष्क्रिय मदत करण्याचे धोरण त्यांनी अवलंबिले होते. इस्लामिक जिहादचे मुख्य कार्यालय दमास्कसला होते आणि हमास पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेचा डावा गट यांच्या कचेऱ्याही शहरात होत्या.

असे असूनसुद्धा आणि मानव अधिकारांच्या पूर्ततेमधले सिरियन सरकारचे दारुण

अपयश लक्षात घेऊनही, दहशतविरोधी युद्धासाठी अमेरिकेने सिरियाला भागीदार करून घेतले होते. ९/११ च्या घटनेनंतर सिरियन सरकारने अल्-कायदा संघटनेतील सक्रिय कार्यकर्त्यांची माहिती अमेरिकन गुप्तचर विभागाला दिली होती व त्या हल्ल्याचा जाहीर निषेधही केला होता. इराक युद्धात आपल्या सीमेवरून इराकमध्ये घुसणाऱ्या बंडखोर सैनिकांशी कडवा प्रतिकार केला होता. इस्लामी मूलतत्त्ववाद अरब देशांमध्ये पसरवण्यास सिरियाचा कट्टर विरोध होता. कुठलाही अतिरेक सहन केला जाणार नव्हता.

गुन्हेगाराच्या चौकशीसाठी तयार करण्यात आलेली कोठडी अरुंद व काळोखी होती. खोलीतली खिडकी, भिंतीच्या अगदी वर होती आणि जलनि:सारणाची व्यवस्था फरशीच्या मध्यभागी केलेली होती. सुरक्षारक्षक कैद्याला घेऊन आला. काही क्षणांनंतर दुसऱ्या रक्षकाने एक लहानसे, शाळेत असते तसे डेस्क व त्याला जोडलेली खुर्ची आणून ठेवली. गॅसनला त्यावर बसवण्यात आले. एका रक्षकाने त्याच्या चेहऱ्यावरचा बुरखा काढला.

“तर मिस्टर गॅसन,” कर्नल माईकने अरेबिक भाषेत सुरुवात केली. “दमास्कसमध्ये आम्ही तुझं स्वागत करतो. जर तू सहकार्य केलंस आणि आमच्या प्रश्नांना नीट उत्तरं दिलीस, तर तुझा इथला मुक्काम फारच छोटा असेल व आमच्या अमेरिकन मित्रांच्या कोठडीत आम्ही तुझी परत रवानगी करू.

गॅसनने उत्तर देण्यासाठी तोंडदेखील उघडले नाही.

“तुला सिगारेट हवीय? थोडंसं पाणी? किंवा आणखी काही?”

“तू कोण मला विचारणारा?” गॅसन पुटपुटला खरा; पण त्याने आपल्या खांद्यांवरून मागे टाकलेल्या अस्वस्थ कटाक्षांमुळे तो मनातून घाबरलाय हे सहज लक्षात येऊ शकले.

कर्नल माईकने इशारा केला व दोन्ही सुरक्षारक्षक त्याच्यावर तुटून पडले. एकाने त्याचा डावा खांदा मुरगळून मागे खेचला तर दुसऱ्याने त्याच्या तळहातावर गुडघा टेकवत त्याचा उजवा हात जोरात ओढला आणि हाताचा पंजा टेबलावर ताणून धरला. दुसऱ्याच क्षणी, विजेचा शॉक बसावा तशी त्याची बोटे वाकडीतिकडी झाली होती.

“मी अमेरिकन नागरिक आहे.” वेदनेने कळवळत गॅसन केकाटला. “मला हक्क आहेत. तू मला ताबडतोब सोडून दिलं पाहिजेस. मला वकील नेमायचाय. मला माझ्या देशात परत पाठवायची मी मागणी करतो.”

कर्नल माईकने आपल्या शर्टाच्या खिशातून एक छोटासा चाकू काढून, त्याचे पाते मोकळे केले. अतिशय काळजीपूर्वक त्याने गॅसनची करंगळी इतर बोटांपासून वेगळी करत मधल्या पोकळीत त्यावर दारूच्या बाटलीचे बूच घट्ट दाबून धरले.

“मला राजदूतांना भेटायचंय. तुला कसलाही अधिकार नाही. मी अमेरिकन नागरिक आहे. तुला हक्क नाही की–”

कर्नल माईकने त्याच्या बोटाच्या मुळाशी चाकूचे पाते टेकवले व एखाद्या गाजराचे बारीक तुकडे करावेत तसा तो चाकू बोटावरून फिरवू लागला. गॅसन किंचाळला आणि जेव्हा कर्नल बोटाच्या बुंध्याशी जंतुनाशकाने मलमपट्टी करू लागला तेव्हा तर तो असह्य वेदनेने बोंबाबोंब करू लागला.

पालुंबो शांतपणे बघत होता. त्याच्या चेहऱ्यावर कसलेही भाव नव्हते. कर्नल माईकने

एक उसासा सोडला व तो पुन्हा बोलू लागला. “तू शेव्हचेन्कोला दहा हजार डॉलर्स मोजलेस आणि त्याच्याकडून तीन पेट्या घेऊन व्होल्क्सवॅगन व्हॅनमध्ये ठेवल्यास. इथपर्यंत आम्हाला ठाऊक आहे. आता तू आम्हाला उरलेली हकिकत सांगणार आहेस. मुख्य म्हणजे ती स्फोटकं तू कोणाकडे पोहोचवलीस आणि त्यांची यापुढची काय योजना आहे? ही माहिती मिळाल्याशिवाय आम्ही तुला सोडणार नाही. तुला जर वाटत असेल की खोटं बोलून आपण इथून निसटू शकतो तर लक्षात ठेव की, तुझं बोलणं खरं आहे की नाही हे पडताळून पाहिल्याशिवाय तुझी सुटका होणार नाही. आपण सुरुवात करू या. आम्हाला त्या स्फोटकांबद्दल सांग. तू ती कुणाच्या हातात दिलीस?”

पालुंबोचे लक्ष गॅसनच्या बुटांकडे होते.

हाच तो क्षण असतो जेव्हा माणसात किती धमक आहे याचा पुरता अंदाज येतो. गॅसन कर्नलच्या तोंडावर थुंकला.

गडी चांगलाच लढवय्या होता. तर!

पालुंबो खोलीतून बाहेर पडला. कॉफी प्यायची गरज होती. रात्र जागवावी लागणार होती.

१३

लँडक्वॉर्ट स्टेशनवर लावलेल्या भल्यामोठ्या घड्याळावरून बर्फाचे छोटे- मोठे सुळे अधांतरी लोंबकळत होते. झोंबणाऱ्या वाऱ्यापासून बचावण्यासाठी मान खाली झुकवून, ते दोघे तो लांबलचक प्लॅटफॉर्म एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चालत आले. आपापले सामान ताब्यात घेण्यासाठी अनेक 'स्कीअर्स' रांगेत उभे होते. आज 'स्कीईंग' करणे शक्यच नव्हते. जोनाथन रांगेच्या शेवटी जाऊन उभा राहिला. कधी एकदा ते सामान पदरात पडतेय याची उत्सुकता आता कमालीची वाढली होती. तो अस्वस्थपणे आपले अंग झटकू लागला.

सीमॉनने त्याचा खांदा हलकेच दाबत विचारले, "एम्माच्या नातेवाइकांना कळवलंस?"

"तिला एकच तर बहीण आहे. बिट्रिस. ती बर्नला असते."

"म्हणजे ती आर्किटेक्ट? मला वाटतं, एम्मला ती आवडत नव्हती."

"हो. पण तिच्या नात्यातलं असं, तेवढं एकच माणूस आहे. बिट्रिसशी तिचे कसे संबंध होते हे तर तुला ठाऊकच आहे. पण तरीही एम्माने तिच्यासाठी म्हणून स्वित्झर्लंडला स्थायिक व्हायचं ठरवलं. आज सकाळी मी तिला फोन करण्याचा प्रयत्न केला, पण ती घरात नसावी. फोनवर निरोप ठेवता आला असता; पण काय सांगणार होतो मी?... एम्मा... छे. माझ्याच्याने शक्य झालं नाही."

"तिच्या अंत्यसंस्कारांबद्दल काय ठरवलंयस?"

"प्रेत ताब्यात मिळाल्याशिवाय कसं ठरवणार?"

"कधी मिळेल?"

"सांगणं कठीण आहे. अजून काही दिवस तर नक्कीच लागतील. आपल्याला पुन्हा त्या डोंगरावर जायला लागणार आहे. पण जायला कधी जमेल, कुणास ठाऊक!"

"इथे करणार की इंग्लंडमध्ये?"

"इंग्लंडमध्येच. तीच तिची जन्मभूमी होती."

रांग वेगाने पुढे सरकत होती.

"आणि तुझ्या भावांना कळवलंस?" सीमॉनने विचारलं.

"बोलण्याच्या मन:स्थितीत येईन तेव्हा त्यांनाही कळवीनच. आज मला कुणाचीच सहानुभूती नकोशी वाटतेय."

रांग पुढे सरकली आणि जोनाथन खिडकीसमोर आला. त्याने पावत्या दिल्या. कारकुनाने एक काळी प्रवासी बॅग त्याच्यासमोर ठेवली व आणखी एक मध्यम आकाराचा चौकोनी खोका, त्याच्या हातात दिला. खोक्याला तपकिरी कागदाचे वेष्टण होते.

त्या मऊ मुलायम कातडी बॅगेला सोनेरी चेन होती व चेनलाही सोनेरी कुलूप लावलेले होते. बॅग चांगलीच महागडी असणार यात काही शंकाच नव्हती. शनिवार-रविवारच्या छोट्या प्रवासाला वापरण्याजोगी. रेंज रोव्हरच्या पुढच्या सीटवर आरामात

ठेवता येईल अशी. बॅगेवरही नावाचे लेबल नव्हते. फक्त हँडलला एक पावती तेवढी अडकवलेली होती.

जोनाथन त्या खोक्याकडे पाहू लागला. दुकानात शर्ट ठेवायला खोकी असतात तसा तो त्याला चटकन वाटला. जाड दोऱ्याने तो बांधलेला होता. पण त्यालाही नावाचे लेबल चिकटवलेले नव्हते. फक्त एक पावती लावलेली होती. त्याने तो उचलला. तो कमालीचा हलका होता. त्याने खिशातून छोटा चाकू काढला. खोका उघडायला तो उत्सुक झाला होता.

"हेच तुला अपेक्षित होतं?" सीमॉनने विचारले. "म्हणजे हे एम्माचं असू शकेल?"

"असायलाच हवं." जोनाथन थोडक्यात म्हणाला. "कुणीतरी तिच्यासाठी पाठवलंय."

"चला. मागच्याला येऊ देत." कारकून ओरडला.

रांग पुढे सरकली. जोनाथनच्या मागचा माणूस जोनाथला धक्का मारत पुढे सरसावला. स्विसमधील वागण्याची ती पद्धत होती. जोनाथनने चाकू खिशात ठेवला, सामान उचलले व तो प्लॅटफॉर्मच्या दिशेने चालू लागला. बॅगा नीट ठेवता येईल अशी जागा तो शोधू लागला. बन्हहॉफच्या कँटीनमधील गर्दी पाहून तो चक्रावला. कँटीनच्या बाहेरही लोकं थांबली होती.

"चूरकडे जायला आता पाऊण तासाने गाडी आहे." इंडिकेटर पाहत सीमॉनने माहिती दिली. "रस्त्यावर एक कॉफी हाऊस आहे. जायचं तिथे?"

"जाऊ या ना. थोडा एकांतही मिळेल." जोनाथन म्हणाला.

वाहतूक थांबेपर्यंत ते रस्त्यावर उभे राहिले व मग त्यांनी धावत रस्ता क्रॉस केला. रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला ते पोहोचत असतानाच एक चंदेरी रंगाची गाडी वळसा घेत जोराने येताना, त्यांना दिसली.

"थांब, थांब." जोनाथनने सीमॉनला खेचून बाजूला घेतले. गाडी जोरात पुढे आली व करकचून ब्रेक दाबत, त्यांच्यापासून फूटभर अंतरावर थांबली. गाडीचे दरवाजे उघडले गेले आणि दोन्ही बाजूंनी एकेक माणूस त्यांच्या दिशेने पुढे येऊ लागला.

जोनाथन आळीपाळीने दोघांकडे पाहू लागला. ड्रायव्हरच्या बाजूने उतरलेला माणूस बुटका व पीळदार शरीरयष्टीचा होता. अंगात जॅकेट, डोळ्यांवर गॉगल्स व केस भादरलेले होते. दुसरा मात्र उंच व दणकट होता. जीन्स, गळाबंद स्वेटर, पिंगट केस व बारीक डोळ्यांचा. दोघांची पावले थंडपणे पडत असावी तरी त्यातली आक्रमकता लपत नव्हती. जोनाथन हे त्यांचे लक्षय आहे हेही तितकेच स्पष्ट दिसत होते. त्याने काही हालचाल करण्यापूर्वी – सीमॉनला सावध करण्याआधीच – त्या गळाबंद स्वेटर घातलेल्या माणसाने जोनाथनच्या चेहऱ्यावर एक ठोसा लगावला. त्या जोरदार प्रहाराने जोनाथन गुडघ्यावर पडला. सामान जमिनीवर फेकले गेला.

"जोनाथन...? देवा रे!" सीमॉन अस्फुटपणे किंचाळत एक पाऊल मागे गेली. पिंगट केसाचा माणूस जोनाथनच्या अंगावर ओणवा झाला व त्याने ती बॅग व खोका उचलला. "चल, निघू या." मान तिरपी करत तो आपल्या साथीदाराला म्हणाला.

ते जर लगेच निघून गेले असते तर जोनाथन काहीच करू शकला नसता, त्याच्या चेहऱ्याला जबरी मार लागला होता. नजरेसमोर अंधारी आली होती. फुटलेल्या ओठांतून रक्त वाहत होते. कुस्ती व मारामारीचा त्याला अनुभव होता, कधी चढाई करायची व

कधी माघार घ्यायची हे त्याला पक्के ठाऊक होते.

पण तेवढ्यात त्या क्रू कट केलेल्या माणसाने धडक देत, सीमॉनला खाली पाडले. ती किंचाळली. आणि त्या किंचाळीने, गेल्या चोवीस तासांत घडलेल्या साऱ्या भयानक घटनांच्या स्मृती त्याच्या मनात एकच कल्लोळ करत जाग्या झाल्या – त्या झंझावती वादळाची सुरुवात, एम्माचे खाली कोसळणे, हिमदरीत दिसलेले तिचे मृत शरीर – एकेक आठवण काळीज कुरतडत त्याला घायाळ करून गेली.

आपण नेमके काय करतोय हे कळायच्या आतच तो उठून त्या पिंगट केसाच्या माणसाच्या अंगावर धावूनही गेला होता. त्याच्या डोक्यात फक्त एकच गोष्ट घुमत होती. त्या माणसाने एम्माच्या वस्तू पळावल्याहेत आणि मला त्या परत मिळवायच्या आहेत.

जोरदार शिवी हासडत त्याने त्या चोराला पाठीमागून पकडले. त्याच्या मानेभोवती हातांचा विळखा घालत, त्याने त्याला जमिनीवर पाडण्याचा प्रयत्न केला. पण दुसऱ्याच क्षणी जोनाथनच्या बरगडीत, त्या माणसाच्या कोपराचा तडाखा बसलेला होता. पाठोपाठ जबड्यावर एक जोरदार ठोसा. मग दुसरा. जोनाथन हवेत हेलकावे खात मातीत कोसळला.

पिंगट केसांच्या माणसाने बॅग उचलली व गाडीत भिरकावून दिली. एखाद्या जेत्याच्या थाटात त्याने जोनाथनकडे उपहासाने पाहिले व त्याच्या तोंडावर लाथ मारण्यासाठी पाय उचलला.

पण यावेळेस मात्र जोनाथनचे पूर्ण लक्ष होते. एका हाताने त्याचा बूट पकडत त्याने त्याच्या पायाला मिठी मारली व सगळी ताकद पणाला लावून त्याचा पाय पिरगळला. झोकांड्या खात तो हल्लेखोर जमिनीवर पडतो ना पडतो तोच जोनाथन त्याच्या छाताडावर बसलेलाही होता. निर्दयपणे त्याने त्याच्या डोळ्यांवर व नाकावर जबरदस्त मुष्टीप्रहार केले. नाक रक्तबंबाळ होऊन गेले.

एव्हाना तो दुसरा मवाली गाडीपर्यंत पोहोचला होता. उंचीला तो पहिल्यापेक्षा अर्ध्या फुटाने बुटका होता. त्याचे खांदे निमुळते व मान बेढब होती. एखाद्या बैलाच्या वेगाने तो धावत आला. जोनाथनने त्यालाही आपल्या पायापाशी खेचले व एखाद्या मुष्टियोद्ध्याच्या पवित्र्यात तो त्याच्यासमोर उभा राहिला.

हल्लेखोर जवळ येताच जोनाथनने पाठोपाठ दोन ठोसे लगावण्याचा प्रयत्न केला; पण त्याने ते दोन्ही ठोसे सफाईदारपणे चुकवले. जोनाथनचे जॅकेट पकडून त्याने त्याला गाडीच्या बॉनेटवर भिरकावून दिले. एका हाताने त्याचा खांदा घट्ट पकडून दुसऱ्या हाताने जोनाथनचा गळा आवळून धरला. गळ्यावर बोटे अशी काही दाबली गेली होती की, घशातून आवाज फुटणे अशक्य होते.

मोकळ्या असलेल्या हाताने, जोनाथनने त्याला बदडण्याचा प्रयत्न केला, पण त्या ठोशात काहीच ताकद नव्हती. गाडीच्या अँटिनाला घट्ट पकडत त्याने हल्लेखोरापासून सुटका करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अँटिना तुटून त्याच्या हातात आली व ती त्याने हातामध्ये कशीबशी धरून ठेवली.

अचानक एक सावली पसरत गेली. सीमॉनने हात हवेत उंचावत त्या माणसाच्या अंगावर चार-पाच दगड फेकले. “थांब.” ती ओरडली. “सोडून दे त्याला.”

हल्लेखोराने आपला एक हात मोकळा करत सीमॉनच्या चेहऱ्यावर एक जोरदार फटका चढवला. सीमॉनचा तोल जाऊन रस्त्याच्या कडेवर दाणकन आपटली. दुसऱ्याच सेकंदाला तो हात जोनाथनच्या गळ्यावर पडलेला होता. पकड अधिक घट्ट झाली होती.

आपल्यापासून काही इंचांवर असलेल्या त्या गुंडाच्या चेहऱ्यापलीकडे जोनाथनला काहीही दिसत नव्हते. बीअर, कांदे आणि सिगारेटचा तीव्र दर्प त्याच्या नाकात घुसला. हल्लेखोराने त्याला बॉनेटवरून खाली खेचले व दुसऱ्या हाताने त्याचे नरडे आवळले. त्याची बोटे लोखंडासारखी कडक व टणक होती. गळ्यावर दाब इतका वाढत गेला की जोनाथनला श्वास घेणे मुश्किल होऊन गेले.

त्याला तीव्रपणे जाणवले की प्रश्न आता फक्त सुटका करून घेण्याचा राहिलेला नव्हता तर जीव वाचवण्यावाचून आता गत्यंतर उरले नव्हते. छाताडावर बसलेल्या माणसाला ठार मारणे हाच एक उपाय होता. असे करणे त्याच्या मनाला पटत नव्हते. त्याला एम्माची आठवण आली. बर्फावर पडलेली तिची विच्छिन्न आकृती त्याच्या नजरेसमोर आली. एकाकी. निर्वासित. आपण तिला सोडून निघून गेलो ही आपण केलेली घोडचूक होती. कुणीतरी तिला खाली घेऊन यायला हवे होते.

तो विचार त्याला चेतवून गेला.

त्याची बोटे अँटिनाभोवती आवळली गेली.

जोनाथन त्या माणसाचा चेहरा शोधू लागला– डोळे, नाक, ओठ– तो नेमकी जागा हेरत होता. सर्व शक्ती पणाला लावून तो उठून बसला. त्याच वेगात त्याने हातातला अँटिना अतिशय क्रूरपणे त्या गुंडाच्या चेहऱ्याजवळ अर्धवर्तुळाकार गरागरा फिरवला.

तत्काळ हातांची पकड ढिली झाली.

जोनाथनने बळ एकवटून अँटिना त्याच्या चेहऱ्यात खुपसला.

धक्का दिल्यासारखा तो मारेकरी गाडीतून खाली ढकलला गेला. डोळ्यावरचा गॉगल, एका कानावर लटकत राहिला. हवेत गोल गिरकी घेत तो जमिनीवर पडला. निम्मा अँटिना त्याच्या कानातून बाहेर आला होता. त्याने अँटिनाचा दांडा पुन्हा पुन्हा पकडण्याचा प्रयत्न केला, पण हाताची बोटे दांड्यापासून लांब राहात होती.

चकित झालेला जोनाथन गाडीवरून घसरत खाली आला; पण त्याने आपली नजर मात्र त्या हल्लेखोरावर सतत रोखलेली होती. त्याच्या आतला डॉक्टरी आवाज त्याला सांगत होता की, अँटिना कानाच्या पडद्यातून लहान मेंदूत घुसलाय. त्याने मज्जातंतूंचे जाळे तर विस्कटून टाकलेलेच असणार पण आणखी काय काय केले असेल, कोण जाणे!

हल्लेखोर आपल्या गुडघ्यांवर खाली कोसळला. त्याची हनुवटी छातीवर येऊन विसावली. चावी संपलेल्या एखाद्या खेळण्यासारखा तो डोळे टक्क उघडे ठेवून निश्चल झाला होता.

सीमॉन धडपडत उठून उभी राहिली. तिच्या चेहऱ्याची एक बाजू लालबुंद व सुजलेली दिसत होती. “मेलाय का तो?”

जोनाथनने आपला हात त्या मारेकऱ्याच्या मानेवर ठेवला व मानेनेच होकार दिला. तो शांतपणे उठला व रस्त्यावरचा मूठभर बर्फ उचलून तिच्या गालांवर दाबून धरला.

“पण तो आहे तरी कोण?” सीमॉनने विचारलं.

“काहीच कळत नाही. त्या दोघांपैकी एकालाही मी कधी आयुष्यात पाहिलेले नाही.” हल्लेखोराचे जॅकेट उघडे पडले होते. बेल्टवरचा चंदेरी बिल्ला चमकत होता व त्याच्याचशेजारी एक पिस्तूल लटकलेले होते. जोनाथन वाकून पाहू लागला. “ग्रॉबंडन पोलीस.” त्याच्या पोटात खड्डा पडला. त्याने त्या इसमाच्या जॅकेटमध्ये हात घातला. एक ओळखपत्र त्याच्या हातात आले. सार्जंट ऑस्कर स्टुडर. ओळखपत्रावरचा फोटो जुळणारा होता.

“पोलीस आहे.” जोनाथनने तिला ओळखपत्र दाखवले.

“चल.” ती कुजबुजली. “इथून लगेच निघू या.”

“मी नाही निघू शकत. मला पोलीस स्टेशनवर जाऊन कबुली द्यायला हवी.”

“अरे, हेच तर ‘पोलीस’ आहेत.”

जोनाथनला तिचे म्हणणे स्वीकारायला जड गेले. “पण त्यांचा नेमका काय उद्देश होता? त्यांनी एक शब्ददेखील उच्चारला नाही.”

“हे बघ मला त्यांच्याशी काही कर्तव्य नाही आणि त्या गोष्टीची मला पर्वाही नाही.” सीमॉन म्हणाली. “ज्या देशात मी वाढले, तिथे कुणीही पोलिसांवर विश्वास ठेवत नाही. त्यांनी माझ्या वडलांना पकडून नेलं होतं. नंतर माझ्या काकांनाही. कुठल्याही स्पष्टीकरणाशिवाय. आपला अधिकार ते कसा राबवतात हे मला चांगलंच ठाऊक आहे.”

“जरा भानावर ये. हे इजिप्त नाही.”

मूर्ख माणसाकडे पाहावे तसे तिने जोनाथनकडे पाहिले. “आणि मग? हा बिल्ला, हे ओळखपत्र बनावट असू शकत नाही?”

“ठाऊक नाही... म्हणजे त्यामुळे काहीच फरक पडत नाही. जे घडलंय ते योग्य नव्हतं. मी पळून जाऊ शकत नाही. हा इसम मेलेला आहे. मी त्याला ठार मारलंय. मी आता इथून असा–”

“मूर्ख अमेरिकन माणसा, जागेवरून हलशील तर याद राख.” दहा फुटांवरून त्या पिंगट केसाच्या आडदांड माणसाचा गडगडाट जोनाथनच्या कानावर पडला. स्वत:चा तोल सावरणे त्याला कठीण जात असले तरी त्याचा आवाज मात्र खणखणीत होता. त्याच्या एका हातात पिस्तूल होते व त्यांच्याच दिशेला ते रोखलेले होते.

‘अमेरिकन माणसा?’ त्याच्या त्या शब्दांवर विश्वास ठेवणे, जोनाथनला कठीण गेले. या इसमाला तर आपण पूर्वी कधीही पाहिलेले नाही. आपण कोण आहोत हे त्याला कसे समजले?

त्याने नेम धरला व पिस्तुलाचा चाप ओढला. पण काहीच घडले नाही. त्यानेही बावचळून आपल्या पिस्तुलाकडे पाहिले. पिस्तुलाची सुरक्षा-झडप मोकळी करण्यासाठी तो धडपडू लागला.

जोनाथनची नजर सीमॉनवरून आधी त्या रस्त्यावरच्या प्रेताकडे गेली व फिरून स्वत:शीच धडपडणाऱ्या त्या रक्तबंबाळ माणसावर गेली. त्याने झटकन जॅकेटच्या बाजूचे पिस्तूल उचलून त्या इसमावर रोखले व तो सीमॉनकडे पाहात ओरडला, “चटकन गाडीत जाऊन बस. चल. चल लवकर.”

ड्रायव्हरच्या बाजूचा दरवाजा उघडा होता. त्याने स्वत:ला गाडीत झोकून दिले व

क्षणार्धात इंजीन सुरू केले. सीमॉन कशीबशी गाडीत शिरली व तिने धाडकन गाडीचा दरवाजा बंद केला. तिचे डोळे विस्फारलेले होते.

एका मिलीसेकंदानंतर गाडीची मागची खिडकी थडथडली आणि त्यांच्या पाठीवर व मानेवर काचांचे तुकडे बरसले.

सीमॉन किंचाळली.

जोनाथनने रिव्हर्स गिअर टाकत आपला पाय अॅक्सिलरेटवर दाबून धरला. गाडी वेगाने जाऊन त्या पिस्तुलधारी इसमावर धडकली व तो हवेत फेकला जाऊन धपकन फुटपाथवर आदळला.

जोनाथनने ब्रेक लावून गाडी पहिल्या गिअरमध्ये आणली. क्लचवरचा पाय हळूहळू सैलावत त्याने गाडीला पुढची दिशा दिली व अॅक्सिलरेटर दाबत गाडीचा वेग वाढवला.

काही मिनिटांतच त्यांनी शहराची सीमा ओलांडलेली होती. एकशेऐंशी किलोमीटरच्या सुसाट वेगात गाडी पाहतापाहता हायवेवरून धावू लागली.

१४

बेल्लेव्यू प्लॅट्झमधील एका कॉफीहाऊसच्या आवारात, एका आडोशाला उभा राहून मार्क्स व्हॉन डॅनिकन हळू आवाजात बोलत होता. त्याच्या कानाला सेलफोन चिकटलेला होता. “हां... बोल फ्रँक”, आजूबाजूच्या गोंगाटामुळे त्याला आपला आवाज उंचावणे भाग पडले. “त्या पासपोर्टसंबंधात तुझ्या हाती काही विशेष माहिती आली?”

दुपारचा एक वाजला होता. सोसाट्याच्या बोचऱ्या वाऱ्यांनी उच्छाद मांडला होता. समोरच्या तलावात लाटा उसळत होत्या. लाटांमधले पाणी वाऱ्याबरोबर हवेत झेपावत होते आणि त्या पाण्याचे तुषार मार्क्सच्या गालांवर आपटत होते.

“चांगला प्रश्न विचारलास.” बेल्जियम फेडरल पोलीसप्रमुख फ्रँक व्हिन्सेंट म्हणाला. “पण मार्क्स, मला सांग की तू लॅमर्सबद्दल मला काही सांगायला विसरला होतास का? मला म्हणायचंय की त्याचे आमच्याशी जे संबंध आले होते, त्याबद्दल?”

“कसले संबंध?” व्हॉन डॅनिकनने विचारले.

“आमच्या देशाबरोबर आलेले.”

“नाही. लॅमर्सचं एक-दोन वर्षं ब्रुसेल्सला वास्तव्य होतं. पण ती १९८७ सालची गोष्ट आहे. वीस वर्षांपूर्वीची. तुला काय समजलंय?”

मार्क्सच्या उत्तराने व्हिन्सेंट थोडा निराश वाटला. “हे बघ, आम्ही त्या मूळ पासपोर्टधारकाचा म्हणजे ज्यूल्स गायचा शोध घेतला. त्याचा अर्ज शोधून त्याच्या घराचा पत्ता, जन्मदाखला आणि त्याची करपत्रकंही तपासली. तुझ्या माहितीसाठी सांगतो की, तो एक आंतरराष्ट्रीय पातळीवरचा बडा उद्योगपती आहे. जगभरात त्याच्या मालकीच्या एक डझन कंपन्या आहेत. त्याचा कापडाचा व्यवसाय आहे व त्या निमित्ताने त्याने खूप प्रवासही केलाय. दुबई. दिल्ली. हाँगकाँग.”

व्हॉन डॅनिकनला लॅमर्सच्या पासपोर्टवरचे अनेक देशांचे शिक्के आठवले. लॅमर्सही बराच प्रवास करत असे. “मग, तुझ्यामते तो खराखुरा माणूस आहे?”

“होय तर.” व्हिन्सेंट म्हणाला. “बायको, मुलं, अॅव्हेन्यू टर्व्हुरनमध्ये स्वतःचं घर. तो खरा आहे यात शंकाच नाही.”

“काय म्हणायचंय तुला? म्हणजे लॅमर्स हा दोन वेगवेगळ्या नावांनी वावरत होता. एक कुटुंब झुरिचमध्ये तर दुसरं ब्रुसेलला?”

“नाही. ती शक्यता आम्ही अमान्य केलीये. लॅमर्स व गाय ह्या दोन वेगवेगळ्या व्यक्ती आहेत.”

अगदी त्याच वेळी व्हॉन डॅनिकनच्या लक्षात आले की, व्हिन्सेंट बोलत असताना, त्याच्या पाठीमागून एका गाडीचा हॉर्न कर्कशपणे वाजतोय. “फ्रँक, तू आत्ता नेमका कुठे आहेस?”

“एका सार्वजनिक बूथवर.” व्हिन्सेंट म्हणाला. “ब्रुसेलमध्ये उरलेला हा एकमेव बूथ आहे.”

“सार्वजनिक बूथ? आणि तू तिथे काय करतोहेस?”

“एका सेकंदभरात सारं काही तुला समजून चुकेल.”

“फ्रँक, तू गायला शोधून काढलंस की नाही?”

“अर्थात. शोधून काढलं तर.” बोलता बोलता व्हिन्सेंट थांबला. त्याच्या आवाजाला नेहमीची धार नव्हती. “गायचा पासपोर्ट हा बदली केलेला पासपोर्ट होता. प्रवासामध्ये त्याचा पासपोर्ट हरवला गेला होता व त्याला तत्काळ नवा पासपोर्ट हवा होता. आमच्या अम्मानमधल्या कार्यालयात येऊन त्याने तशी मागणी केली होती.”

“अम्मान. तो तिथे कशासाठी आला होता?”

“एका कापड फॅक्टरीला भेट देण्यासाठी. ती भेट अगदी कायदेशीर होती. तिथल्या माझ्या स्टाफला मी आत्ताच फोन लावला होता व ही केस त्यांच्या आजही लक्षात होती. किंवा फार तर असं म्हणता येईल की, ही घटना ते कधीच विसरू शकणार नाहीत.”

पलीकडून येणाऱ्या वाहनांच्या आवाजामुळे त्याला व्हिन्सेंटचे बोलणे ऐकू येणे मुश्किल होऊ लागले. व्हॉन डॅनिकनने सेलफोन कानाला घट्ट चिकटवला. एखाद्या प्रवाशाला बदली पासपोर्ट बनवून देण्यात एवढे संस्मरणीय असे काय असू शकेल याचे त्याला नवल वाटत राहिले.

“ही घटना दोन वर्षांपूर्वीची आहे. ऑगस्टमधली.” व्हिन्सेंट ती हकिकत सांगू लागला. “आपल्या हॉटेल रूममधून आपलं पैशाचं पाकीट व पासपोर्ट चोरीला गेलाय असं सांगत गाय तिथे आला होता. स्वत:ची ओळख पटवण्यासाठी त्याने आपलं ड्रायव्हिंग लायसन्सही दाखवलं. तो खरंच एक सभ्य गृहस्थ वाटला. तत्काळ त्याला नवीन पासपोर्ट देण्यात आला. त्यानंतर साधारण दोन आठवड्यांनी, एका युरोपियन जोडप्याचे मृतदेह एका लहानशा कोरड्या कालव्यात सापडले. स्थानिक पोलिसांच्या म्हणण्यानुसार दरोडेखोरांनी त्यांना ठार मारलं असावं; पण वस्तुस्थिती समजणं अवघड होतं. त्यांचा मृत्यू होऊन बराच अवधी झाला होता. काही आठवडे, कदाचित काही महिने. वाळवंटाच्या त्या उष्णतेने त्या मृतदेहांची काय अवस्था झाली असेल याची तू कल्पना करू शकतोस. शिवाय तिथल्या महाभयंकर माशा त्या मृतदेहांभोवती घोंगावत होत्या. दरोडेखोरांनीच त्यांच्या सर्व चीजवस्तू लुटून नेलेल्या असल्यामुळे, त्यांचा ठावठिकाणा शोधणंही अशक्यच होतं. कालांतराने सापडलेल्या एका भाड्याच्या लाल गाडीमुळे पोलीस माग काढत एका छोट्याशा हॉटेलवर पोहोचले. हॉटेल मॅनेजरला ते मृतदेह दाखवण्यात आले. आपल्याच हॉटेलवर हे जोडपं उतरलं होतं असं त्याने पोलिसांना खात्रीपूर्वक सांगितलं. त्याने पुरुषाच्या अंगावरचा शर्ट ओळखला. मॅनेजरच्या मते, तो गाय होता.”

“पण हे कधीही सिद्ध न झालेलं...”

“सिद्ध झालं. त्याच्या कुटुंबीयांनी ऊँचाचणीची मागणी केली. त्या चाचणीला तीन महिने लागले. अखेर त्या मॅनेजरचं म्हणणं खरं ठरलं. तो इसम गायच होता.”

“म्हणजे तुला असं म्हणायचंय की बदली पासपोर्टची मागणी करणारा इसम हा लॅर्मस होता?”

“ते आता तूच मला सांग. लॅमर्सची उंची १.८ मीटर्स होती? वजन ८५ किलो होतं? त्याचे काळे केस हळूहळू पांढरे व्हायला लागले होते? डोळ्यांचा रंग निळा होता?”

व्हॉन डॅनिकनने लॅमर्सचा मृतदेह आठवण्याचा प्रयत्न केला. “हो, बरंच साम्य आहे.”

“मार्क्स, आता माझ्या मनात काय विचार चाललाय, माहितीये? त्या वाळवंटामध्ये हे जे सर्व भयानक कृत्य घडलं... तो एक पद्धतशीर व्यावसायिक कट होता.”

व्हॉन डॅनिकनला मात्र अजून एक गोष्ट सतावत होती. “पण हे सर्व दोन वर्षांपूर्वी घडलं होतं ना! याचा अर्थ तुम्ही लगेचच तो पासपोर्ट रद्दबातल ठरवलेला असणार.”

“अर्थातच. आम्ही तो पासपोर्ट तत्काळ रद्द करून टाकला होता.”

“मग त्यामध्ये तुला इतकं विशेष असं काय वाटतंय? हे सांगण्यासाठी तुला सार्वजनिक टेलिफोन बूथचा का वापर करावासा वाटला?”

“कारण त्यानंतर महिन्याभरात, कुणीतरी तो पासपोर्ट पुन्हा ‘वैध’ ठरवला होता.”

“कुणी?” व्हॉन डॅनिकनचा आवाज अचानक चढला होता.

मिनिटभर शांतता पसरली. दूरवरच्या त्या बुरसेल्समधील गजबजलेल्या बॉऊलव्हर्डच्या रस्त्यावरून एका ट्रकचा कर्कश हॉर्न केकाटत होता. “कुणीतरी एक उच्चपदस्थ. मार्क्स, कुणीतरी खूप खूप वरच्या पदावरचा माणूस.”

१५

“हलकट! साली कुत्र्याची अवलाद!” प्रत्येक शब्दागणिक सीमॉन नॉयरेट आपल्या हाताची मूठ डॅशबोर्डवर आपटत होती. “तो तुला ठार मारणार होता. का पण?”

“नाही ठाऊक मला.” जोनाथनने उत्तर दिले. पण त्याचा आवाज खोल गेला होता. गाडीतल्या ‘हिटर’मुळे हवा उबदार झाली असली तरी जोनाथन मात्र कुडकुडत होता. कानात घुसलेला अँटिना पकडण्याचा व्यर्थ प्रयत्न करणारी त्या पोलिसाची आकृती पुन्हा पुन्हा त्याच्या नजरेसमोर येत होती.

“पण तू ते ठाऊक करून घ्यायला हवंस.” सीमॉन ठामपणे म्हणाली.

“त्यांना आपल्याकडचं सामान हवं होतं, एवढाच अर्थ मी काढू शकतो. मी हल्ला चढवल्यावर तो इसम चवताळून उठला.”

“सामान? फक्त सामानच? त्यांना त्यापेक्षाही अधिक काहीतरी हवं असणार. नक्कीच–”

“माझ्याकडून काही वदवून घ्यायचंय का तुला?” सीमॉनचे बोलणे त्याला आवडले नव्हते. तो तिच्याकडे वळून पाहू लागला. “मी सांगितलं ना तुला की त्या माणसांना मी पूर्वी कधीही पाहिलं नव्हतं. तू जितकी घाबरली आहेस, तितकाच मीही घाबरलेलो आहे. उगाच वाद घालून काय उपयोग होणार आहे का? नेमकं काय करायला हवं, ते आपण आता ठरवायला हवंय.”

त्याच्या उद्वेगामुळे सीमॉन खजील झाली. “सॉरी, चुकलं माझं.” आपल्या सीटवर ती नीट सावरून बसली. “बरोबर आहे तुझं. आपण दोघंही घाबरलोत. माझा म्हणण्याचा उद्देश तसा नव्हता...”

“मलाही ते कळतंय. आपण काही वेळ इथे जरा शांत बसू या. आपण आता काय करायला हवं याचा जरा थंड डोक्याने विचार करू या.”

डोंगरावर उंच असलेल्या पाईन वृक्षांच्या गर्द झाडीत त्याने गाडी थांबवली होती. शहर आता दृष्टीआड गेले होते. ते जिथे उभे होते, त्यापासून खाली साधारण दोन मैल अंतरावरील स्टेशनचा परिसर दिव्यांच्या प्रकाशझोताने झगमगून गेला होता. खाली उभ्या असलेल्या गाड्या त्याने मोजल्या. दहा पोलीस जीप्स आणि दोन रुग्णवाहिका.

बंदुकीच्या गोळीमुळे गाडीच्या डॅशबोर्डला गोल भोक पडले होते. त्याने त्यात बोट घालून पाहिले. “त्या दोन माणसांपैकी... एक मरून पडलाय आणि दुसरा तर किमान जबर जखमी झालेला असणार. मी इथे नुसता बसून नाही राहू शकत. जे काय घडलं त्याची मला कबुली द्यायला हवी. हे सर्व काहीतरी चुकीमुळे, गैरसमजामुळे घडलं हे मला त्यांना समजावून सांगितलं पाहिजे. ते चुकीच्या माणसामागे...”

“जोन, गोळीमुळे पडलेलं हे भोक जरा नीट बघ. तुझ्या त्या पोलिसांनीच पाडलंय.

आणि यांच्याच ताब्यात तुला जायची इच्छा आहे?” सीमॉनने निराशपणे आपले दोन्ही हात वर उचलले.

“पण मग दुसरा पर्याय तरी काय आहे? एव्हाना ह्या परिसरातील प्रत्येक पोलिसाला आणि कदाचित संपूर्ण देशालाच आपलं वर्णन कळवलेलं असणार. BMW-5 च्या चंदेरी गाडीतून एक राखाडी केसांचा उंच अमेरिकन माणूस व त्याच्यासोबत काळ्या केसांची एक स्त्री फरार आहेत. तासाभरात त्यांना आपली नावंही माहीत झालेली असतील... किमान माझं तरी. आपल्याला शोधून काढणं, त्यांना फारसं जड जाणार नाही.”

“आणि मग तू काय सांगणार आहेस? हे सर्व मी केवळ स्वसंरक्षणासाठी केलं, असं तू सांगणार? तुझ्या एका शब्दावरदेखील ते विश्वास ठेवणार नाहीत.” सीमॉनचा हात बॅगेतून सिगारेट काढण्यासाठी चाचपडत होता. “जोन, याला आमच्या भाषेत ‘पौर्रीस’ म्हणतात. या शब्दाचा अर्थ ठाऊक आहे तुला? सडलेले. लाचार. हे... हे पोलीसवाले... त्यांच्यात चांगुलपणाचा लवलेशही नसतो.” ती संतापाने थरथरत होती. लायटर पकडण्यासाठी तिला आपले दोन्ही हात घट्ट धरावे लागले.

जोनाथनने खिशातून त्या इसमाचे ओळखपत्रे काढले. ऑस्कर स्टुडर, वॉचमाईस्टर, ग्राऊबंडन पोलीसस्टेशन असे त्यावर लिहिले होते. अचानक त्याच्या लक्षात आले की, ही गाडी तर एरवी दिसणाऱ्या पोलीसगाड्यांसारखी वाटत नाही. त्यात बिनतारी संदेशयंत्रणा नव्हती. आतमध्ये कॉम्प्युटर बसवलेला नव्हता. बंदुका ठेवण्यासाठी स्वतंत्र कप्पा नव्हता. गाडी कमालीची स्वच्छ होती. खालच्या कार्पेटवर धुळीचा एक कणदेखील दिसत नव्हता. कॉफीचे रिकामे कप नव्हते. गाडी दोन हजार किलोमीटर धावलेली होती. बाजूच्या कप्प्यात काही कागदपत्रे पडलेली होती. त्याने ती तपासली. ऑस्कर स्टुडरला ती गाडी भाड्याने देण्यात आली होती. आज सकाळी दहा वाजता गाडी ताब्यात मिळाली होती व चोवीस तासांनी ती परत करायची होती.

“पौर्रीस.” आता त्याला त्या शब्दाचा नेमका अर्थ समजला.

पोलिसांकडे जायचा विचार आता त्याच्या मनातून निघून गेला होता.

त्याने ते कागद जागेवर ठेवून दिले. “मी अमेरिकन आहे हे त्यांना ठाऊक होतं.” तो म्हणाला. “ते माझीच वाट पाहत होते.”

सीमॉनने त्याच्याकडे पाहात मान हलवली.

त्याने त्या चामड्याच्या बॅगकडे व चौकोनी खोक्याकडे पाहिले.

“उघड ते.” ती म्हणाली. “आत काय आहे, ते तरी आपण पाहू या.”

त्याने आधी तो खोका उघडायचे ठरवले. आपल्याकडील स्विस लष्करी चाकूने, त्याने खोक्याला बांधलेली सुतळी कापली. खोका सहज उघडला गेला व त्यात ठेवलेली एक काळी चकचकीत पेटी त्याला दिसली. तिच्या उजवीकडील वरच्या कोपऱ्यात, ती पेटी बनवणाऱ्या कंपनीचे नाव सोनेरी लेबलवर लिहिलेले होते.

“बॉगनर,” सीमॉन उद्गारली. “फारच किमती प्रेझेंट दिसतंय.”

“हो. वाटतंय तरी तसंच.” पेटीभोवती बांधलेली रिबिन कापताना जोनाथनच्या मनाचा गोंधळ उडाला होता.

आल्प्स पर्वत चढणाऱ्या अतिश्रीमंत लोकांसाठी खास बनवलेल्या उबदार व उच्च

प्रतीच्या कपड्यांना बॉगनर असे म्हटले जाई. गेल्या ऑक्टोबरमध्ये चॅमोनिक्सला जात असताना, तो आणि एम्मा सहज गंमत म्हणून एका दुकानात शिरले होते. जोनाथनला आठवले, त्या दिवशी लखलखीत ऊन पडले होते. हेमंत संपून शिशिर ऋतू सुरू होण्यादरम्यानचे ते दिवस होते. अशा दिवसात फार बोचरे वारे सुटलेले असते.

"तुला कुठला आवडला?" कपडे बघता बघता एम्माने त्याला हळूच विचारले होते.

"मी हा विकत घेतला असता." एका गळाबंद काळ्या स्वेटरकडे त्याने बोट दाखवले.

"चल. तो तुझा झाला असं समज."

"खरंच?" तोही तिच्याबरोबर कल्पनेत खेळू लागला.

"तुला तो छान दिसेल. आपण घेऊ या." काऊंटरपलीकडे उभ्या असलेल्या मुलीकडे पाहात ती म्हणाली.

"आपण घेऊ या?" जोनाथन जवळजवळ ओरडलाच.

त्याच्या खांद्यात खांदा अडकवत एम्माने मान डोलावली. "माझ्यापाशी गुप्तधन आहे." ती त्याच्या कानात कुजबुजली. कानाचा चावा घ्यायला ती विसरली नव्हती.

"अच्छा, म्हणजे मॅडमने एका पेटाऱ्यात फक्त तिचे एकटीचे पैसे लपवून ठेवलेले आहेत तर!"

एम्माने त्यावर काहीच प्रतिक्रिया दिली नव्हती. उलट तो जणू तिथे नाहीच आहे असे भासवत ती त्या मुलीला म्हणाली, "याहून मोठ्या साईजचा स्वेटर मागव आणि तो पॅक कर." आता तिच्या आवाजात मस्करी नव्हती किंवा अभिनयही नव्हता. आणि तसाच तो तिच्या नजरेतही नव्हता.

"एम्मा, बस्सं झालं हं आता." तो म्हणाला. "मस्करी खूप झाली. आता इथून बाहेर पडू या."

"नाही." ती हट्टाने म्हणाली. "तू ते कमावलंयस. मी देणं लागतेय."

"कशाबद्दल?"

"ते मी सांगणार नाही."

ती बोलत असतानाच, जोनाथनची नजर स्वेटरवरच्या लेबलकडे गेली. त्यावर लिहिलेला किमतीचा आकडा पाहून त्याला चक्कर यायचीच बाकी होती. त्याने एम्माला चक्क खेचत बाहेर आणले. त्याला वाटले की, एम्माच्या सणकी स्वभावाची चेष्टा करायला त्याला मस्त संधी मिळालीय. पण एम्माची थंड व तीक्ष्ण नजर पाहून तो चक्रावलाच. तू एक फार मोठी घोडचूक केलेली आहेस व त्याबद्दल बराच काळ तुला माझ्या अवकृपेला सामोरे जावे लागणार आहे असेच जणू तिची नजर त्याला सूचित करत होती.

पेटीचे झाकण उघडताना जोनाथनला तीच नजर आठवत होती. जाळीदार कागदात ते कपडे ठेवलेले होते. ते वेष्टन अर्धवट उघडत, त्याने ते कपडे पेटीतून वर उचलले. त्यांचा मुलायम स्पर्श तो पार विसरून गेला होता.

"किती सुंदर!" सीमॉनच्या तोंडून शब्द आले.

चॅमोनिक्समध्ये पाहिलेलाच तो स्वेटर होता. गळाबंद, काळ्या रंगाचा, अतिशय उत्तम बांधणीचा. रुबाबदार. परंतु प्रथमदर्शनी किरकोळ वाटावा. आणि हीच त्याची आवड

असायची. स्वेटरच्या कॉलरवरून त्याने हात फिरवला. काश्मिरी लोकर. जगात त्याहून काही मुलायम असूच शकत नाही. किंमत सोळाशे डॉलर्स. अर्ध्या महिन्याचा पगार.

"माझ्यापाशी गुप्तधन आहे."

बेल्लेव्हुच्या मॅनेजरला तिने सांगितलेली ती हीच वाढदिवसाची भेट असेल का?

जोनाथनने तो स्वेटर पेटीत ठेवून दिला. आजच्या घडीला डॉक्टर व श्रीमती रॅन्सम यांच्या बँक खात्यात शिल्लक असलेली रक्कम अंदाजे पंधरा हजार स्विस फ्रँक्स म्हणजे सुमारे बारा हजार डॉलर्स होती. हॉटेलचे बिल भरण्यापूर्वीची ही रक्कम होती.

पेटी बाजूला सारत त्याने ती चामडी बॅग आपल्या मांडीवर घेतली. त्या बॅगेच्या आत काय आहे हे आपण पाहणे चुकीचे आहे, असे उगाचंच त्याला वाटत होते. एम्माला आलेले पत्र उघडणेही त्याला असेच चुकीचे वाटले होते. 'जे बंद दाराला कान लावून आतले संभाषण चोरून ऐकतात त्याचे कधीच भले होत नाही.' लहानपणी त्याची आई हे वाक्य त्याला अनेकदा सांगत असे. पण जोनाथनसाठी आता कोणतीच गोष्ट भली किंवा बुरी उरलेली नव्हती. सत्य की फसवणूक एवढाच प्रश्न उरला होता. सामानाच्या पावत्यांकडे जसे त्याला दुर्लक्ष करणे अवघड गेले, तसेच आता ती बॅग न उघडणेही त्याला अशक्य होते. हे सर्व करत असताना, त्याच्या मनात सतत एक प्रतिमा येत होती. त्याने कधीकाळी पाहिलेल्या त्या गोंडस रशियन बाहुलीची. त्या बाहुलीला 'मात्र्योश्का' म्हणत. बाहुलीचे एकेक कवच सोलत गेले की आत अगदी हुबेहूब तशीच बाहुली असायची. आकाराने छोटी होत जाणारी, पण तिचीच जणू जुळी बहीण.

बॅगेच्या चेनला एक दणकट सोनेरी कुलूप लावलेले होतं... त्याने सीमॉनकडे पाहिले. तिने होकार दिला. त्याने बॅगेत चाकू खुपसला व बॅगेच्या लांबीइतका आडवा खेचत नेला.

त्याचे प्रथम लक्ष गेले ते एका छोट्या बटव्याकडे. त्यात मर्सिडिज बेन्झ गाडीच्या चाव्या ठेवलेल्या होत्या, शिवाय एका कागदावर हाताने काढलेला एक नकाशा होता. एका चौकोनात 'बन्हहॉफ' अशी अक्षरे होती व त्याच्याच शेजारी एक आयताकृती काढून त्यात 'पार्किंग' असे लिहिलेले होते. तिथेच × अशी खूण करून तिचे दुसरे टोक कागदाच्या खालच्या टोकाला जोडले होते. म्हणजे त्याचा अर्थ लँडक्वॉर्ट स्टेशन असा समजायचा का? स्वित्झर्लंडमध्ये बन्हहॉफ या नावाची अनेक ठिकाणे होती.

चाव्यांच्या खाली एक गडद जांभळा क्रेपचा ब्लेझर होता व त्याच्यासोबत स्लॅक्सची जोडी आणि पांढराशुभ्र ब्लाऊज होता. लंडन व फ्रँकफर्टमधील तरुण अधिकारी अशा प्रकारचे रुबाबदार कपडे घालत असत. असे कपडे घातलेल्या स्त्रियादेखील विमानतळावर सर्रास पाहायला मिळत. चार इंच टाचेचे बूट, कानाला सेलफोन चिकटलेला व खांद्यावर लटकणारी लॅपटॉपची बॅग. त्यानंतर त्याला दिसली एक नक्षीदार विणलेली काळ्या रंगाची ब्रेसिअर आणि पँटीज. त्याने त्या एका बोटाने उचलल्या. यामध्ये काही फारशी व्यावसायिकता दिसत नाही असा विचार त्याच्या मनात येऊन गेला. एका वेगळ्याच ग्राहकवर्गाला खास खूश करण्यासाठी त्या बनवल्या गेल्या असाव्यात.

त्यापुढे एक सौंदर्यप्रसाधनांनी खचाखच भरलेली एक लहानशी पेटी होती. जोनाथनने ती ही उघडून पाहिली. मस्कारा, लिपस्टिक, भुवया रंगवायच्या पेन्सिली, फाऊंडेशन, मॉईश्चरायझर आणि आश्चर्य म्हणजे पापण्यांचे नकली केससुद्धा होते. शिवाय पर्फ्युमही

होता. डायॉर कंपनीचा ‘टेंडर पॉयझन.’

“ही एम्माची पसंती?” त्याने स्वत:लाच विचारले. बर्बरीच्या ‘टेंडर टच’ शिवाय दुसरा कुठलाही पर्फ्युम तिला चालत नसे. कारण ते इंग्लंडमधल्या गुलाबाचे आणि इंग्लंडमध्ये बनवलेले पर्फ्युम असायचे.

मेकअपच्या सामानाखाली त्याला सोनेरी लडीने बांधलेली एक रेशमी पिशवी दिसली. त्याने ती मोठ्या कौशल्याने उघडली. त्यामध्ये जणू चाच्यांनी पळवलेली ‘लूट’ होती. सोन्याचे ब्रेसलेट, पाचूची अंगठी, हिऱ्याचे डूल आणि एक सोन्याचा नेकलेस. त्याला सोन्या-हिऱ्याची अजिबात पारख नव्हती, पण समोर दिसतेय ते शंभर नंबरी आहे हे मात्र त्याला कळत होते.

त्याने सहज वर पाहिले. सीमॉन त्याच्याचकडे टक लावून पाहत होती. जोनाथनला वाटले की, ही ती एम्मा नव्हेच. त्याच्या एम्माने असे रुबाबदार कपडे कधीच घातले नव्हते. त्यांच्या एम्माने अशी लालभडक लिपस्टिक कधीच लावली नव्हती. तिने कधी भुवया रंगवल्या नव्हत्या किंवा कानाच्या मागे टेंडर पॉयझन उडवले नव्हते. आणि इतक्या किमतीचे दागिने तर तिने कधीच विकत घेतले नव्हते. हे दुसऱ्याच कुणा स्त्रीचे सामान असावे असा त्याचा समज झाला.

सीमॉन मात्र ती अंगठी अगदी बारकाईने न्याहाळत होती. त्या अंगठीवर तीन अद्याक्षरे होती. ‘E.A.K. ’ तिने विचारले. “अशी कोण व्यक्ती तुला ठाऊक आहे?”

“तू का असं विचारतेयस?”

“जरा नीट निरखून बघ.” ती लग्नात भेट दिलेली अंगठी होती व त्यावर कोरलेले होते ‘श्रीमती E.A.K. 2-8-01 ’ “ही बॅग त्या व्यक्तीची आहे.” ती म्हणाली. “श्रीमती E.A.K. जिचं ८ फेब्रुवारी, २००१ रोजी लग्न झालं होतं. एम्माचीच एखादी मैत्रीण असणार.”

जोनाथनने ‘E ’ या अक्षरापासून सुरुवात होणाऱ्या मैत्रिणींची नावे आठवण्याचा प्रयत्न केला. एड, अर्नी आणि एटीएन्ने अशी तीन नावे त्याला आठवली; पण अंगठीचा आकार त्यांच्या बोटांशी जुळणारा नव्हता. स्त्रियांची यादी तशी फारशी नव्हती आणि अखेर ती एका नावापाशी येऊन थांबली : इव्हॅनोलिन लार्सन. ती एक डॉक्टर होती आणि त्याने तिच्याबरोबर चार वर्षं एकत्र काम केले होते.

त्या रेशमी पिशवीत आणखी एक शेवटची वस्तू होती. रोलेक्सचे एक हातात घालायचे सोनेरी रंगाचे घड्याळ होते. हिऱ्याचे. या सामानाचा आणि आपल्या बायकोचा काहीही संबंध नाही हे सिद्ध करणारा आणखी एक पुरावा जोनाथनला सापडला होता. रोलेक्स घड्याळासारखा दुसरा काही विरुद्ध पुरावा असूच शकत नव्हता. केवळ प्रतिष्ठेसाठी पाच हजार डॉलर्स किमतीच्या घड्याळ्याची खरेदी? एम्माची ही निवड असूच शकत नाही.

बॅगमध्ये आणखीही काही वस्तू होत्या. बुटांची जोडी. साडेपाच नंबरचे. हा एम्माचाच साईज होता. एम्माच्या पावलांचा आकार लहान होता व तिच्या पायात बसणारे बूट चटकन मिळत नसत. पायमोजे. मिंट गोळ्यांचा एक पुडा. कासवाच्या आकाराचा चश्मा ठेवलेली एक आकर्षक पेटी.

रिकाम्या झालेल्या बॅगेमधून जोनाथनने पुन्हा एकदा हात फिरवला. एका चोरकप्प्यात

त्याच्या हाताला एक टणक आयताकृती वस्तूचा स्पर्श झाला. बहुतेक पैशांचे पाकीट असावे. ती एक छोटीशी रेशमी मुलायम पर्स होती व त्यात एक मौल्यवान अंगठी होती. कुठलीही विवाहित स्त्री फक्त अंघोळ करताना किंवा पोहतानाच आपल्या हातातली अंगठी काढून ठेवत असते व खरे तर तसे करणेही उचित समजले जात नसे. आगगाडीतून पाठवलेल्या सामानात अशी अंगठी ठेवणे, हे मान्य करणेदेखील जोनाथनच्या कल्पनेत बसणारे नव्हते.

त्या पर्समध्ये आणखी एक युरोकार्ड, एक एटीएम कार्ड, अमेरिकन एक्सप्रेसचे कार्ड आणि वर्षभर झुगमधील सार्वजनिक प्रवास मोफत करण्याची मुभा असलेले रेनबो कार्डही होते.

"इव्हा क्रुगर," त्याने कार्डधारिकेचे नाव वाचले. E.A.K. "या स्त्रीचं नाव तू कधी ऐकलं होतंस?"

सीमॉनने नकारार्थी मान हलवली. "एम्माच्या कुणी परिचितांपैकी असेल. एकाच गोष्टीचं मात्र बरं वाटतंय की, तिच्या बॅगेची तू काय विल्हेवाट लावलीयेस हे सांगण्याची जबाबदारी आता तुझ्यावर आहे. माझ्यावर नाही."

जोनाथनने त्यावर काहीही प्रतिक्रिया दिली नाही किंवा त्यातील छुप्या विनोदावर तो हसलादेखील नाही. त्या पर्समध्ये असलेले पैसे तो मोजू लागला. एक हजार स्विस फ्रँक्स, पाचशे युरोज. शिवाय चार फ्रॅक्स व पन्नास रॅपनची नाणी.

अचानक तो मांडी घालून खाली बसला. या सर्व सामानात अजून एक गोष्ट असायला हवी असे त्याला तीव्रपणे वाटले. त्याने ती पर्स पुन्हा उघडली. उर जरी धडधडत असले तरी निष्णात शल्यचिकित्सक असल्याने त्याचे हात स्थिर होते. पर्समधल्या कार्डांमधून व नोटांमधून त्याचा हात पर्समधील प्रत्येक लहानमोठ्या कप्प्यांमधून फिरू लागला.

आणि त्याच्या हाती इव्हा क्रुगरचे ड्रायव्हिंग लायसन्स लागले. लायसन्सवर असलेला तिचा फोटो तो बारकाईने न्याहाळू लागला. ती दिसायला आकर्षक होती. तपकिरी मुलायम केस. कासवाच्या आकाराच्या चष्म्यात लपलेले घारे डोळे व रेखीव चेहरा.

"काय आहे ते?" सिमॉनने विचारले. "तुझा चेहरा तर भूत पाहिल्यासारखा भेदरलाय."

जोनाथनच्या तोंडून मात्र शब्दच फुटत नव्हते. त्याची छाती दडपून-गुदमरून गेली होती. त्याने तो फोटो पुन्हा पाहिला. त्या लावण्यवतीच्या चेहऱ्यावरील मस्करा व लिपस्टिकच्या आडून एम्माच त्याच्याकडे टक लावून पाहत होती.

जोनाथनने गाडीचा दरवाजा उघडला व तो बाहेर आला. चार पावले चालून तो एका झाडाला टेकून उभा राहिला. आणखी एक पाऊल टाकणेदेखील त्याला अशक्य झाले होते. जणू पायाखालची जमीन सरकत होती. कॅमेऱ्यासमोर उभ्या असलेल्या त्या तपकिरी केसांच्या व आकर्षक गॉगल्स घातलेल्या त्या कठोर स्त्रीचा चेहरा याच्या नजरेसमोरून हलत नव्हता.

इव्हा क्रुगर.

एम्माचे त्या कुणाबरोबरतरी अनैतिक संबंध असावेत ही कल्पनाच त्याच्या मनाला पीळ पाडणारी होती. जखमेवर मीठ चोळणारी. पण कदाचित हे... एक बनावट लायसन्स, एक बनावट नाव आणि एक वेगळेच समांतर अस्तित्व तर नसेल? ही कल्पना तर सहन

करण्यापलीकडची होती.

सीमॉनही गाडीतून उतरून त्याच्या जवळ आली. “हे बघ, मला खात्री आहे की, ह्या रहस्याचा नक्कीच उलगडा होईल. आपण जिनिव्हाला पोहोचेपर्यंत जरा धीर धर. तिथे जाऊन आपण शोध घेऊ.”

“त्या घड्याळाची किंमत दहा हजार फ्रँक्स आहे. शिवाय इतर दागदागिने? कपडे? सौंदर्यप्रसाधनं? मला सांग सीमॉन, या सगळ्याचं तू काय स्पष्टीकरण देऊ शकणार आहेस?”

ती गप्प बसली. विचारात पडली. “माझ्याकडे काहीच उत्तर नाही... म्हणजे मी कल्पनाच करू शकत नाही.”

त्याने आपल्या जॅकेटवर एक नजर टाकली आणि त्यावर साकळलेल्या रक्ताचा एक डाग त्याला दिसला. हे रक्त त्याचे स्वतःचे होते की त्या पोलिसाचे, हे त्याला कळत नव्हते. पण रक्ताचा तो डाग मात्र त्याला पाहवत नव्हता. जॅकेट काढून टाकत त्याने ते गाडीच्या टपावर फेकले. दुसऱ्याच क्षणी तो थंडीने गारठून गेला. “प्लीज मला तो स्वेटर दे.”

सीमॉनने जाऊन तो काश्मिरी स्वेटर आणला. “घे.”

स्वेटरच्या घडीमधून एक लिफाफा खाली बर्फावर पडला. सीमॉनकडे पाहत त्याने तो लिफाफा उचलला. लिफाफा कोरा पण जड होता. आत काय असणार याचा त्याला त्याच क्षणी अंदाज आला. त्याचा आकार व जडपणाच ते सूचित करत होता. त्याने तो उघडला. नोटा. नोटांची चवड. हजारो फ्रँक्स. नवीन कोऱ्या करकरीत नोटा.

“देवा!” सीमॉनचे डोळे विस्फारले गेले. “किती पैसे असतील?”

“शंभर!” त्याने ती चवड मोजली.

“शंभर...?”

“शंभर हजार स्विस फ्रँक्स.”

माझ्यापाशी गुप्तधन आहे, एम्मा म्हणाली होती.

“तू मस्करी करतोयस.” सीमॉनचा विश्वास बसत नव्हता. ती पिसाटल्यासारखी हसत सुटली होती.

“आता समजलं?” नोटांच्या चवडीकडे थक्क होऊन पाहत जोनाथन म्हणाला.

“काय समजलं?” सीमॉनने विचारलं.

“पोलिसांना ही बॅग का हवी होती?”

त्याने लिफाफ्यात नोटा सरकावल्या व लिफाफा खिशात ठेवला. ती बॅग लँडक्वॉर्टला येऊन पोहोचलीय हे पोलिसांना कसे समजले आणि एवढ्या प्रचंड रकमेची एम्मा कशी काय हक्कदार होऊ शकली हे आता शोधायची गरज होती.

हवेची एक मंद झुळूक आली आणि झाडांच्या फांद्यांवर साठलेला बर्फ जमिनीवर पडू लागला. जोनाथन गारठ्याने कुडकुडू लागला. त्याने हातातला स्वेटर अंगावर चढवला. स्वेटरच्या बाह्या त्याच्या मनगटापासून तीन इंचाने आखूड होत्या.

तो स्वेटर दुसऱ्याच कुणा माणसासाठी होता.

१६

“हे पाहिलंस तू?” कायदामंत्र्याच्या ऑफिसात शिरताच क्षणी अल्फॉन्स मार्टी, व्हॉन डॅनिकनवर गरजला. “एनझेडझेड. ट्रिब्यून डे जिन्हिवा. टेगेस अॅनझायगर,” कायदामंत्र्याने टेबलावर पडलेले फॅक्सचे कागद उचलले व त्यांचा बोळा करून आपल्या मुठीत ठेवला. “काल विमानतळावर काय घडले याचा जाब मला देशातल्या प्रत्येक वर्तमानपत्राचा वार्ताहर विचारतोय.”

व्हॉन डॅनिकनने अंगातून कोट काढला व घडी करत आपल्या हातावर ठेवून दिला. “मग तू त्यांना काय सांगितलंस?”

मार्टीने हातातला बोळा कचऱ्याच्या बादलीत फेकला. “प्रतिक्रिया नाही.” आणखी मी काय सांगू शकतो असे तुला वाटतं?”

बुंडेशॉसच्या चौथ्या मजल्यावरील ते ऑफिस म्हणजे जणू एक शाही महालच होता. छताला सोनेरी नक्षी केलेली होती आणि येशुख्रिस्त स्वर्गात आरोहण करतोय असा अगदी खराखुरा भास निर्माण करणारे तैलचित्र भिंतीवर लावलेले होते. लाकडी फरशीवर एक मखमली गालिचा पसरलेला होता आणि सेंट पीटर चर्चमधील भव्य टेबलाच्या आकाराचे एक डेस्क टेबल त्या खोलीत ठेवलेले होते. भिंतीवर लटकणाऱ्या आणखी एका क्रुसावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट होत होती की, मार्टी हा साध्या राहणीचा व सरळ वृत्तीचा माणूस होता.

“आणि मग?” मार्टीने सुरुवात केली. “विमानाने पुन्हा कधी उड्डाण केलं?”

“इंजीन दुरुस्त होताच ते निघून गेलं.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “आज सकाळी सातच्या सुमारास. आपण अथेन्सला चाललो आहोत असं वैमानिकाने सांगितलं.”

“अमेरिकनांनी पुन्हा एकदा हसत हसत आपल्या तोंडात शेण कोंबलं. युरोपमधून प्रवास करताना कुठल्याही परकीय देशातील वैमानिकाने आपलं विमान युरोपीय भूमीवर काही काळ तरी उतरवलंच पाहिजे या धोरणाचा मीच पुरस्कार केला होता. आज ना उद्या कुणीतरी ही बातमी पत्रकारांच्या कानावर घालणार व मग माझ्या चेहऱ्यावर अंड्यांचा पाऊस पडणार.” मार्टीला संताप अनावर झाला होता. “तो कैदी विमानातच होता, याबद्दल माझी पक्की खात्री आहे. ओनिक्स कधीही खोटं बोलत नाही.”

ऱ्होन दरीमधील एका पर्वतशिखरावर वसलेल्या ल्यूक या शहरामध्ये तीनशे अँटीनांचे जाळे उभारण्यात आले होते. पृथ्वीच्या कक्षेत फिरणाऱ्या तितक्याच उपग्रहांचा व या अँटिनांचा मेळ साधून, विविध देशात होणाऱ्या नागरी व लष्करी संदेशवहनांची अचूक माहिती ओनिक्स टिपत असे. अल्गोरिदम या अरेबिक संख्याशास्त्राचा वापर करून त्याबद्दलची माहिती कॉम्प्युटरद्वारे सांकेतिक भाषेत तो तत्काळ देत असे. “फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन’ ‘इंटलिजन्स.’ ‘प्रिझनर’ असे सांकेतिक शब्द वापरले जात. काल पहाटे ४ वाजून ५५ मिनिटांनी ओनिक्सकडून असाच एक फॅक्स आला होता.

“काल रात्री आलेला तो फॅक्स मी पुन्हा एकदा नजरेखालून घातला.” मार्टीने आपले बोलणे सुरू ठेवले. “नावं, प्रवासाचा तपशील, सर्व काही त्यात दिलेलं होतं.” टेबलावरची एक फाईल त्याने पुढे सरकवली. व्हॉन डॅनिकनने ती हातात घेतली व तो वाचू लागला. स्टॉकहोममधील सिरियन कार्यालयातून, दमास्कसमधील सिरियन कचेरीसाठी पाठवलेला तो एक फॅक्स होता. ‘प्रवाशाची माहिती : ७४७ मधून कैदी प्रवास करत आहे.’ वैमानिक व सहवैमानिकांच्या नावाबरोबर आणखी दोन परिचित नावांचा उल्लेख होता. फिलिप पालुंबो आणि वालिद गॅसन.

“मार्क्स, त्या फॅक्सवर नोंदवलेली वेळ बघ. विमानाचं उड्डाण केल्यानंतर फॅक्स पाठवलेला आहे. गॅसन विमानात होता. पालुंबोने त्याला विमानातून ढकललं या गोष्टीवर माझा काडीचाही विश्वास नाही. माझ्या मनात काय विचार येतोय सांगू? आपण विमानाची कसून तपासणी करणार ही खबर कुणीतरी पालुंबोला आधीच दिली होती. याचा तू ताबडतोब शोध घ्यायला सुरुवात करावीस असं माझं मत आहे.”

“या फॅक्सची प्रत आपल्यापैकी अगदी काही जणांकडेच आहे. तू, मी, आपल्या दोघांचे साहाय्यक आणि अर्थातच ल्यूकमधले काही तंत्रज्ञ. बरोबर?”

“अगदी बरोबर.”

“आपण तर विमानाची वरपासून खालपर्यंत पूर्ण तपासणी केली होती.” ती फाईल पुन्हा टेबलावर ठेवत व्हॉन डॅनिकन म्हणाला. “विमानात कैदी असल्याची एकही खूण सापडली नव्हती.”

“तुझ्या म्हणण्याप्रमाणे ‘तू’ स्वत: त्याला शोधलंस?” मार्टीने आपले टपोरे निळे डोळे त्याच्यावर रोखलेले होते.

“मला वाटतं, तू ही तिथे हजर होतास.”

“म्हणजे आपण, आपल्या दोघांना त्यातून वगळू शकतो.” आपले खराब झालेले दात दाखवत, मार्टी विचकटपणे हसला. “त्यामुळे तुझा तपास आणखीनच सोपा होणार आहे. रोज मला तपासातली प्रगती समजायला हवी.” समोरच्या फाईलवर दोन टिचक्या मारून हा विषय आता इथेच संपल्याचे त्याने सूचित केले. “आणखी काय? त्या दुसऱ्या गोष्टीचं काय झालं? तुझ्या सेक्रेटरीने मला सांगितलं की, काल रात्री तू एर्लनबॅचला झालेल्या एक खुनाची केस हाताळत होतास. पण त्यासाठी तुला वॉरंट का हवंय?”

व्हॉन डॅनिकन क्षणभर घुटमळला. मार्टी आपल्याला बसायला सांगेल अशी त्याची अपेक्षा होती. परंतु ती अपेक्षा पूर्ण होण्याची काही चिन्हे दिसेनात असे लक्षात आल्यावर त्याने बोलण्यास सुरुवात केली. लॅमर्सची त्याने थोडक्यात माहिती सांगितली. लष्करी शस्त्रास्त्र निर्मितीमध्ये त्याचा असलेला सहभाग आणि त्याने अलीकडे स्वत: शोधून काढलेल्या MAV या इटुकल्या विमानावर व्हॉन डॅनिकनने विशेष लक्ष वेधले. शेवटी तो म्हणाला की लॅमर्स हा एका फार मोठ्या यंत्रणेचा हस्तक असावा व त्याची संपूर्ण माहिती मिळवण्याकरता रोबोटिका एजी या इमारतीतील त्याच्या ऑफिसची झडती घेण्यासाठी आपल्याला वॉरंट हवे आहे.

“एवढंच?” मार्टी म्हणाला. “एका संशयास्पद छोट्याशा विमानाच्या आधारावर मी वॉरंट काढू म्हणतोस? शक्य नाही. वॉरंट म्हणजे कायदेशीर कागदपत्र. त्यासाठी मला ठोस कारण हवं.”

“लॅमर्समुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाला होता असं माझं स्पष्ट मत आहे.”

“कसा काय? शिवाय तो माणूस आता जिवंतही नाही. तू फक्त एका विमानाची प्रतिकृती पाहिलीस... प्रतिकृतीही नव्हे... फक्त पंखांची एक जोडी आणि त्या पंखात काय मोठं असं दडलंय, देव जाणे.”

मार्टीच्या शब्दागणिक मार्क्सच्या मनात संताप उफाळत होता. पण आपल्या मनावर कसाबसा ताबा ठेवत त्याने चेहरा हसरा ठेवण्याचा प्रयत्न केला. “सर, ते केवळ एक छोटंसं विमान नाही. तेच तर एक मोठं षडयंत्र आहे. लॅमर्सचा इतिहास सांगतो की, त्याने नेहमीच अपप्रवृत्तींशी हातमिळवणी केलेली आहे. आणि मग एक दिवस अचानक त्याने स्वत:चाच अध:पात ओढवून घेतला. माझी पक्की खात्री आहे की, एक महाघातक योजना आकार घेत होती. मला दोन शक्यता दिसतात. एक तर सारं काही लॅमर्सच्या मनासारखं घडत असावं किंवा त्याने आखलेल्या योजनेच्या पार ठिकऱ्या उडाल्या असाव्यात. पुरावा, त्याच्या ऑफिसातच सापडेल.”

“हा फक्त तुझा अंदाज!” मार्टी गुरगुरला.

“त्याच्या कार्यशाळेत एक उझी रायफल दडवलेली मिळाली. शिवाय अनेक पासपोर्ट्सचा एक गठ्ठा. मध्यपूर्व देशात स्थायिक असलेल्या किंवा त्या देशात सतत प्रवास करणाऱ्या माणसांचे चोरलेले पासपोर्ट्स. हा मात्र अंदाज नाही.”

मार्टीच्या ऑफिसमध्ये शिरण्यापूर्वी व्हॉन डॅनिकनला न्यूझिलंड राजदूतवासातून फोन आला होता. लॅमर्सच्या गाडीत सापडलेला पासपोर्ट हा इस्तंबूलच्या एका हॉस्पिटलमधून चोरण्यात आला होता. पासपोर्टच्या खऱ्या मालकाला अर्धांगवायूचा झटका आला होता व तो त्या हॉस्पिटलमध्ये तीन वर्षं उपचार घेत होता. आपला पासपोर्ट चोरीला गेलाय याचीही त्याला कल्पना नव्हती. लॅमर्सने हीच युक्ती जॉर्डनमध्येही वापरली होती. पासपोर्ट चोरीला गेलेल्या एका उद्योगपतीच्या नावाने तो तिथे वावरत असे.

“बेल्जियन आणि न्यूझीलंडचे पासपोर्ट चोरण्यामागे केवळ एकच उद्देश असू शकतो.” व्हॉन डॅनिकनने आपले बोलणे सुरू ठेवले. “मध्यपूर्वेतील देशात प्रवेश करणे व पुन्हा तिथून प्रस्थान ठेवणे. विशेषत: ज्या देशांमध्ये परदेश प्रवासावर कडक निर्बंध घातले गेले होते. येमेन. इराण. इराक. अशा तऱ्हेच्या योजनेसाठी केवळ आर्थिक पाठबळ असून चालत नाही, तर त्यासाठी काही मूलभूत सोयींची व चपळ हालचालींची फार गरज असते. लॅमर्स मनातून घाबरला होता. आपल्यावर हल्ला होणार याची त्याला कल्पना होती. योजनेलाही वेग आला होता.”

“अंदाज!” मार्टीने पुनरुच्चार केला. “एका अधिकृत स्विस कंपनीच्या कार्यालयाची झडती घेण्याकरता काढलेल्या वॉरंटसाठी केवळ ‘दहशत’ हा सबळ पुरावा होऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीचा नव्हे तर एका कंपनीचा आपण इथे विचार करतोय.”

व्हॉन डॅनिकनने मनातल्या मनात एक ते पाच आकडे मोजले. “सर, तुम्हाला एक गोष्ट सांगायची राहून गेली. त्या यंत्राचं म्हणजे MAV चं पूर्ण नाव आहे, ‘मायक्रो एअरबोर्न व्हेईकल.’ त्याला ‘मधमाशी’ असंही टोपणनाव आहे.”

“उत्तेजित द्रव्य प्यायलेला एक मच्छर असं जरी तू म्हणालास तरी त्यामुळे काहीच फरक पडत नाही.” मार्टीने त्याला फटकारले. “मी वॉरंटवर सही करणार नाही. तुला जर त्याच्या ऑफिसची झडती घेणं अत्यावश्यक वाटत असेल तर झुरिचच्या कोर्टात तशी

याचिका दाखल कर. तिथल्या न्यायाधीशाला जर तुझं म्हणणं पटलं तर तुला माझी गरजही पडणार नाही.”

“पण त्यामध्ये एक आठवडा निघून जाईल.”

“मग?”

“आणि जर स्विसच्या भूमीवर आजच संकटाचं सावट पसरलेलं असेल, तर?”

“देवा! आपण इतका आक्रस्ताळेपणा न केलेलाच बरा.”

मार्टीच्या टेबलामागे त्याचाच फोटो होता. ऑलिंपिकमधील त्या भीषण ठरलेल्या मॅरॅथॉन स्पर्धेतला. तो स्टेडियममध्ये प्रवेश करत असतानाचा. फोटोमध्येही त्याचे पाय लटपटताहेत असा भास होत होता. स्पर्धेच्या दरम्यान त्याने स्वत:च्याच अंगावर उलटी केलेली असणार. आयुष्यातल्या त्या अत्यंत अपमानास्पद क्षणांचाच वापर करून या माणसाने जनमानसात आपली प्रतिमा कशी काय उंचावली असेल यावर व्हॉन डॅनिकन विचार करत राहिला.

“जर तुला वाटत असेल की, अगदी नजीकच्या काळात देशाच्या सुरक्षेला धोका आहे, तर तू तसा भक्कम पुरावा सादर कर.” मार्टी म्हणाला. “लॅमर्स शस्त्रास्त्र निर्मितीत गुंतला होता असं तू म्हणालास. मग मला ती महाकाय तोफ दाखव. हे वॉरंट काही सहज एखाद्या फाईलमध्ये गडप होऊ शकणार नाही. जर मी माझा वापर एखाद्या रबरी स्टँपप्रमाणे करू दिला तर मीच माझी मान अडकवून घेतलेली असेल. तू तुझ्या मनाला वाटेल तशी अटकळ बांधू लागलास, म्हणून मी तुला काहीही करायला मोकाट सोडू शकत नाही.”

अटकळ? माझ्या तीस वर्षांच्या अनुभवाचा ह्याने हाच मतितार्थ काढावा? व्हॉन डॅनिकनने मार्टीला एकवार नीट न्याहाळले. बसलेली गालफडे, झिपऱ्या केसांना तांबूस रंगाचा डाय करून अद्ययावत करण्याचा केलेला केविलवाणा प्रयत्न. या माणसाच्या मनात आले तर तो डच लोकांनी बनवलेल्या टाकाऊ खारट बिस्किटांनाही कायदेशीर मान्यता देईल. CIA च्या जेटवर छापा घालण्यात आपण गबाळे ठरलो यामुळे तो अपमानित झाला होता व त्याचाच सूड उगवण्यासाठी तो हट्टीपणाने वागत होता.

“त्याच्या घरात सापडलेल्या उझीबद्दल तुला काय म्हणायचंय?” व्हॉन डॅनिकनने विचारले. “पासपोर्ट्सचा काय अर्थ होतो? या सगळ्याला काहीच महत्त्व नाही?”

“त्याचं उत्तर तूच आधी दिलंयस. तो घाबरला होता. तो पळून जाणार होता. पण म्हणून काही त्याच्या खाजगी गोष्टींवर घाला घालण्याचा हक्क आपल्याला पोहोचत नाही.”

“तो इसम आता मेलेला आहे. आता खाजगीपणाचा प्रश्नच कुठे येतो?”

“हे बघ, माझ्याबरोबर शब्दांचे खेळ खेळू नकोस. तुझ्या भाषाशास्त्रावर मी हुज्जत घालत बसणार नाही.”

“आपण एखादा भक्कम पुरावा गमावून तर बसणार नाही ना, इतकीच भीती वाटते.” व्हॉन डॅनिकन, जसा देशाच्या घटनेचा आदर राखायचा तसाच समोर असलेल्या माणसाचाही. आजपर्यंतच्या कारकिर्दीत त्याने कधी कायद्याचे उल्लंघन केले नव्हते की कायदा कधी हातातही घेतला नव्हता. पण गेल्या दशकामध्ये पोलिसी कामाचे स्वरूपच आमूलाग्र बदलून गेले होते. दहशतविरोधी पथकाचा प्रमुख म्हणून त्याचे हे कर्तव्य

बनले होते की, गुन्हा घडण्यापूर्वीच गुन्हेगारांचा बंदोबस्त करणे, गुन्हा घडून गेल्यानंतर त्यासंबंधीचे पुरावे गोळा करून, ते न्यायाधीशांसमोर सादर करण्याची पद्धत आता इतिहासजमा झाली होती. अशी सुस्त चैन आजच्या काळात परवडणारी नव्हती. स्वत:चा अनुभव व अंत:प्रेरणा हाच काय तो पुरावा समजायचा आणि निर्णय घ्यायचा.

तो खिडकीपाशी चालत गेला. खाली वाहणाऱ्या आरे नदीचे विस्तीर्ण पात्र त्याला दिसले. सूर्यास्त होत होता. उधळलेल्या नानाविध रंगांच्या मिश्रछटांमुळे आकाशाला जणू एखाद्या चित्रकाराच्या रंगफळीचे स्वरूप आले होते. थांबलेला हिमवर्षाव पुन्हा वेगाने सुरू झाला होता. तुफानी वाऱ्यांचे पिसाट भोवरे जमिनीवर थैमान घालत होते.

“जाऊ दे. तूही आता वॉरंटचा विचार डोक्यातून काढून टाक.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. मार्टी खुर्चीवरून उठला व वळून त्याने त्याचा हात हातात घेतला. “तू समजूतदारपणा दाखवलास, याचं मला खरंच खूप बरं वाटलं.”

व्हॉन डॅनिकनही वळला व दरवाजाच्या दिशेने जाऊ लागला. “मी निघतो.”

“एक मिनिट...”

“बोल.”

“त्या छोटया विमानाबद्दल तू काय करायचं ठरवलंयस? MAV ?” आपल्याला जणू आता त्यात काहीच रस उरलेला नाही असे दर्शवत, व्हॉन डॅनिकनने फक्त त्याचे खांदे उडवले. “मी काहीच ठरवलेलं नाही.” तो म्हणाला.

अर्थात ती शुद्ध थाप होती.

१७

लँडक्वॉर्ट स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारावर जोनाथनने आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केले. स्टेशनसमोरच्या रस्त्यांवर गाड्यांसाठी वाहनतळाची व्यवस्था केलेली होती. तिसऱ्या रांगेच्या मध्यभागी ती मर्सिडिज बेन्झ गाडी दिमाखात उभी होती. इव्हा क्रूगरच्या बॅगेतील नकाशात खूण केलेल्या अगदी नेमक्या जागी. स्टेशनच्या प्रवेशद्वारावर व त्या मर्सिडिज गाडीवर पूर्ण लक्ष ठेवण्यासाठी त्याने रस्त्याच्या पन्नास मीटरवर असलेल्या एका रेस्टॉरंटच्या बाहेरची जागा निवडली होती. त्या आधी दीड तास, त्याने स्टेशनभोवती अनेक चकरा मारल्या होत्या. चूर व झुरिचवरून अर्ध्या-अर्ध्या तासाच्या अंतराने आगगाड्या येत होत्या. त्या आधी व त्यानंतर पाच-दहा मिनिटे, रस्ता माणसांच्या गर्दीने भरून जायचा. वाहनतळावर काही नवीन गाड्या दाखल व्हायच्या तर आधी उभ्या असलेल्या काही गाड्या निघून जायच्या आणि त्यानंतर पुढील गाडी येईपर्यंत सर्वत्र शुकशुकाट व्हायचा. पण त्या दरम्यानच्या काळात, त्याला एकदाही एखादा पोलीस दिसला नाही. तरीपण वाहनतळावर कुणीतरी पाहारा ठेवून राहिलेला असेल ही शक्यता नाकारता येत नव्हती. तसे जरी असले तरी आता त्याला सीमॉनचे म्हणणे पूर्ण पटलेले होते. एम्माचे सामान पळवायला आलेले इसम हे पोलीस नसून गुंड होते.

सहा वाजायला पाच मिनिटे शिल्लक होती. संध्याकाळची वाहतूक व वर्दळ ऐन भरात होती. एकेका रांगेतून पुढे सरकणाऱ्या गाड्यांच्या लखलखीत दिव्यांची जणू कवायत चालली होती. जमिनीवर दोन-चारदा बूट आपटून त्याने आपले स्नायू मोकळे करून घेतले. सीमॉनच्या विरोधाला न जुमानता, त्याने तिला शहराच्या वेशीवरच गाडीतून उतरवले होते. काही गोष्टी एकत्र करायच्या असतात व काही गोष्टी मात्र एकट्यानेच करायच्या असतात याचे त्याला पक्के भान होते. आता तो एकटाच असायला हवा होता.

जॅकेट चाचपडत असताना, त्याची नजर मात्र मर्सिडिजवर एकटक रोखलेली होती.

पत्र उचल.

पावत्या दाखव.

बॅगा ताब्यात घे.

गाडी कुठे पार्क केली आहे ते कळण्यासाठी नकाशाचा आधार घे.

कपडे बदल. केस मागे वळव. लग्नाची अंगठी विसरू नकोस.

आयुष्य बदलून टाक.

शंभर हजार फ्रँकच्या पाकिटासकट स्वेटर देऊन टाक.

पण कुठे? केव्हा? कुणाला? आणि सर्वांत वेड लावणारा प्रश्न म्हणजे का?

एम्माची छबी डोळ्यासमोर आणत, त्याने गाडीची चावी घट्ट पकडली.

प्रश्न : तुझी बायको ही, कायम तुझीच बायको होती?
आणि जेव्हा ती तुझी बायको नव्हती, तेव्हा ती नक्की कोण होती?

डॉक्टर जोनाथन रॅन्सम, बाऊल्डर येथील कोलोरॅडो विद्यापीठाच्या साऊथवेस्टर्न मेडिकल कॉलेजचा पदवीधर, न्यूयॉर्क मेमोरियल स्लोन-केट्टरींग कॅन्सर सेंटरच्या शल्यचिकित्सक विभागाचा प्रमुख, ऑक्सफर्ड रॅडक्लिफ हॉस्पिटलची डेवेस फेलोशिप विजेता व पुनर्रचनात्मक शस्त्राक्रियेतील तज्ज्ञ-लिबेरियाच्या मोन्रोव्हिया-रॉबर्ट्स विमानतळावर, नुकताच विमानातून खाली उतरलाय व तिथेच काही क्षण रेंगाळत उभा राहिलाय. विमानातून उतरलेला शेवटचा प्रवासीही त्याच्या समोरून निघून जातो. सकाळचे आठ वाजलेत. तरीही भडक केशरी आकाशात सूर्य प्रखर तळपू लागलाय. अजून दिवसाची सुरुवातही होत नाही तोच हवेतील उषमा व दमटपणा चांगलाच जाणवू लागलाय. जेट इंधनाचा गंध समुद्राच्या खारटपणात मिसळून गेलाय आणि धावपट्टीच्या दुसऱ्या टोकाजवळ बांधलेल्या उंच व बंदिस्त स्टेडियममध्ये जमलेल्या काळ्या कातडीच्या फुटबॉल शौकिनांच्या उत्साहाला उधाण आलेय. ते अक्षरशः चीत्कारत आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन देताहेत. मशिनगनमधून केलेल्या गोळीबाराचा आवाज त्याच्या कानावर पडतो.

शहराबाहेरील काही ठरावीक वस्त्यांमध्येच फक्त असा गोळीबार होत असतो. त्यात चिंता करण्याचे काहीच् कारण नाही असे आधीच् त्याला सांगण्यात आलेले असते.

तो कस्टम्सच्या इमारतीकडे चालत जात असतानाच, कुंपणापलीकडे दोन प्रेते पडलेली त्याला दिसतात. ज्या तऱ्हेने ती दोघे एकमेकांना बिलगलेली होती त्यावरून तरी त्या मायलेकी असाव्यात असे त्याला वाटून गेले. पण प्रेतांवर घोंगावणाऱ्या माशांमुळे त्यांचे चेहरे झाकून गेलेले होते.

“तूच रॅन्सम का?”

एक जुनाट, धुळीने माखलेली जीप त्याच्याजवळ येऊन उभी राहिलेली असते. उन्हाने तांबूसलेली व आपल्या तपकिरी केसांचा पोनीटेल बांधलेली एक आकर्षक तरुणी स्टिअरिंग व्हीलमागे बसलेली असते. “तू?” बाजूने जाणाऱ्या वाहनांचा आवाज भेदत ती मोठ्याने विचारते. “तूच डॉक्टर रॅन्सम ना? आत ये. या सर्कशीपासून मी तुला वाचवते.”

जोनाथन आपली बॅग जीपच्या मागच्या सीटवर भिरकावतो. “मला वाटलं होतं की गोळीबार शहराबाहेर होत असतो.”

“याला गोळीबार म्हणत नाही. ‘संवाद’ म्हणतात. तू पेपर वाचत नाहीस का?” ती हात पुढे करते. “एम्मा रोझ. तुला पाहून खूश झाले.”

“हो. मी सुद्धा.” जोनाथन म्हणतो.

आजपर्यंत त्याने कधीही न पाहिलेल्या अशा एका गलिच्छ वस्तीतून जीप जात असते. गरिबीची भलीमोठी भिंत. पाच मैल लांब व दहा मजले उंच असलेली. शहराची सीमा अचानक पुसट होते. ग्रामीण परिसर सुरू होतो. शहरात जितका गोंगाट आणि गलिच्छपणा त्या उलट इथे कमालीची शांतता.

“पहिलीच नेमणूक असेल ना?” तिने विचारले. “ते इथे नेहमीच नवशिक्यांना पाठवतात.”

“का पण?”

त्यावर एम्माने काहीच उत्तर दिले नाही. फक्त मोनालिसा-स्मित केले. एका पाणथळीच्या टोकावर बांधलेल्या प्राचीन धर्मशाळेचं, हॉस्पिटलमध्ये रुपांतर करण्यात आले होते. बाहेरच्या गवतावर डझनावारी स्त्रिया व मुलांना अस्ताव्यस्त निजवण्यात आले होते व इमारत लाल चिखलामध्ये बुडून गेली होती, त्यातली काही जण किरकोळ तर काही मात्र जबर जखमी झालेले दिसत होते. वातावरणात एक विचित्र शांतता पसरलेली होती.

“ठरावीक काळाच्या अंतराने आम्हाला असा एखादा जखमी झालेला गट सापडतोच.” इमारतीच्या मागच्या बाजूला जीप् थांबवत एम्मा म्हणाली. “बॉम्बगोळ्यांच्या हल्ल्यात बिचारे जखमी झालेले असतात. सुदैवाने त्यांना झालेल्या जखमा फारशा गंभीर नसतात.”

जोनाथनचे लक्ष एका मुलापाशी गेले. त्याच्या पोटरीत फुटलेल्या बॉम्बचे लोखंडी तुकडे घुसलेले होते. “जखमा फारशा गंभीर नसतात याचा अर्थ, रक्तत्रावाने कुणाचा मृत्यू ओढवत नाही.”

दाढी राखलेल्या व तांबड्याभडक डोळ्यांच्या एका बुटक्या माणसाने जोनाथनचे दिलखुलास स्वागत केले. तो लियॉन येथील डॉक्टर डेलाक्रॉईक्स होता. “नशीब, विमान अगदी वेळेवर पोहोचलं.” रक्ताचे डाग पडलेल्या टी-शर्टला हात पुसत तो म्हणाला.

“दोन नंबरच्या खोलीत असलेल्या मुलीवर तू उपचार करायचे आहेस. तिच्या उजव्या हाताचे तुकडे-तुकडे पडलेत.”

“तुकडे-तुकडे?”

“म्हणजे बघ...” जणूकाही एखाद्या कत्तलखान्यातले यंत्र खाली येत आहे असा त्याने हातांचा आविर्भाव केला. “मोठा सुरा वापरला गेला.”

“मला हात घासून स्वच्छ करायचे आहेत.”

“घासून?” डॉक्टर डेलाक्रॉईक्सने वैतागून एम्माकडे एक नजर टाकली. “बाथरूममध्ये तू हात धुवू शकतोस. तिथे काही हातमोजे तुला दिसतील. ते जपून वापर. एक जोडी आम्ही किमान तीन वेळा तरी वापरतो.”

आता जोनाथन हॉस्पिटलबाहेरील एका गवताळ कुरणात उभा असतो. गवतावर अल्कलीमिश्रीत धूळ पसरलेली असते. या जागेचा वापर कधी स्वागत कक्षासाठी तर कधी आरामगृह म्हणून केला जातो. त्या मध्यरात्री, उष्णतेमुळे हवा दमट झालेली असते. माकडांचे चीत्कार व अधूनमधून बंदुकीच्या फैरींचे आवाज कानावर पडत असतात.

“कॉफी?” एम्मा त्याच्या हातात कप देते. आता ती आधीपेक्षा खूपच वेगळी दिसत असते. लहानशी, सडपातळ. आधीसारखी व्रात्य किंवा थट्टेखोर वाटत नाही.

“आपल्याकडे *O +ve* रक्ताचा साठाच नाही.” जोनाथन म्हणतो. “त्यामुळे दोन जण दगावले.”

“पण तू काही जणांना वाचवलंसही.”

“हो. पण...” त्याने निराशेने मान हलवली. “नेहमी हीच परिस्थिती असते?”

“नेहमी नाही पण अधूनमधून.”

आता उत्तर न देण्याची जोनाथनची पाळी होती.

एम्मा त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहते. “जुनी, अनुभवी माणसं इकडे फिरकत नाहीत.” काही क्षणानंतर ती बोलते.

“काय म्हणायचंय तुला?”

“ते इथे फक्त नवशिक्यांनाच का पाठवतात हे जाणून घ्यायचं होतं ना तुला? मग ऐक. जसजसे दिवस जातात, तसतशी इथली परिस्थिती अधिकाधिक कठीण होत जाते. इथली भयाणता अंगावर येते. तुम्ही मनाने खचून जाता. वयस्कर माणसे हे सारे सहन करू शकत नाही. ते म्हणतात की रोज रोज इतकी माणसे मरताना पाहून आपणही मरून गेलो आहोत असंच वाटतं.”

“आलं माझ्या लक्षात.”

“मी तुझं चुकीचं मत तर नाही ना बनवलं?” एम्माने विचारले. तिच्या आवाजात जिव्हाळा होता. सहकार्याची हमी होती. “तू ऑक्सफर्डला होतास असं
समजलं. मी सेंट हिल्डाला होते. तौलनिक राजकीय प्रवाह हा माझा विषय होता.”

“म्हणजे? तू डॉक्टर नाहीयेस?”

“नाही रे बाबा. मी नर्सिंगचं प्रशिक्षण घेतलंय, पण व्यवस्थापन हे माझं खरं काम आहे. पुरवठा सेवा वगैरे काम. यापुढे जेव्हा आपल्याकडे $O +ve$ चा भरपूर साठा असेल तेव्हा तू माझे आभार मानायला हवेस.”

“मला तसं नव्हतं म्हणायचं–” जोनाथन लगेच माफी मागू लागला.

“ते मला समजलं रे.”

“तुला पहिल्यांदा पाहिलं तेव्हा तू इंग्लिश असशील असं वाटलंच नव्हतं. तुझी बोलण्याची ती ढब. मला वाटलं तू स्कॉटिश असशील किंवा मध्य युरोपियन देशातली. प्रागसारख्या एखाद्या देशातली.”

“मी? मी कॉर्नवॉलची आहे. आमचं बोलणं जरा मजेशीर असतं. माझं गाव अगदी सीमारेषेवर आहे. पेन्झान्स. ऐकलंयस नाव?”

“पेन्झान्स? ऐकलंय खरं.” त्याने एक दीर्घ श्वास घेतला. आपण आता मूर्ख ठरणार आहोत हे लक्षात येऊनसुद्धा त्याने मोठ्ठा श्वास घेत छाती भरून घेतली आणि चार गद्यओळी तो चक्क गाऊ लागला.

मला पूर्ण परिचित आहे, गणितातील प्रत्येक गजब गोष्ट

समजतात सर्व समीकरणे मला, साधी किंवा अतिशय क्लिष्ट

बीजगणिताचे नवनवीन सिद्धान्त, माझ्या मनात करतात दंगा

काटकोन त्रिकोणाच्या कर्णाचा वर्ग शोधून, दाखवतो मी माझा इंगा.

ती काहीच बोलत नाही हे लक्षात आल्यावर तो झटकन सांगून मोकळा होतो की, “गिल्बर्ट आणि सुलीव्हन हे पेन्झान्सचे लुटारू होते ना? आता या आधुनिक मेजर जनरल्सची नावं ठाऊक नाहीत असं कृपा करून सांगू नकोस.”

अचानक एम्मा पोट धरधरून हसू लागते. “अर्थात, मला माहीत आहे. पण ह्या अफ्रिकन जंगलात, त्यांचं कधी कुणी नाव उच्चारेल असं वाटलं नव्हतं. तू तर त्यांचा मोठा चाहता

निघालास!”

“मी नाही. माझे वडील. ते राजकीय मुत्सद्दी होते. त्यांच्याबरोबर आम्ही सर्व देशांमध्ये मुक्काम केलाय. स्वित्झर्लंड, इटली, स्पेन. ज्या ज्या ठिकाणी आम्ही गेलो, तिथल्या प्रत्येक संगीत नाटकांमध्ये त्यांनी भाग घेतला होता. मी म्हटलेलं गाणं, ते इंग्लिश, जर्मन व फ्रेंच भाषेत म्हणून दाखवायचे.”

अचानक तालवाद्यांनी धरलेला लयबद्ध ठेका, त्यांच्या कानावर पडू लागला व सारे वातावरण मुग्ध होऊन गेले. आवाजाच्या दिशेला, एम्माने मान तिरकी
केली. “मुथैगा क्लब. नृत्य करण्यासाठी मस्त जागा आहे. पण मला वाटतं तिथे मिल्काडो नृत्य मात्र केलं जात नाही.”

“पण मुथैगा क्लब तर नैरोबीत आहे असं मी ऐकलं होतं.”

“मी सुद्धा.” आपल्या टाचा उंचावत ती कुजबुजली. “मी ते नाव चोरलंय हे कुणाला सांगू नकोस. चल, येतोस?”

“नृत्य करायला?” त्याने मानेनेच नकार दिला. “मी खूप लांबचा प्रवास करून आलोय. थकलोय आणि या गरमीने उकडून गेलोय.”

“म्हणून काय झालं?” एम्मा त्याचा हात पकडते व त्या सुरांच्या दिशेने त्याला खेचून नेऊ लागते.

जोनाथन प्रतिकार करतो. “थँक्स. पण मला खरंच विश्रांतीची फार गरज आहे.”

“हा तुझ्यातला बुद्धा बोलतोय.”

“माझ्यातला बुद्धा?”

“म्हणजे तुझ्यातला तो अरसिक शल्यचिकित्सक. कामाला अखंड वाहून घेतलेला. नवनवीन पुरस्कार आणि फेलोशिप्स पटकावणारा.” ती त्याचा हात आणखीनच जोरात खेचते. “माझ्याकडे असा विचित्र नजरेने पाहू नकोस. सांगितलं ना, मी इथलं सर्व व्यवस्थापन पाहाते. मी तुझी सर्व माहिती वाचलीय. थोडा सल्ला देऊ तुला? म्हणजे तुझ्यातल्या त्या राब-राब राबणाऱ्या बुढ्ढ्याला? त्याला तू लवकरात लवकर विसरून जा. तो तर इथे एक आठवडाभरही टिकणार नाही.” एम्माच्या आवाजाला धार चढली होती. ती गंभीर होती की गंडवत होती याचा थांग जोनाथनला लागत नव्हता. “हा आफ्रिका आहे. इथे प्रत्येकाला कात टाकावी लागते.”

काही वेळ लोटलाय. मनसोक्त नृत्य करून झालेय. स्थानिक मद्य पोटात रिचवले गेलेय. संगीताने कान तृप्त झालेत. ती त्याला क्लबमधून बाहेर घेऊन येते. क्लबमधल्या गर्दीपासून व ड्रम्सच्या गदारोळापासून दूर. गर्द झाडीचा रस्ता पकडते. शांत. सुनसान. मिट्ट काळोख आणि फक्त पावलांचा आवाज. बराच वेळ चालल्यावर ते मोकळ्या माळरानापाशी येतात. वर एक माकड चींचीं आवाज करत या झाडावरून त्या झाडावर उड्या मारत नाहीसे होते. ती त्याच्यापाशी वळते. त्याच्या डोळ्यात रोखून पाहते. वाऱ्याने केस विस्कटून चेहरा झाकू लागतात.

“मी तुझीच वाट पाहत होते.” ती त्याचा बेल्ट घट्ट पकडते व त्याला स्वतःकडे खेचते.

जोनाथनही तिचीच वाट पाहत होता. काही आठवडे किंवा काही महिने. नव्हे, खूप आधीपासून. भेट होऊन फक्त एक दिवस झालाय. पण तिने त्याचा संपूर्ण ताबा घेतलाय. त्याने तिच्या ओठांवर ओठ टेकवलेत आणि तीही बेभान होऊन चुंबनांचा वर्षाव करतेय. त्याचा हात तिच्या शर्टातून आत सरकतो. हाताला घट्ट ओलसर कातडीचा स्पर्श होतो. हात आणखी वर सरकतो. अर्धचंद्राकृती स्तन हातात आलेला असतो. ती त्याचा ओठ चावते आणि आपले ओठ घट्ट रुतवते. “मी एक छान साधी मुलगी आहे जोनाथन. तुलाही मी हवीय ना? ये. खुशाल माझ्या आत, अंतरंगात प्रवेश कर.”

ती त्याचा शर्ट काढत, त्याला उघडा करते. तिच्या हाताचा तळवा त्याच्या छातीवरून फिरु लागतो व हळूहळू खाली उतरू लागतो. पाऊलभर मागे सरकत ती आपला टी-शर्ट डोक्यावर खेचते आणि जीन्स खाली ढकलत, लाथेने उडवून देते. त्याची अधाशी भूक तिला समजलेली असते.

“कसं कळलं तुला?” तो विचारतो. ती त्याच्या अंगाभोवती विळखा घालते.

“तुझ्याचसारखं.”

तो गवतात पडून राहतो. ती त्याच्या अंगावर ओणवी होते. तिच्या करपलेल्या तांबूस केसांवर चंद्र फेर धरून नाचू लागतो. झाडे झुलायला लागतात. भेदून जाणारा एक चीत्कार, अवकाशाची पोकळी चिरत जातो.

चूरवरून आलेली गाडी स्टेशनात शिरते आणि मिनिटभराच्या अंतराने दुसरी एक गाडी झुरिचवरून येते. प्रवाशांच्या गर्दीने स्टेशन गजबजून जाते. संधी साधायची हीच वेळ आहे. जोनाथनची पावले रस्त्याच्या दिशेने झपाझप पडू लागतात. पार्किंगच्या बाजूला उभारलेल्या भिंतीजवळून चालत तो मधल्या रांगेत शिरतो. जर त्याच्यावर कुणी पहारा ठेवून बसलेला असेल तर त्याला जोनाथनचा वेध घेण्यासाठी आता काहीच कष्ट करावे लागले नसते. अंगात जांभळ्या रंगाचे नवीन जाकीट घातलेला एक सव्वासहा फुटी कॉकेशियन वंशाचा पुरुष, आपली स्की कॅप डोक्यावर चढवून भर चौकात बिनधास्त

उभा होता. वयाच्या तेविसाव्या वर्षापासूनच अकाली पिकायला लागलेले केस लपवण्यासाठी जोनाथन कॅप चढवल्याशिवाय कधीच बाहेर पडत नसे.

घाई करू नकोस, त्याने स्वत:लाच बजावले. पाय ताणून, त्याने स्नायू मोकळे केले.

तो सहजपणे ड्रायव्हरच्या सीटवर बसला व त्याने गाडीचे दार लावले. त्याने गाडी मागे घेण्यासाठी फक्त गिअरला स्पर्श केला आणि गाडीचे इंजीन आवाज करत उसळले. तो बसल्या जागेवरून उडाला आणि त्याचे डोके धमकन छताला आपटले. "स्साला –" तो पुटपुटला आणि त्याच्या झटकन लक्षात आले की, गिअरच्या वर असलेले इंजीन चालू करायचे बटण त्याने चुकून दाबले होते. गाडीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरलेले होते. एक-दोन दीर्घ श्वास घेत, त्याने स्वत:ला सावरले. त्याच क्षणी त्याला समजून चुकले की आपल्याला गाडी चालवायची काही गरजच नाही. गाडी आपली आपणच स्वत:ला चालवणार आहे.

गाडीच्या आतील रचनेकडे त्याचे प्रथमच लक्ष गेले. ताज्या चामड्याचा गंध, कोरी करकरीत केबिन, न हाताळल्या गेलेल्या गाडीचा अस्सल 'नवेपणा.' ती केवळ मर्सिडिज नव्हती. आज बाजारात असलेली अत्याधुनिक, उत्कृष्ट दर्जाची ती एक सर्वोत्तम गाडी होती. बाहेरच्या हवामानाशी स्वत:ला आपोआप सुसंगत ठेवणारी. केवळ ती एक चैनीचे प्रतीक नव्हती तर मानवाने तंत्रज्ञानात केलेल्या भव्य प्रगतीची, ती साक्ष देत होती. त्याने गाडी सावकाश मागे घेत, रस्त्यावर आणली, खाली पसरलेल्या बर्फावरून एका दबक्या शांततेत आता गाडी चाललेली होती. त्याला वाटले जणू आपण ढगांवरून विहार करतोय.

पण दुसऱ्याच क्षणी त्या गाडीबद्दल त्याच्या मनात एक प्रकारचा तिरस्कार निर्माण झाला. एम्माने आपल्याला फसवलेय, एवढीच त्यामध्ये खंत नव्हती तर इतके उच्चभ्रू आयुष्य जगण्याचा त्याचा पिंडच नव्हता. स्लोन-केट्टरिंग हॉस्पिटलमधल्या त्याच्या अनेक सहकाऱ्यांनी मात्र अशाच एका सुखासीन आयुष्याचे स्वप्न कायम आपल्या मनात जपले होते. त्या स्वप्नपूर्तीसाठी ते तितकीच कठोर मेहनत घेत होते का, हा प्रश्न अलाहिदा. आपल्या स्वप्नाच्या नकली दुनियेत मशगूल होण्यातच त्यांना आनंद वाटत असे. पण जोनाथनसाठी वैद्यकशास्त्र हे केवळ साधन नव्हते, साध्य होते. आपल्याजवळील मालमत्तेचा त्याने कधीच हिशेब ठेवला नव्हता. अशा प्रकारच्या गाड्यांना त्याच्या लेखी काहीच किंमत नव्हती. त्याला 'कृती' महत्त्वाची वाटायची. डॉक्टर जोनाथन रॅन्सम नेहमीच इतरांची काळजी घेत असे.

मुख्य रस्त्यावर, दोन्ही दिशेने वाहनांची वर्दळ सुरू होती. वर्दळीचा फायदा उठवत, पायी चालणारी माणसे अगदी मर्सिडिजसमोरूनही बिनदिक्कत रस्ता क्रॉस करत होती. अचानक एक माणूस, गाडीच्या लखलखत्या दिव्यांसमोर येऊन, जोनाथनच्या पुढे उभा ठाकला. डोळ्यांवर हाताचे झापड करून तो काचेच्या आत बसलेल्या जोनाथनकडे नजर रोखून पाहू लागला. तो पोलीस होता, याबद्दल जोनाथनच्या मनात कोणतीच शंका नव्हती. जोनाथनने स्टिअरिंगवरचे हात खाली आणले व आपल्या मनाची तयारी केली. खिशातून पिस्तूल काढून आता तो इसम कोणत्याही क्षणी ओरडणार. "ताबडतोब गाडीच्या बाहेर ये. तुला मी अटक केलीय."

पण एका क्षणानंतर तो माणूस काहीही न बोलता चक्क निघून गेला होता आणि घर

गाठण्याच्या घाईत असलेली माणसे गाडीसमोरून झपाझप ये-जा करत होती.

वर्दळ निवळली. जोनाथनने हलकेच गाडी सुरू करत स्टेशनच्या डाव्या बाजूने पुढे नेली. चार चौक पार केल्यावर त्याने गाडी बाजूला नेत, काच खाली आणली.

“चल. आत ये.”

सीमॉन गाडीत येऊन बसली. अंगातला कोट गच्च लपेटत ती आ वासून गाडी निरखू लागली. “ही एम्माची गाडी?” तिने विचारलं.

“वाटतंय तरी तसं.” पूर्वेकडे जात तो ऑटोबन्हपाशी पोहोचला. रस्त्याच्या कडेला पाटी होती. “चूर– २५ कि.मी.”

सीमॉनचा चेहरा गोंधळलेला होता. “तू कुठे चाललायस?”

“परत हॉटेलपाशी. हे सामान कुणी पाठवलं, हे आपल्याला शोधायचंय.”

१८

“अजून गरम कर.”

रक्षकाने बर्नरचे बटण फिरवले. खाली असलेल्या तांब्याच्या प्रचंड कढईतून निळ्या ज्वाळा उफाळू लागल्या. तापमानाचा आकडा, एकशेचाळीस डिग्रीवर स्थिरावला. आतून एक अणकुचीदार जाड सुई वर येऊ लागली.

तिला ‘पॉट’ असे नाव दिले गेले होते आणि सतराव्या शतकात तिचा खूप वापर होत असे. पाच फूट उंचीची व तितक्याच जाडीची. अलेप्पोमधील सार्वजनिक धुलाई केंद्राचा ती एक अविभाज्य भाग असायची. त्या काळी सिरिया हे एक ओट्टोमन साम्राज्यातील संस्थान होते. सुईचे तापमान आता एकशेपन्नास डिग्रीपर्यंत पोहोचले होते. आगीसारखे चटके खांद्याला लागल्यावर, गॅसन वेडापिसा होऊन लाथा झाडू लागला. पाय वाफेने पोळून निघणार या भीतीने त्याला ते धड खाली टेकवताही येत नव्हते.

तापमानाचा आकडा आता एकशेसाठ डिग्री दाखवू लागला.

रात्र खूपच लांबली होती. गॅसनने कमालीची सोशिकता दाखवली होती. त्याने प्रचंड यातना सोसल्या होत्या आणि तरीही पन्नास किलोंची स्फोटके आपण कुणाकडे पोहोचवली याबद्दल त्याने ब्रही काढला नव्हता. कर्नल माईकही आता पूर्वीसारखा स्वच्छ व परीटघडीचा उरला नव्हता. त्याला प्रचंड मेहनत करावी लागली होती व त्यामुळे त्याच्या मिशा घामाने थबथबल्या होत्या. त्याच्या रंध्रारंध्रातून आता फक्त क्रौर्य दिसून येत होतं.

“अजून तापू देत.”

कढईच्या टोकाशी बुडबुडे जमा होऊ लागले होते. गॅसन जोरजोरात ओरडू लागला. तो प्रार्थना करत नव्हता. अल्लाची क्षमायाचनाही मागत नव्हता. तमाम पाश्चिमात्य राष्ट्रांना अर्वाच्य शिव्या देत सुटला होता. राष्ट्राध्यक्षांना, एफबीआयला, सीआयएला. तो धार्मिक नव्हता. त्याच्या अगदी उलट होता. आपल्या कृत्यांमधून स्वत:ला दहशतवादी म्हणून सिद्ध करणारा. त्या बंडामागे कोणताही हेतू नव्हता. विध्वंस हे एकच ध्येय होते.

फिलिप पालुंबो एका कोपऱ्यात खुर्चीवर बसलेला होता. त्या केविलवाण्या किंकाळ्यांचा त्याला केव्हाच उबग आला होता. बालीवर बॉम्बहल्ला करणाऱ्या गॅसनसारख्या नराधमांबद्दल आता त्याच्या मनात जराही सहानुभूती उरलेली नव्हती. वीस प्रेते सापडली होती. बिचारे पुरुष, स्त्रिया आणि मुले समुद्रकिनाऱ्यावर मौज करण्यासाठी आली होती. एकही वाचला नाही. शिवाय जवळपास शंभर जखमी झाले होते. आयुष्ये नष्ट झाली होती. आयुष्ये उद्ध्वस्त करण्यात आली होती आणि हे सर्व कशासाठी? केवळ पाश्चिमात्यांना बाष्कळ शिव्या देत त्यांना निशाण बनवायचे. पालुंबो हा नीतिमत्तेचा पुरस्कर्ता होता. कायद्याचे पालन करणे व आपल्या देशबांधवांना आदराने

व सन्मानाने वागवणे हे प्रत्येकाचे सामाजिक कर्तव्य आहे असे तो मानत असे. जर तुम्ही बांधिलकी तोडलीत, खेळाच्या नियमांचे उल्लंघन केलेत तर तुम्हाला क्षमा नाही.

गॅसनने निरपराध लोकांचा निष्कारण बळी घेतला होता. पालुंबोच्या मनात आले की उठून त्याचे मुस्कट दाबून धरावे. बर्नरचे बटण शेवटपर्यंत पिरगळावे आणि गॅसनच्या मृत्यूचा उत्सव साजरा करावा.

"आपण पुन्हा एकदा सुरुवात करू या?" आपल्या रागावर कमालीचा काबू ठेवत कर्नल माईक म्हणाला, "दहा जानेवारीला तू दिमित्री शेव्हचेंकोला लाईपझिग इथे भेटलास. प्लॅस्टिक स्फोटके, सफेद कोल्क्सवॅगनमध्ये चढवलीस. त्यानंतर तू कुठे गेलास? स्फोटकं तर तू कुणाच्या तरी हवाली करणारच होतास. ती स्फोटकं जरुरीपेक्षा जास्त वेळ बाळगण्याचा विचारही तुझ्या मनात येणं शक्य नव्हते. तू एक चलाख मुलगा आहेस, अनुभवी. मला सांग, त्यानंतर काय घडलं? हवं तर मी तुला मदत करतो. जो इसम ती स्फोटकं प्रत्यक्ष वापरणार होता, त्याच्या हातात तू ती दिलीस. मला त्याचं नाव हवंय. तू बोलायला सुरुवात कर, मीही वातावरण मोकळं करतो. तुला एक मनातली गोष्ट सांगू? कुणाला असा त्रास दिला ना की रात्री मला झोप येत नाही."

गेल्या दहा तासांमध्ये प्रश्न विचारण्यात काहीच फरक पडला नव्हता.

पौर्णिमेची रात्र होती. कुत्र्यांच्या भुंकण्याला जोर चढला होता. एक प्रचंड मोठा ट्रक धडधडत निघून गेला. त्या हादऱ्याने भिंती थरथरल्या.

गॅसनने बोलायला तोंड उघडले, पण अचानक ओठांचा चंबू करत त्याने आपली हनुवटी छातीत खुपसली. त्याच्या घशातून एक विचित्र आवाज उमटू लागला व तो खोलीभर घुमू लागला.

"तापवत राहा." कर्नल माईकने फर्मान सोडलं.

ज्वाला वाढू लागल्या. काटा एकशेऐंशी डिग्रीवर जाऊन थडकला.

"त्यांचा काय डाव आहे? त्यांनी कुणाला आपलं 'लक्षय' बनवलंय? मला जागा, तारीख, वेळ पाहिजेय." कर्नल माईकचा आवाज कठोर झाला होता. अशा प्रकारच्या कामांसाठी त्याच्याहून योग्य माणूस सापडला नसता. शत्रूला छळण्यासाठीच तो जन्माला आला होता. जॉकी जसा घोड्याला धावडवतो तसा तो कैद्याला हरप्रकारे पिदवून त्याचा अंत पाहायचा.

एकशेनव्वद.

"सर्वांत पहिल्यांदा तुझी बुबुळं बाहेर येतील. उकडलेल्या सॉसेजेससारखी. मग तुझं पोट फुगेल आणि फुप्फुसं उकळू लागतील. तुझ्या हातांकडे बघ. मांस लोंबू लागलंय आणि दुर्दैवाची गोष्ट ही आहे की, हा खेळ असाच अजून खूप काळ चालू राहणार आहे."

आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध गॅसनचा कंठशोष अखंडपणे सुरू होता, पण त्याचे डोळे सुजून फुगले होते.

"तुझ्या साथीदाराचं नाव काय? तो काय करणार आहे, त्या स्फोटकांचं?"

दोनशे डिग्रीज.

"ठीक आहे." गॅसन बेंबीच्या देठापासून ओरडला. "मी सांगतो तुला. आधी मला बाहेर काढ! प्लीज!"

“तू काय सांगणार आहेस?”

“सारं काही. मला माहितीये, ते सर्व. त्याचं नाव. आधी मला बाहेर काढ.”

कर्नल माईकने रक्षकाला हातानेच इशारा केला. त्याने कर्नलची आज्ञा पाळली.

“तू कोणाच्या हातात स्फोटकं सोपवलीस?”

गॅसनने नाव सांगितले. पालुंबोने ते नाव यापूर्वी कधीच ऐकलेले नव्हते, “मी स्वतः त्याला नेऊन दिली. त्या बदल्यात त्याने मला वीस हजार डॉलर्स दिले.”

“तू ती विस्फोटकं कुठे नेऊन पोहोचवलीस?”

“जिनिव्हा. तिथल्या विमानतळाजवळील एका गॅरेजमध्ये चौथ्या मजल्यावर.” धरणाचा बांध आता फुटला होता. गॅसन भडाभडा बोलू लागला होता. धरणातले पाणी प्रचंड वेगाने बाहेर येत होते. नावे, टोपणनावे, लपण्याची ठिकाणे, सांकेतिक शब्द. त्याला भराभर बोलता येईना.

पालुंबोने ते सर्व ध्वनिमुद्रित करून घेतले. मिळालेली माहिती खरी आहे की नाही हे पडताळून पाहण्यासाठी तो खोलीच्या बाहेर पडला. पाच मिनिटांनी तो पुन्हा परतला. “काही नावांची ओळख पटलीये, पण अजून पुष्कळ माहिती सांगायची शिल्लक आहे.”

“तर मग?” कर्नल माईकने विचारले. “आपल्या सन्माननीय पाहुण्याला तू आणखी काही प्रश्न विचारू इच्छितोस?”

“हो तर.” पालुंबो म्हणाला, “मिस्टर गॅसन हा या खेळातला फार जुना आणि अनुभवी खेळाडू आहे. आणि खेळाला आता तर कुठे सुरुवात होतेय.”

कर्नल माईकने रक्षकाला पुन्हा एकदा इशारा केला.

“पुन्हा तापवायला सुरुवात कर.”

१९

जोनाथन नव्वद मिनिटांत अरोसाला पोहोचला. पोस्ट्रास्सेच्या वरच्या टोकापर्यंत जाऊन त्याने कुल्म हॉटेलजवळ गाडी पार्क केली. बेल्लेव्ह्यूपासून तो आता फक्त तीनशे मीटर्सवर होता. सीमॉन मागच्या सीटवर बसून सिगारेट ओढत होती.

"मला वाटतं तू आता माझ्याबरोबर थांबण्यात काही अर्थ नाही." तो म्हणाला, "आता आपण एकमेकांचा निरोप घेऊ या. यापुढे मी स्वत:ला सांभाळायला समर्थ आहे."

"मला तुझ्याबरोबर राहायचंय." खिडकीबाहेर पाहात तिने उत्तर दिलं.

"मी सांगतो, तू घरी जा. तू तुझं कर्तव्य केलंयस. हवी होती तेव्हा तुझी साथ मिळाली. मी आता तुझी जबाबदारी नाही घेऊ शकत."

"तुला कोण जबाबदारी घ्यायला सांगतंय?" तिने त्याला फटकारले. "आत्तापर्यंत मीच मला सांभाळलंय. त्याबद्दल आभार मानू का तुझे?"

"तू पॉलला काय उत्तर देशील?"

"त्याला सांगीन की मी एका मित्राला मदत केली."

"हे त्याला सांगताना तू मात्र एखाद्या तुरुंगात असशील."

सीमॉन वळून त्याच्याकडे पाहू लागली. पोलिसाच्या त्या ठोशामुळे तिचा गाल काळानिळा झाला होता. तिचे उठावदार व्यक्तिमत्त्व त्यामुळे विस्कटून गेले होते. "आणि मला सांग जोन, तू आता काय करणार आहेस?"

यापुढे आपण एका वेळेस फक्त एक पाऊल उचलायचे अशी त्याने आपल्या मनाशी पक्की खूणगाठ बांधली होती. तांत्रिकदृष्ट्या पाहिले तर तो पळून जायच्या तयारीत होता, म्हणजे त्या खऱ्या-खोट्या पोलिसांपासून नव्हे, स्वत:पासून. स्वत:मधल्या त्या भाबड्या, पापभीरू वृत्तीपासून. आणि हेच सत्य होते. "मी अजून नीट ठरवलेलं नाही." काही क्षणानंतर तो म्हणाला.

सीमॉन आता ताठ बसली. "तुला किती भाऊ आहेत?"

त्याला ह्या प्रश्नाची अपेक्षा नव्हती. "दोन भाऊ आणि एक बहीण. का?"

"जर त्यांच्यापैकी कुणाच्या आयुष्यात हा प्रसंग ओढवला असता तर तू घरी निघून गेला असतास?"

"नाही." तो म्हणाला, "नसतो गेलो."

"मला कुणी भाऊ किंवा बहीण नाही." सीमॉन बोलू लागली. "मी ज्या माणसाशी लग्न केलंय, तो आपल्या कामाला स्वत:ची रखेल समजतो. ज्यांना मी शाळेत शिकवते त्यांना मी माझी मुलं मानते आणि राहिली ती फक्त एम्मा. तिच्याबाबतीत तू जेवढा चक्रावलाहेस, तितकीच मीही गोंधळून गेलेय. हे रहस्य उलगडण्यात, मी तुला साथ देण्याचा प्रयत्न करणार आहे. तुला माझी काळजी वाटणं मी समजू शकते. त्याबद्दल

मला तुझं कौतुकही वाटतं. उद्या मी दाव्होसला जाऊन पॉलला भेटणार आहे. मला वाटतं तोपर्यंत कदाचित आपल्याला याचा उलगडा झालेलाही असेल. पण जर आपल्याला पोलिसांशी मुकाबला करावा लागणार असेल, तर मी तुला सोडून जाऊ शकत नाही."

तिला समजावण्यात काही अर्थ नाही हे जोनाथनला कळून चुकले. त्याच्या हेही लक्षात आले की, जेव्हा पोलीस सुपरिटेंडंटच्या समोर आपण उभे असू, तेव्हा आपल्याला सीमॉनची खूप मोठी मदत होऊ शकते. जिनिव्हामधल्या एका प्रतिष्ठित शाळेत ती एक शिक्षिका आहे व तिचा नवरा एक नावाजलेला अर्थतज्ज्ञ आहे.

त्याने पुढे वाकत, तिच्या ओठांमधली सिगारेट अलगद उचलली. "ठीक आहे, तू जिंकलीस. पण तुला जर माझ्याबरोबर राहायचं असेल तर आधी हे फकाफक सिगारेट ओढणं थांबवायला लागेल. मला ओकारी येईल असं वाटतं."

सीमॉनने दुसऱ्या क्षणाला आपल्या पर्समधून आणखी एक सिगारेट काढली आणि ओठांमध्ये ठेवली. "गप रे. हे बघ, मी तुझी वाट पाहत इथेच थांबते." पुढे वाकून तिने त्याच्या गालावर ओठ टेकवले. "स्वत:ची काळजी घे."

मान खाली घालून जोनाथन भराभर चालू लागला. हिमवर्षाव जोरदार होत होता. वाऱ्याबरोबर उडणारे हिमकण इतक्या वेगाने गालांवर आपटत होते की, मान खाली घालून जास्तीतजास्त दहा फुटांपर्यंतच पाहण्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्याने पोस्ट्रास्सेपासून आर्लेनवाल्डला जाणारा फाटा पकडला. आर्लेनवाल्डचे छोटेसे जंगल एका पर्वतपायथ्याशी येऊन संपत होते. इथे वाऱ्याचा वेग कमी होता व त्यामुळे तो अधिक वेगाने चालू लागला.

रस्त्यावरच्या दिव्यांचा प्रकाश क्षीण होत गेला व पायाखालची वाट अंधारात बुडून गेली. रस्त्याच्या बाजूला पाईन व भोजवृक्षांनी एकच दाटी केली होती. उजव्या बाजूला उभा डोंगर पसरलेला होता. काही वेळातच तो हॉटेलच्या मागच्या बाजूस येऊन पोहोचला व गुडघाभर बर्फ तुडवत तो उतारावरून खाली आला. तिथूनच त्याने आपली खोली नक्की कुठे आहे याची खात्री करून घेतली. चौथा मजला. समोरचा कोपरा. इमारतीजवळ एक शंभर वर्षं जुना, पाईनचा वृक्ष होता. त्याच्या अगदी टोकाच्या फांद्या, तिसऱ्या-चौथ्या मजल्यावरील गॅलरीत जाऊन पोहोचलेल्या होत्या.

अचानक त्याला जाणवले की त्याच्या मानेवरचे केस हुळहुळताहेत. तो गर्रकन वळला. कुणीतरी आपल्यावर नजर ठेवून आहे. त्याची नजर मागच्या डोंगरावरून झरझर खाली येत गेली. एका उंच झाडाच्या खोबणीत एक घुबड बसले होते. घुबडाच्या दबलेल्या आवाजाने त्याच्या अंगावर काटा आला. आणखी एक सेकंद त्याने इकडे-तिकडे पाहिले पण त्याला कुणीच दिसले नाही.

पाच ढांगा टाकत तो पाईनपाशी पोहोचला. नेमकी फांदी पकडत तो झाडावर चढला व वरवर जाऊ लागला. दहा मीटर वर गेल्यावर तो एका आडव्या फांदीवरून रांगत पुढे सरकला. हाताच्या अंतरावर, गॅलरी दिसत होती. पण उतार इतका निमुळता होता की, तो घसरला असता तर तीन मीटर खाली असलेल्या बर्फावर जाऊन पडला असता. त्याने फांदी गच्च पकडली व शरीराला झोका देत गॅलरीचा कठडा दोन्ही हातांनी पकडला. एका बाजूला झुकून त्याने गॅलरीत उडी मारली.

झाकलेल्या पडद्यांमागे दिवा जळत होता. गॅलरीचे दार किंचित उघडे होते. तो एक

पाऊल पुढे आला व अंग मुडपून खाली लपला. त्याच क्षणी पडदा बाजूला सारला गेला. गॅलरीचे दार आत ढकलले गेले. सूट घातलेला एक माणूस, एका स्त्रीशी बोलत बोलत दरवाजापाशी आलाय अशी अस्पष्ट प्रतिमा त्याच्या डोळ्यांसमोर तरळून गेली. जोनाथन झटकन मागे सरकला व त्याने पलीकडे उडी मारली. तो कसाबसा दोन बाल्कनींच्या मधल्या द्विभाजकाला लोंबकळत राहिला. बर्फ साठल्यामुळे ते लोखंडी गज थंड व निसरडे झाले होते. त्याने खाली पाहिले. हॉटेलचे प्रवेशद्वार साठ फुटांवर होते व उडी चुकली असती तर मुख्य रस्ता आणखी साठ फूट खोल होता. त्याची बोटे बधिर झाली होती. इंच-इंच पुढे सरकत त्याने शेजारच्या बाल्कनीचा कठडा पकडला व शरीर वर खेचत त्याने गॅलरीत उलटी उडी मारली.

क्षणभर दम खाऊन तो दरवाजापाशी गेला. दरवाजा आतून बंद नव्हता. सकाळी निघताना त्याने दरवाजाचे लॅच लावले नव्हते. दिवे मात्र मालवलेले होते. तो खोलीत शिरला व क्षणभर तसाच उभा राहिला. आतील अंधूक प्रकाशाशी त्याने आपली नजर जुळवून घेतली. नोकराने खोली स्वच्छ करून ठेवली होती. गादीवर नवीन चादर घातलेली होती. शिसवी लाकडाच्या पॉलिशचा गंध हवेत तरळत होता. तरीही त्याला काहीतरी खटकत होते. काहीतरी बदललेले होते.

तो पलंगाजवळ गेला. एम्माचा शर्ट उशीखालीच ठेवलेला होता. टेबलावरची तिची पुस्तके, नीट रचून ठेवली होती. अगदी वर असलेले पुस्तक त्याने उचलले. 'चुका करण्यापूर्वी...' पुस्तकाचे नाव अगदी समर्पक होते; पण तिने ते वाचायला सुरुवात केले नव्हते याची त्याला खात्री होती. जे पुस्तक एम्मा वाचत होती ते तळाशी होते.

तो हॉलमध्ये गेला व त्याने कपाट उघडले. एकेक कप्पा त्याने शोधला. एम्माच्या वस्तूंवरून तिच्या हालचालींचा अंदाज तो घेणार होता. पण अंदाज तरी कशाचा घेणार? ती काय करत होती हेच जर त्याला ठाऊक नव्हते तर तो शोध तरी कसला घेणार होता?

त्याने कपाट बंद केले. कपाटावर त्यांच्या दोन सूटकेसेस होत्या. टाच उंचावत त्याने त्यातली मोठी सूटकेस उचलून खाली ठेवली. ती एम्माची सूटकेस होती.

एम्माची सूटकेस कधीच सर्वांत वर ठेवलेली नसायची. तो आपली सूटकेस नेहमी वर ठेवायचा, कारण ती छोटी व दिसायला आकर्षक होती.

कुणीतरी खोलीत येऊन गेलेले असणार.

मिनिटभर तो जागचा हलला नाही. मान उंचावत त्याने कानोसा घेतला. त्याच्या छातीचा एकेक ठोका त्याला स्पष्ट ऐकू येत होता. पण त्याखेरीज मात्र दुसरा कसलाच आवाज त्याला ऐकू आला नाही. शेवटी त्याने सूटकेस उचलून आत नेली व पलंगावर ठेवून सावकाश उघडली.

आणखी एक धक्का. सूटकेसवरचे प्लॅस्टिकचे आवरण फाटलेले होते. त्या आधी ते तसे कापले गेल्याचे किंवा खराब झाल्याचे त्याला आठवत नव्हते. ट्रॅक पँटखाली लपवलेली एक छोटी आयताकृती बॅग त्याला सापडली. त्याला ती बॅग ठाऊक होती. कस्टम्सच्या नजरेस पडू नये म्हणून खास कागदपत्रे असलेली ती बॅग एका चोरकप्प्यात दडवलेली होती.

त्याने सूटकेस बंद केली व जागेवर ठेवून दिली. एम्माची रोजच्या वापरातली मोठी पर्स टेबलाखाली ठेवलेली होती. त्याने पर्सचा बाहेरचा कप्पा उघडला आणि एम्माचे

पैशाचे पाकीट पाहून त्याचा जीव भांड्यात पडला. तिचे ओळखपत्र व पैसे शाबूत होते. सत्त्याऐंशी फ्रँक्स. क्रेडिट कार्डालाही कुणी हात लावला नव्हता. सुट्ट्या पैशांची छोटी पर्स त्याने उघडली. त्यात काही नाणी व केसांच्या पिना होत्या. त्याने खाली हात घातला व त्याच्या हाताला एक ब्रेसलेट लागले. एम्मा ते ब्रेसलेट कायम वापरत असे.

ब्रेसलेटचा तीन चतुर्थांश भाग पातळ होता, पण ब्रेसटेल जिथे मनगटाला चिकटते, त्याच्या खालचा भाग मात्र लक्षणीय जाड होता. आतमध्ये चौकोनी जाडसर असे काहीतरी त्याच्या हाताला लागले. तो त्या ब्रेसलेटशी थोडा चाळा करू लागला आणि त्याच्या लक्षात आले की ब्रेसलेटचे दोन भाग होऊ शकतात. तसे करताच ब्रेसलेटमधून एक USB पेन-ड्राइव्ह बाहेर आला. एका कॉम्प्युटरमधली फाईल दुसऱ्या कॉम्प्युटरवर घेण्यासाठी त्या ड्राइव्हचा उपयोग करता येत होता. आपल्या ब्लॅकबेरीचा वापर एम्मा कमालीच्या सफाईने करत असे; पण तिने आपला लॅपटॉप ऑफिसच्या बाहेर कधीच नेला नव्हता. त्याने ब्रेसलेट पुन्हा जोडले व आपल्या मनगटावर चढवले.

त्याच वेळी हॉलच्या दिशेने येणारा पावलांचा आवाज त्याला ऐकू आला. त्याने सॅक खाली ठेवली व तो टेबलाचे कप्पे उघडून शोधू लागला. नकाशे, पोस्टकार्ड्स, तिचा कंपास, पेने. पावलांचा आवाज जवळ येऊ लागला.

“ऑफिसर, ह्या बाजूने या. याच रांगेतली अगदी शेवटची खोली.”

जोनाथनने हॉटेल मॅनेजरचा आवाज ओळखला. लॅचमध्ये चावी घुसली. त्याने मधला ड्रॉवर उघडला. त्याला एक चामड्याच्या पुठ्ठ्याची तपकिरी डायरी दिसली. एका हातात एम्माची सॅक पकडून त्याने ती डायरी त्यात टाकली आणि बाल्कनीला बाहेरून कडी घातली.

दरवाजा उघडला गेला आणि पॅसेजमधला प्रकाश खोलीत पसरला.

“काय म्हणता? पोलीस मारला गेला?” हॉटेल मॅनेजर म्हणत होता. पाठीमागे न बघता, त्याने बाल्कनीमधून खालच्या डोंगरावर उडी मारली.

“ते तिथे पोहोचलेत.” मर्सिडिजमध्ये शिरता शिरता तो म्हणाला, त्याला चांगलाच दम लागला होता. “कुणीतरी त्या खोलीत–”

त्याने मागे वळून पाहिले. सीमॉन गाडीत नव्हतीच. त्याने तिची पर्स शोधली पण पर्सही गायब झाली होती. ती निघून गेली असावी. अखेर तिला भान आले असावे आणि तिने या जंजाळातून काढता पाय घेतला असावा. तो स्वत:शीच विचार करत राहिला. जोनाथनने थकून डॅशबोर्डवर डोके टेकवले व तो दम खाऊ लागला. त्याचे लक्ष स्टिअरिंग व्हीलकडे गेले. गाडीची चावी अडकवलेली नव्हती. तो गर्रकन वळला आणि त्याच्या लक्षात आले की एम्माची ती बॅग व खोकाही नाहीसा झालाय. याचा अर्थ त्या सर्व सामानासकट सीमॉन पसार झाली होती.

त्याने सीटवर हताशपणे पाठ टेकवली. तो थकून, गोंधळून गेला होता. मांडीवर पडलेल्या डायरीकडे त्याचे लक्ष गेले. तो त्यातली नावे, पत्ते, टेलिफोन नंबर्स भराभरा चाळू लागला. त्याच्या मनात विचार चमकला. सुरुवात करायचीच तर आता इथूनच करावी लागेल.

त्याच वेळी गाडीचा दरवाजा उघडला गेला व सीमॉन आत शिरली.

“कुठे होतीस तू?” त्याने विचारलं.

सीमॉन नीट टेकून बसली. “मी डोंगरावर जाऊन आले. तुला अगदी कारणच हवं असेल तर सांगते. मला सिगारेट ओढायची होती.”

“एम्माचं सामान कुठेय?”

“मी ते डिकीत टाकून दिलं.”

जोनाथनने मान हलवली. तो हळूहळू शांत होत गेला. “माझ्या मनात तुला जाब विचारायचा नव्हता. पण लक्षात घे की ते हॉटेलपर्यंत येऊन पोहोचलेत. त्यांनी खोलीची झडती घेतली. अगदी वरपासून खालपर्यंत. म्हणजे, आमच्या हॉटेलमधल्या खोलीची. पण ते हुशार होते. आपलं काम त्यांनी सफाईने केले. त्याबद्दल त्यांचं कौतुकच करायला हवं. त्यांना हवी ती गोष्ट जवळजवळ सापडलीच होती. मग मात्र मला त्यांना शोधून काढणं कधीच जमलं नसतं.”

सीमॉन त्याच्याकडे रोखून पाहत होती. त्याच्या चेहऱ्यावरील भयचकित मुद्रांचे प्रतिबिंब, थेट तिच्या डोळ्यात पडले होते. “काय बोलतोयस तू? कुणाबद्दल? पोलीस?”

“नाही. ते खरे पोलीस असूच शकत नाहीत.” त्याने मग एम्माच्या सूटकेसचे कव्हर कसे फाटले होते वगैरे तिला थोडक्यात सांगितलं.

“फक्त तिचीच सूटकेस?” सीमॉनने विचारले. “ते काय शोधत होते?”

“मला ठाऊक नाही.”

“विचार कर जोन. आतमध्ये काय असू शकेल?”

जोनाथनने तिच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. त्याला काहीच सुचत नव्हते. “मला गाडीच्या चाव्या दे. ते बाहेर पडत असतील.”

सीमॉनने त्याच्या हातात चाव्या ठेवल्या, “गाडी हळू चालव. कुणीसुद्धा येत नाहीये. बघ जरा.”

जोनाथनने आरशातून मागे पाहिले. रस्ता सुनसान होता. वादळ आता थंडावले होते. तो मागे टेकला व त्याने डोळे मिटून घेतले. “ठीक आहे.” तो पुटपुटला. “आपण ठीक आहोत.”

“अर्थातच आपण ठीक आहोत.” सीमॉन म्हणाली.

“मी हॉलबाहेर झालेलं बोलणं ऐकलं. मला वाटतं की हॉटेल मॅनेजरबरोबर पोलीस होते. लँडक्वॉर्टमध्ये मेलेल्या पोलिसाबद्दल ते बोलत होते. मीच त्याला मारलं हे त्यांना समजलं होतं.”

“ह बघ, आता त सराक्षत आहस. एवढा गाष्ट परशा आह.” सामानन त्याच्या मांडीवर पडलेल्या डायरीकडे बोट दाखवत विचारले. “ते काय आहे?”

“एम्माची डायरी. त्यात सर्वांचे पत्ते व फोन नंबर्स आहेत. अस्कोनामधील ती कुणाकुणाला ओळखत होती, हे आपल्याला जाणून घ्यायचंय. जर तिच्या एखाद्या मैत्रिणीने ते सामान पाठवलेलं असेल तर तिचं नाव आपल्याला डायरीत सापडेल.”

“मी बघू?”

जोनाथनने तिच्यापाशी डायरी दिली. बायबलइतकी ती जाडजूड होती व वजनाला दुप्पट होती. या पलीकडे माझ्या आयुष्यात कुणीही नाही असे एम्मा म्हणायची. सीमॉनने ती आपल्या मांडीवर ठेवली व एखादा पवित्र ग्रंथ उघडावा तशी आदरपूर्वक उघडली.

एम्माने आपले नाव उडत्या लिपीत लिहिले होते. त्यामध्ये एका मागोमाग एक पत्ते लिहिलेले होते. अगदी अलीकडचा पत्ता होता, रॅम्पे दि कॉलनी, जिनिव्हा. त्याआधी प्यू सेंट जीन, बैरुत. यादी चांगलीच लांबलचक होती.

"ह्यात किती नावं असतील?" सीमॉनने विचारलं.

"तिला भेटलेल्या प्रत्येकाचं. एम्माच्या स्मरणातून कुणीही निसटत नसे." दोघांनी मिळून अगदी प्रत्येक पान चाळले. 'अ'पासून 'ज्ञ'पर्यंत. त्यांना टेस्सिन, अस्कोना, लोकॉर्नो व ल्युगॉनोमधला एखादा पत्ता हवा होता. 091 या क्रमांकाने सुरू होणारा एखादा फोन नंबर. जगातल्या प्रत्येक कोपऱ्यातली नावे त्यांना सापडली. टास्मानिया, पॅटागोनिआ, ग्रीनलँड, सिंगापूर आणि सायबेरिया. पण अस्कोनाचा मात्र कुठेच उल्लेख नव्हता.

अर्धा तासानंतर सीमॉननी ती डायरी गुपचूप ड्रॉवरमध्ये ठेवून दिलेली होती.

स्वित्झर्लंडच्या दक्षिणेकडील प्रदेशात एम्माला एकही दोस्त मिळाला नव्हता. अस्कोना तर अस्तित्वातच नव्हते.

त्याने खिसे चाचपडले व एम्माच्या सामानाची परत मिळालेली पावती बाहेर काढली. "आपल्याकडे अजून ही तर शिल्लक आहे." तो म्हणाला. "ज्या ठिकाणी हे सामान पाठवले, त्या स्टेशनमास्तरकडे पाठवणाऱ्याचे नाव मिळू शकेल असं तो माणूस म्हणाला होता."

"मला वाटत नाही की स्विस माणसं इतक्या सहज तुला माहिती सांगतील. ते आधी तुझी ओळख पटवून घेतील."

"तुझं म्हणणं बरोबर आहे." जोनाथनने तिच्या हातात पावती दिली व गाडी सुरू केली.

"आपण कुठे चाललो आहोत?"

"तुझा काय अंदाज?" गाडी रस्त्यावर आणत त्याने मान तिरपी करून तिला विचारलं.

सीमॉन सावरून बसली. तिने दोन्ही हातांनी आपले केस मागे सारले. "पण एम्माचं तर तिथं कुणीच ओळखीचं नाही. कुठून शोधायला सुरुवात करायची हेही आपल्याला ठाऊक नाही. आपण आशा तरी कसली बाळगायची?"

जोनाथनने डोंगराच्या उताराच्या दिशेने गाडी वळवली. "एम्माला सामान कुणी पाठवलं हे कसं शोधायचं, ते मला ठाऊक आहे."

२०

मध्यरात्र व्हायला पाच मिनिटे शिल्लक होती. झुरिचच्या औद्योगिक वसाहतीतील रोबोटिका एजीच्या ऑफिससमोरील गोदीजवळ एक व्हॅन येऊन उभी राहिली. व्हॅनमधून चार माणसे खाली उतरली. चौघांनीही काळे कपडे घातले होते. चेहरा बुरख्याने झाकला होता. फक्त डोळे उघडे होते. त्यांनी डॉक्टरी हातमोजे चढवले होते व क्रेप सोलचे बूट घातले होते. चौघांमध्ये सर्वांत बुटक्या असलेल्या त्यांच्या म्होरक्याने व्हॅनवर हलकीच एक थाप मारली आणि व्हॅन भर वेगात निघून गेली.

गोदीची ती वेडीवाकडी चढण तो कसाबसा चढला. गोदामांचे गाळे, लोखंडी पन्हळी शटर्सनी कडेकोट बंद केले होते. त्यांच्या बाजूने सावधपणे चालत तो शेजारच्या इमारतीपाशी पोहोचला. त्याच्या हातात दोन मोठ्या किल्ल्या होत्या. एक किल्ली होती, इमारतीची सुरक्षा यंत्रणा बंद ठेवण्यासाठी व दुसरी इमारतीचा दरवाजा उघडण्यासाठी. म्होरक्याच्या पाठोपाठ उरलेल्या तिघांनीही इमारतीत प्रवेश केला.

“पहारेकऱ्याची दुसरी फेरी सुरू व्हायला फक्त सतरा मिनिटं शिल्लक आहेत व तेवढाच वेळ आपल्यापाशी आहे.” दरवाजा मागून बंद करत चीफ इन्स्पेक्टर मार्क्स व्हॉन डॅनिकन म्हणाला, “भराभर हालचाल करा. कुठल्याही वस्तूला स्पर्श करताना अतिशय काळजी घ्या. ऑफिसमधली एकही गोष्ट आपल्याला जागेवरून हलवायची नाहीये. आपण इथे आलेलोच नाहीत हे लक्षात ठेवा.”

चौघांनीही आपल्या जॅकेटमधून छोट्या विजेऱ्या काढल्या व ते व्हरांड्याच्या दिशेने जाऊ लागले. व्हॉन डॅनिकनबरोबर सेवा विभागातला मायर्स, खास सुरक्षाविभागाचा कुब्लर व कमांडो क्रँजेक असे तिघे जण होते. आज त्यांच्यावर जे काम सोपवले गेले होते ते किती धोकादायक होतं, याचा अंदाज तिघांनाही देण्यात आला होता. जर आज ते पकडले गेले असते तर त्यांना नोकरी गमवावीच लागली असती आणि तुरुंगवासही भोगावा लागला असता. पण डॅनिकनवर असलेल्या अतूट निष्ठेपोटी, ते सर्व जण हा धोका पत्करायला तयार झाले होते.

ज्या कंपनीबरोबर इमारतीच्या सुरक्षेचा करार केला गेला होता, तेथील अधिकाऱ्याशी संपर्क साधून मायर्सने त्या दोन्ही चाव्या मिळवल्या होत्या. स्विस उद्योगसमूहाने फेडरल पोलिसांशी सहकार्य करणे, ही फार जुनी परंपरा होती.

कुब्लरने इतरांना पुढे जाऊ दिले व मग आपल्या बॅगेतून एक सेल-फोनसदृश वस्तू बाहेर काढली. हातासमोर ती धरत, तो व्हरांड्यातून सावकाश चालू लागला. त्याचे लक्ष वरच्या उजळलेल्या पडद्यावरील हिस्टोग्रामकडे होते. अचानक तो थांबला व त्याने अंगठ्याखालचे लाल बटण दाबले. हिस्टोग्राम लुप्त होऊन त्या जागी ‘AM-241’ ही अक्षरे चमकू लागली. त्याने वर पाहिले. तिथे धुराचा शोध घेणारा अभिमापक बसवलेला होता.

एखाद्या व्यक्तीजवळील हातबॉम्ब किंवा एखादी किरणोत्सर्गी वस्तू शोधून काढण्यासाठी त्या उपकरणाचा वापर केला जात असे. त्याला त्या 'AM-241 ' किंवा 'अमेरिसियम-२४१' या अक्षरांची विशेष काळजी वाटत नव्हती. 'स्मोक डिटेक्टर'मध्ये वापरले जाणारे ते एक खनिज द्रव्य होते. तो आणखी काही सनसनाटी सापडतंय का याचा शोध घेत होता. आपल्या हातातील उपकरण तो एखाद्या राजदंडासारखा फिरवत चालला होता. काहीच धोका दिसत नव्हता. जागा, स्वच्छ, निर्धोक होती.

व्हॉन डॅनिकनकडे थिओ लॅमर्सच्या ऑफिसची किल्ली नव्हती. मायर्सने आळख काढलल्या आधिकाऱ्याकड आाफसचा चावा नव्हताच, त्यामळ ता दण्याचा प्रश्नच उद्भवला नव्हता. मायर्सने आपली हरणाच्या कातडीची बॅग खाली पसरली व त्याच्यातील हत्यारे बाहेर काढून तो कामाला लागला. पोलीस अॅकॅडमीमध्ये प्रशिक्षकाचे काम केलेल्या मायर्सला ऑफिसचे कुलूप उघडायला फक्त तीस सेकंद लागली.

व्हॉन डॅनिकनच्या टॉर्चने ऑफिस उजळून निघाले. मागच्या खेपेस त्याने पाहिलेल्याच ठिकाणी, त्याच टेबलावर ते MAV ठेवलेले होते. त्याने ते उचलून सर्व बाजूंनी नीट निरखले. इतके छोटेसे उपकरण, इतक्या प्रचंड वेगात प्रवास करू शकते ही खरोखरच आश्चर्यकारक गोष्ट होती. त्यापेक्षा त्याला महत्त्वाची गोष्ट वाटत होती, ती म्हणजे ते उपकरण निर्माण करण्यामागचा हेतू शांतता प्रस्थापित करण्याचा होता की विध्वंस करण्याचा?

त्याने ते MAV टेबलावर ठेवले व आपल्या डिजिटल कॅमेऱ्यातून त्याचे अनेक फोटो काढले. मग तो लॅमर्सच्या टेबलाकडे वळला. टेबलाचे ड्रॉवर्स उघडे असलेले पाहून तो चकित झाला. लॅमर्सच्या सर्व फायली बाहेर काढून त्याने टेबलावर पसरल्या आणि कागदपत्रांचेही फोटो काढले. बहुतेक कागदांवर फक्त ग्राहकांचे पत्ते व माहिती लिहिलेली होती. या माणसाला तीन पासपोर्ट आणि उझी बंदूक बाळगायची गरज का भासावी याचा त्या कागदपत्रांवरून तरी काहीच अर्थबोध होत नव्हता.

पण हे त्याचे सार्वजनिक आयुष्य होतं, व्हॉन डॅनिकन मनातल्या मनात म्हणत होता. आरशाची हसरी बाजू.

"बारा मिनिटं उरली." क्रॅजेक कुजबुजला.

विषयपत्रिका.

व्हॉन डॅनिकनचे त्या डायरीकडे अगदी सहजच लक्ष गेले. भिंतीवर लावलेला, लॅमर्स कुटुंबीयांचा फोटो तो पाहत होता. त्याने डायरी उचलली व तो पाने चाळू लागला. डायरीत अनेक प्रकारच्या नोंदी केलल्या होत्या. त्यातल्या काही नोंदी करताना सांकेतिक शब्द वापरलेले होते. खास ग्राहकांच्या भेटीसंदर्भाबाबत असे शब्द योजलेले होते. त्याने डायरीतील शेवटची नोंद तपासली. त्याच दिवशी लॅमर्सला मारण्यात आले होते. एमिलो रेस्टॉरंटमध्ये 'जी.बी.' बरोबर रात्री ७ वाजता भोजन. शेजारी फोन नंबरही लिहिलेला होता.

व्हॉन डॅनिकनने त्या पानाचा फोटो काढला.

ऑफिसमधले काम संपल्यावर तो व मायर्स स्वागतकक्षातून बाहेर आले व दोन-तीन दरवाजे पार करत फॅक्टरीजवळ पोहोचले. "त्याचं वर्कशॉप कुठे आहे?" मायर्सने विचारलं.

“मी कुठे पाहिलंय? त्याने तिथे MAV बनवलं एवढंच मला सांगितलं गेलं.”

मायर्सने खांदा पकडत त्याला थांबवले. “पण तो वर्कशॉप इथेच आहे असं तुला खात्रीने वाटतं?”

“बऱ्यापैकी,” लॅमर्सची कार्यशाळा, ऑफिसच्याच इमारतीत आहे असा स्पष्ट उल्लेख त्याच्या सेक्रेटरीने केलेला नव्हता, हे त्याला आठवलं.

त्या मजल्यावर अगदी शेवटच्या टोकाला एक सिमेंटचा बंदिस्त कठडा बांधलेला होता. त्याला लागून असलेल्या लोखंडी दरवाजावर ‘खाजगी वापरासाठी’ असे लिहिलेले होते.

“मला ‘बऱ्यापैकी’ वाटतंय की हीच त्याची प्रयोगशाळा असावी.” व्हॉन डॅनिकन मायर्सला खिजवत म्हणाला.

मायर्स गुडघ्यावर बसला व त्याने बॅटरी पेटवली. “जरा गप्प बसशील तर बरं होईल.”

“तुला कुलूप उघडता येईल?”

मायर्सने त्याच्याकडे एक कटाक्ष टाकला. “मला तशी ‘बऱ्यापैकी’ खात्री वाटते.”

मायर्सने आपल्याकडील हत्यारे बाहेर काढली व काम सुरू केले. व्हॉन डॅनिकन, धडधडत्या छातीने, त्याच्या शेजारी उभा होता. अशा प्रकारच्या परिस्थितीला तो यापूर्वी कधीच सामोरा गेलेला नव्हता. पहिले म्हणजे वॉरंटशिवाय कुलूप तोडून आत घुसणे आणि आता खाजगी मालमत्तेची नासधूस करणे. तो इतक्या आततायीपणे का वागत होता? कुणाच्या पाठीत खंजीर खुपसण्याची त्याची वृत्तीच नव्हती. तो एक टेबलखुर्चीवर बसून काम करणारा मनुष्य होता व त्या गोष्टीचा त्याला सार्थ अभिमानही होता. पन्नास वर्षांच्या आयुष्यात त्याच्या हातून प्रथमच असे चोरटेपणाचे वर्तन होत होते.

“नऊ मिनिटं–” मनातून घाबरलेला डॅनिकन, क्रॅजेकच्या त्या इशाऱ्याने क्षणमात्र दचकला.

एव्हाना कुब्लर आपल्या उपकरणासह तिथे पोहोचला होता. त्याने ते उपकरण उजव्या बाजूला फिरवले आणि हिस्टोग्रॅमच्या जागी ‘C3H6N606 ’ असे चिन्ह उमटले व त्याच्या शेजारी शब्द होता. ‘सायक्लोट्रायमिथिलिनेट्रीनि ट्रॅमाईन.’ त्याला तो शब्द समजला पण ‘RDX ’ या नावाने त्याला तो अधिक परिचित होता. अखेर त्यांची ती धाडसी कामगिरी व्यर्थ ठरली नव्हती.

“आठ मिनिटं–” क्रॅजेक म्हणाला.

मायर्सच्या हातातले छोटे हत्यार कुलपामधून पूर्ण फिरले. “झालं काम,” असे म्हणत त्याने एक हलकासा झटका दिला व कुलूप खाली पडून दरवाजा उघडला गेला.

व्हॉन डॅनिकनने पाऊल आत टाकले. बॅटरीचा झोत एका टेबलावर पडला. त्यावर छोटी-मोठी हत्यारे, पकडी, स्क्रू, वायर्स आणि लोखंडाचे लहान लहान तुकडे पडलेले होते. एका नजरेत त्याने ओळखले की, हेच लॅमर्सचे वर्कशॉप होते.

व्हॉन डॅनिकनने खोलीतले दिवे लावले. काल रात्री एर्लेनबॅचला पाहिलेल्या कार्यशाळेची ही मोठी प्रतिकृती होती. खोलीच्या दोनही टोकांना दोन मोठी टेबले ठेवलेली होती व त्यावर यंत्रांची रेखाटने व योजनांचे आरेखन मांडलेले होते. फरशीवर

वेगवेगळ्या आकारांचे खोके होते. खोक्यांवर लिहिलेली नावे, विद्युत उपकरणांच्या उत्पादकांची होती, हे त्याच्या लक्षात आलं.

जवळच्या भिंतीवर एका विमानाचे आरेखन चिकटवलेले होते. टाचा उंच करत तो ती माहिती वाचू लागला. लांबी : दोन मीटर, पंखांमधले अंतर : साडेचार मीटर्स. हे MAV नव्हते. ही तर खरीखुरी चीज होती. रेखाटनाला 'मधमाशी' असे नाव दिलेले होते. रिमोट कंट्रोलने हे विमान चालवले जायचे. शत्रूक्षेत्रावरून उडवण्यासाठी त्याचा वापर केला जायचा हे व्हॉन डॅनिकनला आठवले आणि अनेकदा त्यातून क्षेपणास्त्रांही सोडली जायची हे ही त्याला ठाऊक होते. त्या कल्पनेनेच त्याच्या मानेवरचे केस ताठ उभे राहिले. ड्रॉइंगच्या कोपऱ्यात विमानाच्या अंतिम रुपाचे चित्र काढलेले होते. ते खरोखरच आकाराने 'मोठ्ठे' होते. भल्या मोठ्या गिधाडासारखे ते दिसत होते. विमानाशेजारी एका माणसाचा फोटो होता. काळ्या केसांचा, काळ्या कातडीचा. त्याने जवळ जाऊन तो फोटो पाहिला. त्यावर एक आठवड्यापूर्वीची तारीख होती. त्याने मागच्या बाजूस पाहिले. 'T. L. आणि C. E. ' अशी आद्याक्षरे होती. T. L. म्हणजे थिओ लॅमर्स. पण C. E. म्हणजे कोण?

"चार मिनिटं–" क्रॅजेक म्हणाला.

व्हॉन डॅनिकन व मायर्सने एकमेकांकडे पाहिले. दोघांनी आपापला शोध सुरूच ठेवला. मायर्स खोके तपासत होता तर डॅनिकन टेबलावरील आरेखने.

"दोन मिनिटं–" क्रॅजेकने इशारा दिला.

अचानक डॅनिकनला लॅमर्सच्या डायरीतली आद्याक्षरे आठवली. G. B. त्याने पुन्हा फोटोच्या मागच्या बाजूला नीट निरखून पाहिले. त्याने आधी चुकीचे वाचले होते. फोटोच्या मागेही G. B. हीच आद्याक्षरे होती.

त्याने मगाशी घेतलेला, डायरीच्या पानाचा फोटो कॅमेऱ्यातून पुन्हा तपासला व त्यावरचा फोन नंबर पाहिला. फोन नंबर 078 ने सुरू होत होता. तो टेस्सिनचा नंबर होता. अगदी दक्षिणेकडचा. ल्युगानो, लोकार्नो, अस्कोना अशी शहरे तिथे वसलेली होती. त्याला आता पहिला धागादोरा सापडला होता.

त्याच वेळेस त्याने कुब्लरला आत आलेले पाहिले. तो एखाद्या स्वयंचलित यंत्रासारखा चालत, त्यांच्यापाशी पोहोचला. "आरडीएक्स." तो म्हणाला, "इथे त्याचा भरपूर साठा आहे."

आरडीएक्स ही प्रसिद्ध आद्याक्षरे होती. रॉयल डिमॉलिशन एक्स्प्लोझिव्ह. ब्रिटिश हे त्याचे निर्माते होते व दुसऱ्या महायुद्धात त्याचा वापर केला गेला होता. आता तर सर्व अण्वस्त्राशस्त्रांमध्ये आरडीएक्स असतेच.

व्हॉन डॅनिकनला वेड लागायची पाळी आली होती. मधमाशी, मार्गाचे अचूक निर्देश करणारी कंपनी आणि आता आरडीएक्स. "पण मला तर इथे कुठेच दिसलं नाही?" त्याने आश्चर्य व्यक्त केले. "मग ते कुठे दडवलेलं असेल?"

"आत्ता ते इथे नाहीये. मला फक्त त्याचा छडा लागलाय. पण इथे आरडीएक्स साठा अगदी आत्ताआत्तापर्यंत होता."

"तुझा काय अंदाज? नेमका कधीपर्यंत तो साठा इथे होता?"

कुब्लरने आपल्या उपकरणातील आकडे पुन्हा एकदा तपासले. "जास्तीतजास्त चोवीस

तास उलटून गेले असावेत.”

म्हणजे जी.बी.बरोबर ठरवलेल्या भोजनापूर्वी.

“साठ सेकंद,” क्रॅजेक म्हणाला, “वॉचमनची गाडी फक्त तीन चौक दूर आहे.”

“बाहेर पडा.” ड्रॉइंगचे फोटो काढता काढता व्हॉन डॅनिकनने फर्मान सोडले. कुब्लर कार्यशाळेच्या बाहेर पडला. मायर्सही त्याच्या पाठोपाठ निघाला. व्हॉन डॅनिकन दरवाजापर्यंत पोहोचला व दिवे विझवणार होता, तोच त्याची नजर त्या वस्तूकडे गेली.

लहान भावंडं.

खोलीच्या एका टोकाला, लाकडी मांडणीखाली आणखी एक MAV ठेवलेले होते. ऑफिसमधल्या MAV पेक्षाही त्याचा आकार अधिक लहान होता. जवळजवळ निम्मा. पंख मात्र वेगळ्या तऱ्हेने कापलेले होते. त्रिकोणी. ते एका बिजागरीला जोडले होते व पक्षाच्या पंखांसारखे वर-खाली होत होते.

थांबायचे की बाहेर पडायचे अशा द्विधा मन:स्थितीत असताना, त्याने अचानक पुढे जाऊन ते इवलेसे विमान उचलले. वजन पाचशे ग्रॅमहून जास्त नव्हते. अगदी पिसाएवढे नसले तरी ते कमालीचे हलके होते.

“म्हणजे ते उडू शकतं?” आज दुपारी मिशेला मेंझला त्याने हा प्रश्न विचारला होता.

“अर्थात.” मेंझला तो प्रश्न झोंबला होता. “त्याचा शुभारंभच मुळी आम्ही एका खाजगी हवाईतळावरून केलाय.”

पंखांच्या आतल्या बाजूस एका तलम व लवचीक कापडाचे आवरण घातलेले होते व त्याला फुलपाखराचा रंग दिला होता. गडद पिवळा व त्यावर काळे पट्टे.

मायर दरवाजातून डोकावला. “भल्या गृहस्था, तू काय करतोयस? आता एक क्षणही इथे थांबणं धोक्याचं आहे.”

व्हॉन डॅनिकनने त्याला ते MAV दाखवले. “ह्याच्याकडे जरा बघ.”

“फेकून दे ते.” मायर कडाडला. “ही काय फुलपाखराबरोबर खेळत बसायची वेळ आहे?”

२१

efJnSVee शहराच्या सीमेलगत असलेल्या सेबॅस्टियन्स डॉर्फ या गर्द झाडीने वेढलेल्या खेड्यामधील खास शिकारीस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या फ्लिमिलेन या लॉजच्या खिडक्या लखलखीत दिव्यांनी उजळल्या होत्या. सम्राट फ्रँझ जोसेफच्या एकांतवासासाठी उभारलेल्या त्या विश्रामगृहाची रया, आपल्या मालकाच्या मृत्यूबरोबरच पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस पार निघून गेली होती. त्यानंतर जवळजवळ चाळीस वर्षं त्याचा कुणी वापर तर केला नव्हताच; पण त्याकडे कुणी ढुंकूनही पाहिले नव्हते. खिडक्यांच्या काचा फुटल्या होत्या, दरवाजाचे लाकूड कुजले होते आणि ढासळलेल्या भिंतीमधले दगडही दुसऱ्या बांधकामासाठी वापरले गेले. त्या गर्द झाडीने जणू ते गिळंकृत करून टाकले होते.

आणि अचानक १९६५ साली त्या लॉजचे पुनरुज्जीवन करण्यात आले. कामगार आणले गेले, बांधकामाचे साहित्य पुरवले गेले आणि पाहतापाहता ते विश्रामगृह पुन्हा नव्या दिमाखात उभे राहिले. आधुनिक तऱ्हेच्या खिडक्या, मजबूत लाकडाचे दरवाजे व शिवाय पहारेकऱ्यासाठी एक खास चौकी. एका आंतरराष्ट्रीय संघटनेने फ्लिमिलेनचा ताबा घेतला. तिथे अत्यंत खाजगी व गुप्त मसलती होऊ लागल्या. ती संघटना सरकारपुरस्कृत नसली तरी तिचा हेतू मात्र युद्ध व विध्वंस रोखण्याचाच होता.

त्या ऐसपैस दिवाणखान्यातील गोलाकार टेबलापाशी चार पुरुष व एक स्त्री असे पाच जण बसलेले होते. चर्चेच्या अध्यक्षस्थानी असलेला इसम हा मध्यपूर्व राष्ट्रांचा मुख्य प्रतिनिधी होता. गंभीर चेहऱ्याच्या त्या माणसाचे केस रूपेरी होते व त्याने मिशा राखलेल्या होत्या. बुद्धिमान माणसे वापरतात तसा अरुंद आकाराचा चश्मा त्याने घातला होता आणि तो खरोखरच विद्वान गृहस्थ होता. कायदा व मुत्सद्देगिरी या विषयातील पदव्या त्याने कैरो आणि न्यूयॉर्क विद्यापीठातून संपादन केलेल्या होत्या. मध्यरात्र झाली होती. इतरांनी आपल्या शर्टाची कॉलर व गळ्यातले टाय सैल केले असले तरी याने मात्र अंगातले जॅकेट उतरवले नव्हते व टायची गाठही सोडली नव्हती. त्याने आपल्या पदाचा कार्यभार अत्यंत गांभीर्याने व अभ्यासपूर्वक उचलला होता. त्याबद्दल जागतिक शांततेचे नोबेल पारितोषिक देऊन त्याला गौरवण्यात आले होते. जगाचे भवितव्य घडवण्याची ताकद असलेली व तरीही स्वभावाने नम्र व मृदू असणारी फारच मोजकी माणसे अस्तित्वात असतात. त्यांच्यापैकी तो एक होता.

त्याच नाव हात, माहम्मद एलबरादा. इटरनशनल आटामक एनजा एजन्साचा तो अध्यक्ष होता.

“हे खरं असू शकत नाही.” टेबलावर पडलेल्या एका अहवालावर बोट ठेवत तो म्हणाला.

“मला वाटतं त्यात अविश्वासार्ह असं काहीच नाही.” त्याच्या शेजारी बसलेल्या

गृहस्थाने त्याचे म्हणणे खोडून काढले. तो युरी कुलीकोव्ह होता. निमुळत्या चेहऱ्याचा रशियन व IAEA मधील आण्विक उर्जा विभागाचा प्रमुख.

“पण कशावरून?” जमलेल्या सर्वांचे चेहरे शांतपणे निरखत, एलबरादीने विचारले. “हा अहवाल जर सत्य असेल तर त्याचा अर्थ असा होतो की, आपण सर्व जण, आपले कर्तव्य निभावण्यात सपशेल अयशस्वी ठरलो आहोत.”

“समाजव्यवस्थेची घोर फसवणूक करणारी ही योजना आहे.” कुलीकोव्ह म्हणाला. “खेकड्याच्या चालीचा हा खेळ आहे. वर्षानुवर्षं आपण फक्त एका विशिष्ट ठिकाणावरच आपलं लक्ष केंद्रित केलेलं होतं. त्यांनी मात्र अत्यंत गुप्तपणे एक वेगळाच मार्ग शोधला.”

तिथे जमलेले सर्वच जण हे IAEA च्या सचिवालयातील उच्चपदस्थ होते. आण्विक शास्त्र कार्यकारी विभागाचा प्रमुख, ओनिगुंची हा जपानी होता. बॅन्डत ही त्या खोलीत असलेली एकमेव ऑस्ट्रियन स्त्री, तांत्रिक विभागाची प्रमुख होती. फिनलण्डच्या पेक्कोननकडे IAEA च्या सर्वांत नावाजल्या गेलेल्या सुरक्षा तपासणी विभागाचा कारभार सोपवण्यात आला होता.

“तपशिलाच्या अचूकपणाविषयी शंका घेण्याचा प्रश्नच उद्भवू शकत नाही.” पेक्कोनने सांगितले. “कारण त्यासाठी सेन्सरमध्ये अत्याधुनिक चिप वापरण्यात आली होती. ज्यामध्ये आधीच्या चिपपेक्षा दहा पटीने अधिक प्रमाणात उत्सर्जित होणारे गॅमा किरण पकडण्याची क्षमता आहे.”

एलबरादी हा काही प्रशिक्षित संशोधक नव्हता. परंतु व्हिएन्नाच्या IAEA मधील वीस वर्षांच्या अनुभवानंतर, त्याचे आता आण्विक पदार्थ विज्ञानाच्या मूलतत्त्वांचे उत्तम अध्यापन झाले होते. युरेनियम व प्लुटोनियमसारख्या पदार्थांमधून अत्यंत अपायकारक किरणांचे उत्सर्जन होत असते. जर त्याचे अचूक मापन करता आले तर त्यातील हानिकारक द्रव्याची क्षमता व कालमान समजू शकते आणि त्यापेक्षाही तिथे जमलेल्या मंडळींच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची असलेली गोष्ट म्हणजे त्यामागचा हेतू चटकन लक्षात येतो.

युरेनियम हा आपल्या मूल स्वरूपात आण्विक प्रक्रियेला उत्तेजक ठरू शकत नाही. युरेनियम-२३५ या भिन्न मूलद्रव्याशी त्याचा संयोग करून त्याला अधिक सक्षम बनवावे लागते. सर्वांत सोपी पद्धत म्हणजे जलद वेगाने फिरणाऱ्या एका पोलादी केंद्रोत्सारी पिंपात युरेनियम हेक्झाफ्लुरोड वायूवर प्रक्रिया घडवून आणणे. हीच प्रक्रिया अधिक जलद करण्यासाठी एका शेजारी एक अशा अनेक पिंपांचा वापर करून त्यात तो वायू खेळवला जातो.

त्याचा वापर आण्विक निर्मिती केंद्रांमध्ये करण्यासाठी त्याची क्षमता तीस टक्क्यांनी वाढवावी लागते. त्यातून आण्विक विखंडक पदार्थ बनवण्यासाठी तर त्याची क्षमता नव्वद टक्क्यांनी वाढवावी लागते. एलबरादीसमोर असलेला अहवाल सांगत होता की, तिथे गॅमा किरणांची क्षमता शहाण्णव टक्क्यांनी वाढवण्यात आली होती.

“ते फुलपाखरू आपल्या उद्देशित क्षेत्रावर सतत सात दिवस घिरट्या घालत होतं.” पेक्कोनन सांगत होता. “त्या कालावधीत त्याने वातावरणविषयक अनेक प्रकारची माहिती पोहोचवलेली असेल. ती सर्वच माहिती चुकीची असू शकेल असं आपण म्हणू

शकत नाही.”

“पण हे आकडे तर अगदी टोकाचे आहेत.” एलबरादीने निषेध व्यक्त केला. “आपल्यापासून ही माहिती कशी काय लपून राहिली?”

“जमिनीखाली खूप खोलवर जाऊन ही सुविधा तयार करण्यात आली होती; मात्र भूगर्भातील एक जलाशय शोधला जात आहे असा देखावा निर्माण केला गेला होता.”

“तर मग हा बुरखा आपण कसा काय फाडू शकलो?”

पेक्कोनन पुढे झुकला व हळू आवाजात बोलू लागला. “युनोमधील एका अमेरिकन प्रतिनिधी मंडळाने ही अफवा आपल्यापर्यंत पोहोचवली. त्यांना इराण सरकारच्या अगदी आतल्या गोटातून ही बातमी मिळाली होती. आपण यामागची सत्यासत्यता पडताळून पाहू याची अमेरिकनांना खात्री होती. देशाच्या दक्षिणेकडे सुमारे शंभर मैलांवर आपण एक तपासणी पथक तयार ठेवलेलं आहे. कुणाच्याही नजरेस न पडता, आपण त्या ठिकाणाहून फुलपाखरांच्या हालचालींचं निरीक्षण केलं.”

“आणि तू हे सर्व माझ्या परवानगीशिवाय केलंस? अशी गोष्ट करताना आपण यजमान राष्ट्राला त्याची पूर्ण कल्पना देऊन त्यांचं सहकार्य घेऊ, असा आपण करार केलेला आहे. तो ही तू मोडलास?”

पेक्कोननने शांतपणे मान डोलावली.

“छान केलंस.” एलबरादी उपहासाने म्हणाला. “आपल्या ह्या कामाची अमेरिकनांना कल्पना आहे?”

“नाही सर.”

“मग ही गोष्ट आता गुप्तच राहू देत.” एलबरादीने सर्वांचे चेहरे पुन्हा एकदा निरखले. “वर्षापूर्वी आपलं असं एकमत झालं होतं की, इराण सरकारकडे एकूण पाचशे सेंट्रीफ्यूजेस व ते अर्धा किलो युरेनियमची क्षमता साठ टक्क्यांहून अधिक वाढवण्यात यशस्वी झालेले आहेत. परंतु इतक्या कमी क्षमतेतून आण्विक शस्त्रास्त्रं बनवता येत नाहीत. मला आता सांग की, आपल्याला मिळालेले आकडे खरे असतील तर आता त्यांच्याकडे किती सेंट्रीफ्यूजेस उपलब्ध असतील?”

“पन्नास हजारांहून अधिक.” ओनिगुंची म्हणाला.

“आणि त्यांनी ती कुठून मिळवली? हे बघ, आपण केवळ बनावट आयपॉड्सबद्दल बोलत नाही आहोत. जगातील सर्वांत भयानक अशा शक्तिशाली विध्वंसकाची आपण इथे चर्चा करतोय.”

“यामध्ये तस्करीचा वापर केला गेला ही तर गोष्ट अगदी स्पष्ट आहे.”

“आहे स्पष्ट.” एलबरादीने पुनरुच्चार केला. “पण ही तस्करी कुणी केली? कुठून केली? फक्त याच कामासाठी आपण चारशे इन्स्पेक्टर्स नेमलेले आहेत. पाच मिनिटांपूर्वीपर्यंत माझं मत होतं की, ते आपल्या कामात अत्यंत वाकबगार आहेत.” त्याने आपल्या डोळ्यांवरचा चश्मा काढून टेबलावर ठेवला. “तर मग? त्यांच्याकडे शस्त्रनिर्मितीसाठी आवश्यक अशा किती युरेनियमचा साठा असू शकेल?”

पेक्कोननने एलबरादीची नजर टाळली. “सर, आम्ही या निष्कर्षाप्रत आलो आहोत की, आजच्या घडीला इराण सरकारकडे युरेनियम-२३५ या उच्च प्रतीच्या युरेनियमचा

सुमारे शंभर किलो साठा आहे.”

“शंभर? आणि त्यापासून ते किती बॉम्ब बनवू शकतात?”

पेक्कोननने आवंढा गिळला. “चार किंवा कदाचित पाच.”

मोहम्मद एलबरादीने पुन्हा आपला चश्मा डोळ्यांवर चढवला. चार किंवा कदाचित पाच. तो हजारही म्हणू शकला असता. “जोपर्यंत या सर्व माहितीचं अचूक व स्वतंत्रपणे मूल्यांकन होत नाही तोपर्यंत ह्या खोलीतील कुणीही त्या आकड्यांचा पुनरुच्चार करणार नाही.”

“पण आपल्याला चर्चा तर –” मिली ब्रँडत म्हणत होती.

“एक शब्दही नाही.” एलबरादीने ठणकावले. “अमेरिकनांपाशी नाही. व्हिएन्नामधील आपल्या सहकाऱ्यांपाशीही नाही. पूर्ण मौन राखलं गेलं पाहिजे. आपल्याला अचूक माहिती मिळण्यापूर्वीच मला एकही दुर्घटना घडायला नको आहे.”

“पण सर, आपल्यावर ही जबाबदारी सोपवली गेलीय.” ती पुन्हा म्हणाली.

“मला आपल्या जबाबदारीची पूर्ण कल्पना आहे. माझ्या बोलण्याचा अर्थ तुमच्या लक्षात येतोय?”

मिली ब्रँडतने नाइलाजाने मान डोलावली पण तिच्या नजरेतून एक वेगळाच अर्थ सूचित होत होता.

“आजची बैठक संपलेली आहे.”

इतर सर्व निघून जाईपर्यंत एलबरादी आपल्याच जागी शांतपणे बसून राहिला. पिसाटलेल्या वाऱ्याचा आवाज, तो ऐकत राहिला. मनात थैमान घालणाऱ्या विचारांनी त्याला असह्य यातना होत होत्या. अखेर दरवाजा बंद झाला. सर्व आवाज विरून गेले. तो एकटा उरला होता.

हाताची ओंजळ करून तो रात्रीच्या त्या प्रशांत अवकाशाकडे एकटक पाहू लागला. तो वृत्तीने धार्मिक नव्हता. पण आज मात्र त्या आकाशाच्या बापासमोर त्याचे हात, त्याच्याही नकळत जोडले गेले होते. जर त्या अहवालातली बातमी ह्या खोलीबाहेर पसरली गेली तर त्याचे परिणाम तत्काळ होणार होते व ते तितकेच उद्ध्वस्त करणारे ठरणार होते.

“देवा, पृथ्वीतलावरील प्रत्येक माणसावर आपलं कृपाछत्र धर.” तो पुटपुटला. “महायुद्ध सुरू होणार आहे.”

२२

उड्डाणापूर्वीची सर्व तपासणी पूर्ण झाल्यावर वैमानिकाने विमानाच्या पंखांवरून शांतपणे हात फिरवला. इंधनाचा भरपूर साठा होता. विमानातील हवेची पातळी योग्य प्रमाणात राखली होती. पक्षी हवेत झेप घ्यायला सज्ज झाला होता. तो आपल्या बुटांनी छोटेछोटे खडे उडवत, धावपट्टीवरून मजेत चालू लागला.

आज रात्री विमानउड्डाणाची अखेरची चाचणी होणार होती. आजपर्यंत भर दिवसा जशी रंगीत तालीम घेतली गेली होती, अगदी तशीच चाचणी आत्ताही घेतली जाणार होती. सरावातील सातत्यामुळे अचूकपणा येतो व एकदा अचूकपणा साधला की यश पाठोपाठ येतेच. आपल्या कठोर परिश्रमामधून, तो हा नियम शिकला होता. त्याच्या अंगावर अनेक व्रण व खुणा होत्या. अज्ञाताबदलच्या अज्ञानामुळे तो भोग त्याला भोगावा लागला होता. तो विमानापाशी परतला आणि दरवाजातून आत शिरण्यापूर्वी त्याने विमानाच्या पंखावर दोन चापट्या मारल्या. त्याला दैवाची साथ हवी होती.

युद्धामध्ये भाग घेऊन आता त्याला बरीच वर्षे झाली होती. त्या वेळेस तो तरुण होता. बेफिकीर होता. देखणाही होता. पियक्कड आणि स्त्रीलंपट. नीतिमत्तेचा रस्ता त्याने निर्लज्जपणे नाकारला होता. त्याने आरशात आपला चेहरा पाहिला. तारुण्य ओसरलं होतं, बेफिकीरपणा उरला नव्हता आणि देखणेपणाची तर खूणही शिल्लक राहिली नव्हती.

आरशात आपला चेहरा बघता बघता त्याच्यासमोर सारा भूतकाळ उभा राहिला. त्या घटनेला आता बरीच वर्षे झाली असली तरी त्याच्या आयुष्यातल्या त्या काळ्याकुट्ट दिवसाची आठवण त्याच्या मनात अगदी ताजी होती. एखाद्या बेसावध क्षणी ती अचानक येऊन भुतासारखी त्याच्या मानगुटीवर बसायची. नुसत्या आठवणीनेच त्याला कापरे भरायचे आणि अपराधीपणाच्या ज्वालेत तो होरपळून जायचा. वाळवंटातली ती संध्याकाळ त्याला आठवली. उत्साहाला उधाण आले होते, विजय तर अगदी नजरेच्या टप्प्यात होता, ईश्वर आपल्या बाजूला आहे, ह्याची खात्री पटली होती. सर्वत्र एकच जल्लोष सुरू होता. मित्रांच्या, सहकाऱ्यांच्या आणि बांधवांच्या हास्यकल्लोळाने त्याचे कान भरून गेले होते.

आणि अचानक गहजब झाला. निसर्गाने रौद्र रूप धारण केले. पाहता पाहता, प्रचंड वेगाने गरगर फिरणारा वाळूचा एक महाकाय ढग आकाशात मैलभर उंच उसळला. त्या ढगाने तिथे असलेल्या सर्वांना विमानासकट आपल्या कवेत घेतले आणि किडामुंगीसारखे दहा दिशांना भिरकावून देत, हाहाकार उडवून दिला.

आगीचे डोंब उसळले. आठ माणसे आगीच्या भक्षस्थानी पडली आणि पाच माणसे होरपळून निघाली. त्यामध्ये तो एक होता. त्याच्या शरीराचा सत्तर टक्के भाग भाजला होता.

त्यापुढचे दिवस म्हणजे– शरीराचे यातनाघर झाले होते आणि मनामध्ये संभ्रमाच्या सावल्याच सावल्या पसरलेल्या होत्या– पण अचानक त्याच्या लक्षात आले की आपल्याला वाचवण्यामागे ईश्वराचा एक निश्चित उद्देश असावा. त्याचसाठी ही दुसरी संधी आपल्याला दिली गेलीय. त्याच्या अंगावरच्या जखमांचे डाग, त्याला या संधीची सतत आठवण करून देत राहिले; ईश्वरी आज्ञेचा अवमान केल्याबद्दल त्याला शिक्षा मिळाली होती. पण देवाने त्याच्या शरीरसंपदेवर घाला घातला असला तरी त्याच्या मनात एका दैवी जाणिवेचा अंकुर उमटवला होता. तो आता परमेश्वराच्या निकट आला होता आणि परमेश्वर त्याच्याशी प्रत्यक्ष बोलू लागला होता. परमेश्वराने त्याला आपला खास दूत बनवला होता. त्या सर्वांमागे एक हेतू होता आणि हेतुपूर्तीचा दिवस जवळ येऊन ठेपला होता.

विमानातल्या विश्रांतीकक्षात त्याने आपल्या सर्व सहकाऱ्यांना एकत्र गोळा केले. सर्वांनी एकमेकांचे हात पकडले.

“देवाधिदेव, आम्ही आपल्या पायापाशी विनम्र प्रार्थना करत आहोत. आपल्या दैवी खजिन्यातून अशा एका नररत्नाचा उदय होऊ दे की जो पूर्ण, पवित्र आणि आश्वासक महामानव असेल. जो या विश्वात न्याय व शांती प्रस्थापित करेल.”

गोलाकार कडे मोडले गेले व जो तो आपापल्या जागी निघून गेला.

वैमानिकाच्या केबिनमध्ये शिरताना, त्याच्या मनावरचा ताण जाणवत होता. त्याच्या काळातील केबिनमध्ये व आजच्या अत्याधुनिक केबिनमध्ये बराच फरक पडला होता. पूर्वी केबिनमध्ये तबकड्यांची व उपकरणांची एकच गर्दी झालेली असे. आज भिंतीवर पसरट आकाराच्या पडद्याचे सहा संगणक ठेवलेले होते. विमानातील महत्त्वाच्या कार्याची त्यामधून माहिती पुरवली जात होती. तो आपल्या खुर्चीत बसला व मग एकाग्र करू लागला. त्याने जॉयस्टिकवर नियंत्रक दांड्यावर हात ठेवला व बराच वेळ त्याचा अंदाज घेत राहिला.

“सर्व यंत्रणेची तपासणी पूर्ण झालीय.” एका तंत्रज्ञाने जाहीर केले, “नियंत्रक कक्षाशी आपण जोडले गेलेले आहोत. उपग्रहांबरोबरचा संपर्क साधला गेलेला आहे. चित्रफीत सुरू केलेली आहे.”

“सिद्धता पूर्ण.” वैमानिकाने इंजीन सुरू केले. नियंत्रक बोर्डावरील हिरवे दिवे चमकू लागले. टर्बोफॅन इंजिनाने आपली दिशा वळवली आणि उड्डाणापूर्वीच्या धावपट्टीवरून विमान सावकाश पुढे सरकू लागले.

रात्रीचे दोन वाजले होते. कॉकपिटमधून समोर फक्त अंधारच अंधार दिसत होता. ज्या ठिकाणी ती चाचणी घ्यायची होती त्या आल्प्स पर्वताच्या दरीत एकही दिवा चमकत नव्हता. त्याने नियंत्रक बोर्डाच्या मध्यभागी असलेल्या संगणकाच्या पडद्यावर आपले लक्ष केंद्रित केले. हिरवीगार धावपट्टी, पडद्यावर अतिशय लोभस वाटत होती. सोडा प्यायच्या स्ट्रॉमधून आपण जगाकडे पाहतोय असे त्याला वाटले.

“विमान उड्डाणाची परवानगी आहे?”

“हो. परवानगी आहे. आपला प्रवास सुरक्षित होतो. अल्लाहु अकबर. ईश्वर महान आहे.” वैमानिकाने नियामक झडप पुढे सरकवली. ब्रेक मोकळे केले व विमान धावपट्टीवरून वेगाने जाऊ लागले. ताशी शंभर नॉटिकल मैलाचा वेग पकडताच पुढची

चाके वरच्या दिशेला फिरली आणि विमानाने आकाशात झेप घेतली.

वैमानिकाने रडार तपासले. दरीभोवती उंचच उंच पर्वतांच्या रांगा पसरलेल्या होत्या. त्यातील काही पर्वत तर चार हजार मीटर्स उंचीचे होते. ते स्थळ काही सर्व दृष्टीने सुयोग्य म्हणता आले नसते, पण तिथे एका गोष्टीची पूर्तता होत होती. तिथे कमालीचा एकांत होता. त्याने विमानाचा वेग अडीचशे नॉट्सपर्यंत वाढवला आणि पंखांवरच्या झडपा नीट जुळवून घेतल्या. त्याने दिलेल्या सूचना, त्या विमानाने किंचित विलंबाने पण तितक्याच सफाईने कार्यवाहित केल्या. त्याने उजवीकडील दिशा पकडली व आपण विमानाबरोबर कलतो आहोत हे त्याच्या लक्षात आलं.

"चाचणी क्रमांक एक, सुरू करा." संपूर्ण दरीला एक वळसा घातल्यावर त्याने आज्ञा दिली.

वैमानिकाने पुन्हा आपले लक्ष रडारवर केंद्रित केले. सेकंदभर झाला असेल आणि रडारवर एक 'ब्लिप' उमटला. 'लक्षय' आता सहा किलोमीटर दूर होते व वेगाने वर सरकत होते. त्याने संपर्क बटण दाबले व त्या ब्लिपला 'अल्फा-१' असे नाव दिले. त्याच क्षणी संगणकावर 'लक्षया'कडे जाणाऱ्या मार्गाचा आलेख मुद्रित झाला होता.

"लक्षयभेदाची तयारी सुरू करत आहोत. दोन मिनिटं व दहा सेकंदांनी संपर्क साधा."

"दोन मिनिटं दहा सेकंद मोजायला सुरुवात झालीय." नियंत्रक कक्षकडून उत्तर मिळाले.

वैमानिकाने आपले विमान लक्षयाच्या मागील बाजूस, अगदी सरळ रेषेत आणले. तो ब्लिप पडद्याच्या मध्यभागाकडे सरकू लागला. आता तो एक किलोमीटर दूर व विमानाखाली दोनशे मीटर अंतरावर आला होता. नेमक्या त्याच वेळी विमान एका ढगामध्ये घुसले. तो दृष्टिविहीन झाला. त्याने दुसरा संगणक तपासला. लाल किरणांमागील अदृश्य उष्णतादायक किरणांचा वेध घेण्याची क्षमता त्या संगणकामध्ये होती. संगणकाने उष्णतेचा निर्देश केला नाही. वाऱ्याचा प्रचंड झोत आला. बझर वाजू लागला. धोक्याची सूचना दिली गेली. त्याच्या मणक्यातून भीतीचा थंडगार शहारा सणसणत उठत गेला. त्याला वाळवंटातल्या त्या रात्रीची आठवण झाली. त्याला वाटले, आज पुन्हा एकदा गहजब होणार.

तुमच्या हाती असलेल्या उपकरणांवर संपूर्ण विश्वास ठेवा. वैमानिकाला शिकवला गेलेला हा सर्वांत महत्त्वाचा नियम.

त्याला ती टक्कर आठवली. जेट इंजिनाचे तेल त्याच्या अंगावर पसरले होते, त्याचा सहवैमानिक जळून भस्मसात झाला होता. जळणाऱ्या शरीराचा महाभयानक वास. शरीरातून लोंबणारं त्याचं मांस.

तुमच्या उपकरणांवर अतूट श्रद्धा ठेवा.

या खेपेस दुसराच एक आवाज त्याच्याशी बोलत होता. शांत, आश्वासक आवाज. माझ्यावर विसंबून राहा, तो म्हणाला.

त्याने जॉयस्टिकवर हात ठेवला व नियामक झडप पुढे सरकवली. विमानाचा वेग तीनशे नॉट्स होता. विमानाचे नाक दिसू लागले. अचानक तो ढगापार आला होता. वर तारे चमकताना दिसत होते. नाडीचे ठोके पुन्हा मंद पडू लागले; पण त्याची पाठ मात्र घामाने निथळून गेली होती.

पुन्हा एकदा त्याने आपले विमान लक्षयाच्या बरोब्बर पाठीमागे नेऊन ठेवले. त्याने विमानाचा वेग पाचशे नॉट्सवर नेला व क्षेपणास्त्र सज्ज ठेवले. 'लक्षय' नजरेच्या टप्प्यात आले. त्याचा देवमाशासारखा आकार समोर झुलू लागला. त्याने वेग आणखी वाढवला आणि लक्षयभेद आता अगदी जवळ येऊन ठेपला.

तीन... दोन... एक.

लक्षयावर शस्त्र आदळले. पडद्यावरचा ब्लीपचा ठिपका पुसला गेला.

अल्फा-१ अदृश्य झाले होते.

"थेट धडक. लक्षयभेद यशस्वी." नियंत्रण कक्षाने जाहीर केले. "चाचणी पूर्ण." सहकाऱ्यांच्या आनंदाला उधाण आले. या खेपेस तयार केले गेलेले 'लक्षय' हे संगणकनिर्मित होते.

वैमानिकाने त्या दरीभोवती एक गोल फेरी मारली व विमान सफाईदारपणे जमिनीवर आणले. कॉकपिटमधून तो बाहेर आला व नियामक कक्ष पार करत तो विमानाच्या एका मोठ्या खिडकीपाशी आला. खिडकीचा पडदा त्याने दूर सारला. खाली रस्त्यावर, त्याने आत्तापर्यंत बाहेरून नियंत्रित केलेले ते मधमाशी नामक विमान शांतपणे पडून होते. त्या भोवती एका पथकाने आता आपले काम सुरू केले होते. पाहता पाहता त्या इटुकल्या विमानाचे सर्व भाग विलग केले गेले.

वैमानिकाने नजर झुकवत आभार मानले.

पुढच्या खेपेस खरी कसोटी होती.

२३

त्याने घड्याळ पाहिले. चार वाजून एक्केचाळीस मिनिटे. पहाट फुटत होती. रस्त्याच्या कडेला गाडी लावत, जोनाथनने इंजीन बंद केले. गाडीच्या काचांवर पाऊस कोसळत होता. त्याच्यासमोर एक तीन मजली दगडी इमारत धुकं लपेटून उभी होती.

"अरे पण, ते अजून उघडलंय कुठे?" सीमॉन म्हणाली, "इथे एक माणूससुद्धा नाही."

दुसऱ्या मजल्यावरच्या कठड्यावर वाळत घातलेल्या दोन पँटींकडे जोनाथनने बोट दाखवले. "तो स्टेशनमास्तर ऑफिसच्या वरच राहातो." त्याने तिच्यासमोर हाताचा पंजा उघडा धरला. "तुझ्याजवळच आहे ना ते?"

पर्स चाचपत तिने सार्जंट ऑस्कर स्टुडरचे ओळखपत्र बाहेर काढले. "आणि जर त्याने तुझ्यावर विश्वास ठेवला नाही, तर?"

"पहाटेचे पाच वाजताहेत. इतक्या सकाळी आपल्या दरवाजावर आलेल्या पोलिसाला उलट प्रश्न करण्याचा विचारही त्याच्या मनात येणं शक्य नाही. शिवाय मी काही दिवसाढवळ्या ते ओळखपत्र त्याच्या डोळ्यांसमोर नाचवत नाहीये. तसं करण्यासाठी मला चाळीस पौंड वजन वाढवावं लागेल, डोक्याचं टक्कल करावं लागेल आणि दोन-तीन वेळा नाक आपटवून घ्यावं लागेल. बघ जरा, तुला दिसतंय?" जोनाथनने ते ओळखपत्र आपल्या चेहऱ्याशेजारी ठेवलं. सीमॉनने आपले डोके पुढे-मागे करत त्या अंगठ्याएवढ्या फोटोवर नजर रोखण्याचा प्रयत्न केला. त्याने तिला तीन सेकंद दिली व ते ओळखपत्र तिच्या आणखी जवळ नेले. आता?"

"केवढा काळोख आहे. मला काहीसुद्धा दिसत नाही."

"तेच तर म्हणतोय मी."

पण सीमॉनची समजूत इतकी सहज पटणारी नव्हती. "पण तुला हवं ते सापडेल असं कशावरून वाटतंय?"

जोनाथनने आपल्या खिशातून त्या पावत्या काढल्या आणि ओळखपत्रामध्ये खोचून ठेवल्या. "परत मिळण्याची खात्री असल्याशिवाय कुणी उगाच असे पैसे पाठवत नाही."

सीमॉनला त्याचे म्हणणे पटले नव्हते. तिने हाताची निमूट घडी घातली. आधी आणलेल्या उसन्या अवसानाने ती पार कोमेजून गेली होती. चेहरा उतरला होता. ती वयस्कर दिसू लागली होती. जोनाथनला पुन्हा एकदा एका चुकीच्या कामात साथ द्यायला, तिचं मन तयार नव्हते. "जोन, तुला खरंच सांगते. आपण अजून थोडी वाट पाहायला हवी."

"ड्रायव्हरच्या सीटवर जाऊन बस. मी जर पंधरा मिनिटांत परतलो नाही तर तू गाडी घेऊन निघून जा."

गाडीचा दरवाजा उघडत तो भर पावसात चालू लागला.

“स्स?”

पायजमा घातलेला व दाढी वाढलेला एक माणूस डोळे किलकिले करत दरवाजाच्या फटीतून पाहत होता. त्याची नजर जावी म्हणून जोनाथनने तो पोलिसी बिल्ला मुद्दाम वर धरला. ‘सायनर ओरसिनी’ तो खास इटालियन कामगाराच्या टेचात म्हणाला. “ग्राऊबंडन कँटनपोलीस. आम्हाला तुझी मदत हवीय.”

ओरसिनीने तो बिल्ला खेचत डोळ्याजवळ आणला. “दिवस उजाडेपर्यंत न थांबण्याइतकं काय महत्त्वाचं काम अडलंय?” बिल्ल्यांच्या हेलकाव्याकडे व समोर उभ्या असलेल्या माणसाकडे त्याची नजर एकसारखी पुढे-मागे होत राहिली.

“दिवस सुरू झालाय.” त्याने बिल्ला मागे ओढला व दरवाजा अडवत तो अशातऱ्हेने उभा राहिला की, त्या स्टेशनमास्तरला एक पाऊल मागे सरावे लागले. “खून झालाय. माझ्याच एका सहकाऱ्याचा. तू बातम्यांत ऐकलंच असशील.”

बिल्ल्यावरच्या फोटोबद्दल तो काहीतरी बोलेल याची वाट पाहत तो क्षणभर गप्प राहिला. पण झाल्या प्रकाराने ओरसिनी पार त्रासून गेला होता. “मी नाही पाहिलं.” तो म्हणाला. “मला कुणी कळवलंही नाही.”

जोनाथनने आपली सरबत्ती सुरूच ठेवली. कुणी त्याला सांगितले किंवा नाही, याबद्दल त्याला काहीच देणेघेणे नव्हते. “काही तासांपूर्वी आमच्या लक्षात आले की, संशयिताजवळ असलेल्या बॅगा ज्या गाडीतून पाठवल्या गेल्या, ती गाडी तुझ्या स्टेशनवरून निघालेली होती. आमच्याकडे बॅगांच्या पावत्या आहेत. ज्या कुणी त्या बॅगा तुझ्यापाशी आणून दिल्या होत्या, त्या माणसाचं आम्हाला नाव हवंय.”

“तुझ्याकडे तशी लेखी परवानगी आहे?”

“अर्थातच नाही. तितका वेळच नव्हता. तो खुनी ह्याच दिशेने पसार झालाय.”

त्या बातमीने ओरसिनीच्या चेहऱ्यावरची रेषही हलली नाही. “मारिओ कुठेय? लेफ्टनंट मारिओ?”

“त्यानेच मला सरळ स्टेशनवर जायची सूचना केली.”

ओरसिनीला हे उत्तर पटले असावे. त्याने सैल झालेला पायजमा घट्ट बांधला. “एक मिनिट थांब.” दरवाजा बंद झाला.

पाच मिनिटांनी ओरसिनी बाहेर आला. केस विंचरलेले होते. चेहरा धुतलेला होता व त्याने करड्या रंगाची पँट आणि निळ्या रंगाचे जाडजूड जॅकेट घातले होते. जोनाथन त्याच्या मागोमाग चालत खाली तिकीट ऑफिसात आला.

दुसऱ्याच मिनिटाला ओरसिनीने काँप्युटर चालू करत आपल्या कामाला सुरुवात केली होती. “आपण बघू या हं... लँडक्वार्टला पाठवलंय... काल दुपारीच बॅगा ताब्यात घेतल्याहेत... छे. छे. फारच उशीर झालाय. एकदा का सामान ताब्यात दिलं गेलं की फाईल आपोआपच बंद होते... मी तुझी काहीच मदत करू शकत नाही.”

ओरसिनीने अंग झटकलेले पाहून जोनाथनचा संताप अनावर झाला. “त्या सामानाची आणखी कुठे नोंद असू शकते?” त्याने आवाज चढवला. “असायलाच हवी. हे बघ, आपण एका खुनाचा तपास करतोय. चोरलेल्या पर्सचा नव्हे. मला त्या माणसाचं नाव हवंय.” त्याने आपली मूठ टेबलावर जोराने आपटली.

ओरसिनीने गपचूप पुन्हा कामाला सुरुवात केली. तो वेड्यासारखा की बोर्ड फिरवू लागला. “रोख पैसे देऊन त्याने तिकिटं विकत घेतली होती... त्याला पावती भरावी लागली असणार... जरा थांब.” जोनाथनला बाजूला सारत तो समोरच्या उघड्या लाकडी मांडणीपाशी गेला. उगाचच काहीतरी पुटपुटत, त्याने एकामागोमाग एक पावत्यांचे गठ्ठे चाळले. अचानक एका पावतीवर बोट ठेवत तो ओरडला. “सापडली.”

“कोण आहे तो?” जोनाथन त्याच्या मागेच उभा होता.

“ब्लिट्झ. गॉटफ्रिड ब्लिट्झ. प्रिन्सिपेस्सा व्हिला. डेल्ला नॉन्नामार्गे.” ओरसिनीने विजयी स्वरात त्या पावतीवरचे नाव व पत्ता वाचला. “तर मग साहेब, आता तरी आपण खूश आहात ना?”

तो मागे वळला. मागे कुणीही नव्हते.

जोनाथन केव्हाच निघून गेला होता.

२४

मार्क्स व्हॉन डॅनिकन बर्न-बेल्प विमानतळावरील प्रतीक्षागृहात ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत फेऱ्या मारत होता. धावपट्टी बर्फमय झाली होती. ती स्वच्छ करण्याच्या प्रयत्नात कर्मचारी गुंतलेले होते. धावपट्टीच्या शेजारी असलेल्या खडीच्या रस्त्यावर एक हेलिकॉप्टर उभे होते. हवामानखात्याकडून खबर आली होती की आल्प्स पर्वतावरील ढग झपाट्याने निघून चालले आहेत व निदान पुढची साठ मिनिटे तरी आकाश निरभ्र राहाणार आहे. या काळात पर्वत ओलांडून टेस्सिनपर्यंत जाणे शक्य होऊ शकेल. त्यानंतर पुन्हा एकदा हवामान ढगाळ होईल. डॅनिकनला विमान प्रवास मनापासून आवडत नसे; पण आज त्याच्यासमोर दुसरा पर्यायच उरलेला नव्हता. गोथ्थार्डच्या बोगद्यात अठरा चाकांचा एक टँकर उलटून पडला होता व पंचवीस किलोमीटर्सपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या होत्या.

हेलिकॉप्टरमध्ये चढण्याची घोषणा माईकवरून करण्यात आली. काहीशा अनिच्छेने तो त्या उबदार प्रतीक्षालयातून बाहेर आला. त्याच्याबरोबर मायर व क्रॅजेकही होते. “प्रवासाला किती वेळ लागेल?” वर चढता चढता त्याने पायलटला विचारले.

“नव्वद मिनिटं... जर हवा चांगली राहिली तर.” उत्तराबरोबरच त्याच्या हातात एक छोटीशी बॅग देण्यात आली. हवामानाचा त्रास झाल्यास लागणारी औषधे त्यात होती.

व्हॉन डॅनिकनने कमरेभोवतीचा पट्टा घट्ट आवळून घेतला. त्याने मांडीवरच्या त्या बॅगेकडे पाहिले व तो मनातल्या मनात प्रार्थना म्हणू लागला.

अस्कोनाजवळील एका मोकळ्या माळरानावर जेव्हा ते हेलिकॉप्टर उतरले, तेव्हा नऊ वाजून सहा मिनिटे झाली होती. कधी एकदा प्रवास संपतोय, असे त्याला झाले होते. इलेक्ट्रॉनिक खेळाच्या मशिनमध्ये जसा तो पिंगपाँगचा बॉल इकडून तिकडे आपटत असतो तसे तुफानी वारे प्रवासभर त्या हेलिकॉप्टरवर आदळत होते. हेलिकॉप्टर माघारी वळवायचे का? असा प्रश्न पायलटने व्हॉन डॅनिकनला दोनदा विचारला होता. दोन्ही खेपेस डॅनिकनने फक्त मान हलवत नकार दिला होता. हवामानापेक्षाही त्याला आणखी एका गोष्टीचा जास्त त्रास होत होता. नेमक्या तेवढ्याच काळात, ब्लिट्झ आपले चंबूगबाळे आवरून, इटलीच्या सीमेबाहेर पसार तर होणार नाही ना ही भीती त्याला सतावत होती.

लॅमर्सच्या डायरीतील त्या फोन नंबरवरून समजले होते की, तो फोन गॉटफ्रिड ब्लिट्झ या व्यक्तीच्या नावावर आहे व तो अस्कोनामधील प्रिन्सिपेस्सा व्हिलामध्ये राहतो. व्हॉन डॅनिकनच्या आकस्मिक आगमनाची सूचना, स्थानिक पोलिसांना आधीच दिली गेली होती. सदर संशयित गुन्हेगाराला कुणीही अटक करू नये व त्याच्याशी संपर्कही साधू नये अशाही सूचना दिल्या गेल्या होत्या.

हेलिकॉप्टरचे इंजीन क्षीण आवाज करत बंद झाले आणि गरगरणारे पंखेही हळूहळू स्थिर झाले. गुडघ्यावर पडून जमिनीवर नाक घासण्यापासून त्याने कसेबसे स्वत:ला सावरत, आपले पाऊल खाली टेकवले. आता काय वाट्टेल ते झाले तरी परत जाताना आपण कारमधूनच जायचे असे त्याने मनाशी पक्के ठरवून टाकले.

टेस्सिन पोलीसप्रमुख लेफ्टनंट मारिओ काँटी त्याच्याजवळ येऊन पोहोचला होता. "तू माझ्याबरोबर ब्लिट्झच्या घरी येतोयस." तो म्हणाला. "मला वाटतं, तुझा सहकारी आधीच तिथे पोहोचलाय."

जवळ उभ्या असलेल्या गाडीच्या दिशेने डॅनिकन चालू लागला. हेलिकॉप्टरच्या आवाजाने त्याचे कान आधीच बधिर झाले होते. लेफ्टनंटचे बोलणे आपल्याला नीट ऐकू आलेय की नाही याबद्दल त्याला शंका वाटली. "माझा सहकारी? माझी माणसं तर ही आहेत. मिस्टर मायर आणि मिस्टर क्रॅजेक. आमच्या तिघांशिवाय कुणीच ही केस हाताळत नाही."

"पण आज सकाळी मला सायनर ओरसिनीचा फोन आला होता. तो इथला स्टेशनमास्तर आहे. त्याच्या म्हणण्यानुसार त्या सामानाच्या तपासासंदर्भात एक ऑफिसर स्टेशनवर येऊन गेला. मला वाटलं तो तुझाच मदतनीस असेल आणि तूच त्याला तिथे पाठवलं असशील."

"कुठल्या सामानाबद्दल तू बोलतोयस?" व्हॉन डॅनिकनने त्याला आवाज चढवत विचारले.

"त्या बॅगा लँडक्वॉर्टला पाठवण्यात आल्या होत्या." काँटी सांगू लागला. "काल ज्याने एका पोलिसाचा खून केला होता, त्याच संशयिताच्या त्या बॅगा असाव्यात असं त्या ऑफिसरने ओरसिनीला सांगितलं."

"हे बघ, मी कुणा पोलीस ऑफिसरच्या खुनाच्या केससाठी इथे आलेलो नाही आणि मी कुणालाही त्या स्टेशनमास्तरकडे पाठवलेलंही नाही."

काँटीने गोंधळून मानेला झटका दिला. त्याचे गाल तापू लागले. "पण ह्या पोलिसाने तर... आपलं ओळखपत्रंही दाखवलं. तो तुझा सहकारी नाही याची तुला खात्री आहे?"

व्हॉन डॅनिकनने त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले आणि सरळ मुद्द्यालाच हात घातला, "त्या माणसाला नक्की काय हवं होतं?"

"ज्या माणसाने त्या बॅगा पाठवल्या होत्या, त्याचं नाव व पत्ता."

व्हॉन डॅनिकनची पावले आता गाडीच्या दिशेने जलद पडू लागली होती. अचानक त्याच्या काहीतरी लक्षात आले. "आणि त्या माणसाचं नाव–"

"ब्लिट्झ–" डॅनिकनला गाठताना काँटीची दमछाक झाली होती. "तोच माणूस, जो तुला हवाय. तो अॅस्कोनालाच राहतो. काही गफलत होतेय का?"

व्हॉन डॅनिकनने गाडीचा दरवाजा उघडला. "घर किती दूर आहे?"

"वीस मिनिटांवर."

"दहा मिनिटांत आपल्याला तिथे पोहोचायचंय."

२५

धुके डोंगरावरून खाली उतरत होते. उतरताना त्याने शेकडो वर्षांच्या पुराण्या इमारतींना आणि वाटेत येणाऱ्या गल्लीबोळांनाही घट्ट वेढून टाकले होते. पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या अस्कोना शहरातल्या रस्त्यावरून तो शांतपणे गाडी चालवत होता. 'पिशाच' या टोपणनावाने तो त्याच्या टोळीत प्रसिद्ध होता. वाट धुक्यात हरवून जात होती व त्याला गाडीचा वेग कमी करावा लागत होता.

धुके... ह्या धुक्याने आपली पाठ कधीच सोडली नाही.

सैनिकांची छोटी फौज घरी येऊन थडकली होती तेव्हाही धुकेच पसरलेले होते, त्याला आठवले. त्याची गाडी आता दोन्ही बाजूंनी वेढलेल्या डोंगरामधून चालली होती. वाटेत टुमदार बंगले आणि हिरव्यागार बागा दिसत होत्या. त्या दिवशी, आजच्या इतके दाट धुके नव्हते. पण नेहमीच रात्री पडायचे तसे धुके पडले होते. डोंगरावरून ते खाली घसरत यायचे. तिथे त्यांचे कॉफीचे मळे होते. एखाद्या खतरनाक, अजस्त्र सापासारखे ते नागमोडी सरपटत यायचे. त्याच्या डोळ्यांसमोर तो प्रसंग उभा राहिला. ते संपूर्ण दृश्य मुकाटपणे पाहायची त्याच्यावर सक्ती करण्यात आली होती. सैनिक घरात घुसले. बिछान्यावर झोपलेल्या त्याच्या आईवडिलांना खेचून बाहेर आणण्यात आले. त्यांच्या अंगावरचे सर्व कपडे काढले गेले आणि त्यांना नागवे करून चिखलात झोपवले. नंतर त्यांनी त्याच्या बहिणींकडे मोर्चा वळवला. पाच वर्षांच्या टेरेसालाही त्यांनी सोडले नाही. त्याने आपले डोळे गच्च मिटले; पण कानांवर पडणाऱ्या जीवघेण्या किंकाळ्या तो अडवू शकला नाही. जिवात जीव असेपर्यंत त्यांची चाललेली जगण्याची धडपड, धडपड करत असताना त्यांनी केलेला आक्रोश आणि अखेर जगण्याचं बळच निघून गेलेले. आपला कार्यभाग उरकल्यावर त्यांनी बहिणींच्या पोटात गोळ्या घुसवल्या. काही जण आत गेले व त्यांना ती बाटली सापडली. त्याच्या वडलांची खास आवडती व्हिस्की. इकडे बहिणींचा प्राण परलोकात निघून जात असताना, ते व्हिस्की पिऊन गच्चीवर धिंगाणा घालत होते.

त्या वेळेस तो फक्त सात वर्षांचा कोवळा मुलगा होता. भेदरलेला. कमांडरने त्याच्या हातात पिस्तूल कोंबले व त्याला आईबापांच्या समोर उभे केले. आईवडिलांना, गुडघ्यावर ओणवे बसवण्यात आले. कमांडरने त्याचा हात पकडून उंच धरला व पिस्तुलाच्या चापात त्याचे बोट अडकवले. मग तो त्याच्या कानात कुजबुजला, जिवंत राहायचे असेल तर तुला तुझ्या मातापित्यांना ठार मारावे लागेल. पिस्तुलातून एकापाठोपाठ एक असे दोन बार उडाले. दोघेही गतप्राण होऊन चिखलात कोसळले, पिस्तुलाचा चाप, त्या लहान मुलाने ओढलेला होता.

मग त्याने तेच पिस्तूल स्वत:वर रोखले. आता त्याच्या मनात किंचितही भीती नव्हती किंवा जराही घालमेल नव्हती.

आणि अद्भुत घडले. तो मेला नाही.

त्याचा बेडर स्वभाव पाहून, कमांडर एकदम प्रभावित झाला. त्याने निर्णय घेतला. खरे म्हणजे तो त्याला, आईवडील, चार बहिणी आणि एक कुत्रा यांच्याबरोबर सोडून निघून जाणार होता. मतदानाचा हक्क बजावल्याचे काय गंभीर परिणाम होऊ शकतात याची समस्त गावकऱ्यांना अद्दल घडावी, हा त्याचा हेतू होता. पण तो त्या मुलाला घेऊन डोंगरापलीकडे आला. त्या मुलाच्या जबडयात घुसलेली गोळी सर्जनने बाहेर काढली. त्याचे दात दुरुस्त करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर त्याला एका खाजगी शाळेत घालण्यात आले. तिथे एक अभ्यासू विद्यार्थी म्हणून त्याने नाव कमावले. त्याच्या शिक्षणाचा खर्च सरकारने उचलला. एका खास 'प्रयोगा'साठी केलेली ती गुंतवणूक होती.

शाळेमध्ये त्याला सर्व विषयांत उत्तम गती होती. तो फ्रेंच, इंग्लिश, जर्मन व स्वत:चीही स्थानिक भाषा शिकला. मैदानी खेळांतही तो चमकला. त्याच्या खेळात चापल्य व सफाई होती. त्याने सांघिक खेळांपासून मात्र स्वत:ला दूर ठेवले होते आणि फक्त वैयक्तिक खेळांमध्ये तो भाग घेत असे. पोहणे, टेनिस, शर्यती.

आठवडयातून एकदा तरी कमांडर त्याला येऊन भेटायचा. मग ते दोघे एखाद्या कॅफेत जाऊन चहा, केक खात असत. सुरुवातीसुरुवातीला तो त्याला पडणाऱ्या भयानक स्वप्नांबद्दल कमांडरशी बोलायचा. त्याचे आईवडील, रोज रात्री त्याच्या स्वप्नात यायचे आणि आपल्याला मारू नकोस अशी याचना त्याच्यापाशी करायचे. हळूहळू त्या स्वप्नातल्या आकृती, दिवसाही त्याचा पाठलाग करू लागल्या. कमांडर त्याची समजूत काढायचा. काही काळजी करू नकोस, अशी स्वप्ने सगळ्याच सैनिकांना पडत असतात असे सांगून त्याला धीर द्यायचा. हळूहळू त्या दोघांमध्ये एक छान नाते निर्माण होऊ लागले. मुलगा, कमांडरला आपला बाप मानू लागला. कमांडरशिवाय त्याला करमेनासे होऊ लागले. पण तरीही त्या स्वप्नांनी काही त्याचा पिच्छा सोडला नव्हता.

आता त्याच्या शाळेतही समस्या उद्‌भवू लागल्या होत्या.

त्याला मुख्य कारण होते, त्याचा स्वभाव. शाळेतल्या मुलांबरोबर त्याला साधे, सरळ वागणे जमत नसे. एकतर तसे वागणे त्याला खरच जमत नसावे किंवा त्याला ते मनापासून आवडत तरी नसावे. तसा तो सज्जन व नम्र होता. त्याच्यापाशी सौजन्यही होते... पण एका मर्यादेपर्यंत त्याच्यामध्ये एक थंड अलिप्तपणा होता आणि त्याने तो कायम तसाच जपून ठेवला होता. त्याला कुणीही मित्र नव्हते व मैत्रीची त्याला आसही नव्हती. तो एकटाच जेवायचा. खेळून आल्यावर तो नेमाने अभ्यास करायचा. शनिवार-रविवार तो एकतर कुणा ओळखीच्या मुलाबरोबर टेनिस खेळायचा (त्या मुलाने जर त्यानंतर त्याला बाहेर फिरायला बोलावले तर तो ते निमंत्रण नाकारायचा) किंवा दिवसभर खोलीत बसून भाषेचा अभ्यास करायचा.

आता त्याने यौवनात पदार्पण केले होते. त्याचे देखणेपण जितके इतरांच्या नजरेत भरत असे, तितकाच त्याचा तो विचित्र स्वभावही. तो सडपातळ, आकर्षक बांध्याचा व राजबिंडा दिसू लागला होता. त्याच्या आईचे भारतीय रक्त मात्र त्याच्यात अजिबात उतरलेले नव्हते. आणखी एक वैशिष्ट्य त्याच्यापाशी होते. एखाद्या स्वयंभू, प्रभावी नेत्याप्रमाणे त्याच्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनी कुणावरही चटकन पडत असे. शाळेत नावाजली गेलेली मुलेही त्याच्या सहवासासाठी आतुर होऊन, त्याच्या पाठी लागत असत. पण तो कुणालाही त्याच्या आसपासदेखील फिरकू देत नसे. त्याच्या नकारामुळे ती

मुले चिडत असत व त्याला टोमणे मारू लागत. त्याला ते हलकट, चक्रम व नादिष्ट म्हणत. अशा वेळेस त्याच्यामधला रानटीपणा जागा होत असे. आपल्या मुठींमध्ये असणारी ताकद एव्हाना त्याने ओळखली होती व प्रतिस्पर्ध्याला रक्तबंबाळ करण्यात त्याला मजा वाटू लागली होती. त्याचा दरारा वाढत गेला आणि त्याच्या वाटयाला जाण्याची हिंमतही कुणी दाखवेनासे झाले.

त्याचे दुसरे पाप हे त्याहूनही अधिक भयंकर होते. शाळेच्या दृष्टीने तर त्या पापाला क्षमाच नव्हती. देवाची प्रार्थना म्हणायला त्याने साफ नकार दिला होता. रोमन कॅथलिकमधील कडव्या धार्मिक गटाने स्थापन केलेली ती शाळा होती व रोजच्या सांघिक प्रार्थनेला उपस्थित राहायलाच हवे असा दंडक होता. चर्चमधील बाकावर तो जाऊन बसायचा, पण त्याने कधी हातही जोडले नाहीत किंवा प्रार्थनाही म्हटली नाही. चर्चच्या वेदीवरचे भगवान येशूचे रक्त त्याने नाकारले व त्याच्या प्रतिमेला स्पर्श करण्याचेही टाळले. एक दिवस तर कमालच झाली. फादर त्याच्या तोंडात जबरदस्तीने पवित्र जल ओतू लागले तर त्याने त्या धर्मगुरूचे बोट चावून, त्यातून रक्त काढले. आणखी एक वाईट गोष्ट घडली. शाळेच्या संचालक मंडळाने असा निष्कर्ष काढला की, तो आपल्या आईच्या पूर्वजांची भाषा शिकत आहे व त्या प्राचीन भाषेतील स्तोत्रे म्हणत मूर्तीपूजक बनला आहे.

ह्या सर्व गोष्टींची कल्पना कमांडरला देण्यात आली. आपला 'प्रयोग' अयशस्वी ठरला म्हणून खचून जाण्याऐवजी तो चक्क खूश झाला होता. नकली तत्त्वज्ञानांची पुटे आणि भुते खरवडून टाकलेल्या स्वच्छ आत्म्यांचीच त्याला खरी गरज होती. विशेषतः अशा एका माणसाची की, जो आपल्या बुद्धिमत्तेच्या तेजाने व आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने कुणालाही एक रुबाबदार सद्गृहस्थ वाटला असता. कुठल्याही उच्च वर्तुळात त्याला सहज प्रवेश मिळाला असता.

थोडक्यात, तो एक निर्दोष, दगाबाज मारेकरी होण्यासाठी पात्र ठरला होता.

एका मिनिटातच तो 'दगाबाज मारेकरी' आता शहरात येऊन पोहोचला होता. तो व्हिया डेल्ला नॉन्नाला वळला आणि व्हिला प्रिन्सिपेस्सा शोधून काढणे त्याला फारसे अवघड गेले नाही. पण तो तसाच आणखी एक किलोमीटर पुढे गेला व झाडांनी वेढलेल्या रस्त्याच्या टोकाशी जाऊन त्याने गाडी थांबवली. मग त्याने आपल्या पवित्र नित्यकर्माला सुरुवात केली. गळ्यात अडकवलेली छोटी बाटली काढून त्यातील द्रव्यात एकेक गोळी हलकेच बुडवली. असे करत असताना तो मनातल्या मनात प्रार्थना म्हणत होता.

त्याचा तो विधी संपल्यावर गाडीबाहेर येत त्याने डिकी उघडली व त्याने लोकरी स्वेटर व पावसाळी ओव्हरकोट अंगावर चढवला व डोक्यावर लाल फेरारी टोपी घातली. लोकांना फक्त कॅप दिसायची. चेहरा दिसायचा नाही. पायातले बूट काढून त्याने हायकिंगचे बूट घातले व खांद्यावर सॅक टाकत तो सज्ज झाला. स्विस लोकांना मैलोन्मैल चालण्याचा नाद होता. डिकी बंद करून त्याने बेल्टला अडकवलेले पिस्तूल एकवार तपासले व तो चालू लागला.

तो शंभर मीटर चालला असेल तोच व्हिला प्रिन्सिपेस्सामधून एक काळ्या केसांचा

माणूस पुढच्या दरवाजाने बाहेर पडताना त्याने पाहिला. त्याच्या सोबत तीन जर्मन डॅपस्हंड्स होते. आखूड पायांचे कुत्रे. तो इसम त्याच्याच दिशेने येत होता. त्याची पन्नाशी उलटलेली होती. डोळे निळे होते व अंगात गडद निळ्या रंगाचा स्वेटर होता. तो 'तोच' होता.

'पिशाच्या'ने त्याचे हसऱ्या चेहऱ्याने स्वागत केले. "गुड मॉर्निंग!" तो सौहार्दाने म्हणाला. ज्याचा 'काटा' काढायचा आहे त्याच्याशीच आधी संवाद साधायची संधी त्याला क्वचितच मिळत असे. त्याने त्या क्षणाची मजा लुटायचे ठरवले. बऱ्याच वर्षांच्या अनुभवातून त्याने, माणूस – त्याचे प्राक्तन – त्याचा मृत्यू यासंबंधीची स्वत:ची अशी खास मते बनवली होती. ह्या माणसाला आपल्या मृत्यूची चाहूल लागली असावी का हे जाणून घेण्याचं कुतूहल त्याच्या मनात होते.

"मॉर्निंग!" गॉटफ्रिड ब्लिट्झने प्रतिसाद दिला.

"मी त्यांना हात लावू शकतो?" खाली वाकत त्याने कुत्र्यांना गोंजारले व कुत्र्यांनीही अगदी तत्परतेने त्याचे हात ओले केले.

ब्लिट्झ गुडघ्यावर बसला व त्याने कुत्र्यांची मान व डोकी खाजवली. "माझी मुलं आहेत." तो म्हणाला, "ग्रीट, आयसोल्दे आणि एलॉइस."

"तिन्ही मुली. आपल्या बापाची काळजी घेतात ना?"

"अगदी उत्तम काळजी घेतात. म्हणून तर मी इतका तगडा दिसतोय."

"मुलींकडे आणखी काय काम दिलंय?"

दोघे जण एकमेकांपासून काही इंचांवर उभे होते. पिशाचाने ब्लिट्झच्या डोळ्यांत डोळे घालून पाहिले. त्याला त्या माणसाच्या अंतर्मनातली अस्वस्थता जाणवली. त्यात भीती नव्हती, पण अतिसावधानता होती. त्याला आपला संशय येऊ नये म्हणून तो बराच वेळ त्याच्याकडे तसाच शांतपणे पाहत राहिला. त्याला यमदूत दिसत नसावेत, तो मनातल्या मनात म्हणाला. दैवाचे फासे उलटे पडलेत हे बिचाऱ्याच्या गावीही नव्हते.

त्याने उठत एक छोटा सलाम ठोकला व तो सरळ चालू पडला. खांद्यावरून त्याने मान किंचित तिरकी केली आणि ब्लिट्झ उलटच्या दिशेने चालत गेलाय हे त्याच्या लक्षात आले.

त्या भेटीने तो किंचित हबकला होता. ब्लिट्झच्या मनावरचा ताण त्याने ओळखला होता; पण आपण आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर आहोत ह्याचा मात्र ब्लिट्झला संशयही आला नव्हता.

त्याने आपल्या मनातली भीती दडपण्याचा प्रयत्न केला. काहीही कल्पना नसताना, कुणाच्याही आयुष्यात अचानक मृत्यूचा क्षण यावा, ह्या कल्पनेनेच त्याला नेहमी धडकी भरत असे.

कोपऱ्यावर वळत, तो एक छोटी टेकडी चढून वर आला. बाजूला पन्नास मीटर्सवरून एक धुळीने भरलेली पायवाट उजव्या बाजूने मुख्य रस्त्याला जाऊन मिळत होती. तो त्या पायवाटेवरून चालत गेला. चालत असताना तो मनात, बाजूला दिसणारे बंगले मोजत होता. चौथ्या बंगल्यापाशी आल्यावर त्याने छोटयाशा कुंपणावरून उडी मारली व शांतपणे चालत तो बंगल्याच्या मागच्या दारापाशी आला. कुणी आपल्यावर नजर ठेवून आहे का हे पाहाण्यासाठी त्याने दोन्ही दिशेला दृष्टी वळवली. आसपास कुणीही

नाही हे लक्षात आल्यावर त्याने समाधानाचा नि:श्वास सोडला व पुढे जाऊन दरवाजावर जोरजोरात थाप मारल्या. त्याच्या हातात पिस्तूल होते. एक गोळी पिस्तुलाच्या चेंबरमध्ये आणून ठेवली होती व पहिल्या गोळीने आपले काम नीट केलेय ना हे पाहण्यासाठी उरलेल्या तीन गोळ्या होत्या. धोक्याचा इशारा देणारी विद्युत यंत्रणा नाही याची त्याने खात्री करून घेतली. त्याने दरवाजाला स्पर्श करत त्यावर उमटणाऱ्या कंपनांचा अंदाज घेतला. घर शांत होते. ब्लिट्झ परतलेला नव्हता.

काही सेकंदातच, पिशाच घरात शिरलेला होता.

२६

मिली ब्रॅन्डतची झोप उडाली होती. ती एकसारखी ह्या कुशीवरून त्या कुशीवर वळत होती. व्हिएन्नामधील जोसेफस्टॅड्न या उच्चभ्रू वस्तीत तिचा आलिशान बंगला होता. मोहम्मद एलबरादीचे निर्णायक शब्द एकसारखे तिच्या डोक्यात घुमत होते. "शहाण्णव टक्के क्षमता... शंभर किलो... चार किंवा पाच बॉम्ब बनवण्यासाठी पुरेसे..." ती बैठक संपून आता सहा तास उलटून गेले होते; पण डोळ्यासमोर घडलेल्या एखाद्या भयानक अपघाताचे चित्र सतत आठवत राहावे, तसे ते शब्द तिच्या डोक्यात घण घालत होते. एलबरादीचा चेहरा तर वेदना, चीड आणि असहायतेने काळानिळा झाला होता. तिला ती एक प्रकारची शरणागतीच वाटली होती. भविष्यात काय घडणार हे तर आजच ठरून गेले होते. सारे जग महायुद्धाने पेटणार होते.

अचानक ती उठून बसली. नाडीचे ठोके जलद पडत होते. तिने एक दीर्घ श्वास घेतला व तिने बाजूच्या ग्लासमधले पाणी घटाघटा प्यायले. ती हळूच उठली. शेजारी झोपलेल्या नवऱ्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला आणि पावलांचा आवाज न करता ती आपल्या अभ्यासिकेत आली. दरवाजाला आतून कडी लावली व आपल्या टेबलापाशी आली. तिचा निर्णय पक्का झाला होता. ती आता विचार करणार नव्हती, फक्त कृती करणार होती. हे आपले कर्तव्य आहे, तिने स्वत:लाच बजावले.

फोनचा रिसिव्हर उचलताना तिचा हात अगदी स्थिर होता. आश्चर्य म्हणजे तिला तो नंबर पूर्ण आठवला. आणीबाणीच्या प्रसंगी संपर्क साधण्यासाठी तिला तो दिला गेला होता. त्या गोष्टीला खरेतर बरीच वर्षे झाली होती. पलीकडच्या फोनची रिंग वाजली. एकदा, दोनदा. फोन उचलला जाण्याची ती वाट पाहत होती. फक्त एका मिनिटात तिचे आयुष्य पार पालटून गेले होते. ती आता इंटरनॅशनल अॅटोमिक एनर्जी एजन्सीच्या तांत्रिक विभागाची उपसंचालक राहिली नव्हती. या क्षणी ती एक देशभक्त नागरिक होती आणि म्हटले तर एक छोटीशी गुप्तहेर. आपल्यातल्या आत्मविश्वासाची यापूर्वी तिला इतकी प्रखर जाणीव कधीच झाली नव्हती.

"बोला." पलीकडून एक तुटक आवाज आला.

"मिलिसंट ब्रॅन्डत बोलतेय. रॉयल लिपिझॅनर्सच्या हॅन्सबरोबर मला बोलायचंय."

"फोन चालू ठेवा." पलीकडचा माणूस कॉंप्युटरवर फाईल किंवा लॉग चाळत असलेला जणू तिला चक्क दिसत होता. एखाद्या एजंटची खातरजमा करून घेण्याची ती पद्धत होती.

'एजंट' हा खरंतर तितकासा योग्य शब्द नव्हता. शिवाय मिलिसंट ब्रॅन्डत हे काही तिचे खरे नावही नव्हते. तिचे खरे नाव होते ल्युडमिला निल्सकॉव्ह. ती किव्हमध्ये जन्मली होती. एका ज्यू औषध विक्रेत्याच्या घरात जन्माला आलेली ती तिसरी मुलगी होती. तिचे वडील प्रथम जेरुसलेममध्ये व तिथून नंतर ऑस्ट्रियात स्थलांतरित झाले

होते. जरी ती ऑस्ट्रियन शाळेत शिकली होती, जर्मन हा तिचा विषय होता व तिच्यापाशी ऑस्ट्रियन पासपोर्टही होता, तरी ज्या देशाने तिच्या कुटुंबाची रशियामधून सुटका केली होती, त्या देशाला ती कधीच विसरू शकत नव्हती. एक दिवस अचानक तिला एक फोन आला होता. आपली व तिच्या कुटुंबाची फार जुनी ओळख असल्याचे त्याने सांगितले. त्या माणसाची तिला ओळख पटली नव्हती; पण त्याच्या बोलण्याचा लहेजा मात्र तिने चटकन ओळखला होता.

बेलव्हेडिरेमधल्या, गावापासून दूर असलेल्या एका हॉटेलात ते भेटले. भेट अगदी खेळीमेळीच्या वातावरणात झाली. चर्चेमध्ये अनेक विषय येऊन गेले. थोडे राजकारण, थोडे सांस्कृतिक. कमाल म्हणजे तिच्या आवडीनिवडींची त्याला इत्थंभूत माहिती होती. तिला मोझार्टचे असलेले वेड, एवढेच काय तर ती दर महिन्याला बायबलचा अभ्यास करण्यासाठी एका मंडळात जायची हे सुद्धा त्याला ठाऊक होते.

जेवण संपता संपता आपल्याला एक मदत हवी आहे असे जेव्हा तो म्हणाला, तेव्हा मात्र ती एकदम सावध झाली. त्याने तिच्या खांद्याला स्पर्श करत तिचा ताण हलका केला. तिच्या मनात उगाचच संशयाची पाल चुकचुकली होती. त्याला तिच्याकडून लगेच काही नको होते. चुकीची मागणी तर तो करतच नव्हता. तिची नोकरी जाऊ शकेल असे तो काही मागत नव्हता. उलट तिने त्या नोकरीत असणेच जास्त महत्त्वाचे होते. दोघांचेही हितसंबंध चांगले राहावेत हीच त्याची अपेक्षा होती. तिला दत्तक घेतलेल्या देशाची सुरक्षितता धोक्यात असल्याची माहिती जर कधी तिला कळली तर तिने ताबडतोब ती गोष्ट त्याच्या कानावर घालावी एवढेच वचन त्याला तिच्याकडून हवे होते.

त्याने तिला एक फोन नंबर दिला व एक वाक्य तिच्याकडून घोकून घेतले. फोन केल्यावर एवढे एकच वाक्य तिने बोलायचे होते. फोन नंबर व ते वाक्य त्याने पुन्हापुन्हा तिच्याकडून वदवून घेतले. एवढे बोलणे झाल्यावर तो तिच्याशी पुन्हा मित्रत्वाने वागू लागला. तिला घट्ट मिठी मारत त्याने तिचे आभार मानले.

घरी जाण्यासाठी जेव्हा ती टॅक्सीत बसली, तेव्हा मिलिसंट ब्रॅन्डत, पूर्वाश्रमीच्या ल्युडमिला निल्सकॉव्ह हिच्या मनात किंचित काहूर माजले होते. थोडी काळजी, थोडी भीती व थोडी उत्सुकता अशा विविध भावनांनी तिच्या मनात खळबळ उडवून दिली होती. जणू आता ती देशातल्या अनेक महत्त्वाच्या माणसांच्या खांद्याला खांदा लावून ताठ मानेने उभी राहिली होती. शासकीय अधिकारी, उद्योजक, कार्यकारी अभियंते, व्यावसायिक तज्ज्ञ अशी महत्त्वाची माणसं की ज्यांनी इस्त्रायलच्या देशसेवेची व राष्ट्रनिष्ठेची शपथ घेतली होती.

फोनवरून मगाचाच तुटक स्वर पुन्हा तिच्या कानी पडला. “हॅन्स तुला सकाळी दहा वाजता शॉनब्रूनमधील ग्लोरिएटमध्ये भेटेल. येताना ‘वायनर टॅगब्लॅट’ची प्रत सोबत घेऊन ये व ती चटकन दिसू शकेल याची काळजी घे.”

“हो.” ती म्हणाली. “अर्थातच.” पण तोपर्यंत फोन बंद झाला होता.

मिली ब्रॅन्डतने फोन ठेवून दिला होता. तिने कृती केली होती. वचन पाळलं होते. ती आता अधिकृतपणे ‘सय्याँ’ बनली होती.

एक मित्र.

२७

गॉटफ्रिड ब्लिट्झ तिन्ही कुत्र्यांसोबत आत आला. त्याने दार लावून घेतले. धोक्याचा इशारा मिळतोय का हे पाहण्यासाठी तो कुत्र्यांकडे पाहत क्षणभर स्तब्ध उभा राहिला. कुठल्याही विद्युत उपकरणापेक्षा, कुत्र्यांची नाके अधिक तीक्ष्ण होती. घर अगदी शांत होते. तो हॉलमध्ये आला. कुत्र्यांनी आपले अंग संगमरवरी फरशीवर पसरून दिले होते. सकाळच्या व्यायामामुळे ते दमलेले होते.

खिडकीजवळ जात त्याने पडदा दूर सारला व तो खालचा रस्ता न्याहाळू लागला. रस्ता निर्मनुष्य होता. मगाशी भेटलेला तो गिर्यारोहकही त्याला दिसला नाही. माणसांचे चेहरे लक्षात ठेवायची, ब्लिट्झची फार जुनी सवय होती. मगाशी भेटलेला तो सडपातळ माणूस आपल्या आसपास राहणारा नव्हता हे त्याने ओळखले होते. तो इटालियन भाषा सफाईने बोलत असला तरी तो मूळचा इटालियन नक्कीच नसणार. मग तो कोण होता? डोंगरदऱ्या चढायची आवड असलेला एक मुक्त प्रवासी? आणि ते ही अशा वादळी वातावरणात? आणि मग खालच्या वाटेवरून न जाता त्याने मुख्य सडक का पकडली असेल?

ब्लिट्झ ढगाळलेल्या आभाळाकडे पाहू लागला. सकाळचे नऊसुद्धा वाजले नव्हते आणि दिवस तर संपून गेल्यासारखा वाटत होता. पावसाला सुरुवात झाली होती. खिडक्यांच्या तावदानांवर पडणाऱ्या टपोरी थेंबांचा आवाज त्याला ऐकू येत होता. गारठा सहन करणे मुश्किल झाल्यावर त्याने झटकन तो पडदा पुन्हा लावून टाकला.

लॅमर्सच्या मृत्यूने तो भेदरून गेला होता. पेपरातल्या बातमीनुसार तो खुनी माणूस लॅमर्सच्याच घरात दबा धरून बसला होता. तो एक व्यावसायिक खुनी असावा आणि लॅमर्स हा एखाद्या योजनाबद्ध कटात गुंतलेला असावा असा अंदाजही त्या बातमीत व्यक्त केला होता. ब्लिट्झला ते जास्त चांगले ठाऊक होते. जर त्यांना लॅमर्सचा बळी घ्यावासा वाटला तर त्यानंतरचा नंबर कदाचित आपलाच असू शकेल. इतर कोणत्याही वेळी त्याने तिथून पसार व्हायचा निर्णय घेतला असता. त्याच्या जिवाला जबरदस्त खतरा निर्माण झाला होता.

पण ही वेळ, इतर वेळेसारखी नव्हती.

तो खेळत असलेली खेळी आता अगदी अखेरच्या टप्प्यावर होती. पायलट देशात येऊन पोहोचलेला होता. मधमाशीची शेवटची चाचणी यशस्वी झाली होती. सर्व कार्यवाही यंत्रणा सुसज्ज होती. शेवटची आज्ञा मिळालेली होती. पूर्ण हेतू व इराद्यानिशी हल्ला चढवला गेला होता.

आणि नेमका त्याच वेळेस लँडक्वॉर्टला विचका झाला. एक ठार व दुसरा जबर जखमी.

ब्लिट्झने आपले ओठ दुमडले. त्या बॅगा आगगाडीने पाठवणे योग्य आहे का अशी

शंका त्याच्या मनाला चाटून गेली होती; पण त्याच्यासमोर दुसरा पर्यायही नव्हता. प्रश्न केवळ मनुष्यबळाचाच नव्हता (संपूर्ण देशात काम करणारे फक्त सातच कार्यकर्ते होते.) तर धोका पत्करण्याचा होता. त्या क्षणी कुणा माणसाकरवी त्या बॅगा पोहोचवणे म्हणजे खतऱ्यालाच निमंत्रण होते. स्विसमधली टपाल व्यवस्था वापरणे अधिक सोयीचे होते, जरी त्या पावत्यांवर आपले नाव लिहिणे ही एक घोडचूक होती असे त्याला आता वाटू लागले होते. पण अर्थखात्यानेच तसा हट्ट धरला होता. जर काही गफलत झाली तर ते पैसे उगाचच पडून राहायला, त्यांना नको होते. कारण एवढे पैसे कुणी पाठवले ह्याचा नक्कीच शोध घेतला गेला असता. छोटीशी चूक देखील फार महाग पडते. पोलिसांना वास यायला वेळ लागत नाही. सर्व धागेदोरे शेवटी त्याच्याकडे बोट दाखवणार होते. गॉटफ्रिड ब्लिट्झकडे.

थिओ लॅमर्सला मनातून हटवणे त्याला जमत नव्हते. काम तर अगदी निष्णात व्यक्तीकडून करवून घेतले गेले होते. त्याच्याच घरी कुणीतरी शांतपणे वाट पाहत होता. त्याच्या अंगावर काटा आला. या सर्वांचा एकच अर्थ होतो, आपले जाळे भेदले गेलेले आहे.

दिवाणखान्यातील स्टिरिओ त्याने लावला. त्याचा आवडता वॅग्नर. त्याने आवाज मुद्दामच वाढवला. आपण घरात आहोत हे शेजाऱ्यांच्या लक्षात यावं आणि आपण अगदी नेहमीसारखे घरात वावरतोय, हेही.

गॉटफ्रिड ब्लिट्झ हा एक धनाढ्य जर्मन व्यापारी आहे हे त्याच्या मित्रांना व शेजाऱ्यांना ठाऊक होते. केवळ हवापालटासाठी जी काही गर्भश्रीमंत माणसे दक्षिण स्वित्झर्लंडला मुक्काम ठोकायला येतात, त्यापैकी तो एक होता. तो नेहमी नवी कोरी मर्सिडिज चालवतो. वार्षिक यात्रेसाठी तो बायरूथच्या धर्मस्थळांना न चुकता भेट देतो. रविवारी सकाळी तो एखाद्या पापभीरू ख्रिश्चन माणसासारखा चर्चमध्ये जातो. हा सर्व मुखवटा त्याने अगदी सहेतुक चढवून, स्वत:भोवती संशयाची सुईही फिरवू दिली नव्हती.

ब्लिट्झ आपल्या अभ्यासिकेतल्या खुर्चीत जाऊन बसला. बसताना त्याने कमरेला अडकवलेले पिस्तूल काढून टेबलाच्या वरच्या ड्रॉवरमध्ये ठेवले. आपला लॅपटॉप सुरू करत, त्याने त्यावरची यादी तपासली. पी.जे.साठी नवीन बॉगनर स्वेटर, शंभर हजाराची रक्कम रवाना. त्याने हलकी शीळ घातली. आणखी एक लाख फ्रँक्स. हे पैसे तर आपल्या अर्थखात्याच्या हातात नक्कीच पडणार नाहीत. आधी खर्च केलेल्या पैशांच्या तुलनेत ही तर त्यांच्या लेखी किरकोळ रक्कम होती. झूगमधली एक कंपनी विकत घेण्यासाठी दोनशे दशलक्ष फ्रँक्स दिले गेले होते. माल पाठवण्यासाठी आणखी साठ दशलक्ष वापरले गेले होते. पी.जे.ला जवळजवळ वीस दशलक्षाचे मानधन मिळाले होते. मर्सिडिजची किंमत सोडून.

त्याने पैशाच्या हस्तांतरणासाठी अर्थखात्याला ई-मेल पाठवून दिली. त्याच वेळी झटकन त्याची नजर दरवाजावर गेली आणि त्याच्या हातावरचे केस ताठ उभे राहिले.

“कोण आहे?” त्याने विचारले, “कुणी आहे तिथे?”

उत्तर आले नाही. घर चिडीचूप शांत होते. कुणी आलेच असते तर त्या पाठोपाठ येणारा भुंकण्याचा आवाज कसा ऐकू आला नाही?

“ग्रीटेल, आयसोल्डे,” त्याने कुत्र्यांना पुकारलं.

तो तसाच बसून राहिला. ते आपले पंजे संगमरवरी फरशीवर घासत असतील असे त्याला वाटून गेले. दिवाणखान्यातून वॅग्नरचे स्वर झुलत होते. मध्येच गडगडाटासारखे घुमत होते. टचुटॉनिकच्या पराभूत राजासाठी त्यांचा आर्त विलाप चालला होता.

कुत्रे कुठे होते?

मागच्या बाजूला त्याला काहीतरी जाणवले. एक थंड, काळोखी अस्तित्व.

पोटात गोळा उभा राहिला.

ब्लिट्झने पिस्तूल उचलण्यासाठी ड्रॉवरकडे आधी पाहिले आणि मग लॅपटॉपकडे.

एकच काय ते निवड.

तीस वर्षांच्या प्रशिक्षणाने बाजी मारली. आधी काम. त्याने की-बोर्डावर 'DESTROY' ही अक्षरे टाईप केली आणि लॅपटॉपची 'हार्डड्राइव्ह' नष्ट करून टाकली.

मागे सळसळ झाली.

त्या थंड, काळोखी 'अस्तित्वाने' आता त्याच्या कपाळावर काहीतरी दाबून धरले होते. धाडकन आवाज झाला. नरकयातना निर्माण करणारी निळीजांभळी वर्तुळे उमटत गेली. पुढच्याच सेकंदाला तीही विरून गेली.

आणि उरला फक्त काळाकुट्ट काळोख.

२८

खडी पसरलेल्या रस्त्याच्या टोकाशी व्हिला प्रिन्सिपेस्सा बंगला दिमाखात उभा होता. अठराव्या शतकातल्या वाड्याचे रूपांतर बंगल्यात झालेले होते. भिंतीवर वेली चढलेल्या होत्या. पहिल्या मजल्यावरील शयनगृहाच्या खिडकीखाली तांबड्या फुलांना बहर आला होता. बंगल्याच्या समोर केलेल्या गुलाबाच्या बागेला दगडाचे कुंपण होते. शांतपणे खाली येणाऱ्या धबधब्यासारखा, संथपणे पाऊस पडत होता.

सीमॉनने आपल्या कोटाची बटणे लावली व डोळ्यावर येणारे केस कानामागे सारले. "म्हणजे आता आपण त्याला जाऊन जाब विचारायचा? आणि जर तो म्हणाला की मी त्या बॅगा पाठवल्याच नव्हत्या, तर? तर आपण काय करणार आहोत?"

"तो का म्हणून नाही म्हणेल?" जोनाथनने तिला विचारले.

"एम्मा मेलीय हे समजल्यावर तो आनंदाने आपली मर्सिडीज परत घेईल."

"आणि त्याचे पैसे?"

"ते ही तो घेईल." जोनाथनने पैशाचे पाकीट खिशात ठेवले.

"काल रात्रभर मी विचार करत होतो– एम्मा नेमक्या कुठल्या कामात गुंतली होती?"

सीमॉनने त्याला अडवले नाही.

"औषधं," जोनाथन म्हणाला, "औषधांचा पुरवठा मागणीनुसार कधीच योग्य ठिकाणी पुरवला जात नाही ही तिची नेहमीची तक्रार होती. त्या गोष्टीने ती वेडीपिशी व्हायची. आम्ही काम करतो, तिथली परिस्थिती तर तुला ठाऊकच आहे. निम्म्या वेळेस तो माल एकतर सरकारकडून जप्त केला जातो किंवा कस्टम्सच्या अधिकाऱ्यांकडून पळवला जातो. तोच माल ते नंतर आम्हालाच दुप्पट भावाने विकत. आवश्यकतेच्या सत्तर टक्के माल मिळाला तरी आम्ही समाधान मानायचो. ह्या सर्वांचा आणि या घराचा नक्कीच काहीतरी संबंध असावा. हा बंगला बांधायला भरपूर खर्च आलेला असणार. माझ्या अंदाजाप्रमाणे ब्लिट्झ हा एखाद्या औषध तयार करणाऱ्या कंपनीचा बडा अधिकारी असणार आणि त्या दोघांचे संधान जुळलेलं असणार. नक्कीच हे पैसे म्हणजे कुणालातरी दिली गेलेली लाच आहे. सौदा. आपले प्रयत्न कमी पडताहेत असं एम्माला नेहमी वाटायचं."

"ब्लिट्झ हे सर्व तुला सांगून टाकेल असं तुला वाटतं?"

"एक लाख फ्रँक्सच्या मोबदल्यात कुणीही सहकार्याचा हात पुढे करेल."

"किंवा तो ओठसुद्धा उघडणार नाही. मला वाटतं की तुझ्या नजरेतून काहीतरी महत्त्वाचं निसटतंय. त्या पोलिसांना ब्लिट्झनेच पाठवले होते असा विचार तुझ्या मनात कसा येत नाही याचं मला आश्चर्य वाटते."

"मला नाही पटत. त्यासाठी मुळात एम्माचा मृत्यू झालाय ही गोष्ट त्याला कळलेली

असायला हवी आणि ते अशक्य आहे. तुझं काय म्हणणं आहे? म्हणजे आधी त्याने एम्माच्या नावाने बॅगा पाठवल्या आणि त्या ती ताब्यात घेत असतानाच तिच्या अंगावर घालण्यासाठी मारेकरीही पाठवले. शक्यच नाही. ते काम ब्लिट्झचं नसणार. त्यामागे दुसराच कुणीतरी आहे."

"म्हणजे असा, की ज्याला एम्माच्या मृत्यूची खबर मिळालीय?"

"किंवा कुणीतरी, जो अखंडपणे त्या सामानावर टपून बसला होता."

जोनाथन गाडीतून बाहेर पडला व बंगल्याच्या लोखंडी फाटकापाशी आला. मागोमाग सीमॉनही आली. दरवाजावर 'गॉडफ्रिड ब्लिट्झ' अशी पाटी होती. त्याने बेल वाजवली. आतून काहीच उत्तर आलं नाही. त्याने खिसा चाचपला. त्याच्या हातात मिंटची गोळी आली. इव्हा क्रुगरच्या त्या पर्समधून त्याने काही गोळ्या उचलल्या होत्या. "तुला हवीय?" त्याने सीमॉनला विचारलं.

तिने मानेनेच नकार दिला.

जोनाथनने दरवाजाला कान लावून आतला अंदाज घेण्याचा प्रयत्न केला. त्याच्या कानावर शास्त्रीय संगीताचा अस्पष्ट आवाज पडला. त्याने पुन्हा बेल वाजवली. जेव्हा काहीच प्रतिसाद आला नाही तेव्हा त्याने कुंपणावरून पाय टाकून आणि मान उंचावून खिडकीतून आत पाहण्याचा प्रयत्न केला. संगमरवरी फरशीवर तीन कुत्रे शांतपणे झोपलेले होते. झटकन एक सावली सरकल्याचे त्याला डोळ्याच्या कोपऱ्यातून दिसले.

"मिस्टर ब्लिट्झ," त्याने हाक मारली. "मला तुमच्याशी बोलायचंय. प्लीज, दरवाजा उघडा." त्याने पुन्हा कुत्र्यांकडे पाहिले. त्याच्या नजरेला काहीतरी खटकले. कुत्र्यांची झोप इतकी शांत कधीच नसते. त्याच्यातला डॉक्टर जागा झाला. त्याने त्यांचे पोट निरखले. कुणीही श्वास घेत असावा असे वाटत नव्हते. एकाची मान तर खूपच तिरकी झाली होती आणि जीभही तोंडाच्या कोपऱ्यातून लोंबत होती.

जोनाथनने दरवाजा ढकलून पाहिला, पण आतून लॅच लागलेले होते.

"काय करतोयस तू?" सीमॉनने विचारलं, "तू असा घरात घुसू शकत नाहीस."

जोनाथनने दरवाजा अक्षरशः ठोठावला. "मिस्टर ब्लिट्झ, माझं नाव रॅन्सम आहे. मला वाटतं, तू माझ्या बायकोला – एम्माला – ओळखतोस. कृपा करून, दार उघड. मी त्या बॅगा घेऊन आलोय आणि पैसेसुद्धा."

तेवढ्यात घराचा आतला दरवाजा वाजल्याचा आवाज आला.

"तू दार ठोठावत राहा." पायऱ्या उतरत असताना तो म्हणाला.

"तू कुठे चाललायस." सीमॉनने त्याला हाक मारत विचारलं.

"मागच्या बाजूला. इथे काहीतरी विचित्र घडलंय."

"अरे पण... थांब."

तो घराच्या बाजूने धावत, बागेमधून मागच्या अंगणात पोहोचला. सीमॉन त्याला ओरडून थांबवायचा प्रयत्न करत होती. पण त्याने मागे वळूनसुद्धा पाहिलं नाही. पाठीमागचा दरवाजा उघडा होता. गाण्याचा आवाज त्याला ऐकू आला. त्याने आतमध्ये पाऊल टाकले. तो स्वयंपाकघरात उभा होता. हळुहळु तो पुढे जाऊ लागला. पायाखालची करकरणारी लाकडी फरसबंदी, वातावरण आधिकच भयाण करत होती. पण

त्या भयाण वातावरणाने जोनाथन मात्र खचून गेला नव्हता. उलट त्याच्यात एक वेगळीच शक्ती संचारली होती.

तो स्वयंपाकघरातून हॉलमध्ये आला. दरवाजापाशी कुत्रे झोपलेले होते. त्याची पावले वाजली तरी एकानेही मान वर उचलली नाही. त्याने खाली वाकून त्यांच्याकडे पाहिले. तिघेही मरून पडलेले होते. त्यांच्या माना मुरगळलेल्या होत्या.

त्याच्या छातीचे ठोके वाढलेले होते. समोर जिना होता. त्याला कसला तरी आवाज ऐकू आला... त्याच्या पुढच्या बाजूला... तो हॉलमधून पुढे जाऊ लागला. डाव्या हाताला असलेला दरवाजा त्याने उघडला. ते बाथरुम होते. आता आवाज अगदी जवळून ऐकू येत होता. क्षीण घर्रघर्र निर्माण करणारा आवाज.

त्याच वेळेस त्याला स्फोटकांचा उग्र वास आला व चुरचुरलेल्या डोळ्यातून पाणी येऊ लागलं.

तो अभ्यासिकेत येऊन पोहोचला.

"बाप रे!" त्याच्या तोंडून अभावितपणे उद्गार निघाला.

एक माणूस टेबलावर जवळजवळ कोसळून पडला होता. त्याचे तोंड सताड उघडे होते आणि छातीचा भाता, श्वास मिळवण्याचा निकराने प्रयत्न करत, जोराने धपापत होता. हाच ब्लिट्झ असणार. त्याने अंदाज केला. कपाळावर भली मोठी जखम दिसत होती. गोळी आत घुसून भोक पडले होते. ती आत्महत्या होती? जोनाथन एक पाऊल मागे सरला व पिस्तूल शोधू लागला. पण त्याला ते कुठेच आढळले नाही. त्याला मगाशी पाहिलेली ती निसटती सावली आठवली. आत्महत्या नव्हती. कुणीतरी खून केलेला होता.

जोनाथनने चपापून दरवाजाकडे पाहिले. न जाणो तो खुनी अजून घरातच असावा आणि त्याचाही जीव धोक्यात सापडलेला असायचा. पण त्याने तो विचार मनातून काढून टाकला व तो ब्लिट्झशी चक्क बोलू लागला. त्याने त्याला आपले नाव व एम्मा आपली बायको असल्याचे सांगितले. तुला जिवंत ठेवण्यासाठी आपण वाटेल ते करायला तयार आहोत आणि तूही जिद्द हरवू नकोस असेही तो म्हणाला.

त्याने हळुवारपणे ब्लिट्झला टेबलावरून उचलले व जमिनीवर झोपवले. त्याचे तोंड उघडे राहील याची मात्र त्याने दक्षता घेतली. त्याने कपाळावरची जखम नीट निरखली. आजपर्यंत त्याने अशा अनेक जखमा पाहिल्या होत्या. बंदुकीच्या नळीचा व्यास मोठा असणार. जखम खूपच खोल होती. ब्लिट्झ वाचण्याची त्याला फारशी शक्यता वाटत नव्हती. पण निदान त्या क्षणी तरी तो जिवंत होता आणि तेच महत्त्वाचे होते.

तो धावत दिवाणखान्यात गेला व १४४ हा नंबर फिरवत, त्याने तातडीच्या रुग्णसेवेशी संपर्क साधला. "कपाळावर गंभीर जखम झालीय आणि बरंच रक्त वाहून गेलंय." आपण चुकून इंग्लिशमध्ये बोलतोय हे लक्षात येताच त्याने लगेच इटालियन भाषेतही सांगून टाकले.

"काय झालंय जोन?" सीमॉन घरात येऊन पोहोचली होती. तिच्या चेहऱ्यावरची काळजी स्पष्ट दिसत होती. "तुझ्या हातांवर रक्त आहे."

"हॉलच्या टोकाला बाथरूम आहे. गरम पाण्यात थोडे टॉवेल भिजव आणि मला आणून दे."

“टॉवेल? काय झालंय? का–”

“सांगतोय तेवढं कर.”

जोनाथन अभ्यासिकेत परतला व ब्लिट्झच्या शेजारी गुडघे टेकून बसला. वैद्यकीय मदत येईपर्यंत तो फारसे काहीच करू शकणार नव्हता. मात्र तोपर्यंत त्या माणसाच्या हृदयाचे ठोके सुरू राहतील याची काळजी घेणे फार आवश्यक होते. ब्लिट्झची बुबुळे विस्तारली गेली होती व श्वास मंद होत चालला होता. जोनाथनने त्याचे मनगट हातात घेतले पण प्रयत्न करूनही त्याला नाडी सापडेना. अखेरचा उपाय म्हणून त्याने CPR सुरू केले. कृत्रिम श्वासोच्छ्वास. तीन वेळा दाब द्यायचा आणि मग दोन श्वास पुरवायचे. तेवढ्यात सीमॉन धावत आली आणि ब्लिट्झला पाहून तिच्या तोंडून अस्फुट किंकाळी उमटली. तिच्या हातातले टॉवेल जमिनीवर पडले.

“मी EMT ला फोन केलाय.” तो म्हणाला, “ते एवढ्यात इथे येऊन पोहोचतीलच. त्याच्या मानेभोवती ते टॉवेल गुंडाळ.”

“पण तू का फोन केलास?” नाखुशीने तिने टॉवेल उचलले व जोनाथनच्या बाजूला ठेवून दिले. कार्पेटवरचे रक्त पाहून तिचे हातपाय लटपटू लागले होते. “तो मेलाय.”

“अजून नाही. त्याच्यात थोडी धुगधुगी शिल्लक आहे. डॉक्टर्स येईपर्यंत जर मी त्याला जिवंत ठेवू शकलो तर तो कदाचित वाचेलही.”

“अरे, त्याच्या कपाळात गोळी घुसलीये. त्याचा नाद सोडून दे.”

जोनाथनने आपले डोके त्याच्या छातीवर ठेवले. हृदयाचे ठोके आता बंद पडले होते. श्वासोच्छ्वास सुरू नव्हता. त्याने सीमॉनकडे पाहिले आणि मान हलवली.

“कुणी केलं हे?”

“मला वाटतं की मला तो माणूस क्षणभर दिसला होता... म्हणजे... एक सावली. दरवाजा धाडकन बंद केल्याचा आवाजही मी ऐकला. तो नक्कीच पळाला असणार.”

“ते जाऊ देत. कोणत्याही क्षणी पोलीस इथे येऊन पोहोचतील. त्याच्या आत आपल्याला इथून बाहेर पडायला हवं.”

जोनाथन चटकन उठून उभा राहिला. अचानक डोळे दिपवून जाणारा लख्ख प्रकाश उजळला आणि त्याला पापण्या मिटून घ्याव्या लागल्या. तो एकदम स्तब्ध झाला. त्याने एक दीर्घ श्वास घेतला. मृत्यू असा समोर घडल्यावर आपोआपच गळ्यात एक दुःखाचा कढ येतो. पण त्याला असे काहीच जाणवले नाही. उलट त्याला एकदम उत्साही, आनंदी आणि ताजेतवाने वाटत होते. खरे तर काल रात्री एक मिनिटही त्याचा डोळा लागला नव्हता. त्याने केसांमधून हात फिरवला. त्याची बोटे हुळहुळली. एका वेगळ्याच, अनोखी संवेदनेची लहर त्याच्या शरीरात पसरत गेली. दृष्टी. स्पर्श. नाद. फक्त त्याचे ओठ सुकून एकमेकांना चिकटलेले होते. बाजूच्या भिंतीवर लटकवलेल्या आरशात, त्याने स्वतःचे प्रतिबिंब पाहिले. त्याचे डोळे त्याच्याचकडे रोखून पाहत होते. आरोपीच्या खुनशी नजरेने. त्याचीही बुबुळे आता विस्तारली गेली होती.

तो वास आता अगदी चांगलाच जाणवू लागला होता, आणि त्याने तो वास लगेच ओळखला. पेट्रोलसारखा उच्च ज्वालाग्रही, शरीर उत्तेजित करणाऱ्या मादक अँफेटामाईनचा वास.

त्याने खिशातले मिंटचे पाकीट चाचपले. मागच्या एका तासात, त्यातल्या किती

गोळ्या त्याने चघळल्या होत्या? दोन? तीन?

“चल जोनाथन, निघ ताबडतोब.” सीमॉनने त्याचा खांदा पकडत त्याला दरवाजाच्या दिशेने खेचले. पण जोनाथनने स्वत:ला सोडवून घेतले. “एक मिनिट थांब.” जोनाथन क्षणभर तसाच उभा राहिला. “ह्या माणसाची काहीतरी माहिती मिळाल्याशिवाय मी इथून जाणार नाही.”

“अरे पण...”

“मी काय बोललो ते ऐकलंस?” तिचे बोलणे तोडत तो म्हणाला. “तुला काय वाटतं, आपण आता अखंड पळतच राहायचं?” त्याने एक श्वास घेतला. स्वत:ला शांत केले. “ब्लिट्झ एम्माला ओळखत होता. ते दोघं एकत्र काम करत होते. ते काय काम करत होते हे शोधण्याची ही एकमेव संधी आहे.”

टेबलावरचा लॅपटॉप उघडाच होता. त्यावर आडव्यातिडव्या रेघोट्या उमटलेल्या होत्या. त्याने दोन-तीनदा लॅपटॉपचा कळफलक वापरून पाहिला, पण ते चित्र काही केल्या बदलेना. त्याने ड्रॉवर्स शोधायला सुरुवात केली आणि पहिल्याच खणातल्या पिस्तुलावर त्याची नजर गेली. त्याला पिस्तुलांची बरीच माहिती होती. पिस्तूल पाहताच त्याने ओळखले की, ते एसआयजी-सॉअर पिस्तूल होते. तिसऱ्या महायुद्धात अशा पिस्तुलांना बरीच मागणी होती. इतर खणांमध्ये कागदपत्रे, पेनं, पेन्सिली, बिले, नाव व फोन नंबर्सचे चिटोरे, काडेपेट्या वगैरे किरकोळ गोष्टी होत्या.

फायली ठेवलेला खण कुलूपबंद होता व बराच प्रयत्न करूनही त्याला तो उघडता आला नाही. टेबलामागच्या ट्रेकडे त्याचे लक्ष गेले. अगदी वरच एक कंपनीचे अधिकृत नाव असलेला कागद त्याला दिसला. ‘ZIAG ’ हे नाव ठळक अक्षरात छापले होते. उजवीकडे कंपनीचे संपूर्ण नाव होते : झुग इंडस्ट्रीवर्क एजी. हॅनेस हॉफमनने इव्हा क्रुगरला लिहिलेले पत्र होतं व त्याची एक प्रत ब्लिट्झला पाठवलेली होती. विषय : थॉर प्रकल्प.

इव्हा क्रुगर.

हेच त्याला हवे होते. खणखणीत पुरावा सापडला होता. म्हणजे जणूकाही डोक्यात गोळी घालून ठार मारून टाकलेले समोरचे प्रेत हा पुरेसा पुरावा नव्हताच.

पत्रातला मजकूर होता, ‘२००– मधील पहिल्या चौथाईचे काम पूर्ण होत आले आहे. १०.२ ला माल गिऱ्हाइकाकडे पाठवण्यात येईल. १३.२ पर्यंत उत्पादनाची सर्व उपकरणं पुन्हा सुटी करण्यात येतील.’

“मला सायरनचा आवाज ऐकू येतोय.” सिमॉन विनवणीच्या सुरात म्हणाली, “जोन, कृपा करून आपण लवकरात लवकर इथून बाहेर पडू या.”

“एक सेकंद.”

त्या पत्राखाली अनेक पाकिटांचा एक गठ्ठा पडलेला होता. पहिल्याच पाकिटात एम्माचे तीन फोटो होते. नकली वाहन परवान्यांवर चिकटवले जातात, तसे. दुसऱ्या पाकिटात आणखी फोटो होते. जोनाथनच्याच वयाचा पण कृश शरीरयष्टी असलेल्या एका पुरुषाचे. फोटोच्या मागे ‘हॉफमन’ असे नाव लिहिलेले होते व तोच एम्माला पत्र पाठवत होता. त्याने तो फोटो अगदी निरखून पाहिला. हॅनेस हॉफमन. इव्हा क्रुगरला पत्र पाठवणारा.

‘मुखवटा.’ तो स्वत:शीच पुटपुटला. तरुणपणी त्याने गुप्तहेरांवर लिहिलेल्या कादंबऱ्या अधाशासारख्या वाचल्या होत्या. त्यात हा शब्द वारंवार येत असे. प्रत्येक गोष्ट म्हणजे एक वेष्टण असते. एम्मा, जी एम्मा नसतेच. अँफेटामाईनवर सुवासिक मिंटचे आवरण चढवले जाते. प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक वस्तू हे एक सोंग असते. एक मुखवटा. त्याने फरशीवर पडलेल्या त्या मृतदेहाकडे पाहिले. आणि ब्लिट्झ? ब्लिट्झ हा जर ब्लिट्झ नसेल, तर मग तो कोण असेल?

आपली किती घोर फसवणूक केली गेलीय या विचाराने तो हादरला. तो केवळ एक मामुली कावा नव्हता. काळ्या बाजारातून औषधं विकत घेण्यासाठी एम्मा अफ्रिकन आरोग्यमंत्र्याला फक्त लाचच देत नव्हती. प्रकरण फार गंभीर होते. त्याची व्याप्ती खूप मोठी होती. ही दुनिया होती उत्तेजक गोळ्यांची, फसव्या मुखवटयांची आणि हुबेहूब बनवलेल्या बनावट वाहन परवान्यांची.

“जोनाथन... प्लीज.” खुर्ची गच्च पकडत सीमॉन म्हणाली. जणू काही ती स्वत:लाच पळून जाण्यापासून रोखत होती.

सायरन्स. दोन सायरनचा आवाज येत होता. त्याने मान उचलली आणि त्याच क्षणी त्याच्या लक्षात आले की, पोलिसांची गाडी वेगाने जवळ येत चाललीय. टेबलावर पडलेले सगळे कागद त्याने गोळा करून शेजारी असलेल्या चामडयाच्या बॅगमध्ये कोंबले. “चल,” तो म्हणाला, “मी तुझ्या पाठीशीच आहे.”

“चल. चल.”

“आलोच मी.” तिला खोलीबाहेर ढकलत तो म्हणाला, “मागच्या बाजूला जा.”

सीमॉन बाहेर पडली.

जोनाथन दरवाजात उभा होता. सायरनचा आवाज आता अगदी बंगल्याबाहेरून ऐकू यायला लागला होता. चिडलेले व आक्रस्ताळी आवाज, कोसळणाऱ्या पावसाला भेदून कानावर पडू लागले. बाहेर पडण्याऐवजी तो ब्लिट्झच्या टेबलाकडे धावला व त्याने वरचा ड्रॉवर उघडला. त्यात असलेल्या पिस्तुलाकडे त्याने क्षणभर पाहिले आणि दुसऱ्याच क्षणी ते उचलून आपल्या कमरेला खोचलं.

तो आणखी काही क्षण तिथे रेंगाळला. बंगल्यात शिरणाऱ्या पोलिसांच्या गाडया त्याने पाहिल्या. काळा ओव्हरकोट घातलेला एक बुटका, निग्रही चेहऱ्याचा अधिकारी सर्वांत पुढे चालत होता.

पोलीस? मग त्याने फोन करून बोलावलेली अॅम्ब्युलन्स कुठे होती?

प्रश्न. प्रश्न. खूप सारे प्रश्न.

जोनाथन बाहेर पडला. धावत जाऊन त्याने सिमॉनला गाठले. तिचा हात पकडत त्याने तिला बागेतून खेचत नेले.

“कुठे चाललोय आपण?” तिने विचारले. त्याच्या वेगाशी जुळवणं, तिला कठीण जात होते. “गाडी तर दुसऱ्या बाजूला आहे.”

“गाडी विसर. तिच्यासाठी आपण परत येऊ शकतो.”

धुळीने माखलेल्या रस्त्यावर ते थांबले नाहीत. त्याऐवजी त्यांनी डोंगरावरचा रस्ता पकडला. वारा, पाऊस, छातीला टोचणारी झुडपे, कशाकशाची तमा न बाळगता

जोनाथन रस्ता कापत बराच वर पोहोचला. सीमॉन धापा टाकत होती, शिव्या देत होती, रागाने पाय आपटत होती; पण तरीही कशीबशी त्याच्या बरोबरीने वर पोहोचली होती. अखेर जेव्हा त्याने मागे वळून पाहिलं तेव्हा ते चारशे फूट उंचावर आले होते. बंगला, किमान अर्धा मैल तरी दूर राहिला होता.

"आता मात्र मी एक पाऊलही टाकू शकत नाही." जोरजोरात श्वास घेत ती म्हणाली. "मला विश्रांती हवीय."

त्याला वाटले, हा एम्माचाच आवाज आहे. आपण एम्मालाच पाहतोय लाल-काळ्या कपड्यांमध्ये ती खालच्याच कड्यावर उभी आहे. भान येत त्याने सीमॉनचा हात पकडला. "चल." तो म्हणाला, "आता फक्त एकच मार्ग उरलाय."

चामड्याची बॅग छातीशी घट्ट धरत तो पुन्हा वळला आणि डोंगरमाथ्याच्या दिशेने चालू लागला.

२९

त्या बर्फाळ रस्त्यावर मिली ब्रँडतची पावलं झपाझप पडत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गर्द दाट झाडी होती. एरवी त्या शॉनब्रून राजवाड्याच्या बागेमधून मुक्तपणे हिंडायला तिला खूप आवडलं असते. चारही दिशांना मैल-मैल लांब पसरलेल्या प्रचंड मैदानावर उभा असलेला तो भव्य प्रासाद एकेकाळच्या ऐतिहासिक युगाची आठवण करून देत होता. अनियंत्रित राजसत्तेचा तो काळ होता. काही राजे दयाळू निघाले तर काही, क्रूरकर्मे.

तिला तो दिवस आठवला. त्या दिवशी ती प्रथमच त्या प्रसिद्ध बागेत आली होती. इस्त्रायलला तिने नुकताच अलविदा केलेला होता. तिच्याबरोबर त्या दिवशी तिचे आईवडील व बहीणही होते. अख्खा दिवस ती बागेच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत बागडत होती. डोंगरावर चढून ती ग्लोरिएटलाही जाऊन आली. तिथे उभारलेल्या उंच स्तंभांच्या रांगा हे परदेशी पर्यटकांचे प्रमुख आकर्षण होते. सम्राट जोसेफ व त्याची पत्नी मारिया ह्यांनी १७७५ साली ते स्तंभ उभारले होते. दोन्ही बहिणी अत्यंत महत्त्वाकांक्षी होत्या. मिलीला नामांकित न्यायाधीश व्हायचे होते तर तोव्हा राजनीतिज्ञ होणार होती. दोघींमध्ये, तोव्हाने आपले इप्सित आधी साध्य केले. वयाच्या पंचविसाव्या वर्षी ती जेरुसलेमला परतली होती व इस्त्रायलच्या परराष्ट्र खात्याची प्रवक्ती म्हणून तिची नेमणूक झाली होती. एव्हाना तिचे लग्न होऊन, ती एका मुलीची आई झालेली होती. रात्री नऊच्या बातम्यांत तिला अनेकदा निमंत्रित केले जात असे.

एका संध्याकाळी ती व तिचा नवरा, तेल अविव्हच्या समुद्रकिनाऱ्यावरील एका खास रेस्टॉरंटमध्ये मत्स्य आहाराचा स्वाद घेण्यासाठी आलेले होते. त्या आधीच्याच आठवड्यात, ती पुन्हा एकदा गरोदर असल्याचा निर्वाळा डॉक्टरांनी दिला होता.

मजा करायची ही आपली शेवटचीच संधी आहे हे लक्षात येऊन, दोघांनी तिथे असलेल्या डिस्कोबारमध्ये नृत्य करायचे ठरवले. मध्यरात्रीच्या सुमारास, नासेर ब्रिम्म नावाचा एक देखणा तरुण तिथे दाखल झाला आणि गर्दीमध्ये घुसत नृत्यमंचावर जाऊन पोहोचला. त्या धमाल आणि दमट संध्याकाळसाठी त्याने केलेला खास पेहेराव आणि विशेषतः त्याने घातलेले लोकरीचे ब्लेझर, कुणाच्याही नजरेला चटकन खटकणारे होते; पण ते लक्षात यायला आता फार उशीर झालेला होता.

पोलिसांच्या सांगण्याप्रमाणे त्या तरुणानेच बॉम्बचा स्फोट घडवून आणला होता व त्या वेळेस तोव्हा त्याच्या अगदी शेजारीच उभी होती. तिचं शरीर कुणालाही सापडले नाही. हाती लागले ते फक्त तिचे डोके.

त्या बॉम्बहल्ल्यात एकूण सोळा स्त्री-पुरुष मारले गेले. दोघांना अंधत्व आले. तिसऱ्याचा हात तुटला तर चौथ्याचा मानेखालचा भाग लुळा पडला होता. खरे तर, मृतांची संख्या त्याहून अधिक होती. कारण तोव्हाच्या उदरात वाढणारा जीव, कुणीच

गृहीत धरला नव्हता.

“मिस ब्रँडत,”

कानावर तो खोल, खर्जातला आवाज कानी पडताच, मिली गर्रकन वळली. तिच्या पाठीमागे एक सडपातळ, प्राध्यापकी चेहऱ्याचा माणूस उभा होता. तो जवळ आल्याचे तिच्या लक्षातही आले नव्हते. “मिस्टर काट्झ?”

“तुझ्या हातातला खुणेचा कागद मी पाहिला. आमच्या सूचना पाळल्याबद्दल धन्यवाद.” तो माणूस तिच्या जवळ आला आणि अगदी नवराबायकोसारखे खांद्याला खांदा घासत ते त्या बागेतून चालू लागले. काल रात्री व्हिएन्निजच्या जंगलात झालेल्या गुप्त बैठकीबद्दल आणि मोहम्मद एलबरादीने केलेल्या टिप्पणीची तपशीलवार माहिती, मिलीने त्याला दिली.

“शहाण्णव टक्के क्षमता? तुझी नक्की खात्री आहे?”

मिलीने हो म्हटले.

“आणि ह्या सर्व निरीक्षणात चूक असण्याची शक्यता कितपत आहे?”

“यापूर्वी तरी अशी चूक कधीही झालेली नाही. खरं तर ही माहिती सांगताना मला अपराधी वाटतंय. पण ही गोष्ट तुमच्या कानावर घालणं हे मला माझं कर्तव्य वाटलं.”

“राजावर जितकी कर्तव्याची जबाबदारी सोपवलेली असते तितकीच ती प्रजेवरही असते. पण प्रत्येकाला त्याची जाणीव असतेच असे नाही, असे म्हणणारा कदाचित मी एकटाच माणूस असू शकेन; पण माझे असे ठाम मत आहे की, शेक्सपिअर हा ज्यू होता.” तो क्षणभर थांबला आणि त्याने वळून तिच्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर एक बुजरे स्मित उमटले होते. “कुणालाच विश्वासघात करावासा वाटत नसतो.”

ती उंच, सडपातळ आकृती, समोरच्या बर्फाच्छादित घनदाट वृक्षांमधून हळूहळू नाहीशी होत जाताना, मिली स्तब्धपणे पाहात राहिली होती. घोंगावणाऱ्या वाऱ्याचा आवाज तिच्या कानात भरून राहिला व अचानक तिला खूप एकाकीपणाची जाणीव झाली. ‘तू खूप महत्त्वाचं काम केलंस’ असे त्याने म्हणण्याची, तिने अपेक्षा केली होती. ‘आम्ही यावर ताबडतोब कारवाई करू. तुझ्यामुळे हजारो जीव वाचणार आहेत.’ निदान आभाराची दोन वाक्ये तिला ऐकायची होती; पण तो एक शब्दही न बोलता निघून गेला.

निघताना तो एवढेच म्हणाला की, तिला जर आणखी काही माहिती मिळाली तर तिने दिलेल्या नंबरवर लगेच फोन करावा. बस्स. साधे, ‘थँक यू’ सुद्धा नाही.

३०

“हा, तोच आहे?”

व्हॉन डॅनिकनने एकदा आपल्या हातातल्या फोटोकडे पाहिले आणि मग समोर मरून पडलेल्या त्या प्रेताकडे. हातातल्या फोटोमध्ये, गॉटफ्रिड ब्लिट्झ त्या ‘मधमाशी’ विमानाशेजारी उभा होता. “आता तूच बघून सांग.” त्याने तो फोटो मायरच्या हातात ठेवला आणि तो झटकन बाजूला वळला. त्याच्या पोटात उमसून आले होते.

“तोच स्वेटर. तसेच डोळे नक्की, ‘तोच’ आहे.” खाली वाकून मायर आपले निरीक्षण नोंदवू लागला. “खुर्चीत बसलेला असतानाच त्याला गोळी घालण्यात आलीये. त्यानंतर त्याला फरशीवर झोपवलं गेलंय. कमरेएवढ्या उंचीवरून त्याच्या चेहऱ्याचा वेध घेत गोळी सुटलीय आणि त्याच्या मेंदूची शकलं उडवली गेलीयेत.”

बॉलपेनचा वापर करत, मायरने प्रेताच्या कॉलरवर आणि अंगावर उडालेली बंदुकीतली दारू दाखवली. त्या खुन्याने जेव्हा पिस्तुलाचा चाप ओढला तेव्हा तो ब्लिट्झपासून फूटभर अंतरावर उभा असणार. तो आसपास असेल, याचा ब्लिट्झला पत्ताही नसणार. तो लॅपटॉपवर काम करण्यात मग्न असणार.

व्हॉन डॅनिकनच्या मनात मात्र वेगळच विचारचक्र सुरू झालं होते. “एक सेकंद थांब. तू म्हणालास की त्यानंतर कुणीतरी ब्लिट्झला फरशीवर झोपवलं. याचा अर्थ काय? म्हणजे त्या खुन्याने आधी त्याला मारलं आणि मग कार्पेटवर झोपवलं? नंतर त्याने जाऊन टॉवेलसुद्धा आणले?”

“कुणीतरी ते केलंय. स्वत: ब्लिट्झने तर नक्कीच नव्हे.” मायरने टॉवेलला हात लावला. “अजून गरम आहेत.”

दोघांनी एकमेकांकडे अस्वस्थ नजरेने पाहिले.

रस्त्यावरून पुन्हा एकदा सायरनचा आवाज ऐकू आला. दरवाजा ढकलला गेला. दोन शिकाऊ डॉक्टर्स आत आले.

“कमाल झाली.” त्या दोघांकडे पाहत व्हॉन डॅनिकन म्हणाला.

“तू फोन केला होतास?” दोघांमधला एक म्हणाला. “एका अमेरिकन माणसाने फोन केलाय असं आम्हाला सांगितलं गेलं.”

“अमेरिकन?” व्हॉन डॅनिकनने मायरकडे अर्थपूर्ण कटाक्ष टाकला. “त्या अमेरिकन माणसाने किती वेळापूर्वी फोन केला होता?” त्याने त्या डॉक्टरला विचारले.

“बारा मिनिटांपूर्वी. नऊ सहाला.”

“हा तोच असणार.” मायर म्हणाला “रॅन्सम.”

व्हॉन डॅनिकनने मान डोलावली आणि हातातल्या घड्याळाकडे पाहिले. मगाशी गाडीत बसल्यावर त्याने स्टेशनमास्तर ओरसिनीला फोन करून त्याच्याकडे सकाळी

आलेल्या पोलीस ऑफिसरचे वर्णन मागितले होते आणि त्या बॅगा लँडक्वॉर्टला कुणी पाठवल्या, हेही विचारले होते. त्यानंतर ग्राऊबंडन पोलीसस्टेशनला फोन करून त्याने काल झालेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या खुनाची माहितीही मिळवली होती. तो खून प्रत्यक्ष पाहाणाऱ्या एका साक्षीदाराने केलेले वर्णन हे ओरसिनीने केलेल्या वर्णनाशी तंतोतंत जुळले होते. लँडक्वॉर्टच्या पोलिसांना त्या माणसाचे नावही समजले होते : डॉक्टर जोनाथन रॅन्सम. अमेरिकन नागरिक. आणखीही बरेच काही. रॅन्समची बायको दोन दिवसांपूर्वीच डॅव्होसजवळील पर्वतशिखर चढताना दरीत कोसळून मरण पावली होती.

"जर रॅन्समनेच ह्यांना फोन केला असेल," तो मायरला म्हणाला, "तर ह्या टॉवेलची संगती सहज लागू शकते. तो डॉक्टर आहे."

लेफ्टनंट काँटी, त्या दोघांचे संभाषण अस्वस्थपणे ऐकत होता. आपल्या इटालियन पद्धतीने हात उंचावत त्याने विचारले, "जर रॅन्समने ब्लिट्झला मारलं असेल तर तो त्याला वाचवण्यासाठी अॅम्ब्युलन्सला का फोन करेल?"

व्हॉन डॅनिकन व मायरची पुन्हा एकदा नजरानजर झाली. दोघांनीही त्या प्रश्नाचे उत्तर देणे टाळले.

व्हॉन डॅनिकन टेबलापाशी गेला व त्याने लॅपटॉप तपासला. लॅपटॉपवर रेघोट्या उमटल्या होत्या व तो पूर्ण निकामी झाला होता. आता आणखी एक नवा प्रश्न उपस्थित झाला. म्हणजे गोळी मारली गेली तेव्हा ब्लिट्झ त्या निकामी लॅपटॉपवर काम करत होता? का, लॅपटॉपची हार्ड ड्राइव्ह कुणाच्याही हाती लागू नये म्हणून तो ती नष्ट करून टाकत होता?

त्याने एकामागोमाग एक टेबलाचे सर्व खण उघडले. वरचे दोन खण तर पूर्ण रिकामे होते. थोडीफार कागदपत्रे, रबर बँड्स आणि पेने तेवढी होती. शेवटच्या ड्रॉवरला कुलूप होते, पण कुलूप तोडण्याचा प्रयत्न केला गेला होता. भिंतीच्या बाजूला पडलेल्या खोक्यांकडे त्याची नजर गेली. त्यात काय आहे हे पाहाण्यासाठी तो उत्सुकतेने गेला पण रिकामे खोके पाहून निराश झाला.

त्याच वेळेस गुन्हाअन्वेषण पथकाचे तिथे आगमन झाले. नको असलेल्या व्यक्तींना खोलीबाहेर काढण्यात आले. मायरही बाहेर सटकला. पण जाता जाता तो डॅनिकनच्या कानात कुजबुजला की, त्याला स्फोटकांचा वास येतोय.

पथकाने आपले काम सुरू करताच, व्हॉन डॅनिकन जिना चढून ब्लिट्झच्या बेडरूममध्ये गेला. तो ब्लिट्झपेक्षा, त्या खुन्याबद्दलच अधिक विचार करत होता. ज्या माणसाची पत्नी दोन दिवसांपूर्वी अपघातात मेली, अशा माणसाने आधी एका पोलीस अधिकाऱ्याचा खून करून तातडीने ब्लिट्झला भेटण्यासाठी का यावे, याचा त्याला उलगडा होत नव्हता.

ब्लिट्झच्या बेडरूममध्ये काहीच सापडले नाही. सर्वसाधारणपणे एखाद्या बेडरूममध्ये ज्या गोष्टी असतात, त्याच तिथेही होत्या. पण त्या मधमाशी विमानाचा व ब्लिट्झचा असलेला संबंध किंवा विमानासंबंधी त्याची काय योजना होती याबद्दलचा एकही धागादोरा त्याच्या हाती आला नाही.

व्हॉन डॅनिकन कॉटवर बसला व खिडकीतून बाहेर पाहत राहिला. त्याच्या आता

लक्षात आले होते की, या दोन वेगवेगळ्या टोळ्या आहेत व त्या आपापसात लढत आहेत. एका बाजूला लॅमर्स व ब्लिट्झ तर दुसऱ्या बाजूला त्यांना ठार मारण्यासाठी टपलेली दुसरी टोळी मधमाशी विमान आणि आरडीएक्सच्या पुराव्यावरून तरी असे दिसते की, या दोन्हीही गुप्तहेर संघटना असाव्यात.

त्याने आता आपला विचार डॉक्टर रॅन्समवर केंद्रित केला. स्टेशनमास्तरच्या म्हणण्यानुसार, त्या बॅगा कुणी पाठवल्या हे जाणून घेण्यास रॅन्सम कमालीचा आग्रही होता. याचा अर्थ असा होतो की तो ब्लिट्झला ओळखत नव्हता. तर मग त्या बॅगा रॅन्समच्या हातात कशा आल्या होत्या?

मात्र जर व्हॉन डॅनिकनने असे गृहीत धरले की, रॅन्सम आणि ब्लिट्झ एकमेकांना ओळखत होते– एकत्र काम करत होते– तर मात्र अनेक घटनांची संगती लावणे अगदी सोपे होऊन जात होते. बॅगा ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी अचानक अडवल्यामुळे रॅन्सम बिथरला व त्याने आपल्याला पकडणाऱ्या पोलीस ऑफिसरला ठार मारले व तिथून चटकन पसार होण्याच्या प्रयत्नात त्याने दुसऱ्या ऑफिसरलाही जबर जखमी केले. कामाचा मोबदला आधीच ठरलेला असल्यामुळे त्यानंतरच्या सूचना आपल्या बॉसकडून मिळवण्यासाठी त्याने अस्कोना गाठले. त्याला ब्लिट्झच्या घराचा पत्ता माहीत नसावा हे ही सयुक्तिकच होते. कारण गुप्तहेर जगतातला तो मुख्य नियम समजला जायचा : प्रत्येकाला सर्व माहिती दिली जाणार नाही किंवा साध्या भाषेत सांगायचे तर गरज लागली की, ज्याची त्याने ती हुडकायची. म्हणून तर त्याला ओरसिनीशी बोलण्याची गरज भासली.

आणि त्याची पत्नी? दरीत कोसळून मेलेली ती इंग्लिश स्त्री? आपण गुप्तहेर आहोत याचे बिंग फुटल्यामुळे कदाचित त्यानेच तिला मारून टाकलेले असावे.

व्हॉन डॅनिकनच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरले होते. जाळ्यामधला कोळी पकडण्याचा तो प्रयत्न करत होता. कल्पनांचे खेळ खेळत होता. जिना उतरतानाही त्याच्या मनातला विचार सुरूच होता. त्या बॅगांमध्ये असे काय होते की त्यासाठी रॅन्समने इतक्या जणांचे जीव घ्यावेत? पण इतक्या लवकर ह्या प्रश्नाचे उत्तर मिळणे शक्य नव्हते. रॅन्समने जखमी केलेला ऑफिसर आता कोमामध्ये होता व तो वाचण्याची फारशी चिन्हे दिसत नव्हती.

व्हॉन डॅनिकनचा मोबाइल वाजला आणि त्याचे विचार विस्कटले गेले.

मायरचा आवाज चिंताग्रस्त होता. “मी गॅरेजमध्ये आहे. चटकन ये.”

३१

बंगल्याच्या बाजूला गॅरेज होते व गॅरेजमध्ये जाण्यासाठी खास पायवाट तयार केलेली होती. गॅरेजच्या अर्ध्या भागात एक जुनी मर्सिडिज गाडी उभी होती. दुसरा अर्धा भाग जरी मोकळा असला तरी तिथल्या डिझेलच्या वासाने आणि उमटलेल्या चाकांच्या खुणांमुळे, तिथेही एखादी व्हॅन किंवा ट्रक उभा होता हे सहज लक्षात येऊ शकत होतं.

मायर मर्सिडिजच्या बाजूने पुढे जात, भिंतीजवळील कपाटापाशी गेला. त्याने कपाट उघडले आणि डॅनिकनला ते कपाट नीट दिसावं म्हणून तो मागे सरकला. कपाटाच्या खणांमध्ये पांढऱ्या प्लॅस्टिकच्या कागदात पाच-पाच विटांचा संच ठेवलेला होता.

"मला जे वाटतंय, तेच ते आहे?" व्हॉन डॅनिकनने मायरला विचारले.

"सगळं मिळून तीस किलो सेमटेक्स आहे आणि ते नुकतंच कारखान्यातून आणलं गेलंय." मायर म्हणाला. "ते कुठून आणलं गेलंय हे शोधणं फारसं कठीण नाही."

प्लॅस्टिक स्फोटकांवर एका विशिष्ट रसायनाचे लेबल लावणे बंधनकारक असे. त्यामुळे ते ज्या कारखान्यात बनवले असेल, त्या उत्पादकाचे नाव व उत्पादनाचा गटक्रमांकही समजत असे. बेकायदेशीर विक्रीला व चोरट्या व्यापाराला आळा घालण्यासाठी हा उपाय योजला होता.

"त्यातली एक उचल." व्हॉन डॅनिकन म्हणाला.

मायरनेही फारसा विचार न करता त्यातली एक वीट उचलून क्रॅजेकच्या दिशेने फेकली. क्रॅजेकने ती आपल्या ओव्हरकोटमध्ये ठेवून दिली. खरे म्हणजे त्या पुराव्यावर फक्त टेस्सिन पोलिसांचाच अधिकार होता. व्हॉन डॅनिकनला तो पुरावा ताब्यात मिळवण्यासाठी आधी एक विनंतीअर्ज करावा लागला असता व त्यानंतर आठवडाभर वाट पाहावी लागली असती. त्याच्यापाशी एवढा वेळ नव्हता आणि प्लॅस्टिक स्फोटक पदार्थ म्हणजे काही एखादा पासपोर्ट नव्हता.

"गाडी तपासलीस?" व्हॉन डॅनिकनने विचारलं.

"फक्त डिकी. त्यात काही नाही."

व्हॉन डॅनिकन गाडीत जाऊन बसला व त्याने तपासणी सुरू केली. गाडी ब्लिट्झच्या नावावर नोंदली गेली होती. दरवाजाच्या बाजूला वाहन-परवाना अडकवलेला होता. डॅनिकनने तो उचलला तेव्हा एक निळा कागद त्याच्या मांडीवर पडला.

तो एक लखोटा होता. जुन्या काळी 'एअर मेल' अशी अक्षरे छापलेले पाकीट असायचे. त्याने त्या पाकिटावरचे शब्द वाचले आणि त्याच्या काळजाचा ठोकाच चुकला. अरेबिक लिपी होती व फिकट निळी शाई वापरलेली होती. 'दुबई, यु.ए.ई. १०.१२.८५' असा पोस्टाचा त्यावर शिक्का होता.

व्हॉन डॅनिकनने तो लखोटा उघडला. पत्र अरबी भाषेत होते. एका कागदावर अगदी

सुवाच्य अक्षरात लिहिलेले. जरी त्यातला एकही शब्द त्याला कळलेला नसला तरी फारसे काही बिघडणार नव्हते. पत्रावर चिकटवलेला फोटोच त्याला सर्व काही सांगून गेला होता.

फोटोमधल्या तरुणाने हिरव्या रंगाचा सैनिकी गणवेश घातला होता आणि त्याच्या डोक्यावर लष्करी अधिकाऱ्याची कॅप होती. त्याच्यासोबत त्याचे आईवडील होते व त्यांचे चेहरे आपल्या मुलाबद्दलच्या अभिमानाने फुलून गेलेले होते. व्हॉन डॅनिकन आजपर्यंत कधीच इराणला गेला नव्हता. पण फोटोमागे दिसणारी तसवीर त्याने ओळखली. ते अयातोल्ला रुहोल्ला खोमेनीचे तैलचित्र होते. त्या अर्थी तो फोटो तेहरानमध्येच काढलेला असणार हे निश्चित होते. तरीसुद्धा त्याचे लक्ष पुन्हा पुन्हा त्या लष्करी माणसाच्या चेहऱ्यावर जात होते. विशेषतः त्याच्या विलक्षण विक्षिप्त निळ्याभोर डोळ्यांकडे. धर्मांध, अतिरेकी नजर.

तितक्यात त्याचा सेलफोन वाजला. खाजगी नंबर होता. "व्हॉन डॅनिकन." तो म्हणाला.

"मार्क्स, मी, तुझा अमेरिकन चुलतबंधू."

व्हॉन डॅनिकनने हातातले पत्र मायरकडे दिले व अरेबिक भाषा समजणाऱ्या एखाद्या माणसाला घेऊन येण्यास सांगितले. गॅरेजबाहेर पडत त्याने संभाषण सुरू केले.

"तुझ्या विमानाचं इंजीन पुन्हा बिघडलेलं नसो, एवढीच अपेक्षा करतो."

"छे. छे. त्याची आता मी पूर्ण काळजी घेतलीय."

"ते एक बरं झालं."

"आम्ही वालिद गॅसनशी बोललो."

"मला वाटलंच." बोलता बोलता वालिदला त्याने विमानात कुठे लपवले असेल ह्याचा तो विचार करू लागला. "तुम्ही त्याला नेमकं कधी पकडलं होतं?"

"पाच दिवसांपूर्वी, स्टॉकहोममध्ये. लॅपझिगमधून त्याने प्लॅस्टिक स्फोटकं उचलल्याची खबर आम्हाला मिळाली होती. आम्ही एका मोठ्या पथकासह त्याला शिताफीने पकडण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यापूर्वीच त्याने ती स्फोटकं दुसरीकडे पोहोचवलेली होती."

"सेमटेक्स?"

"तुला कसं ठाऊक? त्याने ती कुप्रसिद्ध युक्रेनियन शेव्हचेन्कोकडून मिळवली होती."

"तुझी तशी खात्री आहे?"

"सांगता येत नाही. पण आपण असं म्हणू या की, त्याने अगदी शपथ घेऊन जे आम्हाला सांगितलं ते सत्य असावं."

व्हॉन डॅनिकनने त्याला जास्त तपशील विचारला नाही.

"गॅसन हा स्फोटक पुरवण्याचं काम करत होता." पालुंबोने आपले बोलणे चालू ठेवले. "त्याने ती प्लॅस्टिक स्फोटकं कुणा एका महम्मद क्विताबकडे आणून दिली. आम्ही हे नाव लॅंग्ले व इंटरपोलवरून तपासून पाहिले, पण आम्हाला काहीच शोध लागला नाही. ते राहूदेत; पण ह्या क्विताब नावाच्या इसमाने तो माल एका पांढऱ्या व्होल्क्सवॅगनमध्ये भरला. व्हॅनवर स्विस पाटी होती. नंबर मात्र समजला नाही."

व्हॉन डॅनिकनने गॅरेजकडे एक कटाक्ष टाकला. गॅरेजच्या मध्यभागी असलेल्या खांबावर पांढऱ्या रंगाचा चट्टा उमटलेला होता. “व्हॅन सफेद रंगाची होती? नक्की?”

“तो तरी तसं म्हणाला. क्विताब हे नाव तुला आठवतंय?”

“नाही बुवा.” आपल्या अधीर मनाला कसंबसं आवरत तो म्हणाला. “ह्या क्विताबबद्दल आणखी काही माहिती... फोन नंबर, पत्ता, त्याचं वर्णन?”

“त्याच्या फोनमध्ये फ्रेंच सिमकार्ड आहे. आम्ही फ्रान्स टेलिकॉमला तो नंबर शोधून काढायची विनंती केलेली आहे. गॅसनच्या फोनवरून आलेल्या व त्याने केलेल्या सर्व फोन कॉल्सबाबतीतही आम्ही अशीच चौकशी सुरू केलीय. क्विताबच्या घराचा पत्ता समजलेला नाही, पण तो कसा दिसतो हे कळलंय. साधारण पन्नाशीचा. काळे केस. बारीक कापलेले. मध्यम उंची. सुसंस्कृत. उंची पोशाख. त्यांच्याचपैकी एक, पण निळ्या डोळ्यांचा.”

त्यांच्यापैकीच एक, म्हणजे अरब.

व्हॉन डॅनिकनने ब्लिट्झचा फोटो पुन्हा पाहिला. काळे केस. मध्यम उंची, चेहऱ्यावर सुसंस्कृत भाव आणि अर्थातच हिऱ्यासारखे चमकणारे निळेभोर डोळे.

तेवढ्यात मायर एका पोलीस अधिकाऱ्याला घेऊन आला. व्हॉन डॅनिकनने पालुंबोला काही वेळ थांबायला सांगितले व तो त्या पोलीस अधिकाऱ्याशी बोलू लागला. “तू पत्र वाचलंस?” त्याने विचारलं.

ऑफिसरने मान डोलावली व सांगितलं की त्या माणसाने ते पत्र आपल्या आईवडिलांना लिहिलंय व त्यात त्याच्या दैनंदिन घडामोडी सांगितल्या आहेत. बेकायदेशीर कृत्यांबद्दल कुठेच उल्लेख नाही.

व्हॉन डॅनिकन किंचित खट्टू झाला. “आणि त्याचं नाव? हे पत्र त्याने कुणाला लिहिलंय, त्यांची नावं?”

पोलीस अधिकाऱ्याने नावे सांगितली.

आपला अंदाज खरा ठरणार याची त्याला खात्री होतीच. या खेळामध्ये योगायोगाला वाव नसतो.

“मार्क्स, फोन चालू आहे ना?” पालुंबोने विचारलं.

“हो. हो. बोल तू.”

“ह्या क्विताबने तुझ्याच गल्लीत घर बांधलंय” पालुंबो म्हणाला. “त्याचा ठावठिकाणा सांगण्यासाठीच तर मी फोन केलाय.”

“हो. मला ठाऊक आहे.”

“तुला ठाऊक आहे, म्हणजे?” पालुंबोच्या आवाजात अविश्वास होता. “मला वाटलं होतं की तुला त्याचं नावदेखील ठाऊक नसेल.”

“स्पष्ट सांगू? आत्ता मी त्याच्याच घरातून बोलतोय.”

“म्हणजे तुला हे सर्व कारस्थान समजलंय?”

“तुला वाटतंय त्यापेक्षा ते खूप जास्त गुंतागुंतीचं आहे. क्विताब मेलाय.”

“तो मेलाय? क्विताब? कसा? म्हणजे मला म्हणायचंय... वा! फारच छान! बापरे... ही

तर फारच आनंदाची बातमी आहे. मी थोडा काळजीत पडलो होतो. वाटलं होतं की तुला बराच कडा मुकाबला करायला लागणार. तुला स्फोटकंसुद्धा मिळाली?”

“हो. मिळाली.”

“सगळीच्या सगळी? पन्नास किलो? देवाचे आभार मानावेत तेवढे थोडेच! मोठ्या संकटातून तुम्ही वाचलात.”

व्हॉन डॅनिकन धावत गॅरेजमध्ये गेला. त्याने त्या स्फोटक विटा मोजल्या. पाच विटांचे सहा गठ्ठे. म्हणजे जास्तीतजास्त तीस किलो. “आम्ही संकटातून वाचलो म्हणजे? फिल, तुला काय म्हणायचंय? क्विताब कुठल्या कारस्थानात गुंतला होता, हे तुला ठाऊक आहे?”

“अरेच्चा... मला वाटलं की तुला...” संपर्क तुटत चालला होता. पालुंबोचा आवाज अस्पष्ट, तुटक झाला होता. “... हरामखोर, उलटच्या काळजाचा.”

“ऐकू येत नाही. तुला मी ऑफिसच्या नंबरवर फोन करू?”

“शक्य नाही. मी प्रवासात आहे.”

कदाचित बाहेर नीट ऐकू येईल म्हणून व्हॉन डॅनिकन गॅरेजमधून बाहेर आला आणि पावसात भिजत उभा राहिला. “आम्ही संकटातून वाचलो म्हणजे तुला नेमकं काय म्हणायचंय?”

“गॅसनने आम्हाला सांगितलं की तो चक्रम भडवा क्विताब स्वित्झर्लंडला जाऊन एक विमान उडवणार होता.”

३३

इस्त्रायलमधलं घड्याळ स्वित्झर्लंडपेक्षा तीन तासाने पुढे होते. तिथे पाऊस किंवा बर्फ पडत नव्हता. आकाशात सूर्य तळपत होता. वेळेअगोदरच आलेल्या उन्हाळ्याच्या तप्त लाटांमुळे, पूर्व भूमध्यसमुद्राचे किनारे तापून लाल झाले होते.

तेल अविव्हच्या उत्तरेला दहा मैलांवर असलेल्या हर्जलिया ह्या खडकाळ डोंगरभागात एक तातडीची बैठक बोलावण्यात आली होती. खास गुप्तहेर यंत्रणा संस्थेच्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर ती बैठक सुरू होती. मोस्साद या नावाने ती इमारत अधिक प्रसिद्ध होती. इस्त्रायल सरकारची ती परकीय गुप्तहेर संस्था होती. संस्थेच्या सर्व महत्त्वाच्या विभागांचे प्रमुख, बैठकीला उपस्थित होते. संचयित विभाग, जिथे गुप्तहेरांकडून मिळालेली माहिती गोळा केली जायची. राजकीय कृती व संपर्क विभाग, ज्यांचा संबंध आंतरराष्ट्रीय गुप्तहेर सेवेबरोबर असे, आणि प्रत्यक्ष कार्यकारी विभाग किंवा मेत्सादा, जिथे संभावित गुन्हेगार, अपहरण, घातपात अशा विघातक कृत्यांवर बारीक नजर ठेवली जात असे.

“चालूसमध्ये त्यांना ही सुविधा कधीपासून उपलब्ध झाली?” खोलीमध्ये येरझारा घालणाऱ्या एका गलेलठ्ठ माणसाने प्रश्न विचारला. “आजपर्यंत मला जे सांगितलं गेलं, त्याप्रमाणे त्यांची निर्मिती केंद्रं ही फक्त नातांझ आणि एस्फाहानमध्येच होती.” अर्ध्या बाह्यांचा शर्ट, डोक्यावरचे काळे पातळ केस, एकही सुरकुती नसलेला चेहरा आणि सरड्यासारखे टपोरे डोळे यावरून कुणाला तो चाळिशीचा वाटला असता तर कुणाला सत्तरीचा. पण त्याच्या करारी उग्र स्वभावाबद्दल मात्र कुणाचेच दुमत झाले नसते. त्याचे नाव होते झ्व्ही हिर्रस्च आणि गेली सात वर्षे तो मोस्सादचा प्रमुख होता.

“आम्हाला नकाशावर तर काहीच सापडलं नाही. उपग्रहाची एकही खूण नाही. काहीच नाही.” संचयित विभागाकडून उत्तर आले. “ते फारच हुशार निघाले. आपलं नवीन केंद्र साऱ्या जगापासून लपवण्यात ते यशस्वी ठरले.”

“लपवलं, यात तर काही शंकाच नाही.” झ्व्ही हिर्रस्च म्हणाला, “दोन वर्षांत जर त्यांनी शंभर किलोचा साठा केला असेल तर त्यासाठी लागणाऱ्या युरेनियमची किती सेंट्रीफ्यूजेस प्रेरके त्यांच्याकडे असू शकतील?”

“इतकी छोटी कालमर्यादा लक्षात घेता, निदान पन्नास हजार तरी असावीत.”

“आणि त्यासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीची निर्मिती करण्यासाठी किती कंपन्या काम करत असतील?”

“शंभरच्या आसपास.” संचयित विभागप्रमुख म्हणाला. “निर्यातीवर बंधनंही आहेत व नियंत्रणही.”

“ते मला ठाऊक आहे.” हिर्रस्च कोरड्या स्वरात म्हणाला.

“याचा अर्थ स्पष्ट आहे की त्यांनी ते तंत्रज्ञान वेगळ्याच कुठल्यातरी मार्गाने मिळवलेलं आहे.” मेत्सादा प्रमुख म्हणाला. तो काळा आणि कृश होता. त्याचे बोलणे इतके मृदू होते की वाटावे, आयुष्यात त्याने कधी माशीवर देखील हात उगारला नसेल. “बहुतेक दुहेरी उपयोगाच्या उत्पादक मालाचा उपयोग केला असावा.”

“सरळ हिब्रू भाषेत बोल.”

“अशा प्रकारचा माल, जो एकाच वेळेस नागरिक सुविधांसाठी वापरता येतो आणि लष्करी उद्योगासाठीही. ह्या ठिकाणी इंधनाची क्षमता विकसित करणाऱ्या साधनांचा उपयोग केला गेला. जलद वेगाने फिरणारी केंद्रोत्सारी पिंपे, जी दुग्धालयासाठीही उपयोगी ठरतात व तशीच ती युरेनियम हेक्झाफ्लुराईड वायु बनवण्यासाठीही उपयोगी असतात. उष्णता निवारक यंत्रे ही पोलाद कारखान्यांसाठी लागतात व त्यांच्या साहाय्याने रिअॅक्टर्सही योग्य तापमानात ठेवले जाऊ शकतात. अशा मालांसाठी निर्यात परवान्यांची किंवा अंतिम-ग्राहक प्रमाणपत्राची आवश्यकता नसते.”

“ठीक आहे. म्हणजे आता त्यांनी पुरेसा साठा तयार करून ठेवलाय. आपल्यावर ते कधीही हल्ला करू शकतात. होय ना?” हिर्रस्चने विचारलं.

“साठ दिवसांपूर्वी त्यांनी शहाब-४ ह्या दूर पल्ल्याची क्षमता असलेल्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.” संचयित विभागप्रमुख म्हणाला.

“ते क्षेपणास्त्र किती वेळात आपल्यावर येऊन धडकू शकतं?”

“जास्तीतजास्त एक तासात.”

“आपण ते खाली पाडू शकतो?” हिर्रस्चने विचारलं.

“तसं पाहिलं तर आपण आईच्या कुशीत असलेल्या बालकाइतके सुरक्षित आहोत.”

इस्त्राईल हे नेहमीच दुपदरी हवाई संरक्षक संरचनेवर अवलंबून राहिला होता. त्यांचे अॅरो-२ हे क्षेपणास्त्र जमिनीवरून उडून हवेत असलेले शत्रूचे क्षेपणास्त्र नष्ट करत असे व दुसरी म्हणजे राष्ट्राभिमानी क्षेपणास्त्र यंत्रणा. पण दोन्हीही सदोष होत्या. शत्रूचे क्षेपणास्त्र शंभर किलोमीटर्सच्या परिसरात पोहोचेपर्यंत ते उडवता येत नसे– म्हणजे तोपर्यंत प्रतिस्पर्धी क्षेपणास्त्र अगदी धडकण्याच्याच बेतात आलेले असते आणि देशातील या दोनही क्षेपणास्त्रांचा अजूनपर्यंत युद्धात कधीही वापर केला गेलेला नव्हता.

“त्यांच्याकडे रडारच्या साहाय्याने वापरली जाणारी क्षेपणास्त्रे आहेत? आणि युद्धनौकेवरची क्षेपणास्त्रे?”

“अशा अफवा आहेत. पण अखेर त्या अफवाच ठराव्यात.”

“अशी आपण आशा करू या.” हिर्रस्च म्हणाला. “शहाबची अचूकता किती आहे?”

राजकीय कृती व संपर्कविभागप्रमुख बोलू लागला. “शहाबची अचूकता, हा जर्मन, फ्रान्स व अमेरिका ह्या राष्ट्रांसाठी काळजीचा विषय ठरू शकेल. आपल्यासाठी तो मुद्दा गैरलागू आहे. पन्नास मैलावरील ‘लक्षय’ भेदायची क्षमता असलेलं क्षेपणास्त्र जर ते विकसित करू शकले तर मात्र तो प्राणघातक वार ठरू शकेल. पण जर ते आपल्या डोळ्यादेखत पन्नास हजार सेंट्रीफ्यूजेसची तस्करी करू शकत असतील व कुणालाही पत्ता लागू न देता उच्च युरेनियम क्षमतेची केंद्रे उभारू शकत असतील, तर त्यांनी अत्यंत महाघातकी क्षेपणास्त्र निर्मिती करण्यात निश्चितपणे प्रगती केलेली असणार

असं मी ठामपणे म्हणू शकतो.”

“तर मग,” हिर्रस्च आपला तळहात खाजवत म्हणाला. “आता आपण हात वर करून शरणागती पत्करायची? आपल्या इराणी मित्रांची हीच इच्छा आहे का? त्यांनी आपली रॉकेट्स उडवत आमची शहरं उद्ध्वस्त करावीत आणि आम्ही मात्र हाताची घडी घालून उभं राहावं?”

इस्त्राईल संरक्षणदलाचा तो भूतपूर्व मेजर जनरल होता. इस्त्राईलच्या भूमीवर जर आण्विक क्षेपणास्त्रांचा हल्ला झाला तर त्याचे किती भयानक परिणाम होतील, हे तो जाणून होता. इस्त्राईल हा देश तीनशे मैल लांब व दीडशे मैल रुंद पसरलेला होता. पण नव्वद टक्के लोकवस्ती ही फक्त जेरुसलेम व तेल अविव्ह या दोनच शहरांत एकवटलेली होती. यापैकी एका शहरावर जरी आण्विक हल्ला झाला तरी मोठ्या प्रमाणावर जीवितहानी तर होणारच होती. पण देशाच्या नकाशावरील औद्योगिक क्षेत्र नाहीसे होणार होते. किरणोत्सर्गी संहारानंतर पुढची कित्येक वर्षे इस्त्रायलच्या भूमीवर लोकवस्ती उभी राहू शकणार नव्हती. साध्या शब्दात सांगायचे तर देशवासीयांवर परागंदा होण्याखेरीज पर्याय उरणार नव्हता. त्यांच्या नशिबी पुन्हा एकवार सक्तीची हद्दपारी लिहिली जाणार होती. इतिहासाची पुनरावृत्ती होणार होती.

सर्व विभागप्रमुख मूग गिळून गप्प बसले होते.

“एका तासाने माझी पंतप्रधानांबरोबर भेट ठरलेली आहे.” हिर्रस्चचा आवाज आता तापू लागला होता. “अजूनपर्यंत त्यांनी आपल्याला आपले इंद्रिय हातात पकडून गपचूप उभे केलेले नाही, एवढीतरी खात्री मला पंतप्रधानांना द्यावीच लागेल. पंतप्रधानांना फक्त एकाच प्रश्नात रस आहे. ते आपल्यावर हल्ला करण्याच्या तयारीत आहेत की नाहीत?”

संचयित विभागप्रमुख ओठाचा चंबू करून बोलू लागला. “कुराणात सांगितल्या गेलेल्या विश्वाच्या अंतिम पर्वावर, इराणच्या अध्यक्षाची ठाम श्रद्धा आहे. प्रेषित महम्मदाच्या खऱ्या वारसशिष्याने, म्हणजेच बाराव्या इमाम असलेल्या मेहदीने या भूतलावर लवकरात लवकर अवतार घ्यावा यासाठी तो व्यक्तिशः प्रयत्नशील आहे. कुराणात असं लिहिलेलं आहे की, तो अवतार घेण्याआधी सत् आणि असत् ह्या दोन विरुद्ध प्रवृत्तींमध्ये टोकाचा संघर्ष होणार असून, सर्व जगाला घनघोर युद्धाला, राजकीय उलथापालथींना व भयानक रक्तपाताला सामोरं जावं लागणार आहे. त्यानंतर अखिल जगतावर मेहदी शांतता प्रस्थापित करून अनेक वर्षं सुखाने राज्य करणार आहे. अर्थात, त्यापूर्वी त्याला इस्त्रायलचा निःपात करावा लागेल.”

“वा! छान!” हिर्रस्च म्हणाला. “ह्यापुढे तुझ्याकडून कुठल्याही चांगल्या बातमीची अपेक्षा न ठेवण्याची मी दक्षता घेईन.”

“मला अजून काही सांगायचंय. सत्तेची सर्व केंद्रं आपल्या ताब्यात ठेवायची, अध्यक्षाची मोहीम कमालीची यशस्वी ठरतेय. शैक्षणिक, वैद्यकीय आणि राजनैतिक क्षेत्रातील अनेक प्रस्थापित नेत्यांना, त्याने पदच्युत करून त्याजागी आपल्यामागे शेपटासारख्या फिरणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. सर्वांत कहर म्हणजे देशाच्या सर्वोच्च धार्मिक नेत्यासाठी आपल्याच एका विश्वासू माणसाची वर्णी लावलीय. हीच गोष्ट जर सहा महिन्यांपूर्वी घडती तर अनेक धार्मिक पुढाऱ्यांनी

अध्यक्षाच्या महत्त्वाकांक्षेला लगाम घातला असता. पण आता ते शक्य नाही. ह्या नवीन माणसाला, अयातोल्ली रझदीला सत्पात्र म्हणून घोषित करण्यात आलं आहे. तो म्हणे प्रेषित महम्मदाबरोबर सतत संपर्कात असतो. तुम्ही त्याच्याकडून तर्कशुद्ध विचारांची अपेक्षा ठेवू शकत नाही."

"तो कोणत्याही क्षणी चाप ओढेल की काय हा जर तुला प्रश्न पडलेला असेल," मेत्सादा प्रमुख म्हणाला. "तर त्याचं उत्तर आपल्याला आधीच मिळालंय."

संचयित विभागप्रमुखाने मान डोलावली. "इराणला पुन्हा महम्मदकालीन युगात नेण्याचा अध्यक्षाने चंग बांधलाय. प्रेषित महम्मद आपल्याशी प्रत्यक्ष बोललाय व येत्या दोन वर्षांत आपण पृथ्वीतलावर पुन्हा येणार आहोत याची ग्वाही त्याने आपल्याला दिली आहे असं अध्यक्षाने अनेकदा जाहीर व्याख्यानात सांगूनही टाकलंय. त्याच्या एका हातात कुराण व दुसऱ्या हातात पिस्तूल आहे."

"तो आपल्या योजना फार काळ गुप्त ठेवू शकणार नाही." मेत्सादा प्रमुखाच्या आवाजाला आता चांगलीच धार चढली होती. "जेव्हा भांडं फुटेल, तेव्हा आपलेही हात सरसावतील हे तो पुरेपूर जाणून आहे."

"अर्थात, जर त्यानेच आधी सुरुवात केली नाही, तर." हिर्रस्च खुर्चीत बसत काहीशी उपहासाने म्हणाला, "तसं घडलं तर मार्च, १९३६ ची ती पुनरावृत्तीच असेल."

"म्हणजे?"

"पहिलं महायुद्ध संपल्यावर हिटलरने आपल्या सैनिकांना, फ्रान्सजवळील प्रदेशावर पुन्हा ताबा मिळवण्यासाठी, ऱ्हाईनलँडमध्ये घुसण्याचा आदेश दिला होता. त्या सैनिकांना पुरेसं प्रशिक्षण मिळालेलं नव्हतं आणि त्यांच्यापाशी अपुरा शस्त्रपुरवठा होता. काहींपाशी तर रायफलमध्ये घालण्यासाठी गोळ्याही नव्हत्या. कमांडरच्या खिशात हुकूम लिहून ठेवलेल्या दोन चिठ्ठ्या होत्या. फ्रेंच सैनिकांनी जर हल्ला केला तर त्यातली एक चिठ्ठी त्याने उघडायची व जर त्यांनी हल्ला केला नाही तर दुसरी उघडायची."

"फ्रेंच लोकांनी त्या सैनिकांना कोणताही विरोध न करता आपल्या प्रदेशात घुसू दिलं. इतकंच नाही तर ते जणू आपले पालनकर्तेच आहेत अशा तऱ्हेने ते त्यांच्याशी वागू दिले. कमांडरने दुसरी चिठ्ठी उघडली. प्रदेश ताब्यात घ्या व सर्व नागरिकांच्या हातात जर्मन झेंडे द्या अशी त्यात आज्ञा होती. तोच ऐतिहासिक क्षण ठरला. तोपर्यंत हिटलरचं जहाज हे वादळीवाऱ्यात हेलकावत होतं. ज्या क्षणी त्याने ऱ्हार्डनलँडवर ताबा मिळवला, त्या क्षणी त्याला आत्मविश्वास गवसला आणि सर्व जगात त्याचा दरारा पसरला."

"एक मिनिट झ्वी." संचयित विभागप्रमुखाने त्याला छेडले. "मग त्या दुसऱ्या चिठ्ठीत काय लिहिलेले होते?"

"दुसऱ्या चिठ्ठीत?" झ्वी हिर्रस्च उद्विग्नपणे हसला. "जर हल्ला झालाच तर सर्व सैनिकांसकट तात्काळ माघार घेण्यास कमांडरला सांगितलेलं होतं. संघर्षाची छोटीशी ठिणगी पेटलेली दिसली तर ताबडतोब पोबारा करायचा. अन्यथा देशाला फार मोठ्या नामुश्कीला सामोरं जायची पाळी आली असती. सरकार कोसळलं असतं. एका फटक्यात हिटलरला सिंहासन सोडावं लागलं असतं."

"तुझं म्हणणं आहे की आपण त्यांचा प्रतिकार करायचा?"

हिर्रस्च वळला आणि खिडकीबाहेर पाहू लागला. “मला वाटत नाही की ह्या खेपेस आपल्याला ते इतकं सोपं जाईल.”

३३

जोनाथन आपले गुडघे छातीला टेकवून, भिंतीला टेकून बसला होता. खोलीच्या एका कोपऱ्यात ताज्या फुलांचा गुच्छ ठेवलेला होता. त्याच्या वर एक लोखंडी क्रूस लटकत होता. त्या डोंगराळ भागात गुहेच्या आकारासारखे दिसणारे ते विश्रामगृह, स्विस अल्पाईन क्लबने उभारले होते. खोलीच्या भिंती व खोलीची फरशी, दगड व वाळूनी सुशोभित केली होती. तो जिथे बसला होता तिथून सर्व रस्त्यांवर लक्ष ठेवता येत होते. पूर्वेकडून येणारा रस्ता डोंगराच्या कडेवरून किनारपट्टीकडे जात होता. दुसरा, एका तळ्यावरून वर आला होता आणि वेडीवाकडी नागमोडी वळणे घेत घेत पुढे सरकला होता. तिसरा रस्ता पश्चिमेकडून निघून टेकडीपलीकडे निमुळत्या उतारावरून खाली घसरला होता. पाऊस मुसळधार पडत होता. पावसाच्या चाबकाऱ्यामुळे अर्धवर्तुळाकृती नयनरम्य लॅगो मॅगिओरे क्षितिजामध्ये बुडून गेले होते.

सीमॉन त्या दगडी फरशीवर पाठ टेकून झोपली होती. तिचे कपडे चिंब भिजले होते व ती अजूनही धापा टाकत होती. “तुला कुणी दिसतंय?” तिला धड बोलताही येत नव्हते. “कुणीतरी अजून आपला पाठलाग तर करत नसेल ना?”

“नाही.” जोनाथन म्हणाला. “मला कुणीही दिसत नाही.”

“नक्की?”

“हो.”

“देवच आपला पाठीराखा.” ती कण्हत उठून बसली. “हे म्हणजे सहन करण्यापलीकडचं झालं.” तिने गुडघ्यात मान खुपसली. “आयुष्यात मी इतकी कधीच घाबरले नव्हते. तो... तो माणूस... तो ब्लिट्झ... अशी जिव्हारी गोळी लागून ठार झालेला माणूस मी कधीच पाहिला नव्हता. काय करणार आहोत रे आता आपण?”

“मलाही नक्की ठाऊक नाही.”

सीमॉनने झटकन मान वर उचलली. अचानक तिला काहीतरी सुचले होते. “आपण आता काय करायचं, हे मी तुला सांगते,” ती म्हणाली. “आपण डोंगर उतरून पलीकडे जायचं. तिथून बस पकडून ल्युगानोला जायचं. मग आपण तुझ्यासाठी नवे कपडे खरेदी करायचे. एखादा छानसा सूट. तू पक्का व्यापारी माणूस वाटायला हवास. नंतर आपण तुझे केस कापू व त्यांना कलप लावू. मग तू आगगाडीने मिलानला जायचं. ठरलं तर मग, अगदी असंच करायचं.”

“त्यासाठी मला आधी एक पासपोर्ट लागेल.” जोनाथन म्हणाला. “आतमध्ये माझं नाव आणि पत्ता नसलेला.”

सीमॉनने आपली आधीची कल्पना रद्द करून टाकली. “ठीक आहे. आगगाडी नको. आपण काही वेळ थांबू आणि परत जाऊन गाडी घेऊन येऊ. आपण सीमेलगतच्या

भागातून प्रवास करू. ते आता प्रत्येकाला अडवत असणार. पण मर्सिडिजमध्ये बसलेल्या एका बँक अधिकाऱ्याला अडवण्याची ते हिंमत करू शकणार नाहीत. मी तुझ्यासोबत येते."

ती बोलत असताना, जोनाथनने तिच्याकडे निरखून पाहिले. आपला चेहराही हिच्यासारखाच भीतिदायक दिसत असला तर आपले भवितव्य कठीण आहे.

"आणि मग, त्यानंतर काय?" तो म्हणाला, "कायम पळतच राहायचं?" तो उभा राहिला आणि डोंगरावरून ब्लिट्झच्या बंगल्याच्या दिशेने बोट दाखवत म्हणाला, "जरा तिकडे बघ. मी स्टेशनवर केलेला पराक्रम एव्हाना पोलिसांच्या लक्षात आलेला असणार. ब्लिट्झच्या ऑफिसात तर माझ्या हाताचे भरपूर ठसे सापडलेले असतील. मी खुनी आहे. सीमॉन, मीच ब्लिट्झच्या डोक्यात गोळी घातलीय, अशी आता त्यांची खात्री पटलेली असणार. मी आता स्वत:ला निर्दोष शाबित करू शकणार नाही.

"म्हणून तर तुला हा देश सोडून जाण्याची गरज आहे."

"पण त्यामुळे प्रश्न सुटणार नाही."

"निदान तू जिवंत तरी राहशील. सुरक्षित राहशील."

"किती काळ? मी देशाची सीमा ओलांडली म्हणून काही ते माझा शोध घेण्याचं थांबवणार नाही. युरोपमधल्या प्रत्येक देशात ते माझा फोटो पाठवतील."

त्याचा मूळ स्वभाव पळपुटा नव्हता. त्याने आपली अनेक वर्षे, प्रतिकूल हवामानात देखील दुर्गम डोंगर सर करण्यात घालवली होती. जर आपण परतीचा दोर कापून टाकला तर कुठलीही अशक्य गोष्ट आपण साध्य करू शकतो या मताशी तो आला होता. त्यासाठी फार मोठ्या विद्वत्तेची गरज नसते. 'सतत पुढे वाटचाल करत राहायचं बस्स.'

ज्यावेळी तो एक बेफिकीर तरुण होता व जेव्हा त्याच्यात थोडा फाजील आत्मविश्वास होता, तेव्हा त्याच्यामध्ये नियम झुगारण्याची बंडखोरी होती. केवळ त्याच्यामध्ये असलेल्या जिद्द व चिकाटीमुळे तो सात वर्षांत कॉलेज आणि वैद्यकीय शिक्षण संपवून डॉक्टरी क्षेत्रात स्थिरावला होता. त्याचे सर्व सहकारी मित्र मात्र एका मागोमाग गळत गेले होते.

"ते चक्क खाली कोसळून, ढुंगणाला पाय लावत पळून जायचे." जॅक डॅनियलचे एक-दोन पेग मारल्यावर एम्मा म्हणत असे. "बुझदिल अवलाद साली. सशाचं काळीज आणि सिंहाचा आव."

एम्माचा आवाज त्याला स्पष्टपणे ऐकू आला होता. जणू काही ती त्याच्या शेजारीच बसली होती. अचानक त्याच्या डोळ्यात अंगार उसळला. त्याला तिचा हात गच्च पकडायचा होता. तिच्यासारखी ताकद आपल्यापाशी असावी असे त्याला तीव्रपणे वाटले.

सीमॉनने मान तिरकी करत जोनाथनकडे पाहिले. "तुझं काय चाललंय?" तिने विचारले.

"काय चाललंय, म्हणजे?"

"आपली एम्मा नक्की कुठल्या जाळ्यात फसली होती?"

"मला ठाऊक नाही."

“तिने कधीच तुला सांगितलं नाही? पण इतकी महत्त्वाची गोष्ट, तिने तुझ्यापासून लपवून तरी कशी ठेवली? तुला नक्कीच काहीतरी कल्पना असणार. म्हणून तर तू असा शोध घेत चाललायस... का तिचं भूत तू मानगुटीवर घेऊन फिरतोयस? जोनाथन, मला खरं खरं काय ते सांग. तू पण तिची साथ करत होतास? दोघं मिळून? अनेक जोडपी अशा प्रकारच्या कामात गुंतलेली असतात असं मी ऐकलंय.”

“अशा प्रकारच्या, म्हणजे?”

“त्याला काय नाव द्यायचं हे मला कळत नाहीये. हेरगिरी म्हणू या आपण. बनावट वाहन परवाना. बॅगांच्या पाठी लागलेली माणसं. हे एवढे पैसे एक लाख फ्रँक्स. ब्लिट्झला ज्याने मारलं, तो काही भुरटा चोर नसणार. हो ना?”

“नाही.” तो म्हणाला, “नक्कीच नसणार.”

त्याच्या उत्तराने तिच्या मनातली भीती जणू खरीच ठरली. तिने केलेल्या भरमसाट आरोपांमुळे तिचेच खांदे जड झाले होते.

जोनाथन पुढे सरकला व तिच्या शेजारी आला. “एम्मा कशामध्ये गुंतली होती, हे मला माहीत नाही.” तो म्हणाला, “मला आधीच कळायला हवं होतं असं मात्र फार फार वाटतं.”

सिमॉन बराच वेळ त्याच्याकडे एकटक पाहत राहिली. “तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवणं अतिशय कठीण आहे.”

जोनाथनने नजर वळवली. तो अस्वस्थपणे स्वत:च्या चेहऱ्यावरून हात फिरवू लागला. पुढचे पाऊल कोणते उचलायचे हे त्याला कळत नव्हते. “तर मग,” तो अखेर म्हणाला, “तू काय करायचं ठरवलंयस?”

“ते मी तुला सांगितलं. आपण काय वाट्टेल ते करून ल्युगानोला पोहोचायचं आणि तुझ्यासाठी नवीन कपडे विकत घ्यायचे. नंतर आपण तुझा चेहरामोहराच साफ बदलून टाकायचा, आणि मग आपण–”

“सीमॉन, बस्स झालं. तू ह्यापुढे माझ्याबरोबर राहू शकत नाहीस. आता सगळी परिस्थिती आटोक्याबाहेर गेलीय.”

“मी जावं असं तुला वाटतंय?

“डोंगर उतरून पायथ्याशी पोहोचलो की, आपण विभक्त व्हायचं. तू डॅव्होसला जाऊन पॉलला भेटायचंस आणि जे काय घडलं ते कायमचं विसरून जायचं.”

“आणि तू?”

जोनाथनने निर्णय घेतला होता. “ती नेमकी कशामध्ये गुंतली होती, याचा मी शोध घेणार आहे.”

“का? त्यातून तुझा काय फायदा होणार आहे? तू स्वत:कडे लक्ष द्यायला हवंस.”

“ते मी देतोच आहे. तुझ्या लक्षात येत नाहीये का?”

सीमॉनने मान डोलावली व पर्समधून सिगारेट काढली. सिगारेट पेटवून धुराचा एक मोठा ढग हवेत सोडला. आपले हात आता थरथरत नाहीत हे तिच्या लक्षात आले.

“निदान तुझ्यासाठी कपडे विकत घ्यायला तरी मला सोबत राहूदेत.” ती म्हणाली. “मी जाण्यापूर्वी...”

जोनाथनने तिच्या गळ्यात हात टाकले व तिला जवळ घेतले. “तेवढं तू नक्कीच करू शकतेस. बरं, आता ब्लिट्झच्या ऑफिसातून जो कागद आणलेत, त्यातून काय निष्पन्न होतंय का ते बघू या.”

त्याने ब्लिट्झची ब्रीफकेस उघडली व त्यातले कागद बाहेर काढून चाळायला सुरुवात केली. बहुतेक सर्व कागद म्हणजे बिले किंवा घरगुती कामाच्या संदर्भातले होते. त्याने ते सीमॉनकडे दिले. सीमॉनने त्याच्यावर एक नजर टाकली आणि पुन्हा ब्रीफकेसमध्ये ठेवून दिले. ब्लिट्झ कोण होता किंवा काय काम करत होता हे काही त्यांना त्यावरून समजले नाही.

एका चोरकप्प्यात त्याला तळहाताच्या आकाराचा एक PDA सापडला. फोन, वर्ड प्रोसेसर आणि वेब ब्राऊझर या तीनही गोष्टी त्यात एकत्र होत्या. त्याने बटण दाबले आणि त्यातल्या फोनमधून आवाज येऊ लागला. वरच्या उजव्या कोपऱ्यात एक चांदणीसारखे चिन्ह उमटले. त्याने ते चांदणीचिन्ह दाबले. त्याला पासवर्ड विचारला गेला. त्याने १-१-१-१ व नंतर ७-७-७-७ असे आकडे दाबून पाहिले. पण प्रवेश नाकारला गेला. तो अस्वस्थ होऊ लागला.

“ते काय आहे?” त्याच्याजवळ सरकत सीमॉनने विचारले.

“ब्लिट्झचा PDA .पण पासवर्डशिवाय मला काहीच करता येत नाही. ई-मेल नाही. शब्द नाहीत, माहिती नाही. तू कुठला पासवर्ड वापरतेस?”

“प्रत्येक गोष्टीसाठी निरनिराळा. आधी मी आईच्या वाढदिवसाची तारीख वापरायचे. मग माझ्या घराजवळच्या रस्त्याचा नंबर. अलीकडे मात्र मी १-२-३-४ ह्या आकड्यांवरच स्थिरावलेय. लक्षात ठेवायला सोपं जातं.”

आणि जोनाथन काय करत असे? त्याच्यापाशी फक्त एकच पासवर्ड होता. एम्माची जन्मतारीख ११-१२-७७.

अचानक त्याला एम्माच्या बॅगेतल्या त्या ब्रेसलेटमधल्या फ्लॅश-ड्राइव्हची आठवण झाली. त्याने हातातले ब्रेसलेट काढून त्यातला तो ड्राइव्ह ब्लिट्झच्या PDA ला जोडला. ‘थॉर’ असा शब्द उमटला. त्याने त्या शब्दावर दोनदा क्लिक् केले. पुन्हा त्याला पासवर्ड विचारण्यात आला. ‘कठीण आहे.’

“हा तुझा आहे?” त्या पेन ड्राइव्हला हात लावत सीमॉनने विचारले.

“एम्माचा. मी हॉटेलात परत गेलो होतो तेव्हा तिच्या बॅगेत मला सापडला पण त्यालाही एक पासवर्ड हवाय.” त्याने आधी एम्माची व मग स्वत:च्या वाढदिवसाची तारीख वापरून पाहिली. नंतर अलीकडचा एटीम पिननंबर व अखेर लग्नाची तारीख. सर्व प्रयत्न फुकट गेले.

त्याने पुन्हा कागद चाळले आणि इव्हा क्रुगरला लिहिलेले पत्र त्याच्या हातात आले. झिअॅग या कंपनीच्या लेटरहेडवर ‘थॉर’ प्रकल्पासंबंधी लिहिलेले ते पत्र होते. “मी आता त्यांनाच फोन करून विचारतो.”

“कुणाला?”

“झिअॅगला किंवा ब्लिट्झ ज्या कुठल्या कंपनीसाठी काम करत होता, त्यांना.”

सीमॉनने त्याच्या हातातला PDA काढून घ्यायचा अर्धवट प्रयत्न केला. “नाही जोनाथन. नको, तू आणखीनच गोत्यात येशील.”

“आता आणखी काय गोत्यात येणार?” जोनाथन उभा राहिला आणि गुहेच्या दुसऱ्या टोकाला गेला.

त्याने फोन सुरू केला. डायल टोन ऐकू आला. नशीब, फोन तरी पासवर्डशिवाय सुरू झाला. पत्रावरचा फोन नंबर त्याने टाईप केला. पलीकडच्या फोनची बेल दोन वेळा वाजली आणि फोन उचलला गेला. “गुड आफ्टरनून, झूग इंडस्ट्रीवर्क. आपल्याला कोण हवंय?”

एका प्रशिक्षित तरुणीचा आवाज होता.

“इव्हा क्रुगर प्लीज.”

“कोणाचा फोन आहे असं सांगू?”

जोनाथन गप्प राहिला. अशा प्रश्नाची त्याने अपेक्षा केलेली नव्हती, कारण अशा नावाची कंपनी असू शकेल ह्याचीच त्याला मुळात खात्री नव्हती. “तिचा मित्र.” क्षणभराने तो म्हणाला.

“तुमचं नाव काय सर?”

“श्मिड.” जोनाथनने सांगितले. स्मिथ आडनावाच्या ते जवळपास जातेय, असा त्याने विचार केला.

“एक मिनिट. फोन दुसरीकडे जोडला गेला असावा. पण त्यामागोमाग एक ध्वनिमुद्रित संदेश त्याने ऐकला. “मी इव्हा क्रुगर. आत्ता मी इथे नाही. जर तुम्ही तुमचं नाव व फोन नंबर सांगितलात तर मी तुम्हाला नक्कीच नंतर फोन करेन. आणखी काही मदत हवी असल्यास स्टार की दाबा आणि माझी सहाय्यक, बार्बारा हग हिच्याशी संपर्क साधा.”

स्विस जर्मन भाषेत उत्तर मिळाले होते व त्यातला बर्नीज लहेजाही ओळखता येत होता. इव्हा क्रुगर ही स्विस नागरिक असणार यात काहीच शंका नव्हती. अडचण इतकीच होती की तो प्रत्यक्ष एम्माचाच आवाज होता. ‘ग्रुएझी’ हा शब्द म्हणताना ती अडखळायची आणि ‘च्यूचिकाएत्स्ली’ हा शब्द तर तिला उच्चारताच येत नसे. अगदी शाळकरी फ्रेंच भाषा सोडली तर इतर भाषांच्या बाबतीत आपण निर्बुद्ध आहोत असे ती स्वत:च जाहीर करत असे. तिचे फक्त तिच्या राणीच्या भाषेवर, इंग्लिशवर अतोनात प्रेम होते.

जोनाथनने स्टार की दाबली. त्याला बार्बारा हगशी बोलायचे होते. इव्हा क्रुगर हे तिचे खरे नाव होते का, हे त्याला विचारायचे होते. का खोटच्या रंगवलेल्या भुवयांसाठी आणि चकमकत्या चड्डीसाठी आणि नोटांनी भरलेल्या बॅगांच्या मोहापायी तिने ते नाव धारण केले होते?

पण एका सेकंदानंतर बार्बारा हगचासुद्धा ध्वनिमुद्रित संदेश त्याच्या कानी पडला आणि त्याने फोन ठेवून दिला.

त्याने लगेचच तो नंबर पुन्हा फिरवला. जेव्हा ऑपरेटरने त्याला नाव विचारले, तेव्हा पुन्हा त्याने ‘श्मिड’ हेच नाव सांगितले. आता त्यालाही टोपणनाव मिळाले होते.

“मला मिसेस क्रुगरच्या बॉसबरोबर बोलायचंय.” लग्नाच्या अंगठीवर कोरलेली तारीख त्याला आठवली. “अतिशय तातडीचं व महत्त्वाचं काम आहे.”

“मला वाटतं तो ह्या क्षणी फार कामात आहे.”

“अर्थात, तो असणारच.”

“आपल्याला काय म्हणायचंय सर?”

जोनाथनला मिळालेल्या पाकिटातला तो एम्मा व हॉफमन नावाच्या माणसाचा एकत्र काढलेला फोटो त्याला आठवला. “मला मिस्टर हॉफमनशी बोलायचंय.”

“एकच मिनिट, प्लीज.”

एक पुरुषी आवाज आला. “मिस्टर श्मिड? मी हॅन्नेस हॉफमन बोलतोय. मिसेस क्रुगर सध्या परदेशात आहे. तू तिला काय सांगणार होतास?”

“थॉरबद्दल.”

शांतता पसरली. हॉफमनला आणखी बोलतं करणारा पासवर्ड आता जोनाथनपाशी नव्हता. मग अचानक पलीकडून आवाज आला. “बरं, थॉरबद्दल काय सांगायचंय?”

“माझ्यामते, तुमच्या कंपनीत उद्भवलेली समस्या ताबडतोब मिटवायला हवीय.”

“हे बघ मिस्टर श्मिड, आम्ही अनोळखी माणसांबरोबर धंद्याच्या गोष्टी बोलत नाही.”

“मी अनोळखी माणूस नाही. मी तुम्हाला सांगितलं ना, की मी इव्हाचा मित्र आहे. मला एवढंच सांगायचं होतं की, तुम्ही यापुढे गॉटफ्रिड ब्लिट्झवर अवलंबून राहू नका.”

जोनाथन क्षणभर थांबला. आम्ही अनोळखी माणसांशी धंद्यासंबंधी बोलत नाही हे वाक्य पुन्हा ऐकायला मिळेल अशी त्याची अपेक्षा होती, पण पलीकडे शांतता होती. “तू त्याला ओळखतोस. हे मला ठाऊक आहे. तू त्याला पत्रंही पाठवलं होतंस.”

“हो.” उत्तर किंचित अडखळत आलं. “मिस्टर ब्लिट्झबद्दल काय सांगायचंय?”

“तो मेलाय.”

“तू काय बोलतोयस?”

“आज सकाळीच त्यांनी त्याला संपवला. घरात घुसून त्यांनी त्याच्या डोक्यात गोळी मारली.”

“तू कोण आहेस?” हॉफमनने विचारलं.

“मी तुला आधीच सांगितलंय, माझं नाव श्मिड.”

“ब्लिट्झबद्दल तुला कसं कळलं?”

“मी तिथे होतो. मी त्याला पाहिलं.”

“शक्य नाही.” हॉफला ती बातमी खरी वाटत नव्हती. फोनवरचा माणूस आपली क्रूर थट्टा करतोय असे त्याला वाटत असावे.

“माझ्यावर जर विश्वास नसेल तर कुणाला तरी त्याच्या घरी पाठव आणि खात्री करून घे. पोलिसांनी त्याच्या बंगल्याला गराडा घातलाय. हवं तर तूच त्याला फोन कर म्हणजे तुला समजेल.”

“करतो. लगेच करतो. आता मला सांग की तू नक्की कोण आहेस?”

“माझा फोन नंबर तपास.”

क्षणभर विराम. पाठोपाठ दीर्घ श्वास घेतल्याचा आवाज. “कोण आहेस तू? तू ब्लिट्झला काय केलंस?”

जोनाथनने फोन बंद केला. यापुढे प्रश्न विचारायचा हक्क फक्त त्याला एकट्यालाच असणार होता.

३४

रोबोटिका एजी कंपनीचा सरव्यवस्थापक, डच नागरिक, अनोळखी देशाला प्रक्षेभक कृत्यांसाठी मदत करणारा एक संशयित गुप्तहेर आणि एका व्यावसायिक गुन्हेगाराकडून हत्या करण्यात आलेल्या थिओडॉर ए. लॅमर्सचा मृतदेह मनुष्यवधासंबंधी केलेल्या कायद्यानुसार, विद्यापीठ हॉस्पिटलच्या शवागारात पाठवण्यात आला. तिथे त्याचे संपूर्ण शवविच्छेदन करण्यात आले. झुरिच कँटॉनचा मुख्य वैद्यकीय अधिकारी, डॉ. एर्विन ऱ्होड याने ती जबाबदारी पार पाडली.

डॉक्टर ऱ्होड साठ वर्षांचा होता. उंचीला बुटका, निळे पाणीदार डोळे व करड्या रंगाचे केस. आज त्याला काही मृत्यूचे कारण शोधायचे नव्हते. त्याने आपले लक्ष लॅमर्सच्या कपाळावरील व छातीवरील जखमांकडे केंद्रित केले. कपाळावरच्या गोळीने जर आपले काम केलेले नसेल तर ती कामगिरी छातीत घुसलेल्या गोळीने नक्कीच बजावलेली होती. छातीला भोक पडलेले होते.

केवळ झुरिचमध्येच नव्हे, तर एकूण स्वित्झर्लंडमध्येच खुनाच्या घटना अगदी क्वचितच घडत असत. गेल्या वर्षभरात मनुष्यवधाच्या सदुसष्ट घटना नोंदल्या गेल्या होत्या. त्यामानाने अमेरिकेतल्या एकट्या सेंट डिएगोमध्ये त्याहून जास्त खून पडले होते. आणि स्वित्झर्लंडची लोकसंख्या ही सेंट डिएगोच्या सातपट होती म्हणजे सुमारे सात दशलक्ष. त्या सदुसष्ट खुनांपैकी वीस खून हे संघटित टोळ्यांकडून केले गेले होते व ज्यांचे खून झाले होते, तेही गुन्हेगारच होते. पण डॉक्टर ऱ्होडने गेल्या कित्येक वर्षांत इतके निर्घृण कृत्य पाहिलेले नव्हते.

स्कालपेलने त्याने कपाळाच्या वरच्या भागाचा आडवा छेद घेत, डोक्याचा पूर्ण परीघ कापून काढला. मग त्याने विद्युतचलित करवतीने कवटीचा वरचा भागही कापला. फारच किचकट काम होते. घुसलेल्या गोळ्यांनी मेंदूचा जवळपास भुगा करून टाकला होता.

ऱ्होडने आतमध्ये अडकलेले शिशाचे अनेक तुकडे खरवडून बाहेर काढले व उजवीकडे असलेल्या बेसिनमध्ये टाकून दिले. डमडम जातीच्या गोळ्या वापरण्यात आल्या होत्या. त्यात गोळीचे टोक पोकळ असल्यामुळे हवा असलेला परिणाम अधिक वेगात साधला गेला होता. त्याने धातूचा आणखी एक तुकडा बाहेर काढला आणि क्षणभर तसाच उभा राहिला. जरा विचित्रच वाटतंय? तो मनातल्या मनात म्हणाला. नेहमीच्या गर्द गुलाबी रंगाऐवजी, गोळीच्या तुकड्याभोवती खारट तपकिरी रंग जमा झाला होता. एखादा अवयव कुजला तरच हाडाभोवती असा रंग दिसून येतो. पण तसं होण्यासाठी बाहेरून रोगजंतू, ज्वालाग्राही पदार्थ किंवा विषद्रव्याद्वारे पेशींना मारले जावे लागते.

ऱ्होडने मेंदूच्या मागच्या भागाचा एक जाड तुकडा काढून, नमुना तपासणीच्या बॅगमध्ये ठेवून दिला. डोके पुन्हा शिवून टाकण्याचे काम आपल्या मदतनिसाकडे सोपवून तो छातीवरच्या जखमेकडे वळला. हृदयात घुसल्यावर गोळीचा वेग मंदावल्याने बाकी

कुठल्याही भागाला धक्का लागलेला नव्हता. गोळी ताबडतोब बाहेर काढणे जरूरीचे होते. डोक्यावरचा दिवा हव्या त्या जागेवर आणत तो हृदय तपासू लागला. हृदयाचा रंग गडद अंजिरी व अतिशय उठावदार दिसत होता. फक्त जखमेजवळच्या पेशी मात्र विष्ठेसारख्या तपकिरी झाल्या होत्या. अगदी मेंदूमधल्याच पेशींसारख्या.

ऱ्होडने पेशींचा एक पुंजका तोडून प्रकाशात धरला. पेशी कुजून गेल्या होत्या, ह्यात काहीच शंका नव्हती. त्याने त्याही नमुन्यादाखल बाजूला ठेवून दिल्या.

त्याने अंगावरचा झगा उतरवला व हातामध्ये प्लॅस्टिकच्या बॅगा पकडून तो खोलीबाहेर पडला.

दोन मिनिटांतच तो प्रयोगशाळेत पोहोचला होता. “मला आता GC-MS चा वापर करावा लागणार.” तो म्हणाला. GC-MS म्हणजे मास स्पेक्टोमीटर-गॅस क्रोमॅटोग्राफ.

गोळीवर असे काहीतरी होते की जे अंगातले मांस कुजवत होते.

C31-H42-N2-06

मास स्पेक्टोमीटरवर उमटलेल्या त्या रासायनिक आकड्यांकडे ऱ्होड पाहात होता. हे सूत्र कोणत्या रासायनिक पदार्थासाठी वापरले जाते, याचा उलगडा समोरचे मशिन काही वेळातच करेल अशी त्याची खात्री होती. दहा सेकंद झाली तरी पडद्यावर काहीही बदल होण्याची चिन्हे दिसेनात. एकूण ६४,००० रासायनिक पदार्थ शोधून काढायची त्या यंत्राची क्षमता होती. पण ते यंत्रही हतबल झालेले दिसत होते. ऱ्होडने त्या यंत्राला पुन्हा एकदा पेशींचे पृथक्करण करावयास सांगितले परंतु उपयोग झाला नाही. ऱ्होडने निराश होऊन मान हलवली. गेल्या वीस वर्षांत मशिन अयशस्वी ठरण्याची ती पहिलीच वेळ होती.

त्याने ते सूत्र एका कागदावर लिहून घेतले व तो घाईघाईने आपल्या ऑफिसात आला. कसले तरी विषारी द्रव्य असणार याची त्याला पक्की खात्री होती. ते कुठल्या प्रकारचे टॉक्सिन असावे, एवढाच प्रश्न होता. स्वत:चा कॉंप्युटर वापरून त्यातून काही अर्थ लागतोय का, ह्याचा त्याने प्रयत्न केला. पण त्याला काहीच उत्तर मिळाले नाही. हताशपणे तो आपल्या खुर्चीत रेलून बसला. त्याच्या प्रश्नाचे उत्तर द्यायला फक्त एकच माणूस समर्थ होता. ऱ्होडला त्याची प्रकर्षाने आठवण झाली.

त्याने आपली डायरी चाळली व फोन नंबर मिळवला. त्याने तो परदेशी फोन नंबर फिरवायला सुरुवात केली. प्रथम ४० हा इंग्लंडसाठी, मग २० लंडनसाठी. न्यू स्कॉटलंड यार्डशी तो संपर्क साधत होता.

“विक्स.” पलीकडून एक रुक्ष इंग्लिश आवाज आला.

ऱ्होडने स्वत:ची ओळख करून दिली. आपण मागच्या उन्हाळ्यात विक्सने संचलित केलेल्या ‘न्यू फॉरेन्सिक टेक्नोलॉजिज’ या विषयावरच्या चर्चासत्रात सहभागी झालो होतो याची आठवण करून दिली. विक्स हा सतत अनेक कामांमध्ये व्यग्र असलेला माणूस होता. कुणी जर अतिसौजन्याने बोलू लागला तर तो त्या माणसाचे बोलणे झटकन तोडून टाकत असे. “हां, तर मग काय हवंय?”

लॅमर्सच्या शवविच्छेदनाविषयी ऱ्होड सांगू लागला. आपल्याला त्याच्या मेंदू व

हृदयात पिस्तुलाच्या गोळीभोवती कुजलेल्या पेशी सापडल्या; परंतु मास स्पेक्टोमीटरसुद्धा ते रसायन ओळखू शकत नसल्याचे त्याने सांगितले.

"फक्त सूत्र सांग." विक्सने पुन्हा तोडले. "बाकी सर्व माझ्यावर सोपव."

ऱ्होडने त्याला ते सूत्र वाचून दाखवले. विक्स जेव्हा फोनवर पुन्हा परतला तेव्हा त्याच्या आवाजातला उद्धटपणा बराचसा कमी झाला होता. "ह्या पेशी तुला कुठे सापडल्या असं तू म्हणालास?"

"मेंदूवर आणि छातीवर मारलेल्या गोळ्यांभोवती."

"कमाल आहे!" विक्स म्हणाला.

"म्हणजे तुला त्या पदार्थाचे नाव कळले?"

"अर्थात. मी शोधून काढलंच. त्याला बॅट्रॅकोटॉक्सिन म्हणतात."

हे नाव आपण प्रथमच ऐकत असल्याचे ऱ्होडने कबूल केले.

"तुला ते माहीत असण्याचं काही कारणच नाही. तुमच्याकडच्या भागात ते उपलब्धही नाही. तो ग्रीक शब्द आहे. बॅट्रॅकॉस म्हणजे बेडूक."

"बेडकाचं विष?"

"मूळ शब्द आहे, डेंड्रोबेट्स. नेमका अर्थ सांगायचा, तर विषारी बेडूक. तो बेडूक तुझ्या अंगठ्याच्या आकाराएवढा असतो. मध्य अमेरिका, पश्चिम कोलंबिया, निकाराग्वा, एल साल्व्हाडोर, कोस्टारिका येथील पर्जन्यमय जंगलात असे बेडूक सापडतात. त्यांचं वजन शंभर मायक्रोग्रॅम्स, म्हणजे साधारण सव्वाशे मिलिग्रॅम मीठाएवढं असतं. पण दीडशे पौंड माणसाला मारून टाकायची त्यात क्षमता असते. ते बेडूक स्वसंरक्षणासाठी ह्या विषाचा उपयोग करतात. शिवाय माकडांसारख्या प्राण्याची शिकार करण्यासाठी भारतीय आदिवासी जमातीतले लोक आपल्या बाणांवर ह्या विषाचा लेप लावत असत."

"म्हणजे त्या गोळ्यांनाही लेप लावलेला होता. पण का?"

प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी विक्सने त्यालाच उलट प्रश्न केला. "तुझ्या माणसांना त्या खुन्याचा काही सुगावा लागलाय? का त्यांनी त्याला पकडलेलंच आहे?"

"नाही."

"वाटलंच मला. गुन्हेगार हा अट्टल व्यावसायिक असणार."

आमच्या पोलिसांचेही हेच म्हणणे असल्याचे ऱ्होडने त्याला सांगितले.

विक्सने घसा खाकरला. त्याचा आवाज संथ पण दबका होता. "यावरून मला एक गोष्ट आठवली. मी रॉयल मरीन्समध्ये असताना अशी घटना मी प्रत्यक्ष पाहिली होती. १९८१-८२च्या सुमारास मी एल साल्व्हाडोरमध्ये होतो. आम्ही स्थानिक अमेरिकनांबरोबर काम करत होतो. देशामध्ये वणवा पेटलेला होता. प्रत्येक गट सत्ता मिळविण्याचा कसोशीने प्रयत्न करत होता. कम्युनिस्ट, समाजवादी, धर्मवेडे. सरकारने तर विरोधकांना जीवे मारण्यासाठी खास सैनिकी पथक सज्ज ठेवलं होते. निर्दयपणे हत्या होत होत्या. काही भारतीय वंशाचे सैनिक मात्र आपल्यावर नेमून दिलेल्या कामाबद्दल नाखूश होते. त्यांचा अंधश्रद्धांवर विश्वास होता. त्यांचा भुतांवर व असंतुष्ट आत्म्यांच्या अस्तित्वावर विश्वास होता. आपल्या हातून मारल्या गेलेल्या स्त्रीपुरुषांच्या मृत्यूनंतर होणाऱ्या

भुताखेतांपासून स्वत:चे संरक्षण व्हावे या हेतूने ते काही खबरदारी घेत असत. आपल्याकडील बंदुकीच्या गोळ्या ते प्रथम विषामध्ये बुडवत असत. त्या विषामुळे त्या मनुष्याबरोबरच त्याचा आत्माही मरतो व त्यामुळे त्या माणसाचं भूत बनत नाही अशी त्यांची श्रद्धा असे.”

“हे भयानक आहे.” ऱ्होड म्हणाला.

“ह्या सैनिकी पथकांना कोण प्रशिक्षित करायचं, हे तुला ठाऊक आहे?” विक्सने विचारले.

“त्यांना प्रशिक्षित केलं जायचं? म्हणजे तुला काय म्हणायचंय?”

“त्यांना त्या कलेत पारंगत केलं जायचं. मग त्यांना प्रत्यक्ष मैदानात पाठवायचे आणि आपला इप्सित हेतू त्यांच्याकडून साध्य करून घेतला जायचा.

“छे. मला काहीच कल्पना नाही.”

“ते यांक्स होते. तीच ती कंपनी. त्या वेळेस तरी ह्याच नावाने ओळखली जायची. तुम्हाला जर तो खुनी शोधून काढायचा असेल तर तुम्ही तिथून सुरुवात करायला हवी.”

“त्या कंपनीबरोबर? म्हणजे तुला म्हणायचंय की CIA बरोबर?”

“बरोब्बर. हरामजादे भडवे साले!”

गुडबाय म्हणत विक्सने त्याचा निरोप घेतला.

एर्विन ऱ्होड मटकन खाली बसला. जे ऐकलं ते पचवायला त्याला क्षणभर उसंत हवी होती. विषाने माखलेल्या गोळ्या. राजखुनी. अशा गोष्टी स्वित्झर्लंडमध्ये यापूर्वी कधीच घडलेल्या नव्हत्या.

नाइलाजाने त्याने फोन उचलला आणि मार्क्स व्हॉन डॅनिकनचा खाजगी फोन नंबर फिरवला.

३५

“ते विमान पाडणं अशक्य आहे.” ब्रिगेडियर जनरल क्लॉड चॅबर्ट उद्वेगाने सांगत होता. स्विस हवाईदलाच्या तिसऱ्या लढाऊ तुकडीचा तो कमांडर होता. “त्या विमानाचं चक्री इंजीन फारच मजबूत व शक्तीशाली आहे. एरवी हे विमान जास्तीतजास्त ताशी दोनशे किलोमीटर वेगाने जाऊ शकलं असतं; पण ह्या चिटुकल्या विमानाच्या शेपटीला जेटची यंत्रणा जोडलीय. ते गरम वायूचे फवारे सोडू शकतं. मला वाटतं, विमान पाडण्याचा विचार तू डोक्यातून काढून टाकावास.”

“काय बोलतोहेस तू? आपण त्यावर क्षेपणास्त्र सोडू शकत नाही?” अल्फॉन्स मार्टी त्याच्यावर कडाडला. पुढे येत तो मध्यभागी असलेल्या टेबलापाशी आला. टेबलावर त्या ‘ड्रोन’ची – ‘मधमाशी’ विमानाची – नीलप्रत ठेवली होती. मार्टी तिच्याकडे बारकाईने पाहू लागला. ‘विनापायलट उडणारे विमान’ असं चॅबर्टने त्याचे नुकतेच वर्णन केले होते. “हवं तर एखादं स्टिंजर वापरा. तुझ्या म्हणण्याप्रमाणे जर ते जेट असेल तर त्यात हीट सिग्नेचर असायलाच हवी.”

न्यूसबॉमस्ट्रॉसमधल्या डॅनिकनच्या ऑफिसात ते तिघे एकत्र जमले होते. दुपारचे पाच वाजले होते. चॅबर्ट हा इलेक्ट्रिकल इंजिनिअर होता व त्याची खासियत म्हणजे ‘गांधीलमाशी’ या टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या F/A-18 हे विमान चालवण्यात तो अतिशय तरबेज होता. त्या विमानातून त्याने आजपर्यंत सहा हजार तासांचा प्रवास केला होता. म्हणूनच त्याला आज पायर्न हवाईतळावरून तातडीने बोलावून घेतले होते. स्वयंचलित विमाने कशी नष्ट करायची याचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवण्यात आली होती. पिंगट केस व सडपातळ शरीरयष्टी असलेल्या चॅबर्टचे निळे डोळे मात्र एखाद्या गुराख्याच्या डोळ्यांसारखे सुरकुतलेले होते. आताही त्याच्या अंगावर वैमानिकाचाच गणवेश होता. एका कुशल व यशस्वी वैमानिकाचे, तो मूर्तिमंत उदाहरण होता.

“केवळ हीट सिग्नेचर पुरेशी नाही.” चॅबर्ट शांतपणे म्हणाला. “आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की ते एक चिमुकलं जेट विमान आहे. त्याचे पंख फक्त चार मीटर पसरलेले आहेत. अख्खं विमानच मुळी अडीच बाय पन्नास सेंटीमीटरचं आहे. ताशी पाचशे किलोमीटर वेगाने ते जात असताना, तुम्ही त्या विमानाचा वेध घेऊ शकत नाही. हवाई रहदारी नियंत्रणासाठी जी रडार यंत्रणा वापरली जाते, त्यातून पक्षी, घारी वगैरे लक्षय भक्षयस्थानी पडू नये म्हणून खास काळजी घेतलेली असते. आणि हे तर त्याहुन कमालीचं चपळ आहे. त्याच्या आकारात वक्रपणा जास्त आहे. धूर सोडणाऱ्या नळकांडीवरही विमानाचं पातं बसवलंय. माझ्या मते विमानावर RAM चा चंदेरी मुलामासुद्धा दिला गेलाय.”

“RAM? RAM म्हणजे काय?” मार्टीने विचारले. चॅबर्ट आपल्याला मुद्दाम चिडवतोय

असे त्याला वाटले.

“रडार अॅबसॉर्बंट मटेरियल. चमकत्या धातूचा रंग, माणसाच्या डोळ्याला तो चटकन दिसणं अवघड असतो.” चॅबर्ट बोलता बोलता व्हॉन डॅनिकनकडे वळला. “सॉरी मार्क्स, पण रडारला ते विमान दिसू शकणार नाही. त्या बाबतीत तुला काहीच करता येणं शक्य नाही.”

व्हॉन डॅनिकन खुर्चीत बसला आणि त्याने आपल्या केसांमधून हात फिरवला. गेल्या तासाभरात त्याला ‘ड्रोन’ या अत्याधुनिक शस्त्राच्या प्रगती व वापराबद्दलचे नको इतके ज्ञान मिळालेले होते. १९९० साली इस्त्राईल हवाई दलाने ह्या स्वयंचलित वाहनांचा वापर लेबॅनॉनच्या उत्तर सीमेवरून जाण्यासाठी प्रथम केला होता. त्या वेळेस ‘ड्रोन’ म्हणजे एक रेडिओसारखे खेळणे समजले जायचे. त्यात एक कॅमेरा बसवलेला असायचा व शत्रूचे फोटो काढण्यापुरताच त्याचा उपयोग व्हायचा. पण आजचे त्याचे अत्याधुनिक स्वरूप मात्र काळीज थरारून टाकणारे होते. पंखांची व्याप्ती पंधरा मीटर होती. पंखांखाली क्षेपणास्त्रे दडवलेली होती आणि हजारो मैल दूर पोहोचण्याइतका त्यामध्ये इंधनाचा साठा केलेला होता.

“ड्रोन कुठे असावं याबद्दल तुला काही कल्पना आहे?” चॅबर्टने विचारले.

व्हॉन डॅनिकन म्हणाला “बहुतेक ते स्वित्झर्लंडमध्येच असावं.”

“नेमकं कुठे असावं याबद्दल काही खबर? झुरिच, जिनिव्हा, बेसल-मुलहाऊस?”

“त्यापैकी कुठेच नाही.” व्हॉन डॅनिकनने घसा खाकरला. गेल्या काही दिवसांच्या दगदगीचा त्याच्या शरीरावर परिणाम होऊ लागला होता. डोळ्यांभोवती काळी वर्तुळे जमा झाली होती. बसतानाही त्याला पोक काढावे लागत होते. “जनरल, मला एक सांग की, अशा विमानांसाठी कशा प्रकारची धावपट्टी बनवावी लागते?”

“कुठलाही एखादा दोनशे मीटर लांबीचा मोकळा रस्ता पुरेसा असतो.” चॅबर्ट म्हणाला. “त्याला आकाशात झेप घ्यायला फक्त पाच मिनिटं लागतात.”

व्हॉन डॅनिकनला लॅमर्सच्या सेक्रेटरीशी झालेली भेट आठवली. आपले विमान किती वेगवेगळ्या पद्धतीची अचूक माहिती गोळा करू शकते ह्याचे वर्णन करताना तिचा उर अभिमानाने भरून गेला होता. त्याने त्यातील फक्त एवढीच गोष्ट लक्षात ठेवली होती की, त्या विमानाचा पायलट किंवा नियंत्रणकर्ता, ब्राझीलमध्ये किंवा जगाच्या आणखी कुठल्याही कोपऱ्यात बसलेला असू शकतो. “बरं, मला सांग की त्या ड्रोनचं संदेश देणं आपण बंद करू शकतो?”

“त्यासाठी तुला जमिनीवरचं प्रक्षेपण केंद्र आधी हुडकून काढावं लागेल. ड्रोन हे त्रितत्त्वावर काम करत असतं. जमिनीवरील प्रक्षेपण केंद्र, उपग्रह व स्वतः ड्रोन त्या तिघांमध्ये सतत परस्पर संदेशन कार्य सुरू असतं.”

“प्रक्षेपण केंद्र किती मोठं असू शकेल?”

“त्यात वेगवेगळे प्रकार असू शकतात. जर पायलट हा ड्रोनच्या दृष्टिकक्षेबाहेर असेल, म्हणजे जर तो ड्रोनमध्ये ठेवलेल्या कॅमेऱ्यावर पूर्ण अवलंबून असेल, तर त्याला व्हिडिओ मॉनिटर्स, रडार, स्थिर विद्युतशक्तीचा पुरवठा व अखंड उपग्रह सेवा आवश्यक असते.”

“हे सर्व व्हॅनसारख्या फिरत्या वाहनातून पुरवता येऊ शकतं?”

“शक्यच नाही.” चॅबर्ट झटकन म्हणाला. “एका पक्क्या बांधलेल्या खास तळावरूनच तो ऑपरेटर हे काम करू शकतो. नाहीतर दूर अंतरावर त्याला संदेश पाठवता येणार नाही व त्याच्यापर्यंतही ते पोहोचू शकणार नाहीत. तुझ्यामते, शत्रूची विमानं पाडणं हा त्यांचा हेतू आहे. पण ह्यामध्ये हवेमधली क्षेपणास्त्रं घेऊन जाण्याएवढी क्षमता नाहीये. हे ‘ड्रोन’ दुसऱ्या मोठ्या विमानाशी जोडलेलं असेल अशी तुझी खात्री आहे का? तसं असेल तर त्यांना हवं असलेलं ‘लक्षय’ कायम आपल्या दृष्टीच्या कक्षेत राहील असा प्रयत्न सतत करावा लागेल. त्यासाठी त्यांना कॅमेरा व रडारवर विसंबून राहावं लागेल. ही सगळी तारेवरची कसरत आहे.”

“हे बघ, म्हणजे मी तुला अगदी खात्रीपूर्वक सांगू शकत नाही,” व्हॉन डॅनिकन उत्तरादाखल म्हणाला. “पण बहुतेक करून ह्यामध्ये प्लॅस्टिक विस्फोटकांचा वापर केला जाईल.”

“अच्छा!” चबर्टचा चेहरा चमकला. “चला, एक तरी कोडं उलगडलं! तर मग त्या नॅसेल्लेचा वापर ते कशासाठी करणार हे आता स्पष्ट झालं. आजपर्यंत हवाई तंत्रज्ञानाच्या विकासाकरताच ते वापरलं गेलं होतं.”

“नॅसेल्लेचा, म्हणजे?” डॅनिकनने विचारलं.

टेबलावर असलेल्या चित्राकृतीमधील ड्रोनच्या नाकावर लोंबणाऱ्या गोलाकारावर चॅबर्टने बॉलपेन टेकवले. “हा गोळा तीस किलोपर्यंत वजन उचलू शकतो.”

व्हॉन डॅनिकन आतून अस्वस्थ झाला. ब्लिट्झच्या गॅरेजमधून वीस किलो सिमटेक्स गायब झालेले होते.

“एक विमान पाडण्यासाठी इतकं पुरेसं आहे?” मार्टीने विचारले.

“चिक्कार झालं.” चॅबर्ट म्हणाला. लॉकरबीला ज्या बॉम्बने पॅन एएम १०३ पाडलं गेलं, तो एका कॅसेट रेकॉर्डरमध्ये ठेवलेला होता. बोईंग ७४७ च्या डाव्या बाजूला दोन मीटर बाय चारचं भगदाड पाडायला अर्धा किलोपेक्षाही कमी C-4 लागलं होते. दहा हजार फूट उंचीवर असलेलं विमान वाचण्याची शक्यताच नसते. नुसती कल्पना कर की, लहानशा आकाराचं ड्रोन पाचशे किलोमीटर वेगाने चाललंय आणि आपल्या आकाराच्या पन्नास पटीने मोठ्या असलेल्या स्फोटकांचा ते वर्षाव करत आहे.”

मार्टी नकळत मागे सरकला. त्याचा चेहरा नासलेल्या दुधासारखा दिसत होता.

“पण हे तर तुझ्या प्रश्नाचं निम्मं उत्तर झालं.” ब्रिगेडियर जनरल चॅबर्ट म्हणाला.

“म्हणजे?” व्हॉन डॅनिकनने डोळे बारीक करत विचारले.

“इतका दारुगोळा असलेलं ड्रोन हे आता स्वत:च एक क्षेपणास्त्र बनलंय. बॉम्बहल्ला करण्यासाठी त्याला जोडल्या गेलेल्या विमानावर अवलंबून राहायची त्याला काहीच गरज नाही. जमिनीवरच्या कुठच्याही लक्षयाचा ते स्वत:च भेद करू शकतं. स्फोटकांचा बार उडाल्यावर पंखांजवळच्या इंधन टाक्या पेट घेतील व ती आग वणव्यासारखी पेटत जाईल. उडवलेल्या विमानाच्या वीस मीटर परिसरात असलेले दुसरे विमानही बघता बघता जळून खाक होईल.”

चॅबर्टने अस्वस्थपणे आपली मान चोळली. “मित्रानो, तुमचं अख्खं विमानतळ भस्मसात व्हायला फारसा वेळ लागणार नाही.”

चॅबर्ट पाच मिनिटांपूर्वी निघून गेला होता. व्हॉन डॅनिकन हाताची घडी घालून टेबलाच्या कोपऱ्यावर बसला होता. अल्फॉन्स मार्टी खोलीमध्ये अस्वस्थ फेऱ्या मारत होता. आता खोलीमध्ये ते दोघेच उरले होते.

“आपण आता सर्व संबंधित अधिकाऱ्यांना संभाव्य धोक्याच्या सूचना द्यायला हव्यात.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “आणि मला वाटतं ह्या सूचना तुझ्या फोनवरून दिल्या जाव्यात.”

यादी खूप मोठी होती. अनेक कार्यालयांना फोन करावे लागणार होते. नागरी हवाईदलाचे फेडरल ऑफिस, फेडरल सुरक्षा सेवा, झुरिच-बर्न; बसेल व ल्युगानो येथील पोलीस कार्यालये, तसेच त्यांच्या फ्रान्स, जर्मनी व इटलीमधील संलग्न एजन्सीज यांच्याशी संपर्क साधणे आवश्यक होते. कारण ह्या सर्व ठिकाणी ड्रोन हल्ला करण्याची शक्यता दाट होती.

“पटतंय रे मला, पण तरीही असं वाटतंय की आपण थोडी घाई करतोय. म्हणजे मला म्हणायचंय की नक्की कुठल्या प्रकारचा हल्ला होणार आहे?”

“आत्ताच आपण ह्यावर सविस्तर बोललो.”

“ते ठीक आहे. पण अजून आपल्याला नेमक्या गोष्टी कुठे ठाऊक आहेत? हल्ला कधी व कुठे होईल याची तारीख, वेळ, जागा माहिती आहे का आपल्याला? आपल्याला एवढंच कळलंय की कुणा एका अतिरेकी दहशतवाद्याकडून ही माहिती मिळवली गेलीय. कदाचित ती त्याने पोलिसांच्या दबावाखालीही सांगितली असू शकेल.”

मार्टीचा स्वर सौम्य होता. एखादा बाप आपल्या व्रात्य मुलाची जशी शांतपणे खरडपट्टी काढत असतो, तसा. व्हॉन डॅनिकननेही तोच स्वर पकडला. “गॅसन जरूर दबावाखाली असेल, पण त्याने सांगितलेली माहिती अचूक ठरलीय. त्याने गॉडफ्रिड ब्लिट्झ उर्फ महम्मद क्विताबला पन्नास किलो सीमटेक्सचा माल पोहोचवला असं जे सांगितलं ते खोटं नव्हतं. ब्लिट्झ हा इराणी लष्करी अधिकारी असल्याचं सिद्ध करणारा तर आपल्यापाशी फोटोही आहे. लॅमर्सने ते ड्रोन बनवलं व ते ब्लिट्झच्या ताब्यात दिलं असं आता मी नक्की म्हणू शकतो. स्वित्झर्लंडमधलं एखादं विमान हेच ब्लिट्झचं ‘लक्षय’ होतं असा गॅसनने दिलेला कबुलीजबाब आपण ग्राहा मानला पाहिजे. मला वाटतं आपल्या सर्व कार्यालयांना सतर्क करण्यासाठी हा सबळ पुरावा आहे.”

“ठीक आहे, मी तुझं म्हणणं मान्य करतो. पण मला सांग की लॅमर्स आणि ब्लिट्झ तर आता जिवंतही नाहीत. आता त्यांच्या गँगमधल्या बाकीच्या साथीदारांनाही मारलं गेलं असेल असं जर आपण गृहित धरलं तर त्यात काय चुकीचं आहे ते मला सांग. मी तर म्हणतो की कुणीतरी आपल्या बाजूनेच ही सर्व कामं करतोय.”

व्हॉन डॅनिकनला, ब्लिट्झच्या गॅरेजमध्ये खांबावर उमटलेला पांढऱ्या रंगाचा पट्टा आठवला, वीस किलो प्लॅस्टिक स्फोटके गायब झालेली होती, टायर्सच्या खुणांवरून माल पोहोचवण्याकरता वापरलेली व्होल्क्सवॅगन व्हॅनही बरेच दिवस त्याच गॅरेजमध्ये होती. “ह्या कटामध्ये खूप माणसं सामील आहेत. फक्त दोन माणसांनी रचलेला हा कट नव्हे.”

“हे बघ मार्क्स. आणखी काही माणसं त्यात गुंतलेली असतीलही. मला त्यावर मुळीच वाद घालायचा नाही. पण माझी अजून खात्री पटत नाही. समजा, मी नागरी हवाई सेवेला सूचना केली. पुढे? त्यांनी काय आपली सगळी विमान उड्डाणं रद्द करायची?

आणि मग म्युनिच, स्टच्युटगार्ट आणि मिलानला जाणाऱ्या प्रवाशांना रेल्वेमध्ये किंवा बसमध्ये कोंबायचं? जर आपल्या भुयारी रेल्वेलाही धोका निर्माण झाला आहे असं आपल्याला वाटलं, तर काय आपण सॅन बर्नार्डिनो आणि गोथ्थार्ड बंद करून टाकणार का? असं नाही करू शकत आपण."

व्हॉन डॅनिकनने मार्टीकडे रोखून पाहिले. "आपल्याला स्थानिक पोलिसांची फार मदत लागणार आहे." मार्टीचे बोलणे जणू ऐकलेच नसल्याचा बहाणा करत तो म्हणाला. "विमानतळाच्या दहा मैल परिसरात असलेल्या प्रत्येक घराघरात आपल्याला जावं लागेल. आणि मग आपण–"

"तू जनरलचं बोलणं ऐकलं होतंस ना?" मार्टीने आपल्या त्याच थंड पण चीड आणणाऱ्या स्वरात त्याला अडवले. "ते ड्रोन कुठूनही चालवू शकतात. त्यांना कदाचित फ्रान्स, जर्मनी किंवा... किंवा अफ्रिकेतलंसुद्धा विमान उडवायचं असू शकेल. प्लीज, मार्क्स."

व्हॉन डॅनिकनने चिडून आपल्या हाताचे नख, तळव्यामध्ये खुपसले. ह्याच्याशी बोलणे म्हणजे पालथ्या घडयावर पाणी आहे हे त्याच्या लक्षात आले. मार्टी अजूनही त्या धमकीवरून धडा शिकायला तयार नव्हता. "मी म्हणत होतो की आपण घराघरातून शोध घ्यायला सुरुवात करणार आहोत. ही मोहीम अगदी शांतपणे राबवली जाईल याची मी जबाबदारी घेतो. आपण झुरिच व जिनिव्हापासून सुरुवात करू या."

"ह्या कामासाठी किती पोलीस लागतील?"

"काही हजार."

"अरे वा! म्हणजे आपल्या बायकापोरांना काहीही न सांगता इतके सगळे पोलीस अगदी चूपचाप, आपल्या बुटांचाही आवाज न करता, घरांमागून घरांचे दरवाजे ठोठावत जाणार! आणि का तर म्हणे कुठल्या तरी घरात शस्त्रं आणि क्षेपणास्त्रं दडवून ठेवल्याची त्यांना खबर मिळालीय, म्हणून?"

"क्षेपणास्त्र हुडकण्यासाठी नव्हे. तिथल्या कुणा रहिवाशाला काही संशयास्पद हालचाल दिसली आहे का ते विचारण्यासाठी. एका हरवलेल्या मुलाचा आपण शोध घेत आहोत असं ते सांगतील."

" 'शांत पोलीस!' 'हसतखेळत चौकशी!' वा! उद्या सकाळपर्यंत देशातल्या निम्म्या लोकांना आधीच आपलं गुपित समजलेलं असेल आणि उद्या संध्याकाळी मी टी.व्ही.वरच्या बातम्यातून उरलेल्या निम्म्यांना समजावून सांगत असेन की, बाबांनो आपल्या देशात अतिरेकी दहशतवादी आले आहेत. आपलं एक विमान पाडण्याचा त्यांचा इरादा आहे; पण त्यांचा मुकाबला करायला आम्ही असमर्थ आहोत."

"अगदी बरोबर" व्हॉन डॅनिकन म्हणाला. "आपल्या देशात अगदी ह्याच हेतूने एक अतिरेकी टोळी झपाटयाने आपलं जाळं पसरवतेय आणि ह्याची मला आता खात्री पटलीये."

मार्टीसमोर हार पत्करण्याखेरीज गत्यंतर नाही हे आता त्याच्या हळूहळू लक्षात येऊ लागले होते. बोटांमधून वाळू निसटत जावी तशी परिस्थिती त्याच्या हाताबाहेर चालली होती.

मार्टीने त्याच्याकडे एक कुत्सित कटाक्ष टाकला. "अरे, तू लोकांमध्ये किती घबराट

पसरवणार आहेस याची तुला थोडी तरी कल्पना आहे?” त्याने विचारले. “तू मध्य युरोपमधली अख्खी हवाई वाहतूक ठप्प करून टाळायला निघाला आहेस. हा काही कुणाच्या बॅगमध्ये लपवलेला बॉम्ब नाहीये. आर्थिक नुकसान तर आपण सोडूनच देऊ या... इथे देशाची प्रतिष्ठाच पणाला लागणार आहे.”

“आपल्याला विमानतळावरचा पहारा वाढवावा लागेल. रडार बसवावी लागतील. तिथे मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रांचा साठा करून ठेवावा लागेल.”

व्हॉन डॅनिकन थोडा वेळ गप्प बसला. मार्टीचे माथे आणखी भडकतेय का, ह्याची तो वाट पाहू लागला. पण कायदामंत्री शांत दिसत होता. मार्टी सावकाश खुर्चीत बसला. हात डोक्यामागे ठेवून त्याने आढ्याकडे नजर लावली. काही क्षणांनंतर त्याने आपली मान नकारार्थी हलवली आणि व्हॉन डॅनिकन जे काय समजायचे ते समजला. तो हरला होता आणि त्याहून वाईट गोष्ट म्हणजे मार्टीने घेतलेली सबुरीची भूमिका त्याला अगदीच गैर वाटत नव्हती.

“मार्क्स, माझा नाइलाज आहे.” मार्टी म्हणाला. “आपल्या समोरचं चित्र पुरेसं स्पष्ट झाल्याखेरीज आपण कोणतीही ठोस कृती करू शकत नाही. हा तुझा... कोण तो?... ब्लिट्झ नाहीतर क्विताब... ह्याचे जे कोणी साथीदार आहेत, त्यांना तू आधी शोधून काढायला हवंस. आणि तसंच ती वीस किलोची प्लॅस्टिक स्फोटकं व पांढरी व्हॅनसुद्धा आपल्या ताब्यात यायला हवी. जर मी अख्ख्या देशाचे व्यवहार बंद करावेत अशी तुझी इच्छा असेल तर त्यासाठी तुला त्या रचल्या गेलेल्या कटाचा खणखणीत पुरावा सादर करावा लागेल. तुझ्या CIA मधल्या मित्रांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मी आपल्या देशाचा कारभार ठप्प करू शकत नाही.”

“आणि रॅन्सम?”

“त्याचं काय?” मार्टीने बेफिकीरीने विचारले. तो उठून दरवाजापर्यंत पोहोचला होता.” तो केवळ एक संशयित खुनी आहे. त्याला कसं पकडायचं हे कॅन्टोनमेंट अधिकारी पाहतील.”

“रॅन्समने जखमी केलेला तो हेर, कोमामधून बाहेर यायची मी वाट पाहतोय. रॅन्समला त्या बॅगा का हव्या होत्या हे आपल्याला त्याच्याकडून समजेल.”

“तुला ती काळजी करण्याची आता गरज उरलेली नाही. एका तासापूर्वीच तोही मेल्याचं मला कळलंय. आता रॅन्समच्या नावावर दोन खून जमा झालेत.”

व्हॉन डॅनिकनला वाटलं की कुणीतरी आपल्या पाठीत सुरा खुपसलाय. “पण तोच तर आपल्यासाठी फार महत्त्वाचा–”

मार्टीचा चेहरा लालबुंद झाला. आल्यापासून त्याच्या मनात राग धुमसत होताच; पण आत्तापर्यंत त्याने तो दिसू दिला नव्हता. “नाही चीफ इन्स्पेक्टर, तुझं काम फक्त इतकंच आहे की, स्विस भूमीवर विमान पाडण्याचा कट ज्या टोळीने रचला आहे तिचा व त्या पांढऱ्या व्हॅनचा लवकरात लवकर शोध घेणे. रॅन्समला तू विसरून जा. आणि ही माझी आज्ञा आहे.”

३६

मध्यरात्र उलटून गेली होती. शांत, सुस्त रस्त्यावरून एक व्हॅन सावधपणे पुढे सरकत होती. तिचा रंग आता पांढरा नव्हता. काही दिवसांपूर्वीच तिला काळा रंग देण्यात आला होता व एका बनावट खाद्यसेवा कंपनीचे नाव तिच्या बाजूच्या तावदानावर सुवाच्य अक्षरात लिहिलेले होते. त्याखाली लिहिलेला फोन नंबर हा प्रत्यक्ष अस्तित्वातही होता आणि कार्यरतही होता. त्या नंबरवर फोन करणाऱ्याला अत्यंत सफाईदार उत्तर मिळणार होते. स्विस परवान्याची पाटी काढून त्या जागी जर्मन पाटी आलेली होती. 'ST ' अशी त्यावर आद्याक्षरे होती. स्टचुटगार्ड ह्या बड्या औद्योगिक शहरासाठी ती आद्याक्षरे वापरली जात असत.

स्टिअरींग व्हीलमागे पायलट बसलेला होता. गाडीचा वेग कायद्याच्या मर्यादेत राहील याची तो पूर्ण दक्षता घेत होता. प्रत्येक लाल सिग्नलला तो न चुकता शांतपणे थांबत होता. गाडीचे सर्व दिवे नीट लागलेले आहेत ह्याची त्याने खात्री करून घेतली होती. सिग्नलचा दिवा पिवळा असला तरी गाडीचा वेग कमी करून शांतपणे थांबायची त्याची तयारी होती. कोणत्याही परिस्थितीत पोलिसांचे आपल्याकडे लक्ष जाणार नाही ह्याची तो पूर्ण खबरदारी घेत होता. गाडीमधला स्टेनलेस स्टीलचा पेटारा जर तपासला गेला तर सारेच पितळ उघडे पडले असते. सगळ्या योजनेमधली तेवढीच एक लंगडी बाब होती. कोणत्याही संरक्षणाशिवाय भर रस्त्यावरून एका सार्वजनिक वाहनामधून ते 'ड्रोन' वाहून नेण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता.

ओअर्लिकॉन, ग्लॅटब्रग व ऑफिकॉन मागे टाकत ती व्हॅन आता झुरिचच्या जवळपास पोहोचली. लवकरच तिने बंगले व इमारतींनी गजबजलेले रस्ते पार केले आणि ती पाईन वृक्षांच्या विरळ जंगलात दाखल झाली. पाईन वृक्षांमधून तो रस्ता चढत वर गेला होता. काही मिनिटांतच जंगल पाठी गेले व ती एका छोट्या टेकडीवर आली. टेकडीवरील भलामोठ्या उद्यानात बर्फ साचले होते. उद्यानाच्या शेवटी रस्ता संपलेला होता. पायलटने आपली व्हॅन एका कच्च्या रस्त्यावर आणली. रस्ता साधारण एक किलोमीटर लांबीचा होता. त्याने व्हॅनचा वेग अगदी संथ ठेवला तरीही चाकं डगमगतच होती. पण त्याची त्याला फारशी फिकीर वाटली नाही. तो परिसर त्याला अगदी जसा हवा, तसाच होता. रस्ता किंवा ती धावपट्टी अगदी त्याला हवी तशी सरळ व सपाट होती. उड्डाण करताना आजूबाजूला झाडांचा अडथळा नव्हता. आणि अर्थातच काही दिवसांत बर्फाचा एक कणही दृष्टीस पडणार नव्हता. हवामान खात्याने अंदाज दिला होता की, शुक्रवारच्या आसपास अतिदाबाचे वारे वाहू लागतील व सूर्यप्रकाशामुळे तापमानात चांगलीच वाढ होईल.

रस्त्याच्या टोकाला असलेल्या एका खाजगी जागेत व्हॅनने प्रवेश केला. गॅरेजचा दरवाजा उघडाच होता व भोवताली साचलेले बर्फ काढून जमीन स्वच्छ केलेली होती.

व्हॅन आत शिरताच गॅरेजचा दरवाजा बंद झाला.

बाजूच्या दरवाजाने तो गॅरेजच्या बाहेर आला. एवढ्या लांबच्या प्रवासानंतर त्याला पाय मोकळे करायचे होते. तो पार्कच्या दिशेने जात असताना अचानक आकाशामध्ये कानठळ्या बसवणारा आवाज ऐकू आला. आवाज वाढतच गेला. त्याने वर पाहिले. तो जिथे उभा होता त्याच्या जेमतेम हजार फूट उंचीवरून विमानाच्या एका धुडाने आकाशात झेप घेतली. ती A380 एअरबस होती. सहाशे प्रवाशांना घेऊन जाणारं नवीन कोरं जम्बो विमान. विमान हवेत आणखी वर उचलले गेले. त्याच्या दणकट इंजिनामधून येणारा आवाज त्याला कर्णमधुर वाटला. विमानाच्या शेपटावरची अक्षरं तो उघड्या डोळ्याने वाचू शकत होता. ‘Thai ’ ही अक्षरे जांभळ्या रंगात लिहिलेली होती. ते रात्री साडेनऊचे बँकॉकला निघालेले विमान होते.

ढगांमागे दिसेनासे होईपर्यंत, पायलट त्या विमानाकडे पाहत राहिला. मग वळून त्याने मागे पाहिले. खालच्या विस्तीर्ण पठारावर एका शहराच्या कुशीत आणखी एक शहर पसरलेले होते. विमाने उभी असलेले ते अवाढव्य मैदान, प्रवाश्यांना आराम करण्यासाठी बांधलेल्या प्रशस्त इमारती यासकट ते विमानतळ, वेगवेगळ्या रंगांच्या दिव्यांनी झगमगत होते.

झुरिच विमानतळ.

ते सर्व दृश्य अत्यंत नयनरम्य होतं.

३७

“डोकं नीट मागे ठेव.” त्याच्या ओल्या केसांना ‘डाय’ करता करता सीमॉन म्हणाली. “आधी तो पूर्णपणे आत जिरू देत. नंतर आपण केस धुवू या, मग मी केस व्यवस्थित कापेन. हा सिसिलियन काळा डाय आहे. तू स्वत:लाच ओळखू शकणार नाहीस.”

“मला माझी काळजी वाटत नाहीये.”

एका स्टुलावर बसून जोनाथनने वॉशबेसिनमध्ये आपले डोके झुकवले होते व डोळे मिटून घेतले होते. सीमॉनच्या मजबूत बोटांनी आपले काम चोख केले होते. डोक्याच्या सर्व भागांना तो डाय अगदी छान लागला होता. कपाळाच्या वरच्या भागापासून ते थेट मानेच्या टोकापर्यंत. मिंटमधल्या उत्तेजित द्रव्याचाही आता असर निघून गेला होता. त्या नशेच्या भरात त्याने ब्लिट्झच्या घरात भलतेच धाडस केले होते, झिअॅंगचा बॉस असलेल्या हॅन्स हॉफमनशी तो जराही न घाबरता बोलला होता. पण ह्या सगळ्या गोष्टी घडून आता बराच काळ लोटलाय असे त्याला आत्ता वाटत होते. तो प्रचंड थकला होता व नुकत्याच केलेल्या गरम पाण्याच्या अंघोळीने डोळे जड झाले होते. सीमॉनने त्याच्या अगदी केसांच्या मुळांपर्यंत केलेल्या मालिशने त्याचे डोके हलके झाले होते. गेल्या चोवीस तासांत तो प्रथमच अगदी शांतपणे विश्रांती घेत होता.

दुपार होईपर्यंत ते विश्रामगृहात थांबले होते. नंतर खाली उतरून एक बस पकडून ते ल्युगानोला येऊन पोहोचले. जोनाथन एका चित्रपटगृहात लपून बसला. सीमॉनने बाजारात जाऊन, दोघांसाठी कपडे विकत घेतले. मग शहराबाहेर फेरफटका मारून, त्यांनी रात्रीच्या मुक्कामाची जागा शोधून काढली.

हॉटेलचं नाव अलबर्गो डेल लॅगो होते. ल्युगानोच्या सीमेनजिक असलेले ते हॉटेल अतिशय छोटे होते. एका कुटुंबाने ते चालवलेले होते. तळ्याचा काठावर वीस छोटी कॉटेजेस बांधलेली होती व खाली एक पिझ्झेरिया होता. सीमॉनचा पासपोर्ट व क्रेडिट कार्ड वापरून त्यांनी मिस्टर व मिसेस पॉल नॉयरेट ह्या नावांनी हॉटेलच्या रजिस्टरमध्ये नोंद केली होती. त्यांच्या हातात सूटकेस नव्हत्याच. फक्त कपड्यांनी व किरकोळ सामानांनी भरलेल्या पिशव्याच होत्या. दिवसभर शहरात मजा करून एका रात्रीपुरते हॉटेलात आलेले ते एक प्रेमी युगुल असावे असा बाकीच्यांचा समज होत होता.

“झालं सगळं!” प्लॅस्टिकचे हातमोजे काढत सीमॉन म्हणाली. “आता पंधरा मिनिटांत तुझे केस एलिझाबेथ टेलरसारखे काळे कुळकुळीत झालेले असतील.”

“ती सिसिलियन होती हे मला ठाऊक नव्हतं.”

सिमॉनने त्याचा खांदा थोपटला. “हुषार मुलगा आहेस. आता आहेस तसाच थोडा वेळ बसून राहा. रंग नीट वाळूदेत.”

डाय खाली ओघळू नये म्हणून तिने त्याच्या डोळ्यांभोवती एक टॉवेल गच्च बांधून टाकला. त्यानंतर त्याला जाग आली तेव्हा सीमॉन त्याचे खांदे हलवत होती. “चला.

उठायची वेळ झाली.”

डोळ्यांवरचा टॉवेल काढला गेला. क्षणभर त्याच्या डोळ्यांना दिव्याचा प्रकाश सहन होईना. “मिनिटभर अगदी छान डोळा लागला होता.”

“मिनिटभर नाही, वीस मिनिटं,” सीमॉनने नळ सुरू केला आणि गरम पाणी येऊ लागल्यावर, डाय धुवून काढला. विकत आणलेल्या नवीन कात्रीने तिने त्याचे केस कापले. कुरळेपणा जाऊन केस आता सरळ झाले होते. तिने मग केस व्यवस्थित विंचरले. “आता जरा उभा राहा. मला तुझ्याकडे एकदा नीट बघू देत.”

जोनाथन उभा राहिला.

“थोडंसं काम उरलंय.” आपल्या बोटांनी त्याचा जबडा पकडून तिने त्याचे डोके स्थिर ठेवले आणि स्वत:च्या मनाचे समाधान होईपर्यंत ती त्याच्या केसांना नवीन वळण देत राहिली. मग त्याच्या खांद्यांवर हात ठेवत तिने त्याला गर्रकन वळवले आणि मागच्या आरशात त्याला आपला चेहरा पाहायला लावला. “झाले” ती म्हणाली. “ह्या माणसाला तू ओळखतोस?”

“बापरे, मी तर घाबरलोच.”

“काय रे हे? मला वेगळीच प्रतिक्रिया अपेक्षित होती.”

आरशातला माणूस चक्क दहा वर्षांनी तरुण दिसत होता. एकेकाळी त्याच्या वडलांना जसा हवा होता, तसा तो एक मुत्सद्दी राजनीतिनिपुण अधिकारी वाटत होता. किंवा पार्क अॅव्हेन्यूच्या जाहिरातीमधला एक निष्णात सर्जन. तो हसला आणि त्या प्रकाशात त्याचे दात चमकले.

थोडक्यात सांगायचे तर काम अगदी बिनचूक झाले होते.

“लिझ टेलर असं मी म्हणणार नाही.” बाथरूममधून बाहेर येत तो म्हणाला. “पण व्हिन्स व्हॉनवर मी तडजोड करायला तयार आहे.”

“निदान तुला कुणीही ब्रॅड पिट तर नक्कीच म्हणेल.”

“पण त्याचे केस तर पिंगट आहेत.”

“काय फरक पडतो. आपण त्याच्या केसांना कुठलाही रंग देऊ शकतो.”

जोनाथनने बेडरूममध्ये जाऊन नवीन कपड्यांची पिशवी उचलली व ती कॉटवर ठेवून त्यातला गर्द जांभळ्या रंगाचा सूट तो अंगावर चढवू लागला. टेलिव्हिजन सुरू होता. बातम्या सांगणारा माणूस इटालियन भाषेत बोलत होता. जोनाथनच्या कानावर शब्द येत होते. लँडक्वॉर्ट येथे परवा झालेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या पोलिसाचे आज निधन झाले. ह्या गुन्ह्यासंदर्भात हवा असलेला संशयित अमेरिकन डॉक्टर हा तिथून टेस्सिनला पोहोचल्याचे समजते. त्या ठिकाणी आज सकाळी एका जर्मन उद्योगपतीचा मृतदेह पोलिसांना आढळून आला. जोनाथन खाली बसून त्या बातम्या लक्षपूर्वक ऐकू लागला. दोन वेळा त्याचे नाव उच्चारले गेले होते. डोट्टरे जोनाथन रॅन्सम. सुदैव एवढेच की त्यासोबत त्याचे छायाचित्र नव्हते.

बातमीदार आता हवामानाचा अंदाज सांगू लागला होता; पण जोनाथनचे लक्ष त्यावरून उडाले होते. त्याच्या मनात वेगळाच विचार सुरू झाला होता. ते जेव्हा हॉटेलमध्ये आले होते तेव्हाही व्हरांड्यातल्या टी.व्ही.वर संध्याकाळच्या बातम्या

लागलेल्या होत्या आणि रखवालदाराच्या बारीक नजरेतून ती गोष्ट सुटणं शक्य नव्हते. पोलिसांची शोधमोहीम जर टेस्सिनपर्यंत पोहोचली असेल तर त्यांनी तिथल्या जवळपासच्या प्रत्येक हॉटेलशी संपर्क साधला असेल. त्याचे नाव व वर्णन असलेले फॅक्सही हॉटेलवाल्यांना मिळालेले असतील. इतकंच काय तर, त्याच्याबरोबर एक स्त्री आहे ही गोष्टही त्यांना समजली असणार.

त्याने गॅलरीचा दरवाजा उघडला व बाहेरच्या पावसात पाऊल ठेवले. दूर रस्त्यावर त्याला एका गाडीचे निळे-पांढरे दिवे चमकताना दिसले. तिच्या पाठोपाठ आणखी एक गाडी येत होती.

क्षणभर तो त्या दिव्यांकडे पाहत राहिला. कदाचित त्या गाड्या दुसरीकडे कुठेतरी जात असतील. रखवालदाराला आपला संशय आलेलाही नसेल. त्या गाड्यांचे दिवे पावसामध्ये जास्तच चमकू लागले होते आणि त्याच क्षणी त्याला कळून चुकले की, गाड्या दुसरीकडे कुठेही जात नव्हत्या. त्या अलबर्गो डेल लॅगोच्याच दिशेने येत होत्या. त्यालाच शोधण्यासाठी.

“सीमॉन, आपल्याला पटकन निघायला हवं. पोलीस येताहेत.” तो म्हणाला.

सीमॉनने बाथरूममधून डोके बाहेर काढले. “काय म्हणालास तू पोलिसांबद्दल?”

“आत्ताच टी.व्ही.वरच्या बातम्यातून सगळं सांगितलं गेलंय. रखवालदाराने पोलिसांना फोन केलाय.”

“जोनाथन, जरा धीराने घे. नक्की काय झालंय?”

“आपण दोघं एकत्र आहोत हे त्यांना कळलंय. काही मिनिटातच इथे पोलीस पोहोचतील. आपल्याला ताबडतोब निघायला हवं.”

त्याने अंगावर भराभर कपडे चढवले. पांढरा शर्ट. जांभळा सूट. काश्मिरी ओव्हरकोट आणि कोरे करकरीत बूट. जाताजाता त्याने आरशात एक नजर टाकली. सूट. काळे केस. मधोमध पाडलेला भाग. एम्माने आपल्याला असे पाहिले असते तर तिच्या मनात काय विचार आला असता? मी तर तिला शत्रूच वाटलो असतो. निळ्या सुटातला सैतान. त्याला स्वत:च्याच चेहऱ्याची घृणा वाटली.

तो पुन्हा गॅलरीत आला. गाड्या नक्कीच त्याच्या दिशेने येत होत्या. जेमतेम एक किलोमीटर अंतर उरलं होते. सायरनचा आवाज मोठा होत होता.

“चल. चल.” तो खोलीचा दरवाजा उघडत बाहेर आला.

सीमॉन बूट घालत होती. हातातला ओव्हरकोट सांभाळता सांभाळता ती त्याच्याच अंगावर आदळली. “चल. मी तयार आहे.”

त्यांनी लिफ्टने खाली उतरायचे टाळले. ते जिन्यानेही उतरले नाहीत. पॅसेजच्या टोकाशी एक छोटीशी गॅलरी होती. गाड्या ठेवण्यासाठी असलेल्या मोकळ्या जागेच्या बरोबर वर ती गॅलरी होती. जोनाथन गॅलरीत चढला व त्याने ब्लिट्झची ब्रीफकेस खाली टाकली. बाजूच्या ड्रेनेज पाईपवरून तो सरसर खाली उतरला.

“मला नाही येता येणार.” सीमॉनने वरून सांगितले.

“फक्त पहिलाच तर मजला आहे. हे बघ, मी तुझ्या खालीच उभा आहे.”

“पण मी पडले तर?”

“तू नाही पडणार. ये लवकर. आपल्यापाशी वेळ नाहीये.”

“वाचव रे देवा.” सीमॉन गॅलरीत चढली आणि जास्त विचार न करता तिनेही तो पाईप पकडला व घसरत खाली आली. तीन सेकंदांत काम झाले होते.

“बघ. अवघड होतं का?”

“होतं.”

तिचा हात पकडून तो तिला मुख्य रस्त्यावर घेऊन आला. एकट्या माणसाचा जितका संशय येऊ शकतो तितका एखाद्या जोडप्याचा येऊ शकत नाही हे त्याला आतून कुठेतरी जाणवले. इटलीमधल्या त्या तळ्याचे पाणी प्रकाशाने चमचमत होते. छोट्या बोटी व पडाव नांगर टाकून शांत उभे होते. त्या शांत सरोवराकडे पाहता पाहता त्याचे मनही शांत होत गेले.

पुढच्या दहा सेकंदांत पोलिसांची पहिली गाडी त्यांच्या बाजूने निघून गेली होती.

शहरात पोहोचल्यावर त्यांनी एका टॅक्सीला हात केला व ड्रायव्हरला सांगून ती टॅक्सी डेल्ला नॉन्नामार्गे अॅस्कोनाला वळवली. ब्लिट्झच्या बंगल्यापासून दोन चौक आधी ते टॅक्सीमधून उतरले. पावसाचा जोर मंदावला होता व सारा परिसर अगदी शांत होता. काही घरात मंद दिवे जळत होते. टेकडीच्या उतारावरून पाईन वृक्षांचा सुगंध हवेत पसरला होता. दूर एक कुत्रा भुंकत होता.

“मी गाडी घेऊन येते.” गाडीच्या चावीसाठी हात पुढे करत सीमॉन म्हणाली.

“नको. मला तुझा जीव धोक्यात घालायचा नाही.” तो म्हणाला. “पोलिसांच्या लेखी, तू अस्तित्वातच नाहीस. शेवटपर्यंत त्यांचा तसाच समज राहू देत. तू इथेच थांब. मी दहा मिनिटात परत येतो.”

जोनाथन मर्सिडिजच्या दिशेने चालू लागला. व्हिला प्रिन्सिपेस्साच्या फाटकापासून थेट आतपर्यंत पोलिसांच्या पिवळ्या फिती लागलेल्या दिसत होत्या. बंगल्याबाहेरच्या कच्च्या रस्त्यावर एक पोलिसांची गाडी उभी होती. काल हॉटेलमध्ये त्याने बऱ्याच काळानंतर थोडी शांतता आणि सुरक्षा अनुभवली होती. आता पुन्हा एकदा लपंडाव सुरू झाला होता. आपले धडधडणारे हृदय जरा शांत होण्यासाठी व त्या ‘फरारी’ भूमिकेत परत शिरण्यासाठी तो क्षणभर तसाच उभा राहिला. आत्तापर्यंत परिस्थिती निभावून नेण्यात तो यशस्वी झाला असला तरी हळूहळू मनाचा अस्वस्थपणा वाढत चाललाय, हे त्याच्या लक्षात आले होते. फाशीचा दोर हलकेच खाली येतोय... त्या जाडजूड दोराचा खरखरीत स्पर्श आता आपल्या गळ्याला होतोय... मानेभोवती गाठ आवळली जातेय.

एम्मासुद्धा अशाच मन:स्थितीतून गेली असेल? कोणत्याही क्षणी आपण पकडले जाऊ या भयाच्या सावलीतच ती सतत वावरली असेल? अचानक पाठीमागे पिंजऱ्याचा दरवाजा उघडला जाईल व आपल्याला आत खेचून घेईल याच काळजीने तिचे काळीज अखंड पोखरले जात असेल?

ब्लिट्झच्या बंगल्यापासून तीस मीटरवर त्याने जिथे व जशी ठेवली होती, तिथे व तशीच ती मर्सिडिज उभी होती. रस्ता ओलांडून तो पलीकडे आला. पोलीस गाडीतून खाली उतरतोय हे त्याला डोळ्याच्या कोपऱ्यातून दिसले. नवा सूट व ओव्हरकोट परिधान केलेल्या जोनाथनने क्षणभर थांबून त्याला चक्क अभिवादन केले. हात हलवत

तो त्याच्याकडे बघून मोकळेपणाने हसला. पोलिसाने त्याच्याकडे बराच वेळ रोखून पाहिले व तो पुन्हा गाडीत जाऊन बसला.

जोनाथनने गाडी सुरू केली. पोलीस अधिकाऱ्याच्या समोरून गाडी पुढे नेत त्याने ती उजवीकडे वळवली. दोन चौक गेल्यावर त्याने गाडी थांबवली व आपल्या सहप्रवासिनीला आत घेतले.

"कमालच केलीस तू." गाडीत शिरताना सीमॉन म्हणाली.

"बंगल्यासमोर एक पोलीस उभा होता. त्याच्याकडे पाहून मी हात हलवला."

"पोलिसाला? बापरे. मला वाटतं, तू हाडाचा गुन्हेगार आहेस."

"नाही हं."

गाडी शहरात घुसली आणि स्टेशनच्या दिशेने वळली. गाडीच्या आरशातून त्याला एकदोनदा लुकलुकणारा प्रकाश दिसला. कुणी आपला पाठलाग करतोय का, हे त्याने सीमॉनला पाहण्यास सांगितले. सीमॉनने मागच्या खिडकीतून वाकून पाहिले. दूरपर्यंत रस्ता मोकळा होता. स्टेशनजवळ येताच त्याने आरशातून मागे पाहत पुन्हा एकदा खात्री करून घेतली.

त्याने पार्किंग लॉटच्या मागच्या बाजूस गाडी उभी केली.

"आता आपण एकत्र नाही राहू शकत." तो म्हणाला. "पोलीस प्रत्येक जोडप्याकडे संशयाने बघत असणार."

"मला वाटतं, तू जरा जास्तच विचार करतोयस. त्यांना माझ्याबद्दल कळलंय असं तू कसं काय ठामपणे म्हणू शकतोस?"

"सीमॉन!" त्याने एक उसासा सोडला आणि मग किंचित दबक्या आवाजात म्हणाला. "तू जर सोबत असलीस तर मला सतत तुझी काळजी वाटत राहणार आणि मग जे माझ्या मनात आहे, ते मला नाही करता येणार."

"मला तुझं बोलणं कळतच नाही. मी निघून गेल्याने तुझा असा काय फायदा होणार आहे?" तिने निराश होऊन आपले डोके मांडीवर ठेवले. जोनाथनकडून काहीच उत्तर आले नाही. तिने मान उचलत त्याच्याकडे बराच वेळ रोखून पाहिले. "निदान माझा एक सल्ला तरी मानशील? शक्य तितक्या लवकर हा देश सोडून बाहेर निघून जा. मग एक वकील शोध आणि अगदी नाइलाज झाला तरच परत ये."

त्याने तिचा हात हातात घेतला. "पॉलला माझ्या शुभेच्छा सांग. जिनिव्हाला परतल्यावर मी तुम्हा दोघांना नक्की भेटेन."

"काळजी वाटते रे तुझी."

"माझ्यासाठी प्रार्थना कर."

"तीसुद्धा अपुरी पडेल."

"मग फक्त मला शुभेच्छा दे."

"वेडा आहेस." सीमॉनने वैतागून मान हलवली. आणि मग आवेगाने त्याला घट्ट मिठी मारली. "हे जवळ ठेव. ते कायम तुला सुरक्षित ठेवेल." तिने आपल्या गळ्यातून चामड्याच्या दोऱ्यात अडकवलेले एक छोटेसे पदक काढले. त्यावर एक मूर्ती कोरलेली होती. तिने ते पदक त्याच्या हातात ठेवले. "सेंट ख्रिस्टोफर. प्रवाशांचा पाठीराखा."

“पण त्याला आता कुणी महात्मा मानत नाही.”

“आपलं पटत नाही ते इथेच.” सीमॉन म्हणाली.

जोनाथनने त्या कोरलेल्या आकृतीकडे पाहिले व मग ती साखळी आपल्या गळ्यात घातली. “गुडबाय.”

“अलविदा.”

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो बराच वेळ टक लावून पाहत होता. ती स्टेशनवर पोहोचली तेव्हा तिने हळूच आपल्या डोळ्यांच्या कडा पुसल्या असाव्यात असं क्षणभर त्याला वाटलं.

३८

सीमॉन नॉयरेटने आपली पर्स खांद्यामध्ये अडकवली व ती स्टेशनच्या आत जाऊ लागली. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत लांबलचक आडव्या पसरलेल्या प्लॅटफॉर्मवर फार तर डझनभर माणसे गाडीची वाट पाहत उभी होती. छपरांमधून येणारा बोचरा वारा अगदी हाडांपर्यंत जाऊन झोंबत होता. खिशांमध्ये हात घालत ती गाड्यांचे वेळापत्रक पाहू लागली.

मी माझ्यापरीने पूर्ण प्रयत्न केला, ती स्वत:शीच म्हणाली. त्याला सावध करण्यासाठी जे काही मी करू शकत होते ते मी केले. पण तरीसुद्धा आपण त्याला त्याच्या मार्गावरून परावृत्त करण्यास रोखू नाही शकले. तसा तो एक भला गृहस्थ आहे. आपल्या बायकोच्या वर्तनाचा बिचाऱ्याला कधीच नीट अंदाज करता आला नाही. माझ्या नवऱ्याने माझ्यासाठी एवढं केलं असतं का? नक्कीच नसतं केले. पॉल हा कधीच एक सद्‌गृहस्थ नव्हता. म्हणून तर तिने त्याच्याशी लग्न केलं होतं.

वाऱ्याच्या जबरदस्त झोताप्रमाणे आठ-सहाची आगगाडी स्टेशनात शिरली. दोन इंजीन व वीस डब्यांची ती रिजनल एक्सप्रेस होती. लोकार्नोवरून थेट रिगेन्सबर्गला जाणारी. रिगेन्सबर्ग हे शहर जर्मनीच्या सीमेवर होते. प्लॅटफॉर्मवरची माणसे गाडीत शिरली. सीमॉन त्या सर्व माणसांकडे शांतपणे पाहत होती. सर्वांत शेवटी ती गाडीमध्ये चढली. धुम्रपान करण्याची परवानगी असलेला डबा जवळजवळ निम्मा भरलेला होता. पण तिने चालत दुसऱ्या डब्यामध्ये प्रवेश केला. तिथेही बऱ्याच जागा मोकळ्या होत्या. तिने त्याकडे दुर्लक्ष केले. तिची नजर प्लॅटफॉर्मवर खिळलेली होती. जोनाथन स्टेशनवर आलेला नाही ना याची ती पुन्हा पुन्हा खात्री करून घेत होती. ती चालत चालत आगगाडीच्या शेवटच्या डब्यापर्यंत जाऊन पोहोचली. डब्याचा दरवाजा उघडत व ती पुन्हा प्लॅटफॉर्मवर उतरली.

गाडी स्टेशनातून निघून जाईपर्यंत एकटीच तिथे उभी राहिली.

गाडी अंधारात पार दिसेनाशी झाल्यानंतर ती शांतपणे वळली आणि स्टेशनच्या उपहारगृहात आली. 'ब्रा'च्या आकाराप्रमाणे सजवलेल्या त्या हॉटेलात बऱ्यापैकी गर्दी दिसत होती. बहुतेक सर्व व्यापारी माणसं असावीत. कामावरून घरी परतण्याआधी त्यातले बरेच जण एखाद्या बिअरचा स्वाद घेण्यासाठी तिथे आले होते. ती खिडकीजवळील एका टेबलावर जाऊन बसली व तिने शांतपणे सिगारेट पेटवली.

तिने व्हिस्कीचा एक पेग मागवला. थोड्याच वेळात वेटरने व्हिस्कीचा ग्लास आणला. तिने तो एका घोटातच संपवून टाकला. तिने मग नवऱ्याला फोन लावला व त्याच्याबरोबर जागतिक आर्थिक घडामोडींवर काही काळ चर्चा केली. आपण रात्री एक वाजेपर्यंत डॅव्होसला पोहोचू असेही तिने त्याला सांगितले. "जोनाथन ठीक आहे." ती म्हणाली. "मनाने खूप खचलाय. पण ते साहजिकच आहे म्हणा. बिच्चारा. सगळं काही

मनाला लावून घेणारा. अगदी होता, तसाच आहे. नाही, अंत्यविधीबद्दल अजून काहीच ठरलेलं नाही.”

टेबल थोडंसं सरकलं गेलं आणि एक सडपातळ पण नीटस व्यक्तिमत्त्वाचा माणूस तिच्या समोर येऊन बसला. सीमॉनने त्याच्याकडे जरा चिडूनच पाहिले. “मी इथे बसलेली दिसतेय ना? आजूबाजूला बरीच टेबलं मोकळी आहेत.” सेलफोनवर हात ठेवत ती म्हणाली.

“मला खिडकीशेजारची जागा आवडते.”

त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी तिच्या ओठांवर जळजळीत शब्द आलेही होते; पण तिने ते संयमाने परतवले.

“पॉल. मी आता निघतेय. गाडी आलीय. बाय लव्ह.” सीमॉनने सेलफोन पर्समध्ये ठेवला. समोर बसलेल्या पुरुषाकडे तिने रोखून पाहिले. त्याचे डोळे उदास वाटत होते व त्वचा निस्तेज दिसत होती. एक-दोन सेकंदांहून अधिक वेळ काही ती त्याच्या नजरेला नजर देऊ शकली नाही. “बरोबर आहे तुझे. इथून बाहेरचं दृश्य फार छान दिसतं.” ती म्हणाली. “पण फक्त उन्हाळ्यात मला इथे बसायला आवडतं.”

“मी उन्हाळ्यात झुरिचला असतो.”

सिमॉनने त्याच्याजवळ एक कागद सरकावला. “तो काळ्या मर्सिडिजमध्ये आहे.” ती म्हणाली. “गाडीवरची नंबर प्लेट तात्पुरती बसवलेली आहे. तो गोप्पेनस्टाईनकडे निघालाय. पर्वत ओलांडणाऱ्या तरीपार फेरीमधून तो गाडी नेणार आहे. आपण १०:२१ची कँडेरस्टेगला जाणारी फेरी पकडू असं तो मला म्हणाला.”

‘पिशाचा’ने तो कागद बारकाईने वाचला आणि मग कागदाचे दोन तुकडे करून त्याने ते समोरच्या अॅश-ट्रेमध्ये कोंबले. “आणि तिथून पुढे?”

“झूगला जाणार आहे. त्याच्या मागावर राहाणं, तुला फारसं कठीण जाणार नाही. मी त्याच्या गळ्यात ती वस्तू बांधलीय. ती तुला त्याचा मार्ग दाखवत राहील.”

“हो. त्यामुळे माझं काम खूपच सोपं होणार आहे.” त्याने लायटर पेटवला आणि अॅश-ट्रेमधले कागदाचे तुकडे जाळून टाकले.

“तू आता काय करणार आहेस?” तिने विचारले.

तो काहीच बोलला नाही. आपण आपल्या भावनांवर संयम ठेवू शकलो नाही. याची तिला शरमही वाटली व स्वत:चा रागही आला.

“त्याच्यापाशी एक ब्रीफकेस आहे.” सीमॉनचा आवाज आता कठोर झाला होता. “ती ताब्यात घे. शिवाय त्याच्याकडे एक फ्लॅश पेनड्राईव्ह आहे. त्याच्या उजव्या मनगटावर असलेल्या ब्रेसलेटमध्ये तो दडवलेला आहे. एक गोष्ट आणखी लक्षात ठेव. त्याच्या गाडीला गाडी चिकटवून, त्याचा पाठलाग करू नकोस. ब्लिट्झच्या घरावरून येताना तू आमच्या सतत मागे होतास हे मला पुरतं ठाऊक होतं.”

“तो मी नव्हतो. मी तर पार्किंग लॉटमध्ये वाट पाहत होतो.”

“नक्की?”

त्याचे काळे डोळे तिच्या नजरेला भिडले. “मी तुझे हुकूम पाळत होतो.” तो शांतपणे म्हणाला.

“छान.” सीमॉनने मान डोलावली. “एक गोष्ट सांगायची राहून गेली. त्याच्यापाशी पिस्तूल आहे.”

‘पिशाच’ खुर्चीवरून उठला. “त्यामुळे काही फरक पडत नाही.”

तो निघून गेल्यावर सीमॉन खुर्चीत ऐसपैस बसली. आपले पाय ताणत तिने सिगारेट पेटवली आणि खिडकीबाहेरच्या अंधाराकडे टक लावून पाहू लागली.

३९

Demkeâesvee शहर सोडल्यानंतर खरं तर जोनाथनने आपली गाडी उत्तरेला वळवायला हवी होती. उत्तरेला असणाऱ्या ल्युगानो, एअरोलो व सेंट गोथ्थार्डच्या बोगद्यामधून तो अवघ्या तीन तासांत आपल्या इच्छित स्थळी पोहोचला असता. परंतु त्याने परवाच्या रात्रीप्रमाणे पर्वत मार्गाचाच आश्रय घेतला. गाडीमध्ये मार्गनिर्देशनाची व्यवस्था होती. आपल्याला हव्या असलेल्या स्थळाच्या नावावर त्याने बोट दाबले. पडद्यावर संपूर्ण मार्ग दिसू लागला. ध्वनिमुद्रित केलेल्या आवाजाने त्याला पाचशे मीटर अंतरावर डावीकडे वळण्यास सांगितले. तसा तो डावीकडे वळला. चौपदरी रस्ता हळूहळू दुपदरी होत गेला. समुद्राला एका बाजूला टाकत तो रस्ता व्हर्साझ्का दरीच्या दिशेने वर जाऊ लागला. डोंगरात पोहोचल्यावर वेड्यावाकड्या वळणांचा घाट सुरू झाला. डोंगरमाथ्यावरून चंदेरी ढग खाली उतरत होते. पाहता पाहता मुसळधार पाऊस सुरू झाला. हळूहळू पावसाचे रूपांतर हिमवर्षावात होत गेले आणि गाडीच्या काचांवर हातांच्या मुठी आपटाव्यात तसे बर्फाचे छोटे तुकडे आदळू लागले.

त्याच्या बाजूला ब्लिट्झची ब्रीफकेस पडलेली होती. थॉर प्रकल्प पूर्ण झाल्याचे इव्हा क्रुगरला लिहिलेले पत्र त्याच्या डोळ्यासमोर आले. पत्रातला मजकूर त्याच्या दृष्टीने तसा निरूपद्रवी होता; पण एम्माच्या फ्लॅश ड्राइव्हमध्ये सापडलेला थॉर प्रकल्पाचा उल्लेख मात्र त्याच्या मनावर ओरखडे उमटवून गेला. 'तू कोण आहेस?' ह्या हॉफमनच्या प्रश्नात त्याला चीड जाणवली नव्हती. उलट हॉफमनच्या मनात उडालेला थरकाप मात्र त्याला स्पष्ट ऐकू आला होता.

जोनाथनलाही तोच प्रश्न स्वत:ला विचारायचा होता. तोच मुखवटा त्यालाही भीतिदायक वाकुल्या दाखवत होता. पद्धतशीर योजना. खोटारडेपणा. फसवेगिरी कधीपासून हे सुरू होते? एम्माला जाब विचारावासा वाटत होता. ह्या सर्वांची नेमकी केव्हा सुरुवात झाली? माझ्यापाशी तू किती वेळा खोटे बोललीस? आणि मुख्य म्हणजे मला हे कधीच कसे नाही उमगले?

त्याने हीटर सुरू केला. उबदार हवेबरोबरच एक परिचित गंध त्याच्या नाकात शिरला. व्हॅनिला आणि चंदन. नकळत त्याची नजर मागच्या सीटकडे गेली. मागची सीट अर्थातच रिकामी होती. पण क्षणभरापुरते का होईना, त्याला एम्माचे अस्तित्व नक्कीच जाणवले होते. तिच्या केसांचा सुगंध त्याने हुंगला होता.

"मला एका गोष्टीची कबुली द्यायचीय." एम्मा म्हणत होती. "मी तुला आलेली पत्रं चोरून वाचली."

ऑगस्ट महिना. रविवारची सकाळ. प्रवास करत ते सनायाला पोहोचलेत. जॉर्डन व इराकच्या पूर्वसीमेवर वसलेलं ते गाव. काही दिवसांपुरते तिथे त्याला बोलावून घेण्यात आलेय. एम्माचा एक सहकारी डॉक्टर अचानक अॅपेंडिसायटिसच्या त्रासामुळे हॉस्पिटलमध्ये दाखल झालाय. त्याच्या जागी जोनाथन तीन दिवसांसाठी येऊन पोहोचलाय. काम तसं किरकोळच आहे. सर्दी, संसर्गजन्य रोग, लहानसहान जखमा या सर्वांवर उपचार करणे.

सकाळची वेळ आहे. एक मोठी चादर पसरलीये. त्यावर दोघेही एकमेकांच्या शेजारी लोळत पडलेले आहेत. उघड्या खिडकीमधून उबदार वाऱ्याची झुळूक येतेय. बाजूच्या मशिदीतून मुल्लाने दिलेली बांग कानावर पडतेय. बऱ्याच दिवसांनी त्यांना हवा तसा एकांत मिळालाय. त्यांनी प्रणयाच्या नव्या तऱ्हा शोधून काढल्या आहेत. पहाटे-पहाटे समागम साधायचा. मग एक छान डुलकी घ्यायची आणि पुन्हा एकमेकांच्या मिठीत विरघळून जायचे.

पॅरिस तर पार विस्मृतीत गेलेय. डोकेदुखीही पळून गेलीय. आता आढ्याकडे नजर वळतही नाही.

“अच्छा. म्हणजे माझी पत्रं चोरून वाचलीस तर,” जोनाथन म्हणतो. “काहीतरी सनसनाटी हाती पडलेलं दिसतंय?”

“ते आता तूच सांग.”

“माझ्या फिनलंडमधल्या मैत्रिणीने पाठवलेलं पत्र?”

“तू आयुष्यात कधी फिनलंडला गेलेलाच नाहीस.”

“मग मी लपवून ठेवलेले ‘प्ले बॉय’चे अंक?”

“हॅट!” ती म्हणते व सरकत त्याच्या बाजूला येत एकदम त्याच्या पोटावर बसते. “तू कधीच आंबटशौकिन नव्हतास.”

“हरलो बुवा.” जोनाथन म्हणतो. त्याचे हात तिच्या ओठांवरून व स्तनांवरून मुक्त संचार करू लागलेले असतात. तो हळूहळू उत्तेजित होत असतो. “मग काय?”

“माझा डोळा खीर खातो. चल, मी तुला काही संकेत देते. वुलेवु कुशेर आवेक मुआ?” तिचे उच्चार म्हणजे त्याला कानांवर अत्याचार वाटतो. जणू काही पेन्झान्स मार्गे पॅरिस.

“आत्ताच केलं ना आपण? निदान मला तरी केल्यासारखं वाटलं.”

एम्मा गदागदा डोकं हलवते. “आ--- वी वी.” ती खट्याळपणे म्हणते “अ-ज टेम. पेपेल प्यु. मानिफिक.”

“तुला पेपे ल प्यु आवडतं? मी एका ठार वेडीशी लग्न केलंय हे मला आज समजलं.”

“नाँ नाँ. फ्रोमाज. डक आ लोरांज. पेटिसरी.”

“तुला फ्रेंचमध्ये बोलायचंय का? मग आधी तू ‘गाईड मिकेलिन’ वाच.”

एम्मा आता खुशीत येऊन टाळ्या पिटतेय. तिचे डोळे चमकू लागलेत. तो सुद्धा बहरात येऊ लागलाय. “अं... क्राईस्क... रग... जिन काल्व्हिन... फाँड्यू.” ती स्वतःच्याच नादात भरकटत चाललीय.

अचानक जोनाथनची ट्यूब पेटते. नुकतेच आपल्याला आपल्या हॉस्पिटलमधून पत्र आलेय हे त्याला आठवते. ती त्यासंबंधी बोलतेय. जिनिव्हाच्या मुख्य ऑफिसची जबाबदारी घेणार का? त्याच्या बॉसने विचारलेले असते. “आत्ता आलं लक्षात.”

“म्हणे आलं लक्षात! वेंधळा कुठचा.” अंगावरून खाली उतरत, ती त्याच्या कुशीत शिरते. “किती छान बातमी आहे. तू काही सांगायला तयार नव्हतास.”

“ती बातमी तुला छान वाटली?”

“आपण जाऊ या. आत्तापर्यंत खूप राब राब राबलो.”

“जिनिव्हा? तिथे आमचं व्यवस्थापन केंद्र आहे. दिवसभर मला एका टेबलखुर्चीवर बसून राहावं लागेल.”

“पण तुला तर ते बढती देताहेत. अफ्रिका आणि अरब देशामधल्या तुमच्या कामाची सर्व जबाबदारी तुझ्यावर सोपवली जाणार आहे.”

“मी एक डॉक्टर आहे. मी रुग्णांबरोबर असण्याची गरज आहे.”

“हे कायमचं थोडंच आहे. शिवाय तुलाही नेहमीच्या धावपळीतून जरा आराम मिळेल.”

“आराम कसला? मी माझं कामंच विसरून जाईल.”

“जरा विचार कर, तिथे तुला स्वतःच्याच व्यवसायाकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहता येईल. तुला खूप काही नवं शिकता येईल. तू सुटाबुटात इतका गोड दिसशील. कमालीचा देखणा!”

“हो. दिसेन खरा. मग तू मला एखाद्या क्लबची मेंबरशिप घ्यायला लावशील आणि मी गोल्फ खेळायला लागेन.”

“डॉक्टरांनी काय गोल्फ खेळू नये?”

जोनाथनने तिच्या डोळ्यात खोल रोखून पाहिले. तिच्या मनात काही वेगळेच असावे. एम्मा हाताच्या कोपरांवर रेलून बसली. “आणखी एक कारण आहे.”

“काय ते?”

“मलाही तिथे जावंसं वाटतंय. इथल्या उजाड आयुष्याचा कंटाळा आलाय. खूप मरमर केली. आता जरा त्या सफेद टेबलक्लॉथ घातलेल्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन शाहीखाना खायचाच. स्वच्छ ग्लासात ओतलेली वाईन प्यायचीय. नट्टापट्टा करून चेहरा रंगवायचाय. मस्त ड्रेस घालायचाय. का? ऐकायला त्रास होतोय?”

“तू आणि ड्रेस घालणार? शक्य तरी आहे का?” अंगावरची चादर बाजूला सरकवत जोनाथन कॉटवरून खाली उतरतो. असली चर्चा त्याला कधीच आवडत नाही. “सॉरी, मला ते काम करायला आवडणार नाही.”

“प्लीज.” एम्मा म्हणते. “विचार तर करून बघ.”

तो वळतो. त्याच्या बायकोने अंगाभोवती पांढरी चादर गुंडाळलेली असते. तिचे गाल उन्हाने रापून रखरखीत झालेले असतात. तिचे तांबूस केस राठ दिसत असतात. हनुवटीवरची जखम भरता भरत नसते.

जरा विचार तर करशील...

जिनिव्हातील प्रत्येक सकाळ विलक्षण प्रसन्न असेल. मनमुराद मजा करता येईल. केवळ चर्चा करत न बसता, प्रत्यक्ष पाळणा हलण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू होतील. शिवाय गिर्यारोहण. उत्तरेला केवळ दोन तासांवर केमॉनिक्सचं शिखर तर पूर्वेला जवळच ओबर्लंड. दक्षिणेला डोलोमाईट्स.

“बघू या.” खिडकीचा पडदा बाजूला सारून बाहेरच्या रुक्ष देखाव्याकडे बघत तो म्हणतो. “पण म्हणून उगाच आत्तापासूनच स्वप्न रंगवायला सुरुवात करू नकोस.”

मशिदीबाहेर सकाळच्या नमाजासाठी तुरळक माणसे जमा झालीत. जो तो अरब रिवाजाप्रमाणे गालावर गाल घासत एकमेकांना आलिंगन देतोय.

“बिछान्यातून बाहेर पडायचा विचार आहे ना?” तो मागे न वळता तिला विचारतो. “हवं असेल तर मी बाहेर जाऊन तुझ्यासाठी नाश्ता...”

त्याच क्षणी त्याला एक सुसाट वेगाने येणारी गाडी दिसते. गाडी येण्याचा काही संबंधच नसलेल्या ठिकाणी येत असलेली एक गाडी. टायरमधून धुळीचे लोट उडवणारी. त्या खडबडीत पठारावर दणके देत वर-खाली होणारी. खिडकीच्या काचेमागे दोन फिकट आकृत्या.

“बाजूला व्हा.” तो माणसांना सावध करू बघतो. पण त्याचा आवाज पोहोचत नाही. तो जिवाच्या आकांताने पुन्हा ओरडतो, “पळाऽ बाजूला व्हा, लवकर.”

गाडी बेफामपणे गर्दीत घुसते. माणसे हवेत फेकली जातात. टाहो. किंकाळ्या. बंदुकीच्या गोळ्यांचे सुसाट आवाज. तो असहायपणे पाहत राहतो. मशिदीची भिंत फोडत, गाडी आरपार आत शिरते. दगड-विटा वाळूंनी आसमंत भरून जातो. एक क्षण भयाण सन्नाटा पसरतो. मनातल्या मनात त्याने आकडे मोजायला सुरुवात केलेली असते...

एक प्रकाशझोत.

इतका प्रखर की डोळ्याचा पडदा फाटून जावा.

दुसऱ्या सेकंदाला प्रचंड धमाका. कानठळ्या बसवणारा गगनभेदी गडगडाट. त्याला डोळे मिचकावतादेखील येत नाहीत. फक्त एकच स्फोट नव्हे, लागोपाठ तीन.

जोनाथन कॉटवर उडी घेतो. एम्माला घट्ट मिठी मारतो. खिडक्या हादरून जातात. काचांचा खच पडतो. खिडकीचा पडदा वाऱ्यावर तरंगतोय. खोलीत धूळ आणि वाळू पसरलीय.

“मोटार-बॉम्ब,” आवाज कमी होत गेल्यावर त्याच्या तोंडून कसेबसे शब्द फुटतात. “त्यांनी ती गाडी थेट मशिदीत घुसवली.”

तो सुन्न झालाय. कसाबसा उठतो. केसातील धूळ झटकतो. एम्मा स्वतःला कॉटवरून घसरवत खाली आणते. चटकन कपडे चढवते. जोनाथन आपली औषधांची बॅग शोधू लागतो. एम्माने ती अगोदरच त्याच्या समोर आणून ठेवलेली असते. त्यात ती बँडेजेस, अँटिसेप्टिक्स, गोळ्या भरते. तो तिच्या बाजूला येऊन भराभर हव्या असलेल्या औषधांची नावे सांगू लागतो. नव्वद सेकंदांत त्याची बॅग तुडुंब भरलेली असते.

आकाशात काळ्या धुरांची वलयं पसरलेली असतात. मशीद उद्ध्वस्त झालेली असते. स्फोटामुळे त्या वास्तूचा आकार विद्रूप होऊन गेलेला असतो. फक्त पायथा तेवढा उरलेला असतो. कागदाच्या तुकड्यांचा आणि सिमेंटच्या ढेकळांचा वर्षाव होत असतो.

मोटारीच्या सांगाड्यापाशी येऊन जोनाथन थबकतो. त्याच्या पायाखाली बुटांचा एक जोड जळत असतो. एका तुटलेल्या हातात कुराणाची प्रत अजूनही घट्ट पकडलेली असते. बाजूला एका माणसाचे अर्धे धड पडलेले असते. सगळीकडे जळके मांस व रक्ताची थारोळी. वाचलेली माणसे वाट फुटेल तेथे खुरडत धावण्याचा प्रयत्न करत असतात. त्यातली काही विव्हळत त्याच्यापाशी येऊ लागतात. जळणाऱ्या पेट्रोलचा आणि जळक्या मासांचा वास सहन करणे असह्य होऊन जाते.

“तिकडे बघ.” एम्मा म्हणते. तिचा आवाज कणखर असतो. पाठीवर निपचिप पडून राहिलेल्या एका तरुणाच्या बाजूला ती उभी असते. त्याचा चेहरा
रक्तबंबाळ झालेला असतो. छातीतले मांस बाहेर आलेले असते. पण जोनाथन त्याच्या पायाकडे पाहत असतो. तुटलेले हाड पँटमधून बाहेर डोकावत असते. तीन-चार ठिकाणी तरी हाड मोडलेले असणार.

“हलू नकोस.” जोनाथन अरबी भाषेतून त्याला सांगतो. “तसाच पडून राहा.” मग एम्माला म्हणतो. “मी एखादी लाकडी पट्टी शोधतो. तो अजिबात हलणार नाही याची दक्षता घे- नाहीतर त्याच्या मांडीतील नस फाटून जाईल.”

एम्मा त्याचे खांदे पकडून ठेवते. जोनाथन त्याच्या पायाला पट्टी जोडतो. उपचारांची गरज असते. कुणावर उपचार करायचे या त्याच्या निर्णयावर प्रत्येकाचा जीवन-मृत्यू ठरणार असतो.

“ठीक आहे.” तो एम्माकडे पाहून म्हणतो.

“काय ठीक आहे?”

“जिनिव्हा. आपण तिथे जायचं.”

“खरंच?”

“ते सफेद टेबलक्लॉथ आता मला फारच सुंदर दिसताहेत.”

घाट सुरू झाला होता. एकेक वळण पार करत आता जोनाथन ब्रिगच्या दिशेने जाऊ लागला. रात्रीचे पावणेदहा वाजले होते. बाहेरचे वातावरण कमालीचे थंड झाले होते -३ष्ट सेल्सियस, किंवा २७ष्ट फॅरनहाईट. तापमानाचा काटा दोन्ही परिमाणं दाखवत होता. एक अवघड वळण घेत असताना क्षणभर गाडीचे टायर्स रस्ता सोडून खाली जाऊ लागले; पण वेळीच सावरून पुन्हा रस्त्यावर आले. रस्त्यावर बर्फ साचू लागला होता.

इतक्या खराब हवामानातही त्याचा वेळ मजेत गेला होता. अपेक्षेप्रमाणे अल्पाईन रस्त्यावर फारशी रहदारी नव्हती. समोरून फक्त सहा गाड्या निघून गेलेल्या त्याने मोजल्या होत्या. त्यातली एकही पोलिसांची गाडी नव्हती. अनेकदा त्याच्या गाडीमागे

दिवे चमकले होते; पण एक तर ती गाडी रस्त्यावरून चुकून खाली उतरलेली असायची किंवा गाडी चांगल्या स्थितीत राखलेली नसायची. ध्वनिमुद्रित आवाज आला. आता फक्त अडतीस किलोमीटर अंतर उरले होते.

त्याची बढती एम्मामुळेच झाली होती. एम्माने ते काम स्वत: नसेल केलेले पण ज्यांच्यासाठी ती काम करत होती, त्या माणसांकरवी ते काम करण्यात आले होते. तिचे वरिष्ठ. अर्थ स्पष्ट होता. DWB मध्ये हवा असलेला माणूस त्यांना आणायचा होता.

यामागचा सूत्रधार कोण होता? माझ्या व्यवस्थापकीय खात्यातला? एखादा उपसंचालक? का स्वत: संचालकच तो आठवू लागला. त्यांच्यामधला एक सोमाली होता, दोन ब्रिटिश आणि एक स्विस.

एखादा अमेरिकन असता तर कदाचित अधिक सोपे गेले असते? जोनाथन कोड्यात पडला. एम्माच्या स्वामीनिष्ठेचा प्रश्न त्याला सोडवता येईना. अमेरिकेच्या हस्तक्षेपाने उलट प्रश्न अधिक किचकट बनला असता. 'जगातल्या सर्वोच्च लोकशाही' राष्ट्राची ती ठाम विरोधक होती. देशाची सीमा वाढवत नेणाऱ्या साम्राज्यशाहीचा, अनेक राष्ट्रांना आपल्या पंखांखाली घेणाऱ्या व्यक्तीनिष्ठतेची भलावण करणाऱ्या आणि हीन पातळीवरचे क्षुद्र राजकारण खेळणाऱ्यांवर तिचा मुळीच विश्वास नव्हता.

जर ती अमेरिकेसाठी काम करत नव्हती तर मग कोणासाठी करत होती? ब्रिटिशांसाठी? इस्त्राइलींसाठी? फ्रेंच लोकांना आपल्या हेरखात्याचा केवढा अभिमान होता. ते म्हणत असत की आम्ही एका छोट्याशा चकतीने 'रेनबो वॉरियर'ची बोट ऑकलंडच्या बंदरात बुडवली होती. त्याचे अंग शहारले. तिची काय, कुणासाठीही काम करायची तयारी असणार. तिच्या लेखी राष्ट्र महत्त्वाचे नव्हतेच. तिला तिच्या आदर्शांचा अभिमान होता.

एम्मा आणि तिची प्रत्येक ठिकाणी नाक खुपसायची वृत्ती.

गाडीच्या काचांवर बर्फाचा थर जमला होता आणि समोर गोठून गेलेली रात्र गडद होत चालली होती. जोनाथनच्या डोळ्यासमोर मात्र मशीद उद्ध्वस्त करणारा आगीचा लोळ उभा राहिला होता. स्फोट होण्यापूर्वी काही मिलिसेकंद उसळलेला तो पिवळाधम्मक प्रकाश. डोळ्यांना ठार आंधळे करणारा.

तो मोटारीचा बॉम्बसुद्धा त्यांच्याच योजनेचा एक भाग होता? त्या अखरेच्या प्रश्नाचे उत्तर जर 'हो' आले तर त्याच क्षणी त्याचा निर्णय पक्का होणार होता. उत्तरासाठी त्याने एम्मापाशी गयावया केली. पण त्याचा आता तिच्याशी संपर्क तुटलेला होता.

त्या संभ्रमित अवस्थेत, त्याला फक्त शांततेचा आवाज ऐकू येत होता.

४०

मार्क्स व्हॉन डॅनिकनने हातातली फाईल टेबलावर फेकली. “मला हवी तेवढी माणसं नाही मिळाली.” तो म्हणाला. “पण तुम्ही पुरेसे आहात.”

टेबलाभोवती बसलेल्या चौघांवर त्याने एकवार नजर फिरवली. त्यातले कुणीही गेल्या छत्तीस तासांत एक मिनिटही झोपले नव्हते. बाजूला पडलेले रिकामे कॉफीचे अनेक कप त्यांच्या मरगळलेल्या अवस्थेची साक्ष देत होते. डोक्यावर असलेले भगभगीत प्रकाशांचे दिवेदेखील त्यांचे चेहरे उजळवू शकत नव्हते.

मायर, क्रॅजेक आणि सायलर या त्याच्या तीन भरवशाच्या शिलेदारांसोबत त्याने या वेळेस क्लॉस हार्डन्बर्गची नवीन साथीदार म्हणून निवड केली होती. हार्डन्बर्ग हा आर्थिक गुन्हेगारी विभागातला अनुसंधक होता. त्यांनी आपल्या या नव्या गटाचे ‘टास्क फोर्स’ असे नामकरण केले होते. केवळ याच माणसांचा सहभाग असलेल्या छोट्याशा गटाला ‘टास्क फोर्स’ म्हणवून घेणे हा एक विनोदच होता. पण या नावामुळे त्यांची एक मोठी सोय होणार होती. खूप वेळ काम करण्यामागचे कारण ते आपल्या कुटुंबीयांना सांगू शकत होते. आपल्या कामाचे स्वरूप मात्र त्यांच्यासमोर उघड करण्यास त्यांच्यावर मनाई होती.

प्रत्येक जण आपापल्या कामात वाकबगार होता, पण म्हणून त्यांची तोंडावर भरभरून स्तुती करायचा, डॅनिकनचा स्वभाव नव्हता.

“तुमच्या मनात असलेल्या प्रश्नांपासून आपण सुरुवात करू या.” खुर्चीत बसत तो म्हणाला. “जे काही तुमच्या मनात खदखदत असेल ते बोलून मोकळे व्हा.”

बघता बघता प्रश्नांचा भडिमार सुरू झाला. लॅमर्सला कुणी मारले असेल? गॅसनमध्ये व ब्लिट्झ क्विताबमध्ये नेमका कोणत्या प्रकारचा संबंध होता? जर क्विताब हा इराणी अधिकारी असेल तर आपल्या मित्रसंस्थांना त्याचे नाव कळवणे जास्त योग्य होणार नाही का? त्यामुळे आपल्याला त्याची पूर्वपीठिका समजू शकते. बालिद गॅसनने दिलेल्या कबुली जबाबाव्यतिरिक्त त्यांचे व लॅमर्स आणि ब्लिट्झचे संबंध प्रस्थापित करणारा आणखी काही पुरावा हाती आलाय का? एक महिन्यापूर्वी गॅसन हा स्वित्झर्लंडच्या विमानतळावरून पुढे गेला होता. त्यासंबंधीची काही माहिती मिळालीय का? कुठल्या विमानतळाला ‘लक्षय’ करण्याचा अधिक धोका आहे? आणि त्या अमेरिकन रॅन्समचे काय झाले? तो ह्या सगळ्या प्रकरणात नेमका कुठे बसतो? लँडक्वॉर्टला त्याने मारलेल्या दोन पोलिसांबाबत काही अधिक माहिती मिळालीय का? ज्या दिवशी आपली बायको मेली त्याच दिवशी त्याने खास वेळ काढून लॅमर्सलाही कशावरून मारले नसेल?

अखेरचा आणि महत्त्वाचा प्रश्न : ह्या प्रकरणात मार्टी एवढा आडमुठेपणा का दाखवतोय?

व्हॉन डॅनिकन त्यातल्या एकाही प्रश्नाला उत्तर देऊ शकला नाही. त्यांच्यापैकी

कुणालाही त्या कारस्थानाची किंवा कारस्थान रचणाऱ्यांची काहीही माहिती नव्हती.

शेवटी सर्व जण एकाच मुद्यावर आले : करण्यासारखे खूप काही आहे व त्यासाठी वेळ मात्र खूपच कमी आहे.

व्हॉन डॅनिकनने त्या सर्व प्रश्नांची चार विभागांत विभागणी केली. आरोपींचे आर्थिक व्यवहार, आरोपींनी परस्परांशी संपर्क साधण्यासाठी वापरलेली साधनव्यवस्था, घडलेल्या घटनांचा प्रत्यक्ष शोध आणि आरोपींनी वापरलेली वाहतूक यंत्रणा. ह्यापैकी आर्थिक व्यवहारांच्या तपासणीची जबाबदारी त्याने स्वत:वर घेतली. हॉलोकॉस्ट कमिशनच्या अनुभवामुळे त्याचा बँकिंग व औद्योगिक क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींशी परिचय झाला होता.

"आपण व्हिला प्रिन्सिपेस्सापासून सुरुवात करू या." तो म्हणाला. "हँबर्गमधली ती काही साधीसुधी वस्ती नव्हे. तिथे घर बांधणारी व्यक्ती मालदारच असायला हवी."

ती जागा आधी कुणाच्या मालकीची होती? किती वर्षे तो त्या जागेचा मालक होता? त्याला कोणत्या मार्गाने पैसे मिळाले? ह्यातली गोम अशी होती की, त्यामुळे ब्लिट्झने कोणत्या बँकेमार्फत हा व्यवहार केला होता ते समजणार होते. सर्व धाग्यांमध्ये हाच धागा, त्यांच्यासमोर अनेक दरवाजे उघडणार होता. एकदा का ब्लिट्झच्या दैनंदिन व्यवहाराचे बँक खाते समजले असते की, त्या खात्यात कुठून पैसे जमा होत होते हे समजणेही सहज शक्य होणार होते. तितकेच महत्त्वाचे म्हणजे जमलेल्या पैशांना नंतर कुठे वाटा फुटत होत्या हेही त्यामुळे उघड होणार होते. ब्लिट्झला पैसे पुरवणारी कुठली संस्था किंवा कुठले सरकार होते, त्याचेही नाव आपोआपच स्पष्ट झाले असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याचे साथीदारही त्या जाळ्यात आपोआप अडकणार होते.

क्लॉस हार्डन्बर्ग हा त्या चौकशीच्या दुसऱ्या भागावर लक्ष केंद्रित करणार होता. त्यांचे सर्व उधारीवरचे आर्थिक व्यवहार. व्हॉन डॅनिकनने क्लॉसला बजावले की ब्लिट्झ, लॅमर्स व रॅन्सम ह्यांच्या गेल्या बारा महिन्यांतील केल्या गेलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या नोंदप्रती त्याने ताबडतोब मिळवायला हव्यात. त्यामुळे गेल्या वर्षभरात त्यांनी कोणकोणत्या ठिकाणांहून व्यवहार केले होते व त्यांच्या दैनंदिन कार्याचे स्वरूप काय होते हे समजण्यास मदत होणार होती.

लॅमर्सची माहिती मिळवणे सर्वांत सोपे होते. त्याच्या पाकिटात पाच क्रेडिट कार्डे सापडली होती. शिवाय स्थलांतराच्या भीतीमुळे त्याची बायकोही पोलिसांच्या चौकशीला पूर्ण सहकार्य देत होती.

ब्लिट्झच्या बाबतीत मात्र वेगळीच गोष्ट होती. त्याच्या घरी, त्याचे पाकीट किंवा अन्य काही ओळखपत्रे सापडली नव्हती. पण केवळ नशिबानेच त्याच्या युरोकार्डचे डिसेंबर महिन्याचे स्टेटमेंट ऑफिसमधील एका कपाटाखाली सापडले होते. त्या कार्डावरून ब्लिट्झचे बँकेचे व्यवहार उघड होणार होते. शिवाय त्याचा राष्ट्रीय ओळख क्रमांकही मिळणार होता.

रॅन्समची केस अजून पोलिसांच्याच हातात होती. स्थलांतरण कार्यालयातून नुकतीच त्याची पूर्ण माहिती समजली होती. त्याचा पासपोर्ट क्रमांक व सार्वजनिक सुरक्षा क्रमांकाची छाननी इंटरपोलने पूर्ण करून ते पुढच्या कारवाईसाठी राष्ट्रीय गुन्हा अन्वेषण विभागाकडे पाठवून दिले होते.

संपर्काबाबतची चौकशी मायरवर सोपवली गेली. अस्कोनाहून परतल्यावर त्याने आपले कामही सुरू केले होते. “गेल्या सहा महिन्यांत ब्लिट्झच्या घरातून केल्या गेलेल्या सर्व कॉल्सची यादी स्विसकॉम तयार करतेय.” त्याने माहिती पुरवली. “त्याच काळातल्या लॅमर्सच्या कॉल्सची यादी आम्हाला मिळलीय. त्या दोन्ही एकमेकींशी पडताळून पाहिल्यावर त्यांच्या समान मित्रांची नावं समजू शकतील. मग आम्ही आणखी एका वरच्या पातळीवर जाऊन त्या साथीदारांनी केलेल्या कॉल्सचीही तपासणी करणार आहोत. सकाळी सातपर्यंत आमच्या हातात पहिली यादी आलेली असेल.”

“छान.” व्हॉन डॅनिकन खूश होऊन म्हणाला. टेलिकम्युनिकेशन्स कंपन्यांनी, आपल्याकडील प्रत्येक नोंदणीकृत क्रमांकावरून केल्या गेलेल्या मागील सहा महिन्यांच्या कॉल्सची यादी राखून ठेवण्यासंबंधीचा जो कायदा केला गेला, त्यात त्याचा मुख्य सहभाग होता. “दोन्ही याद्या जुळवून पाहिल्यानंतर तुम्ही त्या प्रत्येक नंबरची वेगवेगळी तपासणी करा आणि त्यात काही समान नावं मिळताहेत का याचा शोध घ्या. जर ते सिमकार्ड वापरत असतील तर ती सिमकार्ड्स कुठून विकत घेतली तेही शोधा.”

“मला खात्री आहे, नावं नक्कीच सापडतील.” मायर म्हणाला.

“त्यांनी किती सावधगिरी बाळगली होती यावर सारं अवलंबून आहे. पण शेवटी प्रत्येकाच्या हातून एक तरी चूक होतेच.”

“त्यांनी विदेशी टेलिकॉम्सचा आधार घेतला नसावा एवढीच आपण आशा बाळगू या.” व्हॉन डॅनिकन म्हणाला.

क्रॅजेकच्या कपाळावर आठ्या पसरल्या. “मुख्य म्हणजे जर्मन कंपनी न निघो.”

जर्मनीइतका आपल्या राष्ट्राच्या नागरिकांचा खाजगीपणा दुसऱ्या कुठल्याही राष्ट्रात जपला जात नव्हता.

अर्थ व संपर्क विभागातली चौकशी परस्परांच्या सहकार्याने होणार होती. एकदा का संशयितांचे आर्थिक व्यवहार उघडकीस आले की, संबंधित व्यक्तींचे फोन नंबर्स मायरकडे पाठवले जाणार होते. प्रत्येक कॉल कॉंप्युटरमध्ये नोंदला जाणार होता. त्या प्रत्येकाची माहिती संगणकामधून मिळणार होती व त्यातून लॅमर्स आणि ब्लिट्झच्या आर्थिक व सामाजिक आयुष्यावर प्रकाश पडणार होता.

व्हॉन डॅनिकनने मधल्या वेळात आणखी एक कॉफीचा कप हातात घेतला होता. त्यात साखरेचे दोन तुकडे व थोडेसे लिंबू पिळून, दोन घोटांत तो कप रिकामाही केला होता. हळूहळू दिसणाऱ्या आशेच्या किरणांबरोबरच त्याचा थकवाही पळून चालला होता. निदान आत्ता तरी कोडे उलगडणे शक्य वाटू लागले होते.

त्याने कॉफीच्या रिकाम्या कपाकडे पाहिले. कदाचित कॉफीमुळेही त्याला उत्साह वाटत असावा.

टेबलावर थाप मारत त्याने पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधून घेतले. “उद्या सकाळी क्रॅजेक आपल्या जिनिव्हा, बसेल व झुरिचमधल्या एजंटांना जाऊन भेटेल. बरोबर?”

“अर्थात.”

गेली तीन वर्षे सातत्याने ‘सॅप’ने देशातल्या महत्त्वाच्या मशिदींमध्ये आपले गुप्तहेर पेरून ठेवले होते. ते सर्व कार्यकर्ते होते. मूलतत्त्ववाद्यांनी आपल्या धर्मावर घाला घातलाय अशा समजुतीने मुस्लीम समाज मनातून चिडला होता. काही जण असे काम

करायला नाखूश होते; पण देशातून हकालपट्टी होण्याच्या भीतीने त्यांच्यासमोर दुसरा पर्याय उरलेला नव्हता. पण त्यामुळे मशिदीत AK-47, RPG यांचा साठा असल्याच्या खबरी मिळाल्या होत्या. हवाला रॅकेट पकडले गेले होते. फ्रान्स, स्वित्झर्लंड व इटलीमधून होणाऱ्या अतिरेक्यांच्या हालचालींचा सुगावा लागला होता.

"जिनिव्हामधल्या प्रवासात गॅसनबरोबर कोण होता हे हुडकून काढ." व्हॉन डॅनिकन म्हणाला. "मला संबंधित व्यक्तींची नावं हवी आहेत. तो कुठेकुठे गेला होता, त्याने काय षडयंत्र रचलं, त्यामागे काय हेतू होता याची पूर्ण माहिती हवी आहे."

क्रॅजेक ते सर्व आपल्या डायरीत झरझर उतरवून घेत होता.

व्हॉन डॅनिकन आता पुढच्या विभागाकडे वळला. "आणि आता तुझ्यावरची जबाबदारी, मिस्टर हार्डन्बर्ग..."

हार्डन्बर्गने हसण्याचा केविलवाणा प्रयत्न केला; पण पोटातून प्रचंड कळ येत असल्यासारखा त्याचा चेहरा वेडावाकडा झाला. तो जाडजूड, मध्यमवयीन गृहस्थ होता. डोळ्यावर जाड भिंगाचा चश्मा होता आणि डोक्याचा तुळतुळीत गोटा झालेला होता. पण एखादी गोष्ट शोधून काढण्याच्याबाबतीत त्याच्याइतका हलकट माणूस डॅनिकनच्या पाहण्यात कुणी आला नव्हता. त्याला कुठूनही कुत्र्यासारखा वास यायचा आणि तो हुंगत हुंगत प्रत्येक जागा पिंजून काढायचा. म्हणून तर त्याला 'रॉटवायलर' हे टोपणनाव मिळाले होते. रॉटवायलर ही शिकारी कुत्र्यांमधली सर्वांत कुशाग्र जात समजली जाते.

"गॅसन, प्लॅस्टिकची स्फोटकं ज्यामधून लिपिझपर्यंत घेऊन गेला ती व्होल्क्सवॅगन शोधायची जबाबदारी तुझ्यावर असेल. माझं मन सांगतंय की, त्याच व्हॅनमधून ते ड्रोनही घेऊन जाणार आहेत. तू व्हॅनचा शोध घे. माणसं शोधण्याची जबाबदारी आमची."

मोठ्या कामासाठी दिलेली ती फारच छोटी सूचना होती. हार्डन्बर्गने घसा खाकरला व मान डोलावली. एक शब्दही न बोलता तो उठून उभा राहिला आणि तडक खोलीबाहेर पडला. तो घरी जायला निघाला असेल असा विचारही कोणाच्या मनात आला नाही. गाड्या भाड्याने देणाऱ्या कंपन्या, मोटारविक्री करणाऱ्या कंपन्या किंवा सर्व सरकारी एजन्सी एवढ्या रात्री उघड्या असणे शक्यच नव्हते. पण आजची अख्खी रात्र हार्डन्बर्ग आपल्या टेबलापाशी बसून काढणार होता. उद्या सकाळी त्या कंपन्यांची दारे उघडण्याआधीच आपण हल्ल्याची सुरुवात कुठून करायची याची योजना त्याच्या डोक्यात पक्की झालेली असणार होती.

आता पाळी होती मॅक्स सायलरची. त्याच्यावर दुहेरी जबाबदारी होती. लॅमर्सच्या सर्व पासपोर्टसवर असणाऱ्या आगमन व निर्गमनाच्या शिक्क्यांवरून तो वारंवार कुठल्या देशांना भेटी देत होता हे शोधून काढायचे होते. त्याच वेळेस सर्व महत्त्वाच्या विमानवाहतूक कंपन्यांशी संपर्क साधून गेल्या वर्षभरात लॅमर्स, ब्लिट्झ व रॅन्सम व त्यांनी धारण केलेल्या खोट्या नावांच्या माणसांनी कुठल्या विमानातून व कधी प्रवास केला होता याची माहिती मिळवायची होती. सायलरच्या माहितीवरून जरी ड्रोनचा शोध लागला नसता तरी या सर्व संशयितांचे आर्थिक पाठीराखे कोण होते हे नक्कीच समजणार होते.

व्हॉन डॅनिकनने खुर्ची मागे सरकवली. "चला. तर मग आता कामाला लागू."

४१

समुद्रसपाटीपासून पंधराशे मीटर उंचीवर लॉत्स्चच्या खोऱ्यात वसलेल्या गॉप्पेन्स्टाईन या छोट्याशा शहराची लोकवस्ती अंदाजे तीन हजार असावी. शहराला ऐतिहासिक वारसा मिळालेला नव्हता किंवा निसर्गसौंदर्याची पार्श्वभूमीही लाभलेली नव्हती. शहराला जी काही प्रसिद्धी मिळाली होती, ती त्या शहरातून जाणाऱ्या लांबलचक रेल्वेच्या बोगद्यामुळे. लॉत्स्चबर्ग आणि बर्न कँटॉनला जोडणारा तो बोगदा साडेबारा किलोमीटर लांबीचा होता. गॉप्पेन्स्टाईन हे दक्षिणेकडील सर्वांत शेवटचे रेल्वे स्टेशन होते.

१९११ साली बांधलेला तो बोगदा आता जुनापुराणा झाला होता. त्यामधून एका वेळेस फक्त एकच आगगाडी जाऊ किंवा येऊ शकायची. संकटकालीन बाहेर पडायचा दुसरा मार्ग त्यात नव्हता. अलीकडच्या काळात मात्र बोगदे बांधण्यापूर्वी त्यासाठी विशेष खबरदारी घेतली जाते. फक्त त्या बोगद्याच्या दोन्ही टोकांना हजार मीटर लांबीच्या एका आणखी लोहमार्गाची व्यवस्था केली होती. पण तरीही तो बोगदा वाहतुकीसाठी अपरिहार्य बनला होता. दिवसभरातल्या आगगाडीच्या वाहतूकीमधून दोन हजारांहून जास्त मोटारी, ट्रक्स व मोटारसायकली त्या डोंगरातून पलीकडे आणल्या जात असत.

सव्वीस फ्रँक्सचे तिकीट विकत घेऊन, 'पिशाचा'ने आपली गाडी रांगेत आणून उभी केली. एकंदर सहा रांगांची व्यवस्था केलेली होती. मोटारी व अठरा चाकी परदेशी गाड्यांमुळे आता पहिल्या दोन रांगांमध्ये एकही जागा शिल्लक नव्हती. नारिंगी रंगाचा चकाकणारा गणवेश घातलेल्या एका इसमाने त्याला तिसऱ्या रांगेत गाडी उभी करण्याची खूण केली.

पार्किंग लॉट संपल्यावर स्टेशन सुरू होत होते. तिथे आगगाडी आधीच आलेली होती. आगगाडीला बंद डबे जोडलेले नव्हते. उघड्या डब्यांमध्ये वाहने ठेवायची व्यवस्था केलेली होती. पाऊस किंवा खराब हवामानापासून बचाव करण्यासाठी वाहनांवर पातळ लोखंडी ताडपत्री टाकण्यात आली होती. गाडीच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत सहज जाता येऊ शकत होते. लांबलचक आगगाडीचे इंजीन काळोख्या बोगद्याच्या आत गेलेले होते. बिळातून डोके बाहेर काढलेल्या सर्पाची त्याला आठवण झाली. भला मोठा, खवल्या खवल्यांचा काळाकभिन्न सर्प.

त्याने घड्याळ पाहिले. आगगाडी सुटायला नऊ मिनिटे राहिली होती.

गाडीच्या आरशातून 'पिशाचा'ने मागे पाहिले. त्याच्यामागे तीन गाड्या सोडून रॅन्समची गाडी होती. खुशीत येऊन त्याने स्टिअरिंग व्हीलवर हाताने ठेका धरला. सर्व काही मनाजोगते झाले होते.

त्याने बाजूचा ड्रॉवर उघडला व पिस्तूल बाहेर काढले. सायलेन्सर जोडत पुढच्या

नळीचे तोंड कापडाने गुंडाळून टाकले आणि शांतपणे ते पिस्तूल बाजूच्या सीटवर ठेवून दिले. गळ्यात लटकणारी छोटीशी बाटली काढून खाली ठेवली व डोळे बंद करून तो अतिशय मनोभावे प्रार्थना म्हणू लागला. दूर जंगलातून पडघम ऐकू येत होते. त्याने एकापाठोपाठ एक सर्व गोळ्या त्या विषात बुडवल्या. मरणाऱ्या व्यक्तीचे भूत आता आपला पाठलाग करणार नाही याबद्दल तो नि:शंक झाला होता. त्याने हळूहळू त्या गोळ्या पिस्तुलात भरल्या.

आता तो शांतपणे वाट पाहू लागला.

हिरवा दिवा पेटला, आत्तापर्यंत शांत उभ्या असलेल्या वाहनांची इंजिने फुरफुरू लागली. ब्रेक लाईट्सचा प्रकाश उघडझाप करू लागला. एकेक वाहन आगगाडीत चढवले गेले. उजवीकडची रांग रिकामी झाली. पुढे असलेली गाडी हिसडा देत आणखी पुढे सरकली. जोनाथनने गाडी सुरू केली व सावकाश आगगाडीमध्ये वर चढवली. त्या अरुंद फलाटावरून तो एकेका गाडीला मागे टाकत पुढे जाऊ लागला. अखेर तो अगदी पुढच्या टोकापर्यंत जाऊन पोहोचला. डब्याच्या दोन्ही बाजूंना बफर्स लावून अडथळा निर्माण केला होता. वाहनचालकांनी 'इमर्जन्सी ब्रेक्स' लावावेत व कोणत्याही परिस्थितीत गाडीतून बाहेर पडू नये अशा सूचना दिल्या गेल्या.

पुढे असलेल्या गाडीपासून पाच-सहा फुटांचे अंतर राखत त्याने आपली मर्सिडिज उभी केली. आजूबाजूला गाड्या येऊन थांबत होत्या. काही मिनिटे गेली. धक्का देत आगगाडी सुरू झाली व सरपटणाऱ्या श्वापदासारखी पुढे जाऊ लागली. चाकांच्या वाढत्या गतीबरोबर त्यातून येणारा आवाजही वाढू लागला. पर्वत जवळ येऊ लागला. गाडी बोगद्यात शिरताना वाऱ्याचा दबका आवाज आला. बदललेल्या हवेच्या दाबामुळे त्याचे कान ताठ उभे राहिले. भोवती काळाकुट्ट अंधार पसरला.

जोनाथनचे डोळे टक्क उघडे होते; पण त्या डोळ्यांना काहीही दिसत नव्हते. तसाच काही वेळ गेला आणि अचानक त्याला एम्माचा चेहरा दिसला. खांद्यावरून वळत ती त्याच्याकडे पाहत होती. 'माझ्यामागून ये', ती म्हणाली. तिच्या आवाजाचा प्रतिध्वनी त्याच्या शरीरात खोल उमटत राहिला. छातीला टेकलेली हनुवटी उचलली गेली व तो दचकून जागा झाला. त्याने घड्याळात पाहिले. त्याला पाच मिनिटे डुलकी लागली होती. सावध होत, तो सावरून बसला आणि त्याने गाडीच्या आतला दिवा लावला.

ब्रीफकेसमधून त्याने झुग इंडस्ट्रीवर्कची कागदपत्रे बाहेर काढली. हॉफमनने इव्हा क्रुगरला लिहिलेले पत्र तो पुन्हा वाचू लागला. '१०.२ ला अखेरचा माल पाठवला जाईल.' तो आकडा त्याला त्रास देऊ लागला. दहा तारीख उजाडायला आता तीन दिवस उरले होते. अचानक त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. मीटिंगसाठी एम्मा दोन दिवस कोपेनहॅगनला जाणार होती. त्याच्या डोक्यात चक्रे फिरू लागली. तिचा खरोखरच डेन्मार्कला जायचा बेत होता? का तिच्या मनात काही वेगळेच होते? ब्लिट्झने, हॉफमनने किंवा तिच्या त्या समांतर आयुष्यातल्या कुणी अनोळखी व्यक्तीनेच तर ते सारे घडवून आणले होते?

त्याने आपले लक्ष कंपनीच्या त्या गुळगुळीत पुस्तिकेवर वेधले. चित्रामध्ये कंपनीच्या मुख्य कार्यालयाची तीन मजली इमारत दिसत होती. तिलाच जोडून फॅक्टरी

होती. त्या पुढच्या पानांवर चंदेरी रंगाच्या मशिन्सचे व संभाषणात गुंतलेल्या सहकाऱ्यांचे फोटो छापलेले होते.

'वर्नर स्टुट्झने १९११ साली झूग इंडस्ट्रीवर्क या कंपनीची स्थापना केली होती. बंदूक निर्मितीचा त्याचा व्यवसाय होता.' कंपनीची माहिती दिलेली होती. "१९३० च्या पूर्वार्धात मिस्टर स्टुट्झने आपला व्यवसाय वाढवला व तो हलकी व अवजड शस्त्रनिर्मिती करू लागला." बेटयाने बरोबर मोका साधला, जोनाथनच्या मनात विचार आला. त्यावेळेस निम्म्या जगाला शस्त्रास्त्रांची अतोनात गरज भासत होती. विसाव्या शतकामधला तो सर्वांत भरभराटीला आलेला उद्योग होता. एकविसाव्या शतकातही ती परिस्थिती बदललेली नव्हती.

त्याने पुस्तिकेचे मलपृष्ठ पाहिले. त्यावर कंपनीचा संक्षिप्त ताळेबंद होता. उत्पन्न : ५५ दशलक्ष. नफा : ६ दशलक्ष कर्मचारी संख्या : ४७८. सर्व आकडे उल्लेखनीय होते. पैसा कमावला गेला होता. तोही फार मोठ्या प्रमाणात. पैसा कधी खोटे बोलत नसतो.

जोनाथन जसजसा वाचत राहिला तसतसा त्याच्या अंगाचा तिळपापड होऊ लागला. ZIAG ही नोंदणीकृत वैध कंपनी होती यात काहीच शंका नव्हती. पण मग ज्या नावाची स्त्री अस्तित्वातच नव्हती, ती त्या कंपनीची कर्मचारी कशी असू शकत होती?

अचानक त्याला जाणवले की, गाडीच्या खिडकीवर कुणीतरी थापा मारत होते. फारच जोरात.

तो सावरून, सरसावून बसला व आवाजाच्या दिशेने पाहू लागला.

त्याला गरज होती, ती फक्त एका टॉवेलची. काळोख इतका घनदाट असेल, असे मात्र पिशाच्याने गृहीत धरले नव्हते. सायलेन्सरमधून निघणाऱ्या ज्वाला मागच्या दहा गाड्यांपर्यंत दिसू शकल्या असत्या. त्याने आपल्या बॅगेत हात घातला आणि एक काळा टी-शर्ट त्याच्या हातात आला. त्याने तो कपडा फाडला व त्याचा एक तुकडा सायलेन्सरभोवती गुंडाळला. गाडीतून बाहेर पडण्यापूर्वी त्याने एक अखेरचे काम केले व ते म्हणजे पिस्तुलाला एक जाड कापडाची पिशवी लटकवली. गोळ्यांची टरफले आता त्या पिशवीत पडणार होती.

पिशाचाने अगदी काळजीपूर्वक गाडीचे दार उघडले व परत येताना आत शिरायला सोपे जावे म्हणून एक लहानशी फट ठेवून किंचित ढकलले. अगदी खाली वाकून तो गाडीच्या शेजारी लपून बसला. बोगद्यामधील हवा थंड व ओलसर होती. हातभर अंतरावर असणारी बोगद्याची दगडी भिंत झरझर मागे सरत होती. तीन गाड्यांच्या मागे असलेली रॅन्समची मर्सिडिज त्याला दिसली. मधल्या तीनही गाड्यांचे दिवे विझलेले होते. रॅन्समच्या गाडीमधला दिवा मात्र मंद पेटलेला होता. तो कागदपत्रे वाचत होता.

जवळजवळ रांगतच, पिशाच त्याच्या दिशेने जाऊ लागला. पहिली गाडी ओलांडली, मग दुसरी. त्याने थांबून घड्याळ पाहिले. गाडी बोगद्यात शिरून नऊ मिनिटे झाली होती. तिकीट देणाऱ्या माणसाने सांगितले होते की, गाडीला बोगदा ओलांडण्यासाठी पंधरा मिनिटे लागतात. त्याने आपली नजर रॅन्समवर ठेवली. त्याच्या गाडीत जळत असणारा दिवा थोडा त्रास देणार होता. कँडरस्टेग येईपर्यंत रॅन्समचा मृतदेह कुणाच्या नजरेस पडायला नको होता. बोगद्यामध्ये सेलफोन्स वापरता येऊ शकत होते. कुणीतरी

पोलिसांना फोन करण्याची दाट शक्यता होती.

तो ढोपरांवर बसला.

एक मिनिट गेले. आणखी एक गेले. अखेर तो पुढे सरकला.

त्याने तिसरी गाडी ओलांडली व तो मर्सिडिजजवळ पोहोचला. गाडीच्या बाजूला कठडा नव्हता त्यामुळे आपले पाऊल बाजूला पडणार नाही याची पिशाचाला दक्षता घेणे फार आवश्यक होते. त्याने आणखी एक पाऊल पुढे टाकले व गाडीचा बंपर पकडला. तो जोनाथनच्या जवळ पोहोचला. उठून उभा राहात त्याने काचेवर पिस्तूल हलकेच आपटलं.

जोनाथनने थेट त्याच्याकडे पाहिले.

पिशाचाने चाप ओढला.

जोनाथन डोळे फाडून खिडकीकडे पाहत होता. त्याला काचेबाहेर काहीतरी हालचाल जाणवत होती. एक सावली. एक आकृती. तो आणखी बारकाईने पाहू लागला. जोनाथनचे डोळे विस्फारले गेले. त्याच्या कपाळाच्या दिशेला एका पिस्तुलाची नळी रोखलेली होती.

अचानक एक ज्योत पेटली व त्याची नजर आंधळी करून गेली. त्याने झटकन डोके बाजूला नेले. वाळू चुरडल्यासारखा आवाज आला. त्याने वळून पाहिले. काचेवर आगीचा जाळ चिकटत होता. खिडकी आतल्या बाजूला फुगली होती. जिथे जिथे गोळ्या आपटल्या होत्या, तिथे तिथे काचेवर चांदण्यांचा आकार उमटला होता. पण काच फोडून गोळ्या आत येऊ शकल्या नव्हत्या.

काच बुलेटप्रुफ होती.

त्याच्यापाशी हालचाल करायला वेळच नव्हता. त्याचक्षणी गाडीचा दरवाजा किंचित उघडला जाऊन हाताचा एक पंजा आत घुसण्याचा प्रयत्न करू लागला. आपल्या गालावर पिस्तूल रोखले गेलेय एवढेच फक्त जोनाथनला जाणवले. चपळाईने त्याने आपले डोके मागे नेत त्याने ते आत घुसू पाहणारे मनगट जोरात दाबून वरच्या दिशेला वळवले. पिस्तुलातून सुटलेल्या गोळीने गाडीचे छत फाडले. आता त्याने दोन्ही हातांनी ते मनगट पकडत खालच्या दिशेने पिरगाळले. त्याची नजर दाराकडे गेली व त्याला तो चेहरा ओझरता दिसला. थंड, रोखलेली नजर. खुनशी डोळे.

त्याच वेळी आगगाडी बोगद्याच्या शेवटच्या टोकाला पोहोचली. हळूहळू बोगद्याची भिंत अदृश्य झाली व आपण एका भुयारी गुहेत डोकावतोय असा त्याला भास झाला. त्याच्या अगदी डोळ्यासमोर एक चमचमणारा दिवा दिसत होता. ते कँडरस्टेग स्टेशन होते.

खुन्याने आपला हात खेचून मोकळा करून घेतला. जोनाथनने लगेच दार लावून लॉक करून टाकले. सावली अंधारात विरघळत दिसेनाशी झाली. जोनाथनने इंजीन सुरू केले. पण जाणार कुठे? पुढेही जाता येत नव्हते, मागेही जाता येत नव्हते आणि कोणत्याही क्षणी गोळी मारली जाईल या भीतीने सीटवरही बसणे शक्य नव्हते. त्याने गाडीचा हॉर्न जोरात वाजवला. गाडीचे दिवे लावून पूर्ण प्रकाशित केले. झेनॉनच्या किरणांमधून निळा हिरा चमकावा तसा प्रकाश पडला व त्यात समोरच्या गाड्या उजळून निघाल्या. त्याच्या लक्षात आले की, आगगाडीचे डबे फक्त दोन मीटर लांबीच्या लोखंडी साखळदंडांनी एकमेकांना जोडले आहेत. त्याशिवाय दुसरा कुठलाही अडथळा नव्हता.

आगगाडी आता पूर्णपणे बोगद्याच्या बाहेर आली होती. डावीकडे आणखी एक रुळाचा पट्टा मुख्य लोहमार्गाला सांधा देऊन जोडला होता व तो सरळ माल वाहतुकीच्या प्लॅटफॉर्मकडे जात होता. गाडी सुरू करत त्याने स्टिअरिंग व्हील पूर्ण वळवले आणि अॅक्सिलरेटर दाबला. मर्सिडिजच्या V - 12 इंजिनाने गाडीला वर उडवले आणि साखळदंड तोडून गाडीला प्लॅटफॉर्मवर नेऊन ठेवले. हिमवर्षावामुळे गाडीच्या काचांवर बर्फ साचले होते. त्याला चटकन वायपर्स चालू करता येईनात. काचेला तोंड चिकटवून तो बाहेर पाहू लागला. एक काळी चौकोनी आकृती अस्पष्ट दिसत होती. अखेर वायपर्स सुरू झाले. व समोरची काच स्वच्छ झाली. गाडीपासून दहा मीटरवर एक छोटीशी टपरी होती. त्याने झटकन गाडी वळवली व गाडी टपरीवर आदळता आदळता काही इंचाने बचावली.

माल उतरवण्यासाठी बांधलेल्या त्या निमुळत्या रस्त्यावरून गाडी खाली उतरवत तो पार्किंग लॉटपाशी आला व तिथून बाहेर पडत अखेर एका लाल सिग्नलपाशी येऊन थांबला. हायवेला तिथेच सुरुवात होत होती. त्याने मागे वळून पाहिले. आगगाडी स्टेशनमध्ये नुकतीच शिरत होती व एकही वाहन अजून खाली उतरलेले नव्हते.

सिग्नल हिरवा झाला.

जोनाथनने गाडी हायवेवर आणली. पुढची दहा मिनिटे तो सुसाट वेगाने गाडी चालवत राहिला. अखेर डावीकडून बाहेर पडणाऱ्या एका रस्त्याच्या दिशेने तो वळला व नंतर अनेक छोट्या अरुंद रस्त्यांवरून गाडी उलटसुलट वळवत त्याने हायवेपासून आपली गाडी जास्तीतजास्त लांब नेऊन ठेवली. रस्त्याच्या कडेला येत त्याने गाडी थांबवली. गाडीच्या आरशात त्याने आपला चेहरा पाहिला. एका फरारी माणसाचा तो भेदरलेला चेहरा होता.

अंगावर गोळी झेलण्याचा हा काही त्याच्या आयुष्यातला पहिलाच प्रसंग नव्हता. लिबेरियातील हॉस्पिटलमध्ये काम करतानाही तो अशाच एका प्रसंगातून गेलेला होता. गोळीबार सुरू झाला तेव्हा तो एक शस्त्रक्रिया करण्यात गुंतला होता. टेबलवर असलेल्या रुग्णाला गँगरिन झाल्यामुळे तो त्याचा पाय कापत होता. हॉस्पिटलबाहेर अचानक दोन विरुद्ध गटांमध्ये भडका उडाला होता. दोन्ही बाजूंनी बेछूट गोळीबार सुरू होता व काही गोळ्या हॉस्पिटलच्या भिंतींवर आदळत होत्या. ‘लवकरात लवकर कुठे तरी लपून बसा.’ त्याने कुणाचा तरी आवाज ऐकला. ‘ते आपल्याला ठार मारणार आहेत.’ पण त्या ऑपरेशन थिएटरमधला एकही जण जागचा हलला नव्हता. कमालीच्या धैर्याने त्या सर्वांनी आपले काम चोख पार पाडले होते.

त्याने गाडीच्या खिडकीकडे पाहिले. काच तर फुटली नव्हतीच पण साधी तडकलीसुद्धा नव्हती. फक्त काचेवर तीन चांदण्याच्या आकाराचे ओरखडे उठले होते. तो थक्क झाला होता. इतक्या जवळून झाडलेल्या पिस्तुलातील गोळीलादेखील ती काच भेदता आली नव्हती. बारकाईने पाहिल्यावर त्याच्या लक्षात आले की ती काच नव्हतीच. ते एक प्रकारचे प्लॅस्टिक होते. जे काय असेल ते असो, त्या क्षणी ते त्याच्या मनात भरले होते. भलतेच आवडले होते. गाडीच्या छताचे कापड फाटले होते. त्यात गोळी अडकली असेल असे समजून त्याने बोटाने चाचपले पण त्याला काहीच सापडले नाही.

सीटवर मागे डोके ठेवून तो शांत होण्याचा प्रयत्न करू लागला. अचानक आलेल्या

त्या संकटांच्या मालिकेने त्याच्या मनावर जबरदस्त ताण आला होता. एका क्षणी त्याच्याकडून सीमारेषा ओलांडली गेली होती. लँडक्वॉर्टला पोलिसांना जीवे मारण्यात त्याच्या हातून ती चूक झाली होती की, ब्लिट्झचा शोध घ्यायचा निर्णय त्याला महागात पडला होता हे त्याला नक्की कळत नव्हते. पण त्या सगळ्याला आता त्याच्या लेखी महत्त्व उरले नव्हते. एम्माच्या दुपदरी आयुष्यावर एकदा कायमचा पडदा पडावा यासाठी उत्सुक असलेला तो आता केवळ एक शोकग्रस्त नवरा उरलेला नव्हता. एका गुप्त संघटनेशी असलेले तिचे चोरटे संबंध. त्या खतरनाक दुनियेचा तोही आता एक भाग झाला होता.

पाऊस कोसळत असतानाही त्याने बाहेर पडून गाडी नीट तपासली. गाडीचा बंपर घासला गेला होता व आतल्या बाजूला त्याला एक पोचा पडला होता. पण एरवी गाडी अगदी व्यवस्थित होती.

गाडी कसली, रणगाडा आहे, रणगाडा. तो गाडीकडे पाहत राहिला. आपण गाडीचे खरे मालक नाही हे माहित असूनसुद्धा खोटच्या गर्वाने त्याची छाती फुगून गेली.

गाडीत शिरत त्याने हिटर सुरू केला. आपला खून करण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्या अनोळखी इसमाबद्दल त्याला विलक्षण कुतूहल वाटू लागले. त्याच माणसाने ब्लिट्झला मारलेले असणार याची त्याला पक्की खात्री होती. योग्य संधीची वाट पाहात त्याने दिवसभर जोनाथनचा पाठलाग केलेला असणार. पण इतका वेळ तो का थांबून राहिला होता? संधी पकडण्याचे अनेक क्षण त्याच्या वाटच्याला आले होते. शहरामध्ये किंवा डोंगरात असताना, तो जोनाथनला सहज मारू शकला असता. विचार करूनही जोनाथनला त्या प्रश्नाचे उत्तर सापडले नाही.

एक गोष्ट मात्र नक्की होती : इतकी मजबूत व भक्कम गाडी पाहून तो खुनी मात्र चक्रावला असणार.

म्हणून तर आपण तिला रणगाडा म्हटले.

जोनाथनने आपल्या गळ्याला हात लावला. सेंट ख्रिस्तोफर त्याच्या अंगाला सतत स्पर्श करत होता. प्रवाशांचा तारणहार. त्या मूर्तीवर ओठ टेकवण्याची त्याला इच्छा झाली. पण क्षणार्धात त्याच्या चेहऱ्यावरचे हास्य मावळले व भीतीने त्याचे अंग गारठून गेले. तो खुनी इसम नक्कीच घाबरून पळून जाणार नव्हता. तो आपल्याला शोधत मागून येत असणार.

जोनाथनने गाडी सुरू केली. तीन ठिकाणी वळवत, मागच्या रस्त्याने तो हायवेवर पोहोचला. त्याने उत्तरेला, बर्नच्या दिशेने गाडी वळवली. बाजूने मोटारी जात होत्या. तो पुन्हा पुन्हा आरशातून मागे पाहात होता; पण त्याला संशयास्पद असे काहीच दिसले नाही.

डोंगर मागे पडला होता व क्षितिजावर तांबूस रंग चढला होता. शहरातले दिवे लागलेले होते.

एक सुसज्ज, सुरक्षित गाडी. शंभर हजार फ्रँक्स. आणि एक उंची काश्मिरी स्वेटर... पण हे सारे नक्की कुणासाठी पाठवले होते?

४२

जेरुसलेममधील मध्यरात्र.

एखाद्या गरम पांघरुणाप्रमाणे प्रसन्न व उबदार हवेच्या लाटेने अख्ख्या शहराला लपेटून टाकले होते. हवामानात झालेल्या सुखद बदलामुळे सारे शहर रस्त्यावर उतरले होते. गल्ल्यागल्ल्यांमधून गोंगाट कानी पडत होता. वाहनचालक उतावीळ होऊन हॉर्न वाजवत होते. सगळे वातावरण गजबजून गेले होते. उत्साह, उल्हास आणि उद्दामपणाला ऊत आला होता. हेच तर खरेखुरे इस्त्राईल होते.

बॅलफोर स्ट्रीटवर असलेल्या पंतप्रधानांच्या निवासस्थानी एका जुनाट टेबलाभोवती चौघे जण बसले होते. बारा बाय पंधरा फुटांचं ते छोटेखानी कार्यालय, राष्ट्रप्रमुखाच्या दर्जाला शोभून दिसत नव्हते. ऑफिसला अलीकडेच रंगरंगोटी केलेली असली तरी आधीचा कुबट वास गेलेला नव्हता.

धोक्याची 'लाल रेषा' ओलांडली गेली होती. ज्या क्षमतेच्या युरेनियमपासून बॉम्ब बनवला जाऊ शकतो, अशा युरेनियमची निर्मिती करण्यासाठी लागणारी साधनसामुग्रीच इराणपाशी होती असे नव्हे तर इराण सरकारजवळ आता अशा युरेनियमचा शंभर किलोचा साठा प्रत्यक्ष उपलब्ध होता. आता केवळ खबरदारीची पावले उचलून भागणार नव्हते, तर आत्मसंरक्षणाचा प्रश्न समोर ठाकला होता.

झ्वी हिर्रस्च इराणच्या नकाशाशेजारी उभा होता. डोक्यावरील दिव्याच्या भगभगीत प्रकाशामुळे त्याचा चेहरा व अंग फिकट हिरवे दिसत होते. नकाशावर एकूण पिवळ्या व काळ्या रंगाचे तीस ठिपके चिकटवलेले होते. अणुशक्ती केंद्रे व किरणोत्सर्गी साहित्याचा साठा निर्देशित करण्यासाठी त्या ठिपक्यांचा वापर केला होता.

"इराणकडे एकूण अशी दहा केंद्रे आहेत की, जिथे बॉम्ब बनवता येईल इतक्या क्षमतेचं युरेनियम निर्माण केलं जातं." हातातील लेझरची छडी वेगवेगळ्या ठिपक्यांवर टेकवत तो म्हणाला. "या चार ठिकाणी क्षेपणास्त्र निर्मितीसाठी लागणाऱ्या युरेनियमचं उत्पादन केलं जातं. नतान्झ, एस्फाहन आणि बुशेऱ्ह. शिवाय चालूसला नुकतंच एक केंद्र त्यांनी सुरू केलंय. आपल्याला ही चारही केंद्रं उद्ध्वस्त करावी लागतील."

"फक्त चारांवर भागणार नाही." समोरून थंड स्वरात आवाज आला.

"एक मिनिट डॅनी" हिर्रस्च म्हणाला. "जरा मोठ्या आवाजात बोल."

"फक्त चार केंद्रं उडवून, प्रश्न मिटणार नाही." जनरल डॅनी गान्झ खुर्चीवरून उठत म्हणाला. हवाईदलाचा प्रमुख असलेल्या गान्झची नव्याने स्थापन झालेल्या इराण कमांडच्या नेतेपदीही निवड झाली होती. इराणवर करायच्या हल्ल्याचे नियोजन व प्रत्यक्ष लष्करी कारवाईची सर्व सूत्रे त्याच्यावर सोपवण्यात आली होती. अस्वस्थ व्यक्तिमत्त्वाचा डॅनी हा दिसायला काटक होता. त्याचे नाक बहिरी ससाण्यासारखे होते व डोळे तपकिरी होते. सतत चालू असणाऱ्या लढाया आणि संघर्षमय वातावरणाच्या

ताणामुळे त्याच्या कपाळावर व डोळ्यांखाली सुरकुत्या दिसू लागल्या होत्या.

तो नकाशाजवळ गेला. “जर आपल्याला इराणचे अणुशक्ती निर्मितीचे सर्व प्रयत्न हाणून पाडायचे असतील तर चालूस सकट एकूण वीस केंद्रांवर तरी हल्ला करावा लागेल व ही गोष्ट सोपी नाही. देशाच्या चारही कोपऱ्यांत ही केंद्रे पसरलेली आहेत. शिवाय आपण फक्त एखाद्या इमारतीबद्दल बोलत नाही आहोत. ही सर्व प्रचंड व अवाढव्य संकुलं आहेत. देशाच्या अगदी मध्यवर्ती भागात वसलेल्या नतांझचं आपण उदाहरण घेऊ.” नकाशावर आपल्या नखाने खड्डा पाडत तो म्हणाला. “हे केंद्र दहा चौरस किलोमीटर पसरलेलं आहे. त्यात डझनावारी इमारती, कारखाने व गोदामं आहेत. प्रत्यक्ष उत्पादन जिथे केलं जातं, ती जागा जमिनीखाली पंचवीस फूट खोल आहे.”

“त्यावर हल्ला करू शकाल?” पंतप्रधानाने विचारले.

गान्झला तो प्रश्न रुचला नाही; पण त्याने आपला राग कसाबसा गिळला. एकीकडे शांतता व सलोख्याच्या मोठ्यामोठ्या गप्पा मारणाऱ्या ह्याच माणसाने काही दिवसांपूर्वी वेस्ट बँकेच्या बाबतीत मात्र कोणतीही तडजोड करण्यास नकार दिला होता. सरड्यासारखा कोणत्या क्षणी तो रंग बदलेल हे सर्वांनाच ठाऊक होते. वेळप्रसंगी हा माणूस देशद्रोहसुद्धा करायला मागेपुढे पाहणार नाही असा गान्झच्या मनात विचार आला. अर्थात सगळेच राजकारणी ह्याच जातीचे असतात म्हणा! “आपण हल्ल्याचा विचार करण्याआधी तिथपर्यंत कसे पोहोचू शकतो ह्याचा विचार करणं अधिक आवश्यक आहे.” त्याने पुन्हा बोलायला सुरुवात केली. “आपल्या दक्षिणेकडील अगदी टोकाच्या हवाईअड्ड्यापासून नतांझ आठशे मैलांवर आहे तर चालूस हजार मैलांवर आहे. तिथे पोहोचण्यासाठी आपल्या वैमानिकांना जॉर्डन सौदी अरेबिया किंवा इराकवरून विमानं न्यावी लागतील. यातील पहिले दोन देश आपल्याला त्यांचे हवाईक्षेत्र वापरण्याची परवानगी देतील असं वाटत नाही... म्हणजे मग उरला फक्त इराक.”

यावर पंतप्रधान काहीतरी बोलेल या आशेने गान्झ क्षणभर थांबला.

“योग्य वेळ येताच मी अमेरिकन सरकारबरोबर बोलणी करणारच आहे.” पंतप्रधानाने आश्वासन दिले.

“काही तासांपूर्वीच तो योग्य क्षण येऊन गेलाही.” झ्वी हिर्रस्च हळूच ओठातल्या ओठात पुटपुटला.

पंतप्रधानाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्याने सरळ गान्झलाच प्रश्न विचारला. “आपली विमानं एवढा मोठा हल्ला करण्यासाठी सक्षम आहेत?”

“आपली इ - १५ विमानं तिथपर्यंत जाऊन परत येऊ शकतात पण F - 16 विमानांचा मात्र प्रश्न मोठा आहे.” गान्झ म्हणाला. “त्यांना इंधन भरण्यासाठी वाटेत एकदा तरी थांबावं लागेल. इराणचं हवाईदल फारसं प्रबळ नसलं तरी आता त्यांच्यापाशी रडारं आहेत. गेल्या काही वर्षांत त्यांनी रशियाकडून, जमिनीवरून सोडता येऊ शकतील अशा क्षेपणास्त्रांची मोठी खरेदी केलेली आहे. आता नतांझचं उदाहरण घेतलं तर त्या केंद्राच्या उत्तर, पूर्व व दक्षिण भागांमध्येही क्षेपणास्त्रं ठेवलेली आहेत. त्यामुळे हल्ल्यामध्ये प्रचंड प्रमाणात जीवितहानी होऊ शकते.”

“प्रचंड प्रमाणात म्हणजे किती?” झ्वी हिर्रस्चने विचारले.

“सुमारे चाळीस टक्के.” त्याच्या ह्या उद्गारावर जमलेले सारेच अवाक झाले. हलक्या

आवाजात संताप व निषेध व्यक्त झाला. गान्झ हाताची घडी घालून शांत उभा होता. या युद्धात त्याच्या माणसांना जे बलिदान करावे लागणार होते, त्या बलिदानाची किंमत उपस्थितांना जाणवावी हीच त्याची इच्छा होती.

"बापरे!" पंतप्रधान म्हणाला.

"जेव्हा तुम्ही शत्रूवर प्रत्यक्ष बॉम्ब डागत असता तेव्हा समोरून येणारी क्षेपणास्त्रं चुकवणं अत्यंत अवघड असतं." गान्झ म्हणाला.

"क्षेपणास्त्रांपासून बचाव करण्यासाठी काही करता येईल कां?" हिर्रस्चने विचारले.

"त्यासाठी पुरेशी विमानं उपलब्ध नाहीत." गान्झ म्हणाला. "जर आपल्याला त्यांची क्षेपणास्त्रे निष्प्रभ करायची असतील तर त्यावर आपल्याला अखंड मारा करावा लागेल. त्यासाठी GPS बरोबर समन्वय साधावा लागेल. तुला काय म्हणायचंय ते माझ्या पूर्ण लक्षात आलंय. हे आपण पूर्वी केलं होतं म्हणून या खेपेसही करू शकू असं तुला वाटतंय. माफ करा मित्रांनो, एखाद्या नाटकाचा पुन्हा प्रयोग करण्याइतकी ती गोष्ट सोपी नव्हे."

७ जून, १९८१ रोजी इस्त्रायलने बगदादजवळच्या ओसिराक अणुकेंद्रावर अचानक हल्ला चढवला होता. त्या दिवशी एटझिऑन हवाई तळावरून पंधरा इस्त्रायली विमाने सुटली होती आणि जॉर्डन व सौदी अरेबियामधून जात त्यांनी सद्दाम हुसेनच्या एकुलत्या एका अणुभट्टीचा विध्वंस करून टाकला होता. सर्व विमाने सुखरूप परत आली होती. त्यासाठी त्यांना एका अमेरिकन हेराची अतिशय मोलाची मदत मिळाली होती. त्या हेराने संपूर्ण मार्गावर ट्रान्समीटर्स बसवले होते आणि त्यांच्या साहाय्याने ती विमाने जॉर्डन व सौदी अरेबियाच्या रडारांखालून जाऊ शकली होती. बॉम्ब अचूक स्थळी फेकता यावेत म्हणून तो हेर घटनास्थळी प्रत्यक्ष हजर राहिला होता व ती जागा त्याने लेझरने रंगवली होती.

"तर आता आपला शेवटचा प्रश्न." जनरलने आपले बोलणे सुरू ठेवले. "क्षेपणास्त्रं. जर समजा आपण ताशी हजार मैल वेगाने वीस जेट्स सोडू शकलो, तर निदान त्यातली बारा तरी शत्रूचा बचाव भेदून थेट आतपर्यंत घुसू शकतील. पण त्यातून आपण नेमके कुठे बॉम्ब फेकणार आहोत? ते बॉम्ब जास्तीतजास्त तीन नंबरच्या फरसबंदीवर जाऊन पडू शकतील, म्हणजे आपण फक्त त्यांचा बंकर उद्ध्वस्त करू शकू. दोन हजार पौंडाची शक्तीशाली अस्त्रं जमीन भेदून आठ फूट खोल जाऊ शकतात. हे सगळं करणं मुळातच फार अवघड आहे. पण खरा प्रश्न वेगळाच आहे. त्यांनी जर आपलं अणुकेंद्र जमिनीखाली पंचवीस फूट खोल बांधलेलं असेल तर? ते पन्नास किंवा शंभर फूटही खोल असू शकतं. तर मग काय? आपण काय फक्त फरसबंदीवरची धूळ उडवून परत यायचं? हाच खरा प्रश्न आहे."

"पण आज त्याहून अधिक ताकदीची शस्त्रास्त्रं उपलब्ध आहेत." पंतप्रधानाकडे कटाक्ष टाकत हिर्रस्चने सुचवले. "अधिक वेगाने आपटून खोलवर जाणारी."

"त्याचं नाव आहे Paveway - N- B61 " गान्झ म्हणाला. "त्यातून काही किलोटनचा बॉम्ब फेकला जाऊ शकतो. हिरोशिमासाठी वापरला गेला त्याच्या दसपट शक्तीचा. गेल्याच वर्षी अमेरिकेने त्याची चाचणी घेतली. जमिनीखाली शंभर फुटापर्यंतचे सारे बेचिराख झाले. उसळलेल्या ज्वालामुखीच्या तोंडाचा परिघ पाचशे यार्डांचा होता."

सर्वांचे डोळे आता पंतप्रधानावर खिळलेले होते. तो आता सत्तरीच्या घरात आला होता. त्याची राजकीय कारकीर्द वादळी ठरली होती. वाटाघाटी करून सौदा पटवण्यात तो वाकबगार होता. शत्रू, त्याच्या निष्ठांबद्दल नेहमीच संशय व्यक्त करत आणि त्याचे मित्र त्याला संधिसाधू म्हणत असत.

पंतप्रधानाने क्षीणपणे मान हलवली. तो निराश दिसत होता. "इराण्यांना अणुशक्तीक्षम युरेनियमचे उत्पादन करण्यापासून रोखणं हे आजपर्यंतचं आपलं ध्येयधोरण राहिलेलं आहे. पण दुर्दैवाने आपण त्यांना रोखू शकलो नाही. ती वेळ आता निघून गेलीय. हल्ला करण्याबाबतीत मी स्वत: द्विधा मन:स्थितीत सापडलोय. जनतेचं कल्याण, ही मी माझी मुख्य जबाबदारी समजतो. ज्यामुळे आपल्या भूमीवर अणुबॉंबचा हल्ला होऊ शकेल अशी कोणतीही जोखीम मी घेऊ शकत नाही. आजच्या घडीला त्यांची नेमकी काय क्षमता आहे याचा अजून आपल्याला नेमका अंदाज आलेला नाही."

"तू एक गोष्ट विसरतोस." हिर्रस्च म्हणाला. "आपल्याला नेमका अंदाज आलेला आहे. आज त्यांच्यापाशी एक बॉम्ब आहे व कोणत्याही क्षणी त्याचा आपल्याविरुद्ध वापर होणार आहे."

पंतप्रधान चांगलाच अस्वस्थ झाला. "पूर्वी एकदा आपण शत्रूला संशयाचा फायदा मिळवून दिला होता. आता पुन्हा तीच चूक करणं आपल्याला परवडणार नाही. चोवीस तासांच्या आत हल्ल्याचा संपूर्ण आराखडा माझ्या टेबलावर यायला हवा. इराकी हवाईमार्ग आपल्याला उपलब्ध करून देण्याविषयी मी तातडीने अमेरिकन सरकारबरोबर बोलणी करतो." त्याने गान्झकडे पाहिले. "इतर दोन देशांच्या बाबतीत मात्र मी फक्त देवावरच भरवसा ठेवू शकतो."

एकेक जण हळूहळू खुर्चीतून उठत उभा राहिला. झ्वी हिर्रस्चने सर्वप्रथम टाळ्या वाजवून पंतप्रधानाचे अभिनंदन केले. इतर सर्वही मग त्यात सामील झाले. प्रत्येकाने त्याच्याबरोबर हस्तांदोलन केले. प्रत्येकजण एकच वाक्य उच्चारित होता.

"इस्त्राईल चिरायू होवो."

४३

मार्क्स व्हॉन डॅनिकन आपल्या घरातल्या बेडरूममध्ये अस्वस्थपणे पडून राहीला होता. त्याला झोप येत नव्हती. डोळे टक्क उघडे होते व त्याची नजर खोलीच्या छताला चिकटलेली होती. रात्र हळूहळू उलटत होती आणि मध्यरात्रीच्या सुमारास खोलीतला रेडिएटर अचानक बंद पडला. कमालीच्या थंडीमुळे घराच्या भिंती थडथडू लागल्या. खोलीत जी काही थोडी ऊब शिल्लक होती तीसुद्धा रेडिएटरच्या आवाजासारखीच कण्हत, कुरकुरत मुकाट्याने थंडीच्या स्वाधीन झाली. रात्री दोनच्या सुमारास रमवेगच्या पुलावरून तुरळक मालवाहतुकीच्या ट्रक्सची ये-जा सुरू होती. घरापासून तो पूल पाच किलोमीटरवर होता, पण वातावरण इतके शांत होते की, तो ते ट्रक्स सहज मोजू शकत होता.

ड्रोन. मधमाशी विमान.

हे विमान प्रकरण आपल्या कारकिर्दीला निर्णायक वळण देणार हे आता त्याला कळून चुकले होते. कारण स्वित्झर्लंडसारख्या छोट्या आणि निवांत राष्ट्रात अशा प्रकारची प्रकरणे वारंवार घडत नसत. अवकाशात झेप घेणारे व प्लॅस्टिक स्फोटकांनी ठासून भरलेले ते स्वयंचलित विमान, त्याच्या मन:चक्षूंसमोर उभे राहिले. विमानाचे नेमके 'लक्षय' कोणते असेल यावर तो विचार करू लागला. अतिरेकी गॅसन म्हणाला होता की, ड्रोनच्या साहाय्याने एक विमान कोसळवणे हेच ब्लिट्झचे मुख्य उद्दिष्ट होते. पण व्हॉन डॅनिकनच्या मनात इतरही काही शक्यता येत होत्या. अगदी आल्प्सवरील धरणापासून ते गॉस्गनच्या अणुकेंद्रापर्यंत. ते ड्रोन कुठेही पोहोचू शकत होते.

त्याच्या मनामध्ये त्या स्वयंचलित विमानाचा आकार हळूहळू वाढत जाऊ लागला. आकृती बदलत बदलत मोठी होत गेली. आता वीस किलो स्फोटके भरलेले ते एक छोटेसे ड्रोन उरले नव्हते. त्याचे रुपांतर चाळीस प्रवासी व सहा कर्मचारी सोबत घेऊन जाणाऱ्या अलितालिया डीसी-९ मध्ये झाले होते. ते विमान मिलानहून झुरिचला निघाले होते आणि त्यात त्याची तीन वर्षांची मुलगी, त्याची बायको व तिच्या पोटात असलेले त्यांचे बाळही होते. आपल्याला स्वप्न पडतेय याचे त्याला भान होते, पण त्यामुळे त्याच्या मनाचा उडणारा थरकाप जराही कमी होत नव्हता. विमान ढगांमधून बाहेर येत आता खाली उतरू लागले होते. तो फेब्रुरवारी महिना नव्हता. नोव्हेंबर होता. पण ती रात्र मात्र अगदी आजच्याचसारखी होती. गोठलेले तापमान. हिमवर्षा. दाट धुके.

स्वप्नामध्ये तो वैमानिकाच्या खोलीत उभा होता. अशा खराब हवामानात तू विमान उडवण्याचा निर्णय का घेतलास असे तो त्या पायलटला तावातावाने विचारत होता. वैमानिकाचे त्याच्याकडे लक्षच नव्हते. हवाईसुंदरीबरोबर गुलुगुलु गप्पा मारण्यात तो मग्न होता. तिचा सेलनंबर त्याला हवा होता. विमानातील बिघडलेल्या अल्टीमीटरमुळे आपण विमान तीनशे मीटर खाली आणलेय याचे त्याला भानही नव्हते.

विमान कमालीच्या वेगात खाली झेपावले आणि अचानक त्याचे लक्ष टोकाशी बसलेल्या आपल्या बायको व मुलीकडे गेले. त्याच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे तो त्यांच्या शेजारी जाऊन बसला. त्याने आपला हात हलकेच दोघींच्या डोळ्यांवर धरला. त्यांच्या पापण्या मिटल्या गेल्या व काही मिनिटांतच त्यांना शांत, गाढ झोप लागली. छोटच्या स्टेफनीचे डोके आपल्या आईच्या खांद्यावर विश्वासाने विसावले होते.

१४ नोव्हेंबर, १९९० रोजी रातुरौ सात वाजून अकरा मिनिटे व अठरा सेकंदाने, अलितालिया ४०४ हे विमान स्टॅडेलबर्गवर आदळले. त्या वेळेस ते समुद्रसपाटीपासून चारशे मीटर उंच होते व झुरिच फ्लॉगफेनपासून पंधरा किलोमीटर दूर होते. विमानाचा वेग ताशी चारशे नॉट्स होता. नंतर प्रसिद्ध झालेल्या अपघाताच्या अहवालानुसार ज्या वेळेस विमानातील धोक्याचा भोंगा वाजला होता, त्या वेळेस अपघात टाळण्यासाठी कॅप्टनकडे फक्त दहा सेकंदांचा वेळ उरला होता.

व्हॉन डॅनिकन दचकून उठत गादीवर बसला आणि त्याच्या डोळ्यांदेखत त्या विमानाने पेट घेतला.

“हे पुन्हा घडणार नाही.” तो स्वत:शीच पुटपुटला.

त्याच्या डोळ्यादेखत यापुढे एकही विमान असे कोसळणार नव्हते.

तो हे घडू देणार नव्हता.

४४

दक्षिणेला साठ किलोमीटरवर असलेल्या कँडरस्टेग नावाच्या खेड्यातील एका छोट्याशा हॉटेलमधले दिवे मंदपणे जळत होते. सडपातळ शरीरयष्टीचा परंतु पीळदार स्नायूंचा एक माणूस विवस्त्रावस्थेत आरशासमोर उभा होता. त्याचे शरीर रक्तबंबाळ झाले होते. डोळ्यांखाली काळी वर्तुळे जमा झाली होती व घामेजलेल्या कपाळावर केसांच्या बटा चिकटलेल्या होत्या.

पिशाच मरणासन्न अवस्थेत होता.

अंगात विष भिनत चालले होते.

त्याच्या पिस्तुलातील एक गोळी मर्सिडिजच्या काचेवर आपटून त्याच्याच आतड्यांमध्ये घुसली होती. जखम जरी अगदी सूर्यफुलाच्या बीएवढी छोटीशी दिसत असली, तरी त्याभोवतीची कातडी पिवळसर तांबूस झाली होती. विषारी द्रव्याचा तो परिणाम होता. शिशाचा स्पर्श त्याला जाणवत होता. काचेवर आपटून उडालेल्या त्या गोळीचा वेग इतका भन्नाट होता की, जॅकेट भेदून ती आत घुसली होती. काचेला आपटल्यामुळे गोळीवरचे बरेचसे विष उडून गेले होते. नाहीतर एव्हाना तो जिवंत राहिला नसता.

त्याला असह्य वेदना होत होत्या. पोटातून एक जीवघेणी कळ आली. कळ निघून जाईपर्यंत त्याने आपले डोळे गच्च मिटून धरले. श्वास घेणे अवघड होऊ लागले होते आणि डोळ्यांसमोर अंधार पसरत होता. असंख्य सुया टोचल्याप्रमाणे त्याची बोटे वेदनेने झणझणत होती. अर्धवट ग्लानीमध्ये असतानाच त्याचे लक्ष जखमेकडे गेले. त्या जखमेत त्याला अनेक विचित्र आकार दिसू लागले. तडफडणारी जनावरं... ओळखीचे चेहरे... आजपर्यंत त्याने घेतलेले बळी. शिव्याशाप देत, ते त्याच्या नावाचा उद्धार करत होते. त्यालाही भूतयोनीत बोलवत होते.

डोळे उघडत त्याने स्वत:ला भानावर आणले. अजून ती वेळ आलेली नाही, त्याने स्वत:ला बजावले. हे जग सोडून जायला तो तयार नव्हता.

त्याने आपल्या एका हातात चाकू पकडला व अल्कोहोलमध्ये भिजवलेले बँडेज दुसऱ्या हातात धरले. पोटात घुसलेले गोळीचे शिसे, त्याने बोटानेच चाचपले आणि त्यावर चाकूचे पाते धरले आणि अतिशय कौशल्याने गोळी खेचून बाहेर काढली. बँडेजमुळे जखम चांगलीच झोंबत होती.

नंतर तो गादीवर बसला आणि इच्छा नसतानाही त्याने स्वत:ला कपभर चहा पिण्यास भाग पाडले. शरीरात भिनलेल्या विषाशी झगडत, तो तीन तास तसाच पडून राहिला. अखेर वेदना थांबल्या. छातीची धडधड कमी होत गेली व श्वासोच्छ्वास पूर्ववत झाला. त्याने लढाई जिंकली होती. त्याचे जगणे संपलेले नव्हते. मात्र त्या जीवघेण्या लढाईत तो शरीराने व मनाने पार थकून गेला होता.

थकलेल्या अवस्थेतही तो जागाच राहिला. झोप घेण्याचे त्याने मुद्दाम टाळले. शॉवरखाली उभा राहून त्याने रक्ताचे डाग धुवून टाकले. अंग कोरडे करत, त्याने खिडकीखाली त्याच्या पवित्र दैवताची प्रतिष्ठापना केली. वडाची एक छोटी फांदी, आपल्या घराजवळच्या जमिनीची माती आणि लेम्पा नदीच्या उगमामधून आणलेले पवित्र पाणी समोर ठेवून त्याने हात जोडले. गुन्हेगारी जगताचा संरक्षणकर्ता, हन्हाऊ व जगन्नियंता कॅकोच यांची तो मनोभावे प्रार्थना करू लागला. काल रात्री आपल्या हातून निसटलेला तो इसम लवकरात लवकर आपल्या हाती सापडावा व आपल्या हातून तो मारला जावा, अशी याचना केली. अतृप्त आत्म्यांपासून आपला बचाव व्हावा यासाठी त्याने ते पवित्र पाणी आपल्या कॉटभोवती शिंपडले.

त्यानंतरच पिशाचाने आपले अंग चादरीखाली सरकवले.

डोळा लागत असताना एक आवाज त्याच्या कानावर आला. यापुढे तू आपले घर कधीच पाहू शकणार नाहीस. एकेक शब्द त्याला स्पष्ट ऐकू येत होता. तू त्या अमेरिकन माणसाला कधीच मारू शकणार नाहीस. उलट रॅन्समच्याच हातून तू मारला जाणार आहेस. त्यापेक्षा ह्याच क्षणी तू तुझे जीवन संपवून टाक. हन्हाऊ त्याला सावल्यांच्या दुनियेत सामील होण्यासाठी साद घालत होता. स्वप्नामध्येच पिशाचाने गडगडाटी हास्य केले व हन्हाऊच्या आकाशवाणीला आपण किंमत देत नसल्याचे उद्दामपणे दर्शवले.

पहाटे जाग आली तेव्हा त्याच्या मनात फक्त एकच विचार होता.

रॅन्समचा खातमा करायचा.

४५

त्या सकाळी दहा वाजता 'टास्क फोर्स'ला आपल्या पहिल्यावहिल्या यशाची चव चाखता आली होती.

ब्लिट्झने आपले बँकेचे व्यवहार, बँक पोपोलरे डेल टिसिनोमधून केले असल्याचा पुरावा व्हॉन डॅनिकनच्या हाती आला होता. तासभरातच त्याला बँकेचे स्टेटमेंट मिळणार होते. त्यामुळे ब्लिट्झने बँकेत कधी व किती पैसे भरले आणि काढले, ते पैसे कुठून मिळाले, त्याने ते कुणाला दिले याची स्पष्ट व सविस्तर माहिती मिळणार होती. त्याला आणखी एक गोष्ट समजली होती की, व्हिला प्रिन्सिपेस्सा हा बंगला भाड्यावर किंवा विशिष्ट मुदतीसाठी करारावर घेतलेला नव्हता. नेदरलंड्सच्या बेटावरील एका बनावट ट्रस्टकडून ब्लिट्झने तो बंगला चोवीस महिन्यांपूर्वी तीस लाख फ्रँक्सना विकत घेतला होता. लायचेटन्स्टाईनमधल्या एका विश्वासू एजंटने तो सर्व व्यवहार हाताळला होता. व्हॉन डॅनिकनने ताबडतोब आपल्या एका सहकाऱ्याला त्या ट्रस्टींची भेट घेण्यासाठी व्हाडूजला धाडले होते.

मायरच्या हातीही जणू एक घबाड आले होते. ब्लिट्झ व लॅमर्स हे दोघेही ज्यांच्या सतत संपर्कात होते, अशा बारा व्यक्तींचे फोन नंबर्स त्याने शोधून काढले होते. त्यातले बहुतेक जण हे रोबोटिकाला पुरवल्या जाणाऱ्या मालाचे उत्पादक होते. कोर्टाचा हुकूम मिळवून त्या कंपन्यांना संबंधित व्यक्तींची नावे उघड करण्यास भाग पाडले होते. उरलेले फोन नंबर्स हे परदेशी टेलिकॉम कंपन्यांच्या अखत्यारातील होते. त्यासाठी फ्रान्स, स्पेन व हॉलंडमधील दूतावासात संपर्क साधण्यात आला होता.

क्रॅजेक झुरिचमधील काही माहितगारांबरोबर चर्चा करण्यात गुंतला होता. त्याच्याकडून अजून काहीच बातमी मिळालेली नव्हती.

फक्त हार्डनबर्ग मात्र निराश दिसत होता. ती व्हॅन शोधणे महाकठीण होऊन गेले होते. तरी आता त्याने आपली यादी, देशातील १८,६५४ व्होल्क्सवॅगन्सवर आणून ठेवली होती. त्याने पोलीस स्टेशनवरून आणि गाड्या भाड्याने देणाऱ्या कंपन्यांकडून चोरलेल्या व्हॅन्सचे नंबर्स व माहिती मागवली होती. त्यांच्याकडून येणाऱ्या उत्तराची तो आतुरतेने वाट पाहात होता.

"ISIS चे काय म्हणणे आहे?" व्हॉन डॅनिकनने टेबलाच्या टोकावर बसत त्याला विचारले.

"मी त्यांना विनंतीपत्र पाठवलंय." हार्डनबर्ग म्हणाला. "स्विस नंबरप्लेट असलेली पांढरीशुभ्र व्होल्क्सवॅगन. पाहू या, त्यांच्याकडून काय उत्तर येतंय."

"तू आपलं लक्ष जर्मनीमध्ये केंद्रित कर."

"ते मी अगोदरच केलंय. मी लायप्झीग व त्याच्या आजूबाजूला पन्नास किलोमीटरवरील शहरांवर जास्त भर दिलाय. काही धागेदोरे सापडण्याची शक्यता

वाटतेय.”

सरकारचे ज्या व्यक्तींवर विशेष लक्ष आहे अशा माणसांची संपूर्ण माहिती ठेवणे हे ISIS चे मुख्य काम होते. त्यांनी युरोपच्या अनेक देशातील महत्त्वाच्या रस्त्यांवर, गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी अनेक छुपे कॅमेरे लावलेले होते. प्रत्येक दिवशी, मिनिटागणिक रस्त्यांवरून जाणाऱ्या वाहनांचे फोटो टिपले जात होते. प्रत्येक वाहनांच्या नंबरची कॉंप्युटर्समध्ये नोंद होत होती. ते एक प्रकारचे ‘गुन्हेगारी इंटरनेट’ होते. देशादेशांमधून हरवलेल्या किंवा चोरल्या गेलेल्या वाहनांचा शोध लागणे, त्यामुळे सोपे जात होते. स्पेनमधून चोरीला गेलेली मोटार पॅरिसमध्ये आढळून आली किंवा नाईसमधून जवाहिराचे दुकान लुटून तो माल ज्या ट्रकमध्ये भरला गेला, तो ट्रक रोमच्या रस्त्यावर दिसल्याची माहिती सर्व युरोपभर प्रसिद्ध केली जात असे. त्यामुळे पोलिसांच्या मदतीशिवाय दरवर्षी हजारो गुन्हेगारांना अटक होत असे.

फक्त त्या प्रक्रियेचा वेग अतिशय संथ होता. लक्षावधी फोटोंची छाननी करणे हे मोठे जिकिरीचे काम असे व त्यातून झटपट शोध लागणे शक्य नव्हते.

“ते काम सुरू ठेव.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “एखादी बातमी हाती आली की मला लगेच कळव. माझा सेलनंबर तुझ्याकडे आहेच.”

हार्डनबर्गने मान डोलावली व तो आपल्या कामात गढून गेला.

काम योग्य दिशेने पुढे सरकतेय या समाधानाने डॅनिकन लिफ्टमधून खाली उतरला व इमारतीमधून बाहेर पडला. गाडी चालवत तो ऑटोबन्हला पोहोचला व तिथून त्याने जिनिव्हाच्या दिशेने गाडी वळवली. दुपारपर्यंत ‘डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स’च्या मुख्य कार्यालयात पोहोचणे आवश्यक होते. त्याने गाडीचा वेग वाढवला.

४६

झुग इंडस्ट्रीवर्कच्या फॅक्टरीशेजारीच गॅस्थॉफ रॉसली हे जुन्या पद्धतीचे कँटिनवजा उपहारगृह होते. पाईन लाकडाच्या भिंती व लाकडी फरसबंदी असलेल्या त्या हॉटेलच्या भिंतींवर आफ्रिकन हरणांची शुभ्र शिंगे ओळीने टांगलेली होती. दुपारच्या वेळी ते खाद्यगृह गजबजलेले असायचे.

जोनाथन त्या हॉटेलात शिरला. हॉटेलात प्रामुख्याने कंपनीतील कर्मचाऱ्यांचाच जास्त वावर होता. निळ्या जाकिटावरील डावीकडच्या खिशावर असलेले कंपनीचे ठळक अक्षरातील नाव चटकन लक्ष वेधून घेत होते. प्रत्येकाच्या गळ्यात नाव व हुद्दा असलेले ओळखपत्रही लटकत होते. ऑफिसच्या कँटिनला, गॅस्थॉफ रॉसली हा एक उत्तम पर्याय होता.

हॉटेलच्या बारमध्ये जेवता जेवता अनेक जण बिअरचा आस्वाद घेत होते. बारमधली अनेक स्टुले रिकामी होती. जोनाथन एका थुलथुलीत शरीराच्या दाढीवाल्या माणसाशेजारी जाऊन बसला. त्याचे सुटलेले पोट, दारूवरील त्याच्या असलेल्या उदंड प्रेमाची साक्ष देत होते. त्याच्याही गळ्यात ओळखपत्र लोंबत होते. ते हस्तगत करण्यासाठी जोनाथनपाशी फक्त तीस मिनिटांचा अवधी होता.

स्टुलावरून पुढे सरकत त्याने मेनूकार्ड चाळले. शेजारचा तो माणूस आपल्याकडे निरखून पाहतोय याचे त्याला भान होते. एका कोपऱ्यात उंचावर ठेवलेल्या टीव्हीवर बातम्या सुरू होत्या; पण टी.व्ही.चा आवाज बंद केलेला होता. जोनाथनची नजर एकसारखी टी.व्ही.कडे जात होती. त्याने सूप व बिअरची ऑर्डर केली व तो वाट पाहत गप्प बसून राहिला.

जोनाथन झुगला अकरा वाजता पोहोचला होता. आदली रात्र त्याने बर्नमध्ये मर्सिडिज बेन्झच्या शोरूमबाहेरील पार्किंग लॉटमध्ये गाडीच्या मागच्या सीटवर झोपून काढली होती. गेल्या छत्तीस तासांमध्ये त्याने प्रथमच विश्रांती घेतली होती व त्यामुळे तो ताजातवाना दिसत होता.

सकाळी लवकर तो फॅक्टरीपाशी आला होता. आधी गाडीमधून व नंतर पायी चालत फॅक्टरीभोवती दोन-चार फेऱ्या मारून त्याने त्या परिसराचे नीट अवलोकन केले होते. त्याची भेट तशी अनाहूत नव्हती. त्याने केलेल्या फोनमुळे हॉफमन अस्वस्थ झाला होता. ऑफिसच्या समोर व फॅक्टरीच्या दरवाजापाशी सिक्युरिटीच्या गाड्या उभ्या होत्या. गणवेश घातलेले गार्ड्स गाडीत बसून आत शिरणाऱ्या कर्मचाऱ्यांवर बारीक नजर ठेवून होते. लोकांचे लक्ष त्यांच्याकडे नक्कीच वेधले जात होते; पण विचलीत होत नव्हते.

सुरक्षा व्यवस्था इतकी तुटपंजी कशी हे काही जोनाथनला कळेना. जर दोन दिवसांपूर्वी माझा मित्र मारला गेला असेल व त्यानंतर आता माझ्या जिवाला धोका असेल तर मी माझ्या ऑफिसभोवती सुरक्षारक्षकांचा वेढा उभा केला असता. मी इतका

स्वस्थ बसलो नसतो.

मग अचानक त्याला त्यामागचे कारण उमगले.

त्यांच्यापाशी दुसरा मार्गच उरला नव्हता.

झिअॅंग ही एक कायदेशीर अधिकृत कंपनी होती. गेली शंभर वर्षे ती अस्तित्वात होती. तिची मिळकत नव्वद दशलक्ष फ्रँक्स एवढी होती. कंपनीत पाचशे कर्मचारी काम करत होते. हॅन्नेस हॉफमन, गॉटफ्रिड ब्लिट्झ आणि इव्हा क्रुगर हे मात्र घुसखोर होते. ती काही कंपनीच्या आतील वर्तुळातील माणसे नव्हती. म्हणजे खऱ्याखुऱ्या कंपनीमधली. त्यांनी फक्त त्या कंपनीच्या नावाचा आधार घेतला होता. कंपनीमध्ये एक छोटी कंपनी उभारल्याचा भास निर्माण केला होता. कुणा वरिष्ठाला फितवून ते ढेकणांसारखे कंपनीच्या कातडीत घुसले होते. मालकाच्याच रक्तावर माज करणारी बांडगुळे.

बुरख्यामागे लपणारी.

पण मग त्यांनी झिअॅंगचीच निवड का केली असेल?

जोनाथनने मागवलेले सूप घेऊन वेटर आला. शेजारी बसलेल्या दाढीवाल्याने त्याच्याकडे पाहिले व सहजपणे अभिवादन केले. जोनाथनने त्याचे आभार मानले व तो शांतपणे सूप पिऊ लागला. आपल्या मनातील उत्सुकता त्याला चेहऱ्यावर आणायची नव्हती. त्याने सूप संपवले आणि मग त्या माणसाचे लक्ष वेधत किंचित भिडस्तपणे त्याला विचारले. “सध्या कंपनीमध्ये भरती सुरू आहे?”

जोनाथनचा एकूण पोशाख व वागणे पाहून त्या माणसाला जोनाथनविषयी विश्वास वाटला असावा. “हां. म्हणजे तशा सतत नेमणुका होतच असतात. अर्थात मला फारशी माहिती नाही.”

“एका फ्युनरलला गेलो होतो. आपल्या काळ्या सुटाचे व टायचे समर्थन करण्यासाठी तो म्हणाला. “मी व्यवसायाने मशिनिस्ट आहे. तू?”

“इलेक्ट्रिकल इंजिनिअर.”

वाटला त्यापेक्षा तो जास्त हुशार निघाला होता. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगला चांगलीच मान्यता होती.

“मला वाटलं होतं की झिअॅंग ही बंदुकींच्या निर्मितीसाठी प्रसिद्ध आहे.”

“त्याला आता बरीच वर्षं होऊन गेली. आता ज्या मालाला मागणी त्याचा पुरवठा केला जातो. सर्व प्रकारची मशिनरी, अचूकपणा व उत्तम दर्जा ही आमची खासियत आहे. प्रिसिजन मशिनरी. एक्सट्रूडर्स, हिट एक्सचेंजर्स.”

“बंदुका बनवताना ह्या सर्व गोष्टी लागतातच.”

“छे. छे. आम्ही ग्राहकोपयोगी वस्तू बनवतो.”

“तुला इव्हा क्रुगर नावाची स्त्री ठाऊक आहे?”

“कुठल्या विभागात काम करते?”

“बहुतेक सेल्स किंवा मार्केटिंगमध्ये असावी. ती इंजिनिअर नाही. मला तिच्याबद्दल एवढंच ठाऊक आहे. पिंगट केस, हिरवे डोळे. दिसायला आकर्षक.”

“नाही बुवा.”

“ती हॅन्नेस हॉफमनबरोबर काम करते.”

“तो माणूस मला माहिती आहे. नवीनच आहे. जर्मनीहून आलाय. नवीन मालकांनी त्याला आणलाय. ज्या मजल्यावर फॅक्टरी आहे तिथेच त्याने आपलं प्रोजेक्ट सुरू केलंय. प्रोजेक्टबद्दल फारसं कुणाला काही माहीत नाही. पण आपल्या कामात तो माहीर आहे. जर तुझी मैत्रीण त्याच्यासोबत काम करत असेल तर तीही त्याच्याशी संबंधित असणारच. मी तुला इतकंच सांगू शकतो. इकडेतिकडे बघायला माझ्यापाशी वेळ कुठेय? माझ्या हाताखाली दहा रद्दड माणसं आहेत. त्यांना सांभाळता सांभाळता माझा जीव मेटाकुटीला येतो. ही क्रुगरबाई जर सेल्स किंवा मार्केटिंगमध्ये असेल तर ती कंपनीच्या मुख्य इमारतीत काम करत असणार. तू तिथे तिला शोध.”

वायनर श्निट्झल आणि पॉम्मेस फ्राईट्स घेऊन वेटर आला. त्या इंजिनिअरने गळ्याभोवती रुमाल गुंडाळला, आणखी एक बिअर मागवली आणि हावऱ्यासारखा तो अन्नावर तुटून पडला.

जोनाथनचे सारे लक्ष त्या माणसाच्या गळ्यात लटकणाऱ्या ओळखपत्रावर होते. ते कसे मिळवायचे हे त्याला ठाऊक होते पण आपल्यापाशी तितके धैर्य आहे का, याची मात्र त्याला खात्री नव्हती. काल रात्री आपल्या गाडीच्या काचेवर पिस्तूल टेकवणारा तो खुनी त्याला आठवला. आपल्या जागी तो असता तर एव्हाना काम करून मोकळाही झाला असता.

इंजिनिअरचे बकाबका खाणे सुरूच होते.

“जरा माझी जागा धरून ठेवशील?” जोनाथन त्याला म्हणाला. वाटले होते त्यापेक्षा तो खूपच आत्मविश्वासाने बोलला. गाडी नीट पार्क करून येतो.”

“खुशाल जा.” मान वरही न करता तो इंजिनिअर म्हणाला.

हिमवर्षाव सुरू होता. जोनाथनने शर्टाची कॉलर ताठ केली व जवळच्या केमिस्टच्या दुकानात तो शिरला. काऊंटरसमोर उभा राहात, त्याने आपले आंतरराष्ट्रीय वैद्यकीय ओळखपत्र दाखवले व पाचशे मिलिग्रॅम पॉवरच्या दहा ट्रायझोलम्सची ऑर्डर दिली. एरवी हाल्सिऑन या नावाने त्या गोळ्या प्रसिद्ध होत्या. आपल्या मागावर पोलीस आहेत याची निदान त्या क्षणी तरी त्याला फारशी फिकीर वाटली नाही. हाल्सिऑन हे निद्रानाशावर नियमित वापरले जाणारे औषध होते. दहा गोळ्यांच्या ऑर्डरमुळे कुणाला संशय येणे शक्य नव्हते. शिवाय स्वित्झर्लंडमधली केमिस्टची दुकाने अमेरिकेप्रमाणे सरकारी नव्हती, तर कौटुंबिक मालकींची होती. संगणकाच्या साहाय्याने ती दुकाने राष्ट्रीय पातळीवर जोडली गेलेली नव्हती. त्यामुळे त्यांना जोनाथनविषयी माहिती मिळाली असण्याचा काही संभव नव्हता. पोलिसांनी ई-मेल किंवा फॅक्स पाठवून दुकानदारांना सावध केलेले असेल ही एकच शक्यता होती; पण त्याने ती शक्यता मनातल्या मनात धुडकावून लावली. कारण लँडक्वॉर्टच्या घटनेला फार दिवस झाले नव्हते व सुस्त सरकारी यंत्रणेकडून इतक्या जलद हालचालींची अपेक्षाच नव्हती. थोडक्यात, तो सुरक्षित होता.

केमिस्टने त्याच्या हातात गोळ्यांची बाटली ठेवली. जोनाथन बाहेर पडला व दरवाजाबाहेर काही काळ रेंगाळला. बाटलीतल्या निम्म्या गोळ्या त्याने दहा फ्रँकच्या एका नोटेमध्ये व्यवस्थित गुंडाळल्या.

बरोबर नवव्या मिनिटाला तो रेस्टॉरंटमध्ये पुन्हा हजर होता.

“तुझ्यासाठी आणखी एक बिअर मागवू?” त्याने दाढीवाल्याला विचारले.

दाढीवाला आपल्या नशिबावर खूश झाला. “मागव ना.”

जोनाथनने त्याच्यासाठी बिअर व स्वत:साठी श्नॅप्स मागवली. “चिअर्स!” ड्रिंक्स आल्यावर तो म्हणाला. मद्याच्या एका घोटाने त्याचा आत्मविश्वास अधिकच वाढला. ओठांवरून जीभ फिरवत त्याने खिशातून पेन बाहेर काढले. “तुझी फारच मदत झाली. मला जरा तुमच्या पर्सोनेल डायरेक्टरचं नाव सांगशील?”

“आमची सार्वजनिक कंपनी आहे. इथे त्याला एचआरडी म्हणतात.” इंजिनिअरने त्याला नाव सांगितले. जोनाथनने नाव लिहून घेत असल्याचा बहाणा करता करता मनगटाने झटका देत हातातले पेन हवेत उडवले. ते पेन दाढीवाल्याच्या खुर्चीपलीकडे जाऊन पडले. अपेक्षेप्रमाणे इंजिनिअर खाली वाकून पेन शोधू लागला. जोनाथनने झटक्यात हाल्सिऑन पाच गोळ्या बिअरच्या ग्लासमध्ये टाकल्या. दाढीवाल्याने पेन परत केले. हात उंचावून जोनाथनने पुन्हा एकदा ‘चिअर्स’ केले.

ग्लास पुन्हा किणकिणले.

दहा मिनिटांत ग्लास रिकामा झाला होता व दाढीवाल्यासमोरची प्लेट स्वच्छ झाली होती. पावाच्या शेवटच्या तुकड्याचे दोन भाग करून त्याने तोंडात कोंबले. जास्त खाल्ल्यामुळे गोळ्यांचा परिणाम व्हायला उशीर तर लागणार नाही ना अशी शंका जोनाथनला वाटत होती.

इंजिनिअर आता अखंड बोलत सुटला होता. कंपनीच्या आफ्रिकेतील व मध्यपूर्व देशातील निर्यातीसंबंधी, त्यासाठी लागणारी कागदपत्रे, परवाने यासंबंधी अनावश्यक माहिती तो पुरवत होता. जोनाथनने घड्याळात पाहिले. गोळ्यांचा परिणाम सुरू झालेला असणार. अल्कोहोलमुळे त्यात भर पडणार होती. त्याच्या पापण्या जड झालेल्या दिसत होत्या. पण शब्दोच्चार मात्र अजूनही स्पष्ट येत होते. त्याने दाढीवाल्याच्या सुटलेल्या ढेरीकडे पाहिले. त्या पोटाला पाच गोळ्या कमी तर पडणार नव्हत्या ना?

“अच्छा. म्हणजे दक्षिण आफ्रिका हे तुमच्या निर्यातीचे मुख्य गिऱ्हाईक आहे तर!” इंजिनिअर उठून जाऊ नये ह्यासाठी जोनाथन त्याला बोलण्यात अडकवू पाहत होता.

“तिथेच तर गोंध...ल आहे. सगळा लाल फितीचा कारभार.”

“अस्सं,” आता मात्र नशा भिनू लागली होती.

“काय करणार? तुम्ही फाइच फरू फक्त...” अचानक त्याच्या पापण्या मिटल्या आणि बराच काळ उघडल्या नाहीत. मग अंगाला झटका बसावा तसा तो थरकला व त्याचे डोळे सताड उघडले. “फाय सांगत...” त्याचे डोळे पुन्हा मिटले गेले व मान खुर्चीच्या कडेवर डोलणाऱ्या बाहुलीसारखी कलंडली.

“मला जरा... बाथरूमला...” बारच्या आडव्या टेबलाला धरत त्याने उभं राहण्याचा प्रयत्न केला पण गुडघा वाकल्याने तो कोसळणारच होता. तितक्यात जोनाथनने त्याला धरले. “जरा जपून. थांब, माझा हात पकड.”

अतिशय सावकाशपणे त्याने त्या इंजिनिअरला रेस्टॉरंटच्या मागे आणले व पायऱ्या चढत तो त्याला पुरुषांच्या स्वच्छतागृहात घेऊन गेला. दुसऱ्या मिनिटाला जोनाथनच्या

शर्टावर झिअॅगचे ओळखपत्र लटकत होते. मिस्टर वॉल्टर केलर मात्र आजची दुपार त्या स्वच्छतागृहाच्या एका काळोख्या कोपऱ्यात छानपैकी झोपून घालवणार होता.

४७

थांबा आणि संधीची वाट पाहा.

पिशाचाने समोरच्या रस्त्यावरून रेस्टॉरंटकडे एक नजर टाकली. वर्तमानपत्रे आणि मासिके विकणाऱ्या टपरीशेजारची जागा त्याने निवडली होती. फुटबॉल सामन्यांच्या बातम्या चाळत त्याने काही वेळ घालवला. टपरीचा मालक आपल्यावर वैतागलाय हे लक्षात येताच त्याने काही चुइंगम, एक सिगारेटचे पाकीट (जरी तो धूम्रपान करत नसे) आणि कॉरिअरा डेल्ला सेरा हे इटालियन वर्तमानपत्र विकत घेतले.

काखेत पेपर अडकवून तो रस्त्याच्या दुसऱ्या टोकापर्यंत चालत गेला. रात्रीच्या समरप्रसंगामुळे तो पार थकून गेला होता. महत्प्रयासाने गाडी चालवत त्याने ते शेवटचे छोटेसे अंतर कसेबसे पार केले होते. आपली जखमी अवस्था कुणाच्याही लक्षात येणार नाही याची मात्र त्याने पुरेपूर काळजी घेतली होती. नेपल्समध्ये खास शिवून घेतलेला करड्या रंगाचा सूट त्याने घातला होता. पायात पिवळसर रंगाचे उंची बूट होते. आज तो एक इटालियन व्यापारी बनून वावरत होता. काल तो स्विस गिर्यारोहक होता, तर परवा जर्मन पर्यटक झाला होता. आपल्या खऱ्या नावाने वावरायची मात्र त्याला मनाई होती. गुन्हेगारी जगात गेली वीस वर्षे घालवताना त्याने स्वत:च्या सहवासात वेळ घालवणे शक्यतो टाळले होते.

एका डीलरच्या दुकानासमोरून गाडी बाहेर काढत असताना आज पहाटे त्याने जोनाथनला गाठले होते. कुणी आपला पाठलाग करतोय का ह्या संशयाने बावचळून गेलेला तो अमेरिकन त्याला नवखा आणि वेंधळा वाटला होता. ज्या वेळेस गाडीचा वेग वाढवायला हवा होता त्या वेळेस तो संथपणे गाडी चालवायचा. मागे वळून पाहण्यासाठी अनेक वेळा गाडी थांबवायचा; पण त्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ होते कारण त्याच्या गळ्यात लटकणाऱ्या त्या लॉकेटमुळे तो स्वत:ला लपवू शकत नव्हता.

पिशाचाने, थांबा व वाट पाहा हे धोरण स्वीकारले होते व त्यात तो खूश होता. आपल्या लक्षयाला जास्तीतजास्त जवळून मारणे ही त्याची खासियत होती. प्रत्येक बळी टिपताना त्याने पक्की योजना आखलेली असायची व शेवटपर्यंत तो सतर्क राहत असे. संधी मिळालीय म्हणून त्याने कधीही कुणावर बेफिकीरपणे गोळी झाडली नव्हती. तो आधी ठिकाण ठरवायचा, सापळा रचायचा आणि वाट पाहत शांतपणे बसून राहायचा. लॅमर्सचा बळी हे त्याच्या योजनाबद्धतेचे उत्कृष्ट उदाहरण होते. ब्लिट्झच्या बाबतीत त्याला पुरेसा वेळ मिळाला नव्हता. रॅन्सम मात्र त्याची कसोटी पाहत होता. हे काम कदाचित त्याला झटपट उरकावे लागणार होते.

शिवाय काल पडलेले ते स्वप्न त्याचा पिच्छा पुरवत होते.

रॅन्समच तुझा कर्दनकाळ ठरणार आहे.

पिशाचाने दैववादी होण्याचे नाकारले. कॉफीच्या मळ्यात काम करणारे आपले

अशिक्षित आईवडील भलेही अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणारे होते; पण मी तर सुशिक्षित आहे आणि तरीही...

त्याच वेळी त्याने रॅन्समला रेस्टॉरंटमधून बाहेर पडताना पाहिले.

त्या अमेरिकन माणसाने रस्ता ओलांडला व पाहता पाहता तो गर्दीत दिसेनासा झाला होता.

पण इतक्या लवकर त्याला रॅन्समजवळ जायचे नव्हते.

योग्य संधी मिळणार याची त्याला खात्री होती.

तोपर्यंत तो थांबणार होता व शांतपणे वाट पाहणार होता.

आणि प्रार्थना म्हणत राहणार होता.

४८

जोनाथन दुपारच्या एक वाजेपर्यंत थांबून राहिला. एक वाजता गर्दी होणार हे त्याला ठाऊक होते. जेवण आटपून फॅक्टरीत परत जाण्यासाठी माणसे दरवाजापाशी जमू लागली तसा त्याने बारा जणांचा एक गट पकडला व त्यांच्यामधून तो आत शिरू लागला. दाराजवळ असलेल्या गाडीपाशी एकच सुरक्षा रक्षक उभा होता. त्याची नजर चुकवणे त्याला फारसे अवघड गेले नाही. त्याने गळ्यातला टाय काढून जॅकेटची कॉलर ताठ केली होती. फोटो दिसू नये म्हणून गळ्यातले ओळखपत्र उलटे फिरवले होते.

इमारतीच्या आत एकही गार्ड नव्हता. फक्त एक इलेक्ट्रॉनिक मशिन होते. पुरुष एका बाजूने आत जात होते तर स्त्रिया दुसऱ्या बाजूने. भिंतीच्या कपाटावर एक घड्याळ होते. आपण कुणाच्या दृष्टीस पडू नये म्हणून त्याने आपली नजर जमिनीवर रोखली होती. मशिनजवळ येताच त्याने अंदाजे एक कार्ड उचलून ते मशिनमध्ये पंच केले. नशिबाने ते कार्ड त्याच्या मागे उभे असलेल्या सहा-सात जणांपैकी कुणाचेही नव्हते. स्वच्छतागृहाशेजारी एक कपाट होते. त्यात इस्त्री केलेली अनेक जॅकेट्स ठेवलेली होती. आपल्या अंगाला बसेल असे एक जॅकेट निवडून तो फॅक्टरीच्या मजल्यावर आला.

एखाद्या बंदिस्त क्रीडांगणाएवढी त्या मजल्यावर ऐसपैस जागा होती. येणाऱ्याजाणाऱ्या कर्मचाऱ्यांची वर्दळ सुरू होती. काही जण चालत होते तर काही छोट्याशा विद्युतचलित गाड्या चालवत होते. भिंतीजवळ कागदपत्रांचे ढीग पडलेले होते.

वाटेत स्टेनलेस स्टीलचे अनेक टँक्स होते. हौदांना वळसा घालत तो पुढे गेला. एका मोठ्या औषधी कंपनीसाठी ते टँक्स बनवले जात असल्याचे त्याला कळले. त्याने कुतूहलाने विचारलेल्या प्रश्नांना आजूबाजूचे कर्मचारी अगदी तत्परतेने उत्तरे देत होते. झुग ही आता खरोखरच शस्त्रास्त्रे निर्मितीची उत्पादक कंपनी राहिलेली नव्हती.

फॅक्टरीच्या टोकाला एक मोठा हॉल होता. फारच थोडी माणसे त्यातून आत-बाहेर जात होती. दरवाज्यावर छोटा कॅमेरा बसवलेला होता. दरवाज्याच्या पाटीवर 'थॉर' ही अक्षरे छापलेली होती. थर्मल हिटिंग अँड ऑपरेशन्स रिसर्च. प्रवेश मर्यादित.

थॉर. एम्माच्या फ्लॅश ड्राईव्हवर त्याने हे नाव वाचले होते. ब्लिट्झच्या टेबलावरील कागदांवरसुद्धा हेच नाव होते. पहिल्या चौमाहीची कामे पूर्ण झाली आहेत. १०.२ पर्यंत माल पाठवला जाईल. १३.२ पर्यंत सर्व मशिन्सचे भाग पुन्हा सुटे केले जातील. त्याला तो मजकूर आठवला.

हॉलमधून आत जाण्याऐवजी त्याने दुसरा मार्ग निवडायचे ठरवले. त्याने मुख्य इमारतीत प्रवेश केला. खालीच एक पाटी होती. पहिला मजला : स्वागत कक्ष. दुसरा मजला : हिशेब विभाग. तिसरा मजला : विक्री, वितरण, जाहिरात. लिफ्टमध्ये जाऊन त्याने तिसऱ्या मजल्याचे बटण दाबले.

तो तिसऱ्या मजल्यावर पोहोचला. तिथल्या प्रत्येक केबिनला ३.१, ३.२ असे क्रमांक दिलेले होते. हॅन्नेस हॉफमनचे केबिन अगदी टोकाला होते. केबिनच्या बाहेर त्याची सेक्रेटरी बसलेली होती.

“मिस्टर हॉफमनला भेटायचंय.” टेबलावर असलेल्या एका छोटच्या पेटीशी चाळा करत त्याने अगदी सहजपणे तिला सांगितले.

“कोण आलंय म्हणून सांगू?”

ओळखपत्र चोरलेल्या त्या माणसाचे नाव त्याने सांगितले. “त्याला काही नमुने दाखवायचे आहेत.”

सेक्रेटरीचे लक्ष त्याच्या ओळखपत्राकडे गेले नाही.

ती ‘थॉर’ कंपनीची कर्मचारी नसावी हे त्याने ताडले.

“मी फोन करून सांगते.”

“त्याची काही गरज नाही. तो माझीच वाट बघतोय.”

आता त्याला कुठल्याही परिणामांची फिकीर नव्हती. एम्माचे रहस्य उलगडायचे ह्या एकाच आसेपोटी, थॉरबद्दल व एकूण सर्वच गोष्टींबद्दल वाढणारे कुतुहूल शमवण्यासाठी त्याने केबिनचा दरवाजा बेधडकपणे उघडला व हॅन्नेस हॉफमनच्या ऑफिसमध्ये पाऊल ठेवले.

४९

हॅन्नेस हॉफमन एका प्रशस्त लाकडी टेबलामागे बसून फोनवर बोलत होता. फोनवरून सूचना देता देता एकीकडे समोरच्या कागदावर काहीतरी झरझर लिहीत होता. दिसायला गुबगुबीत, चेहरा समाधानी पण निर्विकार कपाळावरून उलटे फिरवलेले पिंगट केस व रुंद चेहऱ्यामुळे दोन निळसर डोळ्यांमधले जाणवण्याएवढे अंतर. ब्लिट्झच्या टेबलावर त्याचा फोटो होता. हुबेहूब तसाच तो दिसत होता. जोनाथनने याआधी शंभर वेळा तरी तो चेहरा पाहिला होता... इतका ओळखीचा तरीही अनोळखी.

जोनाथनला पाहताच तो दचकला. त्याची तीक्ष्ण नजर तीरासारखी जोनाथनच्या डोळ्यात घुसली. हाच का तो? त्याच्या मनात उमटलेला प्रश्न, त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. जोनाथन जागेवरून हललादेखील नाही. आपल्या हातातली सॅम्पलची पेटी कुठे ठेऊ असे त्याने किंचित हसत त्याला विचारले. हॉफमनने त्याला एकवार वरपासून खालपर्यंत न्याहाळले व ती पेटी टेबलाच्या कडेला ठेवायला खुणेनेच सांगितले. हॉफमन पुन्हा फोनवर बोलण्यात गर्क झाला.

“उद्या सकाळी दहा वाजता कस्टम्सच्या गोदामात माल पोहोचायला हवा.” तो सांगत होता. “याहून जास्त मुदतवाढ मिळणे शक्य नाही. काही अडचण आली तर मला ताबडतोब कळवा.” हॉफमनने फोन ठेवला व त्याने आपल्या पाहुण्याकडे एक जळजळीत नजर टाकली. “कोण तू?”

“काल आपण फोनवर बोललो होतो.”

हॉफमन हादरला “मिस्टर श्मिड?”

“बरोबर.” जोनाथनने हातातला बॉक्स शांतपणे टेबलावर ठेवला. “तुला हवं तर आरडाओरडा करू शकतोस. अजून तुला संधी आहे. कर सुरुवात. तुझ्या सेक्रेटरीला हाका मार.”

हॉफमन खडकासारखा अचल राहिला. तो एक शब्दही बोलला नाही.

“तू नाही ओरडू शकत. हो ना?” जोनाथन बोलत सुटला. “तू जर ओरडलास तर इथे पोलीस धावत येतील. मग त्यांना मी तुझे इव्हा क्रुगरबरोबरचे सर्व कारनामे सांगून टाकीन. तुला ते परवडणार नाही. बरोबर ना?”

“तुझं म्हणणं बरोबर आहे.” हॉफमननेही शांतपणे उत्तर दिले. “पण त्यात आपल्या दोघांचाही फायदा नाही. जसा मी ओरडू शकत नाही तसाच तूही माझ्याकडून एक चकार शब्दसुद्धा वदवून घेऊ शकत नाहीस.”

“ती कशात गुंतली होती एवढंच मला हवंय.”

हॉफमनने हाताची घडी घातली. “डॉक्टर रॅन्सम, जरा शांतपणे बस. मला वाटतं आपण हा खेळ खेळणं आता थांबवू या.”

जोनाथन सावकाशपणे अंदाज घेत टेबलाजवळ गेला व खुर्चीच्या टोकावर बसला. कमरेभोवती अडकवलेले पिस्तूल पाठीच्या मणक्याला टोचत होते. “तुमचं काम नक्की कसं चालतं? मोठ्या कंपनीत तुम्ही छोटी कंपनी लपवली आहे ना? म्हणजे घरात राहून चोरटा व्यवहार, असंच ना?”

हॉफमनने वैतागून खांदे उडवले. “अंदाज बांधणं थांबव.”

“माझ्यामते तुम्ही नको ती गोष्ट बनवताय आणि नको त्या माणसांना ती पुरवताय. काय बनवताय तुम्ही? बंदुका? क्षेपणास्त्रं? रॉकेट्स? नाहीतर या इथे येऊन दुकान उघडण्याचं कारणच काय? तुझ्या ‘थॉर’ ने एक अख्खा मजला व्यापलाय. ‘थर्मल हिटिंग ऑपरेशन्स रिसर्च’ ही काय भानगड आहे?”

हॉफमन पुढे झुकला. आता त्याच्या चेहऱ्यावर हसू नव्हते. “तू कुठल्या जाळ्यात अडकलायस याची तुला काहीच कल्पना दिसत नाही.”

“मला थोडीफार कल्पना आलीय. गेल्या वर्षी आम्ही लेबेनॉनला असताना तुम्ही एम्माला जाळ्यात ओढलंत. आमच्या संस्थेतल्या कुणाला तरी गाठून तुम्ही माझी इथे बदली करवून घेतलीत.”

“ह्या गोष्टीला लेबेनॉनच्या आधीच सुरुवात झाली होती.” हॉफमन म्हणाला.

“शक्य नाही.” जोनाथन चिडला. “सुरुवात बैरुतमध्येच झाली. तिने निर्णय घेतला तेव्हा मी तिच्याबरोबर होतो.” त्याला आपल्या म्हणण्याची खात्री वाटत होती. त्याच वेळेस तिची डोकेदुखी सुरू झाली होती व तिला नैराश्याचे झटके येऊ लागले होते. “तुला भेटायला ती पॅरिसमध्ये आली होती ना?”

“हां. हां. पॅरिस. मला आठवतंय. त्या वेळेस तू तिला हॉटेलवर अनेक वेळा फोन करत होतास. आम्हाला तुझे कॉल्स तिच्यापर्यंत पोहोचवायचे होते, पण नेमका काहीतरी तंत्रिक बिघाड झाला होता. असं व्हायला नको होते. त्या वेळेस तिने एका मैत्रिणीची मदत घेतली होती. तुझा तिच्यावर पण विश्वास आहे असं तिने मला सांगितलं होतं. पण मला वाटते, तुझा तिच्यावर विश्वास नसावा.”

त्याच्या खवचट बोलण्याकडे जोनाथनने दुर्लक्ष केले. “तू कोणासाठी काम करतोयस?”

“मी एवढंच म्हणेन की आमचा गट अतिशय प्रबळ आणि प्रभावशाली आहे. आता तू स्वत:कडेच बघ ना. तुझ्याजवळ मर्सिडिज आहे. मला वाटतं... घसघशीत रक्कमसुद्धा आहे. ब्लिट्झचा बंगला तर तू पाहिलेलाच आहेस. शिवाय आमचं इथलं वैभवही तू बघतोच आहेस.” हॉफमनने टेबलावर हात टेकवले. जणू एखाद्या विमा एजंटसारखे मधाळ बोलून तो त्याच्या गळ्यात आयुष्यभराची पॉलिसी अडकवत होता. “मला वाटतं एव्हाना तुझ्या लक्षात आलंच असेल.”

“लक्षात आलं तरी मला त्याचं कौतुक नाही वाटत.”

“डॉक्टर रॅन्सम, तू आता मागे फिर.” हॉफमनने त्याला खणखणीत इशारा दिला. “हे ऑफिस सोडून निघून जा. या देशातून बाहेर पड. पोलिसांकडे असलेली सगळी पकडवॉरंट्स मी रद्द करून घेतो. तू तुला हवं ते करू शकतोस. अट फक्त एकच. पुन्हा मागे वळून पाहायचं नाही. या सर्व गोत्यातून तू अजूनही सहीसलामत बाहेर पडू शकतोस.”

“म्हणजे काल ज्या माणसाने माझा खून करायचा प्रयत्न केला, त्यालाही तू माझ्या

वाटेतून बाजूला करणार?”

“त्याबद्दल मात्र मला काहीच ठाऊक नाही.”

“आणि मग ज्या पोलिसांनी एम्माची बॅग पळवण्याचा प्रयत्न केला, ते कशासाठी? का त्याबद्दलही तुला काहीच ठाऊक नाही?”

“पोलिसांना आम्हीच विकत घेतलं होतं. पण त्यांनी जरा जास्तच उत्साह दाखवला. त्याबद्दल मी माफी मागतो. नशिब एवढंच की तू त्यातून तरून गेलास.”

“मग ब्लिट्झला कुणी मारलं?”

हॉफमन क्षणभर विचारात पडला. “आमच्यापेक्षा अगदी निराळाच उद्देश असलेल्या एका गटाने.”

“थॉरची कल्पना पसंत नसलेल्या गटाने? आणि मग जर आजचा सूर्यास्त मी पाहू नये अशी त्यांची इच्छा असली तर?”

“मी त्यांच्या वतीने कसं बोलू? कदाचित त्यांना वाटलं असावं की तू तुझ्या बायकोला साथ देतोयस, म्हणून ते तुझ्या जिवावर उठले असतील.”

“म्हणजे त्यांना वाटतंय की मी तुझ्याबरोबर काम करतोय, असंच ना?”

हॉफमनची भुवई उंचावली गेली. जोनाथन आपल्याबरोबर काम करतोय ही कल्पनाच त्याला रुचली नव्हती. “काही असलं तरी त्याबाबतीत मी तुझी मदत करू शकत नाही.”

“मला तुझा प्रामाणिकपणा आवडला.” जोनाथन म्हणाला. “दुर्दैवाने त्यामुळे माझा प्रश्न मात्र सुटत नाही.”

हॉफमनने खुर्ची मागे सरकवली. आपले हात कपाळामागे घेत तो रेलून बसला. औपचारिक भाग बोलून संपलाय हे त्याला सुचवायचे होते. आता मित्राच्या नात्याने ते बोलू शकत होते. “डॉक्टर रॅन्सम, मला तुझ्याबद्दल आपुलकी वाटते. तिने तुला अंधारात ठेवलं हे तुला पचवणं किती अवघड आहे हे मी समजू शकतो. माझं लग्न फक्त तीन वर्षं टिकलं. तू तर आठ वर्षं टिकवलंस. अलिकडे इतकं कुणालाच जमत नाही.”

अचानक जोनाथनला काहीतरी जाणवले. तो बोलत असताना वारंवार पापण्या मिचकावत होता. अधूनमधून चाचरतही होता. फार वर्षांपूर्वी असाच एक माणूस त्याच्या पाहण्यात आला होता.

“मी तुला पुन्हा एकदा सुचवतो,” हॉफमनने आपले बोलणे सुरू ठेवले. “लवकरात लवकर इथून बाहेर पड आणि हा देश सोडून निघून जा. तुला कसलीही इजा करायची आमची बिलकूल इच्छा नाही. आमच्या लेखी तू अतिशय चांगला माणूस आहेस. तू कळतनकळत आम्हाला खूप मदत केलीयेस. आमच्या कामात दखल घेणार नाहीस असा मला शब्द दे आणि बघ की सगळ्या कुत्र्यांची तोंडं मी बंद करून टाकतो.”

“आणि हा मी तुझा पक्का शब्द मानू?”

“होय.”

हे बोलतानाही हॉफमनच्या पापण्या फडफडल्या आणि त्याचक्षणी जोनाथनला त्याची ओळख पटली. त्या गोष्टीला आता पाच किंवा अधिक वर्षांही उलटली असावीत पण हा माणूस कोण आहे ते मात्र आता त्याला पक्कं उमगलेलं होते.

ती गोष्ट लेबेनॉनच्या आधीचीच होती.

“मी तुला ओळखतो.”

हॉफमन त्यावर काहीच बोलला नाही. त्याचे गाल मात्र हळूहळू लालसर होत गेले.

जोनाथन बोलू लागला. “तू मॅकेन्ना आहेस. युनोच्या कोसोव्हो विभागाचा अधिकारी. मेजर. बरोबर?”

कुणीतरी आपली मस्करी करतोय अशा थाटात हॉफमन गालातल्या गालात हसला. जोनाथनची त्याला गम्मत वाटत होती. बर्लिनमध्ये राहणारा जर्मन माणूस सहसा फारसे हसत नाही. पण आता त्या कठोर चेहऱ्यावर मिश्किल भाव होते. “तुला खूपच वेळ लागला जॉनी, पण बरोबर ओळखलंस. आपण कोसोव्होलाच भेटलो होतो. ३१ डिसेंबरच्या रात्री. बऱ्यापैकी झिंगलोही होतो. तू, मी आणि एम. त्यानंतर माझं थोडं वजन वाढलंय. पण कुणाचं वाढलेलं नाही? अर्थात तू मात्र होता तसाच आहेस.”

तो तोच होता. मॅकेन्नाच! वजन चाळीस पौंडांनी वाढले होते. केस थोडे गळले होते. मिशा पांढरट झाल्या होत्या. पण तो तोच होता. मिचकणारे डोळे. ‘जॉनी’ या नावाने हाक मारायची त्याची ती जुनी, चीड आणणारी लकब.

जोनाथनच्या कपाळावरची शीर ताडताड उडू लागली. कोसोव्हो. ब्रिटिश लष्करी बंगल्यामधील नववर्षाची पूर्वसंध्या. रात्री बाराच्या ठोक्याला चंगीभंगी कपडे घालून व हातात बॅगपाईप्स घेऊन मेजर जॉक मॅकेन्नाने बंगल्यात प्रवेश केला होता. त्याने बॅगपाईप्सवर एक फार जुनी धून वाजवली होती. आणि अचानक त्याच्या डोक्यात प्रकाश पडला होता. त्याची ओळख पटायला आपल्याला एवढा वेळ का लागला याचे कारण त्याच्या लक्षात आले होते.

“पण तू तर मेलेला आहेस. आम्ही तो देश सोडण्याआधी दोनच दिवस, तू एका मोटार अपघातात ठार झाला होतास.”

आपले आणखी एक बिंग फुटलेय हे लक्षात येऊनसुद्धा त्याने बेफिकीरपणे खांदे उडवले. “पण तू बघतोच आहेस की मी मेलेलो नाही.”

“साल्या, तू आहेस तरी कोण?” जोनाथनचा संताप अनावर झाला.

“माझ्या गरजेनुसार मी माझं नाव बदलतो.”

हॉफमनने अचानक टेबलामागून उडी मारली. कमरेभोवतीचे पिस्तूल पकडताना जोनाथन धडपडला. त्याचा वेग फारच कमी पडला होता. एखाद्या नवख्यासारखा. त्याच्या दिशेने एक हात झपकन आला आणि त्याच्या हातातले पिस्तूल जमिनीवर पडले. हॉफमनच्या दुसऱ्या हातात एक दुधारी चाकू होता. त्याने तो जोनाथनवर उगारला. जोनाथनची मान थोडक्यात बचावली, पण चाकू कॉलरमधून आत घुसला होता. खुर्ची ढकलत जोनाथनने मागे उडी मारली.

“चल, आता तुझी पाळी.” हॉफमन त्याच्या पुढ्यात आला. “ओरड. तुला पोलीस हवे आहेत? बोलाव त्यांना. मला काहीच फरक पडत नाही कारण मी एका खुन्यापासून स्वत:चा बचाव करतोय.”

जोनाथनने खुर्ची उचलली व त्या आडदांड माणसावर तो धावून गेला. हॉफमनने पुन्हा एकदा चाकू उगारला. जोनाथनने खुर्ची पुढे करत तोही वार चुकवला.

त्याचे लक्ष टेबलाकडे गेले. त्याने आणलेल्या बॉक्समध्ये स्टेनलेस स्टीलचे व्हॉल्व्हज होते. प्रत्येकाचा आकार ग्लासाएवढा होता व वजन साधारण एक किलो होते. जोनाथन

अचानक पुढे सरसावल्याने हॉफमनला मागे सरावे लागले. जोनाथनने चटकन त्या पेटीतला एक व्हॉल्व्ह उचलला. एका हातात खुर्ची व दुसऱ्या हातात् व्हॉल्व्ह सांभाळता सांभाळता त्याचा तोल जातोय हे हॉफमनच्या लक्षात आले व त्याने जोनाथनवर हल्ला चढवला. खुर्चीचा पाय पकडत त्याने ती जोरात ओढली व त्याच वेळेस दुसऱ्या पायावर जोर देत त्याने चाकू उगारला. झूंऽऽ असा आवाज करत, जोनाथनच्या डोळ्यासमोर एक चंदेरी पात लखलखले. ह्या खेपेस चाकू जॅकेटच्या आरपार घुसला व त्याची छाती ओरबाडली गेली. जोनाथनने आपल्या हातातला व्हॉल्व्ह खाली आणला. हॉफमनच्या भुवईवर तो आपटला आणि डोळ्याच्या किंचित वर एक जबरदस्त घाव बसला. हॉफमन हडबडला, पण दुसऱ्या क्षणी जोनाथनवर त्वेषाने धावून आला. त्याने जोनाथनच्या हातातली खुर्ची त्याच्याच अंगावर दाबून धरली. जोनाथनने हातातला व्हॉल्व्ह खाली टाकला व दोन्ही हातांनी खुर्ची गच्च पकडली. पण हॉफमन हा अधिक आडदांड व दणकट माणूस होता. चाकूचे पाते जोनाथनच्या चेहऱ्याजवळ येऊ लागले. आपल्या गळ्याच्या बाजूला झोंबणारी वेदना होतेय हे जोनाथनला जाणवले.

त्याच वेळेस दरवाजावर थाप पडली.

“मिस्टर हॉफमन, सारं काही ठीक आहे ना?”

“एकदम ठीक.” अतिउत्साहाच्या भरात हॉफमनने खवचट उत्तर दिले. तो खुर्चीवर झुकला. त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. कपाळावर घाम थपथपत होता. दोघांमध्ये फक्त एका मीटरचे अंतर होते. त्याने हल्ला करण्यासाठी हात उगारला.

अचानक जोनाथन खाली वाकत गुडघ्यावर बसला व त्याने हातातली खुर्ची डावीकडे झुकवली. काही कळायच्या आत, हॉफमन तोल जाऊन पुढे पडला. जोनाथन त्याच्या समोर उभा राहिला व बॉक्समधला आणखी एक व्हॉल्व्ह उचलून त्याने त्याच्या डोक्याचा मागच्या बाजूस प्रहार केला. हॉफमनने उठायचा प्रयत्न केला पण तोपर्यंत जोनाथनचा आणखी एक फटका त्याला बसलेला होता.

हॉफमन फरशीवर कोसळला.

“मिस्टर हॉफमन!” सेक्रेटरी आता दरवाजा बडवू लागली होती. “प्लीज, कसला आवाज येतोय? मी आत येऊ का?”

जोनाथन तिच्या आवाजाने चक्रावला. टेबलाचा आधार घेत त्याने स्वत:ला सावरले. टेबलावरच्या काचेत त्याला आपले प्रतिबिंब दिसले. तो स्वत:कडे पाहू शकला नाही. गळ्याला झालेल्या जखमेतून रक्त वाहात होते. मेंदूची रक्तवाहिनी थोडक्यात बचावली होती. खिशातून रुमाल काढून त्याने तो जखमेवर दाबून धरला.

“एक सेकंद.” हॉफमनच्या मिश्किल आवाजाची नक्कल करत तो म्हणाला.

त्याने सभोवताली पाहिले. टेबलामागील खिडकीतून तळमजला दिसत होता. तो चौथ्या मजल्यावर होता. खाली उतरण्यासाठी ड्रेनेज पाईपचा आधार नव्हता. तो धावत दरवाजापाशी गेला. खाली पडलेले पिस्तूल उचलून त्याने ते कमरेच्या आत खोचले.

“आत ये.” तो म्हणाला.

सेक्रेटरी घाईघाईने आत शिरली. तिला काही समजायच्या आतच जोनाथनने दरवाजा लावून घेतला.

“बापरे! हे काय झालंय?” ती थरथर कापत होती.

जोनाथनने तिला दरवाजावर दाबून धरले. “तू जर शांत राहिलीस तर मी तुला काहीही करणार नाही. आलं तुझ्या लक्षात?”

सेक्रेटरीने जोरजोरात मान डोलावली. “पण...”

“श्श...” तो म्हणाला. “तुला काहीही होणार नाही. विश्वास ठेव. आणि शांत हो.”

त्या स्त्रीचे डोळे भीतीने विस्फारलेले होते.

त्याने तिच्या गळ्याजवळची नस जोरात दाबली आणि मेंदूला पुरवणारा रक्तप्रवाह तोडून टाकला. तिने एक आचका दिला व ती बेशुद्ध पडली. त्याने तिला हलकेच कार्पेटवर झोपवले. तिला शुद्धीवर यायला कमीतकमी दोन ते दहा मिनिटांचा काळ लागणार होता. हॉफमन त्याहून जास्त वेळ घेणार होता.

जोनाथनने पुन्हा एकदा खोलीचा आढावा घेतला. तो खिडकीतून नक्कीच खाली उतरणार नव्हता. त्याने अंगातले निळे जॅकेट उतरवले. त्याला हॉफमनचे जॅकेट दिसले. जॅकेट घालताना त्याने गळ्याजवळचे बटण लावायची दक्षता घेतली. तो गॅलरीमधून सावकाश चालू लागला. त्याने मान खाली घातली होती व गळ्याजवळ रुमाल धरला होता. जिना उतरत तो तळमजल्यावर आला आणि मुख्य दरवाजातून बाहेर पडला. थोडेसे अंतर चालल्यावर तो वेगात चालू लागला व त्यानंतर तो अक्षरशः धावत सुटला.

मर्सिडिज दिसल्यावर त्याला हायसे वाटले. गाडीत शिरताच त्याने ड्रॉवरमधून फर्स्टएड बॉक्स बाहेर काढला. जखमेवर बँडेज लावत त्याने त्यावर पट्टी चिकटवली. वेदना थोड्या कमी झाल्या होत्या, पण जखमेला टाके घालणे आवश्यक होते.

गळ्यावर एक हात धरून त्याने गाडी हळूहळू शहराबाहेर आणली. ऑटोबन्हला आल्यावर त्याने बर्नच्या दिशेने गाडी वळवली.

आता त्याला फक्त एकच सुरक्षित जागा ठाऊक होती.

५०

व्हॉन डॅनिकनने आपली गाडी हायवेच्या उजव्या पट्ट्यात घेतली व अॅक्सिलरेटर दाबत गाडीचा वेग १८० वर नेऊन ठेवली. गाडी उतारावरून भरधाव जाऊ लागली. बाजूला निळ्याशार पाण्याचा जिनिव्हा तलाव पसरला होता. तलावापलीकडे दूर दिसणाऱ्या फ्रेंच हॉट सॅवोईच्या उंच हिमशिखरांच्या गळ्यात जणू मेघांची पुष्पचक्रे घातली गेली होती.

जिनिव्हाच्या सरहद्दीवरील न्यॉनला पोहोचताच त्याचा सेलफोन वाजू लागला.

"ऱ्होड, झुरिच वैद्यकीय तपासणी विभाग."

"बोला डॉक्टर," काल रात्री आपण ऱ्होडचा फोन कट केला होता हे त्याच्या एकदम लक्षात आले.

"लॅमर्सच्या शवचिकित्सेबद्दल बोलायचं होतं. आम्हाला एक विचित्र गोष्ट सापडलीय." ऱ्होडने आपल्या निरीक्षणांबद्दल त्याला पूर्ण माहिती दिली. बॅट्रॅकोटॉक्सिन बेडकाच्या विषात घोळवलेल्या पिस्तुलाच्या गोळ्या वगैरे गोष्टींबद्दल तो काही मिनिटे बोलत राहिला. "न्यू स्कॉटलंड यार्डमध्ये काम करणारा माझा मित्र डॉक्टर विक्सने मला खात्रीपूर्वक सांगितलं की, ज्या कुणी लॅमर्सला मारलं असेल तो इसम एके काळी सेंट्रल इंटलिजन्स ब्युरोमध्ये काम करत असलाच पाहिजे."

व्हॉन डॅनिकन त्यावर काहीच बोलला नाही. सीआयए. त्यांचा संबंध होता तर! ब्लिट्झ हा जर्मन नागरिक नसून इराणी होता व त्याने इराणच्या लष्करात काही काळ काम केले होते हे जेव्हा उघड झाले, त्याच वेळेस त्याच्या खुनामागे एका व्यावसायिक गुप्तहेर संघटनेचा हात असणार हे ही स्पष्ट होऊन गेले होते. त्याला फिलिप पालुंबोची आठवण झाली. एकतर या योजनेत त्याचा सहभाग नसावा किंवा त्याने आपल्यापासून ही माहिती मुद्दाम लपवून ठेवलेली असावी.

ऱ्होडचे आभार मानत त्याने फोन बंद केला. गाडी शहरामध्ये शिरताच हायवे अरुंद होत गेला. डावीकडे एक मोठे उद्यान होते व किनाऱ्याला एक बर्फाच्छादित कुरण खाली उतरत गेले होते. त्या मैदानावर सरकारी कार्यालयांच्या अनेक इमारती होत्या. एकेक इमारत ओलांडत तो पुढे जाऊ लागला. युनायटेड नेशन्स. दि जनरल अॅग्रीमेंट ऑन टॅरिफ्स अँड ट्रेड. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन. त्याला हवी असलेली इमारत अगदी टोकाला होती.

रु डे लॉसेनला त्याने गाडी थांबवली. समोर एक चायनीज रेस्टॉरंट व तुर्किश शिंप्याचे दुकान होते. बारा वाजून पाच मिनिटे झाली होती. त्याला उशीर झाला होता. ज्या व्यक्तीला तो भेटणार होता ती व्यक्ती बिचारी खोळंबून राहिलेली असणार. व्हॉन डॅनिकन तिला आणखी काही मिनिटे वाट बघायला लावणार होता.

फोन नंबर शोधण्यासाठी त्याने सेलफोनवर 'झ्' हे अक्षर दाबले. त्याच्या कानात

चित्रविचित्र आवाज शिरला. जगातल्या कुठल्या कोपऱ्यातून तो आवाज येत होता हे कळणे मुश्किल होते.

“हॅलो मार्क्स,” खरखरीत आवाजात उत्तर आले. उच्चार अमेरिकन होते.

फिलीप पालुंबो कुठून बोलतोय हे विचारण्याची व्हॉन डॅनिकनला आवश्यकता वाटली नाही. “मला वाटतं, आता आपण मित्र राहिलेलो नाही.” सुरुवातीचे वायफळ बोलणे टाळत तो म्हणाला.

“काल मी जी तुला बातमी सांगितली, त्याबद्दल तू फोन केलायस?”

“त्याचबद्दल. मला क्विताब म्हणजे गॉटफ्रिड ब्लिट्झसंबंधी अधिक माहिती हवीय आणि तू नेमकी तीच टाळतोयस.”

“मला तेच तर सांगायचंय. दोन दिवसांपूर्वी गॅसनच्या तोंडून मी पहिल्यांदाच त्याचं नाव ऐकलं.”

“सगळ्या गोष्टी अगदी आखलेल्या योजनेप्रमाणे चाललेल्या आहेत. होय ना?” स्वित्झर्लंडमधून एक गट हल्ला करण्याचा प्रयत्न करतोय... हे कुणालाच माहीत नसावं? त्याच्या साथीदारांबद्दल काहीही खबर नसावी? उदाहरणार्थ, लॅमर्स या माणसाबद्दल?”

“मला तुझा प्रश्न कळला नाही. तुला नेमकं काय हवंय?”

“तुझी माणसं माझ्याच देशामध्ये कट रचतायत का, एवढंच मला जाणून घ्यायचंय?”

“माझी माणसं?”

“तू त्यांना काय म्हणतोस हे मला ठाऊक नाही. हस्तक? हितशत्रू? दलाल?”

“फारच अवघड प्रश्न आहे.”

“तुला उत्तर द्यावंच लागेल. कारण तू माझं देणं लागतोस.”

“मला वाटतं, काल मी तुला मोठं गुपित सांगितलंय. मी देणं चुकतं केलंय.”

“हे बघ, गॅसन व त्याच्या साथीदारांना रोखणं हे जसं माझ्या हिताचं आहे, तेवढंच ते तुझ्या दृष्टीनेही महत्त्वाचं आहे.”

“कदाचित.” पालुंबो नकळत कबूल झाला. “पण मला वाटतं की तुझ्याकडेही सांगण्यासारखं अजून खूप आहे.”

व्हॉन डॅनिकनने एक उसासा टाकला. आपण अजून किती माहिती उघड करावी हे त्याला कळेना. पण त्याच्यासमोर फारसा पर्यायही नव्हता. महासत्तेसमोर अखेर झुकावेच लागते. आपण जर त्याच्या विश्वासास पात्र ठरलो नाही तर तोही मूठ सैल सोडणार नाही हे तो ओळखून होता.

“आम्हीही ब्लिट्झची माहिती गोळा करत होतो. पण आमचा दृष्टिकोन वेगळा होता. ज्या लॅमर्सबद्दल मी तुला विचारलं, तो त्याचा सहकारी होता. चार दिवसांपूर्वी ते एकत्र भेटले होते. वीस किलो स्फोटकं वाहून नेणारे व ताशी पाचशे किलोमीटर वेगाने उडणारे एक ड्रोन आपण तयार केले आहे ही गोष्ट लॅमर्सने ब्लिट्झला सांगितली होती. ब्लिट्झला व त्याला मारणारा माणूस एकच आहे का, एवढंच आम्ही शोधत होतो. तो तुमचा माणूस आहे असा आमच्याकडे पुरावा आहे.”

“कसला पुरावा?”

त्या माणसाने पिस्तुलातील गोळ्या बेडकाच्या विषात बुडवल्या होत्या व ही पद्धत फक्त सीआयएने साल्व्हाडोरवर केलेल्या हल्ल्यात फार पूर्वी भारतीय सैनिकांनी कशी वापरली होती हे त्याने पालुंबोला सविस्तर सांगितले.

"तू फारच ताणतोयस." पालुंबो म्हणाला. "अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणारे भारतीय लोक, त्यांच्या पद्धती, विषप्रयोग... तीस वर्षांपूर्वीचा इतिहास तू पुन्हा उकरतोयस. तो आता जुनापुराणा इतिहास झालाय."

"म्हणजे मी हा योगायोग समजायचा?"

"तू मला पेचात पकडतोयस." एवढंच बोलून पालुंबो गप्प बसला.

"हे बघ फिल, आता मी तुला अगदी सरळ सरळ विचारतो. हा जो कुणी खुनी आहे त्याला तुम्ही पगारावर ठेवलंय की, तो दुसऱ्या कुणासाठीतरी स्वतंत्र काम करतोय?"

"ते मी तुला नाही सांगू शकत. त्या खूप वरच्या गोष्टी आहेत. वरच्या मजल्यावरच्या. माझा तेवढा पगारही नाही व दर्जाही नाही. त्याबद्दल मी बोललेलं, माझ्या वरिष्ठांना खपणार नाही."

"आलं माझ्या लक्षात." व्हॉन डॅनिकन म्हणाला. "पण त्या इसमाला कुणीतरी नक्कीच पैसा पुरवतंय. कुणीतरी त्याला अचूक दिशा दाखवतंय. जे काही चाललंय त्याबद्दल त्याला तुझ्यामाझ्यापेक्षा जास्त माहिती आहे. आणि ही गोष्ट फार भितीदायक आहे. मनात आणलंस तर तू त्यासंबंधी खबर मिळवू शकतोस. अनधिकृतपणे."

"अनधिकृतपणे?"

"जे काही तुला समजेल..."

"म्हणजे त्या बेडकाच्या विषाबद्दल... होय ना? आणि तर मग तुला माझ्याबद्दल विश्वास वाटेल?"

"सगळे संशय फिटतील." डॅनिकन एकदम उत्साहात बोलून गेला. असा उत्साह दाखवला की अमेरिकनांना तो प्रामाणिकपणा वाटतो हे त्याला माहीत होते.

पालुंबो तोंडामध्ये काहीतरी चघळत राहिला. "ठीक आहे."

"काय ठीक आहे?"

"मी तुला नंतर फोन करतो." अस्पष्टपणे.

पालुंबोचा आवाज अस्पष्ट होत गेला.

५१

बर्नमधील एका शांत लोकवस्तीत वॉल्डहोहॅवेग ३० ही पाच मजली इमारत कुणाच्याही चटकन नजरेत भरण्यासारखी होती. इमारतीच्या बाजूने वीस-वीस मीटरच्या अंतरावर उंच व पातळ पानांचे भोजवृक्ष पहारेकऱ्यांसारखे एका रांगेत उभे होते. जोनाथनने गाडीचा वेग कमी करत, इमारतीभोवती एक फेरी मारली. आपल्या मागावर कुणी नाही याची खात्री करून घेतली. दुपारी चार वाजतादेखील तो परिसर अगदी शांत व निर्जन दिसत होता. वॉल्डहोहॅवेगच्या पुढे तीन इमारती सोडून त्याने रस्त्याच्या कडेला गाडी पार्क केली.

एम्मा जर खरी असेल तर 'मिस बी' देखील तितकीच खरीखुरी आहे. गाडीतून बाहेर पडताना या गोष्टीची त्याने स्वत:ला पुन्हा एकदा आठवण करून दिली. झूग ते बर्न या प्रवासात त्याने बीसंबंधी मिळालेल्या माहितीची मनातल्या मनात एकदा उजळणी केली होती. पस्तीस वर्षांची बी व्यवसायाने आर्किटेक्ट असली तरी ती आपल्या व्यवसायात कधीच स्थिर होऊ शकली नव्हती. चित्रकला, छायाचित्रण, काचेच्या वस्तू बनवणे अशा अनेक कलांमध्ये तिला गती होती; पण प्रत्येक क्षेत्रात तिच्या नशिबी मात्र अपयश आले होते. तिला मुक्तपणे भटकायची आवड होती. खुल्या निसर्गामध्ये ती हरवून जायची. जीन्स व जॅकेट हा तिचा आवडता पोशाख होता.

इतक्या वर्षांत त्यांची दोनदाच भेट झाली होती. कदाचित तीनदा. दीड वर्षांपूर्वी ते मध्य-पूर्वेतून लंडनला आले होते त्या वेळेस त्याला ती एका रेस्टॉरंटमध्ये भेटली होती. स्वित्झर्लंडला स्थायिक झाल्यावर एम्मा बीला भेटण्यासाठी अनेक वेळा बर्नला येत असे; पण जोनाथनला मात्र तिच्याबरोबर जाणे कधीच जमले नव्हते.

मागच्या बाजूने तो इमारतीकडे जाऊ लागला. अजूनपर्यंत एकही व्यक्ती त्याच्या नजरेस पडली नव्हती. त्याने मागे वळून पाहिले. पार्क केलेल्या गाड्याही रिकाम्याच होत्या. एक हात मानेवर गच्च दाबत त्याने उड्या मारत रस्ता ओलांडला. तो नेमप्लेट्स वाचू लागला. स्ट्रॅस्सर, रुट्ली, क्रुगर, झेंडर. तो गचकन थांबला. त्याच्या पोटात एकदम भीतीची लहर उठली होती. बिट्राईस रोझ हे नाव कुठेच नव्हते; पण फ्लॅट नं ४ए समोर इ.ए. क्रुगर हे नाव लिहिले होते.

त्याचे पाच थरथरू लागले. कशासाठी थांबलोय आपण? मानेजवळ प्रचंड वेदना होऊ लागल्या होत्या. तितक्यात मागून एक स्त्री आली व हातातल्या चावीने तिने प्रवेशद्वार उघडले.

"मी मिस क्रुगरला भेटायला आलोय." तो म्हणाला. "ती माझी मेव्हणी आहे. मी आत येऊन थांबलो तर चालेल?"

स्त्रीचे डोळे त्याच्या मानेवर खिळलेले होते. बाजूच्या काचेत पडलेले स्वत:चे प्रतिबिंब त्याला दिसले. शर्टाची कॉलर रक्ताने माखली होती.

“काय झालंय तुला?” तिच्या स्वरात संशय होता.

“छोटासा अपघात झाला. पण दिसतेय त्यापेक्षा जखम फारच किरकोळ आहे.”

“तू डॉक्टरांकडे जायला हवंस.”

“मी स्वत:च डॉक्टर आहे.” चेहरा हसरा ठेवत त्याने प्रसंगाचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न केला. “घरात गेलो की मी स्वत:च माझ्यावर उपचार करेन. इव्हाला तर तू ओळखतच असशील. पिंगट केस. तपकिरी डोळे. चश्मा लावते.”

“सॉरी.” ती म्हणाली. “मी मिस क्रुगरला ओळखत नाही. तू बाहेरच थांब.”

“ठीक आहे.” नाइलाजाने जोनाथन वळला व काही क्षण तिथेच रेंगाळला. त्याने पुन्हा मागे पाहिले तेव्हा तिथे कुणीच नव्हते व समोरचा दरवाजा हळूहळू बंद होत होता. पुढे धावत जाऊन त्याने दाराच्या फटीत बूट अडकवण्याचा प्रयत्न केला पण दरवाजा थाडकन बंद झाला.

आपल्या नशिबावर वैतागत तो पुन्हा वळला. एकदा त्याच्या मनात आले की, फाटकावरच्या सर्व बेल्स जोरजोरात दाबाव्यात म्हणजे एखादा कुणीतरी येऊन त्याला आत घेईल; पण ते फारच धोक्याचे होते. एका व्यक्तीने नुकतेच त्याला पाहिलेले होते. कुणी पोलिसात तक्रार केलेली त्याला परवडणार नव्हती.

त्याने आपले खिसे चाचपले. एम्माची की-चेन त्याच्या हाताला लागली. कदाचित त्याला हव्या असणाऱ्या चाव्या त्याच्याचपाशी असाव्यात...

त्याने इव्हा क्रुगरची की-चेन खिशातून बाहेर काढली. गाडीच्या किल्लीखेरीज आणखी तीन चाव्या त्यात होत्या. प्रत्येक चावीचा रंग वेगवेगळा होता. काळी चावी लागली नाही. लाल चावीचाही उपयोग झाला नाही. हिरवी चावी मात्र लागली. लॅच उघडले गेले. दुसऱ्या सेकंदाला तो आत होता.

लिफ्टच्या बाजूलाच जिना होता. प्रत्येक मजल्यावर तीन फ्लॅट होते. फ्लॅटच्या दरवाजावर नावाची पाटी लावलेलीच असायला हवी असा स्विसमध्ये दंडक होता. इव्हा क्रुगरचा फ्लॅट चौथ्या मजल्यावर होता. त्याने फ्लॅटची बेल दाबली. पण दरवाजा उघडला गेला नाही.

लेबेनॉनच्याही आधीची ती गोष्ट होती.

कोसोव्होचा मॅकेन्ना अशी त्यावेळेस हॉफमनची ओळख होती. लेबॅनॉनला येण्याआधी पाच वर्षं तो कोसोव्होला आला होता. कदाचित त्या सर्व कहाणीची सुरुवात लेबॅनॉनच्या खूप आधीपासून झाली असेल. पण जोनाथन आपल्या स्मरणशक्तीला जास्त ताण देऊ इच्छित नव्हता. त्याला ती गुंतागुंत कळत नव्हती किंवा ती कळून घ्यायची त्याची इच्छा नव्हती.

कळो किंवा न कळो, आता पुढे जात राहण्याशिवाय त्याच्या समोर पर्याय नव्हता.

जोनाथनने आपल्या हातातील चावीने इव्हा क्रुगरच्या फ्लॅटचा दरवाजा उघडला.

आपल्या दरवाजातील पीपहोलमधून ती स्त्री जोनाथनवर पूर्ण लक्ष ठेवून होती. तो दरवाजा उघडून आतमध्ये शिरलाय हे तिने पाहिले. ती इव्हा क्रुगरला पूर्ण ओळखत

होती. दोघींचे फारसे घनिष्ठ संबंध नव्हते आणि इव्हा सतत फिरतीवर असल्याने तसा वावही नव्हता. पण तरीही अनेकदा दोघींमध्ये जुजबी संभाषण झाले होते व तिला इव्हा आवडली होती. पण अनोळखी माणसाला हे सांगावेसे असे तिला वाटले नाही. शिवाय अशा रक्तबंबाळ आणि संशयास्पद दिसणाऱ्या माणसाशी तर तिला एकही शब्द बोलावासा वाटला नाही.

त्या आठवड्यात इव्हा क्रुगरचा शोध घेत येणारा तो काही पहिलाच इसम नव्हता. दोन दिवसांपूर्वीची गोष्ट. संध्याकाळच्या सुमारास ती घरी परतत होती. तिला इमारतीच्या बाहेर दोन पुरुष काहीसे विचित्रपणे रेंगाळताना दिसले. तिने त्यांना हटकले नाही. ती गुपचूप आपल्या घरात आली होती. काही वेळाने तिला दरवाजाबाहेर कुजबूज ऐकू आली. तिने पीपहोलमधून पाहिले. त्या दोघांनी क्रुगरच्या फ्लॅटचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला होता. आपण ही गोष्ट पोलिसांना ताबडतोब कळवायला हवी होती ही रुखरुख तिला लागून राहिली होती.

आणि आता आणखी एक पुरुष. जखमी, रक्तबंबाळ अवस्थेतला.

ती दुसऱ्यांदा तीच चूक करणार नव्हती.

हॉलमध्ये येत तिने पोलिसांना फोन लावला. “ऑफिसर,” ती म्हणाली, “मला एक तक्रार नोंदवायची...” आपल्याला नक्की काय सांगायचेय हे तिला क्षणभर कळेना. त्या माणसाकडे तर फ्लॅटची चावी होती. तिने मनातला गोंधळ बाजूला सारला. अखेर काही झाले तरी तो एक घुसखोर होता. “वॉल्डहोहॅवेग ३० मध्ये एक चोर शिरलाय. तुम्ही ताबडतोब या. तो आतच आहे.”

ते तिथेही पोहोचले होते. पण याखेपेस त्यांनी स्वत:ला लपवण्याचा अजिबात प्रयत्न केला नव्हता, हे जोनाथनच्या चटकन लक्षात आले. आपण कदाचित पकडले जाऊ याची जराही तमा न बाळगता त्यांनी अगदी पद्धतशीरपणे व मेहनतपूर्वक घराची पूर्ण झडती घेतली होती.

हॉल प्रशस्त होता व त्यात फारसे फर्निचर नव्हते. समोर एक कोच होता. त्याच्यावरच्या उशा काढून बाजूला नीट रचून ठेवल्या होत्या. कपाटातली पुस्तके उसकटलेली होती. त्यांचा फरशीवर ढीग जमा झाला होता. मासिकेही अस्ताव्यस्त पसरलेली होती. पर्शियन कार्पेट अर्धवट गुंडाळून ठेवलेले होते. झडती पूर्ण झाल्यावरही ते तसंच गुंडाळून ठेवलेले होते. एक आरामखुर्ची. कॉफी टेबल. एक स्टीलची शिल्पाकृती. कुणीतरी इथे नक्कीच राहत होते... पण ती व्यक्ती म्हणजे एम्मा नसावी.

आपल्या खिशातील पाकीट बाहेर काढून त्याने आपल्या बायकोचा फोटो काही वेळ न्याहाळला. नखरेबाज ग्लासांना, दाट केसांना व भडक लिपस्टिकला शोभेल असेच घरातले सर्व फर्निचर अगदी सहेतुकपणे बनवले गेले होते. ते नक्कीच इव्हा क्रुगरच्या व्यक्तिमत्त्वाला शोभेल असे फर्निचर होते.

त्याने घराच्या सर्व खोल्यांमधून एक फेरफटका मारला. स्वयंपाकघर तर घासूनपुसून लखलखीत ठेवले होते. भिंतीवरची कपाटं उघडी होती. ग्लासेस व थाळ्या ओटयावर ठेवलेल्या होत्या. त्याने फ्रिझ उघडला. मोसंबीचा रस. व्हाईट वाईन. शँपेन. लोणच्याची बरणी. कांदा. पाव. सॉस. दोन-तीन दिवसांच्या तिच्या झटपट व गुप्त गाठीभेटींसाठी तो

अगदी आदर्श फ्लॅट होता.

फ्रीझरमध्ये पोलिश व्होडकाची बाटली बर्फामध्ये रुतवून ठेवलेली होती. त्याने बाटलीवरचे नाव वाचले. झुब्रोका. फ्रिझवर दोन छोटे ग्लास होते.

बाटली उघडत त्याने ग्लासात एक पेग ओतला. रंग फिकट पिवळसर होता आणि सायरपसारखा गोड वास येत होता. त्याने ओठांवर पेला ठेवला आणि डोके मागे झुकवले "एम्मासाठी!" तो मोठ्याने म्हणाला. "जी कुणी तू होतीस, तिच्यासाठी."

घशातून एक मखमली जाळ खाली सरकत गेला.

त्याच्या मनावर उदासीची छाया हलकेच पसरत गेली. खांदे जड झाले. दहा पावलांचा प्रदीर्घ प्रवास करून तो अभ्यासाच्या खोलीत पोहोचला. ती आणखी एक छोटी खोली होती. लोखंडी टेबल आणि अतिशय किमती अशी गोल फिरणारी खुर्ची. एम्माला अशा खुर्चीची फार आवड होती; पण तिला ती परवडणारी नव्हती. कॉंप्युटर उचलून नेलेला होता, पण त्याच्या वायर्स लेझर प्रिंटरजवळ लोंबत होत्या. कागद किंवा टिपणे मात्र दिसत नव्हती.

तो बेडरूममध्ये आला. गादीवरच्या चादरी काढून कोपऱ्यात भिरकावलेल्या दिसत होत्या. उशा उसकटलेल्या होत्या. भिंतीवर एक तसबीर. साडेपाच नंबरचे बूट. एम्माच्या मापाचे. (सारे माहिती असून तो का पुन्हा पुन्हा स्वत:ची खात्री करून घेतोय?) कपाटात काही कपडे. एक भारी ड्रेस जणू आपल्या खास मेहमानाला खूश करण्यासाठी विकत घेतलेला.

मनाविरुद्ध जाऊन त्याने एम्माला त्या ड्रेसमध्ये डोळ्यासमोर आणले. तिच्या लांब निमुळत्या पायांवरून त्याची नजर चढत वर गेली आणि स्तनांमधल्या खोलगट जागेवर स्थिरावली. खांद्यांपर्यंत लहरत गेलेल्या तिच्या मुलायम केसांमधून त्याने हात फिरवला. तो ड्रेस तिला खरेच छान दिसत होता. एक हसीन शाम साजरी करण्यासाठी तिने अगदी अचूक कपड्यांची निवड केली होती. व्होडका आणि खारवलेली अंडी. दोन माणसांसाठी अगदी उत्तम बेत होता.

एम्मा रॅन्सम आणि इव्हाया क्रुगर दोन भिन्न व्यक्ती. पण दोघांमधली खरी कोण? सत्य व कल्पित यातला भेद त्याला कुठे समजत होता? आणि जर त्याला ते समजत नव्हते तर एम्मा तरी बिचारी त्याला कशी समजावून सांगू शकणार होती?

पण यात आपलासुद्धा सहभाग होता हे त्याच्या अचानक लक्षात आले. पृथ्वी प्रदक्षिणा करायला एका पायावर तयार असलेल्या डॉक्टर जोनाथन रॅन्समला जगातल्या महत्त्वाच्या शहरात सोयीस्करपणे हलवण्यात येत होते. एम्माला त्या... थॉर... का काय जे असेल ते... तिथे काम करणे सोपे जावे म्हणून तर त्याची जिनिव्हाला बदली करून घेतली गेली होती. यापूर्वी त्याची का बदली झाली नव्हती? जोनाथन, एक प्यादे.

छे. प्यादे नाही. एक सुरक्षित आच्छादन.

तो पलंगाच्या कडेला बसला व त्याने फोन उचलला. त्याने पेन्झान्स, इंग्लंडमधील सेंट मेरी हॉस्पिटलचा नंबर ऑपरेटरला विचारला.

"ही कहाणी आणखी किती मागे जाणार आहे?" त्याने स्वत:लाच प्रश्न विचारला. बैरुतच्या आधी तो दर्फुरला होता. इंडोनेशिया, कोसोव्हो आणि लिबेरिया. तिथल्या

विमानतळावर त्याची व एम्माची एका जीपमध्ये प्रथम भेट झाली होती.

एम्माने त्या दोघांमध्ये नेमकी कुठे सीमारेषा आखली होती? किंवा ही सीमारेषा तिने नक्की कधी आखायला सुरुवात केली होती?

जोनाथनने हॉस्पिटलचा नंबर टिपून घेतला व लगेच फिरवला. एका प्रसन्न इंग्लिश आवाजाने त्याचे स्वागत केले. त्याने हॉस्पिटलचा 'संदर्भ' विभाग मागितला. एका स्त्रीचा आवाज आला. "रेकॉर्ड्स".

"मी स्वित्झर्लंडवरून बोलतोय. नुकतंच माझ्या पत्नीचं निधन झालं आणि काही सरकारी कामाकरता मला तिचा जन्मदाखला हवाय. तुमच्या हॉस्पिटलमध्ये तिचा जन्म झाला होता."

"अधिकृत विचारणा झाल्यावर आम्ही तिच्या जन्मदाखल्याची प्रत फॅक्स करू."

"त्याबद्दल मला खात्री आहे. याक्षणी फक्त तो दाखला उपलब्ध आहे का, एवढंच मला जाणून घ्यायचंय. तिचं नाव एम्मा रोझ. जन्मतारीख १२ नोव्हेंबर, १९७५."

"एक मिनिट," ती स्त्री म्हणाली.

जोनाथनने फोन कानावर अडकवला. त्याच्या हातात इव्हा क्रुगरच्या लग्नाची अंगठी होती. मिस्टर क्रुगरच्या अस्तित्वाची एकही खूण त्या सबंध फ्लॅटमध्ये आपल्याला कुठेही न आढळल्याचे त्याच्या एकदम लक्षात आले. मग ही अंगठी कुठून आली? बाकीची सर्व व्यूहरचना इतकी काटकोरपणे केली होती. तिच्या दुहेरी व्यक्तिमत्त्वाचा अगदी बारीकसारीक तपशील. खोटच्या भुवयासुद्धा.

"सर, मी नर्स पूल बोलतेय. आम्हाला एम्मा रोझची जन्मनोंद सापडली."

"छान... म्हणजे मी आभारी आहे." त्या बातमीने त्याचे विचारचक्र तुटले होते. त्याला धड बोलणेही कठीण होऊन गेले होते. आपण कोसळतोय की सावरतोय हेच त्याला उमगेनासे झाले होते.

त्याच्या डोळ्यासमोर एक वेगळेच चित्र तरळू लागले होते. एम्मा व तो गाडीमधून पेन्झान्समधल्या त्या हॉस्पिटलसमोर आले होते. लग्नाला एक वर्ष उलटले होते. एम्मा त्याला घेऊन आपल्या माहेरच्या गावी पहिल्यांदाच आली होती. "आणि ह्या ठिकाणी ते सर्व सुरू झालं." एम्मा अभिमानाने त्याला सांगत होती. "बरोबर सात वाजता मी या जगात पाऊल टाकलं. मृत्युखुणा सांगणाऱ्या स्कॉटिश बॅन्शीसारखी मी टाहो फोडून रडत होते. माझं रुदन अजूनही सुरूच आहे. मी जन्माला आले आणि माझी आई जग सोडून निघून गेली. एक चक्र पूर्ण झालं होतं."

त्याला नर्सचा आवाज ऐकू आला. "एक अडचण आहे. तिचा जन्म १९७५ चा आहे याबद्दल तुम्हाला खात्री आहे?"

"शंकाच नाही."

"तर मग ही गोष्ट विचित्रच म्हणायला हवी. 'एव्हरेट्ट' हे तिचं मधलं नाव होतं?"

"हो."

ती तीच असल्याचा आणखी एक पुरावा. ती इव्हा क्रुगर नव्हती. ती एम्मा होती. त्याची एम्मा.

"मी आमच्याकडील नोंदींमधून एम्मा एव्हरेट्ट रोझ हे नाव शोधून तर काढलंय."

तिचा आवाज किंचित कठोर झाला होता. “तिचा जन्मही बारा नोव्हेंबरलाच झालाय... पण एक वर्ष आधी.”

“मुद्रणदोष असावा. ही तीच असली पाहिजे.”

“तसं नक्कीच नाही.” नर्स म्हणाली. “म्हणजे तुम्हाला कसं सांगावं हेच मला कळत नाहीये.”

जोनाथन पलंगावरून नकळत आणखी पुढे सरकला. “काय कळत नाहीये?”

“माफ करा सर, पण सेंट मेरी हॉस्पिटलमध्ये १२ नोव्हेंबर, १९७४ साली जन्मलेली एम्मा एव्हरेट्ट रोझ ही आधीच मृत घोषित आहे. जन्मानंतर दोन आठवड्यांनी, म्हणजे २६ नोव्हेंबरला एका मोटार अपघातात ती मरण पावली होती.”

५२

“आजपर्यंत त्याने कुठे कुठे काम केलं, हे सर्व ह्या यादीत आहे?” ऊँच्या मुख्य कार्यालयात व्हॉन डॅनिकन बसला होता. असह्य उकाडा होता व क्षणाक्षणाला त्याची सहनशक्ती संपत चालली होती.

त्याच्यासमोर हॉस्पिटलची संचालिका बसली होती. वयाची पन्नाशी उलटलेली ती एक सोमाली स्त्री होती. स्वित्झर्लंडला स्थायिक होऊन तिला वीस वर्षे झाली होती. तिने डोक्याचा तुळतुळीत गोटा केला होता व कानात लोंबणारे सोन्याचे डूल चटकन लक्ष वेधून घेत होते. ती त्याच्यावर चांगलीच उखडलेली होती. आपल्या बोटाचं रंगवलेलं नख त्याच्यासमोर रोखत ती उसळून बोलू लागली.

“यादी अपुरी आहे असं तुला का वाटतंय? मी काहीतरी लपवत असेन असं माझ्याकडे बघून तुला वाटतंय का? तू मला जे काही सांगितलंस ना, तो निव्वळ मूर्खपणा आहे. म्हणे जोनाथन रॅन्सम, एक खुनी आहे! खुळचटपणा आहे खुळचटपणा!”

व्हॉन डॅनिकनने तिच्या बोलण्याची दखलही घेतली नाही. ग्राऊबंडन पोलिसांनी त्याच्यापेक्षा एक दिवस आधीच चौकशी सुरू केली होती. त्यांच्या हातात नक्कीच काहीतरी धागेदोरे आलेले असणार. ह्या बाईबरोबर वाद घालत बसण्यापेक्षा त्या पोलिसांबरोबर बोललेले जास्त फायद्याचे आहे असा त्याने विचार केला. त्याने रॅन्समची फाईल हातात धरली व तो ती बारकाईने चाळू लागला. बैरुत, लेबॅनॉन प्रतिबंधक लस मोहिमेचा पथकप्रमुख. दर्फुर, सुदान. निर्वासितांवरील उपचार कार्यक्रमाचा संचालक कोसोवो, सर्बिया. स्थानिक जखमी जनतेसाठी खास उभारण्यात येणाऱ्या वैद्यकीय केंद्राचा प्रमुख. सुलावासी बेट, इंडोनेशिया. मोन्रोव्हिया, लिबेरिया. बदनाम राजकीय कारस्थानांसाठी त्या यादीतले प्रत्येक शहर अगदी कुप्रसिद्ध होते.

“तुमच्या संस्थेत काम करणाऱ्या प्रत्येक डॉक्टरला असंच देशोदेशी भटकत राहावं लागतं?” फाईलमधून नजर उचलत त्याने विचारले. “मला असं दिसतंय की, डॉ. रॅन्सम सतत दोन वर्षं वेगवेगळ्या देशात काम करत होता.”

“आमच्या कामाची हीच पद्धत आहे.” एक निराश उसासा. छताकडे नजर. “जोनाथनला आव्हानात्मक कामात विशेष रस होता. त्याची कामाबद्दलची बांधीलकी वादातीत होती.”

“बांधीलकी म्हणजे तुला नेमकं काय म्हणायचंय?”

“परिस्थिती बहुतेक वेळा प्रतिकूल असायची. आपल्या कामाचा आवाका व कामाचं महत्त्व हे अनेक डॉक्टरांच्या ध्यानात येत नसे ते त्या प्रतिकूल परिस्थितीला बळी पडत. आपण निरर्थक काम करतोय या कल्पनेने ते हतबल होऊन जायचे. एखाद्या युद्धानंतर कमालीच्या थकव्यामुळे शिणलेले सैनिक जसे इस्पितळातून उपचार घेताना दिसतात; तशाच पण मानसिक थकव्याने खचलेल्या काही डॉक्टरांवर आम्हाला उपचार

करावा लागतो. पण जोनाथन मात्र आपल्या आव्हानांपासून कधीच मागे हटला नव्हता. आमच्यापैकी काही जणांच्या मते एम्मा हे त्यामागचं कारण होतं.”

“एम्मा? म्हणजे त्याची बायको?”

“आमचं असं मत बनलं होतं की, ज्या ठिकाणी ती जायची, तिथल्या स्थानिक लोकांमध्ये ती सहज मिसळून जायची. त्या लोकांनाही ती आपल्यातलीच एक आहे असं वाटू लागायचं.”

“तुमच्या संस्थेत अशी अनेक जोडपी एकत्र काम करत असतात?”

“लग्न करून आपल्या बायकोला किंवा नवऱ्याला कोसो मैल लांब ठेवावं असं कुणाला बरं वाटेल?”

व्हॉन डॅनिकनने क्षणभर तिच्या ह्या वाक्यावर विचार केला. त्यांची कार्यपद्धती त्याला नीट जाणून घ्यायची होती. परदेशामध्ये नेमणुका. सतत प्रवास. “डॉक्टरांना कुठे पाठवायचं हे कोण ठरवतं?”

“आमची गरज व त्यांचं मनुष्यबळ यांचा मेळ घालण्याचा आम्ही प्रयत्न करतो. डॉक्टर रॅन्समने आमच्या स्विस मुख्य कार्यालयात यावे यासाठी आम्ही त्याला बऱ्याच दिवसांपासून गळ घालत आहोत. आमच्या प्रोजेक्ट्सचं नेमकं मूल्यमापन करण्यासाठी त्याचा युद्धक्षेत्रांवरचा प्रत्यक्ष अनुभव फार महत्त्वाचा ठरेल असं आम्हाला वाटतं. पण हे व्यवस्थापकीय काम आहे आणि त्याला उघड्या मैदानावर काम करायची आवड आहे.”

“एखादी नेमणूक साधारण किती काळासाठी असते?”

“अशा कामांना ठरावीक मर्यादा नसते. हाती घेतलेली मोहीम पूर्ण होईपर्यंत तो डॉक्टर तिथेच राहतो. त्यानंतर नवीन माणसाच्या हातात कार्यभाग सोपवून तो परत येतो. दुर्दैवाने अलीकडेच त्याच्या वागणुकीविषयी एक तक्रार माझ्याकडे आलीय. त्याचा तो थोडासा अमेरिकन उद्धट व तुसडा स्वभाव... मिळणाऱ्या पैशांबद्दल तो नाखूश असावा.” ती अगदी हळू आवाजात पुढे म्हणाली, “मिसेस बेट्सला तो आवडत नाही. तिथून त्याची बदली करण्याचा निर्णय घेतला गेलाय.”

व्हॉन डॅनिकनने तिच्या बोलण्यावर मान डोलावली, पण मनातल्या मनात त्याला एका गोष्टीचा छडा लागला होता. जोनाथनच्या वेगवेगळ्या देशातील नेमणुकांच्या मागचा एक अदृश्य हात आता त्याला स्पष्ट जाणवू लागला होता. काहीही कारण नसताना संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिकेकडे रॅन्समची तक्रार का केली जाते याचं कारण शोधताना त्याला नेमका धागा सापडला होता. अचानक एक प्रस्ताव येतो. प्रस्ताव म्हणण्यापेक्षा तो एक प्रकारचा दबावच असतो. त्यामागे दडलेला अर्थ त्या संचालिकेच्या लक्षात येतो. जोनाथनने आता बैरुतला जायला हवे. त्याला दुर्फुरला पाठवायलाच हवे.

“यानंतर तुम्ही त्याला आता कुठे पाठवणार आहात?”

“तो बहुदा पाकिस्तानात जाईल. लाहोरला आम्ही एक नवीन मोहीम सुरू केलीय. तिथला संचालक अलिकडेच हृदयविकाराच्या झटक्याने गेला. फक्त पन्नास वर्षांचा होता बिचारा. सार्वजनिक आरोग्य व कल्याण विभागाच्या मंत्र्याबरोबर त्याची मंगळवारची भेटही ठरलेली होती. जोनाथनने रविवारचं विमान पकडून तिथे जावं असा मी त्याला आग्रह करणार आहे. म्हणजे ठरलेली भेटही रद्द करावी लागणार नाही.”

“ह्या रविवारी?”

“हो. संध्याकाळच्या विमानाने. मला माहितीये की, अशा अवस्थेत आम्ही त्याच्यावर थोडा अन्यायच करतोय. पण जोनाथनला मी जवळून ओळखते. तो या संधीचा उपयोग करून स्वत:ला सावरेल.”

“रविवार,” व्हॉन डॅनिकन स्वत:शीच पुटपुटला. त्याच्या डोळ्यासमोर पुढचे सारे चित्र उभे राहिले होते.

बहात्तर तास.

व्हॉन डॅनिकनचे म्हणणे अगदी साधे-सरळ होते. रॅन्सम हा त्याच्या मते विदेशी सरकारचा एक पगारदार व प्रशिक्षित हेर होता. या संस्थेत डॉक्टर असणे हे त्याच्या दृष्टीने फार फायदेशीर ठरलेले होते. कुणाच्याही नजरेत न येता तो सहजपणे या देशातून त्या देशात प्रवास करू शकत होता. रॅन्सम कुणासाठी काम करतोय हे शोधून काढण्यासाठी त्याने आजपर्यंत काय काम केलेय हे पाहणे गरजेचे होते. त्यासाठीच तर व्हॉन डॅनिकन जिनिव्हा पोलीस कार्यालयातील कॉंप्युटरसमोर बसलेला होता. रुग्णालयात उपचार घेणाऱ्या एका जखमी महिलेचा फोटो तो पाहत होता. तिच्या अंगात घुसलेले बॉम्बचे बारीकबारीक तुकडे काढण्यात डॉक्टर्स व नर्सेस मग्न दिसत होत्या. ‘डेली स्टार’ या लेबॅनॉनच्या इंग्रजी वृत्तपत्रात अगदी पहिल्याच पानावरचे ते छायाचित्र होते. तारीख होती, गेल्या वर्षीची ३१ जुलै.

‘बॉम्बहल्ल्यात गुन्हाअन्वेषण अधिकाऱ्याचा मृत्यू’ या मथळ्याखाली ती बातमी छापलेली होती. बातमीत म्हटलं होतं की बॉम्बहल्ल्यात सतरा जण ठार झाले व त्यात एका पोलीस अधिकाऱ्याचाही समावेश आहे. लेबॅनॉनच्या भूतपूर्व पंतप्रधानांवर नुकत्याच झालेल्या प्राणघातक हल्ल्याची संपूर्ण चौकशी करण्यासाठी जी समिती नेमलेली होती तिचा तो प्रमुख होता. निकामी झालेल्या मूत्रपिंडामुळे सदर अधिकाऱ्याला दर आठवड्यास डायलिसिस करून घ्यावे लागत असे. त्याच्यावर डायलिसिसचे उपचार चालू असतानाच त्या हॉस्पिटलवर बॉम्ब टाकण्यात आला होता. गुप्तसूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तीन महिन्यांपूर्वी त्या हॉस्पिटलचे नूतनीकरण करण्यात आले व त्याच काळात तिथे बॉम्ब पेरला गेला असावा. त्या शक्तीशाली बॉम्बमध्ये शंभर पौंड वजनाची स्फोटक द्रव्ये ठासून भरली असावीत असा प्राथमिक अंदाज आहे.

बातमीत पुढे म्हटले होते की, अजूनपर्यंत कोणत्याही अतिरेकी संघटनेने सदर हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. परंतु काही दिवसांपूर्वी हॉस्पिटलच्या परिसरात काही सिरियन गुप्तहेर फिरताना दिसल्याची खबर विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. त्याच आधारे पोलिसांचा तपास जारी आहे.

व्हॉन डॅनिकनचे विचारचक्र सुरू होते. हल्ला होण्याच्या आधी तीन महिने बॉम्ब पेरला जातो. शंभर पौंड वजनाचे टीएनटी. हल्ल्याची व्याप्ती खूप मोठी होती. डझनाहून अधिक व्यक्तींचा या हल्ल्यामागे सहभाग असणार. बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार, शहर अधिकारी– त्यांनी तर परवाने दिलेले असणार. पोलीस अधिकाऱ्यावर कधी डायलिसिस केले जाणार आहे याची माहिती एका डॉक्टरने दिली असणार. विचार करत

असताना त्याच्यातला पोलीस अधिकारी थक्क झाला होता. त्याच्यातला माणूस मात्र भेदरला होता.

लेबॅनॉनपूर्वी दर्फुर...

युनोचे हे विमान सुदानवरून खार्टुमला जात असताना, हवेतच उडवण्यात आले. त्यामध्ये सुदानच्या मुस्लीम जंजावीडचे अनेक पुढारी होते. युद्धबंदीचा प्रस्ताव मांडण्यासाठी ते शिष्टमंडळ निघाले होते. एकही जण वाचू शकला नव्हता. विमानाच्या एका इंजिनात बॉम्ब ठेवल्याचा पुरावा हाती आला होता. दोन्ही गटांनी ह्या हल्ल्याबद्दल परस्परांना दोषी ठरवले होते. त्यानंतर नागरी युद्धाचा भडका उडाला होता.

आणि दर्फुरच्या आधी, कोसोव्हो. नॅशनल गॅझेट, पान नं २ : 'निवृत्त जनरल व्हाल्दामीर ड्रॅकिक व इतर अठ्ठावीस जण एका बॉम्बस्फोटात ठार. 'ड्रॅको' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जनरलचे वय पंचावन्न होते. त्याने स्थापन केलेल्या उजव्या विचारांच्या फरारी देशभक्त संघटनेने बोलावलेल्या बैठकीच्या वेळी ड्रॅको उपस्थित होता. गेल्या दहा वर्षांपासून एक आंतरराष्ट्रीय गुन्हेगार संघटना, त्याच्या मागावर होती. जुलै, १९९५ ला सिब्रेनिका इथे दोन हजार स्त्री, पुरुष व बालकांची निर्घृण कत्तल करण्यात आली होती. त्या संदर्भात युनोच्या युद्ध गुन्हेगारी आयोगालाही तो हवा होता. वायुगळतीच्या साहाय्याने हा स्फोट घडवला गेल्याचा प्रत्यक्ष पुरावा हाती आला आहे. सदर हल्ल्यामागे एका विरोधी अल्बेनियन संघटनेचा हात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या संदर्भात दोन संशयितांना ताब्यात घेतले गेले आहे.'

तीनही हल्ले एकमेकांशी मिळतेजुळते. पूर्ण संरक्षण असलेल्या उच्च वर्तुळातील महत्त्वाच्या व्यक्तींना 'लक्षय' केले गेले होते. काटेकोरपणे आखलेली योजना, असामान्य बुद्धिमत्ता व दीर्घकालीन बांधिलकी यांचा एकत्र मिलाफ. आणि प्रत्येक खेपेस आळ मात्र तिसऱ्याच कुणावर आलेला.

या प्रत्येक हल्ल्यासाठी निवड केलेली वेळ लक्षात घेता, त्यामध्ये जोनाथनचा असलेला सहभाग अगदी स्पष्ट आहे अशा निष्कर्षाप्रत व्हॉन डॅनिकन येऊन पोहोचला. रॅन्सम लेबॅनॉन सोडून जॉर्डनला जाण्याआधी चार दिवस बैरुतमध्ये बॉम्बहल्ला झाला होता. तसेच रॅन्समने देश सोडण्याआधी दोन दिवस सुदानी विमान उडवले गेले होते. तर रॅन्सम जिनिव्हाला परतण्यापूर्वी फक्त एक दिवस कोसोव्होत बॉम्बस्फोट झाला होता.

पण या सर्व हल्ल्यांमुळे नेमका कुणाचा फायदा झाला असेल हे काही केल्या त्याच्या लक्षात येत नव्हते. यात कुणाचा लाभ? गुन्हाचा हेतू हाच कुठल्याही गुन्हाचा शोध घेणाऱ्या अनुसंधकाचा मुख्य आधार असतो. पण इथे गुन्ह्याचा हेतू अनाकलनीय होता.

व्हॉन डॅनिकन खुर्चीवरून उठला. त्या संचालिकेचे शब्द त्याच्या कानात घुमत होते.

"आम्ही लाहोरमध्ये नवीन मोहीम सुरू करतोय. तो रविवारच्या विमानाने तिथे पोहोचेल अशी मला आशा आहे."

५३

वॉल्डहोहॅवेग ३० या इमारतीत एक घुसखोर शिरलाय अशी तक्रार आल्यावर दोन पोलीस अधिकारी तिथे पोहोचले होते. बेल वाजवून त्या दोघांनी इमारतीत प्रवेश केला. तक्रार करणाऱ्या स्त्रीने त्या दोघांना चटकन घरात घेतले. दोघांच्याही चेहऱ्यावर फारशी उत्सुकता वा फिकीर दिसत नव्हती. गुन्हासंशोधन विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार तो परिसर अतिशय शांत व सुरक्षित म्हणून घोषित केलेला होता. गेल्या नव्वद दिवसांत फक्त दोन घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. गेल्या वर्षभरात दरोडा, बलात्कार किंवा खुनाची एकही नोंद झालेली नव्हती.

"तो अजून आतमध्येच आहे." ती स्त्री म्हणाली. "तुम्हाला फोन केल्यापासून मी सतत नजर ठेवून आहे. तो बाहेर पडलेला नाही."

"तो घरफोड्या असेल असा तुला का संशय आला?"

"मी घरफोड्या हा शब्द वापरलेला नाही. तो घुसखोर आहे, एवढंच मी म्हटलं. या इमारतीमध्ये शिरण्याचा त्याचा काहीही संबंध नाही. आपण इव्हा क्रुगरची वाट पाहतोय असं तो सुरुवातीला म्हणाला. त्याला आत यायचं होतं. पण त्याच्या... इथून रक्त गळत होतं." मानेकडे बोट दाखवत ती म्हणाली. "मी त्याला म्हटलं की मी काही तुला ओळखत नाही. मेव्हणीची वाट पाहायची असेल तर तू बाहेरच थांब. एका मिनिटानंतर तो फ्लॅटच्या दारासमोर उभा होता आणि त्याच्या हातात फ्लॅटची चावीही होती. त्याला घरात शिरताना मी पाहिलं."

"मिस क्रुगर ही त्याची मेव्हणी आहे?"

"असं तो म्हणाला. तो खोटंही बोलत असेल. याआधी त्याला कधी पाहिल्याचं मला स्मरत नाही."

"मिस क्रुगर आत्ता त्या फ्लॅटमध्ये आहे?"

"नाही."

"तू त्याला जखमेबद्दल विचारल्यावर तो तुला काय म्हणाला?"

"छोटासा अपघात झाला, असं तो म्हणाला. आपण डॉक्टर आहोत व एकदा घरात पोहोचल्यावर आपणच स्वत:वर उपचार करू असंही त्याने सांगितलं."

पोलीस तिच्या बोलण्यावर वैतागलेले दिसत होते. "त्याने तुला धमकी दिली?"

"नाही. त्याचं बोलणं अगदी सभ्यपणाचं होतं... पण मिस क्रुगर नसताना तो कसा काय घरात शिरू शकतो? मी त्याला पूर्वी पाहिलेलं नाही. उलट त्याचा अवतार पाहून मी तर घाबरून गेले."

दोघांनी एकमेकांकडे कटाक्ष टाकला. तिच्यासारख्या रिकामटेकड्या माणसांनी केलेल्या निरर्थक तक्रारींचा भरपूर अनुभव त्यांच्या गाठीला होता. "आम्ही त्या

इसमाशी बोलतो. त्याने आपलं नाव सांगितलं?” तिने नकारार्थी मान हलवली. “मॅडम, तुम्ही इथेच थांबा.”

जोनाथन बाथरुममध्ये उभा होता. हनुवटी उंच करून तो आपली मान नीट निरखत होता. रक्त साकळून जखम चिघळली होती. अशा जखमा त्याला रोज पाहायची सवय होती. अंगावर कायमचा व्रण न राहण्यासाठी ती जखम पूर्ण उघडून त्यावर टाके घालायला लागत. त्यासाठी जखम ताजी असणे आवश्यक असते, पण आता ते शक्य नव्हते.

त्याने आणखी एक व्होडकाचा पेग ओतला व एका घोटात पिऊन टाकला. आता त्याला धीर आला.

“अजिबात हलायचं नाही.” गळ्याच्या बाजूला सुई-दोरा आणत त्याने हलक्या आवाजात स्वत:ला बजावले.

एक दीर्घ श्वास घेऊन तो कामाला लागला. त्याला सापडलेली सुई फारशी वाईट नव्हती. तिला बऱ्यापैकी धार होती व ती बऱ्यापैकी निर्जंतुकही होती. यापेक्षा रद्दड सुयांच्या साहाय्याने त्याला अनेकदा काम करावे लागले होते. डाव्या हाताने जखमेचे तोंड उघडत, त्याने एक टाका घातला.

सुरुवातीपासूनचे सारे खोटे होते तर! एम्मा ही एम्मा नव्हतीच. तिचे सगळे आयुष्य हे एक सोंगच होते. अदृश्य दिग्दर्शकाच्या हुकमानुसार चाललेले नाटक. या विचारांनी त्याचं मन मरगळून जाण्याऐवजी मोकळे होत गेले. डोळ्यावरचा पडदा उघडला गेला होता आणि गोष्टींचे खरे स्वरूप त्याला दिसू लागले होते. केंद्रबिंदूच नव्हे तर अख्खा परीघ आता स्पष्ट झाला होता. दृश्य भयानक होते. जोनाथन, एक प्यादे. जोनाथन, एक कळसूत्री बाहुला. जोनाथन सरकारच्या हातातली एक अजाणती, उत्साही कठपुतळी.

कोण होता तो? त्याला कळेना तिला इथपर्यंत कुणी नेऊन ठेवले?

त्याने तिसरा टाका घातला. दोरा किंचित घासला गेला व त्याचे डोळे पाण्याने डबडबले. त्याने सुई खेचली व दोरा सोडवून घेतला.

असह्य चीड. मनात तेवढी एकच भावना उसळलेली होती. एम्मावरची चीड. हॉफमनवरची चीड. आपला स्वार्थ साधण्यासाठी त्याचं आयुष्य त्याच्यापासून हिरावून घेणाऱ्या प्रत्येकावरची चीड.

आणि मग उरलेली कहाणी. त्या दोघांचं सहजीवन? का तो सुद्धा एक अप्रतिम अभिनयच होता? त्या दोघांमध्ये घडलेले हळवे, नाजूक प्रसंग. तो उत्कट संभोग. ते चोरटे कटाक्ष. तिच्या हाताचा स्पर्शच ते प्रेम!

अखंड आठ वर्षं... हे कसे शक्य झाले?

त्याने सुई खाली आणली आणि बेसिन घट्ट पकडत कसेबसे स्वत:ला सावरले.

मान वर करून आरशात पाहिले. तुला अजूनही अक्कल येत नाहीये. अरे मूर्खा, तिने तिचे खरे नावदेखील तुला कधी सांगितले नाही. तिचे मन फक्त तिच्या कामात होते. त्यासाठी ती त्याला आफ्रिका, युरोप व मध्यपूर्वेला फिरवत राहिली. ती वेगळंच आयुष्य जगत होती. बघ, हा फ्लॅट बघ. हे श्रीमंती ड्रेस बघ. इथे येऊन तिने पुरुषांना भुलवले. त्यांच्याबरोबर ती व्होडका प्यायली. तिने त्यांचे स्खलन केले.

आपल्याच प्रतिबिंबात खोल पाहत तो सत्याला सामोरा गेला.

वेदनांकडे पूर्ण दुर्लक्ष करत त्याने आपल्या हातातले काम सफाईदारपणे संपवले. दोऱ्याला शेवटची गाठ मारून त्याचे उरलेले टोक कात्रीने कापले. फारशी साधने नसताना, त्याच्या हातून उत्कृष्ट काम झाले होते. त्याने टाक्यांवर व्होडका चोपडली आणि बँडएडची पट्टी लावत जखम बंद करून टाकली. शर्ट उचलून तो स्वयंपाकघरात आला व त्याने व्होडकाचा आणखी एक पेग रिचवला. त्याने बाटलीवरचे नाव वाचून ते कायमचे डोक्यात ठेवले झुब्रोका. मुक्या, मेंगळट, मूर्खांचा मेंदू तरतरीत करण्यासाठी एक जालीम उपाय.

त्याने ओव्हरकोट चढवत त्याचे खिसे चाचपले. त्याच्या उजव्या हातात ती अंगठी आली. तिचा आपल्याला कधीही विसर पडू नये यासाठी तिला कायम आपल्या सोबत ठेवण्याचा त्याने निर्णय घेतला. स्वयंपाकघराचे दिवे बंद करत तो हॉलमध्ये आला. स्वत:भोवती पूर्ण गिरकी घेत तो फ्लॅट त्याने पुन्हा एकदा नीट निरखला. त्याला तो आभास वाटला. जणू एक रंगमंच.

त्याच क्षणी दरवाजावर जोराची थाप पडली. “पोलीस. आम्हाला तुझ्याशी बोलायचंय.”

जोनाथन जागच्या जागी थिजून गेला. मगाशी भेटलेल्या बाईचेच हे काम असणार. आता पुढे काय होईल याची तो कल्पना करू लागला. ओळखपत्राची मागणी. अंमलबजावणी न झालेल्या वॉरंटची छाननी. बिंग फुटणार : दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या खुनांसंदर्भात डॉ. जोनाथन रॅन्समचा शोध जारी. संशयित गुन्हेगार सशस्त्र व खतरनाक आहे. डोळ्याचे पाते लवते ना लवते तोच त्याच्या हातात बेडच्या व कोठडीत रवानगी.

दरवाजावर आणखी जोरजोरात थापा.

“पोलीस. डॉक्टर, तू आत आहेस हे आम्हाला ठाऊक आहे. आम्हाला तुझ्या मेव्हणीविषयी बोलायचंय. मिस क्रुगरबद्दल.”

जोनाथनचा धीर अगदी सुटत चालला होता. पण त्याने विचार केला की, आत्ता ह्या क्षणाला आपल्याला पूर्ण अडकल्यासारखे वाटत असले तरी आपण खूप आधीपासूनच अडकलोय.

तो धावत बेडरूममध्ये गेला व दरवाजा उघडत त्याने गॅलरीतून खाली वाकून पाहिले. भिंत अगदी सपाट होती. दोन मजले सोडून खालच्या फ्लॅटची गॅलरी दिसत होती. उतरायला काहीही आधार नव्हता.

दरवाजावर ठोठावणे सुरूच होते.

तो पुन्हा हॉलमध्ये आला. इकडून तिकडे अस्वस्थपणे फेऱ्या मारू लागला. शेवटी थकून उभा राहिला. खाली उडी मारण्यात काहीच अर्थ नाही, हे त्याच्या लक्षात आले. एकच मार्ग होता व तो म्हणजे मुख्य दरवाजातून बाहेर पडणे.

बाहेर पडणे म्हणजे त्यांच्या हातात सापडणे, त्यापेक्षा त्यांनाच आत येऊन देणे...

तो शांतपणे स्वयंपाकघरात गेला. आता त्याला कसलीही घाई नव्हती. त्याने एकदाही मागे वळून पाहिले नाही किंवा दरवाजावरील वाढत्या थापांकडे लक्षही दिले नाही. तो थेट ओव्हनजवळ गेला. केवळ बोटांच्या स्पर्शांनी नियंत्रित करता येणारे ते अत्याधुनिक

यंत्र होते. जोनाथनला त्या ओव्हनचा काहीही उपयोग नव्हता. पण त्याच्याशेजारी गॅसच्या शेगड्या होत्या. त्याने शेगडीवरच्या झाकण्या काढून टाकल्या आणि पाचही बर्नरची बटणे सुरू केली. बर्नर्समधून गॅसचा तीव्र वास येऊ लागला.

दरवाजा ठोठावणे आता बंद झाले होते, पण दरवाजाबाहेर आवाज मात्र तापू लागले होते. दरवाजाचे हँडल अर्धवर्तुळाकार फिरले. लॅच तोडण्याचा प्रयत्न होऊ लागला.

"मी बाहेर येतोय." जोनाथनने ओरडून सांगितले. "एक मिनिट फक्त."

"लवकर," पोलिसाचा आवाज आला. "नाहीतर आम्हाला दरवाजा तोडावा लागेल."

"एक सेकंद." तो आणखी जोरात ओरडला. त्याने किचनचा दरवाजा बंद करून घेतला व तो कॉंप्युटर टेबलाजवळ गेला. टेबलावरचे चार-पाच कागद उचलून त्याने त्या कागदांचा शंखाकृती आकार बनवला. आईस्क्रीमच्या कोनसारखा. त्यामध्ये छोटे छोटे कागद कोंबून तो बंद केला. मग त्याने एक टॉवेल थंडगार पाण्यात चिंब भिजवला आणि टॉवेल खांद्यावर टाकत तो बाथरुममधून बाहेर आला. हॉलमध्ये असलेल्या अॅश-ट्रेशेजारी काडेपेटी होती.

दरवाजावर पुन्हा थापा पडू लागल्या होत्या. पोलीस वायरलेस फोनवरून बाहेर संपर्क साधताहेत हे त्याला ऐकू आले.

आता गॅस स्वयंपाकघरात पूर्ण पसरला होता. वास एकदम नाकात शिरल्याने तो नकळत मागे सरला. भिंतीला पाठ टेकवत तो स्वयंपाकघराच्या दाराबाहेर नीट उभा राहिला. त्याने हातातल्या टॉवेलने आपले डोके व खांदे झाकून घेतले. काडी घासत त्याने कोन पेटवला व अंगापासून लांब धरत तो कोन पूर्ण पेटू दिला.

"कर सुरुवात." त्याने स्वत:लाच सांगितलं.

स्वयंपाकघराचा दरवाजा किलकिला करत त्याने जळता कोन आत भिरकावला व त्याच क्षणी त्याने स्वत:ला मुख्य दरवाजापाशी झोकून दिले.

स्वयंपाकघरात आगीचा भला मोठा लोळ उसळला गेला व त्या आगीत सर्व भांडीकुंडी भस्मसात झाली, काचा फुटल्या व खिडक्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. आगगाडीच्या तुफानी मेलसारखा आगीचा तो गोळा स्वयंपाकघराच्या दारातून हॉलमध्ये शिरला, पण अचानक पुन्हा किचनच्या दिशेने आत खेचला गेला.

जमिनीवर अंग घासत जोनाथन दरवाजाच्या टोकापाशी पोहोचला व कपाटामागे लपून बसला. दुसऱ्या सेकंदाला पिस्तुलातून गोळी सुटल्याचा आवाज झाला. दरवाजा उघडला गेला. दोन्ही अधिकारी हातात पिस्तुलं धरून आत शिरले व आगीच्या दिशेने आत जाऊ लागले. जोनाथन कपाटाच्या मागून पाहत होता.

दोघांमधल्या एकाने किचनमध्ये जाण्याचे धैर्य दाखवले. "तो खिडकीतून उडी मारून पळाला."

मग दुसराही आत शिरला व त्याने खिडकीतून खाली वाकून पाहिले. "तो पळाला."

जोनाथन रांगत दारापाशी आला व भराभर जिना उतरू लागला.

दुसऱ्या मिनिटाला तो इमारतीच्या बाहेर आला होता.

पाचव्या मिनिटाला त्याने मर्सिडिज सुरू केली होती व ऑटोबन्हच्या दिशेने त्याची गाडी सुसाट धावू लागली होती.

५४

आपल्याला हवी असलेली 'शिकार' साधण्यासाठी परदेशांमध्ये भटकणे हा फिलिप पालुंबोच्या जीवनाचा आता नित्याचा भाग झाला होता. परंतु प्रवास संपवून अमेरिकेला परतल्यावर तो तडक घरी किंवा ऑफिसमध्ये जात नसे. विमानतळावरून तो थेट त्याच्या अलेक्झांड्रियामधल्या जिममध्ये जाई. सायकलिंग, पोहणे व किरकोळ व्यायामप्रकार करण्यात तो किमान दोन तास तरी व्यस्त राहात असे. बाहेर खाल्लेल्या अरबटचरबट अन्नाचा व अशुद्ध हवेचा घामामधून निचरा झाल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. त्यानंतर 'स्टीम बाथ' घेतल्यावर त्याला आपले भ्रष्ट शरीर पुन्हा पवित्र झाल्यासारखे वाटे. आपल्याला कराव्या लागत असलेल्या कामामुळे, एक प्रकारची अपराधीपणाची जाणीव त्याला सतत पोखरत असे. आपला आत्मा काळवंडून जातोय अशी एक विचित्र भावना त्याला व्यापून टाकत असे. त्यामुळे त्याने हा 'पापक्षालनाचा' मार्ग निवडला होता. तोपर्यंत आपल्या बायको- मुलांना भेटण्याचा, त्याला धीर होत नसे.

आज मात्र ती शुद्धिकरणाची प्रक्रिया करून घ्यायला तो साफ विसरला होता. त्याने आपली कार थेट सीआयएच्या लँग्ली येथील कार्यालयासमोर आणून उभी केली. आपल्या टेबलखुर्चीचा ताबा घेत त्याने काँप्युटर सुरू केला. आपल्या कंपनीने १९८० साली एल् साल्व्हाडोरला नक्की कोणत्या प्रकारचं काम केलं हे पाहण्याची त्याला उत्सुकता लागून राहिली होती. सँडिनिस्टा कम्युनिस्ट राजवटीने शेजारील निकारगुआला आपल्या कब्जात घेतले होते व त्यामुळे ग्वाटेमाला आणि एल् साल्व्हाडोरच्या सरकारला धोका निर्माण झाला होता. त्यासाठी या दोन्ही राष्ट्रांमध्ये लोकशाहीची भक्कम तटबंदी उभारणे अतिशय गरजेचे होते व सीआयएने हीच मोहीम राबवायला सुरुवात केली होती. ती फाईल चाळताना त्याच्या लक्षात आले की, १९८४ च्या उन्हाळ्याच्या सुरुवातीस 'ऑपरेशन मोर्निंग डोव्ह' नावाची एक योजना एल् साल्व्हाडोरच्या दूतावासातून आखली गेली होती. पण 'मोर्निंग डोव्ह'ची फाईल मात्र तो उघडू शकत नव्हता. त्यासाठी उपसंचालकाची परवानगी आवश्यक होती. पण हीच फाईल त्याला हवी होती. ही एकच फाईल गुप्त ठेवलेली होती.

त्या वेळेस या योजनेवर कोणकोण अधिकारी काम करत होते हे शोधत असताना त्याला अचानक एक ओळखीचे नाव त्यामध्ये दिसले. त्या दोघांनी दहशतविरोधी केंद्रामध्ये एकत्र काम केले होते. तो एक उंच सडपातळ आयरिश गृहस्थ होता. जो लेही, हे त्याचे नाव.

सीटीसीसी विभागातील आपल्या काचेच्या केबिनमध्ये बसलेल्या जो लेहीला त्याने लगेच शोधून काढले. "जो, एक मिनिट."

नेहमीप्रमाणे जो रुबाबदार दिसत होता. जांभळा सूट, चकचकीत बूट व केस मागे वळवलेले. तो वॉल स्ट्रीटचा बँकर वाटत होता. "काय रे?" त्याने विचारले.

“एक फार जुनी आठवण उकरून काढण्यासाठी मला तुझा मेंदू जरा खरवडायचाय. कॉफी प्यायला येतोस?”

दोघे जण कँटिनमध्ये आले आणि एका कोपऱ्यातल्या टेबलावर बसले. “तू एके काळी एल् साल्व्हाडोरला होतास. बरोबर?”

“त्याला आता फार वर्षं झाली.” लेही म्हणाला. “आणि त्या वेळेस तू कंपनीत नुकताच लागलेला कोवळा बच्चा होतास.”

“हो. नवशिक्या होतो.” पालुंबो म्हणाला. “मला जरा मोर्निंग डोव्हबद्दल थोडक्यात सांग.”

“ती तर जुनी हकिकत आहे. तुला कशासाठी माहिती हवीय? ऑडिटसाठी?” पालुंबोने मान झटकली. “छे. छे. तसं काही नाही. त्यामागची पार्श्वभूमी जरा जाणून घ्यायची होती.”

“खूप वर्षं झाली रे त्याला. मीही तसा नवखाच होतो. GS-7 . उडाणटप्पू.”

“हे बघ जो, मी तुला कुठेही गोत्यात आणणार नाही. मी शब्द देतो. सर्व काही फक्त तुझ्यामाझ्यात असेल.”

“नक्की?”

“अगदी नक्की.”

लेही पुढे वाकला. “आमचं प्रशिक्षण सुरू होतं. त्यामध्येच हा प्रयोग केला गेला. नव्याने भरती झालेल्या तरुण मुलांना मेहनत व कडक शिस्तीची सवय होणं अतिशय गरजेचं होतं. बहुतेक सर्व जण गावठी, खेडवळ होते. लंगोटचा चढवणारे. आम्ही त्यांच्यासाठी कॅप्स आणल्या. त्यांना पिस्तुले, गोळ्या पुरवल्या. त्यांना किमान सैनिकी शिक्षण देणं आवश्यक होतं. त्या प्रदेशात लोकशाही रुजवायची होती ना?”

“पण हे शिक्षण देण्यासाठी तर आपण बेन्निंगला खास अमेरिकन सैनिकी शाळेची स्थापना केली होती ना?”

“हो. होती ना. पण ती अधिकृत शाळा होती. आणि हा तर सारा छुपा मामला होता. असो. एल् साल्व्हाडोरच्या अध्यक्षाला आमचा हा प्रयोग अतिशय आवडला. त्याने स्वतःच्या खाजगी संरक्षण दलासाठी हीच पद्धत वापरली. आम्ही फार रानटीपणे काम करत होतो. कारण आम्हाला तशाच एका पाशवी शत्रूबरोबर मुकाबला करायचा होता. डॅनी ओर्टेगा, बायंका जॅग्गर अशा कुविख्यात गुंडांनी तिथे उच्छाद मांडला होता. काही झालं तरी कम्युनिस्टांना पाय रोवून द्यायचा नाही असा आम्ही चंग बांधला होता. खरं तर सारी परिस्थिती आमच्या नियंत्रणाबाहेर होती. आमच्यासमोर नेमकं असं काहीच लक्षय नव्हतं. पण योजना कमालीची यशस्वी ठरली. शत्रूचं धाबं दणाणलं. चौऱ्याऐंशी साल उजाडेपर्यंत सगळं काम आटोपलेलं होतं. पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या व तो अध्यक्ष निर्विवाद निवडून आला. आम्ही आमचं चंबुगबाळं आवरलं, बस पकडली आणि परत आलो.”

“आणि ज्या लोकांना तुम्ही शिकवून तयार केलंत, त्यांचं पुढे काय झालं? त्यांच्यापैकी कुणी तुझ्यासोबत घरी परत आलं होतं?”

“घरी परत आलं होतं, म्हणजे?”

“कुणास ठाऊक. मला म्हणायचंय की त्यांच्यापैकी कुणाला तू बरोबर घेऊन आला होतास का? एखाद्या कसबी, तरबेज माणसाला?”

लेही अचानक गंभीर झाला. “तू फारच खोलात शिरतोयस उगाच. जास्त खोल पाण्यात उतरू नकोस.”

“आणखी एक गोष्ट तुला सांगतो. हीसुद्धा फक्त तुझ्या-माझ्यात. मला दोन माणसांची नावं समजलीयेत. एक फिलीचा मिक आणि दुसरा म्हणजे बिनटाऊनच्या दक्षिणेकडचा गुम्भा.”

त्यावर लेही फक्त हसला पण काहीही बोलला नाही.

पालुंबो मात्र बोलत राहिला. “गोष्ट अशी आहे की त्यातला एक जण माझ्या वाटेत आडवा आलाय. फार मोठमोठ्या म्होरक्यांना तो आपलं निशाण बनवू लागलाय व त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. पिस्तुलात गोळी भरण्याआधी तो ती बेडकाच्या विषात बुडवतो अशी खबर आहे. आपण खून केलेल्या माणसांची भुतं उद्या आपल्या मानगुटीवर न बसण्यासाठी तो ही खबरदारी घेतोय असं म्हणतात. तुला ह्या बेडकाच्या विषासंबंधी काही माहिती आहे?”

आता लेहीच्या डोक्यात असंख्य जुन्या आठवणी चमकू लागल्या होत्या.

“जो, मला वाटतं तुला काहीच माहिती नसावं. हो ना?”

“तू त्या काळ्या जादूबद्दल बोलतोयस.” लेही म्हणाला. “जर तुला आपल्या बायकोमुलांची खरंच पर्वा असेल तर त्यामागे न लागण्यातच तुझं भलं आहे.”

पालुंबो हट्टी व खुनशी होता. लेहीच्या धमकीने तो उलट चिथावलाच गेला. “ज्या माणसांना त्याने मारलं, त्या व्यक्ती गॅसनच्या कटात सामील होत्या. त्यांना एक विमान उडवायचं होते. त्यांच्यापाशी अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे. ताशी चारशे मैल वेगाने धावणारं व वीस किलो सिमटेक्स वाहून नेणारे ड्रोन त्यांच्यापाशी आहे. मला तर ते एक प्रकारचं भयानक क्षेपणास्त्रच वाटतंय. ते बनवणं कुणा ऐऱ्यागैऱ्याचं काम नव्हे.”

“तर मग तो इसम चांगलंच काम करतोय असं म्हणावं लागेल.”

“त्याबद्दल काहीच शंका नाही.”

“एखाद्या अतिरेकी संघटनेचं हे काम वाटत नाही. तुला काय वाटतं? त्यामागचा सूत्रधार कोण असू शकेल?”

“मी निश्चित सांगू शकत नाही. पण मला थोडीफार कल्पना आलीय. मला सांग, इतकी प्रचंड साधनं व एवढ्या मोठ्या प्रमाणावर दारुगोळा, कुणाकडे असू शकेल?”

“तुला म्हणायचंय की त्यांना एखाद्या सरकारचं पाठबळ आहे?”

“बरोबर.” टेबलावर टिचक्या मारत पालुंबो म्हणाला. “पण लक्षात ठेव, ही माहिती फक्त तुझ्या-माझ्यातच राहील.”

लेहीने छातीवर हात धरत क्रॉसची खूण केली.

“कॉंप्युटरवर जेव्हा मी त्या फाईल्स चाळत होतो तेव्हा मला एक विचित्र गोष्ट जाणवली.” पालुंबो पुढे म्हणाला. “त्याबद्दलच मला तुझ्याशी बोलायचं होतं. त्या मोहिमेच्या सूत्रधाराचं नाव खोडून टाकण्यात आलंय. जो, मला सांग की तुझ्या त्या ‘मोर्निंग डोव्ह’च्या पडद्यामागचा प्रमुख कोण होता?”

लेहीने क्षणभर पालुंबोकडे रोखून पाहिले व मग तो उठून उभा राहिला. बाहेर जाता जाता तो चटकन वाकला व तो पालुंबोच्या कानात दोन शब्द पुटपुटला. “दि अॅडमिरल.”

लेही कँटिनमधून बाहेर जाईपर्यंत पालुंबो आपल्या खुर्चीतच बसून होता.

‘दि अॅडमिरल’ म्हणजे जेम्स लॅफेव्हर. कार्यकारी उपसंचालक.

५५

“फक्त बहात्तर तास,” अंगातला कोट खुर्चीवर भिरकावत व्हॉन डॅनिकन म्हणाला. “आपल्यापाशी आता एवढाच वेळ शिल्लक आहे. रॅन्सम हे आपलं मुख्य लक्ष आहे. त्या इसमाने अशा प्रकारची कामं पूर्वीही केलेली आहेत. तो एकदम भडका उडवून देतो. त्याने बैरुत, कोसोव्हो आणि दर्फुरला नेमकं हेच केलं होते. माणसांना ठार मारण्यात तो तरबेज आहे.

फेडपोलच्या मुख्य कार्यालयातील तळघरातल्या एका सुसज्ज बैठकीच्या खोलीत आता ‘टास्क फोर्स’ने तंबू ठोकला होता. ती जागा इतकी गुप्त व सुनसान होती की तिथे एखादा भटकणारा आत्माही प्रवेश घेऊ धजला नसता. म्हणून त्या जागेला ‘शवागार’ म्हटले जायचे. अर्धवर्तुळाकार टेबले. प्रत्येक टेबलावर कॉम्प्युटर, फोन व कॉफी मशिन अशी सर्व व्यवस्था होती. त्या क्षणी तिथे फक्त सायलर व हार्डनबर्ग हे दोघेच उपस्थित होते. इतरांच्या अनुपस्थितीमुळे तो फारसा उत्साही दिसत नव्हता.

“मार्क्स, जरा दमाने घे.” मॅक्स सायलर म्हणाला. “बहात्तर तासच उरलेयत, म्हणजे तुला नक्की काय म्हणायचंय?”

व्हॉन डॅनिकनने खुर्चीत बसत, त्याला समजलेली माहिती दोघांना सविस्तर ऐकवली. “घटना घडली की दुसऱ्या दिवशी तो त्या देशातून बाहेर पडलेला असतो.” रॅन्समच्या गुन्ह्यांचे वर्णन करून झाल्यावर तो म्हणाला. “आता आपला डॉक्टर रॅन्सम हा रविवारी संध्याकाळी पाकिस्तानात जायला निघालाय. आपल्या होणाऱ्या बदलीची आपल्याला काहीच कल्पना नसल्याचं तो भासवेल; पण त्याला ते पक्कं ठाऊक असतं. ज्या पदाची तो सूत्रं स्वीकारणार आहे त्यावर आधी काम करत असलेल्या अधिकाऱ्याचा, त्याच्या माणसांनी काटा काढलेला असतो. आपल्याला रॅन्सम हवा आहे आणि तो आज, आत्ता हवा आहे. आता मला सांग, त्या व्हॅनचं काय झालं? कुणाच्या तरी नजरेत ती नक्कीच आलेली असणार.”

‘कुणाच्या तरी’ म्हणजे डब्लीन ते ड्युब्रोव्हनीकच्या दरम्यान बसवलेल्या वाहतूक मार्गावरील कॅमेऱ्याच्या नजरेत, असं त्याला म्हणायचं होतं.

“एकही धागा सापडलेला नाही.” हार्डनबर्ग म्हणाला. “मायर आता ISIS च्या ऑफिसमध्ये काही तपास लागतोय का हे बघण्यासाठी ठाण मांडून बसलाय.”

“सगळे वीस लाख कॅमेरे काय निकामी झालेयत का? वैतागून व्हॉन डॅनिकनने विचारले.

तेवढ्यात आपल्या सुटलेल्या पोटावरचा बेल्ट काढून टाकत कर्ट मायर आत शिरला.

“आला बाबा.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “तुझाच विषय चालला होता.”

मायरने सगळ्या उत्सुक चेहऱ्यांवरून एकवार नजर टाकली. परिस्थितीला कलाटणी

मिळालीय हे तो जाणून होता; पण त्यालाही तिचा नेमका अर्थबोध होत नव्हता. हात उंचावत त्याने आणलेले फोटो सर्वांना दाखवले. “लाइपझिग, दहा दिवसांपूर्वीचा फोटो. रेल्वे स्टेशन लगत असलेल्या बायरिश्चर प्लॅट्झ इथून हा फोटो काढला गेलाय. व्हॅन सापडली.”

“नशीब!” व्हॉन डॅनिकन उभा राहून फोटो निरखू लागला.

फोटो कमालीचा स्पष्ट आलेला होता. एक दाढीवाला इसम स्विस प्लेट्स असलेली एक पांढरी शुभ्र व्हॅन चालवत होता. त्याने कडा नसलेला चश्मा घातला होता. “गॅसन गाडी चालवतोय. मला गाडीचा नंबर मिळाल्यावर मी लगेच पुढच्या शोधाला लागलो. मला सात दिवसांपूर्वीचा झुरिचच्या रस्त्यावरचा एक फोटो सापडला.” पुन्हा दुसरा फोटो सगळ्यांना दाखवला गेला. “ह्या खेपेस ब्लिट्झ गाडी चालवतोय.”

“हा कॅमेरा नेमका कुठे बसवलेला आहे?” व्हॉन डॅनिकनने विचारले.

“बॅडनरस्ट्रॅस्स आणि हार्डप्लॅट्झच्या कोपऱ्यावर.”

“लॅमर्सची कंपनी तिथेच तर आहे ना?”

“हो. फारशी दूर नाही.” मायर म्हणाला. “अगदी काही किलोमीटर दूर. व्हॅनच्या मागच्या खिडकीतून नीट आत पाहा. आतमध्ये एक मोठी जड वस्तू दिसतेय. आम्ही फोटो नीट तपासले. त्या मोठमोठ्या लोखंडी पेट्या आहेत.”

“ड्रोन?”

“कल्पना नाही. पण जे काही आहे ते मोठं व जड आहे. व्हॅन किती खाली दबली गेलीय ते जरा नीट बघा. दोन फोटोंची तुलना करा. दुसऱ्या फोटोतली व्हॅन कमीतकमी सहाशे किलोचं वजन घेऊन निघालीये.” मायरने आपल्या हातातल्या गठ्ठ्यांमधून आणखी एक फोटो काढला. “हा फोटो शनिवारी ल्युगानोच्या रस्त्यावरून काढला गेलाय.”

ल्युगोना हे अस्कोनापासून तीस किलोमीटरवर आहे. ब्लिट्झ तिथेच राहायचा. ती व्हॅन ब्लिट्झच्याच गॅरेजमध्ये पडून होती. व्हॉन डॅनिकनला तो रंगाचा पट्टा आठवला. “याचा अर्थ असा होतो की गॅसनने लाइपझिगवरून स्फोटकं उचलली व मग ती व्हॅन आणि स्फोटकं ब्लिट्झच्या हवाली करून त्याने स्वीडनला पोबारा केला. ब्लिट्झ व्हॅन घेऊन झुरिचला आला व त्याने लॅमर्सच्या फॅक्टरीमधून ते ड्रोन व्हॅनमध्ये चढवलं. असंच ना?”

“पांढऱ्या व्हॅनबद्दल आपल्याकडे इतकीच माहिती आहे.”

व्हॉन डॅनिकनने मायरकडे चपापून पाहिले. “पांढऱ्या व्हॅनबद्दल, म्हणजे? अजूनही एखादी व्हॅन आहे?”

“तो सध्या काळी व्हॅन चालवतो. त्याने तिला नवा रंग दिलाय.”

“तुला कसं माहीत?”

“ती पांढरी व्हॅन कुठून मिळवली गेली हे जरी आपल्याला ठाऊक नसलं तरी तशाच दिसणाऱ्या दुसऱ्या एका व्हॅनच्या नंबर प्लेट्स शॅफहॉसनवरून चोरल्या गेल्या होत्या हे आपल्याला समजलंय. बहुतेक लोकं अशा प्रकारच्या चोरीची माहिती पोलिसांना कळवत नाहीत. त्यांना वाटतं की कोणीतरी उगाचच खोडी केलेली असेल व ते फक्त

मोटार वाहन विभागाकडेच चोरीची नोंद करतात. गॅसन व त्याच्या साथीदारांना वाटलं असेल की, ते भलतेच चलाख आहेत. पण आपण सवाई चलाख आहोत. मी हरवलेल्या नंबरप्लेट्सची यादी ताब्यात घेतली व नीट तपासली. लॉसेनमधल्या एका काळ्या व्हॅनच्या मालकाने आपल्या गाडीच्या नंबर प्लेट्स चोरल्याची तक्रार पंधरा दिवसांपूर्वी केली होती. व्हॅन चोरली गेली नव्हती, तर फक्त व्हॅनच्या नंबर प्लेट्स चोरीला गेल्या होत्या. मी ISIS मधून तो नंबर शोधून काढला आणि माझ्या हातात एकदम घबाडच येऊन पडलं."

मायरने आपल्या हातातला शेवटचा फोटो सर्वांना दाखवला. एका चौकामधून आठ बाय दहाची काळी व्होल्क्सवॅगन भरधाव निघाली होती. त्यावर लिंड्ट चॉकलेटची व एका प्रसिद्ध फर्निचर विक्रेत्याची जाहिरात चिकटवलेली होती.

"काल संध्याकाळी पाच वाजता झुरिचच्या सीमेबाहेर हा फोटो काढला गेलाय."

"पण ही तीच व्हॅन असू शकेल याची खात्री काय?"

"दोन्ही व्हॅन्सच्या पुढच्या बंपर्सकडे नीट लक्ष देऊन बघ. दोन्ही फोटोतल्या बंपर्सला, गाडीच्या दिव्याखालच्या भागात पोचा आलाय. गाडीमधल्या आरशाखाली एकाच प्रकारचा एअरफ्रेशनर दिसतोय. यापैकी एका गोष्टीला आपण योगायोग म्हणू शकतो. दोन्ही गोष्टींबाबतीत? शक्यच नाही."

"शहर पोलीस विभागाला ताबडतोब खबर द्या." व्हॉन डॅनिकन म्हणाला. "व्हॅन ताब्यात घेण्याचं वॉरंट काढायला सांगा. देशातल्या पूर्वेकडच्या प्रत्येक भागातून गेल्या चोवीस तासात वाहतूक केलेल्या प्रत्येक वाहनाचा फोटो मिळवा."

"अगदी बरोबर."

व्हॉन डॅनिकनने तो फोटो डोळ्याजवळ धरला. "आता ती व्हॅन कोण चालवतंय? ब्लिट्झ तर असू शकत नाही. तो तर कधीच मेलाय." त्याने मायरच्या हातात फोटो दिला.

फोटो पाहून मायरच्या कपाळाला आठ्या पडल्या. त्याने डोळ्याला छोटी दुर्बीण लावली. "काहीतरी गोंधळ आहे. तो वेगळाच दिसतोय."

"आपण हा फोटो गुन्हा विभागाच्या प्रयोगशाळेत पाठवू या. ते हा फोटो मोठा करून इंटरपोलकडे पाठवतील. त्यांच्यापाशी चेहऱ्यावरून माणूस ओळखण्याचं सॉफ्टवेअर आहे."

मायर खोलीतून बाहेर पडला होता.

व्हॉन डॅनिकनने खुर्ची फिरवली आणि उरलेल्या दोघांशी बोलायला सुरुवात केली. "पूर्वेला बरंच काही घडलंय. पश्चिमेने किती प्रगती केलीय?"

आता क्लॉस हार्डनबर्गची बोलण्याची पाळी होती. हार्डनबर्ग हा बुटका व पांढऱ्याफटक चेहऱ्याचा अनुसंधक होता. झुरिचमधल्या एका आंतरराष्ट्रीय कंपनीची नोकरी सोडून तो अशा कायदा अंमलबजावणीच्या रुक्ष व काटेरी कुरणात स्वेच्छेने शिरला होता.

"ब्लिट्झ आपला सर्व बँकिंग व्यवहार बँक पोपोलरे डेल टिसिनोमधून करत होता. आम्ही त्याच्या युरोकार्डवरून ह्या बँकेचं नाव शोधलं. त्याच्या बँकखात्यामध्ये सरासरी मासिक शिल्लक ही सुमारे बारा हजार फ्रँक्स असायची. नेहमीच्या घरगुती कारणांसाठी

तो त्यातून खर्च करत असे. गॅस, विजेची बिलं वगैरे. अस्कोनामधील एका ठरावीक एटीम मशिनमधून तो दर आठवड्याला पाचशे फ्रँक्स काढायचा. कोट्यवधी किमतीच्या बंगल्यात राहणाऱ्या व श्रीमंती गाड्या फिरवणाऱ्या या धनाढ्य माणसाची जीवनशैली त्यामानाने अगदीच सर्वसाधारण होती."

"बंगला त्याच्या मालकीचा नसावा असं जर आपण गृहीत धरलं तरच."

"माझ्याही मनात नेमका हाच विचार आला होता." हार्डनबर्गच्या चेहऱ्यावर मंद स्मित झळकलं होते. "मात्र एका गोष्टीकडे माझं लक्ष वेधलं गेलं. गेल्या आठवड्यात अचानक त्याच्या खात्यामध्ये एक लाख फ्रँक्स जमा झाले होते. 'P.J. कडून भेट' अशी त्या स्लिपवर नोंद होती. ब्लिट्झने ते सर्व पैसे ल्युगानो शाखेतून काढून घेतले होते. ते सुद्धा अगदी सरळ-सरळ कुठलीही लपवाछपवी न करता. तो येऊन मॅनेजरला भेटला होता व आपल्याला अँटोवँस येथील एका बोटीच्या खरेदीसाठी रोख रक्कम हवी आहे असं त्याने त्या मॅनेजरला सांगितलं होतं."

"त्याच्या घरी कुणाला ते पैसे सापडले?"

"मी पोलीस स्टेशनला जाऊन चौकशी केली पण काही निष्पन्न झालं नाही."

"ते पैसे कोणी पाठवले होते?"

"हां." हार्डनबर्ग म्हणाला. "इथेच तर खरी मेख आहे. रॉयल ट्रस्ट अँड क्रेडिट बँक ऑफ बाहामासच्या फ्रीटाऊन शाखेतल्या एका गुप्त खात्यातून हे पैसे हस्तांतरित झाले होते."

"मी ह्या बँकेचं नाव कधीच ऐकलेलं नाही." व्हॉन डॅनिकनचा आजपर्यंत अनेक बँका व आर्थिक संस्थांशी संबंध आलेला होता.

"ही बँक तशी छोटी व फारशी प्रसिद्ध नाही. तिचं भांडवलही एक बिलियनच्या आत आहे. बँकेची एकही इमारत नाही. सर्व व्यवहार कागदोपत्री चालतो. आता तुझी परवानगी असेल तर मी ब्लिट्झकडून लॅमर्सकडे वळतो."

सर्वांच्या माना हलल्या. हार्डनबर्गने रेड बुल बिअरचा अर्धा कॅन ढोसला व त्यावर एक सिगारेट शिलगावत बोलायला सुरुवात केली.

"आता आपण लॅमर्सवर लक्ष केंद्रित करू या." हार्डनबर्ग म्हणाला. "त्याचाही सर्व व्यवहार अगदी उघड उघड होता. USB सारख्या प्रतिष्ठित बँकेत त्याचं खातं होतं. मी ते तपासलं. नऊ महिन्यांपूर्वी त्याच्या खात्यात वीस लाख फ्रँक्स जमा झाले होते. ते ही रॉयल ट्रस्ट अँड क्रेडिट बँक ऑफ बहामासमधूनच."

"त्याच बँकेतून आणखी वीस लाख?" व्हॉन डॅनिकन पुढे सरकत आता खुर्चीच्या अगदी कडेवर येऊन बसला होता. "ब्लिट्झला पैसा पुरवणारीही जर हीच माणसं असतील तर आपण ती टोळी नक्कीच पकडू शकतो. लॅमर्सला कोणत्या कारणासाठी पैसे पाठवले गेले होते?"

मायरने व्हॉन डॅनिकनकडे पाहिले. "ड्रोनसाठी."

हार्डनबर्गने मान हलवली. "मग तर आपलं काम सोपंच झाले. ते पैसे दुसऱ्या एका खास गुप्त खात्यातून आले असणार याची मला खात्री होती. कारण एकाच खात्यातून लॅमर्स व ब्लिट्झला पैसे पाठवले जाण्याची शक्यताच नव्हती. मी ही गोष्ट त्या बँकेचा मॅनेजर, मिस्टर डेव्हिस ब्रुन्सविकशी बोललो. तो तोंड उघडायला तयार नव्हता.

सुरुवातीला मी त्याच्याशी सलगी दाखवली. नंतर मात्र त्याला थेट सांगितलं की, जर तू मला माहिती दिली नाहीस तर तुझ्या बँकेचे स्वित्झर्लंडमधील सर्व व्यवहार बंद करण्याची मी व्यवस्था करीन.”

“त्याचा उपयोग झाला?”

हार्डनबर्गने खांदे उडवले. “छे. आता प्रत्येक जण भलताच आडमुठा बनलाय. मग मी दुसरं अस्त्र काढलं. मी ब्रुन्सविकबद्दलची माहिती आधीच गोळा केली होती. आपल्या देशात त्याने वेगवेगळ्या वैयक्तिक खात्यांमध्ये मिळून साधारण सव्वीस दशलक्ष फ्रँक्स गुंतवलेले आहेत. मी त्याला धमकी दिली की, जर त्याने मला खरी माहिती दिली नाही तर त्याची ही सर्व खाती ताबडतोब गोठवली जातील.”

“मग?”

“बुरन्सविक घडाघडा ओकायला लागला. टिंगेली बँकेच्या नियंत्रणाखाली असलेल्या एका ट्रस्टची ती दोन्ही खाती होती. त्याच खात्यातील पैशांमधून व्हिला प्रिन्सिपेस्सा हा बंगलाही विकत घेतलेला होता.”

“पण ब्रुन्सविकने आपल्या देशात पैसा गुंतवलाय हे तू कसं शोधून काढलंस?” व्हॉन डॅनिकनने विचारले.

आपले भले मोठे टक्कल पडलेले डोके गदागदा हलवत हार्डनबर्ग गुदगुल्या झाल्यासारखा हसला. “तो प्रश्न मात्र मला विचारू नको. फक्त माझ्यावर विश्वास ठेव.”

सर्व जण खळखळून हसले.

सायलरने घसा खाकरला. “मार्क्स, तू तर टोबी टिंगेलीला चांगलाच ओळखतोस.”

व्हॉन डॅनिकन, मिश्किलपणे हसू लागला. “होलोकॉस्ट कमिशनवर टोबीने व मी एकत्र काम केलंय.”

“तो तुझ्यावर कदाचित मेहेरबानी करेल.”

“मेहेरबानी? टोबीला हा शब्दच ठाऊक नाही.”

व्हॉन डॅनिकनच्या डोळ्यासमोर टोबीची आकृती उभी राहिली. टोबियास ‘टोबी’ टिंगली दि फोर्थ. त्याचा तो डोळे दिपवून टाकणारा महाल. टोबी गर्भश्रीमंत होता. गर्विष्ठ, बढाईखोर आणि उर्मट होता. मार्क्स व्हॉन डॅनिकनने गेल्या दहा वर्षांपासून याच दिवसाची नकळत वाट पाहिली होती.

पण त्याच्यावर सूड उगवण्याच्या विचाराने तो फारसा आनंदूनही गेला नव्हता. “होय मॅक्स.” तो शांतपणे म्हणाला. “मी त्याला जाब विचारणार आहे.”

५६

ऑटोबन्हच्या रस्त्यावर मोठा अपघात झाला होता. गाड्यांची भली मोठी रांग लागलेली होती व दिव्यांचा भगभगीत प्रकाश सहन करणे कठीण झाले होते. जोनाथनने आपली नजर बाजूला वळवत तो प्रखर प्रकाश टाळण्याचा प्रयत्न केला. त्याच्या डोक्यात विचारांचे थैमान सुरू झाले होते. पळून जा. त्याचे मन त्याला सांगत होते. पाणी आता डोक्यावरून वाहू लागलेय. ते सर्व अट्टल व्यावसायिक आहेत. तुझ्यासारख्या नवशिक्याचा त्यांच्यासमोर निभाव लागणार नाही.

उत्तरेला शंभर किलोमीटरवर ऱ्हाईन नदीचे खोरे होते. त्यापलीकडे जर्मनीची सरहद्द सुरू होत होती. तिथे पोहोचायला अनेक मार्ग होते. बाजूलाच फ्रान्सची सीमा होती. तो जिनिव्हामधून जाऊ शकत होता. तिथून अॅन्नेसी ओलांडून पलीकडे जाणे शक्य होते. तीन तासांच्या आत त्याला चॅमोनिक्समधली त्याची आवडती फाँड्यू डिश चाखता आली असती. ते शहर त्याच्या ओळखीचे होते. तिथली अनेक हॉटेल्स त्याला आठवली. तिथे तो काही दिवस सहज मुक्काम ठोकू शकला असता. पण निर्वासित म्हणून जगायची कल्पना त्याला सहन होणारी नव्हती.. काही काळासाठी आश्रय मिळवणे ठीक आहे, पण अखेर कायमचे बाहेर पडण्यासाठी एखादा मार्ग शोधणे आवश्यक होते.

एगरकिंजेनला पोहोचल्यावर त्याने ऑटोबन्हला बगल दिली. तिथे दोन रस्ते फुटलेले होते. एक रस्ता उत्तरेला बेसेलकडे जात होता व दुसरा पूर्वेकडे झुरिचला. बाजूला मोव्हेनपिक नावाचे एक रेस्टॉरंट, छोटेसे लॉज व एक दुकान होते. गाडी पार्क करून तो रेस्टॉरंटमध्ये शिरला. त्याने पॉम्मेज फ्राईट्स व कोकची ऑर्डर दिली. स्विसमधल्या शाळकरी मुलांचे ते आवडते खाद्य-पेय होते.

वेटरची वाट बघत बघता, त्याच्यासमोर बर्नमधला तो आलिशान फ्लॅट पुन्हा पुन्हा येऊ लागला. इव्हा क्रुगरचा फ्लॅट. तिच्या आवडीनिवडींचा लक्षपूर्वक विचार करून सुशोभित केलेले ते घर. त्यासाठी किती वेळ आणि मेहनत घ्यावी लागली असेल. एम्माने केलेल्या प्रतारणेच्या विचारांपलीकडे तो आता गेला होता. त्यांनी कमालीची शिस्त व सावधगिरी बाळगलेली होती. ती एखादी हेर असू शकेल असा त्याच्या मनात चुकूनही विचार आलेला नव्हता. ती देशाच्या गुप्तहेर विभागात काम करत होती. आपण मात्र तिच्या अनैतिक संबंधाबद्दल विचार करत राहिलो. आपल्या नवऱ्याला सतत आठ वर्षे फसवत राहण्यासाठी तिला फारच उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळालेले असणार.

खिसा चाचपडताना त्याच्या हाताला ती लग्नाची अंगठी लागली. तो अंगठी निरखू लागला. त्याला त्या अंगठीसंबंधात काहीतरी खटकत होते. तिच्या बोटात ती बसणारी नव्हती हेच त्याला त्याचे कारण वाटत होते. तिचे दोन भाग करता येत होते, याचा अर्थ काहीतरी वेगळा होत होता. गुप्त संदेश. इव्हा क्रुगर कुमारिका होती याची त्याला पुन्हा आठवण झाली. मग त्या अंगठीचे नेमके प्रयोजन काय होते?

डिश घेऊन वेटर आला. दहा मिनिटांपूर्वी तो भुकेने व्याकूळ झाला होता. आता भूक मरून गेली होती. तो कोक पिऊ लागला व त्याने डिश बाजूला सरकवली.

अंगठी.

अंगठीवर कोरलेले आकडे तो वाचू लागला. 2-8-01 . ८ फेबुरवारी, २००१. या दिवशी तो कुठे होता? सुदानला. तिथल्या त्या शुष्क हवेमध्ये घोंघावणाऱ्या माश्यांनी जीव हैराण केला होता. पण त्या तारखेला त्याच्या लेखी फारसे काही महत्त्व नव्हते आणि त्याच्या माहितीप्रमाणे एम्माच्या दृष्टीनेही नव्हते.

आणि त्याच्या अचानक लक्षात आलं.

ती एम्माच्या लग्नाची अंगठी नव्हती. इव्हा क्रुगरची होती. तो चुकीच्या पद्धतीने ती तारीख वाचत होता. अमेरिकेमध्ये तारीख वेगळ्या पद्धतीने लिहिली जाते. आधी महिना, मग तारीख व शेवटी वर्ष. पण इव्हा क्रुगर तर स्विस होती. तिने आपल्या अंगठीवरची तारीख युरोपियन पद्धतीप्रमाणे कोरायला हवी होती. तारीख-महिना-वर्ष.

2-8-01

त्याची नजर आकड्यांवर खिळत गेली आणि त्याच वेळेस त्याच्या पोटात अस्वस्थ करणारी एक थंड लहर हळूहळू उसळत गेली.

२ ऑगस्ट, २००१ रोजी इटलीतील कोर्टिनामध्ये एका साध्या खाजगी समारंभात, तो आणि एम्मा एव्हेरेट्ट रोझ विवाहबद्ध झाले होते. कुणीही नातेवाईक हजर नव्हते. तसा तिचाच आग्रह होता. त्याच्याही कुटुंबातले नव्हते व तिच्याही कुटुंबातले नव्हते. ऑफिसमधलेही कुणी सहकारी आलेले नव्हते. “हा फक्त आपल्या दोघांचा दिवस आहे जोनाथन,” ती म्हणाली होती. “ह्या दिवशी मी तुला माझं सर्वस्व अर्पण करतेय.”

ब्लिट्झच्या बंगल्यात त्याला हाताच्या तळव्याएवढ्या आकाराचा PDA सापडला होता. त्याने तो खिशातून बाहेर काढला व एम्माच्या फ्लॅश ड्राईव्हला जोडला. तो इवलासा संगणक सुरू झाला. ‘थॉर’ ही अक्षरे उमटली. त्याने क्लिक् करताच त्याला पासवर्ड विचारला गेला. अंगठीवरचे आकडे त्याने टाईप केले.

पडदा चमकला व "Accepted" हा शब्द उमटला गेला.

तो आता आत शिरला होता.

पडद्याचा रंग निळा झाला. त्यावर "Intelink" अशी अक्षरे आली. त्याने पुन्हा क्लिक केले. काही क्षण काहीच घडले नाही. त्याच्या पोटात खड्डा पडला. बहुतेक पुन्हा एकदा मार्ग खुंटला जाणार. पण हळूहळू पडद्याचा रंग पांढरा होत गेला व त्यावर ओळीमागून ओळींचा मजकूर दिसू लागला. ते एक प्रकारचे लघुलेखन होते. प्रत्येक मजकुराची सुरुवात तारीख, वेळ व पाठवणाऱ्याचे सांकेतिक नाव ह्या क्रमाने होत होती.

अगदी अलीकडे पाठवलेला मजकूर असा होता: 8-2; 15 : 16 CET. Cormorant.

तारीख आजची होती. स्वत:ला कॉर्मोरंट म्हणवणाऱ्या व्यक्तीने तो संदेश दुपारी ३ वाजून १६ मिनिटांनी पाठवला होता.

हत्ती थॉरमध्ये घुसला. उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न अयशस्वी. जखमी हत्तीने पलायन केले. अधिक माहिती घेण्यासाठी ताबडतोब भेटावे.

त्या आधीचा मजकूर तीन तासांपूर्वी पाठवलेला होता. दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी. CET; हॉक असे पाठवण्याचे नाव लिहिलेले होते.

विषय : नवीन अत्याधुनिक मर्सिडिज गाडीच्या उपलब्धतेविषयी, डायमलेर-बेन्झ मुख्य कार्यालयाशी संपर्क साधला. मार्च अखेरपर्यंत नवीन गाडी मिळू शकत नाही. एक गाडी आहे. वापरलेली. रंग : काळा. चामडे : राखाडी, किंमत २,७५,००० युरो. तुला मान्य आहे का? उत्तराची वाट पाहतोय.

जोनाथन वेगवेगळी माहिती चाळू लागला. त्याला वेब लॉग दिसला. एक खास 'एगू' तयार करण्यात आली होती. प्रत्यक्ष मोहीम सुरू असताना त्यावरून आँखों देखा हाल, सांगता येऊ शकत होता. हेरगिरीचे धावते वर्णन.

त्याने त्या वेबचा पत्ता शोधण्याचा प्रयत्न केला पण त्याला तो सापडला नाही. त्याने फाईल डिरेक्टरी तपासली. http : // international resource. net असा एक पत्ता मिळाला, पण तो पत्ता त्याच्या उपयोगाचा नव्हता.

तो पुन्हा Intelink च्या पानावर आला. त्यामध्ये आणखी काही नोंदी केलेल्या होत्या.

7-2 ; 13 : 11 CET. falcon . तो संदेश आदल्या दिवशी फाल्कनकडून आला होता.

रॉबिन तडजोडीला तयार. सर्व संपर्क तोडून टाकावेत. मुख्य कार्यालयातून पुढील सूचनांची प्रतिक्षा.

7-2; 10:55 CET Cormorant . हत्तीने स्वत: संपर्क साधला. थॉरच्या संदर्भात. रॉबिनचा PDA हत्तीच्या ताब्यात. रॉबिन मारला गेलाय असे म्हणाला. दुजोरा हवाय.

7 - 2; 09:55 CET. Falcon . पैसे पाठवण्याची परवानगी मिळाली.

7 - 2; 08:45 CET. Robin. BPT इथल्या खात्यात 1,00,000 फ्रँक्स पाठवावेत अशी विनंती. गायब निधीची पर्यायी व्यवस्था.

जोनाथनच्या हळूहळू लक्षात येऊ लागले होते. 'कॉर्मोरंट' हा हॉफमन होता. 'हॉक' मात्र अनोळखी होता. 'फाल्कन' हा मुख्य सूत्रधार दिसत होता. पैसे पाठवण्यास त्यानेच परवानगी दिली होती व त्यानेच रॉबिनच्या मृत्यूची वार्ता इतर साथीदारांना कळवली होती. 'रॉबिन' म्हणजे गॉटफ्रिड ब्लिट्झ होता. आणि मग एम्मा? ती कुठे होती?

त्याने पुन्हा पुन्हा सर्व मजकूर धुंडाळला. त्याला पक्की तारीख व वेळ हवी होती. अखेर त्याला ती सापडली. मंगळवार. एम्माच्या अपघातानंतरचा दुसरा दिवस.

5 - 2; 07 : 45 CET. Falcon . गिर्यारोहण करत असताना कोकिळा गायब. हत्ती जिवंत.

सापडले. एम्मा म्हणजे 'कोकिळा.' जोनाथन म्हणजे हत्ती. बुद्धिबळाच्या पटावरचा 'हत्ती.' एक सोंगटी. का, फसवणुकीच्या खेळातील एक रुक्. तोच अर्थ जास्त योग्य असावा. जोनाथन मनातून चिडला होता. पण त्याच्या लक्षात आले की, ते फक्त एक सांकेतिक नाव होते. इतरांना जसे दिले होते, तसेच त्यालाही दिलेले होते. इतकेच.

रुक्. ब्रिटिशांमध्ये तो कावळ्याच्या जातीचा एक पक्षी म्हणून ओळखला जातो. पण कावळ्यापेक्षा आकाराने खूपच मोठा व अधिक आक्रमक.

जोनाथन अधाशासारखा तो मजकूर पुन्हा पुन्हा वाचत होता. मागील काही दिवसात घडलेल्या घटनांकडे तो आता एका वेगळ्या नजरेतून पाहू शकत होता. इथे ब्लिट्झ म्हणत होता की, नवीन मर्सिडिज गाडी लँडक्वॉर्टला उभी केलीय व सामानाच्या पावत्या एम्माच्या हॉटेलच्या पत्त्यावर पाठवून दिलेल्या आहेत. नंतर एम्माचं उत्तर आलं होतं की रेल्वे रुळांवर मोठ्या प्रमाणावर बर्फलोट झाल्यामुळे सामानाच्या पावत्या मिळालेल्या नाहीत व ती दुसऱ्या दिवशी जाऊन सामान ताब्यात घेणार होती. गिर्यारोहणाला निघायच्या आदल्या दिवशी संध्याकाळी साडेसहा वाजता पत्र व पावत्या पाठवलेल्या होत्या.

जोनाथनने आजूबाजूला पाहिले. रेस्टॉरंट आता तुडुंब भरलेले होते. दिवे झगमगत होते. गोंगाट वाढला होता.

त्या सर्व काळात एम्मा सतत त्यांच्या संपर्कात होती तर.

तितक्यात आणखी एक मजकूर उमटला.

अगदी आत्ताच पाठवलेला.

8 - 2; 21 : 56 CET. Falcon . पीजे 20 : 16 ला झुरिचच्या विमानतळावर उतरलाय. हॉटेलच्या वाटेवर आहे. 9 - 2 बैठक निश्चित होणार. बेल्व्हेडरला दुपारी दोन वाजता. मालाची रिसिट घेऊन येणे. सोन्याचा व्यापार.

याचा अर्थ, उद्या १ फेब्रुवारीला दुपारी दोन वाजता. डॅव्होसमधले बेल्व्हेडर हॉटेल त्याला ठाऊक होते. श्रीमंत व उच्चभ्रू व्यक्तींची वर्दळ असलेले पंचतारांकित हॉटेल. पण हा P.J कोण होता? आणि सोन्यासारखी कुठली वस्तू त्याच्यापाशी होती?

आणि तेवढ्यात कॉर्मोरंटकडून उत्तर आले. हॉफमन डॅव्होसला निघालाय.

पाच सेकंद तो मजकूर चमकत राहिला.

त्या पानावरील "Reference" या शब्दावर जोनाथनने प्रथमच क्लिक् केले. त्याबरोबर त्याला अनेक नवीन "links" मिळाल्या. आणखी काही सांकेतिक शब्द सापडत गेले. तारखेपाठोपाठ एक नाव आले. ते नाव आता त्याच्या चांगल्याच परिचयाचे झाले होते. झिअॅग. झुग इंडस्ट्रीवर्क.

त्याने पहिली फाईल उघडली.

ते बिल ऑफ लेडिंग होते. झिअॅगवरून अथेन्सच्या झॅन्थस मेडिकल इन्स्ट्रूमेंट्सला पाठवलेल्या मालाची त्यात माहिती दिलेली होती. अत्याधुनिक विमान वाहतूक यंत्रणांचे दोनशे वेगवेगळे सुट्टे भाग जगभरातल्या विविध ठिकाणी पाठवण्यात आले होते. तांत्रिक वर्णन पुढीलप्रमाणे : किंमत : प्रत्येक भागाची किंमत वीस हजार फ्रँक्स. १ फेब्रुवारी, संध्याकाळी ६ वाजताच्या स्विस विमानाने झुरिचहून अथेन्सला माल पाठवण्यात येणार आहे.

फाल्कनने कॉर्मोरंटला पाठवलेल्या संदेशात ह्याच मालाचा उल्लेख होता? त्याने आणखी काही फाईल्स उघडल्या.

त्यामध्येही अशाच प्रकारची माहिती होती. इन्सुलिन पंप, व्हॅक्युम ट्युब्स, कार्बन एक्सट्रूझर्स. १० डिसेंबर, झुरिचवरून कैरोला माल पाठवला होता. २० नोव्हेंबरला झुरिचहून दुबईला. २१ ऑक्टोबरला जिनिव्हावरून रोममार्गे अम्मानला. अशा वेगवेगळ्या नोंदी होत्या. सर्व माल अखेर मध्य-पूर्वेला जाऊन पोहोचला होता.

आपले शब्द खरे ठरले ही गोष्ट जोनाथनच्या लक्षात आली होती. तो हॉफमनला म्हणाला होता की, तुम्ही विघातक वस्तूंचे उत्पादन करताय व त्या वस्तू नको त्या माणसांच्या हाती सोपवताय.

पण हा P. J. कोण होता? आणि तो डॅव्होसमधील जागतिक अर्थशास्त्र परिषदेला का हजर राहतोय?

जोनाथनने जेवण संपवले व बिलाचे पैसे चुकते केले. रेस्टॉरंटच्या बाहेर पडल्यावर तो एका स्टॉलपाशी थांबला व वर्तमानपत्रे चाळू लागला. प्रत्येक दैनिकाच्या मुख्य पानावर जागतिक अर्थशास्त्र परिषदेची बातमी ठळक अक्षरात छापलेली होती. त्याने दोन स्विस वर्तमानपत्रे विकत घेतली व त्याबरोबर 'हेराल्ड ट्रिब्युन' व 'फायनान्शल टाइम्स'ही घेतला. पार्किंग लॉट ओलांडत तो मर्सिडिज असलेल्या रांगेत आला.

त्या मोकळ्या जागेतून चालत जात असताना एक गाडी अगदी हळुवार वेगाने आपल्याच दिशेने येतेय हे त्याच्या लक्षात आले. दुसऱ्याच सेकंदाला गाडीवर असलेल्या सायरनकडे त्याचे लक्ष वेधले गेले होते. तो संथ पावले उचलत गाडीच्या रोखाने चालू लागला. गाडीत दोन पोलीस होते. आपल्या हातातील दिव्यांच्या प्रकाशात ते प्रत्येक गाडीवर असलेली नंबर प्लेट तपासत होते. गाडीपाशी येताच, दरवाजा उघडून तो चटकन गाडीत शिरला. श्वास रोखून तो वाट पाहत राहिला. दिव्यांच्या प्रकाशामुळे बाजूच्या सीटवर ठेवलेले वर्तमानपत्र तो स्पष्ट वाचू शकत होता. न्यू झर्चर झायटंगच्या मुख्य पानावरील फोटोत एक मध्यपूर्वेकडील पुढारी तावातावाने भाषण देत होता. बातमीच्या मथळ्यात परवेझ जिन्न अशी त्याची ओळख दिलेली होती. तो इराणचा तंत्रज्ञान मंत्री होता. बातमीत पुढे म्हटले होते की, संध्याकाळी डॅव्होस येथे होणाऱ्या परिषदेत तो आपल्या देशाच्या आण्विक प्रगतीविषयी माहिती देणार होता.

परवेझ जिन्न. जोनाथनच्या स्मरणातून ती आद्याक्षरे पुसली गेली नव्हती. त्याला 'पी. जे.' सापडला होता.

आणि त्यानंतर पुन्हा काळोख पसरला गेला. दुसऱ्या गाडीवर प्रकाशझोत पसरलेला होता. ही त्यांची नेहमीचीच तपासणी होती का, कां ते त्याचाच शोध घेत होते हे त्याला कळेना.

त्याने इंजीन सुरू केले व गाडी बाहेर आणली.

तो पुन्हा डोंगरात निघाला होता.

डॅव्होसला.

५७

झुरिचबर्गच्या टेकडीवर डोल्डर ग्रँड हॉटेलच्या शेजारी असलेल्या एका भव्य व्हिक्टोरियन प्रासादात टोबियस टिंगेली राहत होता. तो चार मजली दगडी बंगला होता. तिथेच त्याचे वडील राहिले होते व वडिलांचे वडीलसुद्धा. १८७० साली पहिल्या टोबियस टिंगेली यांचे नशिब अचानक फळफळले गेले. कैसर विल्हेम (पहिला) आणि नेपोलियन (तिसरा) यांच्यामधील युद्धकाळात, त्यांनी सुरुवात केलेला बँकव्यवसाय भरभराटीस आला होता.

त्यानंतर आजतागायत त्या खाजगी बँकेचे व जर्मनीचे संबंध अत्यंत सलोख्याचे राहिले होते. दुसऱ्या महायुद्धात तर राष्ट्रीय समाजवाद्यांना ती बँक जणू देवासारखीच वाटली होती. त्यांना बँकेच्या मदतीने आपल्याजवळील सोने विकता आले होते. शिवाय अमेरिकन, ब्रिटिश व रशियन हेरांनाही त्या बँकेमधून आपले आर्थिक व्यवहार करणे सोयीचे ठरले होते. त्यानंतर मात्र बँकेने आपले लक्ष केवळ खाजगी ग्राहकवर्गावरच केंद्रित केले असले, तरी बँकेत चालणाऱ्या छुप्या व संशयास्पद व्यवहारासंबंधीच्या अफवा अधूनमधून पसरतच राहिल्या होत्या.

“मार्क्स, अरे आत ये.” टोबियास टिंगेलीचा गडगडाटी आवाज घुमला. “तुझा फोन येणं, हा माझ्यासाठी धक्काच होता.”

व्हॉन डॅनिकनच्या चेहऱ्यावर मंद स्मित होते. धक्का कसला, तो हादरलाच असणार हे त्याला चांगलच ठाऊक होते. “हॅलो टोबी, तुझं कसं चाललंय? तुझ्या कामात व्यत्यय तर नाही ना आणला?”

“अजिबात नाही. असा ताटकळत उभा राहू नकोस. मला तुझं जाकीट काढू देत.”

टोबियास टिंगेली–चौथा, मित्रपरिवारात ‘टोबी’ या नावाने ओळखला जाणारा, नव्या पिढीचा बँकर होता. तो तरुण होता. व्हॉन डॅनिकनपेक्षा दहा वर्षांनी लहान होता. जीन्सची पँट, गळाबंद स्वेटर आणि मानेपर्यंत रुळणारे केस यामुळे तो बँकरपेक्षा एखादा मनस्वी कलाकारच वाटत होता.

व्हॉन डॅनिकनने आपला कोट त्याच्या हवाली केला. दहा वर्षांपूर्वी तो जेव्हा इथे आला होता त्या वेळी त्याचा कोट काढण्यासाठी आणि त्याला कॉकटेल्स देण्यासाठी नोकरांचा तांडा उभा होता. टिंगेलीने वैभवाचा त्याग केलाय की, तो येणार म्हणून मुद्दाम नोकरांना रजेवर पाठवलेय ह्याचा त्याला अंदाज येईना. त्या दोघांची भेट ही कदाचित इतिहास घडवणारी ठरण्याची शक्यता होती. अत्यंत गुप्त. टोबीने कितीही उत्साहाचा आव आणला असला तरी व्हॉन डॅनिकनचे येणे, त्याला मनातून निश्चितच आवडलेले नव्हते.

“मार्क्स, माझ्या मागोमाग ये. माझं घर तर तुझ्या ओळखीचंच आहे.” टिंगेली त्याला प्रशस्त दिवाणखान्यात घेऊन आला. खिडकीबाहेर झुरिचचा प्रसिद्ध निळाभोर तलाव पसरलेला होता. काचेच्या कपाटात आकर्षक व सुबक आकारांचे ग्लास ठेवलेले होते.

“ड्रिंक्स?” कपाट उघडत त्याने विचारले.

व्हॉन डॅनिकनने नकार दिला. “मी तुला आधीच सांगितलं होतं की परिस्थिती आणिबाणीची आहे.” त्याने सुरुवात केली. “आज जे आपण बोलणार आहोत त्याची तू कुठेही वाच्यता करणार नाहीस असा मला तुझ्याकडून शब्द हवाय. शिवाय तू अतिशय मोकळ्या मनाने बोलशील असंही मी धरून चालतो.”

टिंगेलीने गंभीरपणे मान डोलावली. दोघेही एकसारख्या दिसणाऱ्या चामड्याच्या खुर्च्यांवर समोरासमोर बसले. व्हॉन डॅनिकन त्याला, आपण केलेल्या तपासाची प्राथमिक माहिती देऊ लागला. लॅमर्स व ब्लिट्झ, त्यांचे झालेले खून, ब्लिट्झच्या गॅरेजमध्ये सापडलेली स्फोटके, वालिद गॅसन ह्या दहशतवाद्याबरोबर असलेले त्यांचे संबंध याविषयी तो थोडक्यात बोलला. पण विमान उडवण्याच्या धमकीचा मात्र त्याने उल्लेखही केला नाही. “त्यांचे आर्थिक व्यवहार तपासत असताना आमच्या लक्षात आलं की, तुझ्या नियंत्रणाखाली असणाऱ्या लायसचटेन्स्टाइनमधील एका कंपनीमार्फत ते व्यवहार झालेले आहेत. एक्सेलसिअर ट्रस्ट हे तिचे नाव.”

“मित्रा, जर मी माझ्या ग्राहकाबद्दलची माहिती तुझ्यापाशी उघड केली तर माझ्या हातून किती कायद्यांचे उल्लंघन होईल याची तुला कल्पना तरी आहे का?”

“ठीक आहे. तसं असेल तर मी अल्फान्स मार्टीला वॉरंट काढायला सांगतो.”

टिंगेलीने तो प्रस्ताव चटकन झटकला. “ठीक आहे. आपण नियम विसरून जाऊ या. पण मी तुला पैज लावून सांगतो की, त्या ट्रस्टच्या संचालक मंडळावर सर्व वकीलमंडळी आहेत. त्यांना ते सर्व व्यवहार ठाऊक आहेत. तू त्यांच्यामागे लाग.”

“मला त्यांची नावं सांग. माझ्या माहितीप्रमाणे ट्रस्टच्या बोर्डावर आणखीही काही संचालक असणारच. कागदपत्रांमध्ये त्याची नोंद असेलच.”

टिंगलीने पुन्हा एकदा हास्याचा गडगडाट केला. “हे बघ, मी मदतीचा हात पुढे करायला तयार आहे, पण आपण दोघंही सरकारच्या वतीने काम करतोय ही बातमी जर बाजारात पसरली तर माझ्यावर धंदा बंद करायची पाळी येईल.”

व्हॉन डॅनिकनने तो दिवाणखाना नीट न्याहाळला. फर्निचरची फारशी गर्दी नव्हती. फक्त भिंतींकडे लक्ष वेधण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला होता. उजवीकडे एक भलेमोठे ऑईलपेंट टांगलेले होते. एखाद्या भयाण स्वप्नासारखे दिसणारे ते एक अमूर्त चित्र होते. त्याची किंमत कमीतकमी दहा ते वीस दशलक्ष फ्रँक्स तरी नक्कीच असावी. त्याच्या समोर दिसणाऱ्या पॉल क्लीच्या चित्राच्या मानाने ते अगदीच भिकार दर्जाचे वाटत होते. गेल्या वर्षी झालेल्या लिलावात पॉल क्लीच्या तैलचित्राला सर्वांत जास्त किंमत मिळाली होती. एकशे तीस दशलक्ष डॉलर्स. टिंगेलीने आपले एक-दोन ग्राहक गमावले, तरीही युरोपमधल्या सर्वांत श्रीमंत व्यक्तींच्या यादीतले त्याचे स्थान घसरणार नव्हते.

“मला वाटतं एक गोष्ट तुझ्या लक्षात आलेली दिसत नाही. मी तुझ्याकडे मदत मागत नाहीये टोबी. मी तुला आज्ञा करतोय. उद्या सकाळी तू माझ्यासमोर त्या ट्रस्टसंबंधीची सर्व कागदपत्रं ठेवणार आहेस. त्या वकिलांची व इतर संचालकांची नावे आणि इतरही सर्व काही.”

“माझ्यावर जबरदस्ती करण्याचा सरकारला अधिकार नाही.”

“मी सरकारच्या नावाचा उल्लेख तरी केला?”

“जाऊ दे ना मार्क्स तुला काय म्हणायचंय ते माझ्या लक्षात आलंय, पण त्या जुन्या धंद्याबद्दल आता कुणाला देणंघेणं उरलंय? युद्ध संपून आता सत्तर वर्षं होऊन गेली. नाझींचं तर सोडूनच दे, पण आज हिटलर तरी कुणाला आठवतोय. शिवाय आम्ही आमचं कर्जही चोख फेडलंय. एक बिलियन डॉलर्स ही काही साधीसुधी रक्कम नव्हे.”

कर्जफेडीच्या मागची हकिकत थोडक्यात अशी होती. हिटलरच्या काळाते नावाच्या एजन्सीमार्फत स्विस बँकेबरोबर सर्व आर्थिक व्यवहार चालत असत. या व्यवहारांची संपूर्ण तपासणी हे व्हॉन डॅनिकनच्या हॉलोकॉस्ट कमिशनचे मुख्य काम होते. मृत सैनिकांच्या खात्यातील शिल्लक रक्कम व ठेवी यांचे नेमके वारसदार ठरवण्याचे काम हे बँकांच्या दृष्टीने अत्यंत जिकिरीचे होते. आपल्या ठेवीदारांच्या बँक खात्यांबाबत गुप्तता बाळगण्याचे बंधन बँकांवर घालण्यात आले होते. त्यामुळे स्विस बँका ह्या आपल्याकडील माहिती सांगायला राजी नव्हत्या व कुणालाही पैसे द्यायला तयार नव्हत्या. दुसरीकडे जर्मन सरकारने एक वेगळाच डाव रचला होता. युद्धात वाचलेल्या ज्यूंना प्रथम अटक करून, नंतर त्यांना ठार मारायचे व अखेर त्यांचे पैसे हडप करायचे असा घाट घालून सरकारने आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना झुरिच, बसेल व जिनिव्हाला पाठवले होते. पण स्विस बँकांनी त्यांनाही दाद दिली नव्हती.

एका बँकेने मात्र सर्व कायदे धाब्यावर बसवून जर्मन सरकारला पूर्ण सहकार्य केले होते. त्यांनी केवळ आपल्या बँकेतील ज्यू नागरिकांच्या खात्यात असलेले पैसे जर्मन सरकारला मुक्तहस्ते दिले नव्हते, तर एजन्सीच्याच कार्यालयात आपली एक शाखा उघडून, त्या एजन्सीला हवे तसे पैसे लुटू दिले होते.

व्हॉन डॅनिकनने हा सर्व गैरव्यवहार शोधून काढला होता. हा शोध घेत असताना त्याच्या हातात अचानक एक महत्त्वाचा पुरावा आला होता. टोबी टिंगेलीचे आजोबा (टोबीयास-दुसरे) यांचा, हर्मन गोअरिंग, जोसेफ गोबेल्स व अॅडॉल्फ हिटलर यांच्यासमवेत घेतला गेलेला एक फोटो त्याला मिळाला होता. विशेष म्हणजे त्या फोटोत टिंगेलींच्या अंगावर कर्नलच्या दर्जाचा गणवेश दिसत होता.

तो फोटो मिळाल्याची बातमी जेमतेम पसरली असेल नसेल तोच होलोकॉस्ट कमिशनचे तोंड बंद करण्यासाठी टिंगेली बँकेने निर्वासित फंडाला एक बिलियन डॉलर्सची देणगी दिली. दुसऱ्याच दिवशी केस बंद करण्यात आली.

“तुझं म्हणणं बरोबर आहे.” व्हॉन डॅनिकन म्हणाला, “युद्ध आता जुनं झालं. पण मी ताज्या घडामोडींबद्दल बोलायला आलोय.” त्याने आपल्या खिशातून एक लिफाफा काढला व तो बँकरच्या हातात दिला. टोबी टिंगेलीने लिफाफा उघडला. त्यात अनेक फोटो होते. जुन्या जमान्यातल्या नाझींचे ते फोटो नव्हते. पण तरीही ते तितकेच धक्कादायक होते.

“तुला हे फोटो कुठे मिळाले?” टिंगेलीचा चेहरा पांढराफटक पडला होता.

“अतिरेक्यांना काबूत ठेवण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली गेलीय. या फोटोंमध्ये जे काही दिसतंय तोही एक प्रकारचा अतिरेकच आहे. राजकीय अतिरेक नसेलही, पण हे निर्लज्ज व घृणास्पद वर्तन आहे. हे बघ टोबी, तू मला कधीच आवडला नाहीस. तुझ्या वडलांच्या बाबतीतही माझं तेच मत होतं. असं असूनही इतकी वर्षं तुला तुझी प्रतिमा

स्वच्छ आहे असं भासवण्याची मुभा देण्यात आली. मी तुझ्यावर सदैव लक्ष ठेवून होतो. तू एक विचित्र माणूस आहेस याची मला खात्री होती. पण इतका विकृत असू शकशील याची मात्र कल्पना नव्हती."

लिफाफ्यात फक्त दोनच फोटो होते. पण दोन पुरेसे होते. एका फोटोमध्ये, बारमधील अंधाऱ्या खोलीत टोबी टिंगेली उभा होता. त्याच्या अंगावर आपल्या आजोबांचा ढगळ सैनिकी अंगरखा होता व डोक्यावर सैनिकी कॅप होती. अंगावर दुसरे एकही वस्त्र नव्हते. पँट, बूट, पायमोजे काहीही नव्हते. स्वतःचे ताठरलेले इंद्रिय त्याने एका हातात धरले होते व दुसऱ्या हाताने तो बाजूला ओणवे वाकलेल्या इसमाच्या कुल्ल्यांवर चाबकाचे फटके ओढत होता.

दुसरा फोटो तर त्याहून विक्षिप्त होता. त्यामध्ये टिंगेली गुडघे टेकून बसला होता. त्याने एक काळा बुरखा घातला होता. डोक्यापासून पायांपर्यंतचा एकही भाग उघडा नव्हता. फक्त डोळे, नाक व ओठ उघडे राहतील अशा प्रकारे त्या अंगरख्याला भोके पाडलेली होती. एका नग्न स्त्रीच्या योनीभागात त्याने आपले तोंड खुपसलेले होते. त्याचा चेहरा जरी दिसत नसला, तरी त्याच्या उजव्या हातात असलेली त्याच्या घराण्यातील पारंपरिक सोन्याची अंगठी अगदी ठळकपणे उठून दिसत होती.

"मला वाटत नाही की हे फोटो पाहून तुझ्या बँकेच्या लक्षावधी खातेदारांना व भागधारकांना तुझा गर्व वाटेल. प्रसिद्धिमाध्यमं तर या फोटोंवर हावऱ्यासारखी तुटून पडतील. मी मनात आणलं तर माझं निवृत्तीनंतरचं आयुष्य अगदी सुखासीन होऊन जाईल. या फोटोंसाठी ते मला किती पैसे देतील असं तुला वाटतं? एक लक्ष? दोन?"

टिंगेलीने आपल्या हातातला लिफाफा समोरच्या टेबलावर भिरकावला. "भडवा साला."

"त्याच्यावर भरोसा ठेव."

टिंगेली ताडकन उभा राहिला. "उद्या सकाळी तुला हव्या असलेल्या माणसांची नावं मिळतील. पण मला ते फोटो हवे आहेत."

"सौदा पक्का." व्हॉन डॅनिकन दरवाजापर्यंत पोहोचला. "फक्त एकच गोष्ट लक्षात ठेव. मला आणखीही फोटो मिळू शकतील."

५८

अल्फॉन्स मार्टी, व्हॉन डॅनिकनच्या रिकाम्या ऑफिसमध्ये डोकावला. ऑफिसमध्ये अंधार होता. फक्त कोपऱ्यातल्या एका टेबलावरचा दिवा जळत होता व त्याचा गोलाकार प्रकाश टेबलावरच्या कागदांवर पडला होता. रात्रीचे आठ वाजले होते व दिवसभरातल्या घडामोडींची माहिती करून घ्यायला तो तिथे आला होता. हॉलच्या टोकापर्यंत तो चालत गेला आणि शेवटच्या केबिनमध्ये कुणीतरी असल्याचे त्याला दिसले. त्याने दरवाजा हलकेच ठोठावला. "मी व्हॉन डॅनिकनला भेटायला आलोय." एक गिड्डा, टकलू माणूस ताडकन उभा राहिला. "हार्डनबर्ग. सर, चिफ इन्स्पेक्टर व्हॉन डॅनिकन आता ऑफिसात नाहीये."

"ते मला पण दिसतंय. तो आजच्या घटनांबद्दल माझ्याशी चर्चा करणार होता." "मीटिंग तर तो कधीच चुकवत नाही. तुमचं भेटायचं ठरलेलं होतं?" मार्टीने त्याचा प्रश्न टाळला. तो अचानक आला होता. व्हॉन डॅनिकनला लपवाछपवी करण्याची संधी त्याला द्यायची नव्हती. "आहे कुठे तो?"

"झुरिचला. त्यांच्या आर्थिक व्यवहारात काही गफलती सापडल्या आहेत. त्याचा तो तपास करतोय."

"अस्सं? पण एव्हाना बँका तर बंद झालेल्या असतील." "तो बँकेत नाहीये. टोबियास टिंगेलीला भेटायला गेलाय. होलोकॉस्ट कमिशनच्या काळापासून ते एकमेकांना ओळखतात. तुम्ही हवं तर त्याला सेल फोनवर गाठू शकता?"

मार्टीने क्षणभर विचार केला. "त्याची गरज नाही." तो म्हणाला. "तू मला माहिती देऊ शकतोस. तू पैशांच्या गैरव्यवहाराबद्दल काहीतरी म्हणालास. ह्या कटाच्या मागे कुठली संघटना असावी असं तुला वाटतं? रेव्होल्युशनरी गार्ड? अल् कायदा? इस्लामिक जिहाद? की कधीच नाव न ऐकलेली एखादी गँग?"

"आमची अजून खात्री पटलेली नाही." हार्डनबर्गने उत्तर दिले. "आम्हाला एवढंच कळलंय की क्युराकाओमधल्या एका कंपनीने ब्लिट्झ राहत असलेला बंगला विकत घेतला होता. एकदा आमच्या हातात कागदपत्रं आली की, ह्या हल्ल्यामागे कुणाचा हात आहे हे स्पष्ट होईल."

"मग तुम्ही अडलायत कुठे?"

"कायद्यामुळे बँकांवर गुप्ततेचं बंधन घातल्यामुळे तपासात अडथळा येतोय. तरीसुद्धा आपण त्यांना पकडू शकू अशी व्हॉन डॅनिकनला खात्री वाटतेय. अनेक मोठ्या बँक अधिकाऱ्यांबरोबर त्याची खास मैत्री आहे."

"हो. ते मला ठाऊक आहे." चेहरा हसरा ठेवण्यासाठी मार्टीला कष्ट पडत होते. "छान काम चाललंय तुमचं. चालू द्या. चालू द्या."

हार्डनबर्ग त्याला सोडायला दरवाजापर्यंत आला. “तुम्ही आल्याचं मी डॅनिकनला सांगेन. ठरलेली मीटिंग तो कधीच चुकवत नाही.”

मार्टी भराभर जिना उतरू लागला. त्याच्या डोक्यात विचारचक्र सुरू झाले होते.

आपल्या बंदेलशॉसच्या ऑफिसमध्ये परतल्यावर मार्टी बराच वेळ वेगवेगळ्या फाईल्स उपसत राहिला. अखेर त्याला हवी असलेली फाईल मिळाली. ब्लिट्झ, लॅमर्स व रॅन्समला आलेल्या सर्व फोन कॉल्सची माहिती देण्याची विनंती सरकारतर्फे स्विसकॉमला केलेली होती. मार्टीने स्विसकॉमच्या न्यायविषयक सल्लागाराला फोन लावला.

“हे बघ, मी सांगतो त्या नंबरवरून केल्या गेलेल्या व बाहेरून आलेल्या सर्व फोनकॉल्सची माहिती मला हवीय.” आपली ओळख सांगत, तो म्हणाला. मार्टीने त्या अधिकाऱ्याला मार्क्स व्हॉन डॅनिकनचा, घरचा, ऑफिसचा व सेल्युलर नंबर सांगितला.

“हो सर. तुम्हाला नेमका कुठला कालावधी अभिप्रेत आहे?”

“गेल्या सोमवारी, रात्री आठ वाजल्यापासून पहाटे चारपर्यंत.”

“फक्त मागचा सोमवार?”

“हो. तेवढंच.” मार्टी म्हणाला. “तू लवकरात लवकर कधीपर्यंत ती देऊ शकतोस?”

“उद्या दुपारी.”

“मला सकाळी आठ वाजेपर्यंत हवीय.”

“मिळेल सर तुम्हाला.”

मार्टीने फोन ठेवून दिला. बारा तासांच्या आत त्याला हवा असलेला पुरावा त्याच्या हातात पडणार होता.

५९

जोनाथन पार दमछाक होईपर्यंत गाडी चालवत राहिला. झुरिच तलावाच्या दक्षिणेकडे असलेले रॅपर्स्विल हे शहर दिसू लागताच त्याने हायवे सोडून देत गाडी वळवली. शहर मागे टाकत तो डोंगरात शिरला. गेल्या दहा मिनिटात त्याला पाठीमागून येणारी एखादी गाडी दिसली नव्हती. रस्त्याच्या बाजूला एकही घर आढळलं नव्हते. त्याने रस्त्याच्या कडेला गाडी थांबवली. डॅव्होस शंभर किलोमीटर दूर होते.

गाडीमधला दिवा लावत त्याने सगळी वर्तमानपत्रे नीट वाचून काढली. त्याला त्याआधी वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमबद्दल काहीच माहिती नव्हती. टी.व्ही.वरच्या बातम्यांमधून त्याला थोडेफार समजलेले होते.

दरवर्षी ईची बैठक होत असे. जगभरातून सुमारे एक हजार राजकीय व व्यापारी प्रतिनिधींना या बैठकीसाठी आमंत्रित केले जात असे. जागतिक कल्याणाच्या दृष्टीने एखादा महत्त्वाचा विषय निवडून, त्यासंबंधी सविस्तर साधकबाधक चर्चा केली जात असे. 'आण्विक शस्त्रास्त्रांमध्ये झपाट्याने होणारी वाढ' हा या वर्षीचा मुख्य प्रश्न होता. बातमीत म्हटले होते की, 'अठरा देशांचे राष्ट्रप्रमुख, दोनशे कॅबिनेट दर्जाचे मंत्री व फॉर्च्युन मासिकाने जगभरात निवडलेल्या शंभर सीइओंपैकी सत्तेचाळीस जण या परिषदेला उपस्थित राहणार होते.' शिवाय आणखीही काही विशेष प्रतिनिधींना खास आमंत्रण दिलेले होते. त्यामध्ये अमेरिकेचे दोन भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष, ब्रुनेईचे सुलतान, जॉर्डनचे राजे व ऑईल शेल, इंटेल आणि डच बँकेचे चेअरमन ह्यांचा समावेश होता.

फायनान्शियल टाइम्सच्या वृत्तात परिषदेसाठी खास पुरवण्यात आलेल्या सुरक्षा व्यवस्थेची माहिती देण्यात आली होती. दोनशे स्थानिक पोलिसांच्या मदतीसाठी तीन हजार सैनिकांना पाचारण करण्यात आले होते. संपूर्ण वैयक्तिक तपासणी केल्याखेरीज कुणालाही आत प्रवेश दिला जाणार नव्हता. भले मोठे बर्फाच्छादित मैदान, प्रखर प्रकाशझोत सोडणारे दिवे, सशस्त्र सैनिक व त्यांच्यासोबत असलेले जर्मन शेफर्ड्स यांच्या फोटोंनी वर्तमानपत्रे भरलेली होती. एरवी पर्यटकांचे आकर्षण म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॅव्होसला आता एखाद्या लष्करी छावणीचे स्वरूप आले होते.

टॅगेस-अॅन्झायगरमधल्या बातमीनुसार एका स्विस कंपनीने ओळखपत्रे तपासणीसाठी एक खास मशिन बनवले होते व त्यामुळे बनावट कार्डधारकाला ताबडतोब पकडले जाईल असे कंपनीच्या प्रमुखाने दिलेल्या मुलाखतीत ठामपणे सांगितले होते. सुरक्षेची व्यवस्था तीन पातळ्यांवरून करण्यात आली होती. स्थानिक जनता व बाहेरगावातून आलेल्या पाहुण्यांसाठी हिरवे क्षेत्र आरक्षित करण्यात आले होते. आत येण्यासाठी त्यांना आपल्याबरोबरील ओळखपत्र सादर करावे लागणार होते. त्यानंतर त्यांना परिषदेतर्फे अधिकृत कार्ड दिले जाणार होते व ते कार्ड त्यांना कायम गळ्यात घालावे लागणार होते. शहरातील काँग्रेस हाऊसजवळील भाग हा पिवळे आरक्षित

क्षेत्र म्हणून घोषित केला गेला होता. त्यामध्ये खास निमंत्रित पाहुण्यांच्या हॉटेल्सची व्यवस्था केलेली होती. तिथे प्रवेश करण्यासाठी परिषदेकडून आलेले निमंत्रण पत्र दाखवायचे होते व त्या पत्रावर स्विस फेडरल पोलीस दलाचा शिक्काही असणे बंधनकारक होते.

आरक्षित लाल विभागामध्ये सर्व भाषणे व परिसंवाद होणार होते. जवळ असलेल्या हॉटेल बेल्व्हेरेडमध्ये अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची सोय केलेली होती. त्यांच्या ओळखपत्रावर केवळ त्या व्यक्तीचा फोटोच नव्हता, तर त्याची संपूर्ण माहिती असलेली एक इलेक्ट्रॉनिक चिपही बसवलेली होती. त्या व्यक्तीचे नाव, फोटो व माहिती, एखाद्याला दहा फुटांवरूनही वाचता येऊ शकणार होती. अर्थात बिल गेट्स किंवा टोनी ब्लेअरना कुणीही ओळखले असते, पण सौदी अरेबियाच्या तेलमंत्र्याला ओळखणे अवघड होते.

जोनाथनने सगळे पेपर्स बाजूच्या सीटवर सारले. त्याने विचार केला की जर डॅव्होसला एम्माने आपली गाडी पी.जे.च्या हातात सोपवायची असे ठरले असेल, तर लाल आरक्षित क्षेत्रात प्रवेश करण्यासाठीचे ओळखपत्रही तिला दिलेले असणार. त्याने सर्व गाडी पुन्हा एकदा पिंजून काढली पण त्याला काहीच सापडले नाही.

तो सीटवर रेलून बसला व शांत डोक्याने विचार करू लागला. ब्लिट्झने पाठवलेल्या सूटकेसेसमध्ये जर ते ओळखपत्र नसेल, तर ते नक्कीच गाडीमध्ये असायला हवे. पण आहे कुठे? गाडीच्या माहितीपत्रकात सांगितल्याप्रमाणे, सुरक्षाकवच हे एकच गाडीचे वैशिष्ट्ये नव्हते. गाडीचे दिमाखदार दणकट टायर्स, जबरदस्त ब्रेक्स आणि स्वयंचलित पार्किंग हीसुद्धा खास आकर्षणे होती.

माहितीपुस्तक चाळताना, त्याला हवी असलेली गोष्ट सापडली. पॅसेंजर सीटच्या खाली एक पेटी लपवलेली होती. गाडीतून उतरत त्याने मागचा दरवाजा उघडला व सीटच्या बाजूला असलेला खटका दाबला. सीट वर उचलली गेली. त्याखाली एक काळी लोखंडी पेटी ठेवलेली होती. पेटीचे झाकण उघडताच त्यात 'इव्हा क्रुगर' हे नाव असलेले खाकी पाकीट त्याला दिसले. पाकिटात प्लॅस्टिकचे ओळखपत्र होते. ओळखपत्रावर तिच्या ड्रायव्हिंग लायसन्सवरचाच फोटो होता. शिवाय त्यात परवेझ जिन्नचा फोटो असलेला पासपोर्ट व सेलफोनही होता.

इराण इस्लामी प्रजासत्ताकाचा तंत्रज्ञान मंत्री परवेझ जिन्न याच्या हातात एक लाख स्विस फ्रँक्स, मर्सिडिज गाडी व पासपोर्ट सोपवायचा आणि त्या बदल्यात त्याच्याकडून सोने वसूल करायचे असा जोनाथनने अंदाज बांधला.

त्याने सेलफोन हातात घेतला. तो अगदीच निकृष्ट दर्जाचा होता. पन्नास स्विस फ्रँकचे कार्ड भरून तो चार्ज केला होता. एम्माला फोन दिलेला होता याचा अर्थ तिने कुणाला तरी त्यावरून फोन करणे अपेक्षित होते. परवेझ जिन्नला? त्याने सेलफोन तपासला. त्यात एकही फोन नंबर नव्हता. कदाचित जिन्नच तिला फोन करणार असावा. हेच त्याला अधिक सयुक्तिक वाटले. त्यासाठी आजूबाजूला सुरक्षारक्षक नसतानाचा एखादा निवांत क्षण शोधणे, जिन्नला जरुरीचे होते.

आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांची आता जोनाथनला थोडीथोडी जाणीव होऊ लागली होती. सारे काही उमगले नव्हते, हातात फक्त दोन-चार गोष्टी आल्या होत्या.

माहितीच्या बदल्यात माल. या मालालाच ते 'सोने' म्हणत होते. इराण्यांना फक्त एकाच वस्तूची महत्त्वाकांक्षा होती. एकच वस्तू की जिच्यावर साऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांनी एकमुखी बहिष्कार घातला होता.

छाती धडधडू लागली. त्याने फ्लॅशड्राईव्हवरची इंटेलिंक साईट उघडली व तो मालाची यादी वाचू लागला. किरणोत्सर्गी मशिन्स, विमान वाहतूकसामग्री, व्हॅक्युम ट्यूब्ज. तो मागची पाने उलटू लागला. डिसेंबर, नोव्हेंबर, ऑक्टोबर. कार्बन एक्सट्रूडर्स, स्टील, शीतलीकरण यंत्रणेचे सुटे भाग. सप्टेंबर, ऑगस्ट गोलाकार लोहचुंबके, उष्णतावाहक यंत्रणेचे भाग. मालाचे केलेले वर्णन खोटे होते हे त्याला कळत होते, कारण प्रत्यक्ष पाठवलेला माल वेगळाच असणार याची त्याला खात्री होती. भले त्या वस्तूंबद्दल त्याला फारशी माहिती नसेलही, पण त्यामागचा हेतू त्याला पक्का ठाऊक होता व तेवढे पुरेसे होते.

अचानक त्याला गाडीबाहेर पडून जरा पाय मोकळे करावेसे वाटले. तो रस्त्यावरून लांब लांब ढांगा टाकत चालू लागला व पुढची चढण तर तो धावतच चढून गेला. जोरजोरात घ्याव्या लागणाऱ्या श्वासाचा, धडधडणाऱ्या छातीचा आणि दुखणाऱ्या पायांचे आता त्याला काही वाटत नव्हते. उलट त्या दुखण्याचाही तो आनंद लुटू लागला होता.

त्याचे मन उडत उडत दूर डोंगरात पळाले. रानावनात, डोंगरकड्यांमध्ये जेव्हा तुम्ही स्वत:ला पूर्ण झोकून देता तेव्हा वर्तमान-भूत-भविष्य, सारा काळच तुमच्यासाठी गोठून जातो आणि उरतो फक्त एकच लखलखता, चमकदार क्षण. तुमच्याभोवती एक वेगळेच जग उभे राहिलेले असते. नेहमीच्या जगापासून पूर्णपणे विभक्त. तुमच्यावर कुठलेही बंधन लादलेले नसते. तुमच्याकडून कुठल्या अपेक्षाही केलेल्या नसतात. तुम्ही फक्त एकटे असता आणि खडक, झाडे, झरे हेच तुमचे साथीदार असतात. तुमच्या उचंबळणाऱ्या मनासोबत एक शुद्ध, अस्सल जग फेर धरून नाचत असते. माणसाने नासवायला सुरुवात करण्यापूर्वीचा खराखुरा निसर्ग. तोच एक क्षण असतो की जेव्हा तुमचे अवघे अस्तित्व, धैर्याने व तेजाने उजळून निघालेले असते.

दहा मिनिटांनी तो टेकडीच्या माथ्यावर पोहोचला होता. कुणाच्या तरी स्मरणार्थ एक शिला उभारण्यात आली होती. त्याचे अंग ठणकत होते व थंडीमुळे डोळे चुरचुरत होते. उत्तरेला झुरिच तलावाची अर्धवर्तुळाकार छाया, एखाद्या चपलाहारासारखी चमचमत होती. दक्षिणेला असलेली लांबलचक खोल दरी, काहीकाही ठिकाणी प्रकाशाने उजळलेली होती. जेमतेम एक किलोमीटरवर आल्प्स पर्वताचा पायथा एखाद्या खडबडीत संगमरवरी मनोऱ्यासारखा उंच उभा होता.

पण एम्माच का? त्याचे मन आक्रंदले. जगातील सर्वांत धोकादायक राष्ट्राला असला माल पुरवायची ती हिंमत तरी कशी करू शकली होती? त्यापासून बॉम्ब बनवला जातो हे कां तिला ठाऊक नव्हते? आणि किरकोळ बॉम्ब नव्हे. तो महाभयानक बॉम्ब.

काही वेळाने तो डोंगर उतरू लागला. दहा मिनिटांत तो मर्सिडिजमध्ये जाऊन बसलेलाही होता. त्याने हिटर सुरू केला. एक प्रश्न मात्र त्याला सर्वांत जास्त छळत होता.

ती हे काम कुणासाठी करत होती?

त्याने पाठ टेकली व डोळे मिटले पण त्याचे मन मात्र विस्कटून गेले होते. पहाटेच्या प्रकाशाने आकाश राखाडी होत गेलं तेव्हा कुठे त्याचे डोळे मिटू लागले होते.

६०

तुझा त्याच्याशी काहीही संबंध नाही. नको त्या गोष्टीच्या उगाच वाटयाला जाऊ नकोस. सगळे तुझ्या अंगलट येईल.

फिलिप पालुंबोच्या डोक्यात ते शब्द घोळत होते. त्या शब्दांवर तो काही वेळ विचार करत राहिला. मग पुढे वाकत त्याने बाजूचा ड्रॉवर उघडला व त्यातले पिस्तूल बाहेर काढले. आज कुठलाही देश एक ठाम व निश्चित भूमिका घ्यायचा कणखरपणा दाखवायला तयार नाही आणि म्हणूनच जग या अवस्थेला येऊन पोहोचलेय.

ते बेरेट्टा 9mm चे पिस्तूल होते. हवाईपथक तुकडी नंबर ८२ मध्ये त्याने प्रामाणिकपणे केलेल्या सेवेची ती उरलेली एकमेव खूण होती. त्याने आपल्या आयुष्याची चौदा वर्षे लष्करी सेवेला दिली होती. वेस्ट पॉईंट येथे तो साधा सैनिक म्हणून रुजू झाला होता आणि लष्कराला रामराम ठोकताना तो मेजरच्या हुद्यापर्यंत चढत वर पोहोचला होता. त्याच्यासारख्या कर्तृत्ववान अधिकाऱ्यासाठी, त्यानंतर खाजगी क्षेत्रामध्ये अनेक संधी उपलब्ध होत्या, पण पैसा कमावण्यात त्याला कधीच रस वाटला नव्हता. लष्कराचा राजीनामा दिल्यानंतर सात आठवडयाने, त्याने सेंट्रल इन्टलिजिन्स एजन्सीच्या करारपत्रावर सही केलेली होती. त्यानंतरच्या काळात त्याने जे काही पाहिलं आणि जे काही केलं ते गृहीत धरूनही, सीआयएमध्ये जाण्याचा आपला निर्णय हा आपल्या आयुष्यात आपण घेतलेला सर्वोत्तम निर्णय होता, असे त्याचे आजही मत होते. ती संघटना सोडून जाण्याचा विचारही त्याच्या मनात कधी आला नव्हता.

पिस्तूल भरलेले आहे याची खात्री करत त्याने चेंबर गोल फिरवले आणि लॉक करून टाकले.

घर दुमजली होते. खिडक्यांवर हिरव्या वेली चढल्या होत्या आणि घरावर जुन्या पद्धतीचे उतरते छप्पर होते. दोन-दोन पायऱ्या एकदम चढत तो दरवाजापाशी आला व त्याने बेल वाजवली. एका सडपातळ आणि रुक्ष दिसणाऱ्या व्यक्तीने दार उघडले. त्याच्या अंगात राखाडी जॅकेट होते व गळ्यामध्ये दुर्बीण लटकत होती. “अरे फिल, ये. आत ये.” सेंट्रल इन्टलिजन्स एजन्सीचा उपकार्यसंचालक जेम्स लॅफेव्हरने पालुंबोचे स्वागत केले. “फारच तातडीचं काम निघालेलं दिसतंय.”

पालुंबो आत आला. “तुम्ही इतक्या चटकन मला भेटायला तयार झालात याबद्दल आधी तुमचे आभार.”

“छे. छे. त्यात काहीच अडचण नव्हती.” लॅफेव्हर त्याला घेऊन दिवाणखान्यात आला. तो एकटाच राहात असे आणि सतत कामामध्ये गर्क असे. “तुझ्यासाठी कॉफी आणू?”

“नको.”

लॅफेव्हर स्वयंपाकघरात गेला व त्याने स्वत:साठी मोठा मग भरून कॉफी ओतली.

“वालिद गॅसनकडून तू मोठ्या शिताफीने माहिती काढून घेतलीस. त्यामुळे एक फार मोठा हल्ला रोखता आला असं माझ्या कानावर आलंय.”

त्याला माहिती आहे तर! पालुंबोच्या मनात विचार आला. कुणीतरी त्याला बातमी दिलीय.

“खरं म्हणजे मी त्यासाठीच आलोय.”

लॅफेव्हरने कॉफीत आणखी थोडी साखर मिसळली व मानेनेच खूण करत पालुंबोला बोलणे सुरू करायची सूचना केली.

“मी सिरियाहून परत येत असताना मला स्विस गुप्तहेर विरोधी दलाचा प्रमुख, मार्क्स व्हॉन डॅनिकनचा फोन आला होता. अलीकडेच झुरिचमध्ये थिओ लॅमर्स ह्या डच नागरिकाचा आपल्या राहत्या घराच्याबाहेर खून करण्यात आला होता. व्हॉन डॅनिकन त्या खुनाचा तपास करत होता. खून व्यावसायिक सफाईने केलेला होता. कसलीही चूक नाही. कोणीही साक्षीदार नाही. अत्याधुनिक मार्गदर्शक यंत्रणांची निर्मिती व उत्पादन हा लॅमर्सचा व्यवसाय होता. पण एका बाजूला तो ड्रोन्स बनवत होता. मनुष्यरहित हवाई वाहतूक. छोट्या आकाराचे. मोठ्या आकाराचे. तुम्ही म्हणाल तसे. लॅमर्सच्या कामाचा तपास सुरू असतानाच, त्याच्या आणखी एका साथीदाराचा खून केला गेला. त्याचे नाव महम्मद क्विताब. तो इराणी होता. गॉडफ्रिड ब्लिट्झ या नावाने तो सध्या स्वित्झर्लंडमध्ये राहत होता. तुला ही नावं परिचयाची वाटतात?”

“म्हणजे? तुझ्यामते मी त्यांना ओळखतो?”

“मला तुमच्याबद्दल पूर्ण आदर आहे. पण तरीही मला असं वाटतं की, ही नावे ऐकून तुम्ही मनातल्या मनात अस्वस्थ झाला असणार.”

लॅफेव्हरने आत जाऊन आपल्या कॉफीत थोडे दूध मिसळले. तो पुन्हा बाहेर आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदललेले होते. भेटीमधली अनौपचारिकता आता संपलेली होती. “तू बोलत राहा फिल. मी माझं मत काही वेळासाठी राखून ठेवतो.”

ही विनंती नाही, आज्ञा आहे हे पालुंबोच्या लगेच लक्षात आले. “मी मार्क्सला फोन करून त्याला, गॅसनने दिलेल्या कबुलीजबाबाची पूर्ण माहिती दिली.”

“म्हणजे तुला म्हणायचंय की गॅसनने विमान उडवण्याचा जो कट रचला होता, त्याबद्दल?”

“बरोबर. व्हॉन डॅनिकनला आश्चर्य वाटणं साहजिकच होतं. पुढे त्याच्या तपासात आढळून आलं की, खून झालेल्या दोन्ही व्यक्ती गॅसनच्या कटातील साथीदार होत्या.”

“अरेच्या कमालीचा योगायोग म्हणायला हवा.” लॅफेव्हर असं म्हणाला खरा; पण तो योगायोग नव्हता, याची त्याला पक्की खात्री होती.

पालुंबोने आपले बोलणे सुरू ठेवले. “दुसऱ्या दिवशी मार्क्सला शवविच्छेदन करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा फोन आला. ज्या गोळ्यांनी त्या दोघांचाही खून झाला होता, त्या गोळ्या एका जालीम विषामध्ये बुडवलेल्या होत्या. पूर्वी कधी अशा प्रकारची घटना घडली होती का याचा शोध जेव्हा तो अधिकारी घेऊ लागला, तेव्हा स्कॉटलंडयार्डमधल्या त्याच्या एका सहकाऱ्याने त्याला त्याबाबतची पूर्ण माहिती दिली. तो सहकारी एकेकाळी ब्रिटिश नौदलात होता व १९८० च्या सुमारास एल् साल्व्हादोरमध्ये अगदी अशाच प्रकारच्या विषाचा वापर केला गेल्याचे, त्याने प्रत्यक्ष

पाहिले होते. त्या प्रदेशात राहणारे भारतीय वंशाचे सैनिक अशा विषाचा सर्रास वापर करत असत. अतृप्त आत्म्यांचा त्रास होऊ नये ही त्यामागची अंधश्रद्धा होती. 'आपल्या' माणसांनीच त्यांना प्रशिक्षण दिले होते, असेही त्या ब्रिटिश माणसाने सांगितले. त्याच्या मते खून करणाऱ्या इसमाने कधी ना कधीतरी CIA मध्ये नक्कीच काम केलेले असणार. आपला एखादा गट स्विस भूमीवर गुप्तपणे कार्यरत आहे का, हे व्हॉन डॅनिकनला जाणून घ्यायचं आहे. सर, स्विस हवाईक्षेत्रामध्ये एका संघटनेमार्फत विमान उडवण्याचा कट रचला जातोय अशी आमच्याकडे विश्वसनीय खबर आहे. जर असं असेल तर त्या संघटनेचा डाव आपण हाणून पडायला पाहिजे."

"तू त्याला काय सांगितलंस?" लॅफेव्हरने विचारले.

"चौकशी करतो, असं मी त्याला म्हणालो."

"म्हणजे त्यानंतर तुझं व त्याचं बोलणं झालेलं नाही."

पालुंबोने मानेनेच नकार दिला. "त्या काळात तुम्हीच एल् साल्व्हादोरच्या मोहिमेचे प्रमुख होता. 'मोर्निंग डोव्ह' ही तुमचीच योजना होती ना?"

"ती गोपनीय गोष्ट आहे."

"पण मला ती समजलीये. तिथल्या एका स्थानिक सैनिकाला तुम्ही CIA मध्ये आणले होते. त्याचं नाव रिकार्डो रायस. त्याची आई निम्मी भारतीय होती. त्याला प्रशिक्षण देऊन परदेशी पाठवण्यात आलं. आजही तो आपल्या वेतन-पटावर आहे."

"तू खूपच माती उकरलेली दिसतेय."

"माझ्या मते त्यानेच हे दोन्ही खून केले असावेत."

अॅडमिरल लॅफेव्हर त्याच्या किंचित जवळ सरकला आणि पालुंबोला कॉफीचा वास जाणवला. "माझ्या त्या मोहिमेची तू कां दखल घेतोयस?"

पालुंबो एका पायावर झुकला तेव्हा कमरेला अडकवलेले पिस्तूल त्याच्या पाठीला टोचू लागले. "मी नको तितक्या खोलात शिरतोय याची मला जाणीव आहे. पण लॅमर्सच्या खूनप्रकरणाचा छडा लावल्याशिवाय मी स्वस्थही बसू शकत नाही."

"मग?"

"लॅमर्सबद्दल आपण इतकी माहिती गोळा केलीय की, त्या प्रकरणाची दहा इंची जाडजूड फाईल तयार होऊ शकते. आपल्याकडे तो दहा वर्षं पगार घेत होता. त्याच्याकडे औद्योगिक क्षेत्रातील हेरगिरी सोपवलेली होती. २००३ साली जेव्हा त्याला आपण बाहेर काढले, तेव्हा तो आपल्या लंडन विभागात होता. ज्या माणसाचा कधीकाळी का होईना पण आपल्या एजन्सीशी संबंध होता अशा माणसाला वालिद गॅसनसारख्या कुविख्यात दशहतवाद्याने स्फोटके पुरवावीत ही गोष्ट माझ्या मनाला पटत नाही. हे सगळंच प्रकरण, मला कुठेतरी आतून खटकतंय. लॅमर्स हा त्यानंतर आपल्या विरोधी गटाला जाऊन का मिळाला हे सुद्धा मी शोधण्याचा प्रयत्न केला."

"मग तुला काय समजलं?"

"तो आपल्या विरोधी गटात सामील झाला हे तर उघडच होतं. दोन वर्षांपूर्वी त्याला संरक्षण खात्याकडून बोलावणं आलं. आयुष्याच्या अखेरीस तो संरक्षण हेरखात्याचा सल्लागार म्हणून काम करत होता. अॅडमिरल सर, मला सांगा की अशामुळे आपण

अमेरिकन हेरखात्याची बदनामीच ओढवून घेतोय ना?”

“मला वाटतं, विमान उडवण्याचा कट पेंटेगॉनने रचलाय, ह्यामुळे तू जास्त व्यथित झालेला आहेस.”

“माझा पुढचा प्रश्न तोच आहे.”

आता मात्र अंगार बरसणार अशी पालुंबोची अपेक्षा होती. पण लॅफेव्हरने शांतपणे हातातला कॉफीचा मग टेबलावर ठेवला व तो मंद हसला. “आपल्याकडे ‘डिव्हिजन’ नावाचं एक पथक काम करतं, याची तुला काही कल्पना आहे?”

“डिव्हिजन? नाही सर. काहीच माहिती नाही.”

“तुला माहीत नसेल असं वाटलं नव्हतं.” लॅफेव्हरने त्याला स्वयंपाकघराच्या मागच्या बाजूला यायची खूण केली. “आपण बाहेर जाऊ या, मला सिगारेट ओढायचीय.”

पालुंबो त्याच्याबरोबर घराच्या मागच्या बाजूला गेला आणि पाच-सहा पायऱ्या उतरून ते दोघेही पाठीमागच्या अंगणात आले. संध्याकाळ झाली होती. बोचरी थंडी अंगाला झोंबत होती. आकाश अगदी अनाथ व उदास भासत होते. झुडपांमधून चालताना, त्यांच्या पायाखाली बर्फ चिरडले जात होते.

“या सर्वांमागे तो ऑस्टिन आहे. तीच खरी कीड आहे. मार्लबोरोसच्या पाकिटावर हलकेच एक सिगारेट आपटत लॅफेव्हर म्हणाला. “तो सुवर का बच्चा अजून माझ्या तावडीत सापडायचाय. अतिरेकी ख्रिश्चन स्साला. एकीकडे अखंडपणे त्याच्या प्रार्थनासभा आणि धर्मप्रसाराच्या बैठका सुरू असतात; पण मधल्या काळात तो दुसऱ्याला लुबाडायची एकही संधी हुकवत नाही.”

“तुम्ही हवाईदलाचा मेजर, जॉन ऑस्टिनबद्दल बोलताय?”

“तोच तो. आठ वर्षांपूर्वीच त्याने हे नवीन पथक सुरू केलं.

९/११ च्या घटनेआधीची ही गोष्ट आहे. पेंटेगॉनमधल्या तरुण गटाला परदेशी भूमीवर एक नवी गुप्त संघटना कार्यरत करायची होती. परदेशात असलेल्या अमेरिकन इमारतींवर, दहशतवादी संघटना जाणूनबुजून हल्ला चढवत आहेत व हे हल्ले रोखण्यात CIA ला पूर्ण अपयश आलंय असा त्यांचा दावा होता. सौदी अरेबियातला खोबेर टॉवर्स, नैरोबीतील अमेरिकन वकिलातीवर झालेला बॉम्बस्फोट, अनेक देशांमधील अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनींवर झालेले हल्ले ऑस्टिन राष्ट्राध्यक्षांना जाऊन भेटला व आपल्याला एक नवीन पथक उभारण्याची संधी देण्याची त्याने विनंती केली. राष्ट्रध्यक्षांना फारसं पटवण्याची गरजच उरलेली नव्हती. परदेशातील अमेरिकनांवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे ते आधीच कमालीचे अस्वस्थ झालेले होते. या हल्ल्यांमागे कोण आहे हा प्रश्न ते सतत आपल्याला विचारत होते आणि आपण त्यांना उत्तर देऊ शकत नव्हतो. ऑस्टिनच्या सहकाऱ्यांनी अतिशय वेगात आरोपींना शोधून काढले. त्यानंतर बरोबर तीस दिवसांनी परदेशांमध्ये गुप्तपथकं उभारण्याचा सर्व अधिकार संरक्षणखात्याला दिला असल्याचा अधिकृत आदेश काढण्यात आला.

“त्यांनी त्या पथकाला ‘डिव्हिजन’ असं नाव दिलं. आपल्याकडे त्यापूर्वी मानवी संरक्षण गुप्तचर ह्या नावाचा एक फारसा न नावाजला गेलेला विभाग स्थापन झालेला होता. त्याच कार्यालयातर्फे ऑस्टिनने आपला कारभार चालवण्यास सुरुवात केली. अमेरिकन वकिलातींना शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणं हे त्या कार्यालयाचं खरं काम होते.

ऑस्टिनने भराभर सूत्रं हलवण्यास सुरुवात केली. एका वर्षात त्याने पाच गट तयार केलेले होते. कुठल्याही थराला जाऊन काहीही वाटेल ते काम करण्याची त्यांची तयारी होती. कुटिल नीतिचं ते एक किळसवाणं उदाहरण होते. कमालीची गुप्तता. कोणत्याही क्षणी अंग काढून घेता येईल इतका लवचीकपणा. संपूर्ण संरक्षणाची ग्वाही. प्रसंगी कुणाही गुप्तहेर अधिकाऱ्याला जीवे मारण्याचा अधिकार. अगदी मलासुद्धा. त्यांनी काही चांगली कामंही केली. मी ते नाकारत नाही. बोस्निया, ड्रॅको आणि सुदानमधल्या काही कुविख्यात माथेफिरू अतिरेक्यांना त्यांनी नाहीसे केले. पण ते यश ऑस्टिनच्या डोक्यात गेले. त्याने आपली मर्यादा ओलांडली. लेबॅनिझ पंतप्रधान प्रकरणी त्याने आपले हात बरबटून घेतले. इराकमधल्या बंडखोरीत त्याचं नाव गोवलं गेलं. हे बघ फिल अखेर आपण सर्व गुप्तचर अधिकारी आहोत. माहिती मिळवून ती वर पाठवणे एवढंच आपलं काम आहे. न्याय देणे, निर्णय घेणे, त्याची अंमलबजावणी करणं हे आपलं काम नव्हे. पण आपलं हे धोरण व्हाईट हाऊसमध्येच पायदळी तुडवलं जातंय हे माझ्या लक्षात आलं आणि फिल, माझा संताप अनावर झाला.”

“पण सर, ते अमेरिकन हेर आहेत.”

“ते अमेरिकन नाहीत. क्विताब हा इराणी होता. लॅमर्स, डच होता. परदेशात जन्मलेले आणि परदेशात पोसलेले अमेरिकन नव्हेत.”

“पण सर, तुम्ही राष्ट्राध्यक्षांकडे का गेला नाहीत?”

“मी जाऊन त्यांना काय सांगणार होतो? माझ्या आरोपात, त्यांना मत्सर दिसला असता. अखेर हे सर्व अध्यक्षांच्या मान्यतेने सुरू झालेलं आहे. त्याचा शेवट करणंही फक्त त्यांच्याच हातात आहे.”

“पण एका बोगस इराणी माणसाच्या तालावर नाचून अमेरिकन हेर विमान पाडण्याचा कट रचताहेत हे अध्यक्षांना कदापि मंजूर झालं नसतं.”

“पटतंय मला. पण तरीसुद्धा ऑस्टिनने पसरलेलं जाळं तोडून टाकण्याची त्यांनी मला कधीच परवानगी दिली नसती. छातीवर मिरवणाऱ्या बिल्ल्यांमुळे व गळ्यातल्या क्रूसावर असलेल्या गाढ श्रद्धेमुळे आज जॉन ऑस्टिनकडे एक संत महात्मा म्हणून पाहिलं जातं. त्याची सर्व कारकीर्द लढाया करण्यातच गेलेली आहे. त्यामध्ये जिहाद विरुद्ध पुकारलेल्या आपल्या पवित्र लढाईचादेखील मी समावेश करतोय. ऑस्टिनने १९८० साली इराण सरकारने ओलीस ठेवलेल्या अमेरिकन सैनिकांची सुटका केली होती. शिवाय आपल्या लष्करी प्रमुखाप्रमाणेच ऑस्टिननेही आपलं आयुष्य ख्रिस्ताच्या चरणी वाहिलेलं आहे. तिथे माझ्यासारख्या व्हिस्की पिणाऱ्या पाखंडी माणसाला कोण विचारणार?”

“पण इराणमधल्या त्या मोहिमेचा तर बोऱ्या वाजला होता.” पालुंबो म्हणाला. “आपली विमानं पाडली गेली. आपण आठ जवान गमावले होते.”

“त्यामुळे काहीही फरक पडत नाही फिल. जॉन ऑस्टिन हा हिरो ठरलाय. जोपर्यंत तो अपयशी ठरत नाही तोपर्यंत सर्व गोष्टी त्याच्या म्हणण्यानुसारच घडणार.”

“अॅडमिरल सर, मी पुन्हा एकदा नम्रपणे सांगू इच्छितो की, जर मी तुमच्या जागी असतो तर त्याचा विमान उडवण्याचा कट समजल्यानंतर असा गप्प राहिलो नसतो.”

“तू लक्षात घे फिल, की दुसरा इलाजच नाहीये. या देशामध्ये, एकमेकांशी न

पटणाऱ्या दोन गुप्तहेर संघटना एकाच वेळेस कार्यरत होऊ शकत नाहीत. संरक्षण खात्यामध्ये तर बेपर्वाई आणि मनमानीपणाचा कहर माजलाय. ह्या नवीन मोहिमेत जेव्हा ते तोंडघशी पडतील तेव्हाच हे सारं संपून जाईल. जॉन ऑस्टिनचे सर्व अधिकार काढून घेतले जातील आणि हेरगिरीच्या क्षेत्रातून पेंटेगॉनचं नाव कायमचं पुसलं जाईल.”

“म्हणजे त्यांचा डाव उधळण्यासाठी तुम्ही रायसला तिथे पाठवलंत?”

“होय. इतकं सारं घडत असताना आम्ही केवळ हाताची घडी घालून स्वस्थ बसलेलो नाही हेच दाखवण्यासाठी मी रिकार्डो रायसला पाठवलंय. इतक्या मोठ्या प्रकरणात जर आम्ही रंगे हाथ पकडलो गेलो तर CIA बद्दल ऑस्टिनने व्यक्त केलेलं मत दुर्दैवाने पुन्हा एकदा खरं ठरेल. पण जर आम्ही ते ड्रोन उद्ध्वस्त करण्यात यशस्वी ठरलो... जर त्यांच्या कटात गुंतलेल्या माणसांना आम्ही खतम करू शकलो... तर मात्र आम्ही हिरो बनू शकतो.” लॅफेव्हरने बुटाखाली सिगारेट चिरडली. “मिस्टर रायस हा आपल्या एकट्याच्या ताकदीवर काही हा हल्ला थोपवू शकत नाही. त्याने तो थोपवावा, असं मला वाटतही नाही. एकदा का ते विमान पाडलं गेलं की, मी राष्ट्राध्यक्षांना जाऊन प्रत्यक्ष भेटेन व त्यांना प्रत्यक्ष पुरावाच सादर करेन. परिस्थिती कोणत्या थरापर्यंत हाताबाहेर गेलीय हे मग त्यांना कळून चुकेल. मी प्रतिबंध करायचा प्रयत्न केला होता हेसुद्धा मी त्यांना दाखवून देईन. माझ्या हातात पुन्हा सूत्रं सोपवण्यावाचून अध्यक्षांना पर्याय उरलेला नसेल. दुसऱ्याच क्षणी ‘डिव्हिजन’च्या ऑफिसला कुलूप ठोकलं जाईल. संरक्षणखातं हे चारी मुंड्या चीत झालेलं असेल व CIA चीच अखेर जीत झालेली असेल.”

पालुंबोला बोलण्यासारखं काही उरलेलंच नव्हते. चकित व व्यथित होऊन तो जागच्या जागी खिळून उभा होता.

लॅफेव्हर त्याच्या अगदी जवळ आला. “हे बघ, माझ्या कुठल्याही ऑफिसरने ही गुप्त खबर फोडलेली मला चालणार नाही. ही गोष्ट तू कुणापाशीही बोलणार नाहीस असं मला वचन दे.”

“पण सर. ते विमान... एवढे प्रवासीष्ठ”

“मला फक्त वचन हवंय.”

“पण, अॅडमिरल...”

“पणबिण काही नाही.” लॅफेव्हर म्हणाला. “ऑस्टिनला आणखी काही मूर्खपणा करण्याची संधी मिळू नये म्हणून मी त्याबद्दलची छोटी किंमत तुझ्याकडे मागतोय.”

पालुंबोने उसासा सोडला. ह्यापुढच्या घटनांना कसं वळण लागणार आहे ह्याचा त्याला आता पूर्ण अंदाज आला होता. “माफ करा पण मी असं होऊ देणार नाही.”

लॅफेव्हरने त्याला वरपासून खालपर्यंत न्याहाळले. आपल्यासमोर एक मूर्ख, दुर्बल व फालतू माणूस उभा आहे हाच त्या नजरेतला अर्थ होता. “मी सुद्धा तुला हवं तसं वागू देणार नाही.” जेव्हा त्याने पुन्हा हात वर उगारला तेव्हा त्याच्या हातातले पिस्तूल पालुंबोच्या छातीवर रोखलेले होते. ते लष्करी पिस्तूल गोळ्यांनी पूर्ण भरलेले होते आणि पिस्तूल चालवण्याची त्यांची पद्धतही अगदी शिस्तबद्ध व पुस्तकी होती.

पिस्तुलातून दोन गोळ्या सुटल्या. दोन्ही गोळ्या पालुंबोच्या छातीवर नेम धरून मारलेल्या होत्या. पुढच्या क्षणी तो जमिनीवर कोसळला. त्याचे डोळे सताड उघडे होते.

लॅफव्हरने एक पाऊल पुढे टाकले व तो त्याच्या समोर उभा राहिला. अचानक पालुंबो खाकरला आणि त्याने अंगात संरक्षक जाकीट घातल्याचे, लॅफेव्हरच्या लक्षात आले. अॅडमिरलचा हात पिस्तुलाकडे गेला. पण ह्या खेपेस त्याला उशीर झाला होता.

पालुंबोने मारलेली गोळी त्याच्या कपाळात घुसली होती.

जमिनीवर कोसळण्याआधीच अॅडमिरल जेम्स लॅफेव्हरचा प्राण गेलेला होता.

६१

युद्ध प्रतिनिधी मंडळाने बेलफोर्ड स्ट्रीटबरोबर नियोजित फोन भेटीची वेळ निश्चित करून घेतली होती, त्या गोष्टीला आता चोवीस तास होऊन गेले होते. त्या दरम्यानच्या काळात अॅटलांटिक महासागरावरील अनेक ठिकाणांवरून विजेच्या वेगाने अनेक आंतरराष्ट्रीय टेलिफोन कॉल्सची देवाणघेवाण झाली होती. परराष्ट्र मंत्रालयातून अमेरिकन सरकारला, इराण सरकारकडून सेंटकॉमच्या मुख्य कार्यालयाला, मोस्सादकडून सीआयएला.

रात्री अकरा वाजता इस्त्रायलचा पंतप्रधान आपला एक हात पाठीशी तर दुसऱ्या हातामध्ये असलेला फोन कानाशी चिकटवून खुर्चीत बसलेला होता. त्याला अजून काही काळ थांबण्यास सांगितले गेले होते. अमेरिकन अध्यक्ष त्याच्याशी थोडा वेळ बोलण्यास तयार झाला होता.

पंतप्रधानाच्या शेजारी झिव हिर्रस्च उभा होता. तो कमालीचा अस्वस्थ दिसत होता. अमेरिकन अध्यक्षाचा निरोप येऊन आता पाच मिनिटे उलटून गेली होती. प्रत्येक सेकंदाला त्याच्या छातीवरचे दडपण वाढत चालले होते.

अचानक एका स्त्रीचा आवाज आला. "अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष."

पंतप्रधानाने उत्तर द्यायच्या आत पलीकडून शांत, गंभीर आवाजात शब्द आले. "हॅलो एव्ही, तुझ्याशी बोलायला मिळालं, याचा आनंद झाला."

"मिस्टर प्रेसिडेंट. आनंदाचा प्रसंग असता तर मलाही बरं वाटलं असतं."

"आमचा सल्ला विचारल्याबद्दल आधी मी तुझे आभार मानतो." राष्ट्राध्यक्ष म्हणाला. "ताज्या घडामोडींनी आम्हालाही थोडं बेसावधपणे पकडलंय. इतक्या लवकर असं काही घडेल याची आम्हीसुद्धा अपेक्षा केली नव्हती."

"आपण दोघेही बेसावध होतो. आमच्यावर ओढवलेली परिस्थिती, तुम्ही नीट समजून घ्याल याची मला खात्री आहे. जगाच्या नकाशावरून इस्त्रायलचं नाव पुसून टाकणं हेच ज्यांचं ध्येय आहे अशी निर्लज्जपणे जाहीर कबुली दिलेल्या राष्ट्राने आज आमच्याविरुद्ध आण्विक शस्त्र उपसलंय. आणि ही गोष्ट आम्ही अजिबात सहन करू शकत नाही."

"विधान करणं वेगळं व प्रत्यक्ष कृती करणं वेगळं असतं."

"इराणने आजपर्यंत केलेल्या कृतींना इतिहास साक्ष आहे. गेली कित्येक वर्षं ते हमास, इस्लामिक जिहाद आणि अल् अक्सा शहीद संघटना यासारख्या दहशतवाद्यांना हाताशी धरत आहेत. त्यांचा सहभाग इस्त्रायलपुरताच मर्यादित नाही. इराकमध्ये त्यांनी घातलेल्या हैदोसाबद्दल मी तुला काही वेगळं सांगायला नकोय. त्यांची फक्त दोनच ध्येयं आहेत : मध्यपूर्व राष्ट्रांवर कब्जा मिळवणे आणि माझा देश उद्ध्वस्त करणं. आपलं

पहिलं उद्दिष्टं साध्य करण्यामध्ये ते बऱ्याच अंशी यशस्वी झाले असतीलही; पण मी मात्र त्यांचा दुसरा उद्देश कधीही सफल होऊ देणार नाही.”

“इस्त्रायलवर झालेला हल्ला हा जणू आमच्याच राष्ट्रावर झालेला हल्ला आहे असं आम्ही मानतो व ही भूमिका अमेरिकेने वेळोवेळी स्पष्टही केलेली आहे.”

“आमच्यावर हल्ला होईल म्हणून वाट बघत बसण्याची परिस्थिती आता उरलेली नाही. कारण एका हल्ल्यातच समूळ विनाश होऊ शकतो.”

“मला समजतंय पण इतक्या झटपट निर्णय घेणं म्हणजे वेळेच्या फार आधीच कृती केल्यासारखं होऊ शकतं. आपण त्याआधी युनोसमोर आपली भूमिका मांडायला हवी.”

“मला सांग की जर एकोणीस दहशतवादी विमानं घेऊन वर्ल्ड ट्रेड सेंटरला धडक देणार आहेत ही बातमी जर तुम्हा लोकांना आधी समजली असती तर तुम्ही आधीच त्यांना प्रतिबंध केला नसता कां?”

“एखाद्या देशाशी युद्ध पुकारणं आणि काही मूठभर अतिरेक्यांनी हल्ला चढवणं ह्यामध्ये खूप फरक आहे.” आपल्या आवाजाच्या पातळीकडे काळजीपूर्वक लक्ष देत अध्यक्ष म्हणाला. ९/११ च्या घटनेचा उल्लेख झाल्यामुळे तो किंचित सावध झाला होता. त्या तारखेच्या आठवणींचे भूत आता सर्वांच्याच मानगुटीवर बसलेले होते. ९/११ चा उल्लेख हा आता सावधगिरीचा इशारा समजला जात होता.

“हो, पण आण्विक शस्त्रां आणि एक विमान या दोघांतही तेवढाच फरक आहे.” पंतप्रधान ताडकन म्हणाला. “एक बॉम्ब, लक्षावधी इत्राइली नागरिकांचे प्राण घेऊ शकतो.”

अध्यक्षाने एक दीर्घ श्वास घेतला. “बोल एव्ही, मी तुझ्यासाठी काय करू शकतो?”

“इराकी हवाईमार्गावरून आम्हाला विमानं उडवण्याची परवानगी हवीय.” इस्त्रायलच्या पंतप्रधानाने सांगितले.

“जर आणि जेव्हा इस्त्रायलवर हल्ला केला जाईल तेव्हा तशी परवानगी दिली जाईल.”

“मला तुझ्याबद्दल पूर्ण आदर आहे, तरीसुद्धा मी फक्त एवढंच म्हणेन की, तेव्हा फार उशीर झालेला असेल.”

“इराण सरकार सूड उगवेल.”

“कदाचित. पण काही लढाया आपण पुढे ढकलू शकत नाही.”

क्षणभर शांतता पसरली गेली. अध्यक्ष महाशय आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करतोय हे पंतप्रधानाच्या कानी पडत होते. एका मिनिटानंतर अध्यक्ष पुन्हा बोलू लागला. “तुला आणखीही एक मदत हवी आहे असं मला सांगण्यात आलंय.”

“आम्हाला तुमची चार B61-11-EDWS ही जमीन भेदणारी क्षेपणास्त्रं हवी आहेत.”

“तू तर फारच मोठी मदत मागतोयस. ती आण्विक क्षेपणास्त्रं आहेत.”

“होय. मला ठाऊक आहे.”

तो ही मदत मागणार हे अध्यक्षाला आधीच माहीत होते. त्यावर काय उत्तर द्यायचे हेही त्याने ठरवून टाकले होते. “मी जे काही सांगतोय ते लक्षपूर्वक ऐक. आण्विक शस्त्रास्त्रांच्या वापरासाठी अमेरिका कधीही पुढाकार घेणार नाही. पण तरीही

इस्त्रायलचा बचाव भक्कम व मजबूत असायला हवा ह्यावर आमचा ठाम विश्वास आहे. ह्या कारणास्तव आणि इस्त्रायलबरोबर असलेले बऱ्याच वर्षांचे मैत्रीसंबंध लक्षात घेऊन मी आमच्या माणसांना, जनरल गांझकडे चारँ ६१ सोपवण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. मला फक्त तुझ्याकडून आश्वासन हवंय. तुम्हाला प्रत्यक्ष चिथावलं गेल्याखेरीज, तुम्ही या क्षेपणास्त्रांचा वापर करणार नाही."

"मी तुला असं वचन देऊ शकेन असं मला वाटत नाही."

"ह्या बाबतीत चर्चा होऊ शकत नाही. मी पुन्हा एकदा सांगतो, इराणच्या त्या हलकट माणसाने जर तुमच्या देशांवर किंवा देशांच्या हितसंबंधी गोष्टींवर हल्ला केला तर तुला जसं योग्य वाटेल तशा पद्धतीने ह्या बॉम्बचा उपयोग करण्यास आमची परवानगी असेल. पहाटेपासून संध्याकाळपर्यंत तू इराकी हवाईमार्गाचा वापर करू शकतोस. पण तोपर्यंत ही क्षेपणास्त्रं तू कुलुपबंद ठेवशील असा मला तुझ्याकडून शब्द हवाय."

झ्वी हिर्रस्च दुसऱ्या फोनवरून ते संभाषण ऐकत होता. त्याने पंतप्रधानाकडे एकदम चमकून पाहिले. ताबडतोब अट मान्य कर अशी त्याने खूण केली. पंतप्रधानाने स्वीकृती दिली. "मी तुला वचन देतो आणि माझ्यातर्फे व इस्त्राईली जनतेतर्फे मी तुझे मनापासून आभार मानतो."

बोलणे संपलेले होते.

झ्वी हिर्रस्चनेही फोन ठेवून दिला. "तो काय बोलला, हे तुझ्या लक्षात आलं?"

"अर्थातच." पंतप्रधान म्हणाला. "पण तुला का इतका आनंद झालाय?"

"तो म्हणाला की जर व जेव्हा तुम्हाला प्रत्यक्ष चिथावलं जाईल तेव्हा तुम्ही बॉम्बचा वापर करू शकता."

"हो. मग?"

झ्वी हिर्रस्च इतका उत्तेजित झाला होता की, त्याच्या तोंडून चटकन शब्दही फूटत नव्हते. "तुम्हाला समजलं नाही का?" त्याने विचारले. "त्यांनी बॉम्बहल्ला करण्याची आता जरुरीच नाही... काहीही कारण चालू शकेल... त्यांची कुठलीही कृती... फक्त त्या कारणाचा किंवा त्या कृतीचा संबंध, आपल्याला तेहरानशी जोडता यायला हवा."

"त्यांनी आता आपल्याविरुद्ध फक्त बोट उचलायचा अवकाश."

६२

वैमानिकाने आपल्या उजव्या हातात स्टॉपवॉच धरले होते. “पाच मिनिटं. चला, सुरुवात करा.”

गॅरिजजवळ उभी असलेली माणसे पुढे सरसावली. त्यांच्या हालचालीत विनाकारण कसलीही घाई दिसत नव्हती. दोन-दोन माणसांचे असे तीन गट बनले गेले. तीनही गट तीन बाजूंनी गॅरिजमध्ये जाऊ लागले. गॅरिजच्या भिंतींना टेकवून तीन स्टेनलेस स्टीलच्या उंच पेट्या उभ्या केलेल्या होत्या. त्या पेट्यांसाठी ‘कॉफिन्स’ असा खुणेचा शब्द होता. त्यातल्या दोन पेट्यांमध्ये विमानाचे पंख ठेवण्यात आले होते. एकेका पंखाचे पुन्हा चार-चार फूटाचे असे दोन भाग करण्यात आले होते. तिसऱ्या पेटीत विमानाच्या मधल्या सांगाड्याचे सर्व भाग ठेवलेले होते. इंजीन, स्थिर हवाई वाहतूक यंत्रणा, कु-बँडचा उपग्रहाशी संपर्क साधणारा प्रोसेसर, इंधनाची टाकी, प्राथमिक नियंत्रण यंत्रणा, कॅमेरा वगैरे.

विमानाची चाके योग्य जागी लॉक करत, पहिल्या गटाने विमानाचा मुख्य सांगाडा जमिनीवर नीट जोडण्यास सुरुवात केली. दुसऱ्या व तिसऱ्या गटाने आधी विमानाच्या पंखांचे दोन भाग एकमेकांना जुळवून घेतले व त्यानंतर ते दोन्ही पंख विमानाच्या मुख्य सांगड्याच्या दोन्ही बाजूंना नीट जोडले. त्यासाठी टंगस्टनच्या दातेरी चाकांचा वापर केला. त्याच वेळेस वैमानिक एका चार चाकी स्टँडवर ठेवलेले मोठे स्ट्रेचर घेऊन तिथे आला. ते स्ट्रेचर एखाद्या झोळीच्या आकाराचे होते व त्या झोळीत एका मोठ्या कलिंगडाच्या आकाराचा धातूचा नॅसेल्ले ठेवलेला होता. फुग्याचे वजन तीस किलो, म्हणजेच साधारण साठ पौंड होते. नॅसेल्लेमध्ये शक्तीशाली स्फोटके भरलेली होती.

एखाद्या क्षेपणास्त्रासारखीच त्याचीही रचना करण्यात आली होती. रेथॉनकडून त्या नॅसेल्लेचा मूळ साचा मागवण्यात आला होता. रेथॉन हा संरक्षक विभागासाठी नेमलेला कंत्राटदार होता. तीस वर्षांपूर्वी झालेल्या युद्धात विमानातून सोडलेल्या क्षेपणास्त्रंसाठी हाच साचा वापरला गेला होता. तीस वर्षांमध्ये त्याच्या रचनेत फार मोठा फरक पडला नव्हता. स्फोटके मात्र अधिक शक्तिशाली होती.

त्या मोठ्या झोळीसारख्या पिशवीमधील नॅसेल्लेन वीस किलो वजनाचे सिमटेक्स-प्ची स्फोटके व टिटॅनियमच्या जाड सळ्या तोडून, त्यांचे केलेले पाचशे छोटेछोटे तुकडे ठेवलेले होते. ज्या क्षणी आपल्याला हवे असलेले ‘लक्षय’ अगदी जवळ येते. ह्या ठिकाणी ते प्रवासी विमान हे लक्षय होते– तेव्हा सिमटेक्स भोवती असलेले स्फोटक रसायन कार्यान्वित होते व वीस किलोचे सिमटेक्स पेट घेते. त्यातून महाप्रचंड उष्णता असलेला गरम वायू बाहेर येऊ लागतो. त्या गरम वायूच्या रेट्यामुळे त्यात असलेल्या टिटॅनियमचे आणखी विघटन होऊन त्याचे हजारो तुकडे प्रचंड वेगाने लक्षयावर जाऊन आदळतात व पाहता-पाहता ते विमान भस्मसात होऊन जाते.

विमानाबरोबरच ते ड्रोनही भस्मसात होणे अत्यंत आवश्यक होते. त्यामुळे ड्रोनच्या रचनेचा व यंत्रणेचा पत्ता शत्रूला लागू शकणार नव्हता.

विमानाला नॅसेल्ले जोडला गेल्याबरोबर व त्याच्या वायर्स मुख्य नियंत्रक पॅनलमध्ये घट्ट बसवल्यावर वैमानिकाने विमानाची चाके आत ओढून घेतली. “वेळ झालेली आहे.” त्याने सूचना दिली.

त्याने स्टॉपवॉच पाहिले “चार मिनिटे, वीस सेकंद.” तो जोरात ओरडला.

त्या माणसांनी जल्लोषही केला नाही किंवा त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं हसूदेखील फुटले नाही. ज्या चपळाईने त्यांनी विमानाचे भाग जोडले होते, त्याच वेगाने त्यांनी ते सर्व भाग पुन्हा विलग करून टाकले. विमान कुणाच्याही दृष्टिक्षेपात पडू शकण्याचा धोका त्यांना स्वीकारायचा नव्हता. सर्व भाग पेटयांमध्ये बंद करून त्या पेटया पुन्हा गॅरेजमध्ये आणण्यात आल्या.

रंगीत तालमीवर पूर्ण देखरेख केल्यानंतर वैमानिक आपल्या राहत्या खोलीत परतला. त्या खोलीमधल्या खिडकीतून झुरिच विमानतळ स्पष्ट दिसत होते. बरोबर आठ वाजता दुरून येणाऱ्या विमानाचे दिवे उत्तर दिशेला चमकताना दिसू लागले. विमान अगदी वेळेनुसार येताना पाहून त्याला समाधान वाटले. पण ते विमान वक्तशीरपणाबद्दल प्रसिद्धच होते.

एअरबस A 380 जमिनीवर उतरले. चार किलोमीटरवरूनही त्या विमानाचा महाकाय आकार नजरेत भरत होता. विमानाची मापे त्याला तोंडपाठ होती. त्र्याहत्तर मीटर्स लांबी, उंची. चोवीस मीटर्स. दोन पंखांमध्ये अठ्ठयाहत्तर मीटर्सचे अंतर. त्यात अख्खे एक फूटबॉलचे मैदान मावले असते. आकारमानाने ते जगातील सर्वांत मोठे विमान गणले जायचे. ५५५ प्रवासी नेण्याची, त्या विमानाची क्षमता होती. आज त्यामध्ये पाचशेहून थोडे कमी प्रवासी होते. उद्या मात्र त्या विमानात एकही जागा रिकामी असणार नव्हती.

विमान धावपट्टीवरून वळत आपल्या खास जागेत जाऊन स्थिर झाले. ते विमान इतके मोठे होते की, त्यासाठी मुद्दाम मोठी धावपट्टी तयार केलेली होती. त्यानंतरच त्याला विमानाच्या शेपटावर रंगवलेला तो चमचमता तारा दिसू शकला.

E1 A1 863 ह्या क्रमांकाची फ्लाईट निदान आज तरी तेल अव्हिववरून झुरिचला सुखरूप पोहोचली होती.

६३

व्हॉन डॅनिकन बरोबर नवाच्या ठोक्याला टोबी टिंगेलीच्या दारात हजर होता. एका सेविकेने त्याला अभ्यासकक्षात आणून सोडले. तपकिरी रंगाच्या टेबलामागे बसून टिंगेली फोनवर बोलत होता. आज त्याच्या अंगात गळाबंद स्वेटर व जीन्स दिसत नव्हती. त्याने काळा सूट व राखाडी रंगाचा टाय परिधान केला होता. नजरेनेच त्याने व्हॉन डॅनिकनचे स्वागत केले व त्याच्यासमोर एक बंद लिफाफा फेकला.

व्हॉन डॅनिकनने लिफाफा उचलला. आतमध्ये एक्सेलसियर ट्रस्टचे करारपत्र होते. नेदरलंड्स अँटिलिजमधील क्युराकाओ येथे तो ट्रस्ट प्रथम अस्तित्वात आला होता. त्याचे सुरुवातीचे भांडवल होते, पन्नास हजार फ्रँक्स. तीन संचालक नेमले गेले होते. त्यापैकी दोन संचालक हे बँकेचे कर्मचारी होते. त्याला तिसऱ्या नावाशी काहीच कर्तव्य नव्हते. गेल्या ऑगस्टमध्ये ट्रस्टसंबंधित काही व्यक्तींनी टिंगेलीच्या बँकेला भेट दिली होती, ही गोष्ट त्याच्या दृष्टीने महत्त्वाची होती. कारण त्याच वेळेस रॅन्सम मध्य-पूर्वेतून परतला होता.

करारपत्रासोबत असलेल्या कागदपत्रांमध्ये त्याला अधिक रस होता. एक्सेलसियर ट्रस्टच्या वतीने बाहामियन बँकेची मासिक स्टेटमेंट्स टिंगेलीच्या बँकेने जपून ठेवलेली होती. त्यामध्ये लॅमर्स व ब्लिट्झला पाठवलेल्या रकमांच्या नोंदी होत्या. तसेच व्हिला प्रिन्सिपेस्सा खरेदीसाठी दिलेल्या रकमेचीही त्यात नोंद होती.

तरीसुद्धा बाहामियन बँकेमध्ये मुळात कोणी पैसे भरले होते ही बाब अजून उघड होत नव्हती. व्हॉन डॅनिकन भराभर कागद चाळू लागला. दोन्ही खाती ही कॅशियरच्या अधिकाराखाली उघडली गेली होती. त्याला चेक्सची छायाप्रत सापडली व त्यावरील असलेले बँकेचे नाव पाहून कमालीचा धक्का बसला. अमेरिकन आर्थिक समूहात, त्या बँकेला आदराचे स्थान होते.

“तर मग?” टिंगेलीने विचारले. फोन ठेवून तो डॅनिकनच्या समोर उभा होता. “ह्याची तू नक्कीच अपेक्षा केलेली नसणार.”

व्हॉन डॅनिकनला पालुंबोबरोबरचे संभाषण आठवले. आपण आपल्या CIA मधील मित्राचा जीव धोक्यात तर घालत नाही ना, असा विचार त्याच्या मनात चमकून गेला. “टोबी, मी ही अपेक्षा केली नव्हती.”

टिंगेलीने त्याच्या हातातून कागदपत्रे घेतली. “काल झालेल्या आपल्या भेटीचा शेवट मला आवडला नव्हता. आयुष्यभर मी तुझ्या धाकाखाली जगू शकत नाही. म्हणून मी माझ्याकडून थोडे अधिक प्रयत्न केले. आपण देशभक्तीसाठी महान कार्य केलंय असं हवं तर तू तुझ्या वरिष्ठांना दाखवून देऊ शकतोस. मी गप्प राहावं अशी जर तुझी इच्छा असेल तर ती मला मान्य आहे. माझ्या कामातील गोपनीयतेचाच तो एक भाग आहे. पण त्याबदल्यात तू कायमचा माझा पिच्छा सोडायला हवास. माझं वागणं थोडं विचित्र

असेल, पण ती माझी वैयक्तिक बाब आहे. मी कुठलेही कायदे मोडलेले नाहीत.”

टोबीने केलेली मागणी ही डॅनिकनला संशयास्पद वाटली. “मी तुला तसं वचन द्यावं असा काही आक्षेपार्ह पुरावा अजून तरी माझ्या हातात आलेला नाही. ही कागदपत्रं मिळवण्यासाठी तुला काही फार मोठे कष्ट करावे लागलेले नाहीत. सर्व गोष्टी त्या फाईलमध्येच होत्या. तुला कोर्टाची नोटिस पाठवून ह्या सर्व गोष्टी मी आठवडाभरात मिळवू शकलो असतो.”

“तू असंच म्हणणार ह्याची मला आधीपासूनच खात्री होती.” टिंगेलीने पुन्हा ती कागदपत्रे डॅनिकनच्या हातात ठेवली. मात्र त्यातील एक पान मुद्दाम दुमडून त्याच्यासमोर धरले. “मूळ फाईलमध्ये हा कागद नव्हता. त्यासाठी मला अनेक फोन करावे लागले व बराच पैसाही ओतावा लागला.”

बाहामियन बँकेतून पाठवल्या गेलेल्या पाच लाख फ्रँक्स रकमेची त्यात नोंद होती. त्या दोनपैकी एका खात्यातून ते पैसे स्वित्झर्लंडच्या सर्वांत मोठ्या बँकेतील एका खात्यामध्ये पाठवले गेले होते. त्याखाली त्या खातेदाराचे नाव लिहिलेले होते.

व्हॉन डॅनिकनला आवंढा गिळावा लागला. “ह्याबद्दल तुला खात्री आहे?”

टिंगेलीने मान डोलावली. “तर मग आता तरी सौदा झाला?”

व्हॉन डॅनिकनने हात लांब करत हस्तांदोलन केले. “हो.”

टिंगेलीने मुद्दाम त्याचा हात खेचला व दोघे नको तितके एकमेकांच्या जवळ आले. “तर मग आता इथून चालता हो आणि बर्नला जाऊन तुझ्या सहकाऱ्यांना सांग की, टिंगेली कुटुंबाने देशाची भरपूर सेवा केलेली आहे.”

व्हॉन डॅनिकन पायऱ्या उतरून खाली आला व चालत आपल्या मोटारीपाशी गेला. पडद्यामागचा सूत्रधार कोण असावा ह्याचा त्याला हळूहळू अंदाज येत होता. म्हणजे अजूनही तो नेमक्या एका व्यक्तीवर बोट ठेवू शकत नव्हता, त्याला आतून काहीतरी जाणवत होते आणि सच्च्या पोलीस अधिकाऱ्याचा आपल्या अंत:प्रेरणेवर सर्वांत जास्त विश्वास असतो. अख्ख्या देशाला हादरवून टाकेल अशी माहिती आता त्याच्या हाती आली होती. आपण आता कशी पावले उचलावीत ह्याचा विचार करत तो क्षणभर तसाच उभा राहिला. कुणावर विश्वास ठेवायचा आणि कुणावर नाही, हे आधी पक्के ठरवायला हवे होते.

गाडीचा दरवाजा उघडत असतानाच समोरून एक काळ्या रंगाची ऑडी त्याच्या बाजूला येऊन थांबली. काच खाली आली व त्याला कुर्ट मायरचा चेहरा दिसला. “आपल्याला रॅन्सम सापडलाय.”

“तू त्याला अटक केलीस?”

“अजून नाही. पण त्याचा ठावठिकाणा समजलाय.”

“काय झालं?”

“काल संध्याकाळी एका अपार्टमेंटमध्ये एक घुसखोर शिरलाय अशी खबर बर्न पोलीस अधिकाऱ्यांना मिळाली. त्यांनी जाऊन त्या फ्लॅटचा दरवाजा ठोठावला तेव्हा आतून एका पुरुषाचा आवाज त्यांनी ऐकला.

“तोच रॅन्सम होता?”

“तसंच वाटतंय. पण त्याने दार उघडण्याआधीच त्या फ्लॅटमध्ये एक मोठा स्फोट झाला. पोलीस दरवाजा तोडून आत घुसले. बेडरूम व किचनला आग लागली होती. तो गॅसचा स्फोट होता. वायुगळतीमुळे झाला असावा.”

गॅसचा स्फोट. व्हॉन डॅनिकनला अचानक आठवले. बोस्नियाचा ड्रेकोसुद्धा अशाच एका गॅसस्फोटात मेला होता.

मायर पुढे सांगू लागला. “सुरुवातीला त्या अधिकाऱ्यांना वाटले की, गॅसस्फोटामुळे तो बहुदा इमारतीबाहेर फेकला गेलेला असणार. पण त्यांना रक्ताचा एक थेंबदेखील कुठेही आढळला नाही. ज्या स्त्रीने फोन करून पोलिसांना बोलवून घेतले होते, तिच्या म्हणण्यानुसार त्या माणसाने आपण डॉक्टर असल्याचे तिला सांगितले होते. त्याच्या गळ्याजवळ जखम झाली होती व त्यातून रक्त वाहत होते. त्याच्या मानेवर कुणीतरी चाकूचा वार केला असल्याचे तिला जाणवले होते. तो फरारी गुन्हेगार असावा असा संशय त्या अधिकाऱ्यांना आला. अंमलबजावणी न झालेली वॉरंट्स त्यांनी तपासली. त्यात रॅन्समचे नाव होते. त्यांनी रॅन्समचा फोटो त्या स्त्रीला दाखवला. तिने तो ओळखला पण ती म्हणाली की, त्याचे केस काळे व बारीक होते.”

“पण तो बर्नमध्ये काय करत असावा?”

“त्याने सांगितले की तो आपल्या मेव्हणीला भेटायला तिथे आलाय. तिचे नाव, इव्हा क्रुगर.”

“तिच्याबद्दल आपल्याकडे काय माहिती आहे?”

“काहीच नाही. जणू ती एक भूत असावी. तिच्या नावाचे राष्ट्रीय ओळखपत्र नाही. नोकरीचा परवाना नाही. शेजारीण म्हणाली की, ती क्वचितच त्या अपार्टमेंटमध्ये राहायला येत असे.”

“पण त्या शेजारणीने तिला पाहिले होते? जिवंत?”

“असं ती सांगते. तिच्या मते इव्हा क्रुगर ही सतत फिरतीवर असे.”

ती नक्कीच फिरतीवर असणार, व्हॉन डॅनिकनच्या मनात विचार आला. दर्फुर, बैरुत, कोसोव्हो अशा बड्या बड्या ठिकाणांना तिला भेटी द्याव्या लागत असणार. रॅन्समच्याच गटामधली ती आणखी एक साथीदार असणार. “मगाशी तू म्हणालास की रॅन्समचा ठावठिकाणा तुला सापडलाय.”

“आम्ही इव्हा क्रुगर ह्या नावाचा राज्य व राष्ट्रीय पातळीवर शोध घेतला.” मायर म्हणाला. “आम्हाला डॅव्होसला भरलेल्या जागतिक आर्थिक परिषदेच्या सुरक्षा प्रमुखाकडून अचानक माहिती मिळाली. तो म्हणाला की, आठवड्यापूर्वी त्याने इव्हा क्रुगरची संपूर्ण तपासणी करून तिला ह्या परिषदेला हजर राहण्यासाठी आवश्यक असलेला पास दिला होता. पासची मुदत एका दिवसाचीच आहे.”

“आजच्या दिवसाची?”

मायरने मान हलवली. “तो व्हीआयपी पास आहे. तिला हव्या त्या ठिकाणी तिला प्रवेश मिळू शकतो. अगदी काँग्रेसभवनातसुद्धा.”

“आजचा कार्यक्रम काय आहे?”

“दिवसभर वेगवेगळी चर्चासत्रं आहेत. जगातल्या मोठमोठ्या व्यक्ती हजर राहणार

आहे. इराणी मंत्री, परवेझ जिन्न याचं संध्याकाळी असलेलं भाषण हे आजचं सर्वांत मोठं आकर्षण आहे.”

“तू तिथल्या सुरक्षा अधिकाऱ्यांना सावध केलंयस?”

“नाही.”

“मग ताबडतोब कर. तिचं ओळखपत्र रद्द करायला सांग. रॅन्समचं नवीन मिळालेलं वर्णन त्यांच्या कानावर घाल. तो सशस्त्र असू शकतो.”

“एवढंच?”

“नाही.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “त्यांना सांग की आम्ही तासाभरात तिथे पोहोचतोय.”

६४

दरीला जिथे सुरुवात होत होती तिथेच लष्करी ट्रक्स उभे असल्याचे जोनाथनने पाहिले. दोन लष्करी ट्रक्समध्ये डझनभर सैनिक रेंगाळत उभे होते. पाच किलोमीटर अंतरावर आणखी दोन ट्रक्स होते. त्यामधले सैनिक मात्र निवांतपणे उभे नव्हते. त्या गणवेशधारी सैनिकांच्या छातीला मशिनगन्स टेकलेल्या होत्या. येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची ते कसून तपासणी करत होते.

उंच वृक्षांनी वेढलेल्या डॅव्होस शहरात प्रवेश करण्यासाठी फक्त एकच मार्ग उपलब्ध होता. त्याच रस्त्याला पुढे जाऊन दोन फाटे फुटले होते. एक उत्तरेला गेला होता तर दुसरा शहराच्या दक्षिणेला गेला होता. शहर जवळ येऊ लागले तसतशी लष्करी सुरक्षा अधिक वाढू लागलेली होती. जीप्स, सशस्त्र व्हॅन्स. धोक्याचा इशारा मिळताक्षणी हल्ला करण्यास ते सुसज्ज होते. सापळा अगदी काळजीपूर्वक रचलेला होता. कोणत्याही क्षणी जोनाथनच्या समोर एखादा सैनिक उभा राहणार होता. त्याला गाडीबाहेर काढून, त्याची संपूर्ण झडती घेणार होता. पण मर्सिडिजची गोष्टच वेगळी होती. त्या गाडीकडे कुणी संशयाचा कटाक्षदेखील टाकला नाही.

अकरा वाजता त्याने क्लॉस्टर शहराची सीमा ओलांडली. हिमवर्षाव कमी झाला होता व आकाश उजळू लागले होते. एकदोनदा तर त्याला आकाशात निळे पट्टेही दिसले होते. चर्चमधला घंटानाद अंगावर शिरशिरी उमटवून जात होता.

पुढचा रस्ता नागमोडी वळणे घेत डोंगरात शिरत होता. डोक्यावरती हेलिकॉप्टरची घरघर ऐकू आली. त्याने परिषदेचे ओळखपत्र चटकन गळ्यात अडकवले. त्यावर आता काळ्या शाईने ठळक अक्षरात लिहिलेले 'इव्हा क्रुगर' हे नाव दिसत नव्हते. त्यात एक अक्षर वाढवून त्याचे 'इव्हान क्रुगर' असे नवे नामकरण झाले होते. 'ओळखपत्रावरील फोटोही बदलला गेला होता. आज सकाळीच त्याने झेगेलब्रुकच्या स्टुडिओत जाऊन नवा पासपोर्ट फोटो काढून त्या जागी चिकटवला होता. ते काम करण्यात त्याचा जवळजवळ एक तास मोडला होता. स्टेन्सिलच्या साहाय्याने, त्याने EVA च्या पुढे N हे अक्षर हुबेहूब जोडले होते. फोटो बदलणे जास्त अवघड होते. पण फोटो लॅमिनेट करण्यात तो यशस्वी झाला होता.

इतकी वर्षे माझे प्रशिक्षण सुरू होते, पण मला त्याचा पत्ताच नव्हता.

एम्माचे प्यादे म्हणून मी इतकी वर्षे प्रवास करत राहिलो.

डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स या संस्थेतील कारकीर्द यशस्वी होण्यासाठी केवळ वैद्यकीय पदवी असून भागत नाही. लबाडी, फसवाफसवी आणि अफाट कल्पनाशक्ती हे गुणसुद्धा तुमच्यामध्ये असणे आवश्यक असते. अत्यंत दुर्गम ठिकाणी औषधे मागवणे व मिळवणे किती अवघड असते याचा त्याला अनुभव होता. लाच दिल्याशिवाय ही औषधे प्राप्त करणे जिकिरीचे असायचे. त्यासाठी त्याने आयात-निर्यातीच्या कागदपत्रांवर किती वेळा

बेमालूम खाडाखोड केली असेल याची तो आता गणतीही करू शकत नव्हता. 'पेनिसिलिन' वर ज्या ठिकाणी बंदी असेल त्या जागी तो 'अॅम्पिसिलिन' असे लिहायचा. खरे तर अॅम्पिसिलिन अधिक जहाल होते, पण ते कुणालाही विशेष माहीत नसायचे. 'मॉर्फिन'चे 'मोराझिन' करावे लागायचे. मोराझिन असे जर औषधच अस्तित्वात नव्हते. पण कुणीही तपासून पाहात नव्हते.

ओळखपत्रातील एकच गोष्ट तो बदलू शकला नव्हता व ती म्हणजे इलेक्ट्रॉनिक चिप. त्याने फक्त त्या चिपवरून लोहचुंबक फिरवून त्यातली माहिती नष्ट करून टाकली होती. एवढ्या ओळखपत्रांमध्ये काही खराब झालेल्या चिप्स नक्कीच असणार व त्यामुळे कुणाला फारसा संशय येणार नाही याची त्याला खात्री होती.

इव्हा क्रुगरचे ड्रायव्हिंग लायसन्स बदलणे फारच सोपे होते. स्विस कार्यालयाने त्यासाठी वापरलेला कार्डबोर्ड अगदीच तकलादू होता. चाकूच्या टोकाने त्याने एम्माचा फोटो काढून त्यावर आपला फोटो लावला. त्यासाठी त्याने आपले रूप व पोशाख थोडा बदलला. सूट व टायच्या ऐवजी जाकीट घातले. कॉलरचे बटण लावले व केस थोडे विस्कटवले. दुसरा फोटो जरी अगदी पाच मिनिटांच्या फरकाने काढला असला तरी दोन्ही फोटो कमालीचे वेगवेगळे दिसत होते.

पुन्हा त्याने 'इव्हा' चे 'इव्हान' केले. एम्माची उंची एक मीटर अडुसष्ठ सेंटीमीटर लिहिली होती. अडुसष्ठच्या जागी त्याने अठ्ठ्याऐंशी केले. त्याचप्रमाणे वजनाचा आकडा वाढवून पन्नास ऐवजी ऐंशी केला.

त्याला खात्री होती की ओळखपत्र किंवा लायसन्स फार काळजीपूर्वक तपासले जाणार नाही. तपासले गेले तर मात्र धडगत नव्हती. पण तो चालवत असलेल्या मर्सिडिज गाडीची नोंदणी ही परवेझ जिन्नच्या नावाने केलेली होती व तोच तर त्याचा हुकमाचा एक्का होता.

परवेझ जिन्न व इव्हा क्रुगरच्या नियोजित भेटीची सर्व माहिती त्याला समजलीय हे अजून कुणाच्याही लक्षात आलेले नसेल असा त्याचा तर्क होता. परवेझ जिन्नसाठी आणखी वेगळी मर्सिडिज पाठवली जाण्याचीही त्याला शक्यता वाटत नव्हती. त्यामुळे इव्हा क्रुगरचा पास बदलून आपल्याला नवा पास दिला जाईल याची त्याला जवळजवळ खात्री वाटत होती.

आपण जास्त कुणाच्या नजरेस पडायचे नाही हे त्याने पक्के ठरवले होते. जरी इव्हा क्रुगरचे नाव अजून संगणकात राहिले असले तरी ती जिन्नकडे मर्सिडिज गाडी सुपूर्त करणार असल्याची टीप त्याखाली नक्कीच जोडलेली असेल. त्यामुळे ती गाडी हेच त्याच्या प्रवेशाचे मुख्य साधन ठरणार होते. दोन लाख डॉलर्स किमतीच्या गाडीला अडवण्याचे धाडस कुणीही करू शकणार नव्हते.

डॅव्होसपासून दोन किलोमीटर अंतरावर पहिली नाकाबंदी केलेली होती. त्याने गाडीचा वेग कमी केला. त्याच्या पुढे चार गाड्या उभ्या होत्या. त्याने ड्रायव्हिंग लायसन्स व नोंदणी फॉर्म तयार ठेवला. टायची गाठ घट्ट करून तो मागे सरळ ताठ बसला. गळ्यात ओळखपत्र लटकत होते, तरीसुद्धा त्याचे ओठ सुकले होते व छाती धडधडत होती. सैनिक प्रत्येक गाडीला घेराव घालत होते. त्याचा श्वास गुदमरू लागला.

एम्मा, तू आठ वर्षं हे सर्व कसं करत होतीस?

“सर!” एका पोलीस अधिकाऱ्याने त्याच्या काचेवर थाप मारली. “गाडी थोडी पुढे आणा.”

जोनाथनने गाडी पुढे आणली. गाडीबाहेर येऊन आपले ड्रायव्हिंग लायसन्स दाखव असे त्याला सांगण्यात आले.

“कुठे जायचंय?”

“डॅव्होसला. मी परिषदेसाठी आलोय.”

“तुला अधिकृत निमंत्रण आहे?”

“मला ही गाडी बेल्व्हेडर हॉटेलमधल्या एका पाहुण्याच्या ताब्यात द्यायचीय. मिस्टर परवेझ जिन्न.”

“मला तुझं ओळखपत्र पाहू दे.”

जोनाथनने गळ्यातले ओळखपत्र त्याच्या हातात दिले. पोलीस अधिकाऱ्याने ते एका मशिनमध्ये टाकले. त्याने ते ओळखपत्र बाहेर काढून दुसऱ्यांदा मशिनमध्ये टाकल्याचे जोनाथनने पाहिले.

तोपर्यंत बाकीच्या सैनिकांनी त्याच्या गाडीची झडती घेतली होती. त्यातला एक जण जोरात ओरडला. पोलीस अधिकारी त्याच्यापाशी गेला. दोघांमध्ये कुजबूज झाली. अधिकारी जोनाथनजवळ आला. “गाडी सशस्त्र आहे?”

“होय,” जोनाथनने उत्तर दिले. “मी तुम्हाला आधीच सांगितलं की, ही गाडी मी इराणचे तंत्रज्ञानमंत्री परवेझ जिन्न यांच्या ताब्यात देणार आहेत. त्यानंतर ही गाडी इराणला पाठवली जाईल.” त्याने मुद्दाम चेहरा हसरा ठेवला. ‘हे प्रकरण थोडं तापणार आहे. असं मी ऐकलंय.’

“इथेच थांब.”

पोलीस अधिकारी थोडा बाजूला गेला व आपल्या वरिष्ठांबरोबर वायरलेसवरून बोलू लागला. त्याने नाव सांगितले व मर्सिडिज गाडीविषयी विचारणा केली असे जोनाथनला अर्धवट ऐकू आले. एक मिनिट निघून गेले. अधिकाऱ्याने मान हलवली व तो जोनाथनपाशी आला. “ठीक आहे. मला फक्त गाडी आतून तपासायची आहे.”

“काहीच हरकत नाही.”

अधिकाऱ्याने जोरजोरात सूचना दिल्या. पाच जण गाडीत शिरले. त्यांनी गाडीतले सगळे ड्रॉवर्स, कप्पे उघडले. गाडीमध्ये आत ठेवलेली लोखंडी पेटीही उघडायला लावली. त्यावरून स्फोटक शोधक यंत्र फिरवले.

“गाडीच्या काचा वर घे.”

जोनाथन गाडीत जाऊन बसला व त्याने काचा वर उचलून बंद केल्या. पिस्तुलाच्या गोळ्यांनी काचेवर चरे पाडले होते. त्यावर बोट ठेवत तो अधिकारी म्हणाला, “हे काय आहे? कुणी तुला मारण्याचा प्रयत्न केला होता?”

“टारगट पोरांनी दगड भिरकावले होते.” जोनाथन म्हणाला.

तेवढ्यात आणखी एक ज्येष्ठ अधिकारी तिथे आला. त्याच्या हातात जोनाथनचे ओळखपत्र होते. “हे ओळखपत्र तुला कुठे मिळाले?” त्याने विचारले.

“म्हणजे काय?” जोनाथनला आपला आवाज काबूत ठेवता आला नाही.

“तू हे चूरच्या पोलीस स्टेशनवरून मिळवलंस का?”

“कार्ड माझ्या घरी पाठवलेलं होतं. का? काही अडचण आहे?”

“त्यातली इलेक्ट्रॉनिक चिप खराब आहे.”

“त्यात चिप आहे हेच मला ठाऊक नाही.” त्याने दिलगिरी व्यक्त करत म्हटले. “तुम्ही माझ्या ऑफिसमध्ये फोन करा... प्लीज.”

“तुझा गैरसमज होतोय.” ज्येष्ठ अधिकारी म्हणाला. “उलट आमच्या चुकीबद्दल मलाच माफी मागायचीय. तुझी इतर सर्व माहिती तपासली गेलीय. ते तुझ्या गाडीची वाटच पाहतायत. मी तुला नवीन ओळखपत्र देण्याची व्यवस्था करतो.”

‘नवीन ओळखपत्र?’ जोनाथनला हसू आवरेना. “आभारी आहे. तुमच्या कामाचं मला खरंच कौतुक वाटतं.”

“तांत्रिक चुका तर सगळीकडेच होत असतात म्हणा. त्यात एक छोटीशी चूक होती.”

“अच्छा?”

“तुझं नाव तर इव्हा असू शकत नाही. होय ना?”

जोनाथनने मान हलवली. अधिकाऱ्याने त्याच्या हातात ओळखपत्र ठेवले. “आता तू डॅव्होसच्या वेशीपाशी असलेल्या मुख्य तपासणी केंद्रात जा. ते तुझा नवा फोटो काढून तुला दुसरं ओळखपत्र देतील. ते मात्र कायम गळ्यात घालून ठेव. ठीक आहे?” पोलिसाने गाडीच्या दरवाजावर थाप मारली व तो पुढच्या गाडीकडे वळला.

मुख्य तपासणी केंद्रात, जोनाथनला नवीन ओळखपत्र देण्यात आले. त्याचबरोबर आजच्या दिवसाची कार्यक्रम पत्रिकाही त्याला मिळाली. शहराचा संपूर्ण नकाशा, शिवाय जॅकोबशॉर्न आणि पारसेन्न ह्या दोन केबल कार्सचे पासेसही त्याच्या हातात पडले. एका पोलिसाने त्याला अगदी गाडीपर्यंत आणून सोडले व बेल्व्हेडर हॉटेल कुठे आहे ते खुणेने दाखवले. हॉटेल आता फक्त तीनशे मीटरवर होते.

जोनाथनने गाडीचा वेग दहा किलोमीटरहून कमी ठेवला. रस्त्यावर खूपच वर्दळ होती. कोपऱ्याकोपऱ्यावर सैनिक उभे होते व अधूनमधून ओळखपत्र तपासत होते. काही पोलीस, जर्मन शेफर्ड कुत्रे बरोबर घेऊन टेहेळणी करताना दिसत होते. कॅफे, हॉटेल्स, स्की सामानाची दुकाने, हिऱ्यामोत्यांची दुकाने गजबजून गेली होती. समोरचा रस्ता चढत थेट बेल्व्हेडर हॉटेलपाशी पोहोचत होता. हॉटेलच्या दोन्ही बाजूला तीन मीटर लांबीचे कुंपण घातलेले होते.

रेड झोनमध्ये तुमचे स्वागत असो.

जोनाथनने गाडी थांबवली. सुरक्षा अधिकारी धावत आला. त्याने जोनाथनचे ओळखपत्र मशिनमध्ये सरकवून तपासले. लाकडी खांब वर उचलला गेला. तो गाडी चालवत वर जाऊ लागला व हॉटेलच्या फिरत्या दरवाजांपाशी येऊन थांबला. दोन्ही बाजूला हातात मशिनगन्स पकडलेले सैनिक उभे होते. मागचे सर्व दरवाजे बंद होते गेलेले, त्याने आरशातून पाहिले. अखेर प्रवेश मिळाला होता.

तो थोडा वेळ स्टिअरिंग व्हीलमागे शांतपणे बसून राहिला. आता नेमके काय करायचे ह्याचा तो विचार करू लागला. हॉटेलच्या आतमध्येच भेट घ्यायची ठरली होती का?

जिन्नला फोन करावा? का वाट पाहत राहावे? बरोबर बारा वाजले होते. इतकी अचूक वेळ पाळणारा दुसरा कुणी स्विस बँकर शोधूनही सापडला नसता. समोरच्या मुख्य दरवाजापाशी पोहोचण्यासाठी तीन पायऱ्या चढाव्या लागत होत्या. पायऱ्यांवर उंची कार्पेट पसरलेले होते. दरवाजापाशी उभे असलेले सुरक्षारक्षक खाली वाकून त्याला न्याहाळू लागले. एक जण त्याच्यापाशी येऊ लागला. जोनाथनने आवंढा गिळला. त्याच्या कपाळावर घाम जमा झाला होता. हाताची नखे पाहण्यात आपण गर्क आहोत असे भासवण्याचा त्याने प्रयत्न केला. टायची गाठ घट्ट केली. त्याने दरवाजापाशी पुन्हा एक कटाक्ष टाकला. तो रक्षक पुन्हा आपल्या जागी जाऊन उभा राहिला. चारही दिशांना त्याची नजर फिरू लागली. भोवतालच्या कुंपणावर जणू त्याचा विश्वास नसावा. घुसखोराला अडवण्याची जबाबदारी फक्त आपण एकटेच उचलू शकतो अशा रुबाबात तो उभा होता.

दुसऱ्याच क्षणी मात्र वातावरण एकदम हलकेफुलके होऊन गेले. माणसांचा एक घोळका आतून बाहेर आला. सर्वांनी काळे सूट घातले होते. त्यांची संख्या मोजणं कठीण होऊन गेले. सातपर्यंत आकडे मोजून, जोनाथन थांबला. तितक्यात जोनाथनची नजर त्याच्याकडे गेली. उंच, रुबाबदार, टापटीप, विरळ दाढी. इतरांहून वेगळा, ऐटदार चाल. लक्षवेधी व्यक्तिमत्त्व. पण जोनाथनच्या नजरेत भरली ती मात्र त्याच्या उर्मट चेहऱ्यावर उमटलेली विलक्षण चीड. त्याला काल पाहिलेला फोटो आठवला. तोच चेहरा. तशीच चीड. परवेझ जिन्न.

अचानक आवाज वाढला. कुणीतरी अचानक सावधतेचा इशारा तर दिला नाही ना असा विचार जोनाथनच्या मनात चमकून गेला. पण तो आवाज भीतीमुळे वाढलेला नव्हता. रडारवर कुणी खुनी किंवा बॉम्बर आढळला नव्हता. तो आनंदाचा चीत्कार होता. परवेझ जिन्न अगदी खालच्या पायरीवर उभा होता. त्याचे दोन्ही हात कौतुकाने आपल्या दोन्ही गालांवर चिकटलेले होते. चीड लुप्त झाली होती व त्याच उर्मट चेहऱ्यावर आता आनंद ओसंडून वाहत होता.

“माझी गाडी!” तो अमेरिकन उच्चारात ओरडला. “दि ५६००. कलेचा अप्रतिम नमुना.”

"A V 8 ?" कुणीतरी विचारलं.

आपल्या आवाजातल्या जरबेमधूनच जिन्नने त्या आगाऊ कुत्र्याला एक सणसणीत चपराक ठेवून दिली. "A V 12 !"

क्षणार्धात तो सर्व घोळका आता गाडीभोवती जमा झाला होता. गाडीला गराडा पडला होता. प्रत्येकाचे डोळे आश्चर्याने विस्फारलेले होते. गाडीच्या बाजूने सर्वांचे हात फिरत होते, पण गाडीला स्पर्श करण्याचे धाडस मात्र कुणामध्येही नव्हते. जिन्नने गाडीभोवती एक पण फेरी मारली. तो बारकाईने गाडी निरखू लागला.

काचेवरचे ओरखडे दिसू नयेत म्हणून जोनाथनने हळूच काच खाली आणली. गाडीला आलेले पोचे त्याने आधीच अगदी काळजीपूर्वक दुरुस्त करून घेतले होते. त्या गॅरेजमध्ये त्याला हवा असलेला काळा रंगही मिळाला होता. तो अगदी अचूक असणे शक्यच नव्हते, पण गाडीखाली झोपून नीट निरखून पाहिल्याशिवाय कुणालाही त्यातला फरक

जाणवला नसता. त्यानंतर गाडी पूर्ण धुवून लखलखीत केली होती व डॅव्होसच्या वेशीआधी सर्व टायर्सही चकचकीत करून घेतले होते. काचेवरचे चरे सोडल्यास गाडी अगदी नुकतीच कारखान्यातून बाहेर काढल्यासारखी दिसत होती.

जोनाथन गाडीतून बाहेर आला.

मुख्य सुरक्षा अधिकारी चपळाईने त्याला सामोरा गेला; पण त्याच्या नजरेत नेहमीचा तुसडेपणा नव्हता. त्याने खाली वाकून जोनाथनचा हात हातात घेतला व गाडीची तोंड भरून प्रशंसा केली. जोनाथन देखणा दिसत होता. सहा फूट तीन इंच उंच, भांग पडलेले काळेभोर केस आणि उंची सूट. जोनाथन म्हणजे जर्मन कार सेल्समनचे जणू मूर्तिमंत प्रतीक होता. मर्सिडिज– बेन्झसाठी प्रसिद्ध असलेला तो देश आणि इराण इस्लामिक प्रजासत्ताकाचे एकमेकांशी असणारे सख्य, साऱ्या जगाला चांगलेच परिचित होते. जिन्न एक पाऊल मागे सरकला. इव्हा क्रुगरच्या जागी एका पुरुषाला पाहून तो चकित झाला होता. पण त्याच्या चेहऱ्यावर तरी त्याने तसे दाखवलेले नाही. आपला हात पुढे करत त्याने जोनाथनशी हस्तांदोलन केले व तो इंग्लिशमध्ये म्हणाला. “शुभेच्छा मित्रा.”

“इव्हान क्रुगर,” जोनाथनने त्याचा हात घट्ट पकडला व हाताला किंचित हिसडा दिला. त्या धक्क्याने परवेझ जिन्न त्याच्या अधिक जवळ आला. जोनाथन चटकन त्याच्या कानात कुजबुजला. “मिस्टर जिन्न, तुम्हाला तुमच्या गाडीतून एक छोटी फेरी मारून आणायला मला अतिशय आवडेल.”

दुसऱ्याच क्षणी तो सुरक्षा अधिकारी पुन्हा एकदा जोनाथनच्या खांद्यापाशी येऊन उभा होता व फारसी भाषेत त्याला इशारा देत होता. जोनाथनला त्याचे निम्मेच बोलणे समजले असले तरी त्याच्या बोलण्याचा रोख त्याच्या ध्यानी आला होता. सुरक्षेशिवाय मंत्र्याला गाडीतून एकट्याने फिरायला मनाई होती. परवेझ जिन्नने त्याला दमात घेतले. तो बिचारा गप्प बसला. गाडीभोवती आणखी एक फेरी मारत जिन्नने गाडीचा दरवाजा उघडला व ड्रायव्हरच्या शेजारील सीटवर बसत म्हणाला, “चल, आपण जाऊ या.”

गाडीत शिरता शिरता जोनाथनने हॅन्नेस हॉफमनला पाहिले. तो फाटकातून आत शिरत होता. कॉर्मोरंट. हॉफमनच्या एका डोळ्यावर टाके घातलेले होते व ते लपवण्यासाठी त्याने हॅट डोळ्यांवर ओढली होती. दोघांची नजरानजर झाली. हॉफमन धावत येऊ लागला. जोनाथनने दरवाजा बंद केला व इंजीन सुरू केले. जिन्न सीटवरून किंचित वर उडाला. पहिल्या दिवशी गाडी सुरू करताना, जोनाथनचीही अशीच अवस्था झाली होती.

“इंजीन स्वयंचलित आहे.” जोनाथन समजावून सांगू लागला. “पण तुमची इच्छा असेल तर तुम्ही ते स्वत:ही नियंत्रित करू शकता.”

“चमत्कार आहे!” थक्क झालेला जिन्न भारावून म्हणाला.

“ठरल्याप्रमाणे मी तुमच्यासाठी आणखी दोन भेटवस्तू आणलेल्या आहेत.” आपला पाय अॅक्सिलरेटरवर ठेवत, जोनाथन म्हणाला. “स्वेटर आणि अर्थातच ठरलेली रोख रक्कम.”

“जरा थांब.” हॉटेलच्या बाहेर पडेपर्यंत आपल्याला पैसे न देण्याची जिन्नने खूण केली.

जोनाथनने काचा बंद केल्या. तोपर्यंत हॉफमनने रस्त्याच्या मध्यभागी उभे राहून

गाडी अडवण्याचा प्रयत्न केला; पण जोनाथन गाडीचा वेग कमी करण्याच्या मूडमध्ये नव्हता. अॅक्सिलरेटर दाबत, त्याने गाडीचा वेग आणखीनच वाढवला. हॉफमनने घाबरून बाजूला उडी मारली व तो बर्फाच्या ढिगाऱ्यात जाऊन पडला.

परवेझ जिन्न अजूनही गाडी न्याहाळण्यातच मग्न होता. त्याचे हॉफमनकडे लक्षही गेले नाही.

६५

सिकोस्कार्य हेलिकॉप्टरने ती अरुंद दरी आपल्या कमाल वेगाने पार केली. दोन दिवसांपूर्वीच्या वातावरणात व आजच्या हवेत खूपच फरक होता. वाऱ्यामुळे एकदाही हेलिकॉप्टर हेलपाटले नाही. आकाश स्वच्छ, निरभ्र होते. मध्येच एखादा निळा पट्टा उमटायचा व लगेच नाहीसा व्हायचा. क्षणभरासाठी का होईना पण सूर्याने डोके वर काढले होते व इतक्या दिवसांचे काळेकुट्ट आकाश सूर्यकिरणांनी उजळून निघाले होते.

मार्क्स व्हॉन डॅनिकनने आपल्या हातातला रेडिओ अगदी तोंडाजवळ धरला होता. त्यामुळे त्याचे डोळे तिरळे झाले होते. "नाव आहे, इव्हा क्रुगर." WEF च्या चूरमधील सुरक्षा अधिकाऱ्याला तो सूचना देत होता. "अशा नावाची किंवा त्याला मिळत्याजुळत्या नावाची कुणी व्यक्ती जर तुमच्या चेकपोस्टवर आली तर तिला आत प्रवेश देऊ नका. ती व्यक्ती सशस्त्र आहे व अत्यंत धोकादायक आहे. काहीही करून त्या व्यक्तीला ताबडतोब अटक व्हायला हवी. आलं लक्षात?"

"होय सर."

व्हॉन डॅनिकनने पाहिले. दरी दुभागणारा रस्ता त्याला दिसत होता. हेलिकॉप्टर आता क्लॉस्टर्स शहरावरून उडत होते. नाकाबंदीची ठिकाणंही आता स्पष्ट दिसू लागली होती. माणसांच्या गर्दीने रस्ते फुलून गेले होते. दहा किलोमीटर पुढे आल्यावर त्याला शहराचे पहिले दर्शन झाले. डॅव्होस. लोकवस्ती : ५,५००. समुद्रसपाटीपासून उंची : १८०० मीटर्स. डोंगरातून बाहेर आलेल्या सुळक्यावरच जणू ते शहर वसलेले होते. प्रोटेस्टंट चर्चच्या टॉवरवर सूर्यकिरणे चमकत होती. जेकबशॉर्नबर्नच्या जलाशयात विहरणाऱ्या निळ्या बोटी त्याला दिसू लागल्या.

रेडिओवर आवाज आला.

"इन्स्पेक्टर व्हॉन डॅनिकन, सुरक्षा केंद्रातून बोलतोय."

"काय झालंय?"

"क्रुगर आडनावाची व्यक्ती आधीच येऊन पोहोचलीय. पहिलं नाव : इव्हान. अकरा वाजून सात मिनिटांनी त्याला इथून प्रवेश दिला गेला. अकरा वाजून एकतीस मिनिटांनी त्याला मुख्य सुरक्षा केंद्रातून नवीन ओळखपत्र दिलं गेलं."

"त्या माणसाला नवीन ओळखपत्रं दिलं गेलं?"

"क्रुगरचं मूळ ओळखपत्र सदोष होतं. त्यातली चिप खराब झालेली होती. त्यावरची माहिती चुकीची होती अशी तपासणी अधिकाऱ्याने आपल्या पुस्तकात नोंद केलेली आहे."

"ह्या सगळ्याचा काय अर्थ होतो?"

"मूळ नाव इव्हा क्रुगर होतं. पण ओळखपत्र घेऊन येणारी व्यक्ती पुरुष होती.

इराणचा मंत्री परवेझ जिन्नला तो मर्सिडिज गाडी भेट देण्यासाठी आला होता.”

जिन्न, असंतोष पसरवून लोकांना चिथवणारा तो इराणी! व्हॉन डॅनिकनला अचानक आठवले. गॉडफ्रिड ब्लिट्स उर्फ महम्मद क्विताबला एक लाख स्विस फ्रँक्स पाठवले गेले होते. बँकेच्या स्टेटमेंटमध्ये तळटीप होती. ‘पी.जे.साठी भेट.’ पैसे कुणाला पाठवले हे त्याला आता उमगले होते, पण त्या दोघांमधले संबंध मात्र त्याला अजून उलगडलेले नव्हते.

त्याला आणखी काही गोष्टींची आठवण झाली. काँप्युटरवर त्याने जुन्या वर्तमानपत्रांची कात्रणे वाचली होती. बोस्नियन वॉर्लर्ड व लेबॅनिझ इन्स्पेक्टरच्या खुनाविषयीची. रॅन्समच्या मनात आणखी एक खून करायचा असेल? तर मग त्याला एक लाख फ्रँक्स व त्याच्या दुप्पट किमतीची गाडी देण्यामागचा उद्देश काय असेल?

“इव्हान क्रुगर कुठे आहे?”

“एक सेकंद सर. मला तपासायला हवं.”

व्हॉन डॅनिकनने मनातल्या मनात एक सणसणीत शिवी हासडली.

“तो रेड झोनमध्ये आहे. आठ मिनिटांपूर्वी तो हॉटेल बेल्व्हेडरमध्ये आत शिरलाय.”

“तुझ्या माणसांना हॉटेलवर पाठव.” व्हॉन डॅनिकनने सांगितले. “मला शक्य तितक्या लवकर हॉटेलला पूर्ण वेढा घातलेला हवाय गोंधळ उडाला तरी त्याची पर्वा करू नका. मी तुम्हाला सर्व अधिकार देतोय, मी चार मिनिटांतच दक्षिणेच्या हेलिपॅडवर उतरतोय. मला घेऊन जाण्यासाठी एखाद्या माणसाला पाठवून दे.”

६६

इ.स. १२९१ मध्ये स्वित्झर्लंड देश अस्तित्वात आला होता. आपला देश हा लोकशाहीचा पुरस्कार करणारा जगातील सर्वांत जुना देश असल्याचा प्रत्येक स्विस नागरिकाला अत्यंत अभिमान होता. संसदेच्या दोन विधिमंडळांवर स्विस सरकार आधारलेले होते व ह्या रचनेवर अमेरिकन व इंग्लिश संविधानाचा खूप प्रभाव होता. राज्यसभा किंवा नॅशनल कौन्सिलमध्ये दोनशे प्रतिनिधींचा समावेश होता. देशातील सव्वीस कँटन्समधून हे सर्व प्रतिनिधी रीतसर निवडणूक लढवून निवडून आलेले असत. कौन्सिल ऑफ कॅन्टन्स हे दुसरे विधीमंडळ होते. वीस कॅन्टन्समधून प्रत्येकी दोन व उरलेल्या सहा छोट्या कॅन्टन्समधून प्रत्येकी एक, अशा प्रतिनिधींचा दुसऱ्या विधीमंडळात समावेश केलेला असे. सर्वाधिक प्रतिनिधी असणाऱ्या राजकीय पक्षामधून पंतप्रधानांची निवड केली जात नसे. त्या ऐवजी दर चार वर्षांतून दोन्ही विधीमंडळांची एकदा बैठक बोलावली जाई व त्यातून सात सभासदांचे एक फेडरल कौन्सिल बनवले जात असे. प्रत्येक राजकीय पक्षाच्या संख्याबळाच्या प्रमाणात ही सात पदे विभागली जात असत. प्रत्येक कौन्सिलरकडे मंत्रालयातील एकेक विभाग सोपवला जाई. दरवर्षी त्यातील एकाची अध्यक्ष म्हणून चक्राकार पद्धतीने निवड होत असे. अध्यक्षपदाची मुदत अर्थातच फक्त एक वर्षाची असे.

पंचेचाळीस वर्षांचा अल्फॉन्स मार्टी हा जरी फेडरल कौन्सिलचा सर्वांत तरुण सभासद असला तरी अध्यक्षपद मिळवण्यासाठी अजून सहा वर्षे थांबून राहायची, त्याची मुळीच इच्छा नव्हती. आपल्या स्वत:च्या जिनिव्हा कँटनमध्ये त्याने आधीच, धडाडीचा नेता म्हणून नाव कमावले होते. तिथल्या गुन्हेगारीचा त्याने पूर्ण नायनाट केला होता. शिवाय अलीकडेच त्याने अमेरिकेच्या अति हस्तक्षेपाविरुद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवर मोहीम उघडली होती.

शुक्रवारची सकाळ काहीशी उदासीन होती. आपल्या ऑफिसमधल्या भल्यामोठ्या टेबलामागे बसून मार्टी आपल्या हातातल्या कागदांकडे कौतुकाने पाहात होता. त्याच्या हाती आलेल्या त्या पुराव्यामुळे त्याचा अध्यक्षपदाचा मार्ग आता मोकळा झाला होता.

दहा मिनिटांपूर्वीच स्विसकॉममधून फॅक्स आला होता व त्यात मार्क्स व्हॉन डॅनिकनच्या सर्व फोन नंबर्सवरून केल्या गेलेल्या व त्याला आलेल्या सर्व कॉल्सची पूर्ण यादी दिलेली होती. यादीमध्ये एकूण अडतीस कॉल्स होते. त्यापैकी बहुतेक कॉल्स हे त्याच्या फेडरल पोलीस ऑफिसातील सहकाऱ्यांचे होते. त्या यादीत मार्टीला आपला नंबर तीन वेळा आढळला होता; ०८:५० ला, जेव्हा ओनिक्सकडून CIA च्या त्या विमानातल्या प्रवाशांची यादी पाठवली गेली होती; १२.१५ ला, जेव्हा अमेरिकन जेटने स्विस विमानतळावर उतरण्याची परवानगी मागितली होती आणि १:५० ला, जेव्हा आपण एकाच गाडीने विमानतळावर जाऊ असे सांगण्यासाठी डॅनिकनने त्याला फोन केला होता.

यादीवर ठेवलेले बोट खाली घसरत आणताना तो ००१ ह्या राष्ट्रीय कोडवर येऊन थांबला. युनायटेड स्टेट्स. एरिया कोड ७०३– म्हणजे लँग्ले, व्हर्जिनिया. हा नंबर युनायटेड स्टेट्स सेंट्रल इन्टलिजन्स एजन्सीचा होता.

मार्टीला पुरावा मिळाला होता.

कागदपत्रे नीट ठेवून त्याने हार्डनबर्गला फोन लावला. काल रात्रीच तो त्याच्याशी बोलला होता. “व्हॉन डॅनिकन कुठे आहे? मला त्याच्याशी ताबडतोब बोलायचंय.”

“पंधरा मिनिटांपूर्वीच झुरिचला त्याच्यासाठी एक हेलिकॉप्टर पाठवलं होतं.” हार्डनबर्गने उत्तर दिले. “कुर्ट मायर व तो डॅव्होसच्या दिशेने रवाना झालेत.”

“डॅव्होस?” मार्टीचा चेहरा पडला. “कशासाठी?”

“आम्हाला जोनाथन रॅन्समविषयी खबर मिळालीय. तो इराणचे मंत्री परवेझ जिन्न यांना एक आलिशान गाडी भेट देण्यासाठी डॅव्होसला पोहोचलाय.”

मार्टीला राग आवरणं कठीण गेलं. “तुम्ही डॅव्होसच्या सुरक्षा अधिकाऱ्यांना सावध केलंय का?”

“हो बहुदा.”

“तुला आणखी काही माहिती मिळाली तर मला लगेच फोन कर.”

मार्टीने फोन ठेवला व दुसऱ्याच क्षणी फेडरल पोलीस खात्याच्या प्रमुखाला फोन लावला. “मिस्टर हर्र डिरेक्टॉर,” त्याने बोलायला सुरुवात केली. “एक अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झालाय. तुझ्या ऑफिसमधल्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने विदेशी सरकारबरोबर हातमिळवणी केल्याचं नुकतंच उघड झालंय. त्या व्यक्तीचं नाव आहे मार्क्स व्हॉन डॅनिकन. होय, मला सुद्धा धक्का बसलाय. अखेर, कुणावर विश्वास ठेवायचा हे कळणं नेहमीच अवघड असतं.”

समोर पडलेल्या यादीवरून त्याने नजर उचलली व तो खिडकीबाहेर पाहू लागला. पूर्वेकडील पर्वतरांगांवर त्याची दृष्टी खिळली होती.

“मला सांग, डॅव्होसला तू तुझी माणसं किती लवकरात लवकर पाठवू शकतोस?”

६७

“तू कोण आहेस?”

परवेझ जिन्न आपल्या सीटवर ताठ बसला होता. त्याचे डोळे जोनाथनला न्याहाळत होते.

“इव्हाचा मित्र.”

“तुम्ही दोघं एकत्र काम करता?”

“हो. गेली आठ वर्षं.”

“ओह्!” ठरलेला बेत अचानक फिस्कटला गेल्याने जिन्न मनातून नाराज झाला होता. पण तो आपली नाराजी लपवू पाहात होता. “म्हणजे तू तिला चांगलाच ओळखतोस?”

“हो. असं आपण म्हणू शकतो.” आपले अज्ञान उघडे पडणार नाही याची जोनाथन काळजी घेत होता. पन्नास मीटरवर एक पोलीस, वाहतुकीचे नियंत्रण करत होता.

“तिला काय झालंय? ती का येऊ शकली नाही?”

जोनाथनने त्याच्याकडे मान वळवली. “ती आता ह्या जगात नाही.”

हातोडा बसावा, तसे ते शब्द आदळले. “मेलीय? कधी? कशी? छे! माझा विश्वासच बसत नाहीये.”

“सोमवारी. आपल्या नवऱ्याबरोबर ती ट्रेकिंगला गेली होती तेव्हाच अपघात झाला.”

“तिचा नवरा? हो. हो. बरोबर. तिचं लग्न झालं होतं. मिसेस क्रुगर.” त्याची मान खाली झुकली. त्याने ओठ घट्ट आवळून घेतले आहेत हे जोनाथनला दिसत होतं.

“तुम्ही ठीक आहात ना?”

जिन्नने झटकन वर पाहिले. “हो. खूप वाईट वाटलं मला. तिने माझ्यासाठी खूप काही केलं होतं.”

त्या इराणी माणसाने आता आपली नजर समोरच्या काचेवर स्थिर केली होती. त्याचे ओठ हलले पण त्यातून शब्द फुटले नाहीत. त्याने शेजारचे हँडल घट्ट पकडले होते व त्याची नखे पांढरीफटक पडली होती. त्याला धक्का बसलेला जाणवत होता. जोनाथन त्याच्याकडे टक लावून पाहत होता. त्याला त्याचा प्रचंड तिरस्कार वाटत होता. जिन्नच्या जबड्यावर एक जबरदस्त प्रहार करावा आणि त्याला गाडीच्या खिडकीवर आपटावा अशी सणक त्याच्या मनात उफाळून आली. एम्माच्या मृत्यूबद्दल शोक करण्याचा त्याला मुळीच हक्क नव्हता.

जोनाथनने नजर वळवली व आपल्या प्रक्षुब्ध भावनांवर ताबा मिळवण्याचा तो कसोशीने प्रयत्न करू लागला. जिन्नचे मन इव्हा क्रुगरवरून – एम्मावरून – लवकरात लवकर वळवणे अतिशय जरुरीचे होते. नाहीतर तो गाडीतच मोडून पडायचा. जोनाथन

मनातल्या मनात इंटेलिंकवरून मिळालेली माहिती आठवू लागला. बिले. मालाची यादी. कस्टम्सचे परवाने. “आम्ही पाठवलेला माल मिळाला ना?” त्याने विचारले.

जिन्नने मान डोलावली, पण त्याच्या तोंडून शब्द फूटायला आणखी एक सेकंदभर वेळ लागला. “चालूसचं काम आता जोरात सुरू झालंय.” त्याच्या आवाजात जोर नव्हता. “चारशे कास्केड्स. पंचावन्न हजार सेंट्रीफ्युजेस. आम्ही बाकीची सर्व केंद्रं बंद करून टाकली आहेत आणि सर्व माल तिथेच एकत्र आणलाय. आमचा उद्देश सफल झाल्यातच जमा आहे.” कास्केड्स. सेंट्रीफ्युजेस. संपूर्ण कार्यरत केंद्रं. जोनाथनचा संशय खरा ठरला होता. स्फोटक दर्जाच्या युरेनियम निर्मितीसाठी झिअॅग कंपनी बेकायदेशीरपणे साधनसामुग्री निर्यात करत होती. पण कंपनीला असे करण्याची काय गरज होती? आणि हे सर्व ती कोणाच्या वतीने करत होती? हे जर त्याला समजले तर एम्मा कुणासाठी काम करत होती हेही कळून चुकले असते. गेल्या वर्षी पेपरमध्ये वाचलेले लेख त्याला आठवले. इराण ही आण्विक क्षेत्रात महासत्ता बनू पाहत होती. “सध्या तुमचं उत्पादन किती आहे?” त्याने विचारले.

“महिन्याला चार किलो. शहाण्णव टक्के प्रतीचं.”

“त्यावर तुम्ही समाधानी आहात? शंभर टक्क्यांपर्यंत तुम्ही जाऊ शकत नाही?”

एखाद्या अडाणी माणसाकडे पाहावे तसे जिन्नने त्याच्याकडे पाहिले. “शहाण्णव टक्के हीच मुळात गरजेपेक्षा खूप वरची पातळी आहे. तुला कौतुक वाटेल असा माझा समज होता.”

“मला ना... वाटलंच की... म्हणजे... आम्हाला अभिमानच आहे.” एखाद्या अनोळखी घरात आपण किट्ट काळोखातून चालतोय व कोणत्याही क्षणी आपल्या धक्क्यामुळे घरातल्या वस्तू धडाधडा कोसळणार आहेत असेच त्याला क्षणभर वाटून गेले. त्याला अधिक काळजी घ्यायला हवी होती. आपण इव्हा क्रुगरचे सहकारी नसल्याचा जिन्नला थोडा संशय जरी आला तरी तो काय करेल ह्याचा नेम नव्हता. “बरं मग, आता राहिलेला अर्धा भाग?”

“कसला अर्धा भाग?” जिन्न आता चिंताक्रांत दिसू लागला. त्याच्या नजरेतून जोनाथन झपाझप उतरू लागला होता.

इराणच्या सद्यस्थितीवर चर्चा करण्यासाठी आपली ही भेट ठरलेली नाही हे त्याच्या चटकन लक्षात आले. भेटीमागचा उद्देश निराळाच होता. किंमत चुकती करणे हाच हेतू असावा असा त्याने अंदाज केला. गाडी व पैसे, यांच्या बदल्यात ‘सोने.’ आणि ‘सोने’ म्हणजे अत्यंत गुप्त माहिती, असाच अर्थ असणार. जिन्न दुसरं काय देऊ शकणार होता? “तुम्हाला तर माहितीच आहे.” जोनाथन प्रत्येक शब्दावर जोर देत म्हणाला.

“तुम्हाला हवी असलेली गोष्ट मी आणली आहे की नाही याची जर तुला काळजी वाटत असेल तर तू निर्धास्त राहा. तुम्ही माझ्यासमोर पर्याय तरी कुठे ठेवलायत?”

जोनाथनने त्याच्याकडे एक निसटता कटाक्ष टाकला. “आपल्या सगळ्यांनाच एक मोठी जबाबदारी पार पाडायची आहे.”

जिन्न कडवटपणे हसला. “तुला माहितीये? आपल्या गुप्तहेरांची कामगिरी फत्ते करण्यासाठी जे मदत करू शकतील अशाच व्यक्तीच्या गळ्यात ते मंत्रीपद देतात. त्याला फ्रेंचमध्ये ‘पोअर एन्करेजर लेस ऑट्रेस’ असे म्हटले जाते. इतरांना उत्तेजन

देणे.” त्याने उत्तराची वाट पाहिली नाही. त्याचा मूड लागला होता व जोनाथनलाही तो बिघडू द्यायचा नव्हता. “जर तुम्ही पकडला गेलात तर ते तुमच्या कुटुंबापासून सुरुवात करतात. कुटुंबातल्या सर्वांत लहान मुलाचा ते पहिला बळी घेतात. त्याला आपलं घर आठवलं. पाशा आठ वर्षांची आहे. त्याहून मोठी, यास्मिन. गेल्या आठवड्यात ती तेरा वर्षांची झालीय. नवीन कायद्याप्रमाणे आता घरातून बाहेर पडताना तिला बुरखा घालावा लागणार. त्यासाठी पॅरिसमधल्या हर्मेसमधून तिच्यासाठी खास काळ्या सिल्कचे मोठे रुमाल मागवलेत. व्हर्जिनिया किंवा लंडन किंवा तेल अविव्ह किंवा ज्या कुठल्या शहरातून तू आला असशील, तिथल्या तुझ्या त्या खास सहकाऱ्याला जाऊन ही सगळी माहिती पुरव.”

जिन्नने आपले डोळे जोरजोरात चोळले. ज्या परिस्थितीत तो अडकला होता व जी जबाबदारी त्याच्यावर लादली गेली होती, त्या सर्वांचा असह्य ताण, त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. “पण तुम्हाला ती कुठे सापडली होती?” तो आणखी एक अर्थहीन प्रश्न होता. जिन्नला सर्व प्रश्नांची उत्तरे आधीच ठाऊक होती. स्वत:वर ओढवलेल्या परिस्थितीचा त्याने अगदी बारकाईने अभ्यास केला होता. त्यातले खाचखळगे व धोके त्याने समजून घेतले होते. जोनाथनबरोबर बोलून तो आपला ताण हलका करत होता. “त्यातली गंमत तुला ठाऊक आहे का?” तो पुन्हा बोलू लागला. त्याच्या चेहऱ्यावर एकही स्मितरेषा नव्हती. “आजही माझं मन मला सांगतय की, ती माझी खूप काळजी घेत होती. म्हणजे एवढं सगळं घडूनसुद्धा, तिच्याकडून मला अनेक वेळा धमक्या येऊनसुद्धा, माझे फोटो तिच्यापाशी होते. ती माझी बदनामी करू शकत होती. माझ्याकडून हवं ते वसुल करू शकत होती. का ते बँकेच्या रेकॉर्डसाठी काढले होते? मी लाच घ्यावी म्हणून तिने किती आग्रह केला होता! शेवटी काय झालं? ट्रेकिंग करताना मेली ना? तिच्या नशिबी असंच स्वस्त मरण लिहिलेलं होतं.”

जोनाथन शांतपणे ऐकत होता. आपल्याच मनातलं, जिन्न बोलतोय असे त्याला क्षणभर वाटलं. सिग्नलने हिरवा दिवा दाखवला आणि प्रोमेनेड ह्या शहरातल्या मुख्य वस्तीतून तो रेल्वे स्टेशनकडे वळला. जिन्न आता पूर्ण भानावर आला होता. तो आपल्या सीटवर व्यवस्थित बसला होता व त्याने आपला नेहमीचा अतिउत्साही मुखवटा आपल्या चेहऱ्यावर पुन्हा चढवला होता.

“असो. काय उरकुया.” तो म्हणाला. “मिस्टर क्रुगर, पैसे कुठे आहेत?”

जोनाथनने त्याच्या हातात पाकीट ठेवले. खर्च झालेले पैसे त्याने आपल्या स्वत:च्या खात्यातून वळते केले होते. “एक लाख स्विस फ्रँक्स.”

“माझ्या झुरिचच्या खात्यात पैसे पाठवले?”

“अर्थात!” जिन्न विचारत असलेल्या पैशाबद्दल जोनाथनला काहीच ठाऊक नव्हते.

“पूर्ण वीस दशलक्ष?”

“हो.”

“हे सर्व माझ्या मुलांसाठी मी केलं. कळतंय ना तुला?” जिन्नने खुलासा करण्याचा प्रयत्न केला. “हा देश सोडल्याखेरीज मी पैशाला स्पर्शही करू शकत नाही.”

इराणी गृहस्थाने आपल्या खिशातून एक फ्लॅश ड्राईव्ह काढून समोरच्या बोर्डवर ठेवला. “ह्यात सगळं आहे. आमच्या रॉकेट्सची ठिकाणं. शस्त्रास्त्र साठ्यांची गोदामं.

निर्मिती केंद्रं. आमच्या आण्विक केंद्रांची एकूण एक माहिती. इराकच्या प्रकरणात तुम्ही घोडचूक केली होती, तुम्ही ती पुन्हा करू शकत नाही. ह्या माहितीचं तुम्ही काय करणार आहात हे मला माहीत आहे. या वेळेस तुमच्यापाशी नवे अत्र आहे आणि हल्ला करण्यासाठी सबळ कारणही आहे. ह्या वेळेस जर तुम्ही चूक केलीत तर तुम्हाला माफी नाही.

"नवे अस्त्र?"

"होय. तुम्ही जे कुणी आहात अमेरिकन, फ्रेंच, ब्रिटिश, इस्त्रायली. त्यामुळे काहीच फरक पडत नाही. तुम्हा सर्वांना एकच गोष्ट हवीय. युद्ध."

जोनाथनने जिन्नबद्दल पेपरात खूप वाचले होते. त्याची मंत्रीपदावर कशी नेमणूक झाली होती ह्याचा त्याला थोडाफार अंदाज आला होता. जिन्नने पश्चिमी देशांना दिलेल्या भेटीतून त्याची सुरुवात झाली होती. त्या वेळेस तो तंत्रज्ञान मंत्रालयातला एक कनिष्ठ अधिकारी होता. इराणशी व्यावसायिक संबंध जोडू पाहणाऱ्या बड्या व्यापाऱ्यांना भेटणे ही एकच त्याच्यावर सोपवलेली जबाबदारी होती. सुरुवातीला तो कुठे गेला होता? बैरुतला की जिनिव्हाला? का जोनाथनला माहीत नसलेल्या आणखी कुठल्या वेगळ्याच शहरात? त्या गोष्टीला काहीच महत्त्व नाही. पण तीच पहिली झलक होती. अतिशय सावधपणे त्याला जाळ्यात ओढले गेले असणार. एका किमती, मौल्यवान गोष्टीच्या मोबदल्यात झिअॅगतर्फे 'नियंत्रित यंत्रणे'ची साधनसामुग्री पाठवण्यात येणार होती. अर्थात, इव्हानेच हे सारे घडवून आणले होते. जिन्नसारख्या माणसाला तो मोह आवरणे अशक्य होते. त्याने तर सुरुवातीपासूनच ही शक्यता गृहीत धरलेली असणार. त्याच्यासाठी पदोन्नतीचाही तोच मार्ग होता. पाकिस्तानच्या ए.क्यू. खान ह्या अभियंत्याने, आपल्या देशासाठी बॉम्बनिर्मिती करून देशभक्त हा किताब मिळवला होता. आपणही तसेच शूरवीर ठरु असे त्याला वाटले होते. आणि आजपर्यंत कधीही न भेटलेल्या असामान्य स्त्रीच्या सहवासात असे सुख पदरात पडत असेल तर आपल्यासारखे भाग्यवान आपणच. त्याने ती संधी घट्ट पकडली.

सुरुवातीला कदाचित त्यांचे संबंध पूर्णपणे व्यावसायिक राहिलेले असावेत. इव्हा, हॉफमन व ब्लिट्झ ह्यांनी आपला माल नीट पोहोचतोय की नाही ह्याकडेच फक्त लक्ष दिलेले असणार. वरिष्ठांचा जिन्नवर विश्वास आहे की नाही याबद्दल तोपर्यंत त्यांना खात्री नसावी. काहीही असो, पण त्यानंतर परवेझ जिन्नला अतिशय वेगाने प्रसिद्धी मिळत गेली. सहा महिन्यात तो तंत्रज्ञान मंत्री झाला होता. मंत्री झाल्यामुळे तो आता जगभर मुक्त प्रवास करू शकत होता. त्याने स्वित्झर्लंडला जाऊन झिअॅग कंपनीला नक्कीच भेट दिलेली असणार. जेव्हा जेव्हा एम्मा आपल्याला सोडून गेलेली होती, तेव्हा ती त्यालाच भेटण्यासाठी जात होती. झिअॅग भेटीच्या दरम्यान, इव्हा क्रुगरने त्याला अलगद आपल्या जाळ्यात ओढलेले असणार. खाजगी भेटीसाठी तिने त्याला बर्नला यायचे निमंत्रण दिले असणार. त्या भेटीतच तिने त्याला आपल्या फ्लॅटवर बोलावले असणार. पोलिश व्होडकाने भरलेले ग्लास किणकिणले असणार. आणि पुढे आणखी काय काय झाले असेल कोण जाणे. हा खेळ तर प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. सुरुवातीला त्यांच्याजवळ फोटो होते. मग त्यांनी लाच द्यायला सुरवात केली. झुरिचच्या खात्यात पैसे पाठवले गेले. इव्हासारख्या स्त्रीसमोर कुठल्याही पुरुषाचे

अध:पतन होऊ शकते हे आयातोल्ला खोमेनीसारख्या माणसालाही कळून चुकले असेल.

जिन्नला गळाशी पकडून त्यांनी झोकात सुरुवात केली होती.

त्या इराणी माणसाला अधाशीपणे पैसे मोजताना, जोनाथन पाहत होता. अरे मूर्ख अक्करमाशा, तो मनातल्या मनात म्हणाला. त्याला जिन्नबद्दल आता घृणा निर्माण झाली होती. माझ्या बायकोच्या नखाचीही तुला सर नाही.

“हे एवढंच ना?” हातातला फ्लॅशड्राइव्ह दाखवत जोनाथनने विचारले.

“माझ्या देशाच्या आण्विक कार्यक्रमाची संपूर्ण योजना त्यामध्ये आहे. तेवढं पुरेसं नाही?”

“तुम्ही अजून काही लपवत तर नाही ना? हवं तर आपण. थांबू या. माझ्यापाशी भरपूर वेळ आहे.”

“आणखी एक गोष्ट सांगायची आहे.” जिन्न म्हणाला. “वर्षापूर्वी आमच्या ताब्यात चार रशियन निर्मित KH-55 ही क्षेपणास्त्रं आलेली आहेत. गल्फमधील कार्शुन तळावर ती ठेवलेली आहेत. प्रत्येकाची दहा किलोटनाची क्षमता आहे. जर आमच्या आण्विक केंद्रांवर हल्ला केला गेला तर त्यांचा वापर करण्यास आम्ही बिलकूल कचरणार नाही. जेरुसलेम व घवारच्या तेलखाणी उडवण्यासाठी ती मागवलेली आहेत. आमचा अध्यक्ष ही गोष्ट पुढच्या आठवड्यात जाहीर करणार आहे. मी इथे फक्त वातावरणनिर्मिती करण्यासाठी आलो आहे. कोणतीही कृती करण्याआधी दोनदा विचार करा असा माझा निरोप तू तुझ्या तज्ञांना जाऊन सांग.”

“मी जरुर तुझा निरोप त्यांना सांगेन.”

“तर मग?” जिन्न म्हणाला, “ते फोटो कुठे आहेत? माझा पासपोर्ट कुठे आहे? मी इथून सुखरूप बाहेर पडू शकतो याची मला खात्री वाटायला हवी. मी तुमच्या नोकरासारखा वागलोय. सर्व वस्तू मला परत मिळतील असं इव्हाने मला वचन दिलं होतं.”

जोनाथनने त्याला त्याचा फ्रेंच पासपोर्ट दिला. “फोटोंसाठी तुम्हाला काही काळ थांबावं लागेल. इव्हाकडे फोटो होते. पण तुम्हाला काळजी करायचं काहीच कारण नाही. तुम्ही तुमचं काम पूर्ण केलं आहे. ह्यापुढे कोणीही तुम्हाला कसलाही त्रास देणार नाही.”

अचानक समोरच्या बाजूला गोंधळ सुरू असल्याचे त्याच्या लक्षात आले. सैनिकांचे पथक अगदी रस्त्याच्या मधोमध उभं होते. त्यांनी दोन्ही बाजूंनी रस्ता अडवला होता. रस्त्याच्या कडेलाही पोलीस उभे होते. मोठमोठ्या आवाजात ते पादचाऱ्यांना सूचना देत होते. काही जण विरुद्ध दिशेला धावत होते. काहींनी तर रस्त्यावर आडवे पडून आपल्या हातांनी आपले डोके झाकून घेतले होते.

जिन्नचा फोन वाजला. ऐकताना, त्याने विचित्र हुंकार दिला. त्याची नजर जोनाथनकडे वळली होती.

“पोलिसांनी हॉटेलला गराडा घातलाय.” परवेझ जिन्न म्हणाला. “मर्सिडिज देणाऱ्या माणसाचा ते शोध घेत आहेत. मित्रा, मला वाटते तू माझा खातमा केलायस.”

६८

जोनाथनने आपले डोळे समोर रोखले होते. रस्त्याच्या मधून पोलिसांचे एक पथक पुढे येऊ लागले. त्यांच्या बंदुका मर्सिडिजवर रोखलेल्या होत्या. त्याने आरशातून मागे पाहिले. जवळपास तसेच दृश्य होते. वरून हेलिकॉप्टरचा आवाज येत होता. सूट व ओव्हरकोट घातलेला एक इसम ठाम पावले टाकत, त्याच्या दिशेने येत होता. त्याचे डोळे सुजलेले असले तरी त्याची चाल दमदार होती. डोळ्यात अंगार होता. दोन दिवसांपूर्वी व्हिला प्रिन्सिपेस्सामध्ये ह्याच माणसाने धाड घालणाऱ्या पोलीस पथकाचे नेतृत्व केले होते.

“तू कुणासाठी काम करतोयस?” जिन्नने जोनाथनला विचारले. “सीआयए? एम-१६? मोस्साद? मरण समोर ठाकलेल्या माणसाला निदान हा प्रश्न विचारायचा नक्कीच हक्क आहे.”

“त्यापैकी कोणासाठीही मी काम करत नाही.”

“काय म्हणायचंय तुला?”

“मी तिचा नवरा आहे.”

“कुणाचा नवरा?”

जोनाथनने त्याच्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकला. “इव्हा क्रुगरचा.”

“पण...” जिन्नची देहबोली क्षणार्धात बदलून गेली. “मला ते देऊन टाक.” तो म्हणाला. “फ्लॅशड्राइव्ह दे.”

“माफ कर.” जोनाथन म्हणाला. “त्यात सौदा होऊ शकत नाही.”

“पण पोलिसांना ते सापडेलच... मी ते तुला दिलं होतं हे सर्वांना कळेल. मला ते परत हवंय.”

“मी देऊ शकत नाही.”

भोवताली जमा झालेल्या पोलीस व सैनिकांकडे जोनाथनचे लक्ष गेले. आपल्या हातातल्या पुराव्याच्या जोरावर आपण आपली बाजू उलटवायची असे त्याने आत्तापर्यंत ठरवले होते. त्याच्या हातात इराणच्या आण्विक कार्यक्रमाची संपूर्ण माहिती असलेला फ्लॅशड्राइव्ह होता. गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांना कोण जबाबदार आहे हे ज्याच्या तोंडून वदवून घेता येऊ शकेल असा देशद्रोही मंत्रीही त्याच्या बाजूला बसला होता. पण तरीही हे पुरेसे नाही, हे त्याच्या लगेच लक्षात आले. आपल्याकडचा फ्लॅशड्राइव्ह, पोलीस जप्त करतील. जिन्न आपल्या शिष्टमंडळाबरोबर झटकन आपल्या देशात निघून जाईल. आणि जोनाथन? वीस वर्षे तुरुंगवास किंवा जन्मठेप यापैकी एखादी शिक्षा भोगत, तुरुंगात खितपत पडलेला असेल.

त्याच्यासमोर एकच मार्ग होता. शहराच्या बाहेर पडणे. फ्लॅशड्राइव्हमधील

माहितीचा जी पूर्ण उपयोग करू शकतील अशाच माणसांच्या हातात तो फ्लॅशड्राइव्ह सोपवणार होता.

रिव्हर्स गिअर टाकत तो गाडी झरझर मागे नेऊ लागला. मागून येणाऱ्या गाड्या शिताफीने चुकवत तो जवळजवळ वीस मीटर मागे गेला व त्याने करकचून ब्रेक्स दाबले. चाके वळवून, अॅक्सिलरेटर दाबत त्याने बाजूच्या रस्त्यावर गाडी चढवली. पुढच्याच मिनिटाला चारही बाजूंनी सायरन वाजू लागले. त्याने आरशातून मागे पाहिले. आपल्या हातातल्या मशिनगन्स सरसावून काही सैनिक रस्त्यावर गुडघे टेकून बसले होते. गाडी उडवणे अगदीच सोपे होते. अंतर फक्त तीस मीटरचे होते. मध्ये काही अडथळाही नव्हता. पण एकही गोळी सुटली नाही. जशी काही गरजही नव्हती. ते शहर म्हणजे एक बंद पिंजरा होता.

जोनाथनने पुन्हा अॅक्सिलरेटवर पाय ठेवला. चढावरूनही गाडी सुसाट धावू लागली. टेकडीच्या माथ्यावरून तो डावीकडे वळला. दुतर्फा घरे आणि टुमदार बंगले दिसत होते. थोड्याच वेळात आपण त्यांच्या हाती लागणार आहोत हे त्याला कळत होते. पण त्यापूर्वी त्याला थोडा अवधी हवा होता. विचार करण्यासाठी. योजना आखण्यासाठी. डाव रचण्यासाठी. तो आता त्यांच्यापैकीच एक झाला होता. एम्माच्या टोळीचा सभासद. पक्का धंदेवाईक.

“थांब!” जिन्न ओरडला. “तू आपल्या दोघांनाही मारून टाकशील.”

जोनाथनने नजरेच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे पाहिले. “मला तुझी पर्वा वाटत नाहीये.”

पोलिसांची एक गाडी त्याच्या अगदी मागे आली होती. गाडी जास्त जवळ येत नव्हती, पण तिने एक बाजू अडवून धरली होती. रस्त्याच्या कोपऱ्यावर जोनाथनने गाडी वळवली. रस्ता खूपच अरुंद होता. एका वेळेस एकच गाडी जाऊ शकत होती. दोन्ही बाजूला उंच, डौलदार पाईन्सचे वृक्ष होते. तो आता परिषदेच्या अधिकृत क्षेत्राबाहेर पोहोचला होता. रस्त्यावर बर्फ साचलेलं होते. बर्फाचा कडा कोसळल्याने पुढचा रस्ता बंद झाला होता. जोनाथनने जोरात ब्रेक्स दाबले. गाडी दोन्ही बाजूला हेलकावे खात थांबली.

बाहेर निसटण्यासाठी जिन्न जोरजोरात दरवाजा ढकलू लागला. जोनाथनने गाडी आतून लॉक केली व जिन्नला एका हाताने बाजूला खेचत, त्याच्या सीटवर बसवले. “हलू नकोस.”

जोनाथन गाडी मागे आणतच होता; पण तेवढ्यात पोलिसांची व्हॅन येताना पाहून त्याने गाडी थांबवली. उजव्या बाजूला गवताचे कुरण होते. डावीकडे चढण होती. जोनाथनने चाके डावीकडे वळवली व तो गाडी वर चढवू लागला. दोन्ही बाजूंना लाकडी कुंपणे घातलेली होती. रस्ता मध्येच खाली वळत होता. पुढे सपाट झाला होता व शेवटी डोंगरामागे खाली उतरला होता, कुंपणावर आदळत गाडी डावीकडून उजवीकडे हेलकावत होती. पण विशेष म्हणजे त्याचा श्वास अतिशय संथ होता. छातीचे ठोकेही वाढलेले नव्हते. बर्फावरून गाडी चालवण्यात तो पटाईत होता. त्याने गाडीवर पूर्ण नियंत्रण राखले होते. हलक्या हाताने त्याने स्टिअरिंग धरले होते व वेग जराही न वाढवता तो सावधपणे पुढे जात होता.

“समोर बघ.” जिन्न ओरडला.

गाडीच्या अगदी समोरून, एक जोडपं आपल्या मुलांना बर्फावरून खाली घसरवत घेऊन चालले होते. जोनाथने ब्रेकवर पाय ठेवला, पण वेग कमी केला नाही. हॉर्नचा आवाज अचानक कानावर येताच ते कुटुंब घाबरून सैरावैरा पळू लागले. लहान मुलगा मात्र पळता पळता हळूच वळला व त्याने जोनाथनकडे बघून हसत हात हलवला.

जोनाथनने पुन्हा ब्रेक्स दाबले, पण त्यामुळे त्याचे गाडीवरचे नियंत्रण सुटू लागले. वेग कमी करायची ही पद्धत अगदी चुकीची होती. गाडी व त्या कुटुंबामधले अंतर कमीकमी होऊ लागले होते. दोघांमध्ये आता फक्त वीस मीटर अंतर होते. पंधरा, दहा. स्त्रीचा पाय घसरला व ती खाली पडली. तिचे तोंड उघडे पडले होते पण त्यातून आवाज फूटत नव्हता.

रस्त्याला उजवीकडे एक फाटा फुटला होता.

जोनाथनने चाक वळवले. मर्सिडिज रस्त्यावरून बाजूला घसरली. त्याने अॅक्सिलरेटर दाबला. चाकांनी पुन्हा पकड घेतली. पण क्षणभरच. समोर खोल उतार होता. पाईन वृक्षांच्या गडद सावल्यांमुळे काळोख पसरला होता. बर्फ कडक व टणक झाले होते. चाके पुन्हा घसरु लागली. त्याचे नियंत्रण सुटत गेले. गाडी उजवीकडे झुकत गेली व मग पंचेचाळीस अंशाच्या कोनातून डावीकडे झुकली व शेवटी डोंगराच्या खालच्या बाजूस कलली. आता गाडीने वेग पकडला होता.

जिन्न डोळे विस्फारून बसला होता. गाडीच्या छताला एक हात चिकटवून तो किंचाळत होता.

रस्त्याच्या टोकाला येऊन गाडी उडाली. एका मोठ्या खडकाला आपटून ती एखाद्या बिलियर्ड्सच्या बॉलसारखी इकडेतिकडे आपटू लागली. जोनाथनच्या डोळ्यासमोर अचानक एक झोपडी चमकून गेली. आजूबाजूच्या वस्तू, वास्तू वेगाने हलत होत्या. त्याने स्टिअरिंग घट्ट पकडले व जीव वाचवण्यासाठी तो धडपडू लागला. गाडीचा मागचा भाग कशावर तरी जोरात आदळला व अचानक गाडी अगदी अलगद जाऊ लागली. सगळे आवाज विरून गेले होते. जोनाथनच्या लक्षात आले की गाडी हवेत उडालेली आहे. गाडी पुन्हा जमिनीवर आदळली व गाडीचे छप्पर उंचावल्यासारखे वाटले. सूर्याचा प्रकाश सहन न झाल्याने, त्याने डोळे मिचकावले. गाडी पुन्हा एकदा वर उडून खाली आपटली, मग बाजूला कलंडली व दोन-तीन कोलांटया मारत साफ उलटी झाली.

जिन्न बेशुद्ध पडला होता. त्याचे डोळे मिटलेले होते. दात ओठात घुसून रक्त येऊ लागले होते. जोनाथनने दरवाजा जोर देऊन उघडला व स्वत:ला जमिनीवर झोकून दिले. त्याच्या कानात दडे बसले होते व डावा हात बधिर झाला होता. तो थरथरत कसाबसा गुडघ्यांवर बसला. मर्सिडिज कड्यावरून खाली एका शेतात कोसळली होती. पोलिसांच्या गाड्या सायरन वाजवत त्याच्याच दिशेने येत होत्या. वरच्या बाजूला असलेल्या जंगलातून गाड्यांचे निळे दिवे चमकताना दिसत होते. त्याने पापण्यांची उघडझाप केली. एकाच्या जागी आपल्याला तर दोन-दोन वस्तू दिसताहेत हे त्याला जाणवले. डोके सुन्न होऊन गेल्याचेच ते लक्षण होते. त्याने डोळे तिरळे केले व त्याला पुन्हा स्वच्छ दिसू लागले.

तो डोंगरावरून खाली वाकून पाहू लागला. दुकाने व इमारतींच्या मागे त्याला

डॅव्हॉस्ट्रॅस्सेच्या शिखराचे ओझरते दर्शन झाले. उठून उभा राहत तो दुकानांच्या दिशेने अडखळत जाऊ लागला. त्या सुन्न, बधिर अवस्थेत असतानाही त्याला फ्लॅशड्राइव्हची आठवण झाली.

त्याने खिसा चाचपला. हाताला ड्राइव्ह लागताच त्याने एक सुस्कारा सोडला.

पाठीला अचानक गरम हवेचा चटका लागला व तो हवेत उडाला. स्फोटाचा धडाकाच जबरदस्त होता. खाली येत तो पोटावर पालथा पडला. त्याचे डोके बर्फात पुरले गेले होते. हाताच्या कोपरांवर जोर देत त्याने डोके वर उचलले. मर्सिडिजला ज्वाळांनी घेरले होते. खिडक्यांची राख झाली होती.

काय घडलेय ह्याचा जोनाथनला अंदाज येत नव्हता. डिझेलची टाकी फुटली होती की, आणखी काय झाले होते हे त्याला समजेना. तेवढ्यात पेटणाऱ्या गाडीच्या मागे डोंगराच्या कडेवर एक पोलीस जीप वेगाने येऊन थांबली. एक माणूस उडी मारत खाली उतरला.

“डॉक्टर रॅन्सम!” तो ओरडला. “जागेवरून हलू नकोस. तुला आता पळायला जागा उरलेली नाही.”

तो अस्कोनाचा पोलीस ऑफिसर होता. थोड्या वेळापूर्वीच त्याला तो रस्त्यावर दिसला होता.

जोनाथन पळू लागला.

६९

व्हॉन डॅनिकनने डोंगर उतरायला सुरुवात केली. गुडघाभर उंचीच्या बर्फात त्याचे चामड्याचे बूट रुतत होते. नकळत त्याचा हात कमरेवर लटकवलेल्या पिस्तुलावर गेला, पण त्याने तो लगेच काढून घेतला. तीस वर्षांच्या नोकरीत त्याच्यावर एकदाही पिस्तूल चालवण्यासाठी वेळ आलेली नव्हती. आजही ते चालवण्याचे त्याला काहीच कारण दिसत नव्हते.

मागून गाडीचा आवाज आला. त्याने वळून पाहिले. आणखी एक पोलीस व्हॅन येऊन उभी राहिली. त्यामधून साध्या वेषातले अनेक पोलीस भराभर खाली उतरले. त्यापैकी एकालाही त्याने ओळखले नाही. ते सर्व राज्य दलाचे पोलीस होते.

त्याने मायरला हाक मारली. "डॅव्होस्ट्रेस्सेच्या पोलीस स्टेशनला फोन लाव. त्याना सांग, पोलिसांचं एक मोठं कडं उभं करून ठेवा. कोणत्याही परिस्थितीत रॅन्सम मुख्य रस्त्यावर पोहोचता कामा नये."

"चीफ इन्स्पेक्टर व्हॉन डॅनिकन," मागून आवाज आला.

व्हॉन डॅनिकनने मागे पाहिले. तो आवाज... त्यांच्या ओळखीचा होता. त्याने सर्वांकडे पुन्हा एकदा पाहिले. सगळे चेहरे मात्र अनोळखी होते.

"आहेस तिथेच उभा राहा." ओळखीचा आवाज पुन्हा ऐकू आला. "आमच्याजवळ तुझ्या अटकेचं वॉरंट आहे."

डॅनिकनच्या मनात गोंधळ उडाला. हे वाक्य तर इतकी वर्षे मी उच्चारत आलोय. आवाजाच्या दिशेला त्याची नजर गेली. एक धूसर आकृती हळूहळू पुढे येत होती. कृश, सडपातळ. मानेवर लाल केस रुळत होते. वयाला न शोभणारे.

"विदेशी गुप्तहेरखात्याला फितूर झाल्याचा तुझ्यावर आरोप आहे." अल्फॉन्स मार्टी डोंगराच्या टोकावर उभा राहून बोलत होता. "मार्क्स, तू स्वतःहून आपल्या गाडीकडे परत ये. मला माझ्या माणसांना पाठवायला लावू नकोस."

व्हॉन डॅनिकनने त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. बर्फ तुडवत, तो तसाच पुढे जाऊ लागला. माझ्या अटकेचे वॉरंट? किती मूर्खपणा आहे. पण मनातल्या मनात तो ही गोष्ट घडायची जणू वाटच बघत होता. ती गोष्ट काही त्याला आज सकाळी टोबी टिंगेलीकडून प्रथम समजलेली नव्हती. तरीही त्याने टिंगेलीबरोबर सौदा पूर्ण करून टाकला होता. दोन दिवसांपूर्वी जेव्हा ड्रोनचा शोध घेण्यासाठी पोलिसांची कुमक पाठवायला मार्टीने नकार दिला होता, तेव्हाच ही गोष्ट त्याला कळून चुकली होती.

त्याने कुर्ट मायरकडे पाहिले, पण मायरलाही ते पकडून माघारी नेत होते.

"तू माझ्यावर हेरगिरी केल्याचा आरोप करतोयस?" व्हॉन डॅनिकनने विचारलं.

"आरोप करण्याची जबाबदारी मी कायद्यावर सोपवतो. माझं काम फक्त कायद्याची

अंमलबजावणी करण्याचं आहे.”

व्हॉन डॅनिकनची नजर रॅन्समपासून मार्टीपर्यंत फिरत गेली. मार्टीची माणसे, त्याच्या दिशेने येऊ लागली होती. त्यातल्या एकाने तर त्याच्यावर बंदूक रोखली होती. अमेरिकन माणूस विरुद्ध दिशेला पळून चालला होता. “तू त्याला सोडून देतोयस? इतके दिवस आपण त्याच्याच मागे होतो.”

“मार्क्स, आज तू आमचा नंबर एक शत्रू आहेस.”

एव्हाना बरीच गर्दी जमा झाली होती. जळणाऱ्या गाडीभोवती सर्व गोळा झाले होते. एकाजवळ तर पाण्याचे नळकांडेही होते. रॅन्सम त्या गर्दीत घुसून, पाहता पाहता पसार झाला.

व्हॉन डॅनिकन वेगाने त्या जमावाच्या दिशेने धावत सुटला. “रॅन्सम,” तो ओरडत होता. “पळून जाण्याचा प्रयत्न करू नकोस.”

सैनिक व पोलिसांची संख्या वाढत होती. शेताच्या पश्चिमेकडून दहा-बारा गणवेशधारी पोलीस येताना दिसले. व्हॉन डॅनिकनने हात हलवून त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. “तो बघा, तो पळून चाललाय.” तो जोरात ओरडला. “त्याने काळा सूट घातलाय.”

पोलिसांच्या नजरा डॅनिकनवरून मार्टीकडे वळत होत्या. मार्टीला प्रत्येक जण ओळखत होता. अखेर तो फेडरल कौन्सिलचा सभासद होता. आज तो राष्ट्रीय पातळीवरचा महत्त्वाचा नेता होता. त्याच्या आज्ञेचा ते अवमान करू शकत नव्हते.

मार्टीने पुन्हा फर्मान सोडले. रेडिओवरून ते सर्वांना ऐकवण्यात आले. पोलिसांनी रॅन्समकडे दुर्लक्ष करत, आपला मोर्चा डॅनिकनकडे वळवला. आता मात्र डॅनिकनचे सारे अवसान गळाले. गुडघ्यांवर हात टेकत तो खाली वाकला. देशाचा सर्वोच्च पोलीस अधिकारी एखाद्या सामान्य गुन्हेगारासारखा हतबल झाला होता. पोलिसांनी त्याला घेरले होते. “ठीक आहे.” तो धापा टाकत म्हणाला. “फक्त एक मिनिट थांबा.”

मार्क्स व्हॉन डॅनिकन ताठ उभा राहिला व त्याने दूरवर एक दृष्टिक्षेप टाकला. क्षणभर त्याला एक अस्पष्ट काळी आकृती दिसली. क्षणार्धात ती गुप्त झाली.

रॅन्सम निसटला होता.

७०

जोनाथन झाडांच्या सावल्यांमधून सावधपणे खाली जात होता. कधी काळोखी आडोसा पकडून तर कधी बंद दरवाजाच्या मागून, चिंब ओल्या दरीमधून तर कधी निर्मनुष्य अरुंद गल्लीतून तो लपतछपत पुढे सरकत होता. स्फोटाच्या त्या दणक्यामुळे त्याचे कपाळ ठणकत होते. आपल्या एक-दोन बरगड्या नक्कीच सुजलेल्या असणार हे त्याला आतून जाणवत होते. अजूनही तो पकडला गेला नव्हता. स्वातंत्र्यासारखे दुसरे उत्साहवर्धक पेय असूच शकत नाही. त्याच्या डोळ्यासमोर एकच ध्येय होते— शहराच्या बाहेर पडायचे.

काळा बर्फ साचलेला एक निसरडा रस्ता त्याने पकडला. सैनिक किंवा पोलीस दिसला नाही असे मिनिटभरसुद्धा घडत नव्हते. पण ते सर्व डोंगराच्या वर उभे होते.

तो आता बराच पुढे आला होता. त्याने बरीच घरे, गॅरेजेस व दुकाने मागे टाकली होती. साधेसरळ चालणे तर शक्यच नव्हते. त्याचे एक मन त्याला बेबंद, सुसाट पळायला सांगत होते तर दुसरे मन त्याला एका काळोख्या गुहेत लपून बसायला सुचवत होते. त्याहून वाईट गोष्ट म्हणजे, एकसारखे मागे वळून पाहायची त्याला अनावर इच्छा होत होती. आपला कुणीतरी पाठलाग करतेय असा त्याला सतत धसका लागलेला होता. पण मागे वळून पाहिले तर तिथे चिटपाखरुही नसायचे.

रस्ता ओलांडून त्याने चढणीचा रस्ता धरला. छोट्या छोट्या झोपड्यांमधून तो रस्ता वर गेलेला होता. डोंगराच्या पायथ्याशी मात्र तो रस्ता रुंद झाला होता. डावीकडे आईस-हॉकी खेळायचे मैदान होते. उजवीकडे आणखी एक रस्ता फूटत होता व तो सरळ स्टेशनपर्यंत जात होता. रुळांच्या बाजूला पोलिसांचा सक्त पहारा असणार. त्याला आगगाडीने जाणे अशक्य होते.

कसे आणि कुठून जायचे ह्या विचारात तो पडला होता. गर्दीच्या रस्त्याने जाणे म्हणजे पोलिसांच्या हातात सापडण्याची शक्यता जास्त. काय करावे त्याला सुचेना. त्याला थोडा वेळ शांतता हवी होती. त्याला शांतपणे विचार करायचा होता. पलीकडच्या बाजूला उतरती छपरे असलेल्या लाकडाच्या छोट्या छोट्या झोपड्यांची एक लांबलचक रांग त्याला दिसली. कुंपणावरून उडी मारून तो पलीकडे गेला. गाईच्या शेणाचा वास त्याच्या नाकात भरला. तो गोठा होता. झोपडीच्या मागच्या बाजूने तो जाऊ लागला.

तो अचानक थांबला.

त्याला पुन्हा तेच जाणवले. पाठीमागून पावलांचा दबका आवाज. आता मात्र त्याची पक्की खात्री पटली की कुणीतरी आपला पाठलाग करतंय.

भिंतीला पाठ टेकवून त्याने हळूच मान तिरपी करत बाजूला पाहिले. त्याला कुणीही दिसले नाही. लाकडाच्या खांबावर डोके ठेवून तो स्वत:ला शांत करण्याचा प्रयत्न करू लागला. त्याने खिशातून फ्लॅशड्राइव्ह काढला. तीच त्याच्या मुक्तीची चावी होती. एक प्रश्न मात्र अजून अनुत्तरितच होता. मुख्य कुलपाची चावी कुणाकडे आहे? ह्या सर्वांचा

सूत्रधार कोण?

तो हळूहळू भानावर आला. पुढची पावले कशी उचलायची याचा तो शांतपणे विचार करू लागला. त्याला एखादी निवांत जागा शोधून काही वेळ घालवावा लागणार होता. काळोख पडेपर्यंत वाट पाहावी लागणार होती. त्यानंतर तो पर्वत चढायला सुरुवात करणार होता. आर्थिक परिषदेमधली सर्व महत्त्वाची भाषणे, संध्याकाळी सहानंतर सुरू होणार होती. शहरात आलेल्या सर्व पाहुणेमंडळींचा मुक्काम त्यावेळेस काँग्रेस हाऊसवर असणार. त्यामुळे शहर काहीसे शांत, निवांत झालेले असेल व रस्त्यावरचा पोलीस पहाराही बऱ्याच प्रमाणात हटवला जाईल अशी त्याची अपेक्षा होती. एकदा का त्याने शहराची मुख्य वस्ती पार केली की पुढचा मार्ग तसा निर्धोक होता. वेशीवरची भिंत दोन मीटर उंचीची होती. तो अडथळा पार करायला त्याला जास्तीतजास्त दहा सेकंद लागतील. डोंगराच्या बाजूने चालत गेल्यावर, त्याला दरी चुकवणे सहज शक्य होते. सकाळपर्यंत त्याने लँडक्वॉर्ट गाठलेले असेल. तिथूनच तर ह्या साऱ्याला सुरुवात झाली होती. लँड क्वॉर्टवरून तो आगगाडीने झुरिचला जाणार होता.

अचानक त्याच्या सर्व संवेदना गोठून गेल्या. कुणीतरी नजर रोखून उभे होते.

तो उजवीकडे वळला आणि त्याला दिसले की एक, त्याच्यापेक्षा बऱ्यापैकी बुटका असलेला इसम अगदी त्याच्यासमोर उभा आहे. त्याच्या अंगात गिर्यारोहकाचा वेष असला तरी तो गिर्यारोहक नव्हता हे त्याच्या चटकन लक्षात आले. त्याचे रोखलेले त्याचे काळेभोर डोळे जणू जोनाथनकडून कबुलीजबाब मागत होते. जोनाथनने त्याला ओळखले. आगगाडीत, त्याच इसमाने त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता.

त्याच्याशी दोन हात करण्यात काहीच अर्थ नाही हे जोनाथनने ताडले. गेल्या काही दिवसांत त्याने दोन वेळा तसा प्रयत्न केला होता व प्रत्येक खेपेस तो जबर जखमी झाला होता.

त्याने पळायला सुरुवात केली.

गोठ्यांची रांग संपवून तो टोकाला आला. पुढे एक कच्चा रस्ता सुरू झाला होता. तो अक्षरशः जीव घेऊन पळू लागला. शंभर मीटरवर रस्त्याला दोन फाटे फुटले होते. त्याने डोंगरावर जाणारा रस्ता पकडला. आता त्याला डॅव्होस्ट्रॅस्सेच्या रस्त्यावरची माणसांची गर्दी व वेगाने जाणाऱ्या भरधाव गाड्या दिसू लागल्या. त्याने मागे वळून पाहिले. रस्ता मोकळा होता. खुनी गुप्त झाला होता. तो पळायचा थांबला व शांतपणे चालू लागला.

एका चौकामध्ये पोलिसांच्या दोन गाड्या उभ्या होत्या. त्या पलीकडे तारेचे कुंपण होते. ग्रीन झोनमधून रेड झोनमध्ये जाण्याची ती जागा होती. मध्यभागी पोलीस नाका होता.

बाजूलाच एका बिअर बनवणाऱ्या कंपनीचे गोदाम होते. जोनाथन गोदामाच्या मागच्या बाजूने आत शिरला. बिअरचे क्रेट्स एकावर एक अगदी वरपर्यंत ठेवलेले होते. क्रेट्सच्या रांगांमधून तो सापासारखा सरपटत पुढे जाऊ लागला. पण समोर रस्ता बंद झाला होता. जाण्यासाठी मार्गच न उरल्यावर त्याने बाजूचा एक क्रेट सरकवला व मोकळ्या जागेत तो बसून राहिला. निदान त्या क्षणी तरी तो सुरक्षित होता.

अंगाभोवती कोट गुंडाळून घेत त्याने स्वतःला आणखी लपवले आणि आता समोर उरलेल्या पर्यायांवर विचार करण्यास सुरुवात केली. विचार करायला फारशी जागाच

नव्हती. आता तो काळोख होईपर्यंत वाट पाहू शकत नव्हता. जर त्या खुन्याने त्याला एकदा शोधून काढले होते तर तो पुन्हा त्याला सहज शोधू शकत होता. लपून राहणे हा पर्याय नव्हता. थंडीमध्ये तो कुडकुडू लागला.

काळोख होईपर्यंत वाट बघायची... की भाषणं सुरू होईपर्यंत...

त्याला अचानक आठवले. आजच्या परिषदेत, तिसऱ्या जगातील भ्रष्टाचार ह्या विषयावर पॉल नॉयरेट भाषण देणार होता. पॉल येणार म्हणजे त्याच्याबरोबर सिमॉन नक्कीच असणार होती.

त्याने एका बाजूला किंचित वळत, खिशातून ब्लिट्झचा मोबाइल फोन बाहेर काढला व सिमॉनला फोन लावला.

"हॅलो."

"सिमॉन," त्याला दम लागला होता. "जोनाथन बोलतोय."

"जोनां. अरे आहेस कुठे तू?"

"मी डॅव्होसमध्ये आहे. मी पार अडकलोय. तू कुठे आहेस?"

"मी कुठे असणार? इथेच आहे. पॉलबरोबर. पण तू सुरक्षित आहेस ना?"

"ह्या क्षणी आहे. पण मला इथून बाहेर पडायचंय."

"का? काय झालंय? तू घाबरल्यासारखा दिसतोयस."

"तुला बेल्व्हेडेअरच्या हॉटेलमधून धुराचे लोट दिसताहेत का?"

"हो. आमच्या खोलीतून अगदी स्पष्ट दिसतोय. तुला त्या आवाजाचा धडाका ऐकू आला होता? पॉल आणि मला तर तो बॉम्बचाच आवाज वाटला. पॉल आता मला कुठेही बाहेर सोडायला तयार नाहीये."

"कदाचित बॉम्ब असूही शकेल."

स्फोटाबद्दल विचार करता करता त्याच्या लक्षात आले की, डिझेलची टाकी फूटण्याचे काहीच कारण नव्हते. आणि टाकी फूटून एवढा आवाज झाला नसता. तो स्फोट कितीतरी पटीने मोठा होता. तोफेतून गोळा सुटल्यासारखे वाटले होते. याचा अर्थ गाडी उडवून टाकायचे हे आधीच ठरलेले असणार. त्यांनी तो बॉम्ब कुठे ठेवला होता, पोलिसांनाही तो कसा सापडू शकला नाही ह्याचे त्याला आश्चर्य वाटले. त्याच्या एवढेच लक्षात आले होते की, स्फोटामुळे गाडीचे इंजीन आकाशात भिरकावले गेले होते व जळून खाक झालेल्या तंबूसारखी गाडीची अवस्था झाली होती.

"म्हणजे? तुला त्या बॉम्बस्फोटाबद्दल काही माहिती आहे?" सीमॉनने विचारलं.

"गाडी भस्मसात होण्याआधी तीस सेकंद, मी त्या गाडीच्या आत होतो. हे बघ सीमॉन, मला तुझी मदत हवीय. पॉल गाडी घेऊन आलाय?"

"हो, पण–"

"फक्त ऐक. जर तुला शक्य नसेल तर स्पष्ट सांग. तो हळू आवाजात बोलायचा प्रयत्न करत होता. "तूच मला ह्या शहराबाहेर काढू शकतेस. मला तू झुरिचपर्यंत पोहोचव. जर तू आत्ताच्या आत्ता निघालीस तर पॉलच्या भाषणापर्यंत परत येऊ शकशील."

"मी त्याला काय सांगू?"

“त्याला सत्य सांगून टाक.”

“पण मला तरी सत्य कुठे ठाऊक आहे?”

“मी तुला गाडीत सर्व सांगेन.”

“जॉन, तू मला अवघड परिस्थितीत टाकतोयस. हा देश सोडून जा असं मी तुला अनेकदा सांगितलं होतं.”

“मला अमेरिकन दूतावासात पोहोचायचय. तिथल्या माणसांशी भेट झाली की मी लगेच हा देश सोडणार आहे.”

“अमेरिकन दूतावास? पण का? ते तुला उलट स्विस पोलिसांच्या ताब्यात देतील.”

“कदाचित देतील. कदाचित नाहीसुद्धा देणार. माझ्याकडे असं काहीतरी आहे की, जिच्या जोरावर मी माझ्यासाठी आणखी थोडा अवधी नक्कीच मिळवू शकतो.”

“ते काय आहे? तुला हवा होता तो पुरावा अखेर सापडला का?”

“ते महत्त्वाचं नाही.” त्याने तिचे बोलणे तोडले. त्याची सहनशक्ती संपत चालली होती. “तू येणार आहेस की नाही?”

“मी पॉलला नाही सांगू शकत. तो मला जाऊ देणार नाही.”

“आत्ता तो कुठे आहे?”

“त्याच्या सहकाऱ्यांबरोबर. भाषणाची तयारी करतोय.”

“एम्मासाठी तरी हो म्हण.”

“तू कुठे आहेस?”

“तू डॅव्होसस्ट्रॅस्सेला ये. टुरिस्ट ऑफिसजवळ आलीस की डावीकडे वळ आणि डोंगराच्या पायथ्याशी ये. रस्त्याच्या बाजूला एक गोदाम दिसेल. बाहेर एक ट्रॅक्टर उभा आहे. मी तिथे तुझी वाट पाहातो.”

सीमॉन क्षणभर घोटाळली. “ठीक आहे. मला पाच मिनिटं दे.”

ठरल्याप्रमाणे गोदामाच्या बाजूला एक चंदेरी रेनॉल्ट येऊन उभी राहिली. सीमॉनने गाडीच्या काचा खाली केल्या. “जोनाथन,” तिने हाक मारली. “तू कुठे आहेस?”

जोनाथन काही सेकंद थांबला. तिच्यामागून कुणी येतेय का हे तो पाहत होता. त्याला एकही गाडी दिसली नाही. तरीही तो आणखी थांबून राहिला. तो खुनी जवळपास असणार ह्याची त्याला खात्री होती.

अखेर तो गोदामाच्या मागच्या बाजूने रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला आला “गाडीची डिकी उघड.” मागच्या खिडकीवर हलकेच थाप मारत तो म्हणाला.

सीमॉन दचकली.

“लवकर.” तो म्हणाला. “कुणीतरी पाठलाग करतंय.”

“कोण आहे? कुठे? तुला तो दिसतोय?”

“नक्की ठाऊक नाही. पण तो जवळपास आहे.”

“स्फोट झाला तेव्हा गाडीत एक इराणचा मंत्री होता असं सगळीकडे बोललं जातंय. आज संध्याकाळी त्याचं मुख्य भाषण होतं.”

जोनाथनने मान डोलावली. “डिकी उघड.” तो म्हणाला.

“मी नक्की किती धोका पत्करतेय ते मला जरा समजावून सांग.”

“मी चुकीच्या वेळी, चुकीच्या ठिकाणी होतो. चल, आता चल लवकर.” सीमॉनला पटले असावे. तिने त्याला गाडीत यायचा इशारा केला.

“लँडक्वॉर्टला गाडी थांबव. आणि मला बाहेर काढ.” तो म्हणाला. “तिथे मी तुझ्याशी सविस्तर बोलतो.”

तो डिकीच्या आत बसला व डिकी बंद करून घेतली.

७१

“तो माझ्या ताब्यात आहे.” सीमॉन नॉयरेट शांतपणे आपल्या सेलफोनवरून बोलत होती. “हो. मी ठरल्याप्रमाणे येतेय.”

तिने फोन बंद केला. मग गाडीतल्या रेडिओचा आवाज कमी केला व मान तिरपी करत मागे कटाक्ष टाकला. “तू ठीक आहेस ना?” तिने विचारले. “माझा आवाज ऐकू येतोय?”

थोडीशी अस्पष्ट खरखर आणि आतून डिकीवर मारलेले एक-दोन बुक्के, एवढाच आवाज तिच्या कानी पडला. तो थोडासा गुदमरला असेल, पण तिथे श्वास घेण्याएवढी हवा नक्कीच होती आणि तिला त्याच्या जिवाची कुठे पर्वा होती. ती जोनाथनला थोडीच सुखरूप सोडणार होती.

‘डिव्हिजनला’ आपल्या मोहिमेत यश मिळूनही यासाठी गेली दोन वर्षे सीमॉन नॉयरेटचे प्रयत्न सातत्याने सुरू होते. आपण देशद्रोह करतोय हा विचार जरा विचित्रच होता. पण जगसुद्धा आता तितकेच विचित्र होत चालले होते. आता तर एखाद्या छोट्या संघटनेत असते तशी देशादेशांमध्ये कडवी दुश्मनी दिसू लागली होती.

तिचा जन्म न्यूयॉर्क, क्विन्समधल्या एका कुटुंबात झाला होता. आई फ्रेंच अल्जेरियन होती व वडील इजिप्शियन होते. घरात हलाखीचे दारिद्र्य. पैशाची चणचण ही बालपणीची एकमेव आठवण. आईवडलांची पैशावरून सतत भांडणे चालायची. तिचे वडील हे पक्के कवडीचुंबक होते. त्यांच्या बंद मुठीतून दहा डॉलर्स पटकावायचे म्हणजे तिला घाम गाळावा लागत असे. भावाच्या पावलावर पाऊल ठेवून तीही सैन्यात भरती झाली. तिच्या सफाईदार वक्तृत्वामुळे तिची बदली हेरखात्यात करण्यात आली. फ्रेंच, अरबी व इंग्लिशच्या जोडीने तिला फारसी भाषाही अवगत होती. मग तिला हाऊचुका, अरिझोना व मॉंटेरीच्या सैनिक शाळेत प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले. तिची पहिली नेमणूक जर्मनीला करण्यात आली. जर्मनीहून जेव्हा ती परतली तेव्हा तिने ई-५ ही पातळी गाठली होती व गाठीला बऱ्यापैकी पैसेही जमा केले होते.

महिन्यानंतर तिला एक फोन कॉल आला होता. CIA च्या प्रतिनिधीशी भेट घेण्यासाठी तिला मॅनहटनला येण्यास सांगितले. CIA च्या कार्यकारी संचालक मंडळाने तिच्या लष्करातील कारकिर्दीवर बारीक नजर ठेवलेली होती. त्या प्रतिनिधीने तिला सर्व गोष्टी स्पष्ट करून सांगितल्या. तिला परदेशात काम करावे लागणार होते. अस्सल हेरगिरी. चित्रपटात दाखवतात तशी नव्हे, खरीखुरी. प्रथम तिने विलियम्सबर्ग, व्हर्जिनियाला सीआयएच्या खास प्रशिक्षण केंद्रात दाखल व्हायचे. तिथे जर ती उत्तीर्ण झाली तर तिला गुप्तसंघटकाचे अधिक विशेष शिक्षण देण्यात येणार होते. प्रतिनिधीला तिच्याकडून चोवीस तासात उत्तर हवे होते. सीमॉनने तिथल्या तिथेच होकार देऊन टाकला.

ती अकरा वर्षांपूर्वीची गोष्ट होती.

उपकार्यकारी संचालक, अॅडमिरल लॅफेव्हरने ऑस्टिनच्या 'डिव्हिजन' संघटनेविरुद्ध काम करण्यासाठी तिला बोलावून घेतले. अशी संधी कुणीही नाकारली नसती आणि तिला तर नवनवीन आव्हाने स्वीकारण्यात मनापासून रस होता. तिच्या CIA मधील कामाची सर्व रेकॉर्ड पुसून टाकण्यात आली. फिरतीवर नेमणूक केलेली शिक्षिका असा तिला कागदोपत्री हुद्दा देण्यात आला. स्थलांतरित युरोपियन कुटुंबातील मुलांना वेगवेगळ्या देशातील अमेरिकन शाळेत जाऊन ती शिकवणार होती. तिच्या नवऱ्याची जागतिक बँकेतली नोकरी, हे तिच्यासाठी सुरक्षित कवच होते.

एम्मा बैरुतला येण्याआधी महिनाभर, सीमॉन तिथे आधी पोहोचली होती. तिच्याबरोबर मैत्री जोडण्यासाठी तिने एम्माची सोय डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्सच्या क्वार्टर्समध्ये केली होती. त्या दोघींची मैत्री जमणे अगदी साहजिकच होते. बऱ्याच बाबतीत दोघींमध्ये खूप साम्य होते. एकाच घरटयातल्या त्या दोन पक्षिणी होत्या. लवकरच त्या रोजच्या रोज एकमेंकीना भेटू लागल्या.

त्या संपूर्ण काळात, सीमॉन तिला नीट जोखत होती.

तिने हळूहळू एम्माच्या सर्व साथीदारांची नावे मिळवली होती. फक्त तिला हॉस्पिटलवरचा बॉम्बहल्ला रोखता आला नव्हता. लेबॅनिझ पंतप्रधानांच्या खुनाची चौकशी ज्याच्यावर सोपवली होती असा एक पोलीस अधिकारी त्यात मारला गेला होता.

जिनिव्हामध्येही सिमॉनने आपले काम सुरू ठेवले होते. थिओ लॅमर्स हा एम्माच्या कंपूतला माणूस आहे हे तिला महिनाभरापूर्वी समजले होते. तिने लगेच ही खबर लॅफेव्हर पोहोचवली होती व ह्या वेळेस कठोर निर्णय घ्यायला, लॅफेव्हर कचरला नव्हता. ह्या सर्व प्रकरणात रक्तपात होणार ह्याचा तिला अंदाज होता. तिच्या आधीच्या मोहिमेतही असे प्रकार घडले होते. लॅफेव्हरनेच एम्माचाही खून केला असावा असे तिचे एक मन सांगत होते.

वाटेत तिला दोन पोलीस नाक्यांवर थांबावे लागले होते. प्रत्येक वेळेस तिने आपले ओळखपत्र दाखवले होते. प्रत्येक वेळी तिने इन्स्पेक्टरच्या डोळ्यात रोखून पाहिले होते. तिच्या नजरेत दरारा होता. दोन्ही वेळेस तिला सहज पुढे जाऊ देण्यात आले होते.

हायवे संपल्यावर लँडक्वॉर्टवरून झुरिचला जाण्यासाठी उजवीकडे वळणे आवश्यक होते. पण तिने गाडी पूर्वेला वळवली. समोर एक खोल दरी दिसत होती. त्या रस्त्यावर असंख्य वळणे होती. आपण कुठल्या दिशेने चाललो आहोत ह्याचा जोनाथनला अंदाज लागू नये हा तिचा उद्देश होता. जरी त्याला दिशा समजली असती तरी काहीच फरक पडणार नव्हता. डिकी कुलुपबंद होती.

तो आता कुठेच जाऊ शकत नव्हता.

बिच्चारे कोकरू.

७२

अल्फॉन्स मार्टी एखाद्या विजयी वीरासारखा हात मागे ठेवून डोंगराच्या टोकावर अगदी रुबाबात उभा होता. “तुला काय वाटलं, CIA ला कोण माहिती पुरवतंय हे मी शोधून काढू शकणार नाही? अमेरिकनांना रंगेहाथ पकडण्यासाठी मी जिवाचं रान करतोय ही गोष्ट तुला ठाऊक होती. त्यांनी पकडलेल्या संशयितांना त्यांच्या गुप्त तुरुंगात घेऊन जाण्यासाठी ते गेली कित्येक वर्षं आपल्या हवाईमार्गाचा राजरोस वापर करत होते. निरुपद्रवी, निरपराध लोकांना पकडायचं आणि त्यांच्या जिवाशी खेळ खेळायचा, ह्या त्यांच्या उद्दामपणाचा मला उबग आला होता.”

“तुला ते कधीपासून निरुपद्रवी व निरपराध वाटू लागले?” व्हॉन डॅनिकनने विचारले. “अमेरिकेने बरेच हल्ले रोखलेले आहेत. त्यांचा हेतू सफल होतोय.”

“ह्याच भ्रमात तर त्यांनी सर्व जगाला ठेवून दिलंय. इतकं मोठं आणि बलशाली राष्ट्र असूनसुद्धा स्वत:च्या बाबतीत मात्र ते सर्व नियम धाब्यावर बसवायला जराही कचरत नाहीत. ह्याखेपेस आपण त्यांना पकडलं होतं. गॅसन विमानात होता. स्वित्झर्लंड हे नैतिक मूल्यांवर चालणारं राष्ट्र आहे हे सर्व जगाला दाखवून देण्याची सुवर्णसंधी आपल्याला मिळाली होती.”

“तुला काय म्हणायचंय? दहशतीविरुद्ध पुकारलेल्या युद्धात आपण खोडा घालायचा?”

“दहशतीविरुद्ध युद्ध? या उक्तीचा मी किती तिरस्कार करतो याची कदाचित तुला कल्पनाही नसेल. नाही, मी सामान्य माणसाच्या हक्काविषयी, प्रामाणिकपणाविषयी आणि प्रतिष्ठेविषयी बोलत होतो. लोकशाहीचे पहिले पुरस्कर्ते म्हणून आपल्याकडे पाहिलं जाते. आपली मुख्य जबाबदारी ती आहे असं मला वाटते. तुला नाही तसं वाटतं?”

व्हॉन डॅनिकनला मार्टीच्या बोलण्याची शिसारी आली. “त्या नीतिमूल्यांची आज कुणी पर्वा करतंय यावर विश्वास ठेवण्याचा ढोंगीपणा निदान मी तरी करणार नाही. मला फक्त एवढंच ठाऊक आहे की, आपल्या राष्ट्रावर हल्ला करण्याचा कट रचला जातोय ही गोष्ट गॅसनने CIA जवळ कबूल केल्यामुळे उघडकीस आली.”

“त्याचं पुढे काय झालं? ड्रोनचा शोध तुला लागतोय?”

“जवळजवळ लागलाय.”

त्याच्या उत्तराने मार्टी चकित झाला. “ओह्?”

“काल रात्री झुरिचच्या रस्त्यांवर बसवलेल्या एका कॅमेऱ्याने ड्रोन वाहून नेणाऱ्या एका व्हॅनचा फोटो टिपलेला आहे. ह्या क्षणाला झुरिच विमानतळाच्या परिसरातील वस्तींमध्ये फिरून कुणाला त्या ड्रोनचा सुगावा लागलाय का हे तपासण्यासाठी मी पोलीस अधिकाऱ्यांना तिथे पाठवलंय.”

“ही गोष्ट माझ्या आज्ञेविरुद्ध आहे.”

“अगदी बरोबर.” व्हॉन डॅनिकन. “खरं तर दोन दिवसांपूर्वीच मी तुझी आज्ञा झुगारून द्यायला हवी होती. तू काहीतरी डाव खेळतोयस ह्याचा त्याच वेळी मला अंदाज आला होता, पण तू इतक्या नीच पातळीवर जाऊन देशद्रोह करत असशील ह्याची मात्र मला त्या वेळी कल्पना नव्हती.”

“मी देशद्रोही?” मार्टी रागाने लालबुंद झाला होता. “CIA शी मी संधान बांधलं नव्हतं.”

“छे. छे.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “तू तर त्याहूनही भयानक कृत्य करायला धजावलास.”

“मला वाटतं, माझ्या हातात संपूर्ण पुरावा आहे. मार्क्स, तू आता संपलेला आहेस. तू माझा जाणीवपूर्वक विश्वासघात केलास. तू एका विदेशी सरकारला गुप्त माहिती पुरवलीस. पिस्तूल काढून माझ्या माणसांच्या हातात दे.” फेडरल सुरक्षा काढून दलातील अधिकारी तत्काळ मार्टीच्या संरक्षणासाठी त्याच्या दोन्ही बाजूंना जाऊन उभे राहिले. मार्टी त्यापैकी एका अधिकाऱ्याकडे वळला. “त्याला बेड्या ठोका. तो पळून जाण्याचा प्रयत्न करेल.” त्याने वळून व्हॉन डॅनिकनकडे पाहिले. “अरे तू तुझ्या त्या मित्राला, पालुंबोला फोन का करत नाहीस? बघ, कदाचित ह्या चिखलामधून तो तुला बाहेर काढू शकेल.”

“एक मिनिट.” व्हॉन डॅनिकनच्या त्या आवाजातच असा काही दरारा होता की पुढे येऊ पाहणारे अधिकारी जागच्या जागी थांबले.

“बघताय काय? त्याला बेड्या ठोका.” मार्टी गरजला.

व्हॉन डॅनिकन पुढे आला व त्याने मार्टीचे मनगट घट्ट पकडले. “जरा बाजूला ये. आपण थोडं बोलायला हवंय.”

“काय करतोयस काय तू?”

व्हॉन डॅनिकनने आपल्या हाताची पकड अधिकच घट्ट केली. “माझ्यावर विश्वास ठेव. आपल्या दोघांमध्येच ठेवता येऊ शकेल असं एक गुपित माझ्यापाशी आहे.”

एक सुरक्षा अधिकारी झटकन पुढे येत होता, पण मार्टीने त्याला थोपवले. व्हॉन डॅनिकन त्याला बऱ्यापैकी दूर घेऊन गेला.

“आम्हाला फक्त व्हॅन ही एकच गोष्ट सापडलीय असं नव्हे.” वीसएक मीटर चालत आल्यावर तो म्हणाला. “टिंगेलीच्या बँकेतल्या एका ट्रस्टच्या खात्यामधून लॅमर्स व ब्लिट्झला पैसे पाठवण्यात आले ही गोष्टही आम्ही शोधून काढलीय. मला वाटतं तू टोबीला ओळखतोस. हो ना? तुम्ही विद्यापीठात एकत्र शिकायला होतात? तुम्ही दोघंही कायद्याचे पदवीधर आहात. टोबी सुरुवातीला कबूल करत नव्हता. स्विस नागरिकाच्या कर्तव्याची मला आठवण करून द्यावी लागली.”

“ह्याचा अर्थ तू आणखीही बऱ्याच कायद्यांचा भंग केलायंस.” आपला हात सोडवून घेत मार्टी म्हणाला.

व्हॉन डॅनिकनने त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले. “आपल्या खातेदारांच्या वतीने, त्यांच्या खात्यातील सर्व व्यवहारांची स्टेटमेंट्स जपून ठेवणं हे प्रत्येक बँकेला बंधनकारक असतं हे तर तू जाणतोसच. त्या ट्रस्टची मासिक स्टेटमेंट्स माझ्या हातात सोपवण्याचा चांगुलपणा टोबीने दाखवला... ते पैसे आमच्या अपेक्षेप्रमाणे तेहरानवरून

न येता, वॉशिंग्टन डी.सी.वरून आलेले आहेत हे समजल्यावर आम्ही दोघंही चकित झालो.”

“वॉशिंग्टन डी.सी.? तुला वेड लागलंय.”

“अमेरिकन संरक्षण कार्यालयातर्फे ते खातं उघडण्यात आलंय.”

“पण महम्मद क्विताब हा तर इराणी ऑफिसर होता. तू स्वत:च मला तसं सांगितलं होतंस.” आपण आता आक्रमक पवित्रा घेऊ शकत नाही हे लक्षात आल्यावर मार्टीने चटकन विषय बदलला होता. “काहीही असलं तरी अशी माहिती उघड करायचा टोबीला अजिबात अधिकार नाही. बँकेने गोपनीयता राखायला हवी असा कायदा केलेला आहे. टोबीने त्याचं उल्लंघन केलेलं आहे.”

“असेलही.” व्हॉन डॅनिकन म्हणाला. “पण तरीसुद्धा मला असं वाटतं की, ह्या ट्रस्टतर्फे आणखीही काही व्यक्तींना पैसे पुरवले गेले आहेत व त्यांची नावं जाणून घ्यायला, तुझ्या फेडरल कौन्सिलचे सभासद नक्कीच उत्सुक असतील. खरी गोष्ट अशी आहे की युनायटेड स्विस बँकेच्या बर्न शाखेमधील एका गुप्त खाजगी खात्यातही त्या ट्रस्टकडून पैसे पाठवले गेलेले आहेत. त्या शाखेत तुझंही खातं आहे. नाही का? ५१७ ६२... तुला ठाऊक आहे हा नंबर?”

मार्टीचा चेहरा पांढराफटक पडला.

व्हॉन डॅनिकनने आपले बोलणे सुरू ठेवले. “गेली दोन वर्षं, तुझ्या खात्यामध्ये दर महिन्याला पाच लाख फ्रँक्स जमा होत आहेत. अमेरिकन संरक्षण कार्यालयाच्या सौजन्याने. माझ्यावर तू देशद्रोहाचा आरोप करतोयस? अरे तू तर परकीय हस्तक आहेस.”

“हा सगळा खुळचटपणा आहे.”

“तुझी ती CIA ला संपवायची भाषा आणि अमेरिकेविरुद्धची चीड हा सर्व दिखावा व ढोंगीपणा आहे. पालुंबोला चौकशी करण्याची संधी मिळू नये ह्यासाठी बर्नमध्ये आलेल्या त्या विमानातून तुला गॅसनची सुटका करायची होती.”

“तू काय बोलतोयस हे मला काहीही कळत नाहीये. कुठला हल्ला?” मार्टी आपल्या माणसांच्या दिशेने वळला आणि त्यांना इशारा करण्याचा प्रयत्न करू लागला.

“असं काही करण्याचा विचारही मनात आणू नकोस.” आपल्या जॅकेटमधून कागदपत्रे बाहेर काढत व्हॉन डॅनिकन म्हणाला. “ह्यात, सारं काही आहे. खात्याचा नंबर ५१७.६२३अअ. खाजगी खाते. पण ते आता गुप्त राहिलेलं नाही. माझ्यावर विश्वास बसत नसेल तर स्वत:च्या डोळ्यांनी वाच.”

मार्टीने ती कागदपत्रे चाळली. “कोर्टात ही कागदपत्रं चालणार नाही. कोर्ट त्यांना ग्राह्य धरणार नाही.”

“कोर्टाबद्दल कोण काय म्हणतोय? मी ह्या कागदपत्रांच्या प्रती ई-मेलने अध्यक्षांकडे पाठवल्या आहेत. मी केलेल्या तपासाबद्दल एक टिपणही तपासासोबत जोडलंय. मला नाही वाटत की, मॅडमला तुझ्यासारख्या एका हेराला बरोबर घेऊन देशाचा कारभार चालवायला आवडेल.”

“पण... पण...” मार्टी आता पार कोसळला होता. त्याने मान खाली घातली.

व्हॉन डॅनिकनने त्याच्या हातून कागदपत्रे काढून घेतली. “तर मग अल्फॉन्स, जोनाथन रॅन्समचं नक्की काय चाललंय?”

“मला ठाऊक नाही.”

“तुला माहीत नाही की तुला सांगायचं नाही?”

“त्यांना त्यांच्या मार्गात तो नकोय एवढंच मला माहिती आहे. त्याचा त्यांच्याशी काहीही संबंध नाही.”

“त्यांच्याशी म्हणजे कोणाशी? माझ्याशी खोटं बोलू नकोस. आज एका दहशतवादी कंपूने ड्रोनच्या साहाय्याने येत्या अठ्ठेचाळीस तासांत एक विमान उडवायचा घाट घातलेला आहे.”

“मी तुला कधीपासून सांगतोय की ड्रोनबद्दल मला काहीही ठाऊक नाही.”

“ठीक आहे. मग तुला ठाऊक तरी काय आहे? नुसते आपले हात चोळत बसण्यासाठी तर तुला दर महिना पाच लाख फ्रँक्स पाठवले जात नाहीयेत. मला सर्व गोष्टी कळायला हव्यात. कोण? का? कधीपासून? हा हल्ला रोखता येईल अशी जर काही माहिती तुझ्याजवळ असेल तर ती सांगण्याची हीच योग्य वेळ आहे. आपल्या पापांचं क्षालन करण्याची हीच फक्त एकमेव संधी आहे.”

“मी सांगतो तुला.” बऱ्याच वेळाने मार्टी म्हणाला. “पण मला दुसऱ्या कुणी याविषयी छेडलं तर मी सरळ सरळ नाकबूल करून मोकळा होईन.”

व्हॉन डॅनिकन शांतपणे वाट पाहत राहिला.

मार्टीने एक उसासा सोडला. “मला ह्या हल्ल्याबद्दल काहीही ठाऊक नाही. त्यांना निर्यात परवाना हवा होता. ती गोष्ट माझ्या कायदामंत्रालयाच्या अखत्यारीतील होती.”

“कोणाला हवा होता?”

“जॉन ऑस्टिन.”

“तो कोण आहे?”

“एक मित्र. समविचारी.”

“बकवास करू नकोस. तो नक्की कोण आहे?”

“अमेरिकन हवाई दलाचा मेजर जनरल. ‘डिव्हिजन’ नावाच्या एक गुप्त संघटनेचा सूत्रधार ही त्याची खरी ओळख आहे. दोन वर्षांपूर्वी त्याच्या संघटनेने झुग मधील झिअॅग ही कंपनी विकत घेतली. ही कंपनी अत्याधुनिक अभियांत्रिक साधनसामुग्रींचे उत्पादन करते. झिअॅगचा माल इराणच्या परवेझ जिन्नकडे पाठवला जात होता. त्या निर्यातीला मंजुरी देणं, हे माझं काम होतं. पण ते आता पूर्ण झालंय.”

“कोणत्या प्रकारचा माल?”

मार्टीने त्याच्याकडे वैतागून पाहिले. “कोणता माल असेल असं तुला वाटतं?”

“मी एक पोलीसमन आहे. मी गुन्हेगारांकडून कबुलीजबाब वदवून घेतो.”

“सेंट्रीफ्युजेस आणि तत्सम साहित्य. त्याबाबतच्या कागदपत्रांवर मी स्वत: सह्या करायचो आणि कस्टम्सच्या माणसांची त्यावर नजर पडणार नाही अशी व्यवस्थाही करायचो.”

“म्हणजे आण्विक शस्त्रास्त्रं बनवण्यासाठी युरेनियमवर प्रक्रिया करणारी

साधनं?”

मार्टीने मान हलवली. “त्यांचा ते काय उपयोग करणार आहेत हे पाहण्याचं काम माझं नव्हतं.”

“ह्या हल्ल्याबद्दल तुला काय माहिती आहे?”

“मी सांगितलं तुला, मला काहीही माहिती नाही. तुझ्याप्रमाणे मलाही ते ड्रोन थोपवायला हवं असं मनापासून वाटतं.”

मार्टी खरे बोलत असावा अशी डॅनिकनची हळूहळू खात्री पटत चालली होती. पण ह्या सर्व प्रकरणाचा त्याला नीट अर्थबोध होत नव्हता. इराणला आण्विक क्षेत्रात प्रगती करून द्यायची नाही हे तर अमेरिकन सरकारचे धोरण होते. त्याविरुद्ध जाऊन इराणला मदत करण्याचा अमेरिका का प्रयत्न करेल? मागच्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घटना त्याने आठवायला सुरुवात केली. ब्लिट्झ व लॅमर्सचे खून, ड्रोन आणि स्फोटके उघडकीला येणे आणि आता अमेरिकेची गुप्त मालकी असलेल्या एका स्विस कंपनीमार्फत इराणला आण्विक तंत्रज्ञानाचा पुरवठा करणे.

हळूहळू त्याच्या डोक्यात सर्व चित्र स्पष्ट होऊ लागले.

एक पाताळयंत्री कारस्थान.

त्याने मार्टीकडे नजर टाकली. त्या नजरेत प्रचंड घृणा होती. “कां केलंस तू हे?”

पण अल्फॉन्स मार्टीकडून कोणताच प्रतिसाद आला नाही. तो जणू प्रार्थनेला उभा होता. मान झुकलेली. हात जोडलेले.

७३

दुपारी एक वाजता, डॅव्होस आणीबाणी मदतकेंद्राचा प्रमुख, स्टेप्प स्टायनर हा आपल्या जेकोबशॉर्न ह्या २९५० मीटर्स उंचीवर असलेल्या लहानशा ऑफिसमधून बाहेर पडला व चालू लागला. दक्षिणेला अतिदाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता वेधशाळेने वर्तवली होती. पण अजून तरी आकाश मलमली व नेहमीसारखेच फक्त धडकी भरवणारे दिसत होते. ऑफिसपासून दूर चालत आल्यावर त्याने बॅरोमीटर तपासला. ८८० मिलिबारवर सुईचे टोक स्थिर होते. तापमान : ४ड्ढ सेल्सियस. त्याने काचेवर बोट आपटले आणि सुईचे टोक ९५० वर उडाले.

आकाशाकडे पाहत त्याने ढगांचा अंदाज घेतला. गेल्या तीन दिवसांपासून आकाश, एखाद्या प्रशांत महासागरासारखे दिसत होते. आज सकाळी त्यात थोडा बदल झाला होता. विस्तीर्ण पसरलेल्या राखाडी रंगाच्या जागी, ढगांचे छोटे छोटे पुंजके दिसू लागले होते. हवा कमालीची कोरडी झाली होती. वाऱ्याने गती पकडली होती, पण दिशा मात्र बदलली होती. तो आता दक्षिण दिशेने वाहू लागला होता.

स्टायनर पळत पळत पुन्हा ऑफिसात आला व त्याने टेबलावरची आपली ८’ × ५०’ ची दुर्बीण उचलली. दुर्बीण गळ्यात अडकवलीस की तू रणगाड्याचा कमांडर दिसतोस अशी चेष्टा त्याचे सहकारी मित्र नेहमी करत असत. दुर्बीण डोळ्याला लावून त्याने पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत अख्खा पर्वत न्याहाळला. ह्या आठवड्यात पहिल्यांदाच त्याला फ्राऊन्कर्चनवरील शिखरांचे दर्शन होत होते. तो फर्गावर येऊन थांबला. रोमन्सवर त्याची दृष्टी खिळून राहिली. फार वर्षांपूर्वी त्याचा मोठा भाऊ तिथून गायब झाला होता. तडा गेलेल्या त्या हिमखडकाच्या भेगेमध्ये अजूनही ती स्त्री निपचित पडलेली होती. आपल्या बायकोने बर्फात तसेच अनंत काळ पडून राहिलेले स्टायनरला चालणार नव्हते.

नेमका त्याच वेळी वाऱ्याचा जोर कमी झाला. ढगांमध्ये मोठी फट पडली व त्यातून निळे आकाश डोकावू लागले. तो धावत वेधशाळेजवळ पोहोचला. तापमान आता उणे दोन झाले होते. अतिदाबाचा पट्टा तयार झाला होता.

लगबगीने तो वेधशाळेच्या आत गेला व रेडिओवरून आपल्या सहकाऱ्यांना सज्ज राहायच्या सूचना देऊ लागला.

रोमन्सला जायची वेळ आली होती.

तीन तासानंतर स्टायनर आपल्या सहकाऱ्यांसोबत त्या छोट्याशा टेकडीवर पोहोचला होता, जिथे त्यांनी एम्मा रॅन्समला अखेरचे पाहिले होते. ह्या वेळेस ते दुसऱ्या रस्त्याने आले होते. हवा चांगली असतानाच तिथून येणे शक्य असते व सर्व गिर्यारोहकांचा तो आवडता मार्ग होता. त्या आडवाटेने पटकन पोहोचता येत असे; पण त्यासाठी वीस-वीस मीटर्सचे दोन उंच निमुळते कडे चढावे लागत.

संपूर्ण देशाला गेले पाच दिवस तडाखा देऊन आता ते घनघोर वादळ शांत झाले होते. निळ्या आकाशातून सूर्याचा प्रखर प्रकाश अंगावर पडत होता. बर्फाचे शेत हिऱ्यासारखे चमकत होते.

स्टायनरने मान उंच करत त्या उत्तुंग पर्वताकडे पाहिले. ह्याच ठिकाणी पाच दिवसांपूर्वी जन्म-मृत्यूची थरारक झुंज चाललेली होती. आज त्याचा मागमूसही उरलेला नव्हता. ती बर्फाची भेग शोधणे आता अशक्य झाले होते.

त्याने आपल्या माणसांना एका रांगेत उभे केले. प्रत्येकाने आपल्या हातात दोन मीटर उंचीची जाड काठी धरलेली होती. बर्फात काठी घुसवून तो घट्ट टणक आहे ह्याची खात्री करत ते एकेक पाऊल पुढे सरकत होते. अखेर स्टायनरनेच ती भेग शोधून काढली. त्याने एका बर्फाच्या खडकात काठी खुपसल्यावर ती खाली खाली जाऊ लागली. शेवटी त्याला गुडघ्यावर खाली बसावे लागले.

पंधरा मिनिटांनंतर त्याच्या सहकाऱ्यांनी खाली जाण्याचा मार्ग मोकळा केलेला होता. त्या खडकाच्या चारही बाजूंना खुणेचे झेंडे लावण्यात आले. स्टायनरच्या देखरेखीखाली दोरखंड ठोकण्यात आले. तो स्वत: खाली उतरून ते प्रेत उचलणार होता. आपले बसायचे खोगीर दोरखंडाला घट्ट बांधले आहे ह्याची पक्की खात्री करून त्याने कमरेभोवती दोर आवळला. कपाळाला चिकटवलेला दिवा पेटवत तो खाली उतरू लागला.

आतली हवा फारच थंड होती. तो खाली उतरत असताना बर्फाची भिंत तुटू लागली व त्यातून आतला संगमरवरी खडक दिसू लागला. वरून सोडलेल्या दिव्यांचा प्रकाश क्षीण झाला. हॅलोजन बल्बच्या प्रकाशावर त्याला लक्ष केंद्रित करावं लागलं.

चाळीस मीटर खोल गेल्यावर त्याला तो मृतदेह दिसला. ती स्त्री आपल्या पोटावर पडलेली होती. तिचा एक हात डोक्यावरून लांब खेचला गेला होता. जणू ती मदतीची याचना करत होती. बाजूच्या भिंती कोसळू लागल्या व त्याला जलद वेगाने खाली जाणे शक्य झाले. तिच्या जॅकेटवरचा क्रॉस त्याला दिसला. पिंगट केसांमध्ये चेहरा झाकला गेला होता.

त्याचे पाय जमिनीला लागले.

“मी खाली उतरलोय,” त्याने रेडिओवरून संदेश पाठवला.

त्या अस्पष्ट धूसर प्रकाशात तिचे शरीर अगदी ठिसूळ झाल्याचे त्याला जाणवले. तिच्या डोक्याभोवती व पायाभोवती सांडलेल्या रक्ताचे तळे आता साकळून गेले होते. आपल्या सॅकमधून त्याने चामडी पट्टा व लोकरी टोपी बाहेर काढली. प्रेत वर नेत असताना शरीर खरचटण्याची शक्यता होती. त्याने ते सर्व साहित्य मृत शरीराच्या बाजूला ठेवले व तो गुडघे टेकवून प्रथेप्रमाणे प्रार्थना म्हणू लागला.

स्त्रीच्या पाठीखाली दोन्ही हात घालून त्याने तिचे शरीर पाठीवर टाकण्याचा प्रयत्न केला, पण लगेचच त्याला काहीतरी विचित्र जाणवले. लांब, गुंता झालेले केस बाजूला गळून पडले. बर्फाचे तुकडे जमिनीवर घसरत आले. त्याच्या हातात रिकामे जाकिट होते व खाली पडलेल्या पँटकडे तो डोळे विस्फारून पाहत होता.

स्टायनरच्या तोंडाला फेस आला होता.

त्या ठिकाणी शरीर नव्हतेच.

७४

ते चुकीच्या दिशेला चालले होते.

डिकीत बसून त्याला आता दहा मिनिटे झाली होती. शहराबाहेर पडताना लागणारे वळण त्याला जाणवले होता. पण पुन्हा हायवेला जोडणारा तो उतरणीचा रस्ता येण्याची तो कधीपासून वाट पाहत होता. जर त्याचा अंदाज चुकत नसेल तर गाडी नक्कीच खाली उतरत नव्हती. ती वर चढत होती. आपल्या सूचना न पाळण्यामागे सीमॉनचा काहीतरी वेगळाच उद्देश असणार ह्याची त्याला आता हळूहळू खात्री पटू लागली होती. पण उद्देश काय असावा? नाकाबंदीमुळे तिने वेगळा रस्ता पकडला असेल? पोलिसांनी हायवेच अडवून टाकलेला नसेल ना?

जोनाथन काळजीत पडला होता. तो हातातल्या घड्याळाच्या चाव्या फिरवायला लागला. अल्टीमीटरने १९५० मीटरची उंची दाखवली. दुसऱ्या मिनिटाला १९६० असा आकडा आला. त्याचा अंदाज बरोबर होता. गाडी चढणीवर होती. त्याने दुसरी चावी फिरवली. घड्याळाने पूर्व दिशा दाखवली याचा अर्थ ते हायवेच्या बाजूने टायफेनकॅसलवरून सेंट मॉरिट्झच्या दिशेने चाललेले होते. झुरिचवरून अमेरिकन वकिलातीत जाण्याऐवजी ते त्यापासून दूर पोहोचले होते.

“सीमॉन,” तो तारस्वरात ओरडला. त्याने गाडीचा पत्रा जोरजोरात बडवला. “गाडी थांबव.”

काही मिनिटांतच रस्त्याच्या कडेला येऊन गाडी थांबली. तो हातांच्या कोपरावर ओणवा होऊ पाहत होता. त्याला भीतीने कापरे भरले होते. बर्फावर पावले कुरकुरल्याचा आवाज येऊ लागला. पुरुषी आवाजात बोललेले शब्द ऐकू आले. पोलीस? म्हणजे ते एखाद्या बुथपाशी आले होते? श्वास रोखून धरत तो संभाषण ऐकण्याचा प्रयत्न करू लागला.

तेवढ्यात गाडीचा दरवाजा उघडला गेला व एक व्यक्ती आत आली. गाडीचा दरवाजा धाडकन बंद झाला. गाडी पुन्हा हायवेच्या दिशेने जाऊ लागली.

“सीमॉन! तुझ्याबरोबर आत कोण आहे?”

त्याने जोरजोरात ठोठावले.

“सीमॉन! उत्तर दे! कोण आहे?”

रेडिओ सुरू झाला. त्याच्या डोक्यावरच्या स्पीकर्सवरून कर्कश आवाज येऊ लागला. गाडीचा वेग वाढला व तो दुसऱ्या बाजूला कलंडला.

जोनाथनने पाठ टेकली. त्याचे डोळे उघडे होते. गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांचा तो विचार करू लागला. सीमॉनचे अरोसाला लगबगीने परत येणे, आपण देश सोडून जावे ह्यासाठी तिने केलेल्या विनवण्या, एम्माला कुणी सामान पाठवले होते

ह्याबद्दल तिने दाखवलेली उदासीनता, आपण ब्लिट्झला जीव वाचवण्याचा प्रयत्न करत असताना तिने केलेली चिडचिड. त्याला कोणताही वास न लागू देण्यासाठीच ते सगळे डावपेच रचले गेले होते. त्याने गळ्यातली सेंट ख्रिस्टोफरची प्रतिमा काढून, तोडून टाकली. तिच्यामुळेच त्यांना इशारे मिळत गेले असणार. त्याशिवाय तो खुनी डॅव्होसपर्यंत पोहोचायची दुसरी शक्यताच नव्हती. पण त्याला ग्रीन झोनमध्ये प्रवेश घ्यायचा पास कसा मिळाला हे मात्र त्याला उमजत नव्हते. एम्माप्रमाणेच सीमॉनचेही साथीदार होते.

डिकीच्या फटीमधून सूर्यकिरण आत आले. त्याला डिकीचे कुलूप सापडले. प्लॅस्टिक फायबर बोर्डमागे ते लपलेले होते. एम्माच्या चाव्या वापरून त्याने फायबर बोर्डला भोक पाडले. भोक मोठे झाल्यावर त्यात बोट घालत तो फायबर बोर्ड फाडू लागला.

अखेर कुलपाला हात लागण्याएवढे ते भोक मोठे झाले. त्याने अनेक प्रकारच्या गाड्या हाताळलेल्या होत्या. त्या कुलपाला एक खटका असणार व तो खटका कशाप्रकारे दाबून ते कुलूप उघडायचे हेही त्याला ठाऊक होते. पण डिकी उघडून तो काय करू शकत होता? ताशी एकशेपन्नास किलोमीटर वेगाने जाणाऱ्या गाडीतून उडी मारणे नक्कीच शहाणपणाचे नव्हते. पण त्याचबरोबर तो व्यावसायिक खुनी आपल्या मेंदूत कधी गोळी झाडतोय ह्याची केवळ वाट बघत बसण्यात तरी काय अर्थ होता?

सर्व शक्तिनिशी त्याने तो खटका दाबला. त्याची बोटे त्या गुळगुळीत धातूवरून सटकली. त्याने पुन्हा प्रयत्न केला, पण परिणाम तोच झाला.

गाडीचा वेग कमी झाला व ती अचानक उजवीकडे वळली. त्यानंतर वेडीवाकडी वळणे घेत गाडी वर चढू लागली. अंगाची मुटकुळी करून तो बसून राहिला. गाडीचा तुफान वेग आणि नागमोडी वळणे ह्यामुळे त्याच्या पोटात मळमळू लागले. अखेर तो नागमोडी रस्ता संपला व त्याने नि:श्वास सोडला. पण त्याची अस्वस्थता मात्र अधिकच वाढली होती.

मागे सरकत जाऊन त्याने आतले कार्पेटसारखे पॅडिंग फाडून काढले. स्टेपनीबरोबर ठेवलेली हत्यारांची बॅग त्याच्या हाताला लागली. बॅगेमधला लोखंडी बार त्याने बाहेर काढला.

गाडी थांबली. त्याने हातामध्ये तो लोखंडी बार घट्ट धरून ठेवला. डिकी उघडली जाताच बाहेर ताबडतोब उडी मारण्याच्या पवित्र्यात तो बसून राहिला. डिकीच्या कुलपातून चावी फिरल्याचा आवाज त्याने ऐकला. डिकी उघडली गेली आणि तळपत्या सूर्याचा प्रकाश अचानक त्याच्या डोळ्यांवर आला. हाताने प्रकाशाची तिरीप अडवत त्याने डोळे झाकून घेतले.

“बाहेर ये.” सीमॉनचा आवाज आला.

तिच्या शेजारी काळ्या केसांचा व भेदक नजरेचा एक गिड्डा पुरुषउभा होता. त्याच्या कमरेला पिस्तूल लटकत होते. त्याची वेगळी ओळख करून देण्याची आता गरज उरली नव्हती.

“चल. बाहेर निघ.” जोनाथनच्या चेहऱ्यासमोर पिस्तुलाचे टोक वरखाली हलवत तो म्हणाला. “आणि हातात धरलेल्या वस्तूची उगाच काळजी घेत बसू नकोस.”

जोनाथनने तो बार बाजूला टाकला व डिकीतून उडी मारत तो बाहेर आला. गाडी

डोंगराच्या माथ्यावर आणलेली होती. बाहेरचा देखावा विलक्षण होता. चारही बाजूंनी बर्फांचे संगमरवरी सुळके दिसत होते.

“मला हा देश सोडावासा वाटतोय हे वाक्य उच्चारायला मला वाटतं आता खूपच उशीर झालाय.” जोनाथनचा घसा कोरडा पडत गेला. त्याला तहान लागली होती.

“मी तुला सावध केलं होतं.” सीमॉन म्हणाली.

“तू एम्माबरोबर काम करत होतीस हे तू मला का सांगून टाकलं नाहीस? मला तेवढं पुरेसं झालं असतं.”

“मी तिच्याबरोबर काम करत नव्हते. उलट ती काय काम करतेय ह्यात मला तुझ्याइतकाच रस होता.”

“मग तू कुणाबरोबर काम करतेयस?”

सीमॉनने फक्त त्याच्याकडे रोखून पाहिले.

त्याने बाजूला पाऊल टाकत अंदाज घेतला. दरी साधारण हजार मीटर खोल होती.

सीमॉनने हात पुढे केला. “परवेझ जिन्नने तुला सांगितलेली सर्व माहिती मला हवीय.”

“त्याने मला काहीच सांगितलं नाही,” जोनाथन म्हणाला.

“तू इतक्या लांबून जिन्नला भेटायला आलास आणि तो तस्करी करून आपल्या देशातून काय घेऊन चाललाय हे ही तू त्याला विचारलं नाहीस? मला तर वाटलं की त्यानेच आपणहून तुला सगळं सांगून टाकलं असेल.”

“एम्मा कुणाबरोबर काम करत होती हा एकच प्रश्न विचारण्यासाठी मी जिन्नला भेटायला आलो होतो आणि जमल्यास तिचं खरं नाव काय होतं हेही मला त्याच्याकडून काढून घ्यायचं होतं.”

“नाही. ते कारण नव्हतं. स्वत:ला संकटातून सोडवून घेण्यासाठी तू डॅव्होसला आला होतास. त्यासाठी तुला तो पुरावा मिळवायचा होता.”

जोनाथन काहीच बोलला नाही.

“तू उगाचच गोष्टी अवघड का करतोयस?”

“सीमॉन, तू असं नाही करू शकत.”

“बरोबर आहे तुझं. मी काहीच करणार नाही. पण हा रिकार्डो, मात्र ते जरुर करेल.”

रिकार्डोने हवा हुंगल्यासारखे नाक हलवले. “तुझ्याकडे जर काही माहिती असेल तर मिसेस नॉयरेटला तो लगेच सांगून टाक.”

“तुझा डाव तरी काय आहे?” त्या माणसाकडे पूर्ण दुर्लक्ष करत जोनाथनने तिला विचारले.

“ह्या धंद्यात प्रत्येक जण खेळतो, तोच डाव मीही खेळतेय. लक्षात ठेव, कागदपत्रांची खाडाखोड करण्याएवढी ती सोपी गोष्ट नाही.”

जोनाथनने खिशातून फ्लॅशड्राइव्ह काढला व आपल्या मुठीत धरून ठेवला. “ह्यामध्ये इराणचा संपूर्ण आण्विक कार्यक्रमाचा आराखडा आहे. जिन्नच्या म्हणण्याप्रमाणे ह्यात एक युद्ध पेटवण्याची ताकद आहे.”

सिमॉनने त्या ड्राइव्हकडे एक नजर टाकली. “त्याला तसं वाटतं असेल. पण मी अशा

गोष्टींना फारसं महत्त्व देत नाही.”

“तू कोणाबरोबर काम करतेयस आणि एम्मा तुला कशासाठी हवी होती? माझ्या या दोन प्रश्नांची उत्तरं दे. त्यानंतर हा फ्लॅशड्राइव्ह तुझा असेल.”

“मी सेंट्रल इन्टलिजन्स एजन्सीबरोबर काम करते. मी तुझी मैत्रीण आहे. माझ्यावर विश्वास ठेव.”

“माझी मैत्रीण?” जोनाथनने मान झटकली. मूठ उघडत त्याने तो फ्लॅशड्राईव्ह मागे उंच उडवला.

“बास्टर्ड!” सीमॉनने जोनाथनकडे खुनशी नजरेने पाहिले. “उडवून टाक ह्याला.” रिकार्डोला इशारा करत तिने फ्लॅशड्राईव्ह पकडण्यासाठी उडी मारली.

जोनाथनने आकाशाकडे पाहिले व एक दीर्घ श्वास घेतला. हवा आल्हादायक होती.

त्याच क्षणी जोरदार आवाज आला. जोनाथन दचकला. मेंदूत घुसणाऱ्या गोळीची तो वाट पाहत होता. त्याने नि:श्वास सोडला. त्याच्या अंगावर काहीच आदळले नव्हते.

रिकार्डो मात्र आपल्या गुडघ्यांवर कोसळला होता. त्याच्या छातीवर रक्ताचा भला मोठा डाग पडला होता. त्याने शेवटचा आचका दिला व त्याच्या तोंडातून भळाभळा रक्त वाहू लागले.

सीमॉन, त्या आवाजाने, गर्रकन मागे वळली. एका मोठ्या खडकामागून एक आकृती हळूहळू पुढे येऊ लागली. त्या व्यक्तीने अंगात राखाडी पोशाख घातला होता, डोक्यावर विणलेली कॅप होती आणि तिने गॉगलच्या मागे आपले डोळे लपवले होते. हात उंचावत तिने डोक्यावरची कॅप काढली व तिचे पिंगट केस वाऱ्याबरोबर झुलू लागले. जवळ आल्यावर तिने डोळ्यांवरचा गॉगल बाजूला फेकून दिला.

“तू?” सीमॉन किंचाळली. “पण हे कसं शक्य...”

एम्मा रॅन्समने पिस्तूल रोखले आणि तिच्या पिस्तुलातून सुटलेली गोळी, सीमॉन नॉयरेटच्या कपाळात घुसली. सीमॉन जागच्या जागी थरथरली, एक पाऊल मागे सरकली. ती सुन्न, बधिर झाली होती. एम्माने हिंस्त्रपणे तिच्या छातीत लाथ मारली. सीमॉन कड्यावरून फेकली गेली.

एम्मा शांतपणे त्या कोसळणाऱ्या आकृतीकडे पाहत राहिली.

७५

ती दहा फुटांवर उभी होती. हातात सायलेन्सर असलेले पिस्तूल होते. ती निर्विकारपणे हातातले पिस्तूल खेळण्यासारखं फिरवत होती. मोडलेल्या पायाची एकही खूण दिसत नव्हती. तीनशे फूट खाली कोसळूनही, तिच्या अंगावर जखमेचा एकही व्रण नव्हता. ती जोनाथनकडे अनोळखी नजरेने पाहत होती. त्याचे चुंबन घ्यावे किंवा त्याला घट्ट मिठी मारावी असे तिच्या मनातही आले नसावे. त्याला पाहून तिला आनंद झाल्याचे दिसत नव्हते.

"पण मी तर तुला पाहिलं होतं." तो म्हणाला. "त्या बर्फाच्या ढोलीत तू निपचीप पडलेली होतीस."

"मला पाहिल्याचा, तुला भास झाला."

"पण ते रक्त... बर्फावरून वाहणारा ओघळ... तुझा पाय मोडलेला होता. मी तुटलेलं हाड देखील पाहिलं होतं."

"ते माझं हाड नव्हतं. सगळाच गचाळपणा झाला होता. मला घाईघाईने काम उरकावं लागलं. कारण जेव्हा मला कळलं–"

"एम्मा," तो ओरडला.

"– की ह्या आठवडा अखेरचीच तारीख निश्चित केलेली आहे तेव्हा मी गाशा गुंडाळायला–"

"एम्माऽ" त्याचा आवाज फाटला. "हे तरी तुझं खरं नाव आहे ना?"

त्याच्या प्रश्नाला उत्तरही न देता ती झपाझप डोंगर उतरू लागली. जोनाथनला मात्र पाऊल उचलणेही शक्य होत नव्हते. त्याच्या मनात भावनांचा कल्लोळ उडाला होता. आश्चर्य, संताप, हर्ष आणि कडवटपणा, सर्व भावना एकदम उसळल्या होत्या. स्वत:वर ताबा मिळवण्यासाठी त्याला खूप कष्ट पडले. मनाच्या त्या सुन्न अवस्थेतच तो तिच्या मागून जाऊ लागला. थोड्या अंतरावर तिने आपली गाडी उभी केली होती. ती 'व्हिडब्ल्यू गोल्फ' गाडी होती. गाडी बरीच ताबडवलेली दिसत होती. तो ड्रायव्हरच्या सीटकडे जाऊ लागला, पण एम्मा तिथे आधीच बसलेली होती. तो शेजारच्या सीटवर जाऊन बसेपर्यंत इंजीन सुरू झाले होते. गाडी गिअरमध्ये पडून पुढे सरकू लागली होती.

"तू जन्मलेल्या हॉस्पिटलमध्येही मी फोन केला होता," तो म्हणाला. "तिथल्या नर्सने मला सांगितलं की तिथे जन्मलेल्या एम्मा एव्हरेट्ट रोझचा दोनच महिन्यांत अपघाती मृत्यू झाला होता."

"नंतर," ती म्हणाली. "मी तुला नंतर सर्व सांगेन."

"मला सर्व नकोय. मला फक्त सत्य हवंय."

"सत्यसुद्धा सांगेन." ती म्हणाली. "ह्या क्षणाला मला तुझ्याकडून काही ऐकायचंय.

जिन्नच्या फ्लॅशड्राइव्हबद्दल. तो अजूनही तुझ्याजवळ आहे. बरोबर ना? तू तो भिरकावून दिलेला नाहीस?”

जोनाथनने खिशातून दुसरा फ्लॅशड्राईव्ह बाहेर काढला. “मी फेकून दिलेला ड्राईव्ह तुझा होता.”

तिने त्याच्या हातातून तो खेचून घेतला. “ह्या खेपेस मी तुला माफ केलंय.” ती म्हणाली.

शर्यतीत भाग घेतल्यासारखी एम्मा गाडी चालवू लागली. सरळ रस्त्यांवर ती भरधाव सुटली होती, वळणावर ब्रेक्स दाबत, गिअर बदलत, तिचा हात स्टिअरिंगवरून सफाईने फिरत होता.

त्या क्षणापर्यंत त्याने एम्माला दोन व्यक्तिमत्त्वामध्ये विभागले होते. त्यातली एक होती, एम्मा रॅन्सम– त्याची बायको तर दुसरी इव्हा क्रुगर— कारस्थानी. आत्तापर्यंत त्याला वाटत होतं की, एम्मा हीच तिची खरी ओळख आहे– आणि इव्हा हा तिचा मुखवटा आहे. तिला अशी सुसाट गाडी चालवताना बघून, त्याला आपली चूक उमगली होती. आज प्रथमच त्याला खऱ्याखुऱ्या एम्माचे दर्शन होत होते. आजपर्यंत तिने ह्या एम्माला त्याच्यापासून दडवून ठेवले होते. आपण ह्या स्त्रीला ओळखू शकलो नाही हे त्याला आता कळून चुकले होते.

“तू ह्या प्रकारात इतका तरबेज असशील असं मला वाटलं नव्हतं.” गाडी पश्चिमेला, डॅव्होसकडून पुढे झुरिचला जाण्यासाठी वळवताना ती म्हणाली.

“तुझी काय अपेक्षा होती?”

“मला वाटलं होतं की लवकरच तुला ह्या सगळ्याचा उबग येईल व तू काही वर्षांसाठी पर्वतामध्ये स्वत:ला गुंतवून टाकशील. एकटा. नि:संग.”

“जर त्या बॅगा माझ्या हातात पडल्या नसत्या तर कदाचित मी तेच केलं असतं. त्या बॅगा मी उचलल्या आणि माझं आयुष्य च उधळलं गेलं. माझ्या हातून ते पोलीस मारले गेल्यानंतर, मला माझा जीव वाचवण्याखेरीज पर्यायच राहिला नाही. स्वत:ला निर्दोष शाबित करण्यासाठी मला काहीही करून माझा जीव वाचवायलाच हवा होता. हा देश सोडून निघून जा असं सीमॉन मला पटवण्याचा सतत प्रयत्न करत होती. पण बॅगेतल्या वस्तू पाहिल्यानंतर मी पळून न जाण्याचा निर्णय घेतला. रहस्याचा भेद केल्याशिवाय मला चैन पडणार नव्हतं.”

“आगगाडीतून माल यायला इतका उशीर लागला होता.” वैतागाने मान जोरजोरात हलवत ती म्हणाली. “मला वाटतं, त्या दिवशी मी तुला ट्रेकिंगसाठी जाऊ द्यायला नको होतं.”

“मी तुला माफ केलंय.” तो म्हणाला. “निदान ह्या खेपेस तरी.”

ती त्याच्या बोलण्यावर हसली. त्याला बरे वाटण्यासाठी. तिचे हसणे वरवरचे होते.

“तर मग,” तो म्हणाला. “आता तुझी पाळी. कुठून सुरुवात करायची ते हवं तर मी सांगतो. पर्वतापासूनच सुरू कर. मी जे तिथे पाहिलं, ते नक्की काय होतं?”

तिच्या चेहऱ्यावरचे भाव अचानक बदलले. तापमान एकदम घसरावे, तसा तिचा मूड बदलला होता. “तुझं ते जॅकेट, केसांचा विग, स्की पँट्स, नकली रक्त.”

“पण तू त्या बर्फाच्या घळीमध्ये आत कशी उतरलीस? तिथे एकटयाने जाणं भीतिदायक होतं.”

“मी उतरले नाही.”

“म्हणजे?” तो चक्रावला होता.

“मी खालच्या बाजूने तिथे चालत गेले. तुला आठवतं? लग्नानंतर आपण प्रथमच आल्प्सला गेलो होतो तेव्हा तू मला ती वाट दाखवली होतीस.”

जोनाथनने डोळे मिटले. त्याला आठवले, ते डॅव्होसला हायकिंग करण्यासाठी आले होते व अख्खी दुपार त्यांनी बर्फाच्या सुळक्यांखाली लपलेल्या गुहा आणि छोटी विवरे शोधून काढण्यात घालवली होती. “पण उन्हाळ्यातच बर्फाखालच्या गुहा दिसू शकतात. त्या दिवशीच्या वादळात तर सोडूनच दे, पण हिवाळ्यात देखील त्या शोधणं मुश्किल असतं.”

एम्माने आपली मान तिरकी केली. तो चुकलाय हे सांगण्याची तिची ती खास पद्धत होती. “मी मागच्या शुक्रवारी तुला सांगितलं होतं की, मी अॅम्स्टरडॅमला मीटिंगकरता चाललेय. पण मी त्या दिवशी अॅम्स्टरडॅमला न जाता रोमन्सवर आले होते. मी आखलेला बेत तडीला जाऊ शकतो की नाही हे मला प्रत्यक्ष आजमावायचं होतं.”

“तुमच्या हेरखात्यातली ही खास पद्धत दिसतेय!”

एम्माने त्याच्या खोचक विधानाची दखल घेतली नाही. “माझ्या लक्षात आलं की, जर त्या बर्फाच्या सुळक्याच्या तळाशी असलेली नेमकी जागा तुम्हाला सापडली तर तुम्ही ती लपलेली गुहा कधीही शोधून काढू शकता. मी स्वत: एक GPS चा हँडसेट प्रोग्रॅम्ड केला. त्यानंतर तो पूर्ण मार्ग वरून खालपर्यंत खुणा करून आखून घेतला.”

“म्हणून तू झेर्माटच्याऐवजी अरोसाला जायचा आग्रह धरला होतास.” त्यालाही किंचित अपराधी वाटू लागले होते.

“माझ्याकडे सबळ कारण होतं. तो आपल्या लग्नाचा वाढदिवस होता. आठ वर्षांपूर्वी त्याच दिवशी आपण तिथेच आलो होतो.”

“लग्नाचा वाढदिवस वगैरे ठीक आहे.” तिने त्या दिवशी आपल्याला हवामानाचा अंदाज मुद्दाम चुकीचा सांगितला होता आणि आपला वायरलेस रेडिओही निकामी करून टाकला होता हे त्याला आता समजलेले होते. “पण आम्ही खाली पोहोचून तुझ्यापर्यंत येऊ शकणार नाही याची तुला कशी खात्री वाटली होती?”

“मला खात्री वाटली नव्हती.” तिने कबूल केले. “मी थोडी जुगार खेळले. स्टायनर व त्याचे साथीदार हे एका पाय फ्रॅक्चर झालेल्या स्त्रीच्या मदतीसाठी येणार होते. आपल्याला शंभर मीटर खोल असलेल्या बर्फाच्या घळीतून एका स्त्रीला बाहेर काढायचंय याची त्यांना कल्पना असणंच शक्य नव्हतं. तो दोरखंड मुळातच खूप जड असतो. तरीही त्यांनी इतक्या मोठ्या लांबीचा दोरखंड आणलेला बघून मी चकित झाले होते.”

“स्टायनर... तुला त्याचं नावसुद्धा ठाऊक आहे?” तो खिडकीतून बाहेर बघू लागला, धक्क्यावर धक्के बसत होते.

“त्या काळात मी अनेकदा डॅव्होसभोवती घिरट्या घालत फिरत राहायचे. प्रत्येक गोष्टीची मी पुन्हा पुन्हा खात्री करून घेत होते. स्टायनरने केलेले अनेक फोनकॉल्स व

रेडिओचे संदेश मी ऐकले होते. ह्यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नाही. इतक्या उंच ठिकाणी केले गेलेले कॉल्स आपण सहज मधल्यामध्ये अडवू शकतो."

"आणि त्यानंतर? मी त्या बॅगांचा ताबा घेईन अशी तू अपेक्षाच केली नव्हतीस?"

"त्या तुझ्या ताब्यात येणार नाहीत अशी मी आशा करत होते. खरं तर त्या बॅगा लँडक्वॉर्टमधून मीच उचलणार होते, पण त्यात फार मोठा धोका होता. एकदा मी मेलेय असं म्हटल्यावर अचानक मी पुन्हा जिवंत होऊ शकत नव्हते."

जोनाथन गर्रकन वळला. "म्हणजे त्या वेळी तू तिथे होतीस? स्टेशनवर? पोलीस माझ्यावर हल्ला करतायत हे तू पाहत होतीस?"

एम्माने मान हलवली. "माफ कर जोनाथन. मला खरंच मदत करावीशी वाटत होती."

तो सुन्न झाला. त्याच्यापाशी शब्दच नव्हते.

ती बोलत होती. "त्यानंतर मी हॉटेलपर्यंत तुझा पाठलाग केला, पण मला खूप उशीर झाला होता. आमच्या माणसांनी आधीच आपल्या खोलीची झडती घेतली होती. तू तिथे पोहोचायच्या अगदी थोडं आधी ते तिथून निघून गेले होते. माझ्यापाशी आतमध्ये येण्याएवढा वेळ नव्हता. एकदा तर मला वाटलं की, तू मला पाहिलंयस. हॉटेलच्या मागच्या जंगलात मी लपून बसले होते."

तिचा भास झाल्याचे त्याला अस्पष्ट आठवत होते.

अचानक त्याला त्या सगळ्या तपशिलांचा उबग आला. कोण, का, केव्हा, ह्या प्रश्नात आता त्याला रस उरला नव्हता. ही सर्व सारवासारव होती. ती हे सर्व का करत होती हा त्याचा मुख्य सवाल होता. "एम, पण हे सर्व काय?" त्याने शांतपणे विचारले. "तू नक्की कशामध्ये एवढी गुंतली होतीस?"

"माझ्या नेहमीच्या कामात," रस्त्यावरून नजर न काढता ती म्हणाली.

"युरेनियमची क्षमता वाढवण्यासाठी तुम्ही परवेझ जिन्नला साधनसामुग्री पुरवत होता. ही गोष्ट तुला किरकोळ, नेहमीची वाटते?"

"त्याच्या हातात काहीच पडणार नव्हतं."

"उगाच असा बहाणा करू नकोस."

"असा म्हणजे कसा?"

"कशाचाच विधीनिषेध नसल्यासारखा. बेपर्वाईचा."

"कारण मला ठाऊक आहे की मी जे काही करतेय ते योग्य करतेय."

"तू काय करतेयस? कोणाबरोबर तू काम करतेयस? सीआयए? ब्रिटन?"

"सीआयए? शक्य तरी आहे का? माझा संरक्षणखात्याशी संबंध आहे. पेंटेगॉन. त्याला आता 'डिव्हिजन' म्हटलं जातं."

"पण सीमॉन म्हणाली की ती CIA बरोबर काम करतेय."

एम्माला त्याचे बोलणे पटले असावे. तिने आपली बोटे गालावर घासली. "खरंच? मला तर ही गोष्ट आजपर्यंत ठाऊक नव्हती."

"पण पेंटेगॉनबरोबर काम करणाऱ्या माणसाला, CIA ची माणसं का म्हणून मारतील. दोघंही एकाच संघटनेतले आहेत."

"सत्ता. त्यांना सत्ता हवीय. आज ती आमच्याकडे आहे. गेले दोन-तीन वर्षं ही

रस्सीखेच सुरू आहे.”

“पण माझी तर कल्पना होती की तू अमेरिकन सरकारचा द्वेष करतेस.”

तिच्या चेहऱ्यावर मंद स्मित होते. आपला समज खोटा होता तर. आणखी एक भ्रम निकालात निघाला होता.

“म्हणजे तू अमेरिकन आहेस?” त्याने विचारलं.

“देवा, अरे हे सगळं मी तुला एका निवांत क्षणी समजावून सांगणार होते. त्यात खूप गुंतागुंत आहे.” तिने आपल्या केसातून हात फिरवला. “होय जोनाथन, मी अमेरिकन आहे. तुला माझ्या ब्रिटिश उच्चारांबद्दल कदाचित नवल वाटत असेल. पण ते खरंच ब्रिटिश आहेत. लंडनाच्या परिसरातच मी लहानाची मोठी झाले. माझे माझे वडील अमेरिकन हवाईदलात होते. पण त्यांची नेमणूक लॅकेनहिथला झाली होती.”

“त्यांनी तुला ह्यात प्रोत्साहन दिलं?”

“पण ते अगदी सुरुवातीला. मला वाटतं मुलीवरच्या प्रेमामुळे असेल. डॅडींची सारी हयात लष्करी वातावरणातच गेली होती. पण माझी ती आवड असल्यामुळे मी त्यात रमले. ज्यावर माझा अतूट विश्वास होता त्या कार्यक्षेत्रात माझ्या हातून चांगली कामगिरी होत होती. माझं मन त्यात होते. तुला डॉक्टरी करण्यात जो आनंद मिळतोय तोच मला हे काम करताना मिळत असतो. आपण आपापल्या आवडीच्या क्षेत्रात कामं करतोय ह्याहून मला दुसरं काहीच महत्त्वाचं वाटत नाही.”

“केवळ तेवढ्याचसाठी तू मला निवडलंस?”

“सुरुवातीला तो हेतू होता.”

“नंतर गोष्टी बदलत गेल्या असं तुला म्हणायचंय?”

“काय बदललं हे तुलाही ठाऊक आहे. आपण एकमेकांच्या प्रेमात पडलो.”

“मी तुझ्या प्रेमात पडलो,” जोनाथन म्हणाला. “तू पडलीस ह्याची मला खात्री नाही.”

एम्माने त्याच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकला. “नाहीतर मी तुझ्याबरोबर राहिले नसते. तुझ्याशी लग्न करायची कोणी जबरदस्ती केली नव्हती माझ्यावर.”

“पण त्यांनी तुला अडवलंही नाही. तुला तुझ्यावर सोपवलेली कामं करण्याकरता दुर्गम आणि धोक्याच्या ठिकाणी जावं लागणार होतं आणि अशा खडतर ठिकाणीही अगदी आनंदाने काम करणारा डॉक्टरच जर आपला नवरा असला, तर तुझ्याकडे कुणी संशयाचं बोट उचलू शकणार नव्हतं. पण तू नेमकं काय काम करत होतीस? महत्त्वाच्या व्यक्तींना ठार मारण्याचं? आता ज्या माणसाला तू मारलंस, त्याच्यासारखी तू ही एक खुनी आहेस?”

“अर्थातच नाही.” आपण आयुष्यात कधीच पिस्तूल न चालवल्याच्या थाटात तिने त्याचे विधान उडवून लावलेले होते. तरी बरं की अर्ध्या तासापूर्वी त्याच्याच डोळ्यादेखत तिने दोघा जणांना ह्या जगाचा निरोप घ्यायला लावला होता.

“तर मग काय?”

“मी तुला सांगू शकत नाही.”

“तू, ब्लिट्झ आणि हॉफमन मिळून इराणला आण्विक शस्त्रास्त्रं बनवायला

साहाय्य करत होतात. युद्ध सुरू व्हावं अशी तुमची इच्छा होती आणि म्हणून तुम्ही इराणला मदत करताय असं जिन्नचं म्हणणं होतं. इराककडे WMD आहेत ह्याचा अगोदर पुरावा न सादर करता आम्ही मागच्या खेपेस इराकवर हल्ला करण्याची फार मोठी चूक केली होती. ही चूक आम्ही पुन्हा होऊन देणार नाही असं त्याने मला सांगितलं."

"परवेझने स्वतः हे तुला सांगितलं? तो कायमचा नरकात खितपत पडेल."

"अरे वा! ज्या पुरुषाशी तू संग केलास, त्याच्याबद्दल तू असे उद्‌गार काढतेस?"

"जोनाथन, भलतेसलते आरोप करू नकोस, हा अन्याय आहे."

"अन्याय? आठ वर्षं तू माझ्याशी खोटं बोलत होतीस. माझी बायको असल्याचा बहाणा करत होतीस. न्याय-अन्यायाच्या गोष्टी मला शिकवू नकोस."

"मी तुझी बायको आहे."

"असं तू म्हणू तरी कसं शकतेस? तुझं तर नावदेखील मला ठाऊक नाही."

एम्माने मान फिरवली. तिच्या डोळ्यात पाणी आले असेल असे त्याला क्षणभर वाटले. पण तसे अजिबात नव्हते. तिचा चेहरा दगडासारखा निबर होता.

"तर?" त्याने विचारले. "तुम्ही युद्ध सुरू करण्याच्या प्रयत्नात आहात?"

"उलट आम्ही युद्ध थोपवायचा प्रयत्न करतोय."

"आण्विक शस्त्र पुरवून?"

"आम्ही फक्त काही घटना लवकर घडाव्यात ह्याची व्यवस्था करतोय. कारण त्यानंतर उद्‌भवणाऱ्या परिस्थितीचं, आम्हीच योग्य नियंत्रण करू शकतो. ज्या गोष्टीसाठी आज इराण तडफडतंय, ती यंत्रणा आम्ही इराणला पुरवतोय, पण मग ह्याच इराणला आम्ही जगासमोर नागडं करणार आहोत. आम्हीच पुढाकार घेऊन, आम्हाला हव्या तशा गोष्टी घडवून आणणार आहोत. आता बेसावध राहाणं, आम्हाला परवडणार नाही. ह्या खेपेस नाहीच नाही. शिवाय ते युद्ध असणारच नाही. ती फक्त एक हवाई मोहीम असेल."

"मला बरं वाटावं म्हणून तू असं बोलतेयस?"

"उगाच इतका भाबडेपणाचा आव आणू नकोस. काही राष्ट्रांना आम्ही आण्विक शस्त्राचा साठाच करू देऊ इच्छित नाही. आज इराणने जर ती शस्त्र बाळगली तर काही दिवसांतच ती तुम्हाला अतिरेक्यांच्या हातात गेलेली दिसतील. आमचा मुख्य उद्देश हा आहे."

"पण जर त्यांनी सूड उगवायचं ठरवलं तर मग काय होऊ शकेल?"

"कशाच्या आधारावर ते सूड उगवणार?" एम्माने विचारले. "आम्ही त्यांना युरेनियमची क्षमता थोडीशी वाढवण्याकरता साधनसामग्री पुरवली. आम्ही तीच आता परत ताब्यात घेणार आहोत."

"जिन्न म्हणाला की त्यांच्याकडे कमी उंचीवरून जाऊ शकणारी स्वनियंत्रित क्षेपणास्त्र आहेत. जर आमच्या आण्विक केंद्रांवर कुणी हल्ला केला तर त्यांचा वापर करायला आम्ही कचरणार नाही. साऱ्या जगाला ही गोष्ट कळावी म्हणून इराणचे अध्यक्ष पुढल्या आठवड्यात ह्यासंबंधीची जाहीर घोषणा करणार आहेत."

"जिन्न खोटं बोलत होता," एम्मा अगदी ठामपणे म्हणाली; पण तिचा चेहरा उतरला होता. "इराणकडे अशी क्षेपणास्त्रं नाहीयेत."

“त्याने kh-55 असा त्यांचा उल्लेख केला. तो म्हणाला की वर्षापूर्वी अशी चार क्षेपणास्त्रं त्यांच्या ताब्यात आलेली आहेत आणि पर्शियन गल्फवरील कर्शुन तळावर त्यांनी ती ठेवलेली आहेत.”

“तो तुला थापा मारत होता.”

“पण ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याचा धोका तुम्ही पत्कराल? उद्या जर अमेरिका किंवा इराकने इराणवर बॉम्बहल्ला केला तर त्याला प्रत्युत्तर म्हणून तेहरानचे मुल्ला जेरुसलेम आणि सौदीच्या तेलखाणींवर हल्ला चढवतील. मग काय होईल?”

“देवा!” एम्मा शहारली, तिने जबडा आवळून धरला. “kh-55 ? तुझी नक्की खात्री आहे?”

“तुला माहितीये त्याबद्दल?”

“रशियन त्यांना ग्रॅनाट किंवा पोमग्नॅनेट म्हणतात. त्यांच्या टोकाला आण्विक स्फोटकं ठेवलेली असतात आणि ती प्रचंड वेगाने खूप दूर अंतरावर पोहोचू शकतात. खूप वर्षांपूर्वी त्यांची निर्मिती केलेली होती. आज जरी ती कालबाह्य वाटत असली तरी फार मोठा संहार करण्याची त्यांच्यात क्षमता आहे.”

“हे काही चांगलं चिन्ह नाही.”

“नक्कीच नाही.” एम्मा गोंधळून गेली होती. “डॅव्होसला भेटल्यावर मी तुला एक खास बातमी देणार आहे असं तो मला म्हणाला होता. कपटी, दुटप्पी साला.”

आपण तिची नस बरोबर पकडलीय हे जोनाथनच्या लक्षात आले होते. “पण तुझा जर तुझ्यावर इतका विश्वास होता तर तुला गायब होण्याचं कारणच काय होतं?”

“कसला विश्वास? असा विश्वास नाही ठेवता येत.” एम्माने वळून त्याच्याकडे पाहिले. “ड्रोन म्हणजे काय हे तुला माहीत आहे?”

“थोडंफार. दूरवर्ती नियंत्रण करू शकत येणारी विमानं. त्याच्यातून फोटो काढता येतात. त्यामधून क्षेपणास्त्रंही सोडता येतात असं मी ऐकलंय.”

“असंच एक विमान ह्या घडीला स्वित्झर्लंडमध्ये हल्ला करण्यासाठी उभं आहे. ही माहिती मलाही कळली नसती, पण ब्लिट्झ अनवधानाने बोलून गेला. त्यालाच ड्रोनसंबंधीचे अधिकार दिलेले होते आणि तो माझा बॉस होता. आजपर्यंत आपण केलेल्या कामामधली ती सर्वांत महत्त्वाची निर्मिती आहे असं तो मला म्हणाला होता. आमचा चीफ बॉस ते ड्रोन स्वत: नियंत्रित करणार होता.”

“तुला म्हणायचंय की... ती तुमची माणसं आहेत– ती ‘डिव्हिजन’– कुणावरती हल्ला करणार आहे?”

“कुणावरती नाही. एका प्रवासी विमानावर.”

“प्रवासी विमान खाली पाडणार? स्वित्झर्लंडमध्ये? बापरे... एम्मा आपण ही गोष्ट पोलिसांना कळवली पाहिजे.”

“त्यांना ही गोष्ट आधीच कळलीये. डॅव्होसला ज्याने तुला अडवलं होतं, तोच पोलीस अधिकारी ड्रोनचा तपास करतोय. त्याचं नाव मार्क्स व्हॉन डॅनिकन. तो ‘सॅप’चा प्रमुख आहे आणि तूच ह्या कारस्थानाचा सूत्रधार आहेस अशी त्याला खात्री आहे.”

“मी?”

“तो माझ्याजागी तुला पाहतोय.”

“का पण? मी ब्लिट्झच्या घरात पोहोचलो होतो, म्हणून?”

“हो. अनेक कारणांपैकी तेही एक कारण आहे. पोलिसांकडे न जाण्याचा तुझा निर्णय हा शहाणपणाचा होता. नाहीतर तू आयुष्यभर तुरुंगात अडकला असतास. पोलिसांना मारणं हा तर फार छोटा गुन्हा होता. तुला थॉरबद्दल खूप काही ठाऊक आहे... डिव्हिजनबद्दलसुद्धा तुला बरीच माहिती आहे. आम्ही बरेच मित्र गोळा केलेले आहेत. ते आम्हाला ही सर्व माहिती पुरवतात. म्हणून तर मला अदृश्य व्हावं लागलं. मला हे सर्व प्रकरण बंद करून टाकायचं होतं. माझे हात रक्ताने माखलेले आहेत. पण अजून माझ्या हातांनी एकदाही निरपराध माणसाचा बळी घेतलेला नाही.”

“हा हल्ला कधी केला जाणार हे तुला ठाऊक आहे?”

“काही तासांतच.”

“मग तू इथे काय करत बसलीयेस?”

एम्माने पहिल्यांदाच त्याच्या डोळ्यात खोलवर पाहिलं. “मी अजूनही तुझी बायको आहे.”

तिने हात पुढे केला आणि जोनाथनने तिच्या बोटात बोटे गुंतवली.

“आपण व्हॉन डॅनिकनला सांगायला हवं.”

एम्माच्या डोळ्यात पाणी तरारले होते. “पण ते इतकं सोपं नाही.”

७६

झुरिच क्लॉटन विमानतळावरील पासपोर्ट नियंत्रक बूथमध्ये बसलेल्या अधिकाऱ्याने त्याच्या समोर उभ्या असलेल्या लांब रांगेकडे एक नजर टाकली. नुकतीच वॉशिंग्टन फ्लाईट आलेली होती. त्याने आपला मॉनिटर सुरू करून संशयित प्रवाशांबद्दल काही सूचना आल्या आहेत का हे तपासून पाहिले. तसा काही इशारा दिलेला नव्हता. रांगेत उभ्या असलेल्या सुखासीन चेहऱ्यांकडे व त्यांच्या सुटलेल्या ढेऱ्यांकडे त्याने बराच वेळ टक लावून पाहिले. त्याला त्या रांगेत एकही शंकास्पद व्यक्तिमत्त्व आढळले नाही.

"चला, पुढचा येऊ देत." तो ओरडला.

एक जाडजूड उंच सद्गृहस्थ समोर आला व त्याने आपला पासपोर्ट काऊंटरवर ठेवला. अधिकाऱ्याने तो पासपोर्ट स्कॅनरमध्ये टाकला व तो माहिती वाचू लागला. नाव : लिओनार्ड ब्लेक. गाव : पाम बीच. जन्मतारीख : १ जानेवारी, १९५५.

"मिस्टर ब्लेक, तुम्ही इथे येण्याचं कारण?"

"धंद्यानिमित्त."

त्याने फोटोवरून त्या माणसाला निरखले. राखाडी केस. तांबूस त्वचा. बारीक केलेली मिशी. महागडा गॉगल. गोल्ड रोलेक्स आणि पॉलिएस्टरचा ट्रॅकसूट. ह्या अमेरिकनांना कुठला पोशाख घालावा हे कधी कळणार, कोण जाणे!

"मुक्काम किती दिवस आहे?"

"फक्त एक किंवा दोन दिवस."

अधिकाऱ्याने मॉनिस्टर तपासला. ब्लेकच्या नावासमोर कसल्याही खाणाखुणा नव्हत्या. आणखी एक अरसिक धनवान अमेरिकन. त्याने जोरात शिक्का मारला. "तुमचा मुक्काम आनंददायी होवो."

"धन्यवाद."

अधिकारी पुढच्या व्यक्तीकडे वळला.

मिस्टर लिओनार्ड ब्लेकने आपले सामान ताब्यात घेतले व तो वाहन तळाच्या दिशेने जाऊ लागला. त्याने आधीच एक गाडी आरक्षित केलेली होती. जरुरी कागदपत्रांवर सही करून तो पार्किंग गॅरेजमध्ये आला. गाडी उभी होती. मागच्या सीटवर सामान टाकून तो स्टिअरिंग व्हीलमागे बसला. सीट व आरसे अॅडजस्ट करण्यात त्याने मिनिटभर घालवले. त्या वेळेतही तो पार्किंग लॉट निरखत होता. सर्वत्र स्मशानशांतता होती. त्याने ट्रॅकसूटची झिप खाली केली आणि आत कोंबलेले पॅडिंग भराभर काढून टाकले. पॅडिंगमुळे त्याचे वजन वीस पौंडाने वाढले होते आणि पोट आठ इंच पुढे आले होते. पॅडिंग मागच्या सीटवर फेकून देत त्याने गाडी सुरू केली व तो गॅरेजबाहेर पडला.

त्याने दक्षिणेकडचा हायवे पकडला. वीस मिनिटांत तो शहराच्या भर वस्तीत

पोहोचला होता. तालस्ट्रॅस्सेला त्याने गाडी पार्क केली व बान्होफस्ट्रॅस्सेपर्यंत दोन चौक तो चालत गेला. झुरिच तलावापासून स्टेशनपर्यंत जाणारा तो रस्ता अतिशय प्रसिद्ध होता. रस्त्यावर उंची हॉटेल्स आणि महागड्या कपड्यांची व वस्तूंची अनेक दुकाने होती. झुरिचमधली ती सर्वांत श्रीमंत वस्ती होती. पण लिओनार्ड ब्लेक खरेदी करण्यासाठी तिथे आलेला नव्हता.

तो तलावाच्या बाजूला असलेल्या चिंचोळ्या गल्लीत शिरला. दुकानांच्या शोकेसेपाशी तो रेंगाळला व काचेमधून मागच्या माणसांचे निरीक्षण करत राहिला. काळजी करण्यासारखे काही कारण नसल्याची खात्री पटल्यावर तो भराभर चालू लागला.

उजव्या बाजूच्या तिसऱ्या प्रवेशद्वारापाशी तो थांबला. भल्यामोठ्या लाकडी दरवाजावर एकच पाटी होती. त्यावर 'G ' व 'B ' ही अक्षरे एकमेकांत अडकवलेली होती. ग्रेसलर बँक.

वॉचमनने त्याचे स्वागत केले. ब्लेकने एका स्लिपवर आपले नाव व खात्याचा क्रमांक लिहिला. वॉचमनने फोन लावला. काही वेळाने समोरच्या लांबलचक पॅसेजमधून बँकेचा अधिकारी येताना दिसला. "गुड मॉर्निंग मिस्टर ब्लेक," सफाईदार इंग्रजी उच्चारात त्याने ब्लेकचे स्वागत केले. "मी आपली काय सेवा करू?"

"मला सेफ डिपॉझिट बॉक्स उघडायचाय."

"माझ्यामागून या."

दोघे जण लिफ्टमध्ये चढले. लिफ्ट तीन मजले खाली असलेल्या एका तळघरापाशी येऊन थांबली. दरवाजापाशी दोन सशस्त्र रक्षक उभे होते. ब्लेकला एका छोट्या खोलीत नेण्यात आले. त्याने आपल्याजवळची किल्ली अधिकाऱ्याच्या हातात दिली. एका मिनिटाने हातात एक मोठा सेफ डिपॉझिट बॉक्स घेऊन तो अधिकारी परत आला. "काम झाल्यावर मला फोन करून बोलाव."

ब्लेकने खोलीचा दरवाजा बंद केला व लॉक लावून घेतले. तसे करण्याची खरे तर काहीच गरज नव्हती. गॉगल काढत तो खुर्चीवर बसला.

आपण कोणत्याही क्षणी पूर्ण सुरक्षित असल्याची खात्री देऊ शकत नाही. बॉक्स उघडता उघडता फिलिप पालुंबोच्या मनात विचार आला. त्याने एक तपकिरी रंगाचा लिफाफा बाहेर काढला. त्यात त्याचा व त्याच्या सर्व कुटुंबीयांचे ब्राझिलियन पासपोर्ट्स होते. परेराज ह्या नावाने. बॉक्समध्ये स्विस फ्रँक्स, युएस डॉलर्स व युरोज मिळून एक लाख डॉलर्स किमतीच्या नोटा होत्या. ती सर्व कायदेशीर कमाई होती व त्याने त्यावरचा आयकर भरलेला होता. तो त्याचा गुप्त खजिना होता. तो ज्या प्रकारचे काम करत होता, त्यात त्याने अतिशय धोकेबाज शत्रू निर्माण केलेले होते. एक दिवस ते आपल्या अंगावर चाल करून येणार याची त्याला जाणीव होती. त्यासाठी तो तयारही होता. त्याने दहा हजार डॉलर्सचे एक पॅकेट उचलले. खरे तर तो सगळे पैसे उचलून फरार होऊ शकत होता. अख्ख्या पृथ्वीवर त्याने पाच ठिकाणी सुरक्षित बिळे खणून ठेवला होती. त्याला पकडण्यासाठी खूप वर्षे जावी लागली असती.

त्याने हातातले पैसे पुन्हा बॉक्समध्ये ठेवले.

पळून जाण्यासाठी तो जन्माला आलेला नव्हता.

त्याच्या हिशेबाप्रमाणे, मोहीम फत्ते करून घरी परतण्यासाठी छत्तीस तासांचा अवधी होता. ह्या घटकेपासून एक तासाने, म्हणजे पूर्वेकडील प्रमाणित वेळेनुसार अंदाजे सात वाजता अॅडमिरल लॅफेव्हरचं प्रेत, त्याच्या ड्रायव्हरला सापडलेले असेल. ड्रायव्हरला घरफोडी झाल्याचे दिसेल व आपल्या अभ्यासिकेत चोराशी प्रतिकार करताना मरून पडलेला आपला मालकही दिसेल. काही वेळातच पोलीस हजर होतील. नऊ वाजता लँग्लेपर्यंत बातमी पोहोचलेली असेल. संचालकाने सर्व गोष्टी पडताळून बघेपर्यंत व खुनासंबंधीची एक सर्वांना पटेल अशी कथा रचली जाईपर्यंत ती बातमी गुप्त ठेवण्यात येईल. ती घरफोडी आहे असं भासवण्याचा जरी आपण आटोकाट प्रयत्न केलेला असला, तरी त्यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही हे पालुंबो समजून होता.

अजून तीन तासांनंतर ती बातमी जाहीर केली जाईल. त्या वेळेस वॉशिंग्टनमध्ये दुपारचे तीन वाजलेले असतील व झुरिचमध्ये संध्याकाळचे सहा. चौकशीला वेग येऊ लागेल. लॅफेव्हरच्या त्या दिवशी ठरलेल्या गाठीभेटी तपासल्या जातील, त्याच्या अतिशय जवळच्या सहकाऱ्यांना प्रश्न विचारले जातील. आणि मग ती वेळ येईल– आज दुपारपर्यंत किंवा कदाचित उद्या सकाळी- जो लेही आपणहून त्यांना भेटेल आणि दोन दिवसांपूर्वी पालुंबोबरोबर कॉफी पिताना झालेल्या संभाषणाचा उल्लेख करेल. पालुंबोने लॅफेव्हर आणि मोर्निंग डोव्हबद्दल विशेष रस दाखवला होता, ह्या गोष्टीची नोंद केली जाईल. पण ह्यासारख्या आणखी अनेक संशयित व्यक्तींचीही नोंद झालेली असेल. संघटनेच्या बाहेर अनेक शत्रू निर्माण केल्याशिवाय कुणी कार्यकारी उपसंचालक– देशाच्या हेरखात्याचा प्रमुख होऊ शकत नाही. जर ह्या संदर्भात एजन्सीकडून घरी फोन आलाच तर त्यावर काय उत्तर द्यायचे हे पालुंबोच्या बायकोला पक्के ठाऊक होते. तिने पालुंबोच्या मोबाईलवर फोन केला असता व नंतर पालुंबोने ताबडतोब ऑफिसात फोन लावला असता. पालुंबोच्या मुलाखतीला काही विशेष प्राधान्य दिले गेले नसते.

पण तरीही कुठल्या ना कुठल्या क्षणी व्हर्जिनिया पोलीस खात्याला लॅफेव्हरच्या मेंदूचे तुकडे घराच्या मागच्या अंगणात सापडतीलच आणि प्रेत हलवले गेलेय हे त्याच्या लक्षात येईल. त्यानंतर मात्र वेगाने चक्रे फिरू लागतील.

जास्तीतजास्त छत्तीस तास.

पालुंबोने बॉक्समधून दुसरा लिफाफा उचलला. हा पहिल्यापेक्षा चांगलाच जड होता. त्याने तो उघडला व आतील वस्तू टेबलावर ठेवला. त्या वॉल्दर पीपीकेला तीन वर्षांत त्याने स्पर्शदेखील केलेला नव्हता. त्याने ते पिस्तूल व मॅगझीन तपासून पाहिले. पिस्तूल सुस्थितीत असल्याचे पाहून त्याला समाधान वाटले. पाकिटात सायलेन्सरदेखील होता, पण आज त्याची गरज नाहीये असा त्याने विचार केला.

त्याने बॉक्स बंद करून कुलूप लावले व बँक अधिकाऱ्याला फोन केला.

पाचव्या मिनिटाला तो पुन्हा रस्त्यावर आला होता.

गाडीने लिम्मॅटब्रूक पार करून जेव्हा ती गर्दीच्या सीफेल्ड जिल्ह्यात शिरली, तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. तलावापासून एका चौकाजवळ असलेली एक खडबडीत व्यापारी इमारत हे आता त्याचे लक्षय होते. ४७, ड्यूफोर्स्ट्रॅस्सेच्या समोरील रस्त्यांवर पिवळसर हिरवे गणवेश परिधान केलेले व हातात अमेरिकन बनावटीच्या M16A1 मशिनगन्स घेतलेल्या सैनिकांचे पथक गस्त घालत होते. दोन साध्या वेषातील स्थानिक पोलीसही

त्यांच्यासोबत पाळत ठेवून होते. कारण तिथे अमेरिकन वकिलातीचे कार्यालय होते.

इमारतीसमोर तीन काळ्या मर्सिडिज गाड्या उभ्या होत्या. तीनही गाड्यांवरती अतिमहत्त्वाच्या सरकारी व्यक्तींसाठी वापरण्यात येणाऱ्या खास नंबरप्लेट्स होत्या व गाड्यांच्या उजव्या कोपऱ्यात छोट्या आकारांचे झेंडे लावलेले होते. 'डिव्हिजन' ह्या गुप्तहेर संघटनेचा जनक व संचालक, मेजर जनरल जॉन ऑस्टिन आपल्या ऑफिसात असल्याचाच हा पक्का पुरावा होता.

CIA च्या सर्व खात्यात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा तो महानायक होता. त्याच्यासारखे कर्तृत्व दाखवावे अशी प्रत्येकाचीच महत्त्वाकांक्षा होती. शत्रूंसाठी तो कर्दनकाळ होता. त्याच्या पदोन्नतीचा आलेख अगदी सरळ रेषेत वर चढत गेलेला होता. किंवा त्याच्याच भाषेत सांगायचे तर एका अध:पतित देवदूताचे पुनरुत्थान करून त्याला प्रभूच्या जणू उजव्या हाताचे स्थान दिलेले होते. इथे प्रभू म्हणजे अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होता.

त्याने १९६७ साली हवाई दलाच्या शैक्षणिक संस्थेतून सन्माननीय पदवी संपादन केली होती. ऑस्टिनला जेट वैमानिकाचे प्रशिक्षण देऊन व्हिएतनामला पाठवण्यात आले. तिथे त्याने F-4 फँटमच्या साहाय्याने १२० मोहिमा यशस्वी करून दाखवल्या आणि उत्तर व्हिएतनामची नऊ मिग विमाने पाडली होती. युद्धामध्ये अव्वल क्रमांक मिळवून तो मायदेशी परतला आणि तिसावे वर्ष लागण्याआधीच मेजर झाला होता.

पण त्याच्या चिलखताला अनेक भोकेही पडलेली होती. ज्या वेळेस त्याच्या हातात विमान नसे, त्या वेळेस त्याच्या हातात दारुचा ग्लास असे. रात्रीमागून रात्री तो आपल्या खुशालचेंडू साथीदारांसोबत सायगॉनच्या बदनाम वेश्यावस्तीत पडलेला असे. आकंठ दारू प्यायची व समोर येईल त्या बाईला भोगायची. त्याचे साथीदार स्वत:ला ऑस्टिनचे रेंजर्स म्हणवून घेत. दुसऱ्या महायुद्धातील एका गाजलेल्या लुटारू पथकाला 'रेंजर्स' असे नाव दिलेले होते. त्या पथकाच्या सन्मानार्थ त्यांनी हे नाव धारण केले होते. ते ड्रग्ज घ्यायचे, बलात्कार करायचे व एका प्रसंगी त्यांच्या हातून एक खून घडल्याचीही सर्वत्र वदंता पसरलेली होती. पण अफवा दडपण्यात आल्या. आपल्या हिरोच्या प्रतिमेला धक्का लावायची, मलिन करायची किंवा तिची चिरफाड करायची कुणाचीच बिशाद नव्हती.

१९७९ साल उजाडले आणि इराणच्या ओलीस ठेवलेल्या कैद्यांचा प्रश्न उग्र बनला. कर्नल चार्ली बेक्विथने तयार केलेल्या खास तुकडीत ऑस्टिनची निवड अपरिहार्यच होती. ऑस्टिनने महाकाय विमानातून लष्करी कमांडोंची इराणच्या वाळवंटात ने-आण केली. पण अखेर नशिबाने त्याला दगा दिला. आठ जवानांचा जीव घेणाऱ्या त्या अपघातात तोही भाजला गेला. वाळवंटातून मायदेशी परतला तेव्हा त्याच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल झाला होता. त्याने निवृत्ती नाकारली. भाजलेल्या शरीराशी शर्थीने झुंज देत तो पुन्हा खडखडीत बरा झाला. तंपा, फ्लोरिडा येथील मॅक्डिल हवाईतळावर नव्याने निर्माण केलेल्या 'स्पेशल ऑपरेशन्स कमांड'चा संचालक म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली. आपण त्या भयानक अपघातातून वाचलो हा प्रभूचा चमत्कार होता, असे त्याच्या मनाने घेतले व त्याने आपले आयुष्य येशू

ख्रिस्ताच्या चरणावर वाहून टाकले.

मद्यप्राशनाऐवजी त्याने आपल्या घरात बायबल अध्यापनाचे वर्ग सुरू केले. तो प्रार्थना सभा भरवू लागला. मंगळवार व शुक्रवार रात्री, ऑरेंज लेनमधील ऑस्टिनचे घर हे पापक्षालनासाठी आलेल्या दुराचरणी लोकांनी व पदोन्नती आणि प्रसिद्धीच्या आकांक्षेने झपाटलेल्या लष्करी अधिकाऱ्यांच्या गर्दीने भरू लागले. ऑस्टिनने लवकरच देशातील चारही संरक्षण सेवेतल्या निवडक अधिकाऱ्यांचे 'एकनिष्ठ दल' तयार केले. कुणी त्याला 'गुलामांचे दल' म्हणत असत. पण ह्या दलातील स्वयंसेवकही स्वत:ला 'ऑस्टिन रेंजर्स' म्हणवून घेऊ लागले. मात्र ह्याखेपेस ते एकनिष्ठ साथीदार ख्रिस्ताच्या शिकवणुकीचा प्रसार करू लागले व त्याचबरोबर आपल्या संस्थापकाच्या अतिआक्रमक राजकीय मतांचाही आग्रह धरु लागले. सर्व दुनियेला लोकशाहीची ललकारी देणारे अमेरिकन राष्ट्र हे आता जगातील सर्वांत श्रीमंत व संपन्न राष्ट्र बनले होते. इस्त्राईल हे त्यांचे अतिशय जवळचे मित्रराष्ट्र होते व इस्त्राइलचे संरक्षण करण्यासाठी कुठल्याही पातळीवर जायची त्यांची तयारी होती.

ऑस्टिनची कारकीर्द अगदी अलगद उंचावत गेली होती. चाळिसाव्या वर्षी कर्नल, त्रेचाळिसाव्या वर्षी ब्रिगेडियर जनरल आणि सेहेचाळीस पूर्ण होण्याआधीच त्याने दुसरा 'स्टार'ही पटकावला होता. दर रविवारी टीव्हीवर होणाऱ्या ख्रिस्त अनुयायांच्या लोकप्रिय कार्यक्रमात त्याची कायम हजेरी असे. दैवी योद्धा व येशूचा सारथी ह्या नावाने त्याचा गौरव केला जाई. धार्मिक हक्कांचा तो खंदा पुरस्कर्ता बनला.

आणि त्यानंतर मात्र त्याची कारकीर्द अचानक ठप्प झाल्यासारखी वाटली. त्याला तिसरा 'स्टार' कधी मिळालाच नाही व त्यासोबत होणाऱ्या पदोन्नतीचाही त्याला लाभ मिळाला नाही. टी.व्ही.वरही तो दिसेनासा झाला. पेंटेगॉनच्या मानवी संरक्षण हेर खात्याचा प्रमुख म्हणून त्याला नेमण्यात आले व तिथेच तो कायमचा स्थायिक झाला व लोकांच्या दृष्टीने परागंदा झाला. पण लष्करी वर्तुळात मात्र त्याच्या अस्तित्वाची दखल घेतली जात होती. ऑस्टिन रेंजर्समधले शेकडो अनुयायी आता लष्करात जनरल झाले होते व नौदलात अॅडमिरलची पदे भूषवित होते. ते अजूनही ऑस्टिनचे भक्त होते.

त्याच वेळेस ऑस्टिनने 'डिव्हिजन'ची स्थापना केली असणार हे पालुंबोच्या आता लक्षात आले होते. त्याचे पृथ्वीवरून उच्चाटन झाले नव्हते. उलट त्याने एका वैभवशाली दुनियेत प्रवेश केला होता.

पालुंबो गाडी चालवत आणखी शंभर मीटर पुढे गेला. गाडी पार्क करण्यासाठी एक रिकामी जागा दिसताच त्याला कमालीचा आनंद झाला. आज नशीब आपल्यावर फिदा दिसतेय असेही तो मनातल्या मनात म्हणाला. आपण उगाचच नसत्या गोष्टीच्या मागे लागून आपली कारकीर्द बरबाद करतोय आणि बायकोमुलांच्या बाबतीत बेपर्वाईने वागतोय अशी शंका त्याला भेडसावत होती. आपल्या हळव्या झालेल्या मनावर फुंकर मारण्यासाठी त्याला मधूनमधून अशी नशिबाची साथ फार गरजेची वाटू लागली होती. गाडी बंद करून त्याने आपली कामाची बॅग मांडीवर घेतली. त्यामध्ये दोन सेलफोन्स, एक टेसर गन व GSM चे ध्वनिलहरी अडवणारे उपकरण होते. तो लॅपटॉपसाठी पर्याय होता. त्याने ते उपकरण सुरू केले व ४५५ क्रमांकाने सुरू होणाऱ्या ध्वनिलहरींचा तो

शोध घेऊ लागला. अमेरिकन वकिलातीकडून आपल्या कर्मचाऱ्यांना केल्या जाणाऱ्या फोन कॉल्सचा तो आद्य क्रमांक होता. फोन कानाला लावून तो वेगवेगळ्या ठिकाणी चाललेली संभाषण ऐकू लागला.

जॉन ऑस्टिनला पकडणे अवघड नव्हते. तो नेहमीच स्वत:ला पूर्ण संरक्षणात ठेवत असे. मेजर जनरल आणि संचालक असल्यामुळे त्याचा दैनंदिन कार्यक्रम कायम जाहीर केला जात असे. पालुंबोच्या CIA ऑफिसमधून ऑस्टिनच्या ऑफिसात केल्या गेलेल्या फोनवरून त्याला समजले होते की, मध्यंतरी ऑस्टिनने पश्चिम युरोपीय राजधानींच्या शहराला भेट दिली होती आणि त्याच्या हाताखाली असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला होता. आठवड्याच्या सुरुवातीला तो बर्नच्या दूतावासात जाऊन आला होता व पॅरिस आणि रोमलाही भेट दिली होती. शुक्रवारी दुपारी दोन वाजता तो झुरिचमधील अमेरिकन वकिलातीत जाणार होता. तिथल्या वकिलातीला लष्करी संरक्षण पुरवलेले नाही ही बाब पालुंबो सोडून कुणीही हेरलेली नव्हती. ऑस्टिनच्या झुरिच भेटीमागील खरे कारण त्याला ठाऊक होते व ड्रोन हेच ते कारण होते. दुसऱ्या दिवशी सकाळी तो अमेरिकेला जाणार आहे ही माहितीही त्याने मिळवली होती. त्या मधल्या काळात मात्र तो काय करणार ह्या विचाराने पालुंबोला धडकी भरली होती.

त्याने जवळजवळ अर्धा डझन संभाषणे ऐकली असतील आणि अचानक त्याच्या कानावर इंग्रजी उच्चार पडले.

“आम्ही निघतोच आहोत. सर्व तयारी झाली आहे ना?”

ऑस्टिनचा तो टेक्सन हेल त्याने निमिषार्धात ओळखला.

“निघायला काहीच हरकत नाही सर,” उत्तर आलं होते. “आम्ही तुमचीच वाट पाहतोय.”

“मी अर्ध्या तासात तिथे पोहोचतो.”

संभाषण आटोपले. पालुंबोने GPS आता नकाशाला जोडला. लाल ठिपक्यावरून तो फोन कुठून केलेला होता हे समजत होते. झुरिचच्या रस्त्यावर लाल ठिपका उमटला होता. ४७, ड्युर्फोस्ट्रॅस्से हा अमेरिकन वकिलातीचा पत्ता होता. ज्या ठिकाणी फोन केला गेला होता ते स्थळ होते, ग्लॅट्टब्रुग. ते शहर अगदी झुरिचला लागूनच होते. पत्त्यापेक्षा ती जागा लक्ष वेधून घेणारी होती. ठिपका सरकत सरकत झुरिच विमानतळापासून दक्षिणेला शंभर मीटरवर स्थिरावला. चला, काम झाले होते.

गाडीतल्या आरशामधून माणसांचा समूह इमारतीबाहेर येताना त्याला दिसला. सर्व जण पटापट मर्सिडिज गाड्यांमध्ये जाऊन बसले. संचालकाची भेट आटोपलेली होती. गाड्या रस्त्यावर येऊन पालुंबोच्या बाजूने निघून गेल्या. एकेरी वाहतुकीच्या त्या भर गर्दीच्या रस्त्यावरून त्या गाड्यांचा पाठलाग करण्यात काहीच अर्थ नव्हता. एक तर तो रस्ता चुकला तरी असता किंवा पकडला गेला असता. लॅपटॉप शेजारच्या सीटवर ठेवून त्याने गाडी सुरू केली. ऑस्टिन कुठे निघालाय हे आता त्याला ठाऊक होते. व्यूहरचना करणे ही अडचण नव्हती. ती कार्यान्वित कशी करायची हा प्रश्न होता. पालुंबोने तिथे आधी पोहोचणे आवश्यक होते.

त्याने भन्नाट वेगाने गाडी चालवली. ट्रॅम्स चुकवत, पिवळ्या सिग्नलकडे दुर्लक्ष करत त्याने एकशे ऐंशीच्या वेगाने गाडी ऑटोबन्हपर्यंत आणली. गाडी चालवत असताना

तो सतत ऑस्टिनचे फोन कॉल्स ऐकत होता. त्यातले बरेचसे कॉल्स त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनी ऑफिसच्या कामासंदर्भात केलेले होते. काही कॉल्स मात्र गूढ वाटत होते. नावे सांगितली गेली नव्हती. संभाषणे त्रोटक होती. 'कमांड केंद्राला कुलूप लावले,' 'मुख्य ठिकाणी निघालोय,' आणि सर्वांत भीतिदायक वाटलेले शब्द म्हणजे, 'पाहुणा वेळेवर येतोय.'

पालुंबो अठरा मिनिटांत ग्लॅट्टब्रुगला पोहोचला. त्याला हवा असलेला पत्ता त्याने चटकन शोधून काढला. तुरळक घरे व भरपूर झाडांनी वेढलेल्या त्या परिसरात कमालीची शांतता होती. रस्त्याच्या एका बाजूला काही गाड्या पार्क केलेल्या होत्या. त्यामागे पालुंबोने आपली गाडी लावली. गाडी पार्क करत असतानाच त्याला मागून येणारी मर्सिडिज दिसली. अपेक्षेप्रमाणे एकच गाडी आली होती. ऑस्टिनने सर्व संरक्षण झुगारून दिले होते. तो आता फक्त डिव्हिजनचा प्रमुख या नात्याने पुढची जबाबदारी पार पाडणार होता.

पालुंबोच्या बाजूने जेव्हा ती मर्सिडिज पुढे निघून गेली तेव्हा त्याला ऑस्टिनचे निसटते दर्शन घडले. राखाडी केस, खानदानी व्यक्तिमत्त्व, चेहऱ्यावरची कातडी घट्ट, ताणून बसवल्यासारखी आणि कपाळावर आठ्यांचे जाळे.

भाजलेले शरीर. ऑस्टिनच्या शौर्याची खूण.

पालुंबोने गाडी सुरू केली व तो मर्सिडिजच्या मागून जाऊ लागला. शंभर मीटरवर रस्ता संपत होता. मर्सिडिज थांबली. पालुंबोने आपली गाडी मर्सिडिजच्या मागे चिकटवून लावली व ऑस्टिनचा परतीचा मार्ग बंद करून टाकला. विजेच्या वेगाने तो मर्सिडिजपाशी पोहोचला होता. ड्रायव्हरच्या खिडकीपाशी त्याने हातातला बिल्ला दाबून धरला. बिल्ला खोटा होता पण त्यामुळे त्याला काही सेकंदांची फुरसत मिळाली.

ड्रायव्हरने दरवाजा उघडला व हात उंच करत तो गाडीबाहेर आला. पालुंबोने त्याला गुडघ्यावर खाली पाडले व हातातली टेसर त्याच्या मानेत खुपसली. दहा हजार व्होल्टच्या झटक्याने तो जमिनीवर कोसळून बेशुद्ध पडला. पालुंबो ड्रायव्हर सीटवर बसला आणि त्याने खाडकन दरवाजा लावून घेतला. "हॅलो जनरल," तो म्हणाला.

"कोण आहेस तू?" जॉन ऑस्टिनने विचारलं.

पालुंबोपाशी स्पष्टीकरण देण्याएवढा वेळ नव्हता. "सारं संपलंय." तो म्हणाला. "आम्ही ह्या क्षणाला हे ऑपरेशन बंद करून टाकतोय."

"तू काय बरळतोयस?"

पालुंबोने टेसर खाली टाकली व वॉल्दर पिस्तूल हातात ठेवले. "तू कुठलं विमान उडवणार आहेस?" त्याने सरळसरळ जाब विचारला.

"माझ्या ड्रायव्हरवर हात उचलण्याची तुझी हिंमत तरी कशी झाली?"

"मी विचारलं, तू कुठलं विमान उडवणार आहेस."

"आधी माझ्या गाडीतून बाहेर हो."

पालुंबोने आपला अंगठा, ऑस्टिनचा कान व जबडा ह्यामधील खळग्यात जोराने खुपसला व तसाच दाबून धरला. जनरलचे तोंड गोठल्यासारखे शांत झाले. पक्षाघात झाल्यासारखा तो कळवळला. तलवारीचे पाते कवटीतून फिरावे तशा त्याच्या मेंदूला झिणझिण्या येत होत्या. "तू कुठलं विमान पाडायचा बेत रचलायस?" पालुंबोने फिरून

तोच प्रश्न केला. त्याने दाबलेला अंगठा थोडा सैल केला आणि ऑस्टिनचा एकदम पुढच्या बाजूला तोल गेला.

“तुला कोणी पाठवलं?” ऑस्टिनला दम लागला होता. “लॅफेव्हरने? लॅमर्स आणि ब्लिट्झला तूच मारलंस?”

पालुंबोने त्याच्या गालावर पिस्तुलाचे टोक टेकवले. ड्रमसारखी त्याच्या चेहऱ्यावर कातडी घट्ट ओढून बसवलेली होती. “ड्रोन कुठे आहे? बोलला नाहीस तर तुझ्या कवटीत गोळी घुसवीन.”

“तुझी तेवढी हिंमत नाही.”

“खात्री आहे तुझी?”

“तुला करायचं ते कर. मला काही फरक पडत नाही.”

“फरक तर नक्कीच पडेल. तू मेलेला असशील आणि विमानातल्या शेकडो निरपराध लोकांच्या बळी घेण्यासाठी ड्रोन आकाशात उडालेलंच नसेल.”

“इथे कोणीही निरपराध नसतो. पापामधूनच सर्वांचा जन्म झालेला असतो.”

“फक्त स्वत:बद्दल बोल. तुझं मुख्य केंद्र कुठे आहे? मी मुख्य केंद्राकडे निघालोय असं मी तुझ्याच तोंडून ऐकलंय.”

ऑस्टिनने डोळे मिटले. “मी आनंदात आहे. माझ्यापाशी काहीही नाही. मी कुणीही नाही.” तो प्रार्थना म्हणत होता. “प्रकाशित प्रभूच्या प्रतिमेशिवाय माझ्या दृष्टीसमोर दुसरे काहीही नाही. प्रभूची इच्छा साकार व्हावी ह्याखेरीज दुसरी कसलीही इच्छा नाही.”

पालुंबोने खिडकीतून बाहेर पाहिले. ड्रायव्हर अजून शुद्धीत आला नव्हता. गॅरेजच्या वरच्या खिडकीतल्या पडद्यामागे त्याला हालचाल जाणवली. त्याने पुन्हा अंगठा खुपसला आणि ह्या वेळेस जास्त वेळ दाबून धरला. “ड्रोन कुठे आहे? इथेच आहे? हेच मुख्य केंद्र आहे?”

त्याने पकड ढिली केली.

ऑस्टिन त्याच्याकडे टक लावून पाहात होता. त्याच्या डोळ्यांत पाणी होते. पण ते पाणी वेदनेमुळे आले आहे की, ऑस्टिनला वाटणाऱ्या आध्यात्मिक समाधानातून आले आहे, हे पालुंबोला कळेना.

“आभारी आहे.” ऑस्टिन म्हणाला.

“कशाबद्दल?”

“येशूलाही अग्निपरीक्षेतून जावे लागले होते. त्याने चिकाटी धरली व आपले उद्दिष्ट साध्य केले. आता माझी पाळी आहे.”

“येशू खुनी नव्हता.”

“तुझ्या लक्षात येत नाहीये का? रेव्हेलेशनमध्ये केल्या गेलेल्या भविष्यवाणीप्रमाणेच आज सारी परिस्थिती आहे. इस्त्रायलने जेरुसलेमचा ताबा मिळवलाय. प्रभू पुन्हा पृथ्वीवर अवतार घेणार आहे. तुम्ही कोणतीही गोष्ट थांबवू शकत नाही. आपल्यापैकी कुणीच नाही. आपण फक्त ती गोष्ट घडू द्यायला साहाय्यभूत होऊ शकतो.”

तो पिसाटलाय, पालुंबोच्या मनात विचार आला. “तुम्ही कुठल्या विमानाचा पाठलाग

करणार आहे? मला ठाऊक आहे की ते आज रात्रीचे विमान आहे.”

पण ऑस्टिन त्याचे बोलणे ऐकतही नव्हता. तो फक्त आपला आतला आवाज ऐकत होता. “प्रभू माझ्याशी बोलला. मीच त्याच्या इच्छेचा वाहक आहे असं तो मला म्हणाला. तू मला अडवू शकत नाही. तो तुला तसे करू देणार नाही.”

“सगळं आपल्या इच्छेवर असते. दुसऱ्या कुणाच्या नाही.”

दरवाजा धाडकन बंद केल्याचा, बाहेर आवाज झाला. एका घराच्या जिन्यावर दोन माणसे उभी होती. पालुंबोने गाडी सुरू करायचा प्रयत्न केला पण तिथे चावीच नव्हती. त्याने ऑस्टिनकडे पाहिले. ऑस्टिन त्याच्याकडे बेडरपणे पाहत होता. पालुंबोच्या लक्षात आले की, ऑस्टिनच ड्रोन चालवणार होता.

पालुंबोने ऑस्टिनच्या कपाळावर पिस्तूल चिकटवले. “मी तुला त्या माणसांना मारू देणार नाही.”

त्याच्या डाव्या बाजूला एक सावली पसरत गेली. खिडकीवर प्रहार झाला आणि काचा चौफेर पसरल्या गेल्या. खिडकीमधून हाताचा पंजा आत आला व पालुंबो त्या पंजाच्या पकडीत सापडला. पालुंबोनी आपली मान झटकन सोडवून घेतली. ऑस्टिन त्याच्या हातातले पिस्तूल खेचू पाहत होता. पालुंबोने त्याला कोपराने ढोसत पुन्हा सीटवर बसवले. त्याने पिस्तुलाचा नेम धरला. पण तेवढ्यात कुणीतरी त्याची कॉलर धरून त्याला मागे खेचले. पिस्तुलातून सुटलेली गोळी नेम चुकल्याने बाजूच्या खिडकीतून बाहेर गेली. पालुंबोच्या कपाळावर मुष्टिप्रहार झाला. त्याच्या हातातले पिस्तूल खाली पडले. गाडीचा दरवाजा उघडला गेला व आपल्याला फरफटत बाहेर काढत असल्याचे पालुंबोला जाणवले. आपला शेवट हा असा व्हायला नको होता.

ते विमान... कुणीतरी त्यांना सावध करायला हवे.

आणि मग त्याच्या डोक्यात एका बुटाची सणसणीत लाथ पडली आणि सारे जग अंधारून गेले.

७७

तेल अविव्हवरून थेट झुरिचला जाणाऱ्या E1A1 8851 ह्या फ्लाईटने जेव्हा बेन गुरियन आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केले, तेव्हा स्थानिक वेळेनुसार दुपारची ४ वाजून १२ मिनिटे झाली होती. सव्वीस वर्षांचा कॅप्टन एली झुकरमन हा एक अनुभवी वैमानिक होता. सुरुवातीला तो फायटर विमान चालवत असे. सात हजार तास विमान उड्डाणाचा अनुभव त्याच्या गाठीला होता. ए ३८० ची फ्लाईट तीन तास पंचावन्न मिनिटांनी झुरिचला पोहोचेल अशी त्याने घोषणा केली. हवामान स्वच्छ राहील व फारसे अडथळे जाणवणार नाहीत असेही त्याने सांगितले. सायप्रस, अथेन्स, मॅसेडोनिया व व्हिएन्ना अशा प्रमुख शहरांवरून प्रवास करून, आपले विमान रात्रौ ८ वाजून ०७ मिनिटांनी झुरिचला पोहोचेल असे तो म्हणाला. फावल्या वेळात आपल्या आवडत्या इतिहास या विषयाचा छंद जोपासणाऱ्या झुकरमनला आणखी एक वाक्य बोलण्याचा अनावर मोह झाला होता. त्याला म्हणायचे होते की, या सर्व ऐतिहासिक शहरांमध्ये एकेकाळी अलेक्झांडर, सीझर, तामरलेन व नेपोलियन सारख्या महान सम्राटांच्या नेतृत्वाखाली घनघोर युद्धे लढली गेली होती. या युद्धांचा परिणाम इतका जबरदस्त होता की, त्यावरून पुढची कित्येक शतके, समाजाची सांस्कृतिक दिशा ठरत गेली.

विमानात एकही जागा शिल्लक नव्हती. यादीमध्ये एकूण सहाशे त्र्याहत्तर प्रवाशांची नावे होती. ह्यात काही महत्त्वाच्या व्यक्तींचा समावेश होता. इस्त्राईल रेड क्रॉसचा संचालक धालिया बॉर्डर, बोका रॅटनचा अॅबेनर हा अमेरिकन सैनिक होता. व्हिएतनामच्या युद्धात तो आपले दोन्ही पाय गमावून बसला होता. ओखलाहामाच्या मसिहा बायबल चर्चचा फादर झेन कॅसिडी, मायर कोहेन हा राष्ट्रीय धार्मिक पक्षाचा नेता होता. वेस्ट बँकेच्या विस्ताराला पाठिंबा देण्यासाठी तो वॉशिंग्टनहून झुरिचला होणाऱ्या वाटाघाटींसाठी चालला होता तर अरब-इस्त्रायली विधिमंडळाचा नेता यासर मोहम्मदही त्याच वाटाघाटींसाठी निघाला होता, पण तो वेस्ट बँकेच्या विस्ताराला विरोध करणार होता.

त्यातले ते शेवटचे दोघे जण एकमेकांच्या शेजारीच बसले होते. आधी त्या दोघांमध्ये थोडी चर्चा व सौम्य वादविवाद झाले. मग त्यातल्या एकाने बुद्धिबळाचा पट बाहेर काढला. त्यानंतर ते एकमेकांचे घोडे व उंट मारण्यातच दंग झाले.

तीनशेसत्तर पुरुष, तीनशेतीन स्त्रिया व मुले. शिवाय अठरा सेवक.

विमान सदतीसहजार फूट उंचीवर पोहोचल्यावर झुकरमन पुन्हा बोलू लागला. सर्वांनी आपला सीट-बेल्ट काढून विमानात पाय मोकळे करण्यास हरकत नाही. आपण प्रवास करत असलेले E1A1 चे हे विमान नवे-कोरे-करकरीत आहे असे त्याने मोठ्या अभिमानाने सांगितले. वाऱ्याची उत्तम साथ असल्यामुळे प्रवासाचा वेळ कमी झाला असून, विमान आता ठरलेल्या वेळेच्या पंधरा मिनिटे आधी, म्हणजे ७ वाजून ५० मिनिटाने झुरिचला

पोहोचेल.

त्याने सर्वांना सुखाच्या व सुरक्षित प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. विमान खाली उतरण्यापूर्वी आपण तुमच्याशी पुन्हा एकदा संपर्क साधू असेही तो शेवटी म्हणाला.

७८

“नाही,” व्हॉन डॅनिकन फोनवर बोलत होता. “आम्हाला कोणाकडूनही थेट धमकी मिळालेली नाही. त्यामुळे आमच्याकडे त्यासंबंधीचा तपशीलही नाही. एका सक्रिय दहशतवादी संघटनेने आपल्या देशात तळ ठोकला आहे व आपल्याच भूमीत एक विमान उडवण्याचा त्यांनी कट रचलेला आहे. ते कोण आहेत किंवा ह्या क्षणी ते कुठे आहेत हे आम्हाला ठाऊक नाही. पण मी पुन्हा एकदा सांगतो, ते जवळपासच कुठेतरी आहेत. बहुदा झुरिच किंवा जिनिव्हा येथे ते असण्याची दाट शक्यता आहे. आमच्याकडे असलेला पुरावा असं दर्शवतो की, येत्या अठ्ठेचाळीस तासांत ते हवेमध्ये उडणाऱ्या किंवा विमानतळावर उभ्या असलेल्या विमानावर हल्ला करणर आहेत.”

फेडरल ऑफिस ऑफ सिव्हिल एव्हिएशनच्या संचालकाबरोबर तो बोलत होता. स्विस विमानतळांवरून सुटणाऱ्या किंवा तिथे येणाऱ्या विमान उड्डाणाबाबतचे अंतिम अधिकार त्याला दिलेले होते. तो खरे तर त्याचा चांगला मित्र होता. लष्करातील मेसमध्ये त्यांची घट्ट मैत्री जमली होती. परंतु इतक्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेताना कधी मैत्रीचा विचार केला जात नसतो.

“हे बघ मार्क्स, मी तुला अगदी स्पष्ट विचारतो. पुढील सूचना मिळेपर्यंत आम्ही देशातील सर्व विमानतळांवरची हवाई सेवा पूर्णपणे बंद करून टाकावी असं तुझं मत आहे?”

“होय.”

“याचा अर्थ असा होतो की फ्रान्स, जर्मनी व इटली या देशात उड्डाण करायला सज्ज असलेल्या सर्व फ्लाईट्स रद्द कराव्या लागतील व तिथून येणाऱ्या विमानांना नवा मार्ग आखून द्यावा लागेल.”

“मला त्याची जाणीव आहे.” व्हॉन डॅनिकन म्हणाला.

“फक्त आजचा विचार केला तरी शंभराच्या वर उड्डाणं रद्द करावी लागतील. आपल्या ह्या निर्णयाचा युरोपियन हवाई सेवेवर किती परिणाम होऊ शकतो याची तुला कल्पना आहे?”

“जर तशी गरज निर्माण झाली नसती तर मी तुला विनंतीही केली नसती.”

एक सेकंद शांतता पसरली. त्या माणसाच्या मनात होणारी घालमेल, व्हॉन डॅनिकनला जाणवत होती. “मला ह्यासाठी अध्यक्षांची परवानगी लागेल.” सिव्हिल एव्हिएशनचा संचालक म्हणाला.

“अध्यक्ष मॅडम देशाबाहेर आहेत. ह्या क्षणी त्या पोहोचू शकत नाहीत.”

“उपाध्यक्षांशी बोलू.”

“मी त्यांच्याबरोबर बोललो. मॅडमशी चर्चा केल्याशिवाय ते निर्णय घ्यायला तयार

नाहीत.”

“तू फेडरल सिक्युरिटी सर्व्हिसबरोबर बोललास? आपल्या देशाच्या सीमेत पोहोचलेल्या सर्व विमानांच्या सुरक्षेचा प्रश्न, त्यांच्या अखत्यारीत येतो.”

“आत्ताच मी त्यांच्याशी बोललो. ते ऐकायला तयार नाहीत. आम्ही वैमानिकांना जास्तीतजास्त सावध राहाण्याचा इशारा देऊ शकतो असं त्यांचं म्हणणं आहे. त्यांना नुसता इशारा देऊन उपयोग नाही. आमच्या मते हा हल्ला ड्रोनच्या मदतीने होणार आहे. त्या ड्रोनमध्ये स्फोटकं आहेत. प्रवासी विमानांमध्ये क्षणार्धात दिशा बदलण्याची क्षमता नसते.”

“हो.” संचालक म्हणाला. “तुझं म्हणणं बरोबर आहे. लष्कराशी संपर्क साधलास?”

“संरक्षणमंत्र्याने झुरिच, जिनिव्हा आणि ल्युगानोच्या विमान तळावर जमिनीवरून सुटणारी क्षेपणास्त्रं पाठवली जातील असं आश्वासन दिलंय. पण उद्या सकाळच्या आधी ती तिथे पोहोचणं अशक्य आहे.”

“मार्क्स, मला माफ कर. माझे हात बांधलेले आहेत. मॅडमकडून जर तुला काही सूचना मिळाली तर मला ताबडतोब कळव. मधल्या काळात मी हवाई नियंत्रण कक्षाला धोक्याचा इशारा देतो. गुडलक.”

“आभारी आहे.”

दोन टेबलांवर झुरिच व जिनिव्हाचा नकाशा पसरवून ठेवलेला होता. मायर, झुरिचच्या नकाशाशेजारी उभा होता. प्रत्येक विमानतळाच्या भोवतालच्या परिसरावर तो चौकोनी खूण करत होता.

व्हॉन डॅनिकनने झुकून नकाशाकडे पाहिले. “आपण तिथे किती ऑफिसर्रना पाठवलंय?”

“झुरिचला बावन्न आणि जिनिव्हाला फक्त पस्तीस. कुणी एखादी पांढरी किंवा काळी व्हॅन पाहिलीये का आणि कुणाला एखादी संशयास्पद हालचाल आढळलीये का असं ते घरोघरी जाऊन विचारताहेत.”

व्हॉन डॅनिकनने आपला संताप आवरण्याचा प्रयत्न केला. “ह्या दोन्ही शहरांत मिळून पोलिसांची संख्या दहा हजाराच्या वर जाईल. त्यातले आपल्या वाट्याला मात्र फक्त एकशे सत्तर पोलीस आले.”

“पोलीस प्रमुखांची इच्छाच नसेल तर काय होणार?” मायर म्हणाला. “शेवटी मार्टी हा फेडरल कौन्सिलर आणि कायदामंत्री आहे. त्याचं मत, सर्वांना ठाऊक आहे.”

“असा प्रकार आहे? तर मग मार्टीची मतं आता बदललेली आहेत. हे आपण त्यांना सांगायला हवं.”

व्हॉन डॅनिकन नकाशा निरखू लागला. झुरिच विमानतळाभोवती चार छोटी शहरे होती. ग्लॅट्टब्रूग, ऑप्फिकॉन, ओअरलिकॉन आणि क्लॉटन. आठ हजार घरे. साठ हजार लोकवस्ती.

“तर मग?” व्हॉन डॅनिकनने विचारले. “नवीन खबर काय आहे?”

“डझनभर लोकांनी काळी व्हॅन पाहिल्याचे सांगितले. पण त्या सर्व व्हॅन आसपासच्या होत्या. फारसे संशयास्पद असे कुणी काही पाहिलेले नाही. नेहमीच्याच तक्रारी.

कुणीतरी खिडकीतून डोकावत होते, गाडीतून डिझेल पळवले, तरुण मुलं दारू पिऊन धिंगाणा घालत होती. ड्रोन घेऊन निघालेले दहशतवादी मात्र कुणाच्याही नजरेला पडलेले नाहीत.”

“पंचवीस फूट पंख पसरलेलं एक छोटं विमान कुणालाही दिसलं नाही?”

“नाही.” मायर म्हणाला.

व्हॉन डॅनिकन टेबलाच्या कडेवर बसला.

“मार्टीचं काय झालं? त्याला अटक होणार आहे?” मायरने विचारले.

व्हॉन डॅनिकनने मान झटकली. तो मायरला समजावून सांगू लागला. अल्फॉन्स मार्टी कधीच तुरुंगात जाऊ शकणार नाही. व्हॉन डॅनिकनला खातेदारांची स्टेटमेंट्स दाखवून टोबी टिंगेलीने कायद्याचे उल्लंघन केलेले आहे. मार्टीविरुद्धचा पुरावा कधीही कोर्टात ग्राहा धरला जाणार नाही. तसेच चौकशी समितीच्या न्यायाधीशासमोर मार्टीने शपथपूर्वक कबूल केल्याशिवाय तो झिअॅग कंपनीविरुद्ध वॉरंट मिळवू शकत नाही. मार्टीला कौन्सिलचा राजीनामा देण्यास भाग पाडले जाईल. परंतु प्रकृतीकारणास्तव त्याने राजीनामा दिला असे जाहीर केले जाईल.

“याचा अर्थ तो सहीसलामत सुटतोय,” मायर म्हणाला.

व्हॉन डॅनिकनने खांदे उडवले. “पण मला खात्री आहे की तू आणि मी मिळून त्याचं जगणं मुश्किल करून टाकू शकतो.”

“त्यासारखी दुसरी मजा नाही.”

व्हॉन डॅनिकनने कपात कॉफी ओतली व तो आपल्या खुर्चीत जाऊन बसला. मार्टी हा अमेरिकन पैशावर पोसला जात होता ही कल्पनाच त्याला सहन होत नव्हती. निर्यात परवाने, दुहेरी उपयोगाचा माल. यामागे एक फार मोठी यंत्रणा उभी असणार. हे त्याला समजायला हवं होतं. आपण कुठच्या टोकापर्यंत जायचं याचा विचार करायला नको? आपल्याच शत्रूला असला माल पुरवायचा?

त्याने कॉफी संपवली व फिलिप पालुंबोला फोन लावला. लॅमर्स व ब्लिट्झचा खुनी शोधण्यात त्याने काही प्रगती केली आहे का हे जाणण्याची त्याला उत्सुकता लागलेली होती. व्हॉन डॅनिकनने आपला नंबर व नाव व्हॉईस मेलवर सांगितले. फक्त फोन करण्याचे कारण मात्र त्याने सांगितले नाही. पालुंबोला सूचक इशारा देण्याची गरज नव्हती.

अमेरिकन्स. जिथे पाहावे तिथे ते हजर असतात. रॅन्सम, हीच खरी मेख होती. तो ब्लिट्झ आणि जिन्नला भेटलेला होता. दोन्ही कारस्थानांचा तो एकमेव सूत्रधार होता.

तेवढ्यात त्याने समोरून हार्डनबर्गला येताना पाहिले. त्याने जॅकेट घातलेले नव्हते. त्यामुळे त्याच्या पोटाची ढेरी एखाद्या अनियंत्रित बोलिंग बॉलसारखी पुढे-मागे हलत होती.

“सर,” जवळ पोहोचेपर्यंत गप्प राहणे त्याला अशक्य झाले होते. “माझ्यापाशी एक बातमी आहे.”

“आधी जरा दम खा.”

“क्युराकाओच्या एक्सेलसिअर ट्रस्टसंबंधी.” हार्डनबर्ग धापा टाकत होता. “मी विचार केला की जर त्या ट्रस्टने ब्लिट्झचा बंगला विकत घेतला असेल तर त्यांनी

अलीकडेही एखाद्या जागेची नक्कीच खरेदी केलेली असणार. जनरल चॅबर्टबरोबर झालेल्या मीटिंगमध्ये मी हजर नव्हतो. पण मला सांगण्यात आलं की, ड्रोन-वैमानिकाच्या दृष्टीसमोर विमान राहू शकेल अशीच जागा ते ड्रोनसाठी निवडणार आहेत.”

“अगदी बरोबर.”

“त्याच आधारावर मी टॅक्स-अधिकाऱ्याशी संपर्क साधला आणि त्या ट्रस्टतर्फे नवीन खरेदी केलेल्या जागेचा तपास घ्यायला सांगितले. विशेष करून झुरिच व जिनिव्हा विमानतळाच्या परिसरात त्यांनी जागा घेतली असावी असा संशय मी त्याच्यापाशी व्यक्त केला.”

“आणि मग?” आपली उत्कंठा लपवण्यासाठी व्हॉन डॅनिकनने आपले हात मागे बांधून धरले.

“एक्सेलसिअर ट्रस्टने ग्लॅट्टब्रुगमध्ये एक घर विकत घेतलंय.”

व्हॉन डॅनिकनने आवंढा गिळला. आशेचा नवा अंकुर फुटला होता. ग्लॅट्टब्रुगची वस्ती झुरिच विमानतळाला अगदी चिकटूनच होती. “ग्लॅट्टब्रुगमध्ये नक्की कुठे?”

“धावपट्टीच्या दक्षिणेला एक किलोमीटरच्या आत ते घर आहे.”

७९

इस्त्राईल हवाई दलाच्या ६९ नंबर तुकडीवर ते काम सोपवण्यात आले होते. 'हॅमर्स' या नावाने ही तुकडी ओळखली जायची. नेगेव्ह वाळवंटातील तेल अविव्हच्या दक्षिण-पूर्वेला असलेल्या तेल नॉफ या हवाईतळावर ते काम सुरुही झाले होते. हॅमर्सकडे, प्रचंड आवाज करत जाणाऱ्या मॅक्डोनेल डग्लस F-151 जातीच्या सत्तावीस विमानांचा ताफा होता. F-151 ही विमाने साधारण २.५ मॅच, म्हणजे ताशी १८७५ मैल वेगाने जाऊ शकत व दोन हजार नॉटिकल मैलांचा पल्ला पार करण्याची त्यांची क्षमता होती. एकाच खेपेत ती विमाने इराणमधील तीन चतुर्थांश आण्विक केंद्रे उद्ध्वस्त करू शकत होती. पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे F-151 हे इस्त्राईल हवाईदलातील असे एकमेव विमान होते की, जे आपल्या सोबत B61-11 EPW वाहून नेऊ शकत होते.

संगमरवरच्या क्राँकिट फरशीमध्ये पाडलेल्या एका भल्यामोठ्या खड्ड्यात ठेवलेले प्रचंड आकाराचे पेटारे जणू पाळण्यात ठेवल्याप्रमाणे दिसत होते. त्यामध्ये ठेवलेल्या बॉम्बस्चे दुरून होणारे दर्शनही छातीत धडकी भरवणारे होते. त्यांची लांबी पंचवीस फूट होती व प्रत्येक बॉम्बच्या पुढच्या व मागच्या भागावर, माशांसारखे चार-चार पंख होते. इतर दारूगोळ्याच्या मानाने, हे बॉम्ब्ज हवेतून वाहून नेण्यासाठी फारच हलके होते. बॉम्बचा व्यास, दोन फूट चार इंचाचा होता. अत्यंत सावकाश प्रतिसाद देणाऱ्या फ्यूजचा, त्यामध्ये वापर केलेला होता. त्यामुळे सेकंदाला दोन हजार फूट वेगाने तो जमिनीवर आपटून, संगमरवरी फरशीमध्ये पन्नास फूट खोल खड्डा पडत असे. त्यामधील दहा किलोटन स्फोटक द्रव्यामुळे निर्माण होणाऱ्या भूकंप लहरींमध्ये, जमिनीखालील अडीचशे फुटांपर्यंतचे बांधकाम उद्ध्वस्त करण्याची क्षमता होती व होणाऱ्या स्फोटामध्ये साठ हजार टनांचा किरणोत्सर्गी कचरा हवेत फेकला जाई.

"पाहिजे होती व गोष्ट अगदी वेळेवर मिळाली." जनरल डॅनी गान्झ म्हणाला. तो व झ्वी हिर्रस्च त्या प्रचंड विमानघराची पाहणी करत होते.

"चमत्कार वाटतोय." हिर्रस्चने मान्य केले.

त्यांच्यासमोर, हवाईदलाच्या काही ऑफिसर्सनी एका मोठ्या स्ट्रेचरवरून ते बॉम्ब, संगमरवरी फरशीवरून ढकलत आणले व विमानाच्या खालच्या बाजूस, अगदी मध्यभागी ठेवून दिले. जॅकच्या साहाय्याने ते स्ट्रेचर उंच करत, त्यांनी एकेक बॉम्ब, विमानाच्या आतल्या कप्प्यात अतिशय काळजीपूर्वक ठेवण्यास सुरुवात केली. हिर्रस्च व गान्झ ते सर्व दृश्य अगदी बारकाईने पाहत होते. दुसरा बॉम्ब ठेवला गेला. मग तिसरा. गान्झने उसासा सोडला. सतत चाललेल्या युद्ध-लढायांनी तो पार थकून गेला होता. इस्त्राइलमध्ये लवकरात लवकर शांतता प्रस्थापित व्हावी असे त्याला मनोमन वाटू लागले होते.

"चालूसला उभारलेल्या नवीन आण्विक केंद्रावर सर्वप्रथम हल्ला चढवला जाईल."

तो म्हणाला. “त्यानंतर आपण त्यांच्या क्षेपणास्त्र साठ्यांवर व स्फोटक द्रव्यांच्या उत्पादन केंद्रांकडे वळणार आहोत. आपल्या वैमानिकांना ती सर्व ठिकाणे चटकन दृष्टीस पडावीत ह्यासाठी आपली काही माणसं आज रात्रीच तिथे पोहोचून, त्या विवक्षित जागा, लक्षवेधी रंगांनी रंगवणार आहेत.”

“आज रात्री?” झ्वी हिर्रस्चने गोंधळून विचारले. “आपण फार घाई करतोय असं वाटत नाही तुला? अमेरिकेचा अध्यक्ष काय म्हणाला होता हे लक्षात आहे ना? अर्धवट माहितीवर विश्वास ठेवून हल्ला करणं बरोबर नाही. आपल्यापाशी सबळ कारण पाहिजे.”

गान्झने हाताची घडी घातली. “काही मिनिटांपूर्वीच मला पेंटेगॉनवरून एका मित्राचा फोन आला होता. माझा एकेकाळाचा वैमानिक मित्र.”

“कोण?”

“मेजर जनरल जॉन ऑस्टिन.”

“तो ख्रिस्ती उपदेशक?”

“मी त्याला इस्त्राईलचा सच्चा दोस्त मानतो.” गान्झ त्याच्याजवळ सरकला व दबक्या आवाजात बोलू लागला. “आपल्याला डिवचण्यासाठी व आपले संबंध बिघडले जावेत ह्या उद्देशाने पुढच्या बारा तासांत एक हल्ला करण्याचा कट रचला गेलाय अशी खबर त्यांना गुप्तहेर खात्याकडून मिळाली आहे.”

“कुठे?”

“युरोपच्या कुठल्यातरी भागात.” हिर्रस्चची नजर विस्फारली गेली. त्याच्या त्या नजरेला नजर देत गान्झ म्हणाला. “आपल्याला फार काळ वाट बघत बसावी लागेल असं मला वाटत नाही.”

८०

“आपल्याला तो कसा सापडणार आहे?” जोनाथनने विचारले.

“जरा मागच्या सीटवर ठेवलेला माझा लॅपटॉप घे.” एम्मा म्हणाली.

जोनाथनने लॅपटॉप सुरू केला. “पासवर्ड तोच आहे?”

“तोच. तुला माहितीये, तू पासवर्ड शोधून काढलास आणि आमच्या इथल्या सर्वांची धाबी दणाणून टाकलीस. तुझ्यामुळे ते आता इंटेलिंकची नवीन सिस्टिम तयार करणार आहेत.”

झुरिचच्या तलावाशेजारून ते चालले होते. संध्याकाळ झाली होती. डोंगरात चमचमणारे दिवे परीकथेतल्या राज्याची आठवण करून देत होते. अखेर ती मोकळी होऊन बोलू लागली होती. जरी तिने तिचा इतिहास त्याला सांगितला नसला तरी तो तिला कसा भेटला आणि जॉन ऑस्टिनने विमान उडवायचा कट कसा रचलाय ह्यावर ती भरभरून बोलली. त्यांचे उसवलेले नाते पुन्हा जुळू लागले होते.

कॉंप्युटरवरचा प्रोग्रॅम कसा सुरू करायचा ह्याबद्दल ती त्याला सूचना देऊ लागली. स्वित्झर्लंडच्या संपूर्ण नकाशा दिसू लागला. तिने त्याला "VD" ही अक्षरे टाईप करायला सांगितली. झुरिचलगतच्या परिसरावर एक लाल ठिपका उमटला व हळूहळू तो एका बाजूच्या रस्त्यावर येऊन स्थिरावला.

“ते काय आहे?”

“लोजॅक स्टिरॉईड्स” एम्मा म्हणाली.

“तीन दिवसांपूर्वी मी व्हॉन डॅनिकनच्या गाडीखाली हे उपकरण बसवलंय. मला त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवायचं होते. त्याच्या गाडीने दिलेला संदेश एका उपग्रहावर जातो व तिथून तो आपल्याकडे येतो.”

“म्हणजे तू फारच कामात होतीस.”

एम्मा गूढ हसली. “तो आत्ता कुठे आहे?”

“जवळच.”

“ग्लॅट्टब्रुग?”

जोनाथन नकाशात पाहू लागला. “तुला कसं समजलं?”

“घोटाळा झाला.” एम्माने अॅक्सिलेरटर दाबला.

गाडी पुन्हा भरधाव सुटली.

८१

झुरिच हवाई वाहतूक केंद्र, E1 A1 8851 मधून बोलतोय. आम्ही जवळ पोहोचतोय.

“रॉजर E1 A1 8851 . मार्ग खुला आहे. व्हेक्टर १-७-० च्या दिशेने जाऊन दहाहजार चारशे फुटांपर्यंत खाली या. तुमचा सहावा नंबर आहे.”

“ओके.”

झुरिच हवाई नियंत्रक कक्षाशी E1A1 फ्लाईट ८८५१ चे झालेले संभाषण ‘पायलटने’ लक्षपूर्वक ऐकले.

डोळे मिटून तो शेवटची प्रार्थना पुटपुटु लागला. आपले हात स्थिर राहोत व प्रभूचे मार्गदर्शन मिळो अशी त्याने याचना केली. हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी आपल्याला धैर्य प्राप्त होवो अशी विनवणी केली. तो पाषाणहृदयी नव्हता. सहाशेहून अधिक माणसांचा जीव घ्यायचा ह्या कल्पनेने त्याचे शरीर थरथरू लागलेले होते. येशूला आपला क्रॉस आपल्याच खांद्यावरून वाहून नेताना अशाच यातना झालेल्या असणार. त्यांचा मृत्यूही, क्रूसवर चढवला जाण्याइतकाच वेदनादायक असेल.

“वेळ झालीय.” जॉन ऑस्टिन म्हणाला.

तो गॅरेजमध्ये चालत गेला. त्याच्या माणसांनी लॉकर्समधून ‘कॉफिन्स’, म्हणजे त्या स्टेनलेस स्टीलच्या तीन पेट्या जमिनीवर मध्यभागी आणून ठेवल्या होत्या. झटपट आणि अगदी अचूकपणे वेगवेगळे भाग ठरलेल्या गतीने व ठरलेल्या वेळात जोडून, ड्रोन तयार करण्यात आले. शक्तिशाली स्फोटकं असलेला साठ पौंडी वजनाचा नॅसेल्ले UAV च्या पोटात जोडण्यात आला.

“अगदी छान उडायचं. समजलं ना?” ड्रोनच्या अंगावरून मायेने हात फिरवत तो म्हणाला.

तो आपल्या नियंत्रण खोलीत परतला. समोर विमानतळ दिसत होते. एका भिंतीपाशी त्याला लागणारी सर्व उपकरणे ठेवलेली होती. रडारसाठी लागणारे मॉनिटर्स आणि नोझ-कॅमेरा. एका मोठ्या आडव्या पट्टीवर, वेग, समुद्रसपाटीपासूनची उंची व ड्रोनचे नेमके स्थान, ध्वनिक्षेपित करणारी यंत्रणा बसवण्यात आली होती. पट्टीवर मध्यभागी एक की-बोर्ड होता व त्याच्या दोन्ही बाजूला जॉयस्टिक अडकवल्या होत्या. तो सीटवर जाऊन बसला व वातावरणात व्यवस्थित रुळण्यासाठी तो काही सेकंद काहीही न करता बसून राहिला.

“सर्व इंजिन्स सुरू करतोय.” त्याने इग्निशन की दाबली एक लाल रंगाचा छोटा दिवा पाच वेळा डोळे मिचकावत शांतपणे जळू लागला. तो प्रत्यक्ष ड्रोनमध्ये नसला तरी ड्रोनच्या इंजिनांची थडथड त्याला जाणवत होती. त्याच्या अंगावर काटा उभा राहिला. गेली अठ्ठावीस वर्षे, त्याने ह्या क्षणाची आतुरतेने वाट पाहिली होती. आजही ती तारीख

त्याच्या मनावर कोरलेली होती. २४ एप्रिल, १९८०.

ऑपरेशन इगल क्लॉ.

जॉन ऑस्टिन हा त्या वेळेस अमेरिकन हवाई दलात मेजरच्या हुद्यावर होता. तेहरानमधील अमेरिकन वकिलातीत डांबून ठेवलेल्या तेवीस युद्धकैद्यांची सुटका करण्यासाठी ती मोहीम आखण्यात आली होती. त्यासाठी इराणी वाळवंटात विमान उतरवावे लागणार होते. मोहीम अत्यंत धोकादायक व अतिमहत्त्वाकांक्षी वाटत होती. हर्क्युलस C-130 ह्या विमानाचा वैमानिक म्हणून त्याची निवड करण्यात आली. विमानात चौऱ्याहत्तर प्रशिक्षित सैनिक होते. नव्याने निर्माण केलेल्या खास पथकामध्ये त्या सर्वांची निवड झाली होती. लेफ्टनंट कर्नल विल्यम 'जेरी' बॉयकिन त्या पथकाचे नेतृत्व करत होता व कर्नल चार्ली बेक्विथने त्यांना प्रशिक्षण दिले होते.

विमान ठरल्याप्रमाणे वाळवंटात पोहोचले. फक्त त्या प्रवासातली ती सात मिनिटे जीवघेणी ठरली होती. ग्रेट सॉल्ट वाळवंटावरून जात असताना, दश्त-ए-करीव्ह इथे विमानाला एका प्रचंड धुळीच्या वादळाशी सामना करावा लागला. त्या तुफानाने वैमानिकाला आंधळे करून टाकले. देशाच्या दक्षिणेहून उसळलेले ते वादळ, चारशे मैल पसरले होते. चारही बाजूंनी रेती व खडीचा वर्षाव होत असतानाही वैमानिक जॉन ऑस्टिनने त्या वादळाचा समर्थपणे मुकाबला केला व ठरलेल्या वेळी आणि ठरलेल्या ठिकाणी त्याने विमान उतरवले. विमानापाठोपाठ पोहोचण्यासाठी आठ अमेरिकन निमिट्झ हेलिकॉप्टर्स समुद्रमार्गे पाठवण्यात आली होती. हेलिकॉप्टर्स पुढे तेहरानला जाणार होती व कैद्यांची सुटका करून त्यांना ऑस्टिनच्या विमानापाशी घेऊन येणार होती. ऑस्टिनचे विमान त्या कैद्यांना घेऊन मग सौदी अरेबियाला जाणार होते.

पण त्याच क्षणी तो विध्वंस घडला.

आठातले एक हेलिकॉप्टर त्या वादळामुळे पूर्ण निकामी होऊन बोटीतून खाली उतरले. दुसरे हेलिकॉप्टर आकाशात उडाले, परंतु मध्यावरच त्याने आपली दिशा बदलली, पण त्यानंतर ते दिशा हरवून दिसेनासे झाले. फक्त सहा हेलिकॉप्टर्स उरली होती व सर्व कैद्यांना परत घेऊन येण्यासाठी ती पुरेशी नव्हती. अखेर मोहीम रद्द करण्यात आली.

त्यातले एक हेलिकॉप्टर जमीन सोडून वर जात असताना, वाळूवर जोरात घासले गेले आणि वाळूचा मोठा भोवरा निर्माण झाला. चालकाला समोरचे काही दिसेना. त्याचे नियंत्रण सुटले व ते हेलिकॉप्टर, पन्नास मीटरवर उभे असलेल्या ऑस्टिनच्या विमानावर आदळले. हेलिकॉप्टरचे पंखे विमानाच्या स्टॅबिलायझरमध्ये घुसले आणि विमानाने पेट घेतला.

जॉन ऑस्टिनला आजही, त्या दिवशीचा तो अनपेक्षित दणका आठवत होता. दुसऱ्याच क्षणाला त्याला ज्वालांनी घेरले होते. सीट-बेल्ट अडकवल्याने त्याला पळताही येईना. त्याचे शरीर भाजून गेले होते. "मेलोऽ. मेलोऽ" तो किंकाळ्या मारत होता.

पण तो मेला नव्हता. बेल्ट काढून तो आगीमधून सरपटत बाहेर पडू लागला. त्याचा सूट, त्याचे केस, त्याचे पूर्ण शरीर पेटलेले होते. तो भुतासारखा दिसत होता.

सैनिकांनी त्याला बाहेर काढून जमिनीवर झोपवले आणि वाळूमध्ये गडाबडा लोळवत, आग विझवून टाकली.

त्याला जाग आली तेव्हा तो एका हेलिकॉप्टरमध्ये होता. एक सैनिक त्याच्या अंगावर ओणवा वाकला होता आणि त्याच्या गळ्यात क्रॉस लटकत होता. ऑस्टिनने तो क्रॉस घट्ट पकडला आणि त्याला एकदम शांत झाल्यासारखे वाटले. मुक्तीची एक अलौकिक लहर, त्याच्या हातामधून संपूर्ण शरीरभर पसरत गेली. प्रकाशाने त्याला वेढले होते. तो आगीच्या ज्वाळांचा प्रकाश नव्हता, एका वेगळ्याच चैतन्याचा प्रकाश होता. त्या साक्षात्कारी क्षणी, त्याला प्रभूचे दर्शन झाले. त्याचा रक्षणकर्ता येशू त्याला दिसला होता. त्याने प्रभूच्या मुखातून आलेले शब्द कानात प्राण आणून ऐकले व त्यातला प्रत्येक शब्द पाळण्याचे वचन दिले. आपण ह्यातून वाचणार याची त्याला खात्री पटली. प्रभूने त्याच्यावर आता एक फार मोठे धर्मकार्य सोपवले होते.

त्या गोष्टीला अठ्ठावीस वर्षे लोटली होती.

ऑस्टिनने उड्डाणापूर्वीच्या सर्व गोष्टी नीट तपासून घेतल्या. पंखांवरच्या झडपा, इंधन. कॅमेऱ्यातून चित्र उमटले. धावपट्टीवरचे दिवे चमकू लागले.

त्याने नियंत्रक बटण दाबले आणि ड्रोन पुढे सरकले.

'महदी-१' उड्डाणाला सिद्ध झाले होते.

८२

व्हॉन डॅनिकन कमांडर केंद्रामध्ये उभा होता. त्याने डोळ्यांना दुर्बीण लावली होती व तो एका पडद्याच्या आड लपून त्या घराचे निरीक्षण करत होता. एक्सेलसिअर ट्रस्टने विकत घेतलेले ते घर, ३३, होल्झवेगस्ट्रॅस्सला होते. फारशी कल्पकता न दाखवता बांधलेले ते एक ओबडधोबड दुमजली घर होते. हास्तिदंती रंगाच्या भिंती व राखाडी छप्पर. घराभोवती बाग होती. दुसऱ्या मजल्यावरील एका खोलीला बाल्कनी होती. पण व्हॉन डॅनिकनचे लक्ष वेधले होते ते घराबाजूच्या रस्त्याकडे. तो सपाट व सरळ जाणारा पाचशे मीटर्सचा रस्ता होता. रस्त्यावर बर्फाचा कणदेखील नव्हता. धावपट्टीसाठी अगदी योग्य असा तो रस्ता होता.

त्याने दुर्बीण डावीकडे वळवली. घराच्या डावीकडे एक गॅरेजसारखी दिसणारी छोटी शेड होती. ड्रोन राहू शकेल इतका त्याचा आकार मोठा नव्हता. पण त्याला ब्रिगेडियर जनरल चॅबर्टचे बोलणे आठवले. ड्रोनचे वेगवेगळे भाग पटकन जुळवता येतात. घरात कुणीही नसावे असे वाटत होते. कसलीच हालचाल नव्हती.

विमानतळाचे सुरक्षा कुंपण अगदी दहा मीटरवर होते.

दूर एका विमानाने उड्डाण केल्याचा आवाज झाला. विमान जसजसे जवळ येऊ लागले तसतसा आवाज वाढू लागला. त्या आवाजामध्ये इतर सर्व आवाज विरून गेले.

त्याने दुर्बीण खाली घेतली व तो खोलीत परतला. “त्यांनी अचूक जागा निवडलीय. जवळपास एकही घर नाही. समोर विमानतळ. दृष्टीला कुठलाही अडथळा नाही.”

“फक्त विमानतळ नव्हे.” एक बुटका, जाडा, काळ्या कुरळ्या केसांचा व बारीक मिशी राखलेला इसम म्हणाला. त्याचे नाव होते मायकेल बर्गर. झुरिच पोलीस स्टेशनच्या आकस्मित हल्ला पथकाचा तो कॅप्टन होता. त्या दुमजली घराच्या मुख्य दरवाजाला, तोच प्रथम धडक मारणार होता. “त्या घरात जे कोणी लपून बसलेले असतील, ते आम्हाला शंभर मीटर अंतरावरून पाहू शकतील. आत किती जण असतील असा तुझा अंदाज आहे?”

“आम्हाला नक्की ठाऊक नाही, पण निदान पाच जण तरी असावेत. कदाचित जास्तही असू शकतील.”

“सशस्त्र?”

“नक्कीच. सगळे धंदेवाईक आहेत. काही आठवड्यांपूर्वी त्यांनी वीस किलोंच्या सिमटेक्स-एच स्फोटकांचा ताबा मिळवलाय. ती सर्व स्फोटके, त्या ड्रोनमध्ये नक्की ठेवलेली असणार.”

बर्गरने गंभीरपणे मान डोलावली. स्वतःच्या यशाची व जिवंत राहण्याची शक्यता, तो मनातल्या मनात पडताळून पाहू लागला. “आम्ही हेलिकॉप्टरमधून तिथे जाऊ. दोन

हेलिकॉप्टर्स तयार ठेवलायेत. दोरीच्या साहाय्याने आम्ही खाली उतरू. त्याच वेळी विमानतळावरून एका विमानाने उड्डाण केलेले असेल. दोन्ही हेलिकॉप्टर्स, आवाज न करता उडणारी आहेत. आमची दुसरी टीम तोपर्यंत मुख्य रस्त्यावरून तिथे पोहोचलेली असेल. आम्ही घराचा मुख्य दरवाजा फोडणार आहोत. दरवाजा फोडेपर्यंत कुणाला आवाजही येणार नाही. साठ सेकंदांत सगळं काम आटोपलं जाईल."

"तुम्ही अशा प्रकारचं काम पूर्वी किती वेळा केलेलं आहे?" व्हॉन डॅनिकनने विचारले. बर्गर शांतपणे म्हणाला, "कधीच नाही. पण अशा कामाची आम्ही अनेकदा तालीम केलेली आहे."

व्हॉन डॅनिकन काही बोलला नाही. त्याने फक्त मान डोलावली.

"आम्ही चाळिसाव्या मिनिटाला तयार असू." बर्गर म्हणाला. "म्हणजे सात वीसला."

दोघांनी आपापल्या घड्याळ्यांची वेळ जुळवून घेतली.

व्हॉन डॅनिकन खिडकीपाशी गेला. तिथे मायर, डोळ्यांना दुर्बीण लावून उभा होता. "आसपासच्या लोकांच्या काही पाहण्या-ऐकण्यात आल्याचं तुला समजलंय?"

"गेल्या काही दिवसांत तिथे माणसांची खूपच वर्दळ होती. अनेक गाड्या सतत येत-जात होत्या."

"कुणाला व्हॅन दिसली?"

"व्हॅन सोडून सर्व काही दिसलं."

कॅप्टन बर्गरने बाहेर पडण्याचा इशारा दिला. बाहेर दोन हेलिकॉप्टर्स उभी होती.

वातावरणातील ताण वाढत चालला होता. निळे सूट व चिलखत घालून पोलीस सज्ज झाले होते. रेडिओ, ग्रेनेड्स व दारुगोळा सोबत होता. ही लटुपुटची तालीम नव्हती.

एकूण पंचवीस पोलीस होते. व्हॉन डॅनिकनला वाटले होते तेवढे ते तरुण दिसत नव्हते. एकाला तर सुटलेल्या ढेरीमुळे आपले सामान धड पाठीवरही घेता येत नव्हते. प्रत्येकाकडे सबमशिन होती. दोघांकडे विंशगमास्टर्स ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रायफल्स होत्या. बिजागिरींसकट दरवाजे उखडून टाकण्याचे काम, त्या रायफल्स करणार होत्या.

व्हॉन डॅनिकनचा रेडिओ करकरला. "आत्ताच त्या घरातले दिवे लागले." मायर पलीकडून बोलला.

"काही संभाषण?"

त्या घराच्या खिडकीला बर्गरच्या माणसाने एक लेझर मायक्रोफोन आधीच अडकवला होता. त्यातून त्या घरातले संभाषण ऐकता येणार होते.

"टी.व्ही. सुरू झालाय." मायरने उत्तर दिले.

बर्गरने आठ आठ जणांचे तीन गट केले. शेवटा गट राखीव ठेवलेला होता. "आम्हाला हिरव्या दिव्याचा इशारा दाखवा."

"इशारा मिळेल." व्हॉन डॅनिकनने बर्गरशी हात मिळवत, त्याला शुभेच्छा दिल्या.

बर्गर आपल्या माणसांकडे वळला. "आपण पाच मिनिटांत निघतोय." तो ओरडला.

व्हॉन डॅनिकन मागच्या रस्त्याने कमांड पोस्टकडे जाऊ लागला. तो रस्ता छोट्याशा जंगलातून जात होता. त्याने वर पाहिले. नितांत सुंदर रात्र होती. जणू मखमली

गालिच्यावर चांदण्या चमकत होत्या आणि अर्धी चंद्रकोर आकाशात खाली उतरलेली होती. रात्रीचे सात वाजून सोळा मिनिटे झाली होते. मागच्या बाजूस बर्गरचा आवाज ऐकू येत होता. आपल्या माणसांना तो हेलिकॉप्टरमध्ये भरभर चढायला सांगत होता. त्याने हात खिशात ठेवत चालण्याचा वेग वाढवला.

“व्हॉन डॅनिकन,”

तो थांबला. त्याने पूर्ण वळून पाहिले. त्याला कुणीच दिसले नाही.

अंधारातून एक उंच धिप्पाड माणूस पुढे आला.

“माझं नाव जोनाथन रॅन्सम. मला वाटतं, तू मलाच शोधतोयस.”

८३

जोनाथन व्हॉन डॅनिकनच्या जवळ येऊन उभा राहिला. आपण नि:शस्त्र आहोत हे दाखवण्यासाठा त्यान आपल दान्हा हात शरारापासन दर ठवल हात. एम्मान त्याला तसे पढवून पाठवले होते. “तू तुझ्या माणसांना थांबव,” तो म्हणाला. “तुला हवी असलेली माणसं त्या घरात नाहीत.”

“नाहीत?”

“नाही. आणि ड्रोनसुद्धा नाही.”

“तू मला हे का सांगतोयस?”

“कारण मलाही त्यांना थांबवायचंय. तू मोठी चूक केलीस. तू माझा शोध घ्यायला नको होतास.”

“मग कुणाचा घ्यायला हवा होता?”

“माझा.” अंधारातून पुढे येत एम्मा म्हणाली. “मिस्टर ब्लिट्झ आणि मिस्टर लॅमर्स हे माझे साथीदार होते. जोनाथनचे नव्हे.”

“तू कोण... मिस...?”

“मिसेस रॅन्सम,” ती म्हणाली.

व्हॉन डॅनिकनला पटले असावे. त्याची नजर आळीपाळीने दोघांवर जात होती. त्यांच्या मनाचा कोंडमारा बहुतेक त्याला समजला असावा. “तू एम्मा रॅन्सम आहेस.” तिच्याकडे बोट दाखवत तो काहीशा अविश्वासाने म्हणाला. “गेल्या सोमवारी जी स्त्री गिर्यारोहण करताना अपघातात मेली होती?”

“अपघात झालेलाच नव्हता.”

“हो. ते दिसतंय आता.”

एम्माने त्याच्याकडे पाहिले. दोन सराईत व्यावसायिकांमध्ये एका नि:शब्द, सांकेतिक लघुलिपीची देवाणघेवाण होत होती. त्याच्या मनातला गोंधळ कमी होऊ देण्यासाठी तिने त्याला सेकंदभर वेळ दिला. “जोनाथनचा ह्या कटाशी काहीही संबंध नाही. ज्या पोलिसांना त्याने मारले ते आमच्या आज्ञेखाली काम करत होते. माझ्या काही वस्तू ताब्यात घेण्यासाठी त्यांनी जोनाथनवर हल्ला केला. जोनाथनने केवळ स्वसंरक्षण करण्यासाठी त्यांच्यावर उलट हल्ला केला. ह्यापेक्षा मी तुला जास्त काही सांगू शकत नाही. एवढंच सांगते की जी व्यक्ती तुम्हाला हवी होती, ती मी आहे. माझा नवरा नव्हे. मी सांगतेय ते ऐकण्याची तुला गरज आहे. तुम्ही चुकीच्या घराला आपलं लक्षय बनवलंयत. त्यांनी तुम्हाला गंडवलंय.”

“गंडवलंय?” व्हॉन डॅनिकनला खात्री पटलेली नव्हती.

“होय.”

“तू एवढ्या खात्रीने कशी सांगू शकतेस?”

“कारण खरं घर कुठे आहे ते मला ठाऊक आहे.”

“आपल्याला घाई करायला हवी.” जोनाथन म्हणाला. “त्यांना परत बोलावून घे.”

व्हॉन डॅनिकन आता एका थकलेल्या योद्ध्यासारखा दिसत होता. पण त्याने आपली असलेली सर्व शक्ती त्या एका शेवटच्या लढाईसाठी राखून ठेवला होती. त्याच्या ओठांची जलद हालचाल होत होती. जोनाथनला वाटले की तो, त्याच्या मनाला पोखरणाऱ्या शेकडो प्रश्नांची क्रमवार विभागणी करतोय. जोनाथनला हे ही ठाऊक होतं की, ज्या प्रश्नांनी त्याला छळले होते, तेच प्रश्न आत्ता त्यालाही सतावताहेत.

“ड्रोन कुठे आहे?” व्हॉन डॅनिकनने विचारले.

“डोंगरावरच्या एका घरात ते ठेवलंय. लेंकस्ट्रॅस्से-४. ते जिथे उभे होते, त्याच्या मागच्या बाजूला पाच किलोमीटरवर असलेल्या डोंगरपायथ्याकडे बोट दाखवत एम्मा म्हणाली.

“आणि आज रात्रीचं उड्डाण पक्कं ठरलंय?”

“तेल अविव्हवरून सुटलेल्या विमानावर ते हल्ला करणार आहे.”

दूर विमानतळावरून एक विमान आकाशात झेप घेण्याच्या तयारीत होते. त्या गगनभेदी आवाजाने कानठळ्या बसत होत्या. नंतर दुसऱ्या एका ठिकाणाहून आणखी एक वेगळा आवाज आला. हा आवाज आधीच्याइतका मोठा नव्हता. सर्वांच्या माना वर उचलल्या गेल्या. राखाडी रंगाचे दोन आकार आकाशातून पुढे सरकत होते.

“त्यांना थांबव.” एम्मा म्हणाली.

“पण मी तुमच्यावर का म्हणून विश्वास ठेवू?”

“कारण मी आत्ता इथे आहे.”

व्हॉन डॅनिकनने जॅकेटमधून वॉकी-टॉकी काढत तोंडाजवळ धरला. पण त्याच्या तोंडून एक शब्ददेखील उच्चारला जाण्याआधी एका प्रचंड स्फोटाने सारा आसमंत उजळून निघाला. मशिनगन्सच्या फैरी झडू लागल्या. काचांचा चक्काचूर होत होता. त्या प्रकाशात घरामागे धावणारे सैनिक दिसत होते.

व्हॉन डॅनिकन रस्त्यावरून धावू लागला. जोनाथन व एम्माही त्याच्या पाठोपाठच धावत होते. ते कमांड पोस्टजवळ पोहोचले व मागच्या दरवाजाने आत आले. आतमध्ये बारा सैनिक घोळका करून समोरच्या खिडकीमधून बाहेरचं दृश्य पाहत होते. पोलीसबॅन्डचा रेडिओ खरखरू लागला.

“गुहा मोकळी झालीय.”

“स्वयंपाकघर मोकळं केलंय.”

“बेडरूम मोकळी.”

खुणेच्या भाषेतले आवाज कानी पडत होते. त्यानंतर मशिनगनमधून आणखी एक फैर सुटली.

“एक माणूस मरून पडला.”

“तो कोण होता?”

“गुंड.”

“थांबा जरा... काय करताय?”

“त्याला बांधून ठेवलंय.”

“पण त्याच्या हातात पिस्तूल होतं.”

“ताबडतोब बॉसला बोलवा.”

व्हॉन डॅनिकनने एम्माकडे रोखून पाहिले. पण ती निर्विकार होती. तिचे डोळे रेडिओवर खिळलेले होते.

रेडिओवरची खरखर थांबली. चिडीचूप शांतता पसरली. सर्वांचे कान रेडिओकडे लागलेले होते. एक मिनिट होऊन गेले. रस्त्यावर एक कुत्रा भुंकत होता.

अचानक रेडिओवरून बर्गरचा आवाज आला. “मार्क्स, इकडे निघून ये.”

व्हॉन डॅनिकनने एम्मा व जोनाथनकडे पाहिले. “तुम्ही इथेच थांबा.”

तो मुद्दाम रस्त्याच्या अगदी मधून चालू लागला. त्याला खरे तर धावत जायचे होते, पण अखेर तो फेडरल पोलिसांचा विभागप्रमुख होता. तसे करणे चुकीचे दिसले असते. त्याच्या अंगात पोलिसी पद्धत भिनलेली होती.

दोन-दोन पायऱ्या एका दमात चढत तो वर पोहोचला. वाटेत सैनिक उभे होते. दारूगोळ्याचा वास नाकात भरत होता. त्याचे डोळे चुरचुरू लागले. तो आत शिरला. हल्ला करण्याआधी घराची वीज कापली होती. खोलीत अंधार होता व ती धुराने कोंदटलेली होती. व्हॉन डॅनिकनने बॅटरी पेटवली. बाजूच्या खोलीतून बर्गर बाहेर आला. त्याचा चेहरा काळाकुट्ट झाला होता. “आपण येतोय हे त्यांना समजलेलं होतं.” तो त्याला हॉलमध्ये घेऊन जात म्हणाला. “त्यांनी सगळा बेत आधीच रचून ठेवला होता.”

“झालं काय?”

“तूच बघ.”

व्हॉन डॅनिकनने बॅटरीचा झोत फिरवला. खुर्चीला घट्ट बांधलेला एक माणूस बाजूला कलंडून पडला होता. त्याच्या तोंडावर चिकटपट्टी लावलेली होती. त्याच्या हातातल्या पिस्तुलावरही तशाच पट्ट्या चिकटवलेल्या होत्या. त्याच्या छातीतून वाहणाऱ्या रक्ताचे तळे साठले होते व रक्ताचा प्रवाह पुढे ओघळत चालला होता. मरताना, त्याचे डोळे विस्फारले गेले होते.

“समोरच्या माणसाच्या हातात बंदूक दिसली तर लगेच गोळी चालवायची असं आम्हाला पढवलं गेलंय.” बर्गर म्हणाला.

व्हॉन डॅनिकन एक पाऊल पुढे सरकला. आपले शरीर बधिर होतेय असे त्याला वाटले. त्याचे डोळे जे त्याला दाखवत होते ते स्वीकारायला त्याचे मन तयार होत नव्हते.

मेलेला मनुष्य, फिलिप पालुंबो होता.

“तुम्हाला ड्रोनबद्दल आणखी काय ठाऊक आहे?” कमांड पोस्टला परतल्यावर व्हॉन डॅनिकनने विचारले.

“कमीतकमी सहा जणांची तरी टीम असणार.” एम्मा म्हणाली. “त्यातले चार जण सुट्टे भाग जोडून ड्रोन तयार करण्यासाठी व मग त्यावर पहारा देण्यासाठी. एक जण ड्रोनचा नियंत्रक असेल व उरलेला प्रत्यक्ष ड्रोन चालवत असेल. सर्वांजवळ भरपूर

शस्त्रास्त्रं असतील.”

व्हॉन डॅनिकन खिडकीपाशी गेला व डोंगराकडे पाहू लागला. त्याला ती जागा ठाऊक होती. त्या डोंगरावर अजूनही एका लांब व रुंद भिंतीचे भग्नावशेष शिल्लक होते. एकेकाळी झुरिकची ती भक्कम तटबंदी होती. त्याच वेळी विमानतळावरून एका विमानाने उड्डाण केले. विमान उजवीकडे वळल्यावर, नेमक्या त्याच जागेवरून ते उडत पुढे गेले.

त्याची नजर खालच्या रस्त्यावर गेली. बर्गरची माणसे एका रांगेत चालली होती. त्यांना पुन्हा एकत्र गोळा करण्याएवढा वेळ, त्याच्यापाशी नव्हता.

“गाडी घेऊन ये.” त्याने हार्डनबर्गला आज्ञा केली. तो मायरकडे वळला. “मी विमान उड्डाणांचं वेळापत्रक तुला आणायला सांगितलं होतं?”

मायरने जॅकेटमधून कागद बाहेर काढला. व्हॉन डॅनिकन वाचू लागला. तेल अविव्हवरून येणारे विमान ८.०५ ला पोहोचत होते. E1 A1 8851 . त्याने घड्याळात पाहिले. साडेसात वाजले होते. एम्माकडे पाहत त्याने विचारले, “आणखी काही सांगायचंय?”

“घराकडे जायला दोन रस्ते आहेत.” एम्मा म्हणाली. “त्यातला एक मुख्य रस्ता आहे ज्याचा धावपट्टी म्हणून उपयोग केला जाणार आहे. दुसरा रस्ता मागच्या बाजूला आहे. आपण दोन वेगवेगळ्या तुकड्या करू असं मी सुचवीन. मी पुढच्या बाजूने जाते.”

आपल्याच देशात आपल्याला आज्ञा देणाऱ्या त्या उद्धट व स्वत:वर ठाम विश्वास असलेल्या स्त्रीकडे, व्हॉन डॅनिकनने पाहिले. त्याचे पित्त उसळले. पण असे पित्त उसळणे एका सळसळत्या तरुणाच्या बाबतीत शोभले असते. एका चीफ इन्स्पेक्टरच्या बाबतीत नक्कीच नव्हे. “छान. तुला शस्त्र हवंय?”

एम्माने जोनाथनच्या रोखाने मान तिरपी केली. “त्याला लागेल.” व्हॉन डॅनिकनने जोनाथनच्या हातात पिस्तूल व दोन हातबॉम्ब देईपर्यंत तिने शांतपणे वाट पाहिली व मग ती पुन्हा बोलू लागली. “घराच्या भोवती माणसांचा पहारा ठेवलेला असणार. शक्य तितक्या जवळ पोहोचल्यावरच गाडीच्या दिव्यांचा व सायरनचा भडिमार सुरू करा. आत्ता ह्या घरावर हल्ला केल्यामुळे ते काहीसे निश्चिंत व बेसावध झालेले असणार. आपण येऊ ह्याची शक्यता त्यांनी गृहीत धरलेली नसेल.”

“कोण आहे ह्याचा सूत्रधार? त्याचं नाव ऑस्टिन आहे?”

एम्माने उत्तर दिले नाही.

“तू त्याच्याबरोबर बोलू शकशील?” व्हॉन डॅनिकन पुढे म्हणाला. “आम्ही तुला चारही बाजूने घेरलंय असं जर तू सांगितलंस तर तो विश्वास ठेवेल?”

“नाही.” एम्मा म्हणाली. “तो फक्त एकाच आवाजावर विश्वास ठेवतो.”

“म्हणजे?”

“म्हणजे तो आता कुणाचंही ऐकणार नाही.”

व्हॉन डॅनिकनने SWAT कॅप्टनला रेडिओवरून सूचना दिल्या की, त्याने त्याच्या माणसांना घेऊन मागच्या मार्गाने ताबडतोब लेंकस्ट्रॅस्सेला पोहोचावे. गोळीबार करावा लागणार आहे. तितक्यात पोलीस खात्याची पांढरी ऑडी कार घेऊन हार्डनबर्ग तिथे

पोहोचला. व्हॉन डॅनिकनने गाडीचा दरवाजा उघडला. “तुझ्याजवळ गाडी आहे?” त्याने एम्मा रॅन्समला विचारले.

“मागे रस्त्यावर आहे.” ती म्हणाली.

“गुड लक.”

व्हॉन डॅनिकन मागच्या सीटवर बसला. हेक्लर आणि कोचची मशिनगन घेऊन, कुर्ट मायर ड्रायव्हरशेजारी बसला. “तुला खरं सांगायचं तर मी बऱ्याच दिवसांत मशिनगन चालवलेली नाही.” मायर मान तिरपी करत म्हणाला.

“किती दिवसांत?”

“कधीच नाही.”

“माझ्याकडे दे.”

मायरने ती व्हॉन डॅनिकनच्या हातात दिली. चेंबर फिरवत त्याने ती स्वयंचलित केली. “नेम धर व चाप ओढ. गोळी कोणावर तरी आपटेलच. फक्त ती आमच्या दिशेने येणार नाही एवढे बघ.”

मायरने बंदूक घेतली व मांडीवर ठेवून दिली.

“मॉनिटरवर लेंकस्ट्रेस्सेचा नकाशा उघड.” गाडीने वेग घेतल्यावर डॅनिकन म्हणाला.

हार्डनबर्गने बटणे दाबली व पडद्यावर लेंकस्ट्रॅस्सेचा नकाशा दिसू लागला. रस्ता बागेजवळून अगदी थेट पोहोचत होता. ते घर उत्तरेच्या टोकावर होते. “गाडी मागच्या बाजूने ने.” व्हॉन डॅनिकन म्हणाला.

ग्लॅट्टब्रुगचा रस्ता पार करून गाडीने डोंगराचा घाट पकडला. डॅनिकनने विमानतळावर फोन लावला. चार मिनिटाने फोन लागला. त्याने स्वत:ची ओळख सांगितली. “E1 A1 8851 ची फ्लाईट कधी पोहोचतेय?”

“वीस मिनिटे लवकर पोहोचतेय.” नियंत्रक म्हणाला. “सात पंचेचाळीसला.”

व्हॉन डॅनिकनने घड्याळात पाहिले. सात वाजून छत्तीस मिनिटे झाली होती. “पायलटशी संपर्क साधा आणि त्याला विमान खाली उतरवू देऊ नका. त्या विमानाला धोका असल्याची आम्हाला खात्रीपूर्वक माहिती मिळालीय.”

“तो आता साठ किलोमीटरवर आहे. पण काही अडचण असल्याचे त्याने कळवलेले नाही. तुझी नक्की खात्री आहे?”

“E1 A1 8851 फ्लाईटवर जमिनीवर हल्ला होणार असल्याची पक्की खबर आहे.”

“पण आम्हाला मुख्य कार्यालयाकडून काहीच सूचना...”

“सांगतो ते कर.” व्हॉन डॅनिकनच्या आवाजात चीफ इन्स्पेक्टरची जरब होती.

“होय सर.”

व्हॉन डॅनिकनने फोन बंद केला. साठ किलोमीटर. जर त्याने लॅमर्सच्या ऑफिसात पाहिलेल्या छोट्या ड्रोनचा पल्ला पन्नास किलोमीटरचा होता, तर ह्या मोठ्या ड्रोनचा तर तो त्याहून दसपट असणार. ते जर ड्रोनचे उड्डाण थांबवू शकले नाहीत तर फार उशीर झालेला असेल.

“पुढचा रस्ता बंद आहे.” हार्डनबर्ग म्हणाला.

“गाडी रस्त्याच्या बाजूने घेऊन चल. तुझ्या खांद्यावरून ते घर दिसतंय.”

“सायरन वाजवू.”

“जवळ पोहोचेपर्यंत थांब.”

हार्डनबर्गने गाडीचा वेग कमी केला व तो बर्फाच्या खडकाळ पृष्ठभागावरून गाडी नेऊ लागला. गाडी उडू लागली. “हळू, हळू.”

“काही अडचण नाहीये.” मायर म्हणाला. “मी सांगितलं की–”

गाडीची काच खळकन फुटली. गाडीवर गोळ्यांचा वर्षाव झाला. टायर फुटला व ऑडी एका बाजूला कलंडली.

“खाली उतरा.” व्हॉन डॅनिकन ओरडला. दुसऱ्या सेकंदाला त्याच्या अंगावर काहीतरी गरम व ओलसर आदळलेले होते. त्याने चेहरा पुसला तेव्हा त्याच्या हातात लिबलिबीत मांसाचा तुकडा होता. कुर्ट मायर आपल्या सीटवर वेडावाकडा पडला होता. त्याचा चेहरा विच्छिन्न झाला होता.

हार्डनबर्गने गाडीचा दरवाजा उघडला व तो सरपटत गाडीच्या मागच्या बाजूला गेला. व्हॉन डॅनिकनने अगदी हळुवारपणे दरवाजा उघडला. मनातल्या मनात तीन आकडे मोजले व जंगलात शरीर भिरकावून दिले. त्याचे तोंड बर्फात खुपसले गेले.

गोळीबार थांबला. अधूनमधून एखादी गोळी सुटत होती.

“कॅप्टन बर्गरला फोन कर,” त्याने हार्डनबर्गला ओरडून सांगितले.

“माझा फोन गाडीत आहे.”

व्हॉन डॅनिकनने आपले खिसे चाचपले. गाडीबाहेर उडी मारताना त्याचाही फोन कुठेतरी पडलेला होता. त्याने पिस्तूल बाहेर काढले व चेम्बर फिरवले. सात वाजून बेचाळीस मिनिटे झालेली होती. डोंगरावरून एक नवीन आवाज येऊ लागला. ड्रोनचे इंजीन सुरू झाले होते.

त्याने भोवताली पाहिले. घर तीस मीटरवर दिसत होते. स्टीलच्या खांबावर उभारलेले ते एक अत्याधुनिक घर होते.

त्याने मान उंच करून नीट पाहण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या बाजूला दहा सेंटीमीटरवर असलेल्या झाडावर एक गोळी सुसाट वेगाने आदळली. त्याने बर्फात तोंड खुपसले. अंधारात पाहू शकणारे गॉगल्स– त्याशिवाय इतक्या किर्र काळोखात तो त्यांना कसा दिसला असता?

“धावत खाली जा.” तो हार्डनबर्गला म्हणा. “इतरांना सावध कर.”

“ओके.” हार्डनबर्ग म्हणाला, पण तो जागेवरून हलला नाही.

“गाडीच्या मागच्या बाजूनेच जात राहा म्हणजे ते तुला मारू शकणार नाहीत.”

हार्डनबर्ग थरथरला. त्याने आवंढा गिळला. त्याचे खांदे जड झाले. तो रांगत, सरपटत खाली जाऊ लागला. तो जमिनीला पाठ टेकवून मागे सरकत होता. त्याने डोके थोडेसे उचलले.

“खाली वाक.” व्हॉन डॅनिकन कुजबुजला. त्याने हाताने इशारा केला. हार्डनबर्गने त्या इशाऱ्याचा चुकीचा अर्थ लावला. तो उठून उभा राहू लागला.

“नाहीऽ” व्हॉन डॅनिकन जिवाच्या आकांताने ओरडला. “खाली झोप.” हार्डनबर्गने अर्धवट मान हलवली व तो डोंगर उतरू लागला. सणसणत येणारी गोळी त्याच्या

डोक्यात घुसली. तो खाली कोसळला.

“देवाऽ”

व्हॉन डॅनिकन पाठीवर पडून राहिला. तो सुन्न झाला होता.

८४

कॅप्टन एली झुकरमनने पंख्यांचा वेग कमी केला व विमानातील स्वयंचलित व्यवस्था आपल्या ताब्यात आणण्याचा प्रयत्न केला. विमान चालवणे ही गोष्ट आता वैमानिकाच्या हातात फारशी राहिलेली नव्हती. सर्व काही मशिन्सच्या हातात गेले होते. पोहोचण्याचे ठिकाण, समुद्रसपाटीपासूनची उंची, वेगमर्यादा– म्हणजे विमान जणू काही आपोआप उडत होते. फक्त विमान हवेत उडवताना व खाली जमिनीवर आणताना, विमानाला वैमानिकाची गरज होती– असा विचार झुकरमनच्या मनात येऊन गेला. म्हणजे प्रवासातील फक्त तीस मिनिटे खऱ्या अर्थाने त्याच्या ताब्यात ते विमान होते. इतर वेळी तो केवळ विमानाच्या सर्व उपकरणांवर देखरेख करणारा एक तंत्रज्ञ होता. वैमानिक होताना त्याने असे स्वप्न कधीच रंगवले नव्हते. तेव्हा त्याच्या अंगात रग होती, ऊर्जा होती, रक्त सळसळत होते. तीन युद्धांत त्याने शत्रूपक्षाची एकवीस माणसे मारली होती.

झुकरमनने सर्व स्वयंचलित यंत्रणा बंद करून टाकली. विमानाला हादरा बसला. आता ते विमान सर्वस्वी वैमानिकावर अवलंबून होऊन गेले. विमान डावीकडे झुकत पुढे जाऊ लागले. आकाश निरभ्र होते. विमानचालकाला कुठलाही अडथळा दिसत नव्हता. एका बाजूला, दिव्याने झगमगणारे शहर स्पष्ट दिसत होते व दुसरी बाजू पूर्ण मोकळी दिसत होती. तिथे आल्प्स पर्वत होता. त्याने वेग कमी करत विमान खाली आणले.

“साठ मिनिटांत आपण खाली पोहोचत आहोत.” सहवैमानिक म्हणाला.

झुकरमनने जांभई कशीबशी दाबली. अपेक्षेनुसार आत्तापर्यंतचा प्रवास अगदी निर्विघ्नपणे पार पडला. त्याने घड्याळ बघितले. पंधरा मिनिटे उरली होती. त्याने मान बाजूला वळवली. “बेन्नी, रात्रीच्या जेवणाचा काय बेत आहे?”

“E1 A1 8851 , आम्ही झुरिच विमानतळ कक्षातून बोलतोय. आणीबाणीची परिस्थिती उद्भवलीय. बसेल–मुलहाऊसला विमान वळवा. व्हेक्टर, दोन-सात- नऊ. तीस हजार फूट वर जा. हे सर्व जितक्या लवकर करता येणं शक्य आहे, तितक्या लवकर करण्याचा प्रयत्न करा. आणीबाणी गुप्त क्रमांक ३३.”

गुप्त क्रमांक ३३ म्हणजे जमिनीवरून हल्ला.

“रॉजर, गुप्त क्रमांक ३३. E1 A1 8851 , आम्ही व्हेक्टर दोन-सात-नऊकडे निघालोय. विमान तीस हजार फूट उंच नेत आहोत. तुम्ही तिथल्या रडार संपर्कात आहात का?”

“नाही, E1 A1 8851 , अजून रडार संपर्क झालेला नाही.”

“धन्यवाद झुरिच.”

एली झुकरमनने खांद्याभोवती पॅरेशूट बांधून घेतले. तो अस्वस्थ झाला होता. त्याने नियंत्रक बटण दाबले. विमान पुढे सरकू लागले.

तो कसोटीचा क्षण होता. आपले मूल आपल्या किती ताब्यात आहे हे तो अजमावणार होता.

८५

“महदी-१, सर्व काही व्यवस्थित आहे. तू उड्डाण करू शकतोस. तुला दैवाची साथ मिळो हीच सदिच्छा.”

मेजर जनरल जॉन ऑस्टिनने इंजीन सुरू केले. ड्रोन धावपट्टीवरून पुढे सरकू लागले.

कानाला लावलेल्या यंत्रामधून त्याला फटाके उडाल्याचा आवाज आला. पाठोपाठ त्याच्या डाव्या बाजूला त्याला काही ठिगण्या उडताना दिसल्या. त्याची माणसे गोळीबार करत होती. अचानक आणखी एक आवाज आला. “पोलीस.”

“त्यांना पुढे येऊ देऊ नका.”

धावपट्टीवरून ड्रोन पुढे जाऊ लागले व ऑस्टिनचे मन अभिमानाने व कर्तव्यपूर्तीच्या समाधानाने भरून येऊ लागले. त्याने ते करून दाखवले होते. त्याच्यावर सोपवलेली मोहीम यशस्वी होत होती. इस्त्रायल आपल्या पवित्र भूमीच्या संरक्षणार्थ सज्ज झाले होते. इराणने युद्धसामुग्री जमवलेली होती. आर्मागेड्डनच्या पठारावर, गॉग आणि मॅगॉग समोरासमोर उभे ठाकले होते.

पुढे काय घडणार याचे चित्र त्याला स्पष्ट दिसू लागले. सर्व काही प्रभूच्या इच्छेनुसार घडणार होते.

इस्त्रायलचा बॉम्बहल्ला अयशस्वी ठरणार होता.

इराण आपल्याकडील kh-55 ह्या क्षेपणास्त्रांनी प्रतिहल्ला चढवणार होते. ती शस्त्रे त्यानेच तर इराणला मिळवून दिली होती. दहा किलोंची ती स्फोटक अस्त्रे तेल अविव्हवर कोसळणार होती. पण त्या हल्ल्यातून जेरुसलेम मात्र वाचणार होते. कारण प्रभू आपल्या सर्व पवित्र स्थळांचे रक्षण करणार होता. त्यानंतर अमेरिकन सैन्य इराणवर तुटून पडणार होते व त्यात त्या इस्लामिक मूलतत्त्ववादी राष्ट्राचा समूळ नाश होणार होता.

प्रभूच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होणार होती. सर्वत्र आनंदोत्सव साजरा होणार होता.

त्याने तो गोळीबाराचा वाढत चाललेला आवाज रोखून धरला व आपले लक्ष समोरच्या पडद्यावर केंद्रित केले. आजूबाजूची झाडे वेगाने पुढे चालली होती. धावपट्टीवरचे दिवे लखलखत होते. वेगाची मर्यादा शंभर नॉट्सवरून आता एकशेदहा झाली होती. त्याने जॉयस्टिक मागे खेचली. विमानाचे नाक वर येऊ लागले.

आणि त्याच क्षणी त्याला ते दिसले. ड्रोनच्या समोरून दोन भगभगीत प्रकाशाचे दिवे वेगाने पुढे सरकत होते. त्या तिथे एखादी गाडी येऊच कशी शकते हे त्याला कळेना.

त्याने जॉयस्टिक आपल्या मुठीत घट्ट पकडून ती मागे खेचली.

“चल राजा, आता आकाशात उंच झेप घे.”

८६

“तू तो आवाज ऐकलास?” जोनाथनने तिला सावध करत विचारले. एम्माने त्याच्याकडे पाहिले. “कसला?”

त्याने खिडकीखालून वाकत मान बाहेर काढली. “मला खात्री नाही. पण...” मोठा आवाज झाला, मग पुन्हा एकदा. “गोळ्यांचा आवाज. ऐकू येतोय?”

डोंगर चढता चढता एम्माने गाडी थांबवून रस्त्याच्या कडेला घेतली. आजूबाजूला घनदाट जंगल होते. त्या प्रचंड भिंतीचे भग्नावशेष दिसत होते. दूर झाडामधून गोळीबारांचे आवाज ऐकू येत होते.

“व्हॉन डॅनिकन पोहोचलेला असणार. एका अर्थी बरे झाले. त्याच्यावर हल्ला करण्यात ते गुंतलेले असणार.” तिने मान वळवत त्याच्याकडे रोखून पाहिले. “तुला सर्व जमेल ना?”

जोनाथनने होकार दिला. खूप आधीच त्याने तो निर्णय घेतलेला होता.

“आपण जागा बदलू या.” एम्मा म्हणाली. “तू गाडी चालव. मला वाटत नाही तुला पिस्तूल चालवता येत असेल.”

जोनाथन एक क्षण गप्प बसला. “उलट मी तुला म्हणणार होतो की तुला नेहमीच पिस्तुलाचा खुन्नस वाटत आलाय.”

“मला वाटतोच.”

दोघांनी जागा बदलल्या. जोनाथनने सीट उंच केली. एम्माने दरवाजा बंद करत त्याला गाडी चालवत राहायला सांगितले. तिचा आत्मविश्वास कमी झाला होता व श्वासाची गती वाढलेली होती. ती त्याच्याचएवढी घाबरलेली होती.

“काही झालं तरी थांबू नकोस.” एम्मा म्हणाली.

गाडीचा वेग वाढला. समोर येणारे अडथळे तो तुडवू लागला.

“दिवे बंद कर.” ती म्हणाली.

जोनाथनने गाडीचे दिवे विझवले. समोर काळोख दाटला. तो काचेजवळ वाकला. समोर काहीतरी आले. गाडीने त्या अडथळ्याला धडक मारली. लाकडाचे तुकडे रस्ताभर पसरले. रस्ता आता रुंद झाला. रस्त्यावरच्या कंदिलामुळे आता दिसू लागले होते.

गोळ्यांचा आवाज अगदी जवळून येत होता. अचानक एक गोळी गाडीत घुसली. काचा फुटल्या. वारा आत घुसला. समोरच्या बर्फावर, गुडघ्यांवर बसलेल्या अनेक आकृती दिसू लागल्या.

“चालवत राहा.” एम्माने खिडकीतून वाकत, सावल्यांवर गोळीबार सुरू केला. नंतर त्याला ते दिसले. प्रचंड पंख असलेले ते एक चंदेरी जनावर होते.

“एम्मा,”

“वेग वाढव.” ती म्हणाली. “धडक दे.”

“पण...” त्याने एम्माकडे पाहिले. तो आत्मघात ठरणार होता.

“सांगते तसं कर.”

जोनाथनने तिसऱ्या गिअरमध्ये गाडी नेली व अॅक्सिलरेटर जोरात दाबला. गाडीने कमालीचा वेग पकडला. ड्रोन हवेत उडण्याचे चिन्ह दिसत नव्हते. त्यांना तो एक हिंस्त्र पक्षी वाटला. एम्मा ड्रोनवर गोळ्या झाडत होती. तिचा नेम बसत होता का, हे त्याला समजत नव्हते. त्याचे लक्ष त्या ड्रोनच्या पोटातील फुग्याकडे होते. तो बॉम्ब होता. वीस किलोचे ते सिमटेक्स होते असे तिनेच त्याला सांगितले होते. एखादे प्रवासी विमान उडवून टाकण्याची त्यात क्षमता होती.

“जोरात, वेग वाढव,” एम्मा म्हणाली.

ड्रोनने आपले नाक जमिनीवरून उंचावले व पुन्हा ते खाली आले. जोनाथनने शरीर आवळून धरले. गाडीची टक्कर होणार आणि मोठा स्फोट होणार ह्या अपेक्षेने तो डोळे तिरळे करून समोर पाहू लागला.

ड्रोन हळूहळू जमिनीपासून वर जाऊ लागले. त्याचे नाक हवेत उचलले गेले. पुढची चाके पोटात घुसली. हे चांगले लक्षण नव्हते. टक्कर अपरिहार्य होती. त्याची अंतःप्रेरणा त्याला ब्रेक्स दाबायला सांगत होती. त्याने वेग आणखी वाढवला.

तो किंचाळला.

त्याच्या डोक्यावरून एक चंदेरी पट्टा वेगात सरकून पुढे गेला.

तो नाहीसा झाला. ड्रोन आकाशात उडाले होते.

दुसऱ्या सेकंदाला गाडीचे पुढचे टायर्स फुटलेले होते. रस्ता सोडून गाडी डावीकडे कलंडली. जोनाथनने गाडी विरुद्ध दिशेला वळवण्याचा प्रयत्न केला, पण काही उपयोग झाला नाही. गाडी वेगाने, दिशाहीन जाऊ लागली. ती बर्फावर आदळली व घरापासून वीस मीटर अंतरावर असलेल्या ओक वृक्षांच्या मधल्या मोकळ्या जागेत जाऊन थांबली.

एम्माने त्याच्या हातातल्या पिस्तुलावर मूठ आपटली. “तुला हवा असलेला माणूस त्या घरात आहे. नियंत्रण कक्ष शोधून काढ. तिथे तो तुला सापडेल. त्याच्याशी एक शब्दही बोलू नकोस. आपलं काम पूर्ण झाल्याखेरीज तो कुठेही लक्ष देणार नाही. तुझ्या पिस्तुलात आठ गोळ्या आहेत.”

“तू काय करणार आहेस?”

“मी इथेच थांबते.” ती म्हणाली. “मी गोळ्या झाडायला सुरुवात केली की, तू जंगलात पळ व घराला वळसा घाल. तू एका चढणीवरून गच्चीवर पोहोचशील. तिथून तुला आत शिरायची वाट सापडेल.”

त्या वेळी त्याच्या लक्षात आले की तिला गोळी लागलीये. तिचा खांदा झुकला होता व तिच्या जॅकेटमधून रक्त येत होते. “तुला जखम झालीय.”

“तू जा. निघ.” त्याचा हळवेपणा तिला सहन होत नव्हता.

जोनाथन क्षणभर अडखळला व मग चालू लागला. त्याच्या पाठून, एम्मा त्या घरावर गोळीबार करू लागली.

सत्ता.

व्हॉन डॅनिकन बर्फावर पडून होता. त्याला थंडी जाणवत नव्हती. तो भावनाशून्य झाला होता. दोन दिवसांपूर्वी मिळालेल्या माहितीनुसार त्याला समजले होते की, ड्रोनला नियंत्रित करणाऱ्या उपकरणांमुळे फार मोठ्या प्रमाणावर विद्युत शक्ती खर्च होते. जर त्याने त्या घराची वीज कापली तर ते ड्रोन नादुरुस्त होऊ शकत होते. ते उडत राहिले असते, पण त्याच्या सुकाणूतील शक्ती संपली असती. लवकरच त्याचे इंधनही संपून गेले असते. शक्यता एकच होती की ते जमिनीवर कोसळले असते, पण डोंगराळ भागात. जरी ते कुठेही पडले असते तरी त्यामुळे सहाशे जणांचा जीव नक्कीच जाणार नव्हता.

पोटावरून पुढे सरकत तो डोंगराच्या कडेला जाऊ लागला. त्याच्यादिशेने गोळ्या झाडल्या जात होत्या. बर्फ चिरडून, हिमतुषार अंगावर येत होते. बर्फ नाकातोंडात शिरत असताना त्याला अचानक ती लोखंडी पेटी दिसली. तेच विजेचे मुख्य केंद्र होते.

तो डोंगरावर चढला. आता मात्र तो थंडीने कुडकुडत होता. काही मीटर पुढे जाऊन त्याने विश्रांती घेतली. गोळीबार चालूच होता, पण आता त्याच्या दिशेने गोळ्या येत नव्हत्या. डोंगराच्या दुसऱ्या बाजूने गोळीबार सुरू होता. बहुधा रॅन्सम व एम्माकडून गोळ्या झाडल्या जात असाव्यात.

जेट इंजिनाचा आवाज येऊ लागला. एवढ्याशा छोट्या विमानाचा एवढा मोठा आवाज होऊ शकतो ह्याचे त्याला नवल वाटले. ड्रोन उड्डाण करू लागले होते. त्याने आकाशात पाहिले. त्याला एक चंदेरी पंख चमकताना दिसला.

बर्फावरून अंग घासत तो पुढे जाऊ लागला. स्वत:ला लपवण्याचा त्याने जराही प्रयत्न केला नाही. आपण आपल्या लक्षयाच्या अतिशय जवळ येऊन पोहोचलो आहोत हे त्याला जाणवले; पण गोळ्यांचा आवाज थांबल्याने तो अधिकच सावध झाला होता. आत्तापर्यंत ते घर दूर दिसत होते आणि अचानक तो घरापाशी येऊन पोहोचला होता.

जवळच ती लोखंडी पेटी होती. पेटीला कुलूप होते. तो मागे सरला व नेम धरत त्याने कुलपावर गोळी झाडली. कुलूप तुटून खाली पडले. पेटी उघडली गेली. त्याने पेटीत डोकावून पाहिले. हात न लावण्याचा स्पष्ट इशारा लिहिलेला होता. पेटीमध्ये असंख्य वायर्सचे मोठे जाळे पसरलेले होते. खरे तर पेटीमध्ये एक मास्टर स्विच असणार अशी त्याने कल्पना केली होती. नीट पाहण्यासाठी त्याने मान उंच केली.

त्याच्या खांद्यात एक गोळी घुसली व काय झाले ते कळण्याआधीच तो बर्फावर आडवा पडलेला होता. तो कुशीवर वळला. त्याला श्वास घेणे अवघड झाले. तो तसाच काही वेळ पडून राहिला व मग हळूहळू भानावर आला.

गुडघ्यांवर बसून त्याने घरावर अंदाजाने काही गोळ्या मारल्या. हातात असलेल्या पिस्तुलामुळे त्याच्यात आत्मविश्वास आला होता. त्याने पेटीतल्या वायरींवर गोळी झाडली, पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

तो लटपटला. आपण एका विचित्र परिस्थितीत सापडलो आहोत असे त्याला वाटले.

गेल्या तीस वर्षांत त्याने प्रथमच पिस्तूल चालवले होते व ते ही एका लोखंडी पेटीवर. तो थकून जमिनीवर बसला. पायाखालचे बर्फ लाल झाले होते. त्याने डावा खांदा हलवण्याचा प्रयत्न केला, पण तो गोठून बधिर झाला होता. त्याला बर्फावरून उठता येईना.

त्याला पाणी हवे होते.

अचानक त्याच्या मनात विचार चमकला. पिस्तुलाची काही गरजच नव्हती.

तो धडपडत उठला व पेटीत हात घालून त्याने हाताला येतील तेवढ्या वायर्स बाहेर खेचल्या. असंख्य ठिणग्या चमकून उठत जमिनीवर पडू लागल्या. एका वायरमधून निळा प्रकाश संथपणे बाहेर येत राहिला. त्याने उजव्या मुठीत बर्फ गोळा करून तो पेटीत कोंबला. वायर्समधून चरचर आवाज होत आणखी ठिणग्या उडू लागल्या. आपण करतोय त्याचा काय परिणाम होणार हे त्याला ठाऊक नव्हते, पण समोर दिसणारा परिणाम पुरेसा ठरत नव्हता हे त्याला कळत होते.

त्याने पेटीमध्ये खोल हात घातला व त्याच्या हाताला जाड वायर्सचा एक मोठा जुडगा लागला. त्याने एकापाठोपाठ एक वायर खेचायला सुरुवात केली. अचानक तो जुडगा मोकळा झाला व आतल्या तांब्याच्या वायर्स दिसू लागल्या.

त्या वायरींकडे पाहत असताना त्याच्या मनात ड्रोन व इस्त्रायलवरून सुटलेल्या विमानाचा विचार येत होता. त्या विमानाला समोर येणारे ड्रोन चुकवणे अशक्य होते. पोहणाऱ्या माणसासमोर अचानक एक शार्क मासा येऊन उभा राहिला तर शार्कच्या जबड्यात जाण्याशिवाय त्याच्यासमोर पर्यायच नसतो. खोलीत मरून पडलेला फिलिप पालुंबो अचानक त्याच्या डोळ्यांसमोर उभा राहिला.

व्हॉन डॅनिकनने आणखी बर्फ गोळा करून तो तांब्याच्या वायरींवर चेपून ठेवला. एक जोरदार आवाज आला हळूहळू मग शांततापसरत गेली.

आपला प्रयत्न अयशस्वी ठरलाय या विचाराने तो निराश झाला पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या खांद्यामधून व छातीतून एक जोरदार कळ उठत गेली. त्याच्या पाठीला पोक आले व तोंडाचा आ वासला गेला. त्या विजेच्या प्रवाहाचा झटकाच इतका जबरदस्त होता की, त्याचे शरीर बधिर होऊन गेले. सर्व शक्तिनिशी त्याने बर्फावर पडलेला हात वर उचलला. छातीत काहीतरी उसळले गेले व तो मागच्या बाजूला फेकला गेला.

जोनाथन झाडांच्या मागे लपून शक्य तितक्या वेगाने चालत होता. पायाखाली साचलेल्या उंच-सखल बर्फामुळे धावणे मुश्किल झाले होते. दोनतीनदा तो ठेच लागून खाली पडला होता. पन्नास मीटर धावल्यानंतर तो उजवीकडे वळला व रस्त्याला समांतर असलेल्या एका आडवाटेने वर चढू लागला. त्याला चटकन ती रोमन काळातील खचलेली भिंत सापडली. भिंतीवरून उडी मारत तो खुरडत खुरडत घराच्या मागच्या बाजूला पोहोचला.

घर डोंगराच्या उतारावर बांधलेले होते. पंचेचाळीस अंशाचा कोन करून उभारलेल्या दोन स्टीलच्या भल्या मोठ्या खांबांवर ते घर उभे होते. खांबांजवळ येऊन तो थांबला व त्याने मान उंच करून वर पाहिले. गोळीबार थांबला होता व शांतता पसरली होती. पण ती शांतता भयाण वाटत होती. डोंगरावर चढणाऱ्या गाड्यांचे आवाज त्याला ऐकू आले.

स्टीलचे खांब गुळगुळीत, ओले व थंडगार होते. खांबावरून चढणे तर अशक्यप्रायच होते; पण त्या खांबांना पकडून राहाणेही अवघड होते. एका खांबाला घट्ट मिठी मारून तो शरीराला गचके देत वर सरकू लागला. वरच्या टोकावर जेव्हा तो पोहोचला तेव्हा त्याचे हात गारठ्याने बधिर झाले होते व सगळे कपडे ओलेचिंब झाले होते. खांबाचे वरचे टोक व घराचा पायथा ह्यामधल्या छोट्याशा मोकळ्या जागेत त्याने आपला गुडघा अडकवला व हात उंच करत एका हाताने बाल्कनीचा कठडा पकडला. एक दीर्घ श्वास घेत त्याने आपले अंग हवेत झोकून दिले व बाल्कनीच्या कठड्यावर दुसरा हातही टेकवला. उडी मारून तो बाल्कनीत आला.

बाल्कनीच्या सरकत्या दरवाजाला कुलूप लावलेले होते.

त्याने काचेवर गोळी झाडली. काच फुटली व काचेचा एक तुकडा त्याच्या पायात घुसला. तुकडा काढताना त्याचा पाय रक्तबंबाळ झाला व बूट रक्ताने भिजून गेला.

घर शांत होते. एकही दिवा पेटलेला नव्हता. सुरक्षारक्षकही दिसत नव्हते. जे होते ते ते कदाचित बुडते जहाज सोडून पळाले असावेत. खोलीमधून तो एका लांब पॅसेजमध्ये आला. पॅसेजच्या टोकाला एक दरवाजा होता. पण दरवाजा उघडण्यासाठी खुणेचा नंबर फिरवणे आवश्यक होते. त्याने त्या कुलपावर गोळी झाडली पण उपयोग झाला नाही. दरवाजा व कुलूप स्टीलचे होते.

त्याने दरवाजाला कान लावला. त्याला एक दबलेला हुंकार ऐकू आला व कानाला कंपने जाणवली. अचानक तो हुंकार ऐकू येईनासा झाला. कंपनेही थांबली. सारे घरच जणू स्तब्ध, जड, निर्जिव होऊन गेले.

जोनाथनचे लक्ष दरवाजाकडे गेले. तिथे हिरवा दिवा चमकत होता. मगाशी लाल दिवा पेटलेला होता.

वीज बंद पडली होती.

त्याने दरवाजाचे हँडल फिरवले.

दरवाजा उघडला गेला.

हातात पिस्तूल धरून तो आत गेला. तेच मुख्य केंद्र होते. खिडकीमधून झुरिच विमानतळ दिसत होते. समोरच्या बाजूला, वेगवेगळी यंत्रे व उपकरणे ठेवलेली होती. एक माणूस खुर्चीत बसला होता. जोनाथनकडे त्याची पाठ होती. त्याने जॉयस्टिकवर हात ठेवला होता. तोच जॉन ऑस्टिन असावा.

काही फुटांवर दुसरा एक माणूस बसला होता. तो अस्वस्थपणे भराभर बटणे दाबत होता.

“पर्यायी वीज उपलब्ध झालीय.” दुसरा माणूस म्हणाला. तो फ्लाईट इंजिनिअर होता असे एम्माने त्याला सांगितले होते. “उपग्रहाशी संपर्क साधला गेलाय. पडद्यावर चित्र दिसू लागलंय.” त्याने वर पाहिले. त्याला जोनाथन दिसला. त्याने जोनाथनवर पिस्तूल रोखले. जोनाथनने त्याच्यावर दोन गोळ्या झाडल्या. तो माणूस खाली कोसळला.

जोनाथन पायलटजवळ गेला. “उठून उभा राहा.”

पायलटने उत्तर दिलं नाही. त्याने जॉयस्टिक उजवीकडे वळवली. समोरच्या पडद्यावर हिरवा रंग पसरला. जोनाथनला नीट दिसले नाही. तो पुढे वाकून पाहू लागला. राखाडी रंगाची एक लांबट आकाराची वस्तू आकाशात तरंगताना दिसू लागली. हळूहळू तो आकार

स्पष्ट होऊ लागला. आता त्याला त्या वस्तूचे तोंड व शेपूट दिसू लागले. खिडक्यांमधले दिवे चमकत होते. ते जेट विमान होते.

जोनाथनची नजर रडारच्या पडद्याकडे गेली. त्यावर उमटलेले दोन ठिपके अगदी एकमेकांच्या जवळ आले होते. एका ठिपक्याखाली "E1 A1 8851H" अशी अक्षरे होती. दुसऱ्या ठिपक्याखाली काहीच लिहिलेले नव्हते.

“मी सांगतोय, खुर्चीतून ऊठ.”

“तुला खूप उशीर झालाय.” जॉन ऑस्टिन म्हणाला.

हातातले काम पूर्ण केल्याशिवाय तो थांबणार नाही. एम्मा त्याला म्हणाली होती. मी त्याला चांगली ओळखते.

जोनाथन पुढे आला व त्याच्या मानेमध्ये पिस्तूल खुपसून त्याने चाप ओढला.

पायलट पुढे कोसळला.

जोनाथनने त्याचे शरीर खुर्चीवरून खाली ढकलले.

विमानाचे चित्र आता पूर्णपणे स्पष्ट झाले होते. त्याला विमानाचे पंख दिसू लागले. विमान अगदी जवळ येत चालले होते.

जोनाथनने जॉयस्टिक पुढच्या बाजूला रेटली.

विमान अधिकच जवळ आले होते. त्याला खूप उशीर झाला होता. ड्रोन त्या विमानावर धडकणार होते. पडद्यावर लाल दिवा चमकू लागला. त्याने रडारवर पाहिले. दोन्ही ठिपके एकमेकात मिसळलेले होते. पडद्यावर फक्त विमान दिसत होते.

पाय घट्ट रोवून तो समोर होणारा स्फोट सहन करण्यासाठी मन घट्ट करू लागला.

अचानक पडद्यावरून विमान दिसेनासे झाले. पडद्यावर काळोख पसरला.

त्याने नियंत्रक पटावर असलेला अल्टीमीटर शोधून काढला. त्यावरचे आकडे खाली घसरत चाललेले होते. सत्तावीस हजार फुटांवरून वीस, मग दहा आणि शेवटी शून्य.

पडदा पांढरा शुभ्र होत, विचित्रपणे खरखरू लागला.

८८

जोनाथन गाडीपाशी आला. एम्मा सीटवर आडवी पडलेली होती. ती बेशुद्ध नव्हती पण ग्लानीत होती.

"मी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला." तो म्हणाला. "पण त्याने ऐकले नाही."

तिने मान डोलावली व त्याला जवळ येण्याची खूण केली. "त्याने आजपर्यंत कधीच कुणाचे ऐकले नाही." ती पुटपुटली.

जोनाथनने आजूबाजूला पाहिले. "ते सर्व कुठे गेले?"

"ती भुतं आहेत. त्यांना अस्तित्व नाही."

त्याने तिचा हात हातात घेतला. तिचा स्पर्श थंड व कमजोर होता. "तुला हॉस्पिटलमध्ये घेऊन जायला हवं."

"जगाच्या मते मी मेलेली आहे. मला कुणी हॉस्पिटलमध्ये दाखल करून घेणार नाही."

"पण शस्त्रक्रिया केल्याशिवाय आत घुसलेली गोळी बाहेर काढता येणार नाही."

"तू डॉक्टर आहेस. माझी काळजी घ्यायला समर्थ आहेस."

जोनाथनने सीट मागे सरकवली व तो तिची जखम तपासू लागला. खांद्याच्या वरच्या भागातून गोळी आत घुसली होती. "तूच तर त्यांचा हल्ला थोपवलास. तुला आता कुणी गुन्हेगार ठरवणार नाही."

तिने मान हलवली व ती निराशपणे हसली. "मी संघटनेचा कायदा मोडलाय. त्याबद्दल फक्त एकच शिक्षा दिली जाते."

"पण ऑस्टिन तर..."

"काही सांगता येत नाही." एम्मा कुशीवर वळली. "पण त्यामुळे काहीच फरक पडत नाही. डिव्हिजन ही मेडुसाच्या मुंडक्यासारखी आहे. एक मुंडकं कापलं तर त्या जागी दहा नवीन उगवतात."

जोनाथनने तिचा हात घट्ट पकडला.

"ते तुझ्या पाळतीवर असतील." आता तिचे बोलणे स्पष्ट ऐकू येत होते. ती पुन्हा गुप्तहेराच्या भूमिकेत शिरली होती. "तुला नक्कीच कुणाची तरी मदत मिळालेली असल्याचा त्यांना संशय येणार. त्याशिवाय तू ड्रोनपर्यंत पोहोचूच शकला नसतास. खरे काय घडले याचा पत्ता त्यांना आज ना उद्या नक्कीच लागणार. त्यांच्यापैकी कुणीतरी पर्वतात जाईल. माझा अपघात खोटा होता हे शोधून काढेल. चुका मीच केल्या. मी पुरावा ठेवून द्यायला नको होता."

"मी तुला साथ देईन."

"त्या साथीचा काही उपयोग होऊ शकत नाही."

जोनाथनने तिच्या डोळ्यात खोलवर पाहिले. त्याच्या तोंडून शब्द उमटेना.

एम्माने मान वर उचलली व त्याच्या गालावर ओठ टेकवले. “अजून काही दिवस आपण एकमेकांच्या सहवासात नक्कीच राहू शकतो. ते इतक्या लवकर आपला पाठलाग सुरू करणार नाहीत.”

डोंगराखालून सायरनचे आवाज ऐकू येऊ लागले. जोनाथनने मागे वळून पाहिले. जंगलामधून निळ्या दिव्यांचे झोत चमकू लागले होते. गाड्या घराच्याच दिशेने येत होत्या. पोलिसांची एक गाडी येऊन थांबली. मार्क्स व्हॉन डॅनिकन खाली उतरला. त्याचा एक हात कापडात गुंडाळलेला होता. तो त्यांच्याजवळ आला.

“तू ते थांबवलंस?”

“होय.” जोनाथन म्हणाला.

“देव पावला.”

जोनाथनने घराच्या दिशेने बोट दाखवले. “आतमध्ये दोन माणसं आहेत.”

“मेलेली?”

जोनाथनने मान डोलावली. व्हॉन डॅनिकनला त्याचे म्हणणे पटले असावे. त्याने एम्माकडे पाहिले. “तू कोण आहेस?”

“तुला लवकरच समजेल.” ती म्हणाली.

“मी अॅम्ब्युलन्स बोलावतो.” व्हॉन डॅनिकन म्हणाला.

“मी तिची काळजी घेऊ शकतो.” जोनाथनने त्याला सांगितले.

व्हॉन डॅनिकनने आपली जखम दाबून धरली. त्याने जोनाथनकडे गाडीच्या चाव्या फेकल्या. “निळी VW आहे. कमांड पोस्टजवळ. त्यात बसून निघून जायचं.”

“थँक यू,” एम्मा म्हणाली.

“आता तू माझं देणं लागतेस.” व्हॉन डॅनिकन वळला व त्या घराच्या दिशेने अडखळत चालू लागला.

हळूहळू आणखीही पोलीसगाड्या येऊ लागल्या. एक हेलिकॉप्टर हवेत घिरट्या घालत होते.

जोनाथन गाडीजवळ पोहोचला व त्याने आपल्या बायकोला हातांच्या ओंजळीत उचलून घेतले.

“माझं नाव जोनाथन,” तो तिला म्हणाला.

“माझं नाव केरी. तुला भेटून आनंद झाला.”

तो वळला व तिला घेऊन डोंगर उतरू लागला.

उपसंहार

इस्त्रायली
हवाई दलाच्या ६९ नंबर तुकडीने पहाटेच हल्ला चढवला. त्या अत्याधुनिक विमानांनी इराणी रडारांच्या खाली असलेला पाण्याचा तळ काही सेकंदातच शोधून काढला. इराणने आपले पहिले क्षेपणास्त्र सोडले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. बॉम्बनी आपल्या लक्ष्याचा अचूक वेध घेतला होता. सोळा बॉम्ब्सनी आपले संपूर्ण काम तमाम करून टाकले होते. पर्शियन गल्फवर असलेले कर्शुनचे क्षेपणास्त्र केंद्र नकाशावरून पुसले गेले. जमिनीखाली दहा मीटर खोल ठेवलेली चारही *kh-55* क्षेपणास्त्रे बेचिराख करून टाकण्यात आली.

ऑपरेशन नायटिंगेल यशस्वी ठरले.

पंतप्रधानांच्या कार्यालयाने तात्पुरता का होईना, एक निःश्वास सोडला होता. इस्त्रायलला नामशेष करण्याची धमकी आता कुणी देऊ शकणार नव्हता. राष्ट्राच्या अस्तित्वाला आता धोका राहिलेला नव्हता. देशाची सीमा सुरक्षित झाली होती. अर्थात, तात्पुरती.

इराणचा छुपा आण्विक कार्यक्रम साऱ्या जगासमोर उघड करण्यात आला. जगातल्या सर्व राजकीय नेत्यांनी इस्लामी प्रजासत्ताकाचा तीव्र शब्दात निषेध केला. इराणच्या आण्विक कार्यक्रमावर कायमची बंदी घालण्याची मागणी करण्यात आली. अमेरिका तर एक पाऊल पुढेच होती. येत्या बहात्तर तासांत इराणने आपल्याजवळील स्फोटकक्षम युरेनियमचा साठा नष्ट करावा, अन्यथा अमेरिकेला लष्करी कारवाई करणे भाग पडेल असा निर्वाणीचा इशारा दिला गेला. त्यावर इराणने थोडी आदळाआपट केली पण अखेर मान तुकवली. आणखी एक धोका पत्करायची, त्यांची हिंमत झाली नाही.

इराणच्या आण्विक कार्यक्रमाची माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव फक्त इवी हिर्रस्चलाच ठाऊक होते. त्यामुळेच चालुसऐवजी कर्शुनवर हल्ला चढवला गेला.
पण तो त्या व्यक्तीचे नाव सांगण्यास तयार नव्हता.

पंतप्रधान कार्यालयासमोरील रस्ता ओलांडत असताना, त्याने आपल्या हातातील फ्लॅशड्राईव्ह हवेत हलकेच उडवला.

संगणकतज्ज्ञांनी केलेले चमत्कार खरोखरंच विस्मयजनक होते*!*

डॉक्टर जोनाथन रॅन्सम आणि त्याची लावण्यवती पत्नी एम्मा, गिर्यारोहण करण्यासाठी आल्प्स पर्वतात गेलेले असतात. अचानक आलेल्या एका हिमवादळात ते दोघेही सापडतात; आणि त्यात एम्माचा मृत्यू होतो...

एम्माच्या मृत्यूनंतर जोनाथनच्या हातात एक पाकीट पडते. त्यात त्याला एम्माने इतके वर्षे त्याच्यापासून दडवून ठेवलेले, एक महाभयानक सत्य कळते...

ते सत्य म्हणजे; अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची, आंतरराष्ट्रीय दहशतवादाची व गुप्तहेरांची गुन्हेगारी दुनिया – अशी दुनिया की, जिथे प्रत्येक चेहऱ्याआड आणखी एक चेहरा लपलेला असतो. जिथे फक्त साध्य महत्त्वाचे असते, साधनांबद्दल कसलाही विधिनिषेध नसतो!

अनुवादित आवृत्ती

₹ 440
ISBN-
9788184495702

www.mehtapublishinghouse.com

मेहता पब्लिशिंग हाऊस